माझ्या आजोबांच्या झाडांना...

जनशक्ती
वाचक
चळवळ

दात । कादंबरी । सरदार जाधव
Daat | Novel | Sardar Jadhav

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

मुखपृष्ठ/मांडणी
सरदार

अक्षरजुळणी
सलीम एतेशाम,
औरंगाबाद

© सरदार जाधव
मु. ढोका, पो. पाचोड,
ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद-४३१११२
मो. ९८ ६० ५१ ६० ६८
Email : sardarsinghjadhav@gmail.com

प्रथमावृत्ती
२३ नोव्हेंबर २००९
(चांदणी)

मूल्य रु. ९०/-

मुद्रक
रुद्राणी, औरंगाबाद.

# ▪ चिंतन ▪

एक

# अन्नदात्याला पुरेसं खाऊ द्या, तो जगाला पोटभर खाऊ घालील

औद्योगिकीकरणाला युरोपमध्ये सुरुवात झाली आणि त्यावेळी इंग्लंडमधले जमीनदार आणि उगवता कारखानदार वर्ग यांच्या हितसंबंधामध्ये एक संघर्ष निर्माण झाला. इंग्लंडमधील या औद्योगिकीकरणाच्या आधी तिथे तुकडेबंदीची चळवळ झाली होती. विशेषतः लोकरीचा धंदा किफायतशीर होतो आहे असं दिसल्यानंतर तिथल्या जमीनदारांनी कुळांकडून अगदी पिढ्यान्‌पिढ्या त्यांना दिलेल्या जमिनी परत घेतल्या आणि त्या लांबरुंद पसरलेल्या जमिनींना कुंपण घालून शेती व्यापारीदृष्ट्या, प्रामुख्याने लोकरीच्या धंद्याची चालू केली. इंग्लंडमध्ये जेव्हा कारखानदारीला सुरुवात झाली तेव्हा, तुकडेबंदीच्या चळवळीनंतर प्रस्थापित झालेला हा जमीनदार वर्ग तसा देशामधला प्रबळ घटक होता. इंग्लंडमधल्या उच्च सभागृहांपैकी 'हाऊस ऑफ लॉर्डस्'वर त्याचं प्रभुत्व होतं. त्याचवेळी, नव्याने उदयास येणाऱ्या कारखानदार वर्गाचं प्रभुत्व 'हाऊस ऑफ कॉमन्स्' वर होतं. धान्यधुन्य परदेशातून आणणं स्वस्त पडत असेल तर ते आणायला परवानगी पाहिजे असं कारखानदारांचं म्हणणं तर अशाप्रकारे धान्य आयात केलं की संपूर्ण देशावर परिणाम होतो असं जमीनदारांचं म्हणणं. दोन्ही गट प्रबळ असल्यामुळे त्यांच्यामध्ये मोठा वादविवाद झाल. या वादविवाद अर्थशास्त्राच्या परिभाषेत 'धान्याच्या आयातीसंबंधीचे कायदे (Corn Laws) करण्यासंबंधीचा वादविद' असे म्हटले जाते. या वादाच्या निमित्ताने विकासाच्या प्रक्रियेमध्ये शेतीचं स्थान काय, शेतीतलं उत्पादन कसं वाढवता येईल यासंबंधी चर्चा झाली.

त्यानंतर जवळजवळ २०० वर्षानंतर पहिली समाजवादी क्रांती जेव्हा झाली तेव्हा रशियामध्ये अशाच प्रकारचा वादविद झाला. इंग्लंडमध्ये भांडवलशाही



पद्धतीची कारखानदारी सुरू झाली तेव्हा शेतीतून तयार होणारी बचत कशी वापरावी यावर ऊहापोह झाला होता. रशियामध्ये समाजवादी औद्योगिकीकरणाची क्रांती झाली तेव्हाही तशाच तऱ्हेने वादविवाद झाला. रशियामधील या वादविवादाला काही वेगळं महत्त्व आहे. रशिया स्वतःला मार्क्सवादी देश म्हणवत होता. आणि मार्क्सने स्वच्छपणे सांगितलं आहे की औद्योगिकीकरणाकरिता लागणारं भांडवल हे कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या, श्रमिकांच्या शोषणातून तयार होतं. शेतीचा भांडवलनिर्मितीशी काही संबंध नाही. शेती ही अडाणी, प्राचीन (Primititive) अवस्था आहे आणि अशा अडाणी क्षेत्रातून भांडवल निर्मिती होऊच शकत नाही. त्यामुळे कामगारांच्या शोषणातून तयार होणारी ही बचत कामगाराच्या हाती ठेवली तरच भांडवलशाही औद्योगिकीकरण देशांपेक्षा अधिक वेगाने होऊ शकेल आणि समाजवादी औद्योगिकीकरणही होऊ शकेल. कामगारांच्या शोषणातूनच भांडवल निर्मिती होते असं आग्रहाने मांडणाऱ्या मार्क्स्‌ने आणि मार्क्सवाद्यांनी, कारखानदारी उभी राहिल्याशिवाय कामगार होत नाही आणि कारखानदारीसाठी जे भांडवल लागतं ते कामगारांशिवाय कुठून आणले असेल या प्रश्नाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले.

तर अशा या मार्क्सवादी रशियामध्ये जेव्हा समाजवादी औद्योगिक क्रांती झाली तेव्हा बुखारीन आणि प्रियाब्रेझेन्स्कीचं या दोन अर्थशास्त्रज्ञांमध्ये मोठा वादविवाद लेखी स्वरूपात झाला. प्रियाब्रेझेन्स्कीचं असं म्हणणं होतं की कोणत्याही औद्योगिकीकरणाचा पाया हा शेतीच्या शोषणातच असतो आणि रशियामध्ये जर औद्योगिक क्रांती व्हायची असेल तर शेतीचं शोषण होणं आवश्यकच आहे; पण समाजवादी देशामध्ये, शेतकऱ्यांचं शोषण करावं असं म्हणणं तसं कठीणचं आहे. पण रशियामध्ये त्यावेळी जमीनदारी पद्धत होती. बड्या जमीनदारांना लेनिनने 'कुलक' असा शब्द वापरला होता. तेव्हा शेतीवर हा जो हल्ला झाला तो शेतकऱ्यांवर, शेतावर काम करणाऱ्या कुळांवर न करता या 'कुलका'वर करण्यात आला. या दोघा अर्थशास्त्रज्ञांचा जाहीर वादविवाद होत होता; पण राज्यकर्त्यांना, शेतकऱ्यांना पिळलं पाहिजे, लुटलं पाहिजे असं म्हणणं थोडंच परवडणार आहे? त्यांना निदान म्हणताना, कागदोपत्री, जाहीर सभांतून शेतकरी हा देशाचं कल्याण करणारा आहे, शेतकरी सुखी तर जग सुखी अशीच वाक्यं वापरावी लागतात. मग प्रत्यक्ष अवलंबिलं जाणारं धोरण वेगळं का असेना! राज्यकर्त्या कम्युनिस्ट पक्षाच्या

एका बैठकीत स्टॅलिननं या दोन्ही अर्थशास्त्रज्ञांचा तीव्र विरोध केला. बुखारीनला अटक करण्यात आली, प्रियाब्रेझेन्स्कीला फाशी देण्यात आले. अर्थशास्त्राचा गाढा व्यासंगी असलेल्या बुखारीनलाही नंतर कोर्टामध्ये माफीची आशा दाखवून त्याच्याकडून काहीही कबूल करवून घेऊन हास्यास्पद बनवले आणि नंतर मारून टाकण्यात आले. या दोघांनाही मारल्यानंतर स्टॅलिनने आपली शेतकऱ्यांविरुद्धची आघाडी उघडली. देशामध्ये दुष्काळ पडण्याची परिस्थिती निर्माण झाली होती, गव्हाची वसुली व्यवस्थित होत नव्हती आणि शेतकऱ्यांनी गव्हाची किंमत वाढवून मागितली. स्टॅलिनने म्हटलं की, शेतकऱ्यांना जर आज गव्हाच्या किमती वाढवून दिल्या तर उद्या हे शेतकरी सोन्याची घड्याळं मागतील आणि स्टॅलिनने रणगाडे पाठवून जमीनदारांचा बीमोड केला. त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आणि आता एक समाजवादी प्रयोग शेतीमध्ये होतो आहे, आम्ही सामुदायिक शेती करणार आहोत, आता हजारो, लाखो हेक्टर जमिनीची लागवड यंत्राच्या साहाय्याने कुळं किंवा मजूर करणार नाहीत; सहकारी संस्थांचे सदस्य करतील अशी मोठी जाहिरात करून आपल्या कृतीचं समर्थन केलं. आज आपल्याला दिसतं आहे की हा शेतीतला समाजवादी प्रयोग फसला आहे, तो बासनात गुंडाळण्याचं काम चालू आहे. हा प्रयोग फसण्याचं कारण स्पष्ट आहे. १९३० मध्ये जेव्हा स्टॅलिननं शेतीकऱ्यांवर रणगाडे पाठवले तेव्हाच मार्क्सवाद हा खोटा आहे, मार्क्सवादाचा पराभव झाला आहे हे सिद्ध झालं. कामगारांच्या शोषणातून भांडवलनिर्मिती होत नाही. ती होते शेतकऱ्याच्या शोषणातून हे सिद्ध झाल्यामुळे मार्क्सवादी अर्थशास्त्राला काही स्थान राहिलंच नाही. मार्क्सवादाचा पराभव १९३० मध्येच झाला. कापं गेली, भोकं राहिली होती ती बुजवण्याचं काम आता १९९० मध्ये सुरू झालं आहे.

पाश्चिमात्य देशांचं औद्योगिकीकरण हे त्यांच्या साम्राज्यवादावर आधारलेलं होतं. युरोपमधले चिमूटभर देश, पण या चिमूटभर देशांतील लोकसंख्या वाढता वाढता त्यांनी जगातले सगळे खंड व्यापून टाकले होते. आज आपल्याला लोकसंख्येवर मर्यादा ठेवण्याचा शहाणपणा सागंणाऱ्या युरोपीय लोकांनी दोनशे तीनशे वर्षांपूर्वी सगळं जग व्यापून टाकलं, अमेरिका पाहावी तर त्याच गोऱ्या लोकांनी भरलेली, दक्षिण अमेरिका पाहावी तर ती निम्मी त्यांनी भरलेली, आफ्रिकेमध्ये त्यांच्या मोठ्या वसाहती, आशियावर त्यांचंच साम्राज्य ऑस्ट्रेलियासारखा सबंध खंड त्यांनी ताब्यात घेतलेला. अमेरिका, कॅनडा या



त्यांच्या वसाहती आणि हिंदुस्थानसारखे देश म्हणजे साम्राज्याचा भाग. या वसाहती आणि साम्राज्यातल्या देशांतल्या शेतकऱ्यांचं शोषण करून पश्चिमात्य देशांनी आपल्या औद्योगिकीकरणाचा पाया घातला.

वसाहती हळूहळू स्वतंत्र झाल्या. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध होऊन गेले होतं, त्याच्यानंतर कॅनडाही स्वतंत्र झाला; ऑस्ट्रेलियातही, तो राणीला मानणारा देश असला तरी, इंग्लंडची अधिसत्ता राहिली नव्हती. दुसऱ्या महायुद्धानंतर, हिटलर आणि जपानने काय गोंधळ घातला असेल तो असो पण जोपर्यंत सूर्य आहे तोपर्यंत साम्राज्ये हटायची नाहीत अशी जी काही भावना लोकांच्या मनात होती ती नक्की गेली. वसाहती आणि साम्राज्ये सांभाळायची असतील तर केवळ प्रचंड फौजा आणि बंदुकींच्या साहाय्यानेच सांभाळता येतील अशी परिस्थिती तयार झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या धगीमधे पोळून निघालेल्या साम्राज्यवादी देशांना हे परवडण्यासारखं नव्हतं आणि ते करण्याची त्यांची तयारीही नव्हती. म्हणून दुसरं महायुद्ध संपल्यानंतर १९४५ते ५२ या आठ वर्षांमध्ये मोठ्या संख्येने देश साम्राज्यातून मोकळे झाले, स्वतंत्र झाले. जुन्या वसाहती, हिंदुस्थानसारखे नव्याने स्वतंत्र झालेले देश सोडताना साम्राज्यवाद्यांची काही युक्त्या केल्या. एकाचे दोन देश, तीन देश, चार देश असे तुकडे केले. ज्याला आपण आज तिसरं जग म्हणतो त्या तिसऱ्या जगातील देश राजकीयदृष्ट्या का होईना १९४७ नंतर स्वतंत्र होऊ लागले.

या स्वतंत्र झालेल्या देशांनी आर्थिक विकास करण्याकरिता, प्रगती करण्याकरिता १९४७ पासूनच प्रयत्न चालू केले. कुणी आपल्याला समाजवादी म्हणवलं, काही जणांनी समाजवादी पद्धती आहे म्हटलं, काहींनी स्वतःला अगदी कम्युनिस्ट म्हणवलं, काहींनी खुल्या बाजारपेठच्या व्यवस्थेचा पुरस्कार केला; पण प्रत्येक देशात काही ना काही नियोजनाची पद्धती उभी राहिली आणि गेली ४० वर्षे या पद्धतींनी काम चालू आहे.

इंग्लंडमध्ये भांडवलशाही औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली तेव्हा विकासाच्या प्रक्रियेमध्ये शेतीचं स्थान काय, भूमिका काय याविषयी प्रचंड वादविवाद झाला. रशियामधील समाजवादी औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीला पुन्हा तसाच वादविवाद झाला, संघर्ष झाले; पण दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या तिसऱ्या जगामध्ये औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली तेव्हा तशा प्रकारचा वादविवाद निदान शेतकरी संघटनेचे आंदोलन चालू होईपर्यंत कुठेही

चालू झाला नव्हता. शेतीची आर्थिक विकासातली भूमिका काय, नियोजनाच्या पद्धतीने शेतीचं काय होणार असे प्रश्नही मांडले गेले नाहीत ही मोठी चमत्काराची गोष्ट होती. काहीतरी वादविवाद व्हायला हवा होत. वादविवाद का झाला नाही?

वादविवाद का झाला नाही याला दोन-तीन कारणं दिसतात. पहिली गोष्ट म्हणजे वादविवादाला दोन पक्ष लागतात. या सर्व साम्राज्यांमध्ये जे जमीनदार होते त्यांचं स्वतःचंच जमीनदारीतलं स्वारस्य संपलेलं होतं. त्याच्याकडे जी संपत्ती होती ती जमिनीतून आली नव्हती, त्यांच्याकडची संपत्ती ही त्यांच्या व्यापारी कारभारामुळे कारखानदारी कारभारामुळे आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची बाजू मांडणारी, शेतीत स्वार्थ असलेली अशी माणसं कुणी नव्हती. जे कुणी होते ते जमीनदाराची बाजू मांडणारे होते. हिंदुस्थानातील जमीनदारांची भूमिका आणि शेतकऱ्यांची भूमिका या दोघांत मोठा फरक आहे. शेती आणि आर्थिक विकास यांचा परस्परसंबंध काय यांचा ऊहापोह करण्यापेक्षा नवीन विकासामध्ये आपल्या हाती काय पडेल ते पाडून घ्यावं या दृष्टीने या जमीनदारांनी नव्या शासनव्यवस्थेशी हातमिळवणी केली. कुणाला साखर कारखाना मिळाला, कुणाला सहकारी सोसायटी मिळाली आणि काय, काय! हे सगळे जमीनदार कारखानदारांचे साथीदार झाले. त्यामुळे शेतकऱ्यांची बाजू मांडणारं कुणी उरलं नाही म्हणून वादविवाद झाले नाहीत.

दुसरी गोष्ट. वादविवाद करण्याची गरजच काय होती ? जर काही बदल घडवून आणायचा असेल तर त्याच्याबद्दल वादविवाद होईल. इंग्रज साम्राज्यवाद्यांनी हिंदुस्थानच्या शरीरामध्ये रक्त शोषून घेण्याकरिता दीडशे वर्षे नळ्या खुपसूनच ठेवल्या होत्या. शोषणाची यंत्रणा तयारच होती आणि स्वातंत्र्य चळवळीवर ज्या जमीनदार, व्यापारी आणि कारखानदारांचंच प्रभुत्व होतं त्यांनी स्वातंत्र्यानंतर हाती सत्ता घेतली आणि इंग्रजांनी आयती तयार ठेवलेली यंत्रणाच ते चालवू लागले. सत्ता हाती आल्यावर त्यांचं काम एवढंच होतं की आतापर्यंत दुसऱ्याच्या नावावर शेतकऱ्यांच्या शोषणाचं यंत्र ते चालवत होते ते आता स्वतःच्या नावाखाली ते चालवायला लागले. यासाठी वादविवाद करण्याची गरज ती काय? देशाच्या विकासात शेतीचं आणि खेडेगावाचं स्थान काय आणि शहराचं स्थानं काय या प्रश्नावर महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्यामधे फार प्रचंड मतभेद होते. म. गांधींनी याबद्दल नेहरूंना स्पष्ट म्हटलं होते की, 'जवाहरलाल, याविषयी तुमची जी काही मतं आहे त्यांविरुद्ध



तुमच्याशी मला लढणं भाग पडेल' पण तरीही म. गांधींना अशा जवाहरलाल नेहरूंनाच आपला राजकीय वारसदार नेमावं लागलं आणि स्वातंत्र्य आल्यानंतर अंगावर पंचा नेसून हिंदुस्थानातील दरिद्रीनारायणाची बाजू मांडणाऱ्या म. गांधींच छोट्या उद्योगधंद्याच्या साहाय्याने खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत, देशातील सर्वात जास्त खंगलेल्या, लुटल्या गेलेल्या माणसाच्या दृष्टिकोनातून आर्थिक नियोजन झालं पाहिजे असं मानणारं स्वातंत्र्य लढ्याचं तत्त्वज्ञान फेकून दिलं गेलं आणि सहा महिन्यांच्या आता गांधीवादाचा पराभव होऊन नेहरूवादाचा जय झाला. एका अर्थाने, हा वादविवाद झाला, स्वातंत्र्याआधी झाला; पण स्वातंत्र्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत नेहरू -अर्थवादाची अनभिषिक्त सत्ता आली आणि ती गेली ४३ वर्षे चालू आहे.

वादविवाद झाला नाही कारण शेतकऱ्यांत वादविवाद करायची ताकद नव्हती; पण शेतकऱ्यांविरुद्ध बाजू मात्र मांडली गेली, इतकेच नव्हे तर ती अत्यंत क्रूरपणे, अत्यंत भयानकपणे मांडली गेली. उदाहरणार्थ, शेतीमालाची किंमत जर का वाढली तर शेतकऱ्यांचं नुकसान होणार आहे. ग्रामीण भागातल्या गरिबांचं तर फारच नुकसान होणार आहे; जर लोकांच्या राहणीमानाचा दर्जा वाढवायचा असेल तर धान्य स्वस्तच मिळायला पाहिजे अशा तऱ्हेची अत्यंत विपरीत भूमिका बहुतेक सर्व जाणत्या अर्थशास्त्राज्ञांनी मांडली आणि ती मांडताना अर्थशास्त्राला अजिबात मान्य होणार नाहीत अशा प्रचंड गफलती त्यांनी केल्या. एक उदाहरण पाहा. किमती वाढल्या म्हणजे शेतमजुरांचं नुकसान होतं हे दाखविण्याकरिता त्यांनी किमतीचा कोणता निर्देशांक घ्यावा ? त्यांनी शेतकऱ्याला काय किमती मिळतात हे नाही लक्षात घेतलं तर whole sale price lndex म्हणजे घाऊक व्यापारी ज्या किमतीने विकतात त्या किमती लक्षात घेतल्या आणि मग किमती वाढत्या की शेतमजुराचं नुकसान होतं असा त्यांनी निष्कर्ष काढून दाखविला. घाऊक किमतींचा निर्देशांक आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमती यांचा तसा काही संबंध नाही; पण हे लक्षात न घेता शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमती आणि शेतमजुरीची परिस्थिती या दोघांतील संबंध जुळवून दाखविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी घाऊक किमतीचा निर्देशांक आणि शेतमजुरांची परिस्थिती यांची तुलना करून शेतीमालाच्या किमती जितक्या वाढतील तितकी शेतमजुराची उपासमार जास्त होते असं हिंदुस्थातल्या अत्यंत मान्यवर आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळालेल्या अर्थशास्त्रज्ञांनी मांडलं आहे.

देशामध्ये काय दिसतं? एका बाजूला शहरामध्ये उंच उंच, मजल्यांच्या

इमारती तर दुसऱ्या बाजूला, शेतीमध्ये जगणाऱ्या लोकांच्या झोपड्या ढासळताहेत. हजारो, लाखो लोकांची रांगच्या रांग शहरांकडे लागली आहे. ज्या कुणाचा तर्क जागा आहे तो सांगू शकेल की या दोघांमध्ये ज्या काही देवघेवीच्या अटी आहे त्या उघड उघड ग्रामीण भागाच्या विरुद्ध आहेत; पण या अर्थशास्त्रज्ञांनी खोटी आकडेवारी तयार केली. मी मुद्दाम 'खोटी' ह शब्द वापरतो. कारण व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञांनी ज्या चुका करू नयेत, ज्या चुका केल्याबद्दल साध्या पदवीच्या परीक्षेच्या विद्यार्थ्याला नापास करण्यात येईल असल्या चुका करून, प्रत्यक्षामध्ये देवघेवीच्या अटी या शेतकऱ्यांना बाजूने आहेत असे सांगणारे विद्वत्ताप्रचूर प्रबंध या अर्थशास्त्रज्ञांनी अनेक लिहिले. त्यात त्यांनी युक्त्याही तशाच प्रकारच्या वापरल्या. शेतकऱ्यांच्या देवघेवीच्या अटींचा ऊहापोह करताना, शेतकरी कोणत्या वस्तू विकत घेतो त्याची यादी आणि त्या यादीमधील वेगवेगळ्या वस्तूंचे प्रमाण काय आहे याच्याशी जरा जरी खेळ केला की आपल्याला पाहिजे ते सोयीस्कार निष्कर्ष काढता येतात. त्याचबरोबर, देवघेवीच्या अटी बिघडल्या का सुधारल्या हे पाहताना आधार म्हणून कोणतं वर्ष घ्यायचं? एखादं वर्ष असं असू शकतं की त्यावेळी शेतीची परिस्थिती फारच वाईट होते आणि ते जर पायाभूत वर्ष धरलं गेलं तर त्यांच्यानंतर शेतीमध्ये सुधारणाच झाली असं दिसून येतं. समाजवादी देशांनी धान्याच्या उत्पादनाने प्रत्यक्ष आकडे कधी दिले नाहीत. जी भाषा केली ती नेहमी टक्केवारीची केली. आधी एक पोतं धान्य तयार होत असलं आणि दुसऱ्या वर्षी ४ पोती तयार झाली तर ४०० टक्के धान्यात वाढ झाली; पण ४ पोत्यांनी काही देशांच पोट भरू शकत नाही. अशा टक्केवारीच्या खेळाचा अवलंब करून हिंदुस्थानमधल्या अर्थशास्त्रज्ञांनीसुद्धा शेतकऱ्यांना बनवलं.

आजपर्यत, १९९० सालापर्यंत अर्थशास्त्रज्ञांची हिंदुस्थानात जी काही अधिकृत फळी आहे ती जवळजवळ यच्चयावत् शेतकऱ्यांच्या विरुद्ध एका बाजूने घोषणा करणारी, दुसऱ्या बाजूने शेतकऱ्यांवर आरोप करणारी अशा तऱ्हेची प्रचंड फळी उभी आहे. म्हणजे तिसऱ्या जगात वादविवाद झाले नाहीत कारण शेतकऱ्यांच्या बाजूने बोलायला कोणी नाही. वादविवाद जो काही झाला तो गांधी – नेहरूंत होऊन गेला आणि गांधीना कधीच फेकून देण्यात आलं, नेहरूवादानं जिंकलं. आणि त्यानंतर जुनं सगळं गांधीवादाचं अर्थशास्त्र फेकून देऊन शहराची बाजू मांडणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांनी एकतर्फी शेतकऱ्यांच्याविरुद्ध धोशाच चालवला आहे.



ही काही केवळ हिंदुस्थानातलीच स्थिती आहे असं नाही. तिसऱ्या जगातल्या सगळ्याच देशांची ही स्थिती आहे. आपण नेहमीच्या आपल्या शब्दात म्हणतो की गोरा इंग्रज गेला आणि काळा इंग्रज आला. हीच स्थिती तिसऱ्या जगातील जवळजवळ सगळ्या देशांची आहे. स्वातंत्र मिळाले म्हणजे प्रत्येक देशातून कुठं गोरा इंग्रज , कुठं गोरा फ्रेंच,कुठं गोरा डच, कुठं काळा गोरा जर्मन, कुठं स्पॅनिश यांच्याऐवजी काळा इंग्रज, कुठं काळा फ्रेच कुठं काळा डच, कुठं काळा जर्मन, कुठं काळा स्पॅनिश आला आणि त्या त्या देशामध्ये जो काही व्यापारी, उद्योगधंदा करणारा एक समाज साम्राज्यवादाच्या काळामध्ये साम्राज्यवाद्यांनीच उभा केला होता त्यांच्याच हाती सत्ता आली. शोषित हा क्रांती करीत नाही, शोषक क्रमाक २ हाच क्रांती करतो आणि या सगळ्या साम्राज्यांमध्ये शोषक क्रमांक २ हा स्वातंत्र्यानंतर हाती सत्ता घेऊन पुढे आला. हिंदुस्थानात स्वातंत्र्याची चळवळ पुढे नेताना गांधींना पुढे करण्यात आलं. कारण जर का ही चळवळ कारखानदारांची, व्यापाऱ्यांची झाली असती तर गांधींच्या स्वातंत्र्याच्या चळवळीच्या मागे जी काही कोट्यवधी माणसं उभी राहिली होती ती उभी राहिली नसती. पूर्वीच्या काळी किल्ल्याचे दरवाजे फोडायचे झाले तर त्याच्यावर हत्ती नेऊन धडक मारत असत आणि हत्ती घाबरायचा म्हणून मध्ये उंट उभा करायचा आणि हत्ती त्याला टक्कर मारायचा. या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये दरवाजा फोडण्याकरिता गांधीवादाचा उपयोग फक्त उंट म्हणून करण्यात आला. दादाभाई नौरोजी, रानडे किंवा गोखले बोलत होते शेतकऱ्यांविषयी; पण ज्या काही मागण्या ते करीत त्या मागण्या सगळ्या शहरातल्या नवीन व्यापारी वर्गाकरिता, नवीन कारखानदार वर्गाकरिता केलेल्या दिसून येतात. स्वातंत्र्याच्या चळवळीचं नेतृत्व जर काही दादाभाई, रानडे, गोखले यांच्या हाती राहिलं असतं आणि अशा जर मागण्या ठेवल्या असत्या तर त्याला सर्वसामान्य लाकांचा जो पाठिंबा मिळाला तो मिळणं शक्य नव्हतं. गांधींचा मुखवटा चळवळीनं घेतला, लोकांना वाटलं गांधीवाद जिंकला. प्रत्यक्षामध्ये नेहरूवाद्यांनी, कारखानदारांनी गांधीवादाला वापरून घेतलं. विचार गांधीवादाचा दाखवला; पण त्या चळवळीची खरी प्रेरणा ही गांधीवादाची नव्हती, ती नवीन कारखानदार, नवीन व्यापारीवर्गाचीच प्रेरणा होती.

४० वर्षांनंतर पाहिलं तर काय झालं? ४० वर्षांमध्ये या सगळ्या देशामध्ये काही समान गोष्टी आहेत. नियोजन करायचं म्हणजे काय? नियोजन करायचं म्हणजे आपल्या देशातली जी साधनसंपत्ती असेल त्याचा वापर जास्तीत जास्त

शहाणपणाने, देशातली सर्व लोकांच्या कल्याणाकरिता करणे, यांच्याऐवजी आपापल्या देशामध्ये इंग्लंड, अमेरिकेची मॉडेल्स् तयार करणे, तिथं कारखाने झाले म्हणजे तीच काय ती सुधारणा, शेतीप्रधान मानून आपण जर काही करायला गेलो तर मग त्याला अडाणीपणा म्हणायचा असाच विचार हा जवळ जवळ सगळ्या देशात राहिला. सुधारणा म्हणजे शेतीच्या अडाणीपणापासून दूर जाणे आणि लवकरात लवकर जाणे आणि त्याकरिता सगळ्या शेतकऱ्यांना घेऊन जायचा प्रयत्न नाही झाला, उलट त्याकरिता जुन्या गोऱ्या इंग्रजांनी ज्या तऱ्हेने संबंध देशाचं शोषण केलं, त्याच तऱ्हेने शोषण करून हिंदुस्थानमध्ये काळे इंग्रज बनले आणि त्यांनी देशाच्या बाकीच्या भागाचं शोषण चालू ठेवलं.

हिंदुस्थानाच्या बाबतीत दुष्काळ कायमचे पडत आले आहेत. अगदी तुकारामाच्या काळापासून दुष्काळ पडलेले आहेत. हिंदुस्थान हा सोन्याचा धूर निघणारा देश हे त्याचं वर्णन फक्त काही 'ब्राह्मण' लेखकांनी केलेलं आहे. सर्वसामान्य लेखकांच्या दृष्टीनं हा देश कधी सोन्याचा होता हे दिसत नाही. १९३७ मध्ये इंग्रजांनी आपल्या सोयीकरिता ब्रह्मदेश (म्यानमार) वेगळा केला. ब्रह्मदेशात होणारं भाताचं उत्पादन हे सगळ्या हिंदुस्थानातल्या एकूण बाजारपेठेकरिता महत्त्वाचं होतं. हा भात यायचा थांबला. ब्रह्मदेशातला हा भात मिळायचा थांबल्यावर दुसऱ्या महायुद्धाच्या काळामध्ये इंग्रज सरकारने आपल्याच देशामध्ये वसुलीची जी व्यवस्था सगळ्या दोस्त राष्ट्रांच्या सैन्यांना धान्य पुरविण्याकरिता अवलंबिली त्यामुळे लक्षावधी माणसे दुष्काळामध्ये मेली. बंगालमध्ये मेली, बिहारमध्ये मेली. त्यांच्यानंतर स्वातंत्र्य आलं. स्वातंत्र्याच्या वेळी जी काही फाळणी झाली त्या विभागणीमध्ये शेतीची जमीन पाकिस्तानात गेली त्या मानाने माणसं कमी गेली. पश्चिम पंजाब हा सगळ्यात जुना बागायती प्रदेश. इंग्रजांनी पहिल्यांदा जिथे कालवे आणले आणि शेतीला सुरुवात केली असा पहिला भाग, सगळ्यात संपन्न. तो पाकिस्तानमध्ये गेला आणि त्यामुळे गव्हाचाही पुरवठा कमी पडला. १९३७ मध्ये भात गेला, ४७ मध्ये गहू गेला. ४२ मध्ये इंग्रजांनी लढाईच्या काळामध्ये धान्याच्या तुटवड्याला तोंड देण्याकरिता रेशनिंगची व्यवस्था पहिल्यांदा आणली आणि परदेशामध्ये हिंदुस्थानातलं धान्य गेलं, तरी मग कुठे मिळेल तिथून तांबडी ज्वारी, पिवळा मका, काही वेळा अमेरिकेतून बटाटे असं सगळं आणून काही ना काही करत ही रेशनिंग पद्धत चालू ठेवली. १९४७ पर्यंत रेशनिंग किंवा धान्य वाटपाची



पद्धत ही एक शासनाची जबाबदारी झाली. प्रत्येकाला रेशन कार्ड आणि त्या रेशन व्यस्थेमध्ये धान्य पुरेसं देता येणं ही एक शासनाची जबाबदारी झाली. गेल्या ४० वर्षांमध्ये ही जबाबदारी पुरी करण्याकरिता वेगळेवेगळे खेळ करण्यात आले. १९४९ मध्ये रफी अहमद किडवाईनी असं सांगितलं की,'युद्धाच्या वेळी आपल्या अंगावर पडलेलं हे घोंगडं काढून टाका. माझा हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांवर विश्वास आहे. जर का तुम्ही इथं खुली बाजारपेठ चालू दिली तर रेशनिंगचीही व्यवस्था आवश्यक राहणार नाही आणि उत्पादनही वाढेल,' रेशनिंग दूर करण्यात आलं आणि खरोखरच काही काळ बाजारपेठमध्ये युद्धाच्या काळी जे काही भडकलेले भाव होते ते खाली आले. पण सरकारने धान्याचा साठा तयार करण्याऐवजी आता आपला धान्याचा प्रश्न सुटला आता आपल्याला कारखानदारीकडे वळायला हरकत नाही अशा आनंदामध्ये ते राहिले आणि त्यांच्यानंतर दोनच वर्षांनी पाऊस व्यवस्थित न पडल्यामुळे एकदम तुटवडा तयार झाला आणि धान्याचे भाव इतके कडाडले की सरकारही घाबरून गेलं आणि दोन वर्षांच्या आत रेशनिंगची व्यवस्था पुन्हा चालू करण्यात आली. एवढंच नाही तर त्यावेळी एक समिती सरकारनं नेमली. त्या समितीनं शिफारस केली की हिंदुस्थानामध्ये धान्याची स्वतंत्र अशी खुली बाजारपेठ असूच शकत नाही; सर्व धान्यांच्या सर्व बाजारांचं राष्ट्रीयीकरण करावं. त्या समितीच्या अहवालातील यासंबंधी जो काही भाग आहे तो आजही जर का शेतकऱ्यांनी वाचला तर हिदुस्थानातले शेतकरी बंड करून उभं राहायला तयार होतील. अशा तऱ्हेचा अहवाल सरकारला सर्वस्वी मान्य करणं काही शक्य नव्हतं. मग त्यांनी दुसरा मार्ग अवलंबिला. तो असा की परदेशामधून धान्य आयात करणं. त्यावेळी रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये मोठा वादविवाद चालू होता. नवीन स्वतंत्र झालेल्या देशांना आपापल्या ताब्यात घेण्यासाठी दोन्ही देश धावफळ करत होते. हिंदुस्थानला सगळ्यात मोठी गरज होती ती धान्याची आणि रशियामधून धान्य मिळायची काही शक्यता नव्हती. त्यामुळे तटस्थतेची घोषणा करत करत का होईना हिंदुस्थानात अमेरिकेकडून धान्याची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागली. धान्याच्या मोठ्या देणग्या स्वीकाराव्या लागल्या, PL 480 योजना चालू झाली. पुन्हा एकदा धान्य चांगले मुबलक मिळतं असं म्हटल्यानंतर अशोक मेहतांसारख्या विचारवंतानीसुद्धा काय वाक्य वापरलं? त्यांनी असं म्हटलं की, 'हिंदुस्थानाच्या बाहेर जर आपल्याला इतक्या स्वस्त दरात धान्य मिळणार असेल तर शेतीकडे आपण

काही काळ दुर्लक्ष करायला हरकत नाही आणि आपल्याला जेव्हा जेव्हा लागेल तेव्हा तेव्हा आपण परदेशातून धान्य आणत जाऊ, हिंदुस्थानातली शेती सुधारायचं काय कारण आहे आपल्याला?' यावरून तथाकथित समाजवादी म्हणवणाऱ्या माणसांचीसुद्धा संबंध देशातल्या नियोजनाबद्दल काय प्रवृती होती हे दिसून येतं; पण त्यानंतर रशिया आणि अमेरिका यांच्यातली परिरिस्थती जशी बदलत गेली जॉन फॉस्टर डग्लस्‌चा काळ संपला आणि वाटेल तितके पैसे देऊन धान्यधुन्य पुरवून तिसऱ्या जगातल्या देशांना आपल्या कह्यात आणण्याची आवश्यकता राहिली नाही आणि सतत आयातीवरती राहणं हे हिंदुस्थानसारख्या देशांनासुद्धा काही प्रमाणावर अपमानास्पद वाटायला लागलं त्यावेळी या धोरणामध्ये बदल करण्याची आवश्यकता तयार झाली. आर. के. लक्ष्मणचं व्यंगचित्र आहे. एक पुढारी-गलेलठ्ठ- खिडकीतून पाहतो आहे- आकाशामध्ये चांगले ढग आलेले आहेत- पाऊस येताना दिसतो तो म्हणतो की, '..आमच्या देशात लक्ष घालायचं कारण नाही' असं यंदा आपण अमेरिकेला सांगू शकू बरं का? ' जर का पाऊस आला नाही तर मग मात्र अमेरिकेकडे जाऊन शरणागती घेणं आवश्यक आहे अशा तऱ्हेचं हे धोरण चालवणं हिंदुस्थानसारख्या देशाला सतत काही शक्य नव्हतं.

यात फरक झाला. उत्पादन वाढवलं पाहिजे असं बोललं जात होतं PL 480 च्या या पहिल्या काळामध्येसुद्धा, देशामध्ये उत्पादन झालं तर उत्तम पण ते उत्पादन कसं करावं, देशातली उत्पादनवाढ कशी घडवून आणावी याच्याबद्दल नेहरूंचं एक वाक्य आहे. त्यांनी असं म्हटलं होतं की, 'देशाच्या विकासाकरिता शेतीचं अत्यंत महत्त्व आहे. शेतीइतक्या महत्त्वाचं क्षेत्र दुसरं कोणतंही नाही. शेतीवरती सगळ्या देश अवलंबून आहे. पण शेती म्हणजेच विकास काय? आपल्याला विकास घडवून आणायचा असेल तर त्याकरिता कारखानदारीची वाढ आवश्यक आहे, शेतीच्या विकासाकरितासुद्धा कारखानदारीची वाढ आवश्यक आहे; पण शेतीची वाढ ही आपल्याला घडवून आणली पाहिजे आणि दुर्मिळ भांडवल कमीतकमी शेतामध्ये वापरून आपल्याला हा विकास घडवून आणला पाहिजे.' जे म्हणायचं त्याच्या अगदी उलट सुरुवात करायची ही खास नेहरूशैली. मग शेतीमध्ये उत्पादन कसं काय वाढवून आणायचं? रशियन क्रांतीच्या आधी झारचा रासपुतीन नावाचा सल्लागार त्याला वेडेवाकडे सिद्धांत सांगत असे आणि त्यांची अंमलबजावणी झार अत्यंत क्रूरपणे करीत असे. हर्षमन हा नेहरू सरकारचा सल्लागार. त्या हर्षमनचं सबंध अर्थशास्त्रच



असं की, असंतुलित विकासामुळेच विकास होऊ शकतो, संतुलित विकास अशी काही गोष्टच नसते. म्हणजे काही लोकांना तुम्ही एकदम खूप चढवून दिलं तर ते आपल्या मागोमाग बाकीच्या लोकांना ओढत नेतात आणि सगळ्या देशाचा विकास होतो.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या आधी अशाच तऱ्हेचं तत्त्वज्ञान मार्केस् द सेंटने मांडलं होतं; की काही लोक प्रचंड श्रीमंतीत असले तर बाकीचा देश हा श्रीमंत होऊ शकतो. हर्षमनने असं मत मांडलं की शेतकरी हा अडाणीच असतो, त्याच्या शेतीमालाला भाव देण्याची काही आवश्यकता नाही. शेतीमालाला भाव दिल्यानं तो आपलं उत्पादन वाढवत नाही का कमी करत नाही. एखादं गाढव जसं त्याच्यासमोर गूळ ठेवला काय किंवा चिंधी ठेवली काय ते सारख्याच चवीनं चघळतं तसं कमी किमती द्या का जास्त किमती द्या, प्रत्येक शेतकरी त्याच्याकडे जी काही शेती असेल, त्याच्याकडे जी काही खतं असतील, मुतं असतील, औषधं असतील, बियाणी असतील ती साधनं वापरून जितकं जास्तीत जास्त उत्पादन काढता येईल तितकं तो काढतोच. त्याला काही मिळो का न मिळो आणि जर का विकास घडवून आणायचा असेल तर अशा शेतकऱ्याला शेतीमालाचा भाव देण्यापेक्षा त्याला आपण जमीन देऊ, पाणी देऊ, बियाणी देऊ, खतं देऊ, औषधं देऊ आणि शेतीमालाचे भाव कमी ठेवू. शेतीमालाचे भाव कमी ठेवले म्हणजे कारखान्यात कच्चा माल स्वस्त मिळेल, कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना जास्त मजुरी देण्याची गरज पडणार नाही आणि एका बाजूला उत्पादनही वाढेल आणि दुसऱ्या बाजूला कारखानदारीकरता लागणारे भांडवल स्वस्त कच्चा माल आणि स्वस्त धान्य या स्वरूपात उपलब्ध होईल. हर्षमन हा भारत सरकारचा नियोजनाचा अधिकृत सल्लागार होता आणि नेहरू काळामध्ये धरणं बांधावीत, त्याचं पाणी उपलब्ध करून द्यावं पण फारसं काही आधुनिक तंत्रज्ञानात जाऊ नये. कारण आधुनिक तंत्रज्ञानात जायचं म्हणजे शेतीमध्ये भांडवलाची गुंतवणूक करणं आवश्यक आहे, मग सहकारी शेती करावी, अशी मांडणी केली गेली. हिंदुस्थानातला भांडवली व्यापारी वर्ग आणि तथाकथित समाजवादी तत्त्वज्ञान यांची गाठ कशी पडली. पाहा! सगळ्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये समाजवादाचं नाव कुणी काढलेलं नव्हतं. गांधीजींनी ४२ मध्ये येरवड्याच्या तुरुंगामध्ये मार्क्स्‌चं पुस्तक पहिल्यांदा वाचलं. त्यांनी मत दिलं, 'जर हे पुस्तक मी लिहिलं असतं तर जास्त चांगलं लिहिलं असतं.' स्वातंत्र्याच्या चळवळीच्या नेत्याची

मार्क्सवादविषयी किंवा समाजवादाविषयीची ही भूमिका.

गांधीवाद टाकून दिल्यानंतर मग हिंदुस्थानातल्या कारखानदारांना समाजवादी हे खरे दोस्त झाले. समाजवादी आणि भांडवलदार यांची ही दोस्ती. नाव समाजवादाचं घ्यायचं आणि कामं जी करायची ती कारखानदारांची करायची आणि वर अशोक मेहतांसारखे पैशाला पासरी समाजवादी, ज्यांना समाजवादाची कल्पना नाही अशी माणसं त्यांच्या बाजूला उभं रहायला पहिल्यापासून तयार झाली. म्हणजे नेहरूंचा प्रयत्न पाणी पुरवा, जमीन लागवडीखाली आणा आणि धान्य पिकवा याच काळामध्ये देशाचं फार मोठं नुकसान झालं. ज्या जमिनी कुरणाखाली होत्या, ज्या जमिनी जंगलाखाली होत्या तिथं अधिक जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न झाला. कारण नवीन तंत्रज्ञान वापरण्याची काही शक्यता नसल्यामुळे अधिक जमीन तितकं अधिक पीक हे समीकरण.

१९६५ ते ६७ या काळामध्ये लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले आणि १८ महिन्यांमध्ये पहिल्यांदा शेतीक्षेत्राविषयी धोरण तयार होऊ लागलं. त्याचं श्रेय लालबहादूर शास्त्रींना ते शेतकरी घरातले होते, शेतकऱ्यांच्या प्रश्नाची थोडी जाणीव होती म्हणून त्याला द्यावं, का पाकिस्तानशी त्याच काळामध्ये जी लढाई झाली आणि धान्यधुन्याचा जो प्रश्न तयार झाला त्याला द्यावं? मला वाटतं, माणसं धोरण ठरवत नाहीत. १९६५ मध्ये पाकिस्तानशी लढाई झाल्यानंतर अमेरिकेने हिंदुस्थानवर फार मोठा दबाव आणला आणि त्या दबावाचा सगळ्यात जास्त परिणाम कशावर झाला असेल तर तो हिंदुस्थानातल्या धान्यव्यवस्थेवर. त्यावेळी शास्त्रीजींनी 'जय जवान जय किसान' ही घोषणा केली. एवढंच नव्हे तर आपला अन्नधान्याचा पुरवठा कमी असल्यामुळे रात्रीचं जेवण घेऊ नये, एक जेवण सोडून द्यावं इतकी भूमिका त्यांना घ्यावी लागली. त्यांच्या लक्षात आलं की याच्यापुढे कधी पाकिस्तानशी निर्णायक लढाई करायचा प्रसंग आला तर हिंदुस्थानला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी असण्याखेरीज पाकिस्तानशी लढता येणे शक्य नाही. कदाचित् त्या जाणिवेतून हा नवीन बदल घडून आला असावा; पण पहिल्यांदा नवीन तंत्रज्ञान, संकरित बियाणं, वाणं, नवीन औषधं, नवीन खतं आणि त्याच्याबरोबर शेतकऱ्याला उत्साह वाटेल अशा तऱ्हेची किमती देण्याकरिता कृषिमूल्य आयोगाची स्थापना झाली. या सगळ्या गोष्टी या १८ महिन्यांत घडल्या.

लालबहादूर गेले आणि त्यांच्यानंतर इंदिरा गांधी आल्या. इंदिरा गांधींनी नवीन आधुनिक तंत्रज्ञानाची काही पीछेहाट केली नाही कारण ते शक्यही



नव्हतं; पण कृषिमूल्य आयोग नेमल्यानंतर शेतकऱ्यांना उत्साह वाटेल अशा किमती मिळण्याचं जे काही धोरण होतं त्यामध्ये मात्र कुणालाही न सांगता, काहीही घोषणा न करता हळूहळू बदल करण्यात आला. कृषिमूल्य आयोगावर अध्यक्ष म्हणून कुणाकुणाला नेमलं गेल त्यांची यादी जर आपण पाहिली तर शेतकऱ्यांविरूद्धचा कट किती भयानक आहे हे लक्षात येतं. पहिले अध्यक्ष दातवाला, दुसरे अध्यक्ष लकडावाला, तिसरे अध्यक्ष धर्मनारायण, चौथे अध्यक्ष अशोक मित्रा आणि सगळ्यांचं साहित्य उपलब्ध आहे. धर्मनारायण आणि अशोक मित्रा यांनी उघड उघड शेतीमालाला जितका जास्त भाव मिळेल तितके देशातल्या गरिबांचे अधिक हाल होतील, अशी भूमिका मांडली. नेमकी निवडून निवडून शेतकरीविरोधी माणसं कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष झाल्यानंतर शेतकऱ्यांना किमतीच्या बाबतीत काय न्याय मिळणार हे उघड आहे. एवढंच नव्हे तर काही योजना अशा आखण्यात आल्या की शेतकऱ्यांना पाहिजे तर काही सोयी- सवलती देऊ, त्यांच्याकरिता रस्ते बांधायचे असले तर रस्ते बांधू, सहकारी संस्था उभ्या करायच्या असल्या तर त्या उभ्या करू, बँका उभ्या करू, बाजारपेठा तयार करू, नवीन तंत्रज्ञानातील बियाणी देऊ, त्या तंत्रज्ञानाला लागणाऱ्या सगळ्या वस्तू देऊ, प्रशिक्षण देऊ, प्रशिक्षण योजना काढू. म्हणजे पायाभूत बांधणी (Infrastructure)आणि तंत्रज्ञान आम्ही तुम्हाला किती हवं तितकं देऊ. का देऊ? तर हर्षमनने असं म्हटलं आहे की शेतकरी हा जितका त्याला व्यवस्था किंवा तंत्रज्ञान मिळेल तितकं उत्पादन काढतो, त्याला किमत देण्याची आवश्यकता नाही. किंमत न देतासुद्धा तो उत्पादन वाढवतो किंबहुना त्याचं उत्पादन आणि त्याच्या किमती यांचा काही संबंध नाही.

या सगळ्या वादामधे तीन घटक स्पष्ट दिसतात. शेतीच्या विकासाकरिता काय काय आवयश्क आहे? एक तर व्यवस्था असली पाहिजे- शेती नुसत्या जमिनीत होत नाही. शेतीसाठी लागणारा माल. शेतीपासून तयार होणारा माल आला पाहिजे, गेला पाहिजे, रस्ते असले पाहिजेत. रेल्वे असली पाहिजे, बाजारपेठ असली पाहिजे, पतपुरवठ्याची व्यवस्था असली पाहिजे. ही सगळी व्यवस्था लागतेच. त्याच्याबरोबर एक तंत्रज्ञानही लागतं. जुन्या गावठी पद्धतीनं काही फार उत्पादन वाढू शकत नाही; पण व्यवस्था आणि तंत्रज्ञान याच्याबरोबर शेतकऱ्याला उत्साह वाटेल अशी जर किंमत मिळाली नाही तर उत्पादन वाढतं किंवा नाही? हर्षमन आणि बाकीचे जे काही अर्थशास्त्रज्ञ आहेत त्यांच्या मते

जमीनबिमीन द्या, व्यवस्था द्या, तंत्रज्ञान द्या म्हणजे शेतकरी गाढवासारखं पिकवतोय. याला पहिला विरोध विचाराच्या पातळीवर शेतकरी संघटनेने केला. शेतकरी संघटनेने व्यवस्था किंवा तंत्रज्ञान यांचं महत्त्व मानलं नाही; पण व्यवस्था आणि तंत्रज्ञान विकणारी मंडळी बाजारात पुष्काळ होती. व्यवस्था, तंत्रज्ञान आणि किमती यांच्यातली निवड करायची झाली तर कशाची निवड करायची? खरं तर हा प्रश्न मूर्खासारखा आहे; पण व्यवस्था, तंत्रज्ञान आणि किमती यांच्यापैकी कुणाला वाचवायचं असा जर प्रश्न आला तर त्यांच्यापैकी किमती वाचवणं हेच महत्त्वाचं आहे. तुम्ही फक्त व्यवस्था आणि तंत्रज्ञान दिली तर ती भाकड राहतील. गोदामं बांधून दिली, भाकड राहिलील. पण जर का शेतकऱ्याला उत्साह वाटेल अशा तऱ्हेच्या किमती मिळाल्या तर तो उत्पादन वाढवेल, एवढंच नव्हे तर उत्पादन वाढविण्याकरिता जी काही व्यवस्था, जे काही तंत्रज्ञान आवश्यक आहे तेसुद्धा स्वतः तयार करून घेईल. त्याच्याकरिता बाहेरून कुणीतरी व्यवस्था आणि तंत्रज्ञान देण्याची आवश्यकता नाही.

मग हा जो जगापुढचा अन्नधान्याचा प्रश्न आहे तो कसा काय सोडवायचा? ४० वर्षे तिसऱ्या जगातल्या देशांमध्ये अन्नधान्याचा आणि विकासाचा प्रश्न समोर आहे. सर्व देशांनी व्यवस्था वाढविण्याचं प्रयत्न केले, तंत्रज्ञान वाढवण्याचे प्रयत्न केले, व्यवस्था आणि तंत्रज्ञान वाढवलं हे एका दृष्टीनं सोयीचं. व्यवस्था आणि तंत्रज्ञान वाढवलं म्हणजे शेतकरी उत्पादन वाढवतो. त्याचबरोबर व्यवस्था आणि तंत्रज्ञान वाढवताना जो काही पैशाचा खर्च होतो त्याचा सगळ्यात जास्त फायदा हा मुळी पुन्हा कारखानदार आणि शहरातील लोक आणि त्यांच्या नातेवाईकांना संबंधितांनाच होतो. पाणी आम्ही शेतकऱ्याला देतो म्हणायचं पण काँट्रॅक्ट हिंदुस्थान कन्स्ट्रक्शनला. त्यामुळे त्याच्यामधला प्रत्यक्ष सगळ्यात मोठा फायदा हा 'इंडिया'तल्याच लोकांना होतो. खतं, औषधं आम्ही तुम्हाला पुरवतो पण ONGC मध्ये काम करणारी माणसं काही शेतकरी नाहीत. मोठ्या प्रमाणावर जी गुंतवणूक होते, रस्त्याची म्हणा, बांधकामाची म्हणा किंवा बँका ज्या तयार होतात, बाजारव्यवस्था जी तयार होते त्या सगळ्या व्यवस्थेमध्ये शेवटी प्रत्यक्षात सगळ्यात जास्त फायदा कुणाला होत असेल तर तो बिगरशेतकरी समाजालाच होतो. त्यामुळे, शेतकरी वर्गाचं नाव घ्यायचं, शेतकऱ्याचं कल्याण करतो म्हणायचं आणि प्रत्यक्षात कार्यक्रम असे हाती घ्यायचे की ज्याचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्याऐवजी बिगरशेतकरी समाजालाच मिळेल आणि शेतकऱ्याला व्यवस्था आणि तंत्रज्ञान दिलं म्हणजे तो उत्पादन



वाढवेल असं म्हणत राहायचं. पण या प्रयोगाचा ४० वर्षांमध्ये पराभव झाला आहे.

सगळ्या जगाला जर पुरेसं खाऊ घालायचं असेल तर काय करावं? विकासाचा प्रश्न, औद्योगिकीकरण, भांडवल वगैरे सोडून द्या; पण सगळ्या जगाला खाऊ घालण्याइतकं पुरेसं धान्य तयार व्हायचं असेल तर त्यात मोठी अडचण काय? त्यात मोठी अडचण अशी आहे की सोन्याची अंडी घालणारी कोंबडी कापून खाण्याचा प्रयत्न चालला आहे. तो थांबला पाहिजे. तिच्या पोटात खूप अंडी आहेत असं म्हणून ती कापून खाल्लीत तर ती अंडीही मिळायची नाहीत आणि काहीच मिळायचं नाही. या अंडी घालणाऱ्या कोंबडीला जर खाऊ घालण्याची तुम्ही व्यवस्था केली, जो अन्नधान्य पिकवतो त्याला उपाशी राहावे लागणार नाही अशी जर व्यवस्था असली तर तो उत्साहाने अधिक पिकवेल. अधिक पिकवल्यांनर आपल्या हाती काही बचत राहते असं म्हटल्यानंतर तो स्वतः व्यवस्थाही वाढवेल, संशोधनही करेल, नव्यानव्या पद्धतीही अवलंबेल, नवंनवं तंत्रज्ञानही शोधून काढेल. जग उपाशी राहातं आहे याचं प्रमुख कारण आपण अन्नदात्याला उपाशी ठेवतो आहोत, अन्नदात्याला जर उपाशी ठेवलं नाही तर जगाला खाऊ कसं घालावं हा प्रश्न काही फारसा राहणार नाही.

(जूनच्या शेवटच्या आठवड्यात पॅरिस येथे जगातील ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आणि नियोजनकारांची जगापुढे उभ्या ठाकलेल्या अन्नधान्य तुटवड्याच्या समस्येतून मार्ग काढण्यावर विचार करण्यासाठी एक परिषद झाली. शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांना या परिषदेत आपले विचार मांडण्यासाठी बोलावले होते. परंतु ऐनवळी दिल्लीतील कामकाजामुळे त्यांना जाता येणार नाही असे लक्षात आल्याने ''How to feed the world?'' या समस्येवर तोडगा काढण्यासाठी भरलेल्या या परिषदेत आपले विचार ''Feed the feeder to feed the world'' या निबंधाद्वारे पाठविले. या निबंधाचा आशय श्री. शरद जोशी यांनी कृषी अर्थ प्रबोधिनीतील शिबिरार्थींना समजावून सांगितला. त्यावर आधारीत हा लेख.)

(शेतकरी संघटक, ६ जुलै १९९०)

■

दोन

# प्रशिक्षणाचा खरा अर्थ

शाळेत आपण गेलो की कुणीतरी शिक्षक आपल्यासमोर येतो. पुस्तकांत काहीतरी लिहिलेलं असतं, एकामागून एक धडे शिक्षक शिकवत राहतात आणि परीक्षेला यातलं काही तरी उत्तर द्यायला लागेल हे समोर ठेवून ती उत्तरे कशी द्यावी याची तयारी व्हावी या दृष्टीने थोडीशी पोपटपंची करायला आपण शिकतो. काही ठराविक प्रकारच्या प्रश्नांना ठराविक प्रकारची उत्तरे दिली म्हणजे परीक्षेत आपण पास होऊन जाऊ, मग नंतर त्या विषयाचा आपला काही संबंध राहिला नाही तरी चालेल; एकदाचा शिक्का मिळाला की आपण कर्तव्यातून मोकळे झालो अशा कल्पनेतून आपण शाळा-कॉलेजातून जात असतो.

कृषि अर्थ प्रबोधिनीतील या प्रशिक्षणवर्गाची कल्पना थोडी वेगळी आहे. कशी वेगळी आहे हे समजून घेण्याकरिता शेतकरी संघटनेच्या गेल्या दहा वर्षांतील यशाचं, अपयश पुष्कळ आहे पण त्यातलं जे यश आहे त्याचं कारण काय हे समजावून घेतलं तर या प्रशिक्षणवर्गाची आणि वर्गातील कामाच्या पद्धतीची सहज कल्पना येईल. शेतकरी संघटनेची आंदोलनं काही पुढे गेली, काही मागे गेली. कांद्याला भाव वाढवून मिळाला, उसाला मिळाला, दुधाला मिळाला, कपाशीला मिळाला. रक्कम काढायला गेलो तर खूप मोठी रक्कम होईल. अगदी कर्जमुक्तीच्या वेळचा आकडा घेतला तरी हिंदुस्थानामध्ये चार हजार कोटी रुपयांची कर्जमुक्ती ही शेतकरी संघटनेच्या आंदोलनातून निघाली याबद्दल कुणाला शंका नाही. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने शेतकऱ्यांचा रुपया-पैशांत किती फायदा झाला असे विचारले तर हजारो कोटी रुपयांचा फायदा झाला हेच त्याचे उत्तर येईल. पण माझ्या दृष्टीने तो फारसा महत्त्वाचा नाही.

शेतकरी संघटनेने घडवून आणलेली सगळ्यात अद्‌भुत गोष्ट कोणती? दहा



वर्षापूर्वी शेतकऱ्याला सूट नको, सबसिडी नको, भीक नको, लाचारी नको फक्त त्याच्या घामाचे दाम पाहिजे असा शेतीमालाच्या भावाचा प्रश्न शेतकरी संघटनेने मांडला. त्यावेळी सगळे पुढारी, सगळे नेते, सगळे अर्थशास्त्री कुचेष्टा करत होते, हसत होते. 'शेतीमालाच्या भावाचा एककलमी कार्यक्रम'हा चेष्टेचा विषय झाला होता. 'हे वैद्यबुवा प्रत्येक रोगावर जुलाबाचे औषध देऊन राहिलेत'' अशी या विचाराची अवहेलनाही झाली. आज दहा वर्षांनंतर या विचाराला राजमान्यता मिळाली, एवढंच नव्हे, विद्वन्मान्यता मिळाली एवढंच नव्हे तर सर्व देशभर शेतकरीमान्यता मिळाली. सर्वसामान्य लोकांची या विचाराला मान्यता मिळाली. एखाद्या शेतकऱ्याला कुणी पुढारी भेटला आणि म्हणाला की तुझ्या मुलाला मी नोकरी लावून देतो तर तो शेतकरी अजूनही त्या पुढाऱ्याच्या मागे धावेल, नाही असं नाही; पण शेतकऱ्याच्या मनामध्ये कुठंतरी एक मोठा बदल घडून आला आहे. आज पुढाऱ्याच्या मागे धावताना त्याच्या मनात येत राहील की हे बाकीचं काही खरं नाही; जोपर्यंत आपली शेती तोट्याची आहे तोपर्यंत काही जमायचं नाही; शेती फायद्याची झाली तर कोणताही प्रश्न उरणार नाही. हा फरक कशाने पडला?

दहा वर्षांमध्ये देशभरचा म्हणा किंवा महाराष्ट्रभरचा म्हणा, एक मोठा प्रशिक्षणवर्ग शेतकरी संघटनेने चालविला. आंदोलनं जी झाली त्या आंदोलनांचा हेतू हाच होता. वर्गात बसून नुसतं शिकवलं तर या कानातनं येऊन त्या कानातनं निघून जातं. पण त्याबरोबरच काही प्रात्यक्षिक असलं, प्रयोग असला म्हणजे तो धडा नीट ठसतो. चांकणच्या कांद्याच्या आंदोलनाने शेतकऱ्यांवरील अन्यायाचं एक उदाहरण शेतकऱ्यांच्या समोर आलं. त्या आंदोलनाचा काहीएक परिणाम झाला. कपाशीच्या, शेवटच्या आंदोलनाच्या निमित्ताने ठरलं की गेल्या वर्षीची मिळत असलेली कपाशीची किंमतसुध्दा यंदा मिळत नाही म्हणजे काय? शेतकऱ्यांना अन्यायाची जाणीव झाली. शासन हे काही मायबाप नाही, जिथं शक्य असेल तिथं शेतऱ्यांच्या माना कापायला कमी करत नाही आणि त्याविरुध्द शेतकरी उभा राहू शकतो असं कापूस आंदोलनानं शेतकऱ्यांना शिकवलं. असं एक सगळ्या महाराष्ट्रभर चाललेलं प्रशिक्षणवर्गाचं एक मोठं, दहा वर्षांचं सत्र.

पण आपल्या हातामध्ये तशी साधनं काही नव्हती. पुस्तकंसुध्दा, आपल्या काही सहकाऱ्यांनी आग्रह धरला म्हणून एवढी तरी बाहेर आली. साप्ताहिक-पाक्षिक चाललं पण तेही काही नियमानं चाललं असं नाही. काही काळ

साप्ताहिक 'वारकरी' चालला, मग त्यानंतर पाक्षिक 'शेतकरी संघटक' चालू झाला, पुढे काही काळ साप्ताहिक 'ग्यानबा' चालला. आता पुन्हा 'शेतकरी संघटक'; पण या साहित्यामुळेच काही बदल घडून आला किंवा हा संदेश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला असं म्हणणं कठीण आहे. मग हा प्रचार घडला कसा?

एका बाजूला काँग्रेस (आय्)ची सत्ता, काँग्रेस (आय्)नं सगळ्या शेतकऱ्यांमध्ये सहकारी संस्थांचं जाळं विणलेलं. प्रत्येक जिल्हामध्ये, प्रत्येक तालुक्यात एखादा सहकारमहर्षि, सहकारश्रेष्ठी. कुणी काका, कुणी अण्णा, कुणी तात्या, कुणी मामा. हे सर्व साहेब सर्व शेतकऱ्यांना अगदी पंजामध्ये पकडून बसलेले आणि तरीदेखील एवढ्या ताकदीच्या विरुद्ध जाऊन शेतकरी संघटना हा विचारातला बदल कसा काय घडवून आणू शकली? खरं तर हा चमत्कारच वाटावा. पण याचं उत्तर देण्याचा मी प्रयत्न करणार आहे; पण हे उत्तर खरं आणि शेवटचं आहे असं मलाही वाटत नाही.

मला असं वाटतं की शेतकरी संघटनेने लोकांसमोर जाऊन त्यांच्यापुढे एक आरसा ठेवला. जो काही विचार सांगितला तो ऐकल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याच्या मनामध्ये असं काहीतरी वाटायला लागलं की, अरे आता कुठं काही तरी जमलं, इतके दिवस जे काही विस्कळीत चित्र वाटत होतं ते या आरशात पाहिल्यानंतर त्याचे तुकडे एकमेकांना जमतात. सगळ्या प्रश्नांची उत्तर इथं मिळतात असं त्या शेतकऱ्यांना प्रामाणिकपणानं वाटायला लागलं म्हणून शेतकरी संघटनेचा विचार पसरला. प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये जन्मल्यापासून किंवा समजायला लागल्यापासून एक अनुभवाचं मोठं गाठोडं तयार झालेलं असतं; पण ते वेगवेगळे अनुभव वेगवेगळे तुकडे असल्यासारखे आहेत. आजच्या अर्थव्यवस्थेत आणि शिक्षणपद्धतीत या तुकड्यांना एकत्र करील असा विचार नाही. या शिबिरातील एका कार्यकर्त्याने शेतकरी म्हणून अनुभव घेतला, उसाच्या शेतीचा. त्याच्यानंतर व्यापारी म्हणून अनुभव घेतला. उसाला भाव मिळाला नाही आणि व्यापारी झाल्यानंतर तिथेसुध्दा थकबाकी वाढतच राहिली. कारण आजूबाजूचे काय कापूस, ऊस पिकविणारे शेतकरी असतील त्यांचीसुद्धा थकबाकी देण्याची पात्रता नाही किंवा ताकद नाही. असे सगळे वेगवेगळ्या अनुभवांचे तुकडे एकत्र असलेले गाठोंडे घेऊन प्रत्येकजण चाललेला. त्या सगळ्यांचा अर्थ लावण्याची ताकद काही आपल्यात फारशी नसते किंवा अर्थांच्या बाबतीत दिशाभूल झालेली असते. शेतकरी संघटनेने आपला विचार



सांगितला आणि ऐकता ऐकता शेतकऱ्यांच्या मनात यायला लागलं की अरे, हे खरं आहे, कारण माझा अनुभव असा आहे, माझी जी प्रचीती होती त्या प्रचीतीचा सिद्धांत फक्त कळतो आहे, शब्द संघटनेचे आहेत; पण अनुभव माझा आहे. ही जाणीव जेव्हा सगळ्या शेतकऱ्यांमध्ये झाली तेव्हा ते महाराष्ट्रभर चालवलेलं एक खुलं विद्यापीठ, खुल्या आकाशाखालचं विद्यापीठ होतं. हजारो सभा झाल्या; पण ते एका आर्थाने शिक्षणच होते.

अनुभवांच्या अनाकलनीय तुकड्यांच्या गाठोड्याला जाणिवेने एकसंध चित्राच्या स्वरूपात पाहाण्याइतपत बदल महाराष्ट्रामध्ये घडून आला; पण सगळ्या सभांमध्ये काय कितपत सांगितलं जातं? कोणत्याही एका गावी काही ठराविक वेळ दिला जात नाही. इतरही बंधनं असतात. स्थानिक कार्यकर्त्यांनाही वाटतं की इतकी सभा जमली आहे तर आपणही थोडं बोलावं. मग जो काही सभेचा तासदीडतास वेळ असेल त्यातील अर्धा-पाऊण तास मला किंवा सभेसाठी गेलेल्या प्रमुख कार्यकर्त्यास मिळतो. मग सर्वसाधारण लोकांना ज्यात स्वारस्य आहे, अगदी नव्याने शेतकरी संघटनेशी ओळख करून घेत आहे अशा शेतकऱ्यांनासुद्धा समजतील असेच विषय फक्त त्या सभेत घेता येतात. बहुतेक लोकांच्या गाठोड्यांतील अनुभवांच्या तुकड्यांची संगती लागते एकमेकांशी; पण तुमच्यासारख्या काही लोकांच्या बहुतेक तुकड्यांची संगती लागली तरी काही तुकडे तसेच राहून जातात. बाकी सर्व समजलं भाषणातून; पण अमुक अमुक गोष्टींचा यातून खुलासा होत नाही. शिल्लक राहिलेले हे प्रश्न कसे सोडवायचे?

हे सोडवण्याकरिता, खरं म्हणजे, कृषि अर्थ प्रबोधिनीतील या प्रशिक्षणवर्गांची योजना आहे. इथं काही शिकायचं आहे आणि मग इथून जाऊन, इथं डोक्यावर घेतलेलं ज्ञानाचं गाठोडं तिथं जाऊन शेतकऱ्यांच्या डोक्यावर ओतायचं आहे असा काही प्रकार नाही. किंबहुना, इथून तुम्ही गेल्यानंतर शेतकरी संघटनेच्या प्रचाराचं काम केलंच पाहिजे असासुद्धा मुळीच आग्रह नाही; पण माझी खात्री आहे की, जो मनुष्य इथं मन उघडं ठेवून नीटपणे विचार व विचारपद्धती समजावून घेईल त्याला असा काही एक भुंगा इथं लागणार आहे की तो घरी गेल्यानंतर त्याला स्वस्थ बसूच देणार नाही. एखादी गोष्ट पटली नाही तर पटली नाही असे स्पष्टपणे सांगायला काही हरकत नाही; पण निदान तो विचार समजून घेताना जे जे काही सांगितलं जात आहे त्याचा आपल्या अनुभवाशी काही संबंध आहे का एवढं फक्त प्रामाणिकपणे तपासून घ्यायचं आहे.

आणि ही लहानसहान नव्हे, फार मोठी गोष्ट आहे. मी विद्यार्थ्यांना एक पत्र लिहिलं आहे, ''शेतकरी विद्यार्थी संघटना काढायची म्हणजे कुठं जाऊन मिरवणुका काढायची गरज नाही, कुठं जाऊन दगड फेकायची गरज नाही. तुम्ही आंदोलनात यावं अशीही माझी इच्छा नाही. कारण तुम्हाला मी आंदोलनात ओढलं तर उद्याचं बियाणं मी आजच खाण्याकरिता वापरून टाकलं असं होईल. तुम्ही शेतकऱ्याची मुलं आहात. उद्या शेतकरी समाजाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुमच्या या काळामध्ये तुम्ही विद्याच करणं आवश्यक आहे. पण ही विद्या करताना, जी करता ती विद्याच आहे किंवा नाही हे तपासून पाहा. नाहीतर अविद्या ही तुम्हाला विद्या म्हणून शिकविली जाईल आणि एका अर्थाने तुम्ही हनुमानासारखे आहात. 'भूमिकन्या' सीतेच्या शोधात रावणाच्या लंकेत आला आहात आणि रावणाचं सगळं एवढं मोठं वैभव, सोन्याची लंका. रामाकडे काय असणार – फाटकी वल्कलं नेसून जंगलात कंदमुळं खाणारा तो. तुम्हाला आईबापांनी खेडगावातनं शहरात पाठवलं, या झगझगत्या, सगळे ऐश्वर्य असलेल्या जगामध्ये पाठवलं आणि जर का तुम्ही रावणाच्या या सोन्याच्या लंकेच्या मोहात पडलात तर सीतेला तुम्ही तसंच सोडून रावणाच्याच दरबारात दाखल होण्याची शक्यता आहे आणि मग रामायण कधी घडायचंच नाही. कदाचित, तुम्हाला रावणाच्या दरबारात, जेव्हा पुढे कधी राम येईल तोपर्यंत सुखाची नोकरी मिळेल. पण तेवढ्या काळात सीतेची काही मुक्ती होणे शक्य नाही.''

मग काय विचार करा म्हणून मी विद्यार्थ्यांना सांगितलं? ''ही जी माणसं आजूबाजूला तुला दिसतात, चांगल्यापैकी घरात राहतात, घरात दिवे आहेत, खिडक्यांना पडदे लावलेले आहेत, आईबाप–मुलं एकमेकांशी बोलतात, खेळतात, फिरायला जातात. ते काही फार श्रीमंत आहेत असं नाही; पण कुटुंब म्हणून जे काही आयुष्य असतं ते जगतात. तुम्ही निदान स्वतःला असा प्रश्न विचारा की, माझ्या आई–बापांनी असं कोणतं पाप केलं आहे की त्यांना असं कधी जगता आलं नाही, एक दिवससुद्धा? हा प्रश्न जर तुम्ही विचारला नाही स्वतःला तर तुम्ही विद्यार्थी नाही आणि या प्रश्नाचं उत्तर जर तुम्हाला दिलं गेलं नाही तर तुम्हाला शाळेत किंवा कॉलेजात शिकविली जाणारी विद्या ही मुळी विद्याच नाही.''

ज्याने आसपासच्या परिस्थितीचा अर्थ लागत नाही ती विद्या कसली? इथं तुम्ही जे आला आहात तेसुद्धा पुस्तकं, काही वाक्यं पाठ करण्याकरिता नाही. एखाद्या भुकेलेल्याला जर दयाबुद्धीने काही पैसे दिले तर तो कदाचित त्या



दिवसाची भाकरी खाईल; पण त्याला जर का कुऱ्हाड दिली तर तो कामाला लागेल आणि रोज भाकरी खाईल अशी गोष्ट आमच्या लहानपणी सांगितली जाई. इथे तुम्हाला, शेतकऱ्यांच्या पुढे जाऊन मांडण्याकरिता अशी काही तयार गाठोडी, तयार शिदोरी दिली जाणार नाही. विचार कसा करावा इथपासून तुमच्या मनाची खात्री पटवून घेणं हा खरं तर इथल्या प्रशिक्षणवर्गाचा हेतू आहे आणि एकदा हे विचाराचं हत्यार तुम्हाला गवसलं की मग आपापल्या गावी गेल्यानंतर, आपल्या तालुक्यात, जिल्ह्यात गेल्यानंतर नवीन काही प्रश्न निर्माण झाला तर, ''आम्हाला काही याचं उत्तर शिबिरात सांगितलं नव्हतं.'' असं म्हणायची वेळ येणार नाही. पाठांतरावर भिस्त असणारा एखादा ढ विद्यार्थी कसं म्हणतो? परीक्षेचा पेपर फुटला आहे; पण याचं उत्तर काय द्यायचं ते आपल्याला मास्तरांनी सांगितलेलं नाही; पण जो अभ्यासू असतो तो म्हणतो गुरुजींनी हाच प्रश्न नेमका नाही सांगितला; पण त्या अमुक एका प्रश्नाच्या उत्तरात जी रीत गुरुजींनी सांगितली ती या प्रश्नाच्या परिस्थितीत वापरली म्हणजे उत्तर येतं.

या स्वरूपाचं, एक फार आनंद देणारं उदाहरण घडल्याचं मला आठवतं. १९८४ सालच्या महाराष्ट्र प्रचारयात्रेतील घटना आहे. यवतमाळ जिल्ह्यात एका गावी प्रचारयात्रा थांबली होती. काहीतरी कुरमुरे वगैरे वाटण्याचं काम चालू होतं. दोन कार्यकर्ते एकमेकांत चर्चा करत होते. विषय होता, नुकतेच बिहारमध्ये एका हरिजन शेतमजूर बाईवर झालेल्या बलात्काराच्या घटनेचा. एक कार्यकर्ता म्हणत होता, ''तिथे शेतकऱ्याने त्या बाईवर बलात्कार केला. मग तुम्ही कसं म्हणता की शेतकरी विरुद्ध शेतमजूर असा संघर्ष नाही?'' त्यावर दुसऱ्या कार्यकर्त्याने अत्यंत शांतपणे सांगितलं की, ''त्या हरिजन शेतमजूर स्त्रीवर बलात्कार झाला याचं एकमेव कारण आहे की शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही.'' त्याने जो काही तर्क मांडला, जो काही निष्कर्ष काढला तो तर आहेच पण हे सारं त्यानं ज्या आत्मविश्वासानं सांगितलं हे पाहता त्यामागे एक मोठा अर्थ आहे की, सगळ्या समाजातल्या सगळ्या छेदाछेदांचं कारण काय? सगळ्या समाजाला जी काही साचलेल्या डबक्याची अवस्था प्राप्त झाली आहे त्या डबक्यातले किडे एकमेकांशी जी काही मारामारी करताहेत त्यामागचं जे काही तात्पुरतं कारण आहे त्याचं काय महत्त्व आहे? मुळामध्ये डबकं झालंय मग त्यातले किडे किड्यासारखेच वागायला लागतात. हे त्यानं मोठ्या आत्मविश्वासानं सांगितलं.

अपेक्षा अशी आहे की इथून जाताना तुम्ही हातामध्ये एखादं नवीन हत्यार घेऊन जाल आणि हे हत्यार माझ्याकडे आहे, विचारांचे, तोपर्यंत कोणीही समोर येवो – तो स्थानिक कॉलेजमधला मान्यवर अर्थशास्त्रज्ञ असो का एखादा पुढारी असो, कारखान्याचा अध्यक्ष असो का सोसायटीचा कुणी असो त्याचा सामना मी करू शकतो हा आत्मविश्वास कमावून जाल. माझ्या हातातलं हत्यार हे जगातल्या सर्व ताकदीपेक्षा श्रेष्ठ आहे असा तुम्हाला अभिमान वाटेल. एक भला मोठा पहेलवान व दुसरा ताकदीने अगदी किरकोळ मनुष्य आहे; पण त्या किरकोळ माणसाच्या हातात जर हत्यार असलं तर तो भल्यामोठ्या पहिलवानाचासुद्धा सामना करू शकतो. त्याचप्रमाणे तुम्ही इथून घेऊन जावं अशी अपेक्षा आहे त्या हत्याराच्या साहाय्याने बाकीची साधनं, संपन्नता असलेली माणसं तुमच्यापुढे फिकी पडावी.

हे हत्यार हस्तगत करता करताच ते चालवायचं कसं याचा सरावही इथेच करायचा आहे. मनात आलेला कोणताही प्रश्न विचारायला मागेपुढे पाहू नका. इथं काही कुणी शिकवणार नाही. जसं तुम्ही तुमच्या अनुभवाचा अर्थ लावता आहात तसंच इथले प्रशिक्षकसुद्धा काही शिकून थांबलेले नाहीत. एक मोठा फरक लक्षात घ्या. शाळा–कॉलेजमधला शिक्षक साधारणपणे आवश्यक पदव्या घेतल्या, डी.एड्.– बी.एड्. झालं की, शिक्षण त्याचं साधारणपणे थांबतं. आपण ज्या विषयाचा अभ्यास करतो आहोत तो विषयच मुळी थांबणारा नाही. हा विषय सतत वाढणारा, सतत बदलणारा आहे. आकाशातल्या ताऱ्यांचा अभ्यास जसा, १५ दिवस केला, वर्षभर केला, ...आणि म्हटलं की मला सगळं समजलं, तर ते काही खरं होत नाही. हजारो वर्षांनी ताऱ्यांची पुन्हा तीच स्थिती कधी येत असेल तर असेल. त्यांच्या सगळ्या हालचालीविषयी माहिती जर पाहिजे असेल तर सतत पाहाणे, सतत विचार करणे, सतत अभ्यास करणे याची आवश्यकता आहे आणि मला असं वाटतं की १९८० मध्ये ज्या परिस्थितीमध्ये शेतकरी संघटनेने कामाला सुरुवात केली तिच्यात आणि आजच्या परिस्थितीत म्हटलं तर काहीच अंतर नाही आणि म्हटलं तर महद्अंतर आहे. म्हटलं तर खूपच घडून गेलं आहे आणि म्हटलं तर परिस्थिती पुष्कळशी तीच आहे; पण काय बदललेलं आहे आणि काय बदललेलं नाही याचा जर विचार आपण केला नाही आणि ८० मध्ये जी वाक्यं म्हणत होतो ती त्याच पद्धतीने, त्याच ठेक्यात, त्याच जोशामध्ये आणि त्याच आवेशाने म्हणत राहिलो तर सत्यनारायणाची पूजा सांगणारा ब्राह्मण आणि आपल्यात



काही फरक राहणार नाही. कारण निरर्थक बोलणारे सतत तेच तेच बोलत असतात, कितीही काळ गेला तरी; पण मी आज जे बोलतो आहे ते आजच्या परिस्थितीला लागू आहे ही जाणीव आणि हा आत्मविश्वास असला म्हणजे मग त्याला खऱ्या अर्थाने विषय समजला असे म्हणता येईल.

*(२१ ऑगस्ट १९९०)*

■

तीन

# भारत दशकातील चतुरंग शेती

शेतकरी संघटनेचा शेगावचा जाहीरनामा घोषित झाल्यानंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह अनेकांच्या मनात प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे की इतके दिवस शेतकरी संघटनेने ज्या गोष्टींची चेष्टा केली, उपहास केला; ज्या गोष्टींतून शेतकऱ्यांचं भलं होणार नाही असं लोकांना ठासून सागितलं त्याच गोष्टी शेतकरी संघटना आता शेतकऱ्यांना उलटून सांगायला लागली आहे की काय?

चतुरंग शेती म्हणजे शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचा सहज आविष्कार.

पूर्वी जर कुणी येऊन सांगायला लागलं की शेतीला पाणी मिळायला पाहिजे; खतं किती वापरा, औषधं किती वापरा तर आम्ही त्याची चेष्टा करत होतो आणि म्हणत होतो की 'आबा पाटला' च्या सांगण्याप्रमाणे आम्ही खुरपण्या खूप वेळा केल्या आणि म्हशी गाई ठेवून बघितल्या, कारली लावली, तोंडली लावली; पण डोक्यावर कर्ज चढण्यापलीकडे काही झालं नाही. लोकांना आग्रहाने आम्ही सांगत होतो की शेती करण्याची कोणतीही पद्धत किफायतशीर नाही; कारण 'शेतकऱ्याचं मरण हे सरकारचं धोरण आहे' आणि आज आपण शेती कशी करावी, कोणती खतं वापरावीत असलं काही उलट बोलायला लागलो का काय?

आम्ही असं म्हणत होतो की साखर कारखाना निघाला, सूतगिरणी निघाली, कृषिउत्पन बाजार समिती निघाली, व्यापाराची व्यवस्था झाली, बँकेची व्यवस्था झाली, पतपुरवठ्याची व्यवस्था झाली, कारखान्याची व्यवस्था झाली तरी परिणाम एकच झाला; शेतकऱ्याच्या अंगावर जेवढी काही सालटी होती तेवढीसुद्धा निघून गेली आणि आज आम्ही शेतकऱ्यांना व्यापार करा किंवा प्रक्रिया करा असं नेमकं उलट सांगायला लागलो आहो की काय?



एका काळी मी असं म्हटलं होतं की पाण्याचं वाटप कसं व्हावं याबद्दल माझी काही व्यक्तिगत मतं आहेत; पण त्याबद्दल मी बोलू इच्छित नाही. गावागावांमध्ये वैद्यकीय व्यवस्था कशी व्हावी यासंबंधीही मी काही बोलू इच्छित नाही. असं का? त्यावेळी मी असं म्हटलं होतं की. ''एखाद्या जन्मांधाला जर डोळे आले तर जग कसं दिसेल याचं चित्र त्याला कधी सांगता येणार नाही; ज्याने आयुष्यात कधी प्रकाश पहिलाच नाही तो मनुष्य त्याला दृष्टी आली आणि प्रकाश दिसू लागला तर जग कसं दिसू लागेल याचं वर्णन काय करणार? आणि आपण त्याच्यासमोर जगाचं कितीही वर्णन केलं तर त्याला त्यात काय समजणार? तसंच पिढ्यान्‌पिढ्या शेती तोट्यात चालवणारा शेतकरी हा माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र जर मिळालं तर कसं काय जगेल याचे आराखडे आता बनवायला लागू नका. शेतकऱ्याला लुटणाऱ्या माणसांनी विद्यापीठांमध्ये, वेगवेगळ्या संस्थांमध्ये शेती कशी करावी याचे आराखडे बनविण्याचे काही कारण नाही. ज्यावेळी शेतकरी माणूस बनेल आणि स्वतंत्र बनेल. तेव्हा तुमच्या कल्पनेमध्येसुद्धा येणार नाही असे अप्रतिम मार्ग - शेती करण्याचे, प्रक्रिया करण्याचे, व्यापार करण्याचे, निर्यात करण्याचे - तो दाखवून देईल.'

काही लोकांना खूप आनंद वाटायला लागला आहे. ते म्हणू लागले की शेतकरी संघटना आता रुळावर आली आहे. इतके दिवस जे आम्ही म्हणत होतो तेच आता शेतकरी संघटना म्हणू लागली आहे. असं म्हणण्यात त्यांना खूप आनंद होऊ लागला आहे. अनेक थोर-थोर नेत्यांची मला पत्रं येऊन राहिलीत की शेतकरी संघटनेने आता विचार अधिक व्यापक करायला सुरुवात केली या गोष्टींनी त्यांना फार आनंद झाला आहे. म्हणजे 'आम्ही फार शहाणे होतो,तुम्ही इतके दिवस मूर्खासारखे चालला होता, आमच्या रस्त्याला आलात बरं झालं.' असंच जणू त्यांना म्हणायचं आहे!

शेतकरी संघटनेच्या शेगावच्या जाहीरनाम्याचे दिलेल्या भारत दशकातील चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाबाबत अशी काही गैरसमजूत निदान शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्याची होऊ नये आणि झाली असल्यास ती दुरुस्त व्हावी.

एक महत्त्वाचा नियम लक्षात ठेवा. रात्र संपते आणि दिवस उगवतो. काळीकुट्ट अंधारी रात्र नेमकी संपली कधी आणि पहाटेची सुरुवात झाली कधी याची जर कुणाला रेषा निश्चित करायला सांगितली तर ते करणे अशक्य आहे. जगामधील सगळे महत्त्वाचे बदल हे असे अलगद पावलांनी येऊन जातात,

कधी येऊन जातात ते समजतसुद्धा नाही. मोठा आवाज करून, धूमधडाक्याने एखादा बदल घडला तर समजा हा बदल फालतू आहे. इंदिरा गांधींच्या जागी राजीव गांधी आले, वर्तमानपत्रात खूप आवाज झाला, याचा अर्थ काही हा खरा मोठा बदल नाही. एखाद्या देशात क्रांती झाली म्हणजे काय? लोकांना लुटणारं एक सरकार जाऊन लोकांना लुटणारं दुसरं सरकार आलं म्हणजे फार मोठी क्रांती झाली की काय? गोरा इंग्रज गेला, लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा लागला, नवीन पंतप्रधान सफेद अचकनीतले गुलाब लावणारे झाले, गोऱ्या इंग्रजाच्या जागी काळा इंग्रज आला ही काही क्रांती झाली नाही; पण वर्तमानपत्रात ज्याचा आवाज होतो तो मोठा बदल झाला असं आजकाल सगळ्यांना वाटतं. एखाद्या राज्याचा एक मुख्यमंत्री जाऊन दुसरा मुख्यमंत्री झाला तरी वर्तमानपत्रांची भाषाच अशी बदलते की जणू काही सारं जगच बदललं! खरं म्हटलं तर काही सुद्धा फरक पडलेला नसतो.

फार महत्त्वाचे बदल असे अलगद येऊन जातात की त्याचा आपल्याला पत्तासुद्धा लागत नाही. असा बदल शेतकऱ्यांच्या बाबतीत घडला आहे.

'शेगावच्या जाहीरनाम्या' मधील पहिला मुद्दा हा आहे. ज्या ज्या साधनांनी शेतकऱ्यांना बाधून ठेवलेलं होतं ती साधनं आता सरकारच्या हाती सध्या तरी नाहीत; उद्या परत आली तर बघू निदान, ज्या प्रमाणात त्यांच्याकडं ती साधनं होती त्या प्रमाणात तरी नाहीत. अशा परिस्थितीत पुढचे पाऊल कसे टाकायचे हा खरा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे.

एक जुन्या नाटकातला प्रसंग आहे. पंतोजी एका श्रीमंत व्यापाऱ्याला गद्य म्हणजे काय हे शिकवायचा प्रयत्न करतात, 'कविता म्हणजे पद्य, कविता नाही ते गद्य.' गद्याचा अर्थ शिकता शिकता तो व्यापारी काय म्हणतो? 'अरे, गद्य म्हणजे आपण नेहमी बोलतो तेच ना?' तसाच हा शेगावचा चतुरंग शेतीचा कार्यक्रम म्हणजे काय आहे? शेतकऱ्याच्या पायात जन्मल्यापासून ज्या बेड्या पडलेल्या असतात त्या तशा न्मल्यापासून नसत्या तर तो जन्मतः जसं वागायला लागला असता त्याची ही रूपरेषा आहे; यात नवीन काही नाही.

जर का, शेतकऱ्यांना आजपर्यंत या गुलामगिरीचा अनुभव कधी घ्यावा लागला नसता तर त्यांनी काय केलं असतं? शेती कशी केली असती? व्यापार कसा केला असता? प्रक्रिया कशा केल्या असत्या? निर्यात कशी केली असती? हे आपोआपच जमलं असतं. फक्त आपण जन्मांध जे जन्मलो, आता दृष्टी आल्यानंतर जाणवणाऱ्या या प्रकाशाशी कसं काय वागायचं हे समजत



नाही म्हणून ही चतुरंग यादी करावी लागली.

पण हा कार्यक्रम म्हणजे आता परिस्थिती १९९१ मध्ये बदलल्यानंतर, शेती कशी करावी हे सांगणारे 'आबा पाटील' साखरेची प्रक्रिया कशी करावी हे सांगणारे 'विखे पाटील', निर्यात करणारे आणि कोणी, व्यापार करणारे आणि कोणी यांच्या मार्गाने आम्ही आता जायला लागलो आहोत ही कल्पना सपशेल चूक आहे. उलट, शेती, प्रक्रिया, व्यापार आणि निर्यात या चारही क्षेत्रांमध्ये आजपर्यंत बुजुर्गांनी जे जे मांडलं ते उधळून फेकून देण्याकरिता शेगावचा हा चतुरंग कार्यक्रम आहे. आतापर्यंत, शेती कशी करावी याच्याबद्दलच्या ज्यांनी ज्यांनी कल्पना तोडल्या त्या सगळ्यांनाच चुकीचं ठरवणारा असा कार्यक्रम आहे. कारण, आता जन्मांधाला दृष्टी आली आहे. दृष्टी आल्यानंतर तो जुन्या पंडितांनी सांगितलेलं काहीही मानायला तयार नाही.

**सुरुवातीच्या वेदना ही स्वातंत्र्याची किंमत आहे**

या मधल्या काळामध्ये संघटनेने काय काम केलं ? चीनमधल्या स्त्रियांविषयी एक हकीकत आहे. चीनमध्ये एकेकाळी अशी कल्पना होती की खानदानी स्त्री कोणती? तर जिला कधीही पलंगावरून उतरून चालावं लागत नाही ती खरी खानदानी असं समजलं जायचं. हरियाणामधला शेतकरी भल्यामोठ्या साफ्याचा फेटा घालतो. एवढ्या मोठ्या साफ्याचा फेटा घालणं म्हणजे किती कठीण? त्याला स्टार्च लावून तो फेट्याचा साफा ताठ ठेवावा लागतो. तोच जर मजुराचा फेटा असेल तर तो कसातरी गुंडाळला तरी चालतो. कारण त्या मजुराला आपल्या फेट्यावर मालाचं ओझ घेऊन जावं लागतं. शेतकऱ्याच्या साफ्याच्या फेट्याचा तुरा ताठ आहे याचा अर्थ काय? मला काम करावं लागतं नाही असा मनुष्य आहे मी! तशी चीनमधल्या खानदानी महिलांची ऐट काय? यांना पलंगावरून उतरायला न लागल्यामुळे यांचे पाय अगदी बारीक राहतात. मग ते पाय बारीक राहावे याकरिता मोठे प्रयत्न! जन्मल्याबरोबर मुलीचे पाय पट्ट्याने बांधून टाकीत. मग ते पाय साहजिकच लहान राहत आणि तसे राहावे म्हणून कायम पट्ट्यात राहत. पाय लहान राहत पण लहानपणापासून बांधलेले राहिल्यामुळे पुढे त्या मुलींना जन्मभर त्या पायांवर उभे राहणंसुद्धा शक्य होत नसे. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट आली तेव्हा त्यांनी पहिल्यांदा ही क्रूर अमानुष पद्धत बंद केली. जन्मतः ज्यांच्या पायाच्या पट्ट्या जेव्हा सोडल्या जाऊ लागल्या तेव्हा त्या मुलींनी कळवळून विनंती केली की आता आमच्या पायांतून पुन्हा रक्त खेळू लागलं आहे याच्या वेदना आम्हाला सहन

होत नाहीत, कृपा करून पट्ट्या सोडू नका, आमची पिढी अशीच जाऊ द्या .

आपल्यावर थोडीशी अशीच वेळ येणार आहे. जन्मतः पायाला पट्ट्या बांधलेल्या आमच्या पायातून रक्त खेळायची आम्हाला सवय नाही आणि या पट्ट्या काढतात म्हटल्यावर एकदा त्या पायातून रक्त धावायला लागल्यानंतर त्याच्या वेदना आम्हाला सहन होऊ शकणार आहेत किंवा नाही हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

इतके दिवस त्या मानाने बरे होतो. शेती आपण करत होतो, सरळसोट. नांगराला बैल जुंपलेले तसे शेतीला शेतकरी जुंपलेला. नांगर दिलेल्या तासाने घेऊन जाण्याचं काम बैलाचं आणि कुणबी जन्मलो म्हणून कुणब्यासारखं शेती करत राहायचं काम आमचं शेतकऱ्याचं! दुःख होत होतं, चांगलं जगता येत नव्हतं, माणूस म्हणून जगता येत नव्हतं, आमची घरची बायापोरं जनावरासारखी जगत, वाढत होती. कुटुंब म्हणजे काय हे आम्हाला माहीत नव्हतं, मग त्यामुळं जे काय समाधान कमी पडत असेल ते गावातल्या वादावादीमध्ये, गावातल्या भांडणांमध्ये एकमेकांची डोकी फोडून विनाकारण गुर्मीमध्ये फिरून थोडं फार मिळवत होतो. पण आता पुढं ठाकलेलं आयुष्य किती आहे! पूर्वीच्या काळी कमी पडलं तर माझ्यासारखा एखादा पुढारी आला आणि सांगू लागला, 'शेतीमालाला भाव मिळायला पाहिजे, चला' की गाडीला भोंगे बांधले आणि ' चलो शेगाव' म्हणत चालले!

स्वातंत्र्य उपभोगणे इतकं सोप नाही. उलट, गुलामीची एकदा सवय पडली म्हणजे फार सोयीची असते. तुम्हाला काय कुणी गुलाबांच्या वाटेवरून चालायला बाहेर नाही काढलेलं? तुम्हाला माणूस म्हणून जगायचा फक्त अधिकार दिला आहे. शेतकरी संघटनेच्या प्रतिज्ञेने इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने तुम्हाला जगता येईल असं म्हटलं. माणूस म्हणून जगायचा हा मार्ग तुम्हाला न कळता खुला झालेला आहे. सुख मिळविण्याच्या प्रयत्नांना आता कुणी अटकाव करणार नाही. १९४२ सालच्या लढाईने कधी वाटलं होतं की आता स्वातंत्र्य मिळेल? झालंच काय ४२ सालच्या आंदोलनात? खरे आकडे पाहिले तर पाचपंचवीस माणसं गेली. ब्रिटिश सत्तेला त्यामुळे ढिम्मसुद्धा धक्का लागला नव्हता; पण दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाला सगळीकडे पसरल्या आणि त्यामध्ये इंग्लंड असा काही पोळून निघाला की हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा मार्ग आपल्याला नकळत मोकळा झाला. तसं दहा वर्ष आपण टक्कर दिली तरी शेतकऱ्याचा स्वातंत्र्याचा मार्ग इतक्यात खुला होईल असं वाटत नव्हतं; पण



जागतिक परिस्थिती अशी बदलली की आपल्या शत्रूच्या हातातील शस्त्रं गळून पडली आहेत, तात्पुरती तरी गळून पडली आहेत. याच्यापुढे जायचा मार्ग तुम्हाला शोधून काढायचा आहे.

**सीताशेती म्हणजे बुद्धीवर आधारित प्रयोग**

शेती कशी करावी? सीताशेती म्हणजे आहे तरी काय? सीताशेती, माजघर शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती– या चतुरंग शेतीमध्ये आजपर्यंतच्या दुढ्ढाचार्यांनी मांडलेल्या प्रत्येक कल्पनेचा निषेध आहे, अधिक्षेप आहे. कुणी आम्हाला सांगितलं वरखतं वापरा, युरिया वापरा, अमुक डोस वापरा, तमुक डोस वापरा! आता आम्ही म्हणतो आहोत की शेतीमालाची किमत सरकार पाडू शकत नाही ठरवू शकत नाही आणि देऊही शकत नाही; आम्हीच आमच्या पायावर उभं राहायचं आहे; सरकार संपलं आहे तेव्हा आता आम्ही गुलामीत जन्मलो नसतो तर शेती जशी केली असती तशी शेती करायची ठरवणार आहोत.

सीताशेती म्हणजे नैसर्गिक शेती नाही. सीताशेती म्हणजे जैविक शेती नाही. फक्त गाईचंच शेण वापरायचं, गोमूत्रच वापरायचं असली अजागळ कल्पना मांडणारी ही सीताशेती नाही. खऱ्या अर्थाने शेती ही विज्ञानावर, बुद्धीवर आणि व्यापारावर आधारित करण्याचा पहिला प्रयोग जगामध्ये आज इथं सीताशेतीच्या रूपाने चालू होत आहे. आम्हाला शक्य नव्हतं म्हणून आम्ही शेणखत वापरलं. मग विज्ञान आलं आणि कुणी सांगायला लागलं युरिया वापरा, कुणी सांगायला लागलं फॉस्फेटचे डोस द्या, कुणी म्हटलं एन्डोसल्फान मारा, तेरा फवारे मारा, चौदा फवारे मारा. कुणी आणि कुणी तरी सांगितलं म्हणून आम्ही तसं केलं.

आता परिस्थिती बदलली आहे. जन्मांधाला डोळे आले आणि आम्ही आता सरळ प्रश्न विचारायला लागलो आहोत की जर का आम्हाला ही शेती करायची असेल आणि जर का आम्हाला भाव बांधून देणारं कुणी राहिलं नसेल आणि भाव पाडणारंही कुणी राहिलं नसेल तर माणूस म्हणून आम्ही शेती कशी काय करायची आहे? पहिली गोष्ट, सगळा वाह्यात खर्च बंद . शक्यतो, बाहेरून काही आणायचंच नाही. सीताशेतीचा पहिला पाया शून्य शेती. बाहेरून काही न आणता काही करता येतं की नाही? अगदीच काही लागणार असेल तर बघू. पण अशीच शेती करणं आपल्याला भाग पडणार आहे. सध्याची जी हरितक्रांतीची शेती आहे त्याला पर्याय शोधावाच लागणार आहे.

पर्यायाला पर्याय नाही. तुम्ही जर असं म्हटलं की ही 'युरिया'ची शेती चालवत राहाल, 'एन्डोसल्फान' ची चालवत राहाल तर ते शक्य नाही. याचं पहिलं कारण असं की येत्या दहा वर्षांत जगामध्ये तुम्हाला पुरेल इतका 'युरिया' पुरवेल इतकं पेट्रोल शिल्लक राहणार नाही आणि तुम्ही 'एन्डोसल्फान' मारून भाजी पिकवली तर ती खाणारांना कॅन्सर होतो हे सिद्ध होत आहे. त्यामुळे ही भाजीसुद्धा पुढे कुणी खाणार नाही. दुसरा मार्ग आपल्याला शोधायलाच लागणार आहे. तो शोधायचा कसा? त्याचे आचरट मार्ग सांगणारे पुष्कळ निघताहेत. कालच एका ठिकाणी गेलो होतो. त्यांच्याकडे पीक चागंलं निघतं असा त्यांचा दावा आहे आणि 'अमक्या अमक्याचं असं म्हणणं आहे की गोमूत्राचा वापर केला तर चांगलं पीक निघतं' असं ते भक्तिभावानं सांगतात. मी विचारलं, ''गोमूत्राच्या ऐवजी म्हशीचं वापरलं तर चालेल की नाही हो?'' पण त्यांचं अंतःकरण गलबललं. त्यांना सांगायचं होतं की,''आमच्या पूर्वजांनी गाईला पवित्र मानलं. त्याचा यामागं आधार काही तरी आहे'' म्हणजे, शेतकऱ्यांची काय ओढाताण चालली आहे? आम्ही एका बाजूला युरियासारखा पेट्रोलियम पदार्थ वापरा महणून सांगणाऱ्या दलालांच्या हातून सुटू पाहतो आहोत तर तेवढ्यात आम्हाला हे जुने गायत्रीमंत्र शिकवणारे पंडित आपल्यात ओढून घ्यायला पाहत आहेत आणि सीताशेतीचा खरा अर्थ असा आहे की या जुन्या आणि नव्या दलालांपासून, दोघांपासूनही वाचून बुद्धीवर शेती करायला शेतकरी तयार झाला आहे. हे काम मी माझ्या बुद्धीप्रमाणे कुणावर सोपविलं आहे? शेतकऱ्यांना तर आपली शेती करायचीच आहे. दररोजची शेती चालवायची आहे, पोट भरायचं आहे. सीताशेतीचा निष्कर्ष कळेपर्यंत शेती आपल्याला बंद नाही ठेवता येणार. ते काम आपल्याला चालूच ठेवायचं आहे. मग हे काम ज्यांना आजपर्यंत आपण सर्वात निर्बुद्ध समजलो, 'त्यांना काय अक्कल, तुमची अक्कल चुलीपुढं' असं म्हणून हिणवलं त्या महाराष्ट्रातल्या शेतकरी स्त्रियांनी प्रामुख्याने पार पाडावं अशी मी योजना केली. आणि सुरुवात त्यांनीच केली आहे. पहिली शेती काही पुरुषांनी नाही केली. पहिली शेती स्त्रियांनी केली नुसत्या काटक्या घेऊन. त्या जमिनीमध्ये नांगर घालणे म्हणजे भूमातेला जखमी करणे असं समजत असत आणि शेती करीत असत. स्त्रियांना बाजूला करून पुरुषांनी शेती हातात घेतली कारण बैलाला वेसण घालणे आणि बैलाने नांगर ओढून घेणे ही ताकद शेतकरी पुरुषाकडे आली. शेतीवर पहिला पराभव स्त्रियांचा झाला आणि बैलवाले पुरुष पुढे आले आणि या बैलवाल्या



पुरुषांचा पराभव घोडेवाल्या पुरुषांनी घोडेस्वार बनून, हातात तलवार घेऊन केला. आता हे युग संपलं आहे आणि आपण पुन्हा शून्याकडे जात आहोत. जेथून सुरुवात व्हायला हवी होती तिथे जातो आहोत. सीताशेती सीताशेती म्हणजे नैसर्गिक शेती नाही, सीताशेती म्हणजे जैविक शेती नाही. आम्ही जो मार्ग काढू तो जुनाट पद्धतीचा असेल असे नाही. कदाचित आज शास्त्रज्ञांना अवगत नसलेली, कॉम्प्युटर नव्हे तर सुपरकॉम्प्युटर वापरणारी शेती आम्ही करू; पण ती आमच्या बुद्धीने आणि आमच्या प्रयोगांनी आम्ही ठरविणार आहोत.

याच्याकरिता प्रयोगशाळा कुठून आणायच्या? विज्ञानशाळा कुठून आणायच्या? आपल्याकडे विद्यापीठे नाहीत, दहा दहा हजार रुपयांचा फुकट पगार खाऊन बसणारी प्राध्यापक आणि वैज्ञानिक मंडळीही नाहीत. हा प्रयोग आपल्या शेतावर. आपल्या घरामध्ये. आपल्या परसदारामध्ये, दहा बाय दहाच्या लहानशा जमिनीमध्ये सगळ्या महाराष्ट्रातल्या शेतकरी स्त्रिया करतील. अशी सीताशेतीची कल्पना आहे.

हा मुद्दा यासाठी मांडला की कुणाही माणसाच्या डोक्यामध्ये अशी कल्पना येऊ नये की अरे, फलाणा फलाणा मनुष्य किती दिवस सांगतो आहे की नैसर्गिक शेती करा. फलाणा फलाणा मनुष्य किती दिवस सांगतो आहे की गोमूत्राची आणि गाईच्या शेणाची शेती करा आणि शेतकरी संघटनाही आता तेच सांगायला लागली. असं वाह्यात समाधान या मंडळींना कणभरसुद्धा आणि क्षणभरसुद्धा मिळण्याचं कारण नाही.

### 'माजघर शेती' म्हणजे कारखानदारी नाही

'माजघर शेती' म्हणजे प्रक्रियेची शेती. या बाबतीतही असाच प्रकार आहे. ही मंडळी फार शहाणी होती म्हणून त्यांनी सारखेचे कारखाने काढले, ही मंडळी फार शहाणी होती म्हणून त्यांनी सुताच्या गिरण्या काढल्या आणि आम्हाला इतके दिवस अक्कल नव्हती म्हणून आम्ही रस्त्यावर जात होतो आणि आता यांचा शहाणपणा पटला म्हणून आम्ही पुन्हा साखरेच्या कारखान्यांकडे व सुताच्या गिरण्यांकडे जातो आहोत असं नाही. 'माजघर शेती' ही कल्पना शेतीच्या प्रक्रियांसंबंधी आजपर्यंत मांडल्या गेलेल्या सगळ्याच कल्पनांचा उच्छेद करणारी आहे. त्यातली एकही कल्पना मान्य न करणारी आहे. यावर अनेक प्रकारच्या टीकाटिप्पण्या होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जुन्या प्रक्रियाकल्पनांचा थोडा आढावा घेणे आवश्यक आहे.

डॉ. कुरियन यांनी गेले वर्षभर खूप प्रचार चालवला आहे की दुधावर प्रक्रिया करणे- त्याचं आईस्क्रीम बनवणे, श्रीखंड बनवणे - अशा तऱ्हेची परवानगी नेस्लेसारखा आंतरराष्ट्रीय कंपन्याना देऊ नये. कारण काय? त्यांनी असं म्हटलं की, खरा मलिदा, खरी साय, खरं लोणी तर आईस्क्रीम आणि श्रीखंडात आहे, दूध विकण्यात नाही. 'ऑपरेशन फ्लड'वर किंवा आणंदच्या डेअरीवर मुंबईला दूध पुरवण्याची जबाबदारी आहे; त्यांनी दूध पुरवायचं आणि नेस्लेसारख्या कंपन्यानी आईस्क्रीम बनवायचं, हे चुकीचं आहे, अन्याय्य आहे अशी डॉ. कुरियन आरोळी ठोकतात. इकडे सूरतची सुमूल डेअरी हिंदुस्थानामध्ये दुधाला सगळ्यात जास्त भाव देते. म्हशीच्या ६ टक्के स्निग्धांशाच्या दुधाला दर लिटरला ७ रुपये भाव देणारी ही हिंदुस्थानातली एकमेव डेअरी आहे. या सुमूल डेअरीच्या अध्यक्षांना विचारलं की, ''तुम्ही इतका भाव कसा काय देऊ शकता?'' ते म्हणतात, ''आम्ही इतका भाव देऊ शकतो याचं कारण आम्ही आईस्क्रीमबिस्क्रीम बनवण्याच्या फंदात पडत नाही, लोकांना दूध पाजतो आणि त्याच्यातच सगळ्यात जास्त फायदा आहे.'' हे गूढ काय आहे? एका बाजूला डॉ. कुरियन म्हणतात की प्रक्रिया केल्याने फायदा जास्त मिळतो आणि सुमूलचे अध्यक्ष सांगतात प्रक्रियेच्या फंदात न पडल्यानेच फायदा होतो. याचा खरा अर्थ असा आहे की डॉ. कुरियन काय, महाराष्ट्रातले तात्यासाहेब कोरे काय आणि गावोगावाचे दूध सम्राट काय- या सगळ्यांची दुधावर प्रक्रिया करण्याची कल्पना काय आहे ? सदस्यांकडून शेअर भांडवल गोळा करणे, त्या शेअर भांडवलाच्या आधाराने सरकारकडून आणखी पैसे मिळविणे, ते पैसे नेऊन एखाद्या कंपनीसमोर ठेवणे. त्यांच्याकडे युरोपमध्ये किंवा अमेरिकेमध्ये तयार झालेली किंवा त्या पद्धतीची जी काही यंत्रसामग्री असेल ती यंत्रसामग्री विकत घेणे. त्याच्याकरिता कोट्यवधी रुपये देणे आणि ती कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री येऊन पडली की त्याला एक मॅनेजिंग डायरेक्टर, इंजिनिअर्सची फलटण लागते. त्यांचे पगार ठराविक असतात, कामगारांना पगार द्यावा लागतो, मध्यभागी कारखान्याची एक इमारत बांधावी लागते. त्यात संचालकांचं एक चांगलं ऑफिस ठेवावं लागतं, त्याभोवती गुलाबाच्या चांगल्या बागा फुलवाव्या लागतात, नारळही वाढवावे लागतात आणि इतका सगळा खर्च झाला म्हणजे ऊस पिकवणाऱ्या आणि दूध तयार करणाऱ्या शेतकऱ्याच्या हाती धत्तुरासुद्धा येत नाही. प्रक्रियेची ही कल्पना शेतकरी संघटनेच्या या प्रयोगामध्ये त्याज्य ठरवलेली आहे. हिंदुस्थानात अशा



प्रकारची यंत्रसामग्री पुरविणारी 'अल्फा लाव्हल' या नावाची सर्वात मोठी कंपनी आहे. सोयीसाठी या प्रक्रिया कल्पनेला आपण 'अल्फा लाव्हल' प्रक्रिया म्हणूया. आमच्या या प्रयोगात 'अल्फा लाव्हल' प्रक्रिया आम्ही नाकारतो आहोत.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा. आपण कोणत्या तऱ्हेची प्रक्रिया करणार आहोत? 'अल्फा लाव्हाल'ची नाही. हे सगळे कारखानदार बोलून चालून राजकारणात पडलेले. उघडच मलिदा खायला निघालेले. साखर कारखाना काढायला निघालेल्या कोणाही माणसाला विचारलं की 'कायरे, तू लोकांचं भलं करणार का?' तर तो तुम्हाला प्रामाणिकपणे म्हणेल, तुमचा मित्र असेल तर, 'काही तरी काय विचारता? कारखाना काय लोकांचा फायदा करून देण्याकरिता काढायचा असतो काय?'

दुसराही एक प्रकार लक्षात घ्यायला हवा. शेतकरी संघटनेच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची मुलूखमैदान तोफ म्हणून गाजलेले श्री. माधवराव खंडेराव मोरे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे पिंपळगावला प्रक्रियाक्षेत्रामध्ये पदार्पण केलं आणि द्राक्षापासून शॅम्पेन काढून परदेशात पाठविण्याची योजना राबविली. यंत्रसामग्री ही पुन्हा 'अल्फा लाव्हल'ची आणि शॅम्पेन परदेशात विकायची म्हणजे सी- थर्टी साखर काढून पोत्यांमधून विकण्याइतक सोपं नाही! त्याची बाटलीही परदेशातली, त्याचं लेबलही परदेशातलं, त्याचं बूचही परदेशातलं आणावं लागतं. आता माधवरावही म्हणू लागले की त्यांनासुद्धा लोकांना द्राक्षाचा भाव किलोला दहा रुपयाच्या वर देता आला नाही.

म्हणजे मोठं यंत्र कुठून तरी घ्यायचं, ते एकाजागी उभं करायचं. तिथं काही संचालक मंडळी नेमायची आणि त्यातून प्रक्रिया करून शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेल ही कल्पना अत्यंत चुकीची, अत्यंत खोटी आहे. मग नेस्लेसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या प्रक्रिया करून फायदा काढतात हे डॉ. कुरियनचं म्हणणं चूक आहे का? नाही. या कंपन्याना फायदा होतो हे खरं आहे पण त्याचं मुख्य कारण प्रक्रियेसाठी त्या वापरत असलेली यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञान त्यांनी स्वतःच विकसित केलेलं असतं हे आहे.

एक तिसरं उदाहरण घेऊ. मुंबईला नुकतंच एक शेतीमालावरील प्रक्रियांसंबंधी प्रदर्शन झालं. दिल्लीला १५ जानेवारीपासून एक त्याहून मोठं प्रदर्शन आहे. शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या ज्या हिंदुस्थानातील कंपन्या आहेत त्यांचा माल तिथं ठेवला जाईल. या प्रदर्शनांत काय माल ठेवतात? युरोपातला मनुष्य

ज्या तऱ्हेचा जॅम खातो त्या तऱ्हेचा जॅम, तो ज्या तऱ्हेचा फळांचा रस आवडीने पितो त्या तऱ्हेचा रस बाटल्यांमध्ये भरलेला. युरोपीय लोकांच्या खाण्याच्या पद्धतीमध्ये जे काही पदार्थ बसतात ते पदार्थ आम्ही हिंदुस्थानामध्ये त्यांनी तयार केलेली यंत्र आणून किंवा त्या पद्धतीची यंत्रे करून ते पदार्थ त्यांना विकायचा प्रयत्न करतो हे शक्य नाही. त्यांच्यापेक्षा चांगलं जॅम तुम्ही बनविणे शक्य नाही. त्यांनी दिलेली यंत्रसामुग्री आणून तुम्ही 'शॅम्पेन' ची फॅक्टरी बनवलीत अगदी अत्याधुनिक यंत्रसामग्री आणून बनवलीत, तरी तिकडे त्यापेक्षा अधिक आधुनिक यत्रंसामग्री तयार होत राहणार. मग तुमची फॅक्टरी जुनी होऊन जाणार. मग प्रश्न येतो की जगामध्ये सर्वात आधी अत्याधुनिक तंत्रज्ञान तुम्ही तयार कराल अशी ताकद आहे का? मुळीच नाही. उलट त्यांनी आणलेलं आणखी नवीन तंत्रज्ञान समजायचीसुद्धा ताकद नाही अशा पात्रतेचे आम्ही. म्हणजे आम्ही तंत्रज्ञानाच्या बाबतीत दिवसेंदिवस अधिक अडाणी होत जातो आहोत. प्रक्रियाशेती म्हणजे 'माजघर शेती'मध्ये याला वाव नाही.

पदार्थ कसा तयार करायचा ? शॅम्पेन चांगली म्हणजे कशी असते? बटाट्याचा साधा एक चिप्, एक वेफर तयार करायचा तर तो चांगला कसा फुलतो चांगला कसा रंगतो, चवीने चांगला कसा होतो, याची जाणीव तयार करणाराला कशी झाली पाहिजे? हिंदुस्थानात एकच उदाहरण देण्यासारखं आहे. मोटारच्या गॅरेजमधला मिस्त्री या दृष्टीने आदरास अत्यंत पात्र असा माणूस आहे. त्याच्याकडे मूळचा पार्ट नसला तरी चालेल, 'उल्हासनगर'चा पार्ट नसला तरी चालेल; कोणतीही एखादी लोखंडाची नळी घेऊन एखादी पट्टी घेऊन, बांधून तुमची गाडी पाचपंधरा किलोमीटरपर्यंत चालेल एवढी तरी व्यवस्था तो करू शकतो. याचं कारण, मोटारीच्या इंजिनची आणि त्याची दोस्ती झालेली असते. ही दोस्ती बटाट्याचा वेफर बनवणाऱ्या गृहिणीची आणि त्या वेफरची होऊ शकते. 'अल्फा लाव्हाल'चं यंत्र आणून साखर तयार केली किंवा आईस्क्रीम तयार केलं किंवा शॅम्पेन तयार केली तर कारखानदाराची आणि त्या मालाची अशी दोस्ती होऊ शकत नाही आणि ही जिथं दोस्ती होत नाही तिथं प्रक्रियाही यशस्वी होऊ शकत नाही. माजघर शेती म्हणून प्रक्रिया करताना आम्ही काय विकणार आहोत? जॅम बनवून नाही विकणार. तुम्ही फ्रेंच मनुष्य 'क्रेप' तयार करतो म्हणून त्याचे क्रेप तयार करून त्याला विकायला जाल तर तो म्हणेल याला काही जमलं नाही फारसं. ते शक्यही होणार नाही. आपल्याकडेही काही पदार्थ आहेत. ते पदार्थ तयार केल्यानंतर त्यांची खुमारी



जर आपण इतर देशांतील लोकांच्या लक्षात आणून देऊ शकतो तर आपला माल आपण फार मोठ्या प्रमाणावर विकू शकतो. परवा फ्रान्समधले एक प्राध्यापक आले होते. त्यांना आम्ही बाजरीचे छोटे रोटले करून खाऊ घातले. ते म्हणाले, ''अशा तऱ्हेचे रोटले, गरम गरम, जर जर्मनी आणि फ्रान्समध्ये मिळायची व्यवस्था झाली तर कोट्यवधी रुपयांचे बाजरीचे रोटले तिकडे विकता येतील.'' तुम्ही त्यांचा 'ब्रेड त्यांना विकायचा प्रयत्न करू नका. तुमचा माल तुम्ही तयार करायला हवा. मग हे कुठे जमेल? हे तात्यासाहेब कोऱ्यांच्या कुवतीतलं नाही; हे डॉ. कुरियनच्या या कुवतीतलं नाही. हे तुमच्या आमच्या घरच्या 'सीतामायां'च्या कुवतीतलं काम आहे म्हणून माजघरातली शेती असं त्याचं नावं आहे.

आणखी एक उदाहरण पाहण्यासारखं आहे. पुण्यामध्ये एका शहाण्या माणसानं पोळ्या तयार करण्याचा मोठा कारखाना काढला होता. रोज दोन लाख पोळ्या बनवायच्या. त्या त्यानं प्लास्टिकच्या पिशवीत घातल्या दुकानात मांडल्या. गिऱ्हाईकीच्या हाती जाऊन, पिशवी उघडून खाईपर्यंत तीन दिवसांच्या त्या पोळ्या वातड झाल्या आणि तो कारखाना बंद पडला. याच्या उलट डोंबिवलीला एका विधवा बाईनं डोंबिवली स्टेशनच्या बाहेर एक छोटीशी जागा घेऊन डब्यात ताज्या पोळ्या आणि ताजी भाजी घेऊन स्वतः उभी राहिली. लोकल गाडी पकडायला जे पुरुष जात, त्यांच्यापैकी ज्यांना कुणाला घरून काही कारणानं डबा आणता आला नसेल त्यानं तिथं यायचं आणि त्या बाईकडून दोन-तीन चपात्या आणि भाजी-चटणी-लोणचं घ्यायचं आणि पैसे द्यायचे. दररोज सकाळी ताजी भाजी. ताजी चपाती मिळू शकते हे पाहिल्यानंतर स्टेशनवर त्या जागी, त्या विधवा बाईने चालू केलेल्या कामाच्या तिथे चाळीस माणसं केवळ डबे भरण्यासाठी नोकरीला लागले आहेत. चुकीचं केंद्रीकरण केलं म्हणजे त्याचा पुण्याचा चपात्याचा कारखाना होतो. आपण उत्पादन करताना चुकीचं केंद्रीकरण केलं तर तसंच खड्ड्यात जाऊ. समजा आपल्याकडच्या एखाद्या गृहिणीला साबुदाणा वडे चांगले बनवता येतात. तर तिनं असं ठरवलं की भरपूर साबूदाणा वडे तयार करायचे, पिशव्यात भरायचे आणि चंदीगढला न्यायचे तर ते नाही जमणार; पण तिच्या साबूदाणा वड्याचा एक फार्म्युला आपण करू शकतो. बारकाईने सूचना देऊन - त्यात साबूदाणा किती असला पाहिजे, बटाटे किती असले पाहिजेत, दाणे किती असले पाहिजेत, मीठ किती प्रमाणात -त्याचप्रमाणे वडे बनविण्याच्या शक्यता वेगवेगळ्या ठिकाणी तयार

केल्या आणि वेगळ्या ठिकाणी ताजा माल पोहोचविण्याची व्यवस्था केली तर ती योजना बरोबर होईल.

याचा अर्थ काय? आम्ही काही 'तात्यासाहेब कोरे' किवा 'डॉ. कुरियन' च्या मार्गाने जायला निघालो नाही. उलट, या आणि त्यांच्यासारख्या अनेक सम्राटांनी दाखविलेल्या प्रक्रियेच्या सगळ्या मार्गांचा उच्छेद करण्याकरिता हा स्वतंत्र झालेला शेतकरी येतो आहे.

**व्यापाराचे वेगळे मार्ग**

बाजारपेठ तयार करावी लागेल, व्यापार करावा लागेल. त्याचे वेगवेगळे मार्ग काढावे लागतील आणि तुम्ही नाही काढलं तरीसुद्धा हे कुणीतरी काढणार आहे. या विषयावर निर्णय बैठकीत होत नाहीत. निणर्य घेणारे आपोआप निर्णय घेणार आहेत.

प्रक्रियांकरिता जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये प्रायव्हेट लिमिटेड कंपनी काढणे हेच आता स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने संयुक्तिक ठरते. सहकारी संस्था नको, नावालासुद्धा सहकारी नको. त्या नावाचे सरकारकडून भांडवल उभारण्यात मदत होते असली तरीसुद्धा ती आम्हाला नको. माणूस म्हणून जगण्याचा जो अधिकार आम्ही मिळवला तो भांडवलनिर्मिती मधला थोडासा फायदा सरकारकडून मिळवण्यापोटी विकण्याकरिता नाही. त्याचा जो काही तोटा आहे तो आम्ही सहन करू. शेवटी व्यापारी फायदा काढतात त्यांना तर काही सहकारी भांडवल निर्मितीमधली मदत मिळत नाही ना? तरी ते फायद्याने व्यापार करतात ना? आणि सरकारी संस्थांना भांडवलनिर्मितीतील मदत मिळूनसुद्धा सगळ्या सहकारी संस्था तोट्यातच चालल्यात ना? मग कशाकरता त्या फासात आपला गळा अडकवायचा? प्रक्रियेकरता जिल्हावार 'प्रायव्हेट लिमिटेड' कंपन्या काढता येतील. व्यापाराकरिताही तशा कंपन्या काढता येतील. सुरुवातीला दहा दहा हजार रुपये देणारी पन्नास माणसे जरी प्रत्येक जिल्ह्यात उभी राहिली तरी काम सुरू होऊ शकेल. त्याच्या पुढचं भांडवल त्यात जो फायदा होईल त्यातून उभं करता येईल आणि सगळ्या महाराष्ट्रातल्या या 'प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची' मिळून एक मोठी 'पब्लिक लिमिटेड कंपनी'सुद्धा तयार करता येईल.

शेतकरी संघटनेच्या आर्थिक कार्यक्रमावर शेतकऱ्याचा प्रचंड विश्वास आहे. ते तुम्हाला मतं देत नसतील, मतं देण्याचा त्यांचा हिशोब वेगळा आहे;



पण तुम्ही जर सांगितलं की शेतकऱ्यांनी त्यांना जे काही खरेदी करायला लागत असेल- मीठमिरची कापडचोड- ते शेतकऱ्यांच्या दुकानांतूनच खरेदी करावं आणि त्यांना जो माल विकायला तो शेतकरी संघटनेच्या माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती या मार्गातून विकला तर त्यांना फायदा मिळणार आहे आणि हे जर एकदा शेतकऱ्यांना स्पष्ट झालं तर शेतकऱ्यांच्या सद्‌भावना तुमच्याइतक्या दुसऱ्या कुणाच्याही पाठीशी असणार नाहीत. याचा फायदा घ्यायचा किंवा नाही हे आता स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांनी ठरवायचे आहे.

**बदलाची संधी प्रथमच आली**

याचा अर्थ असा नाही की आता शेतकरी संघटना जिल्ह्या-जिल्ह्यात 'पब्लिक लिमिटेड कंपन्या' उघडणार. असा गैरसमज कुणाचा होऊ नये. शेतकरी संघटना ही कधीही व्यापारी संघटना होणार नाही. शेतकरी संघटना ही आंदोलक संघटनाच आहे. आम्ही शेतकऱ्यांना सांगतो आहोत की तुम्ही स्वतंत्र झाला आहात. आता जन्मतः स्वतंत्र असतात तर जे केलं असतं तेच करायला लागा आणि जर आमच्या असं लक्षात आल की या स्वातंत्र्यावर पुन्हा कुणी गिधाड घाला घालीत आहेत मग ती जातीयवादी असोत का बिगर जातीयवादी असोत त्या नाठाळांच्या माथी काठी घालणं हेच शेतकरी संघटनेचा जो पाईक, जो आधार तो शेतकरी आता निव्वळ रुमणं घेऊन, बैलासारखी जुवाच्याखाली मान घालून जर चालत राहिला तर त्याची लढाई आता जिंकली जाऊ शकत नाही. आता तुमच्या पायाच्या पट्ट्या काढणं अपरिहार्य आहे तुम्हाला पायावर उभे राहाणं अपरिहार्य आहे. तुमच्या पायात रक्त खेळू लागल्यानंतर असह्य वेदना होणार आहेत. पण माणूस म्हणून जगण्याची या वेदना ही किंमत आहे.

शेगावच्या जाहीरनाम्यातील चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाचा सविस्तर अर्थ असा आहे. स्वतंत्र झालेला शेतकरी आता आपल्या प्रश्नांची उकल कशी करील हे आज कोणालाही नक्की सांगणे कठीण आहे; पण ती तो कशी करू शकेल यासाठी सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती आणि निर्यात शेती या चार प्रयोगशाळा आहेत. आपल्याला धडपडत चालावं लागणार आहे. काही वेळा आपण पडू, काही वेळा चुका करू. कदाचित खोट खाऊन घरी बसण्याचीसुद्धा वेळ येईल. दिवाळखोर तर तसे आपण गुलामगिरीतही झालो होतो. दिवाळखोरच व्हायचं नशिबी असेल तर स्वातंत्र्यातील दिवाळखोरीचा

अनुभव घ्यायला तुम्हाला मिळणार आहे एवढाच खरा शेगावच्या जाहीरनाम्याचा अर्थ आहे.

आपल्याला शेतकऱ्यांचं आपल्या मनातलं चित्र पालटणं आवश्यक आहे. जर का शेतकऱ्यांची दुश्मनी करणारं सरकार नसतं तर आपण आज ज्या प्रकारचे शेतकरी झालो आहोत, कुणबाऊ शेतकरी, तसे राहिला नसतो. इथं कुणबाऊ हा जातिवाचक शब्द म्हणून वापरला नाही तर मराठी शब्दकोशातील त्याचा अर्थ माझ्या मनात आहे. आपण सीताशेती करणारे, व्यापार करणारे, निर्यात करणारे शेतकरी एरवीही बनलो असतो. हजार दोन हजार वर्षे आणखी कोणाच्यातरी जोखडाखाली मान घालून आम्ही फुकट घालविणार नाही, स्वतंत्र रस्ता शोधून आमच्या त्या स्वतंत्र रस्त्याने जाणार आहोत हा खरा शेगावच्या जाहीरनाम्याचा अर्थ आहे.

*(वर्धा येथे १५,१६,१७ डिसेंबर १९९१ रोजी शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्रभरच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत श्री. शरद जोशींनी केलेले भाषण)*

(शेतकरी संघटक, २१ डिसेंबर १९९१)

■



चार

# खतांच्या भाववाढीबाबत

ऑगस्ट महिन्यात शेवटी केंद्र शासनाने स्फुरद आणि पालाश खतांवरील सर्व नियंत्रणे रद्द केली आणि केवळ युरियावर नियंत्रण चालू ठेवून त्याची किमत १० टक्यांनी कमी केली. परिणामी स्फुरद खतांच्या किमती दुपटीने वाढल्या तर पालाश खतांच्या किमती त्याहीपेक्षा जास्त भडकल्या.

या किंमतवाढीमुळे जागोजागी शेतकऱ्यांत असंतोष निर्माण व्हावा हे साहजिक आहे. शेतकरी, किंबहुना ज्यांनी शेतकरी आंदोलनाचा दुस्वास केला असे तालुका पुढारी 'शेतकरी संघटना आता काय करते आहे?' अशी आरडाओरड करू लागले आहेत. ज्या शासनाने हे निर्णय घेतले त्याच शासनातले संरक्षण मंत्री, गृहमंत्री महाराष्ट्रात आले म्हणजे त्यांच्यासमोर हा प्रश्न उठवण्याची कोणी हिंमत केली नाही; पण शेतकरी संघटनेने व शरद जोशींनी मात्र हा प्रश्न उठवला पाहिजे, आवश्यक तर आंदोलन केले पाहिजे असा कल्लोळ होत आहे. जळगांव, सांगली, कोल्हापूर, नाशिक इत्यादी जिल्ह्यांतील संघटनेच्या कार्यकर्त्यांना या सगळ्या प्रकाराचा बराच त्रास होऊ लागला आहे. एक वर्षापूर्वी छोटे शेतकरी सोडता इतरांसाठी वरखतांच्या भावात ३० टक्क्यांनी वाढ करण्यात आली. त्यानंतर, पुन्हा एकदा ही भाववाढ. आणि सर्व कार्यकर्त्यांना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

संघटनेची या विषयावरील भूमिका काय आहे?

१) सूट सबसिडीच्या अर्थकारणाला संघटनेचा विरोध आहे. वरखतांवरील सबसिडी शेतकऱ्याला मिळत नव्हती. तिचा फायदा खत कारखाने, त्यांना कच्चा माल पुरवणारे आणि शेतीमालाचे सर्व ग्राहक यांना होतो. सबसिडीच्या भावात खते घेऊनही शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरून निघत नसेल तर या सबसिडीचा लाभ शेतकऱ्याला नाही हे उघड आहे. खतावरील सबसिडी रद्द

झाली पाहिजे आणि या रूपाने शासकीय तिजोरीची होणारी लूट थांबली पाहिजे ही संघटनेची स्पष्ट भूमिका आहे. नरसिंह राव सरकारने सबसिडी कमी करण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकले; पण ते अर्धवट टाकले आणि आता काढता पाय घेऊन ते पुन्हा एकदा जुन्या व्यवस्थेकडे जात आहे, याला संघटनेचा विरोध आहे.

युरियावरील सबसिडी वाढवून त्याची किमत १० टक्क्यांनी कमी केली यालाही संघटनेचा विरोध आहे. खुल्या बाजारपेठेचे तत्त्वज्ञान संघटनेने मांडले आहे, शासनानेही त्याला तत्त्वतः मान्यता दिली आहे, शेतीच्या क्षेत्रात त्याला अपवाद केल्यामुळे विपरीत परिणाम होतील.

युरिया स्वस्त आणि इतर खते महाग अशा धोरणाने वरखतांच्या वापरातील संतुलन बिघडेल. केवळ युरियाच वापरण्याकडे शेतकऱ्यांचा कल होईल व जमिनीचे नुकसान होईल.

याखेरीज, खतांच्या भावाच्या बाबतीत छोटेमोठे शेतकरी हा सरकारने केलेल्या भेदभाव निरर्थक आहे. बहुतेक राज्यांत शासनाने तो अमलात आणलेलाच नाही आणि आता स्फुरद, पालाश खतांवरील सर्व नियंत्रण काढल्यानंतर या भेदभावाला फारसा काही अर्थ राहत नाही.. तेव्हा वरखतांची दुहेरी किमतीची पद्धत रद्द करावी.

शेतीमालाला रास्त किमत मिळाली पाहिजे हा शेतकरी संघटनेचा आग्रह कायम राहिला आहे, पण त्यासाठी शेतीत लागणाऱ्या वस्तूंच्या किमती कृत्रिमरीत्या कमी कराव्यात अशी भूमिका संघटनेने कधीही घेतली नाही. युरियाचा भाव वाढवायचा आहे वाढवा, विजेचा दर चढवायचा आहे चढवा, शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना या चढत्या किमती हिशेबात घ्या म्हणजे झाले अशी संघटनेची कायमची भूमिका आहे. गेल्या वर्षात वाढलेल्या किमती १९९२-९३ च्या खरीप पिकांच्या आधारभूत किमती हिशेबात घेतल्या गेल्या नाहीत असं, म्हणायला आज तरी जागा दिसत नाही. जोपर्यंत बहुतेक अर्थव्यवस्था खुली होत नाही तोपर्यंत आधारभूत किमतीच्या व्यवस्थेला धान्य राहणारच आहे. शेतीच्या निविष्ठांच्या किमती त्यात पूर्णपणे धरल्या जाणे आज महत्त्वाचे आहे. उद्या देशांतर्गत आणि परदेशी व्यापार खुला झाला तर मग या सगळ्या हिशेबाला काही उरणार नाही, हेही तितकेच खरे आहे.

थोडक्यात, संघटनेचे टीकाकार सबसिडी बाढावी, नियंत्रण वाढावी आणि खतांच्या किमती उतराव्यात अशा मताचे आहेत. सरकारने उचलेली पावले



मागे घ्यावीत अशी त्यांची मागणी आहे. तर शेतकरी संघटनेची भूमिका याच्या नेमकी उलट आहे. म्हणजे, सबसिडी संपवावी, नियंत्रण उठवावी, वरखतांच्या किमती खुल्या बाजारात ठरू द्याव्या, सरकारी धोरणाची दिशा योग्य आहे; पण त्यांची अंमलबजावणी अधिक गतीने आणि तर्कशुद्धतेने व्हावी अशी संघटनेची भूमिका आहे. थोडक्यात, संघटनेचे टीकाकार सरकारला म्हणतात मागे हटा, संघटना सरकारला म्हणते अधिक वेगाने पुढे चला.

वरखतांचे सगळेच अर्थकारण आणि राजकारण अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे आहे. त्याचा सगळा इतिहास-भूगोल आणि अर्थशास्त्र मांडण्याकरिता प्रबंध लिहावे लागतील, ते येथे काही शक्य नाही. तिथे काही महत्त्वाच्या मुद्द्यांचाच परामर्श घेता येईल.

आपल्या देशतील वरखतांचा वापर, वरखतांचा पुरवठा व त्यांच्या किमती यांचा सखोल अभ्यास केला तर काय दिसते?

**शेतीवरील परिणाम**

अकार्यक्षम कारखाने, भ्रष्टाचार, महागडी वरखते आणि वर शेतकऱ्यावर भले उपकार करत असल्याचा आव अशी ही सध्याची व्यवस्था आहे, शेतकऱ्यांना वरखतांच्या वापराची चटक लागली त्याबरोबर संकरित आणि इतर विकतचे बियाणे तो येऊ लागला. सुरवातीच्या कारळात उत्पादन चांगली वाढही झाली. देश तथाकथित स्वयंपूर्णतेच्या आसपास पोचला. उत्पादनाच्या या वाढीचे मोठे श्रेय वरखतांमुळे झालेल्या उत्पादकतेला नाही. वरखते उपलब्ध झाल्यामुळे पूर्वीची पाळीपाळीने वावरे पडीत ठेवण्याची व त्यातून जैविक खते तयार करून घेण्याची पद्धत मागे पडली आणि सगळे शेतकरी सरसकट सगळी जमीन प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक हंगामात वापरात आणण्याचा शक्यतो प्रयत्न करू लागले. वरखतांमुळे अधिक जमीन लागवडीखाली आली आणि उत्पादन वाढले.

याउलट वरखतांचा मोठा वापर करणाऱ्या पाचसहा राज्यांत गहू, भात आणि ऊस यांचे उत्पादन अशा पातळीस पोचले की १९७५-७६ च्या सुमारास उत्पादन वाढवल्याने पैशातील उत्पन्न कमी होते अशी व्यस्त परिस्थिती निर्माण झाली.

वरखतांच्या सहज उपलब्धीमुळे आणखी भयानक दुष्परिणाम घडला आहे. रासायनिक शेतीला पर्यायी तंत्रज्ञान उभे करण्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष झाले आणि उद्या पेट्रोलियम पदार्थाचा पुरवठा कमी किंवा बंद पडला तर शेती करायची कशी या प्रश्नाचे समर्पक आणि व्यापक उत्तर कोणीच देऊ शकत नाही.

खत पुरवठ्याच्या एकूण व्यवस्थेतील दलदल संपवणे, या व्यवस्थेचा सरकारी तिजोरीवरील बोजा काढून टाकणे, शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे आणि दूरवरच्या भविष्यात पेट्रोलियम पदार्थाच्या अभावातही स्वयंभू शेती होऊ शकेल या उद्दिष्टांसाठी काही तातडीच्या उपाययोजना आवश्यक आहे.

१) कारखान्यांतील गैरकारभार दूर करण्यासाठी कारखान्यांना बाजारपेठतील स्पर्धेला तोंड द्यावयास लावले पाहिजे. त्यासाठी सर्व नियंत्रण दूर केली पाहिजेत.

२) नियंत्रण दूर करणे याचा परिणाम देशी वरखतांच्या बाबतीच्या तरी किमती भडकण्यात होईल असे मुळीच नव्हे. लक्षणे अशी दिसतात की नियंत्रण काढून घेतल्यास भाव प्रत्यक्षात खाली येतील.

३) भाव उतरोत किंवा भडकोत वरखतांच्या नैसर्गिक किमती लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी वरखते वापरायची किंवा नाही. किती वापरायची आणि काय प्रमाणात वापरायची त्याचा निर्णय घेतला पाहिजे. वरखते महाग झाली तर आपला शेतजमिनीतील एका हिश्श्याचा वापर पर्यायी खते शेतावर तयार करण्याकरिता केला पाहिजे, तसेच, गहू, भात, ऊस यासारखी, वरखते ओरपणारी पिके घेण्याबद्दल फेरविचार केला पाहिजे तरच उद्याच्या पेट्रोलियमविरहित जगाला तोंड देण्याची शेतकऱ्यांची तयारी होऊ शकेल.

या सगळ्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने केंद्र शासनाच्या खुल्या धोरणाला पाठिंबा दिला आहे. त्या सरकारचे पाय आज डगमगू लागले आहेत. शेतीचे अर्थकारण ज्यांना कधी समजलेच नाही असे संधिसाधू काहीही हाकाटी करोत, संघटनेची भूमिका अगदी स्पष्ट आणि शुद्ध आहे.

(शेतकरी संघटक, २१ सप्टेंबर १९९२)

■



पाच

# खते आणि खातेरे

फेब्रुवारी १९९७ च्या शेवटच्या आठवड्यात केंद्र शासनाने युरियाची किंमत १० टक्क्यांनी वाढवली का तर म्हणे, वेगवेगळ्या रासायनिक खतांच्या वापरात संतुलन आणावे. युरियाच्या किमतीतील वाढीमुळे शेतकरी फॉस्फेट (P)युक्त आणि पोटॅशियम(K)युक्त खंताच्या वापराकडे अधिक वळतील अशी अपेक्षा!

अजून महिनाही नाही उलटला, शासनाने युरियावरील सबसिडीचा आढावा घेण्यासाठी एक उच्चधिकार समिती स्थापन केली. मंत्रालयाच्या तबेल्यातील ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. सी. एच. हनुमंतराव हे त्या समितीचे अध्यक्ष असून या समितीने सहा महिन्यांच्या आत आपला अहवाल सादर करावयाचा होता, या समितीचा अहवाल हाती पडण्याची वाट न पाहता युरियाच्या किमतीत वाढ करण्याची निकड का वाटली हे काही कळले नाही.

खतांवरील सबसिडी आणि खतांच्या प्रतिधारण – retention (प्रतिधारण किंमत = renetion price = खत विक्रीसाठी कारखान्याबाहेर येईपर्यंत आलेला एकूण खर्च = उत्पादनखर्च + साठवणूक + व्याज इत्यादी.) किमतीची पद्धती याबद्दल बरेच काही लिहिले आणि बोलले गेले आहे. केंद्राच्या खजिन्यातून 'खतांवरील सबसिडी' या नावाखाली तो काही प्रचंड खर्च केला जातो त्यांच्या शेतकऱ्यांना काहीच लाभ मिळत नाही हे आता सर्वचजण मान्य करू लागले आहेत. वास्तवात, देशांतर्गत खतांच्या किमती पैशाच्या रूपात आणि प्रतिकिलो भात किंवा गहू यांच्या रूपातही शेजारी देशांच्या तुलनेने फारच जास्त आहेत. सबसिडीचा खरा फायदा, गुंतवणूक गिळंकृत करून उत्पादनखर्चाच्या १६ टक्के हमखास नफ्यावर डोळा ठेवून उत्पादनखर्च अवाच्यासव्वा वाढवून सांगणाऱ्या खतकारखानदारांनाच झाला. एकेका कारखान्याची जागा. त्यातील तंत्रज्ञान

आणि तो चालविण्यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीची जुळणी यासंबंधी सर्व ठरवाठरव रसायन व खत मंत्रालयात होते. खत कारखान्याला मंजुरी म्हणजे एक उच्चपदस्थांचा राजकीय खेळ आहे. आपल्या देशातील खत कारखान्याचा भांडवली खर्च इतर कोणत्याही सुसंस्कृत देशातील खर्चाच्या जवजवळ दुप्पट असतो!

सरकारच्या हस्तक्षेपामुळे काही विक्षिप्तपणा येतो. उदाहरणार्थ बिहारमधील कोळसा वीजर्निमितीसाठी गुजरातची वाट चालतो, तर गुजरातेतील खनिज वायू भल्यामोठ्या पाईपलाईनमधून पार उत्तर प्रदेशातील अमेठीकडे युरिया उत्पादनासाठी वाहवला जातो.

भारतीय शेतीमधील रासायनिक पोषणद्रव्यांच्या परस्परपूरक वापराच्या परिस्थितीसंबंधी त्या मानाने फारच थोडे लिहिले जाते. खरं तर, खत म्हणजे सगळीकडे सर्व एकच एक वस्तू अशी बऱ्याच जणांची कल्पना असते वनस्पतीच्या वाढीसाठी आवश्यक अशी मुख्यत :तीन पोषणद्रव्ये असतातः नत्र(N), स्फुरद(P)आणि पालाश (पोटॅशिअम K) पिकांना त्यांच्या वाढीसाठी ही तीन पोषणद्रव्ये वाढीच्या वेगवेळ्या टप्प्यांवर वेगवेगळया प्रमाणात आवश्यक असतात. १९६० मध्ये जेव्हा अधिक उत्पादन जातींच्या (high yielding varities) बियाण्यांचा वापर करून सुयोग्य सिंचन व खतांच्या आधारे धान्योत्पादनात वाढ करण्याचा कार्यक्रम आखला गेला तेव्हा मंत्रालयातील बाबू लोकांनी इतर दोन पोषणद्रव्यांकडे दुर्लक्ष करून फक्त नत्रयुक्त खतांच्या उत्पादनावरच सगळा भर दिला. भारतातील जमिनीत पालाश (K)आणि स्फुरद (P)यांचे प्रमाण निसर्गतःच बऱ्यापैकी आहे, असा युक्तिवाद सहजपणे केला गेला. याखेरीज, एकदोन अपवाद वगळले तर पालाशयुक्त आणि स्फुरदयुक्त खतांच्या निर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल परदेशातून आयात करावा लागत असे. अजूनही लागतो. नत्रेतर पोषणद्रव्यांनी युक्त खतांच्या निर्मितीकडे दुर्लक्ष करण्याच्या या धोरणाच्या निषेधार्थ किमान एका कृषिअर्थतज्ज्ञाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे सर्वांना ठाऊक आहे. पोषणद्रव्यांच्या असंतुलित वापरामुळे जमिनीचा पोत झपाट्याने ऱ्हास पावतो हे काही कोणाला समजावून देण्याची गरज नाही.

आजवरचा अनुभव लक्षात घेता वरील धोक्यांचे कंदील बरोबर असल्याचे सिद्ध झाले आहे. भारतातील रासायनिक खतांच्या वापराचे प्रमाण इतर देशातील वापराच्या तुलनेने खूपच कमी आहे. खतांच्या कमी वापरामुळे गेल्या केवळ तीस वर्षांत जमिनीच्या पोताचा झालेला ऱ्हास तर प्रचंडच आहे. आधुनिक



पर्यावरणवादी 'रासायनिक' शेतीला झोडपण्यासाठी जमिनीच्या खालावलेल्या पोताच्या बाबतीत प्रचंड आकडेवारी गोळा करीत; पण ते करताना आपल्या देशातील जमिनीत भरपूर खते वापरली नसून जी खते वापरली त्यातील पोषणद्रव्यांचे (N.P.K.)अयोग्य गुणोत्तर आहे या गोष्टीकडे ते सोयीस्करपणे काणा डोळा करताना. खतांचा त्यांच्यातील पोषणद्रव्यांच्या प्रमाणानुसार कसा वापर करावा हा खरेतर शेतकऱ्याच्या अखत्यारीतला विषय, शासनाने युरियाच्या भाववाढीच्या कृतीने उगीचच या विषयात नाक खुपसले आहे.

सरकारच्या या 'अव्यापारेषु व्यापारा'ने १९९० पर्यंतच या समस्येचे स्वरूप बरेच गंभीर बनले होते. कृषितंत्राच्या बाबतीत विकसित देशांमध्ये नत्र(N), स्फुरद(P), पालाश(K) या पोषणद्रव्यांची ४:२:१ या प्रमाणात शिफारस केली जाते. भारतात हेच प्रमाण ६:२:५:१ असे आहे.

ऑगस्ट १९९१ च्या शेवटी नरसिंह राव सरकारने सबसिडीची रक्कम कमी करण्याच्या अतंस्थ हेतूने रासायनिक खतांच्या किमती एकदम ३० टक्क्यांनी वाढवल्या. एकाच ठोक्यात एवढी मोठी वाढ करण्यात चूक झाली हे लक्षात येताच सरकारने या विषयासाठी एक संयुक्त संसदीय समिती स्थापना केली स्फुरदयुक्त व पालाशयुक्त खतांवरील किमती, वितरण व वाहतूक विषयक सर्व निर्बंध उठवून टाकले; यूरियाची किमत १० टक्क्यांनी उतरवली. परिणामतः नत्रेतर खतांच्या किमती २०० ते ३०० टक्क्यांपर्यत चढल्या. विद्यमान सरकारने, शपथग्रहण केल्याबरोबर किमती कमी केल्या आणि केलेल्या चुकीमुळे बिघडलेली परिस्थिती सुधारण्याच्या नावाचे आता युरियाच्या किमतीत वाढ केली. साखर कारखानदारीप्रमाणेच खत कारखानदारीमध्येही वरच्या पातळीवरील राजकारण आहे. युरिया उत्पादकांच्या लॉबीचे प्रश्न प्रचंड आहे, हे काही असले तरी भारतातील जमिनीला स्फुरदयुक्त आणि पालाशयुक्त खतांची गरज आहे; भरपूर गरज आहे. शेतकऱ्यांना हवी असलेली, हवी तितक्या प्रमाणात खतांचे उत्पादन करण्यास सरकार असमर्थ आहे; त्यामुळे सरकारने खतांमध्ये आणि खातेऱ्यांमध्ये हात घालून बसण्याचे थांबवावे.

तात्पर्य, 'साधाभोळा शेतकरी'सुद्धा खातेऱ्यात नुसताच हात घालून बसला तर तोही खातेऱ्यात लोळणाऱ्या इतरांइतकाच ओंगळ दिसतो.

(शेतकरी संघटक २१ मार्च १९९७)

■

सहा

# गव्हाच्या आयातीचं गौडबंगाल

**त्यांना समजत नाही...**

गेल्या पंधरा दिवसांत गव्हाच्या आयातीच्या प्रश्नाबद्दल अनेकांशी चर्चा केली, देशभर अयोध्या प्रश्नावर वादळ उठलेले आहे. हर्षद मेहता अजूनही वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर जागा अडवून आहे. नाईक-पवार लठ्ठालठ्ठीत कोणाची सरशी होते याकडे लोक उत्कंठतेने पाहत आहेत. गव्हाच्या आयातीमागे काही एक मोठे संकट उभे आहे याची जाणीव कोणालाच नाही. पत्रकार, कारखानदार, दुसरे काही डॉक्टर,वकील मित्र यांना मी सांगितले की, ''देशात अन्नधान्याच्या तुटवडा नाही हे पंतप्रधानही मान्य करतात; पण तरीही सरकारी भावाने शेतकऱ्यांनी जरूरीइतका गहू सरकारला विकला नाही म्हणून हे शासन आयात करते आहे. भारतासारखा दरिद्री देश आपल्या बजेटातून कॅनडा, अमेरिका यांसारख्या श्रीमंत देशांतील शेतकऱ्यांची धन करीत आहे; देशातील खरेदी किमतीपेक्षा जवळ जवळ दुप्पट भाव देऊन गव्हाची आयात करीत आहे, परकीय चलनाचे महासंकट कोसळलेले असताना दीड-दोन हजार कोटी रुपये या वेडाचारावर सरकार खर्च करीत आहे आणि हे सगळे खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष करीत होत आहे.'' हे सगळे विस्ताराने सांगितले म्हणजे ऐकणारालाच मोठा अचंबा वाटतो. एखाद्या नाटकातील खलपुरुषास शोभून दिसेल असले हे कुटील कारस्थान सरकार करीलच कसे हे त्यांना समजत नाही!

**विषारी आयात**

गहू आयातीचा मागचा इतिहास पाहिला म्हणजे, या आयातीने उत्पादक शेतकरी तात्काळ नरम पडतात, ही गोष्ट खरी, काय करतील बिचारे ? गावात गाडगी, मडकी, डबे घेऊन दुकान घालणारा वाणी शेतकऱ्यांना लुटतो अशी



हाकाटी असते; पण मायबाप सरकारच दोन-दोन हजार कोटी रुपयांचा माल महागात आयात करून स्वस्तात विकू लागले तर त्याच्यापुढे शेतकऱ्यांचा काय इलाज चालणार आहे? पण या आयातीच्या विषाने देशही हळूहळू मरतो, शेतीउत्पादन कमी होते आणि देश आयातीवर कायमचा परावलंबी होतो हा नेहरूकाळात घेतलेला प्रत्यक्ष अनुभव आहे. लालबहादूर शास्त्रींनंतर आयात कमी कमी करत, आम्ही संपवली. आता हे विष पुन्हा घेण्याची शासनाला आणि देशाला अवदसा का आठवली?

गव्हाचे पीक गेल्या वर्षीच्या तुलनेने वरचढच आहे; पण तरीही समजू या की ते देशाला पुरेसे नाही. मग, आर्थिक अरिष्टाच्या काळात गहू आयात करण्यापेक्षा देशातील ज्वारी-बाजरीचा वापर करणे काही अशक्य नव्हते. शास्त्रीजींनी सगळ्या देशाला एक वेळ उपवास करण्याचा आदेश दिला. असे करायला हिंमत लागते. नव्या पंतप्रधानांना देशाच्या आर्थिक संकटात गव्हाचा तुटवडा ज्वारी-बाजरी वापरून भरून काढा असे सांगणे सहज शक्य होते. यंदा ही धान्ये मुबलक पिकली आहेत, त्यांचे भाव कोसळत आहेत. महाराष्ट्रातील ज्वारी उत्पादक शेतकरी हैराण झाला आहे. विलायतेतील शेतकऱ्यांकडे सोडलेल्या गंगेचा एक लहान पाट जरी ज्वारी -शेतकऱ्याकडे वळला असता तर त्यांचे जन्माचे दारिद्र्य फिटले असते. किंवा गव्हाचा तुटवडा होणार आहे, देश आर्थिक संकटात आहे म्हणून विशिष्ट उत्पन्न गटावरील लोकांना शिधापत्रिकेवर गहू मिळणार नाही, त्यांनी गहू बाजारातून घ्यावा असे पंतप्रधान आवाहन करू शकले असते आणि त्याला देशप्रेमी नागरिकांनी प्रतिसादही दिला असता. परिणामी गव्हाच्या पुरवठ्यावरील ताण कमी झाला असता.

पण, सरकारने यापैकी काही केले नाही. गहू आणला. गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना धडा शिकवायचे ठरवून आणला. यामुळे पंजाबमधील शेतकरी संतापला तरी चालेल असा हिशोब करून गहू आणला. पंजाबमधील परिस्थिती थोडी थंडावते आहे. एवढ्यातच शेतकऱ्यांना धडा शिकविता येईल असा आडाखा बांधून आयात झाली.

**प्रयोजन?**

ही सगळी, म्हटले तर हास्यास्पद, म्हटले तर करुण, म्हटले तर दारूण कथा. मी सांगू लागतो म्हणजे ऐकणारांना अधिकाधिकच अदभुत वाटत आणि तेच मला उलटा प्रश्न विचारतात''पण सरकार असे का करत असावे ? तुमचे

काय मत आहे?'' आता हा प्रश्न लोकांनी पी. व्ही. नरसिंह राव यांना विचारायला पाहिजे. मनमोहन सिंगांना विचारायला पाहिजे, अन्न-खात्यातील अधिकारी मोठ्या तोऱ्याने आयातीचे समर्थन करीत आहेत त्यांना विचारायला पाहिजे. मी काय उत्तर देणार? तरी मी सांगतो, ''यात तीन कारणे असण्याची शक्यता आहे,''

**बोफोर्स?**

पहिले म्हणजे, सध्या बोफोर्स बंद पडले असल्यामुळे खरेदीवर कमिशन मिळविण्याचा बिनधास्त मार्ग हाच राहिला असावा. धान्यांच्या या खरेदीवर टक्केवारी घेण्याची फार जुनी परंपरा आहे, ती बंद झाली असेल तसे मानायला काही कारण नाही. अन्नखात्याच्या अधिकाऱ्यांनी हा सगळा व्यवहार केला. कापसाच्या निर्यातीचा निर्णय घेण्याकरिता सहा-सहा महिने लावणारे हे नोकरशहा आयात करायची म्हणजे १५दिवसांत कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथे भेटी देऊन, खरेदी करून बोटी ठरवूनसुद्धा मोकळे होतात. ही तत्परता नोकरशाहीत काही सुटत असल्याखेरीज शक्य नाही. गव्हाच्या आयातीत पैसे खाल्ल्याचा आरोप राजधानीत उघड उघड केला जात आहे. या आरोपाला अन्नखात्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेला जबाब मोठा विनोदी आहे, ''गव्हाच्या आयातीतील 'बोफोर्स' झाले का? '' अधिकाऱ्याचे उत्तर असे की,''या खरेदीत मध्यस्थ कोणी नव्हताच त्यामुळे मध्यस्थाच्या कमिशनचा प्रश्न उद्‌भवत नाही. गहू आणि शेतकरी असल्या विषयांत पत्रकारांनाही फारसे स्वारस्य नाही. साठ कोटींचे बोफोर्स गाजले पण तितक्याच रकमेचे गहू प्रकरण वर येण्याची काही शक्यता नाही.

**लढाईची शिबंदी?**

या अमंगल आयातीचे दुसरे काय समर्थन असू शकते? सरकार नजीकच्या भविष्यकाळात मोठी लढाई वगैरे सुरू करणार असेल तर धान्याचा मोठा साठा करून ठेवणे उचित होईल; पण अयोध्येच्या बैराग्यांना घाबरणारे सरकार असे काही धाडस करीत असेल हेही संभव नाही.

**अतिरेकी?**

राहता राहिली एकच शक्यता. पंजाबमध्ये जगणे कठीण झाल्यामुळे तेथून निसटलेले काही अतिरेकी आता मंत्रालयात घुसले असावेत! आणि तेथून पंजाब पुन्हा एकदा भडकून उठावा अशा हेतूने ते मुद्दाम पंजाबला घातक ठरणारे निर्णय जाहीर करवीत असावेत!



**लंगडे समर्थन**

सरकारचे डोके कसे चालले आहे हे समजणे खरेच कठीण आहे. या प्रश्नावर पूर्वीच्या काळीही शेतकीमंत्र्यांनी मोठी विदूषकी उत्तरे दिली आहेत. अमेरिकेतील शेतकऱ्याला जास्त भाव का, असा प्रश्न लोकसभेत आला असता राव वीरेंद्रसिंगांनी उत्तर दिले, ''अमेरिकेत आम्ही नेहमीनेहमी थोडीच खरेदी करतो? तेव्हा एखाद्या वर्षी खरेदी करावी लागली तर तेवढ्यापुरते जास्त भाव देणे योग्यच आहे .'' या उत्तरात सगळात विदूषकीपणा नाही, काही खोल अर्थ आहे. अन्नसचिवांनी हाच मुद्दा मांडला आहे; पण नोकरशहाच्या शहाजोगपणाने मांडला आहे. ते म्हणाले, ''मागणी आणि पुरवठा यांच्यातील दरी भरून काढण्याकरिता आयात करणे अपरिहार्य होते.'' तजेन्द्र खन्ना खरे बोलत असतील तर मग आयातीचा निर्णय जाहीर करताना पंतप्रधानांनी देशात अन्नधान्याचा तुटवडा आहे स्पष्ट का म्हटले नाही? सरकारी खरेदीत पाहिजे तितका गहू मिळाला नाही असे पंतप्रधान म्हणाले. शेतकऱ्यांनी २८ लाख टन गहू कमी विकला म्हणून ३० लाख टनाची आयात करावी लागत आहे असे पंतप्रधान म्हणाले. याचा अर्थ असा की मागणी पुरवठ्यातील तफावत देशात नाही, सरकारी वितरण व्यवस्थेत आहे. वितरण व्यवस्थेकरिता आवश्यक तो गहू शेतकऱ्यांनी दिला नाही कारण बाजारात साडेतीनशे रुपयांचा भाव चालू असताना शासनाने बळेच दोनशे ऐंशी रुपयांचा आपला सरकारी भाव टिकविण्याचा हेका धरला. बाजारात व्यापारी, अडते यांना उतरण्याचा मज्जाव केला. पंजाबातील भारतीय किसान युनियनच्या दोन्ही संघटनांनी या प्रकाराचा विरोध केला होता.

याखेरीज शेतकऱ्यांनी गहू बाजारात न आणण्याचे आणखी एक कारण होते. एरवी गव्हाचा हंगाम चालू झाल्यानंतर दोनच महिन्यांत सगळ्या पंजबातील गहू बाजारात उतरतो. शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक थोडे थांबून बाजारात जाण्याचे ठरविले. त्यामुळे सरकारची मोठी घबराट उडाली. साडेतीनशे रुपये भावाने देशात गहू खरीदण्याऐवजी परकीय चलनात साडेपाचशे रुपये खर्चून गहू आयात करण्याचे सरकारने ठरविले हे योग्य झाले किंवा नाही?

दोनशे ऐंशी रुपयांमध्ये पुरेसा गहू मिळाला असला तर सरकारने आयातीचा विचार केला नसता, हे नक्की. याचाच अर्थ कमी पडणाऱ्या गव्हाची भरती दोनशेऐंशी पेक्षा अधिक भावाने सरकारने केली असती तरी आयात करण्याची पाळी आली नसती. सरकारने असे का नाही केले? आयातीचा महागडा 'अव्यापारेषु व्यापार' व्यापार का पत्करला?

**प्रतिष्ठेचा प्रश्न का शेतकरी द्वेष?**

याचे एक उत्तर स्पष्ट आहे खरेदी भावाने निम्मी-अधिक भरती झाल्यानंतर सरकारने भावात फरक केला असता तर पुढील वर्षी भावात वाढ होईल या आशेने शेतकऱ्यांनी माल आणखी काही काळ राखून ठेवला असता. सरकारी खरेदीची शान राखायची असेल तर एकच उपाय! कोणत्याही परिस्थिती एकदा ठरलेला भाव शासन बदलत नाही, आवश्यक पडले तर हजारो कोटी रुपयांचा तोटा सरकार सहन करते पण शेतकऱ्यांपुढे मान तुकविणार नाही! थोडक्यात, गव्हाची आयात ही शेतकऱ्यांना दिलेली शिक्षा आहे. शासनाचे शेतकरीद्वेषाचे धोरण ज्यांनी पाहिले आहे त्यांना यात आश्चर्य वाटणार नाही.

पण आपल्या शेतकरीद्वेषाची जाहीर कबुली सरकार थोडेच देणार आहे? आपल्या कृतीचे काहीतरी थातुरमातुर समर्थन देण्याची त्यांची धडपड चालू आहे. जास्त किमत देऊन सरकारने गहू मिळविला असता तर त्यामुळे खुल्या बाजारपेठेतील पुरवठा कमी पडला असता आणि त्यामुळे खुल्या बाजारपेठेत किमती भडकल्या असत्या असे त्यांचे अर्थशास्त्रीय पांडित्य आहे! आता हा युक्तिवाद किती फसवा आहे पाहा.

दोनशे ऐंशी रुपयात सरकारला पाहिजे तितकी म्हणजे एक कोटी टन गव्हाची खरेदी झाली असती तर सरकार खुश झाले असते. मग आयातीचा विषयही निघाला नसता. त्या परिस्थितीतही खुल्या बाजारपेठेतील पुरवठा कमी पडलाच असता. तेव्हा हा युक्तिवाद उघडपणे लंगडा आहे. खोटे बोलायचे असले म्हणजे जाडेजाडे शब्द वापरण्याची प्रवृती होते. सेक्रेटरीसारख्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने यामुळेच मोठा विचित्र इंग्रजी प्रयोग केला असावा. सरकारने भाव वाढवून देशात जरूर ती भरती केली असती तर खाजगी व्यापाऱ्यांच्या हातून गहू फक्त सरकारच्या हाती आला असता -(without any net additionality in domestic availability).

**ग्राहकांकडून समर्थन**

आयातीच्या समर्थनार्थ आणखी एक युक्तिवाद केला जातो. शेतकऱ्यांचे हितसंबंध जपले पाहिजेत हे तर खरे; पण त्याबरोबर ग्राहकांचेही संरक्षण झाले पाहिजे. ग्राहकाच्या पदाराआड लपून भांडवलदारांचे हितसंवर्धन करण्याचा हा पवित्रा फार जुना आहे; पण ग्राहकांचे हित कशात आहे? गेली पाच वर्षे गव्हाचे उत्पादन साडेपाच कोटी टनाच्या आसपास स्थिरावले आहे. ते फारसे वाढत नाही याची चिंता सरकारला लागली आहे. उत्पादन असे थंडावले तर



ग्राहकाची शिधापुरवठ्याची व्यवस्था करण्याकरिता आयात करणे भागच आहे असा त्यांचा युक्तिवाद आहे.

**पुन्हा आयातीच्या दुष्टचक्राकडे**

थोडक्यात, देशातले गव्हाचे उत्पादन स्थिरावू लागले तर असे का होते याचा विचार करायचा नाही, शेतीतील भांडवल गुंतवणूक का कमी पडते आहे याचा अभ्यास करायचा नाही; गव्हाऐवजी शेतकरी दुसऱ्या पिकांकडे का वळत आहेत ते नजरेआड करायचे आणि परदेशातून आयात करायला सुरुवात करायची. यामुळे शेवटी काय होईल? लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले त्यावेळी जी परिस्थिती होती तशीच स्थिती पुन्हा एकदा तयार होईल. गहू परवडत नाही म्हणून शेतकरी पिकवीत नाही आणि गहू पिकत नाही म्हणून सरकार आयात करते हे दुष्टचक्र पुन्हा एकदा सुरू होईल. यामुळे, उत्पादन वाढणार नाही, आयातीचा रतीब चालू होईल, सोय फक्त टक्केवारीने कमिशन खाणाऱ्यांची होईल.

**वेगवेगळ्या किमतीचा गोलमाल** :

या दोनशे ऐंशी रुपये भावाची एवढी काय प्रतिष्ठा आहे की, जिच्याकरता सरकारने आपली सारी इभ्रत पणाला लावावी? धान्याच्या पिकांना एकेकाळी लेव्हीची किमत असे. १९६५ मध्ये कृषी मूल्य आयोग स्थापन झाल्यानंतर धान्यपिकांकरिता खरेदीच्या किमती आणि इतर नगदी पिकांकरिता आधारभूत टकमत किंमत अशी दुहेरी व्यवस्था चालू झाली. आधारभूत किंमत म्हणजे कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याला मिळाली पाहिजे अशी किमान किंमत. खरेदी टकमत ही अगदी वेगळी कल्पना आहे. सरकारला ज्या शेतीमालाची खरेदी करायची आहे त्या व्यवहारातील ही टकमत आहे. खरेदी किंमत आधारभूत किमतीपेक्षा नेहमीच वरचढ असली पाहिजे.

खरे म्हटले तर ही दुहेरी व्यवस्था निरर्थक आहे. खरेदी किंमत अशी काही गोष्ट असता कामा नये. खुल्या अर्थव्यवस्थेत सरकारने बाजारपेठेत उतरून चालू भावाने खरेदी केली पाहिजे. एखादे वर्षी शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल, एखादे वर्षी कमी मिळेल. या पलीकडे जाऊन आधारभूत किंमत मिळण्याची व्यवस्था हवी असेल तर शेतकऱ्यांना तसा विमा उतरवता येईल. किमती पडल्यावर सरकारने आधारभूत किंमत देण्याकरिता बाजारात उतरावे अशी शेतकऱ्यांची अपेक्षा असेल तर सरकारी खरेदीची किंमत खुल्या बाजारातील किमतीपेक्षा कमी असणार हे उघड आहे. थोडक्यात, खरेदीची किंमत आधारभूत

किमतीपेक्षा जास्त, पण खुल्या बाजारपेठेतील किमतीपेक्षा काहीशी कमी असावयास पाहिजे.

**सरकारी हातचलाखी**

हे सगळे विवरण मोठे गोंधळाचे आहे. आणि सरकारने याच गोंधळाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना साफ नाडले आहे. होळी, शिमगा, फाल्गुन असे म्हणून तीन महिन्यांचे व्याज लावणाऱ्या सावकारांसारखी हातचलाखी सरकारने केली आहे. लेव्हाची किंमत १९६५ पर्यंत ठरवली जात होती. खुल्या बाजारपेठेच्या तुलनेने लेव्हीची किंमत ५० ते ६० टक्क्यांच्या आसपास असे. १९६५ मध्ये कृषी मूल्य आयोग स्थापन झाला आणि आधारभूत किमती जाहीर होऊ लागल्या. तीन वर्षांनी सरकारी खरेदीकरिता आधारभूत किमतीऐवजी खरेदी किंमत अंमलात आणावी असे ठरले आणि इथे सरकारने हातचलाखी केली. आधारभूत किमतीतच जुजबी वाढ करून तिलाच खरेदी किंमत म्हणून घोषित करण्यात आले. खरेदी किंमत आधारभूत किमतीपेक्षा निदान २० टक्के जास्त पाहिजे असे धरले तर गेली २५ वर्ष सरकार खरेदी किंमत सांगून, पण आधारभूत किंमत लावून गव्हाची खरेदी करीत आहे. गहू, ज्वारी इत्यादी धान्याची खरेदी किंमत आणि कापूस, भुईमूग इत्यादी नगदी पिकांना द्यायची आधारभूत किंमत या दोन्हीही किमती काढण्याची पद्धत एकच आहे. खरेदी किमतीच्या हिशोबात थोडे उजवे किंवा झुकते माप दिले जात नाही, देण्याची व्यवस्थाही नाही, म्हणजे, खरेदी किंमत, काही झाले तरी, बदलणार नाही अशी जी शासनाने आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे त्यात काही अर्थ नाही. ही खरेदी किंमत मुळातच फसवाफसवीची बाब आहे. त्याचा एवढा बाऊ करून सरकारने शेतकऱ्यांना धडा शिकविण्याचे धाडस करायला नको होते.

**पंचाक्षऱ्यापेक्षा जहाल मात्रा**

यावर आता शेतकरी काय उत्तर देणार? आयातीला विरोध तर करणारच. नेहरूनीतीचे भूत पुन्हा एकदा उठू पाहत आहे. त्यावर पंचाक्षऱ्याची मात्रा चालवणारच; पण याला खरे चोख उत्तर गहू उत्पादक शेतकरीच देऊ शकतील. परदेशातून धान्यधुन्य आणणे इतके सहज आणि सोपे असेल तर सरकारने यापुढे सगळे अन्नधान्य विलायतेतूनच आणावे. आम्ही आमच्या पोटाच्या गरजेइतकेच धान्य पिकवू असा निर्धार शेतकऱ्यांनी केला तर सरकारची मस्ती उतरल्याखेरीज राहणार नाही.

(शेतकरी संघटक, २१ नोव्हेंबर १९९२)

■



सात

# खलिस्तान्यांची चंगळ

**'विनाश काले विपरीत बुद्धी'**

आणखी पंधरा लाख टन गहू आयात करण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाचे याहून यथार्थ वर्णन करणे केवळ अशक्य आहे.

चालू वर्षी बैसाखीचा सण १३ एप्रिलला आहे. त्या दिवसापासून म्हणजे आठवड्याभराने पंजाब-हरियाणातील गव्हाच्या मंड्यांमध्ये गव्हाचा पूर लोटू लागेल. चालू हंगामातील गव्हाचे उत्पादन ६ कोटी ४५ लाख टन इतके प्रचंड आहे. राष्ट्रीय अन्न महामंडळाकडील १९९६ -९७ वर्ष अखेरीचा शिलकी साठा २७ लाख म्हणजे रेशनिंग व्यवस्थेच्या हिशेबाने फक्त १० लाख टन कमी आहे.

गव्हाचे भरलेली जहाजे बंदरात गहू उतरून घेण्याची वाट पाहत उभी आहेत आणि आणखी कितीतरी जहाजे भारताच्या किनाऱ्याकडे निघाली आहेत. गेल्या डिसेंबरमध्ये गव्हाच्या किरकोळ विक्रीच्या किमतीमध्ये झालेल्या कृत्रिम वाढीमुळे हवालदिल होऊन शासनाने परदेशात सुमारे २० लाख टन गहू खरेदीचे करार केले. त्यापैकी ४.४ लाख टन गहू देशात पोहोचला तर सुमारे ३.३ लाख टन गहू वेगवेगळ्या बंदरांमध्ये ९ जहाजांतून किनाऱ्यावर उतरून घेण्याच्या प्रतीक्षेत आहे. येत्या दोन महिन्यांत आणखी २.१ लाख टन गहू बंदरांवर येऊन पोहोचेल आपल्याकडील एकूणच बंदरांची क्षमता, गोदामे, वाहतुकीची साधने इत्यादीसंबंधी परिस्थिती पाहता अजून १५ लाख टन गहू परदेशातून आणण्याचा निर्णय घेणे शहाणपणाचे निश्चितच नाही. आयात झालेला बहू गोदामांमध्ये बेवारस पडलेला असतो. त्यातून तो निकृष्ट प्रतीचा असतो. रेशन व्यवस्थेच्या अगदी खऱ्या ग्राहकांच्याही तो पसंतीस उतरत नाही. १९९३ मध्ये नरसिंह राव सरकारने आयात केलेला ३० लाख टन गहू रेशनकार्डधारकांच्या अक्षरशः माथी मारला गेला. मागील दोन हंगामांत देशांतर्गत

गव्हाची सरकारी खरेदी (आधारभूत भावाने वसुली) अनुक्रमे १८० लाख टन व १६० लाख टन झाली होती. यावर्षी देशातील मंड्यांमध्ये गव्हाची सरकारी खरेदी १० लाख टनांपर्यंतच झाली तरी राष्ट्राय अन्न महामंडळाला त्यांचा गव्हाचा साठा हाताळणे केवळ अशक्य होईल. सरकारच्या ताब्यातील लाखो टन गहू सडून नाश पावणार आहे हे निश्चित.

गव्हाच्या आयातीच्या नव्याने घेतलेल्या निर्णयात आर्थिक शहाणपणा नाही. गव्हाच्या आंतरराष्ट्रीय किमती प्रतिटन १८० डॉलर्सच्या आसपास आहेत. म्हणजे कॅनडा किंवा अर्जेंटिनात त्या प्रतिक्विंटल ६४८ रुपयाच्या आसपास आहेत. भारतात आयात केल्यावर बंदरावर येईपर्यंत त्याची किंमत प्रतिक्विंटल सुमारे ८०० रुपयांपर्यंत पोहोचते. ऑस्ट्रेलियाला त्यांच्याकडे असलेल्या गव्हाच्या प्रचंड साठ्याचे काय करायचे अशी चिंता आहे, ते किमतीवर १० टक्के सूट देऊन आपला जुना साठा हातावेगळा करण्यात उत्सुक आहेत. आपल्याकडील गव्हाची सरकारी वसुली आधारभूत किंमत गेल्या वर्षी ३८५ रुपये प्रतिक्विंटल होती. चालू हंगामासाठी सरकारने ती ४१५ रुपयांपर्यंत वाढविली आहे. (किसान समन्वय समितीने गव्हाच्या भावावर आंदोलनाची घोषणा करताच, सरकार डळमळीत असतानाही १ एप्रिल रोजी शासनाने प्रतिक्विंटल ६० रु. बोनस द्यायचे घोषित केले.) पंजाबात खुल्या बाजारात गव्हाची किंमत सध्या क्विंटलला ६३० रुपयांच्या आसपास आहे. शासनाची जर पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेशातील मंड्यांमध्ये शेतकऱ्यांनी आणलेला गहू क्विंटलला ६०० रुपये दराने घ्यायची तयारी असेल तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी (रेशनिंग) आणि निर्यातीसाठीसुद्धा आवश्यक तितका गहू शासन खरेदी करू शकेल आणि बऱ्यापैकी फायदा मिळवू शकेल; त्याबरोबरच, मौल्यवान परकीय चलनही प्राप्त करू शकेल.

जे सर्वानाच फार काळापासून ठाऊक आहे ते स्वतः पंतप्रधानांनीही मान्य केले आहे. देशाची अर्थव्यवस्था कर्जाच्या सापळ्यात सापडली आहे आणि तरीही डिसेंबर १९९३ मध्ये करार केलेल्या गहू– आयातीच्या व्यवहारात सरकारने १५० कोटी रुपयांचे परकीय चलन वाया घालवले आहे आणि आयात गव्हाच्या हाताळणीत १०० कोटी रुपयांचे नुकसान सोसले आहे. गव्हाच्या नवीन आयातीमुळेही परकीय चलनातील १०० कोटी रुपयांचा तर देशांतर्गत नासधुशीमुळे होणाऱ्या तोट्यात ६० कोटी रुपयांचा भुर्दंड राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला सोसावा लागणार आहे.



या अजागळ कृतीमागचे सांगितले जाणारे कारण म्हणजे शेतकरी सरकारला प्रतिक्विंटल ४१५ रुपयाच्या भावाने गहू विकायला तयार होणार नाहीत अशी सरकारला भीती वाटते! खरं तर, शेतकऱ्यांनी यापेक्षा वेगळे काही करणे म्हणजे त्यांच्याइतके मूर्ख तेच ठरतील! जे सरकार साऱ्या देशाला भारभूत ठरलेल्या नोकरशाहीच्या पगारवाढीसाठी बिनदिक्कत एकरकमी ५००० कोटी रुपयांचा बोजा घेते ते ज्या गहू उत्पादक शेतकऱ्यांनी देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले त्यांच्या घामाचे दाम मिळू देण्यात निकराचा विरोध करते!

पीएल ४८० च्या काळापासूनच्या सर्व अनुभवांवरून असे दिसते की, शेतीमालाच्या देशांतर्गत किमती पाडण्यासाठी आयात शेतीमाल देशांतर्गत बाजारात ओतण्याची (Dumping)कारवाई नेहमीच आत्माघातकी ठरते. अव्यावहारिक आयातीमुळे किमती पडतात; न परवडणाऱ्या किमतीमुळे उत्पादनात अनुत्साह तयार होतोः आणि मग तुटवडा जाणवायला लागल्यामुळे अधिक मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. हे दुष्टचक्र अगदी नेहरू युगापासून आपल्या परिचयाचे आहे. आयातीची मर्दुमकी यावेळी कमी घातक असेल असे सरकारला वाटण्यास काय कारण असावे?

अर्थशास्त्र आणि सामान्य ज्ञानाचे नंतर पाहू; पण अशा तऱ्हेने व हेतूने परदेशी गहू बाजारपेठेत ओतण्याचे पंजाबच्या परिस्थितीवर काय परिणाम होतील याचा विचार सरकारने केला आहे का? देशाचा उर्वरित भाग पंजाबच्या भूमीच्या सुपीकतेचा अवाजवी गैरफायदा घेत आहे असा ग्रह दशकानुदशके पंजाबमध्ये जोपासला गेला आहे. पंजाबच्या ग्रामीण भागाची नाळ 'खलिस्तान'च्या कल्पनेशी कधीच जुळली नसती; पण गव्हाच्या किमतीवरील हमखास अन्यायाने घोटाळा केला. एशियाड १९८२ च्या वेळी कोणाही शीख माणसाला दिल्लीमध्ये प्रवेश न देणे हे जितके पंजाबविरोधी होते तितकेच एकाच वर्षात गव्हाची दोन वेळा आयात करणे पंजाबविरोधी आहे. आता कुठे पंजाबातील परिस्थिती स्थिरस्थावर होऊ लागली आहे, तोच देवेगौडा सरकारने वाकड्या वाटेवर पाऊल टाकले. जागतिक व्यापार संघटनेच्या आणि आर्थिक सुधार कार्यक्रमाच्या अटी गुंडाळल्या आणि 'खलिस्तान्यां'च्या हाती आयते हत्यार दिले.

आपल्यापेक्षा कितीतरी पटीने सुस्थितीत असलेल्या फ्रेंच शेतकऱ्यांनी ब्रिटिश ट्रक रस्त्यांवर अडवून त्यांतील मांस फेकून दिले; त्यांच्याकडील मांसापेक्षा मस्त आणि स्वस्त असूनसुद्धा. 'इंडियन' पद्धतीने त्यांच्या सरकारने

त्यांच्या बाजारात गहू ओतण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांची प्रतिक्रिया काय झाली असती?

मागे बोस्टनला तेथील चहा उत्पादकांनी आयात चहा समुद्रातच बुडवून 'बोस्टन टी पार्टी' साजरी केली होती. इतिहासाची पुनरावृत्ती होऊन मुंबई - कांडल्यातही 'खिरीची' मेजवानी झडेल काय?

(शेतकरी संघटक, ६ एप्रिल १९९७)

■



आठ

# जमीन आमची, भाव आमचा

## विषय लढा

चिखली-कुदळवाडी सुमारे १५०० लोकसंख्येचे छोटेसे गाव. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गापासून नाशिककडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग फुटतो, त्या दुबेळक्यात भोसरीची उद्योगमहानगरी आणि भोसरी गाव बसले आहे. देशातील सगळ्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींपैकी ही एक. पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेच्या क्षेत्रात ही वसाहत येते आणि त्यामुळे ही महानगरपलिका हिंदुस्थानातील सर्वात श्रीमंत समजली जाते. औद्योगिक वसाहतीची हद्द संपते तेथे टाटांच्या टेल्को कंपनीचा ट्रक तयार करण्याचा कारखाना आहे. हिंदुस्थानातील हा सर्वात मोठा कारखाना. कारखान्याच्या पूर्व-पश्चिम कुंपणाच्या भिंतीला लागून एक डांबरी सडक जाते येथे चिखली-कुदळवडी गाव आहे. चिखलीला लागून पंढरीच्या वारकऱ्यांचा देहू-आळंदी रस्ता जातो. त्या रस्त्याला ही सडक मिळते. टेल्कोच्या भिंतीची संगत सुटल्यानंतर सडक आपला गुळगुळीतपणा, तुकतुकीतपणा सोडून देते. गावातून जाणारा रस्ता आपला कच्चा, ओबडधोबड, खाचखळग्यांनी भरलेला आणि पावसाळ्यात चिखलाने भरून जाऊन गावाचे चिखली नाव सार्थक करणारा.

१५ मे १९९३ पासून गावाचा रंग एकदम बदलला आहे. तरुण पोरे छातीवर अभिमानाने शेतकरी संघटनेचा बिल्ला लावून फिरत आहेत. सडकेच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर संघटनेच्या घोषणा रंगवल्या जात आहेत. 'शेतकरी संघटनेचा विजय असो', 'आमची जमीन, आमचा भाव,' चिखली गाव लवकरच संपणार आहे, शेतकऱ्यांच्या जमिनी पिंपरी-चिंचवड महानगरीच्या पसरत्या विळख्यात नष्ट होणार आहे. तेथे आधुनिक कारखानदारी आणि छानछोकीचे विलासी बंगले, गाळे उभे राहणार आहेत. हिंदुस्थानातील सर्वात श्रीमंत महानगरीच्या

पोटांत चिखली गिळंकृत होणार आहे. चिखलीचे शेतकरी जाणार कोठे? टेल्कोच्या शेजारी, मजुरीच्या दरांची स्पर्धा करून शेती करणे शक्य नाही. नव्या कारखानदारीत रोजगार मिळण्याची शक्यता जवळजवळ शून्य. शेकडो वर्षे पूर्वजांच्या पिढ्या जिने पोसल्या ती जमीन सोडून देताना त्या जमिनीच्या किमतीतून पुन्हा पायावर उभे राहता यावे एवढीच तिथल्या गावकऱ्यांची इच्छा आहे; पण ही इच्छासुद्धा पुरी होणे आजतरी अशक्य दिसते आणि ते शक्य करण्याकरिता शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली शेतकरी एकजूट करत आहेत. लढा फार विषम आहे. एका बाजूला मूठभर शेतकरी दुसऱ्या बाजूला पिंपरी-चिंचवड नगरविकास प्राधिकरण (पिचिंप्रा), तिचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील आणि श्रीनिवास पाटलांचे वर्गमित्र, देशभर भूखंड व्यवहारातील कौशल्याकरिता गाजलेले देशाचे माजी रक्षामंत्री सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. शरदचंद्रावजी पवार.

**शेतकऱ्याला निर्वासित करणारा भूखंड व्यापार**

भूखंडाचे अर्थकारण सगळ्या मोठ्या शहरांतील राजकारणाचा पाया झाले आहे. खेडी ओसाड पडत आहेत. खेड्यांतील लक्ष्मी 'नेहरूनीती'प्रमाणे लुटून शहरात आणून टाकली जात आहे, कारखानदाराची वाढ तेथे होते आहे. आपल्या हरवलेल्या लक्ष्मीच्या शोधात शेतकरी पोरे निर्वासित बनून झुंडीच्या झुंडीने शहरात येत आहेत. शहरे फुगत आहेत, तिथल्या जमिनीला सोन्याचा भाव येत आहे. शहरांच्या वाढत्या सीमांच्या आसपासच्या जमिनी खाजगी बिल्डर आणि दलाल विकत घेतात, अगदी मातीमोल भावाने, एकगठ्ठा, अगदी एकरच्या एकर विकत घेतात. त्यांचे प्लॉट पाडून पाण्याची, सांडपाण्याची, विजेची, रस्त्यांची सोय करतात. मग हेच प्लॉट शेतकऱ्यांना मिळालेल्या किमतीच्या दोनशे, पाचशे, हजार पट भावाने चौरस फुटाच्या हिशोबाने विकले जातात. शहरीकरणात जमिनीच्या वाढणाऱ्या किमतीचा फायदा शेतकऱ्याला मिळत नाही. तो निर्वासित बनतो, देशाधडीला लागतो आणि त्याच्याच जमिनीवर आठवड्याभरात बिल्डर लोक मालेमाल होऊन जातात. या लोकांची ताकद फार मोठी. सरकारी अधिकारी, पोलिस यांना ते पोसतात. स्थानिक पुढारी त्यांच्या तालावर नाचतात आणि मोठ्या नेत्याशीही या लोकांचे संपर्क फार घनिष्ठ. या नेत्यांच्या सहकार्याखेरीज इमारती बांधण्याचा आणि भूखंडाचा व्यापार फायदेशीर होऊच शकत नाही.

**परिसाहून थोर, भूखंड व्यापार**



शहराची सीमा जवळ आली की आसपासची खेडी शहराच्या हद्दीत घेतली जातात. दीडदोन एकरांचा छोटा शेतकरी एका दिवसात शहरी कमाल भूधारणा कायद्याखाली जमीनदार ठरतो. जमिनीच्या देवघेवीचा, खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार ठप्प होतो. वेगवेगळ्या कारणांनी अडकलेल्या जमिनी एजंट लोक मातीमोलाने खरीदतात, सरकारदरबारीचा आपला स्नेहसंबंध वापरून कचाट्यात सापडलेल्या जमिनी मोकळ्या करून घेतात. जमिनीच्या स्थितीबद्दल आणि उपयोगाबद्दल फेरफार करण्याचा सरकारी अधिकार म्हणजे लोखंडाचे सोने करणाऱ्या परिसाहूनही अधिक सामर्थ्यशाली ठरला आहे. कारखानदारी, आयात-निर्यात यांच्याकरिता लायसेंस परमीट मागायला येणारे लोक फार थोडे. असे लासयेंन्स-परमीट देणाऱ्यांना काय फायदा मिळत असेल. इतका गडगंज नफा जमिनीच्या फेरफारावर सरकारी शिक्का उठवणारे पुढारी आणि अधिकारी मिळवतात; पण दलालांच्या जमिनी मोकळ्या करण्याबद्दल कमिशन खाऊन मंत्र्यांची, पुढाऱ्यांची भूक थोडीच भागणार आहे? त्यांना स्वतःच्या नावाने या हिरेमाणकांच्या खाणीतील संपत्ती मिळवायची आहे. शिस्तबद्धपणे पुढाऱ्यांनी हा भ्रष्टाचार चालवला आहे. सरकारच्या हाती 'भूमीसंपादन कायदा' नावाचे एक कोलीत आहे. अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय, आर्थिक, सामाजिक कामाकरिता जमिनी संपादन करण्याचा अधिकार या कायद्याने सरकारला दिला आहे. या अधिकाराचा उपयोग एकेकाळी फार बेताबेताने होत असे पण स्वातंत्र्यानंतर भूमीसंपादनाचा रणगाडा बेफाम उधळू लागला आणि त्याखाली चिरडले गेले ते सगळे शेतकरीच.

**विक्राळ सुलतानी भू-संपादन कायदा**

कोणत्याही सरकारी, निमसरकारी, सहकारी किंवा सार्वजनिक संस्थेकरिता भूसंपादन कायद्याचा वापर केला जातो. शेकडो नाही, हजारो एकर जमीन सरकार ताब्यात घेते. जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याप्रमाणेच हा शेतकरीविरोधी कायदा अत्यंत विक्राळ सुलतानी आहे यात शेतकऱ्यांच्या विनंती अर्जांना स्थान नाही, केविलवाण्या आक्रोशाला स्थान नाही. या जमिनीची गरज सार्वजनिक कामांकरिता आहे एवढे एखाद्या जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असले की कोणाचे काही चालत नाही.

जमिनी संपादन करण्याचा अधिकार कठोर तर त्या जमिनीचा मोबदला ठरवण्याचा अधिकार महाकठोर. एके काळी जमिनीच्या किमती महसुलाच्या पटीत ठरवल्या जात. त्यानंतर अलीकडे नोंदणी झालेल्या खरेदीविक्री व्यवहारात

ठरलेल्या किमतीच्या आधाराने मोबदल्याची किमत ठरवली जाऊ लागली. सगळ्या जगभर खेड्यापाड्यात आणि शहरांतसुद्धा नोंदणी झालेली किंमत अपुरी असते, हे जगप्रसिद्ध आहे. तरीदेखील अशा मोडक्यातोडक्या आधारानेच शेतकऱ्यांच्या जमिनी शासन हस्तगत करते. नोंदणीच्या वेळी सरकारला मिळणारे स्टँप फीचे उत्पन्न कमी होऊ नये म्हणून काही वर्षांपूर्वी सरकारने प्रत्येक गावात वेगवेगळ्या भागाकरिता स्टँप फीची रक्कम आकारण्यासाठी खरेदी-विक्रीच्या प्रमाणित किमती ठरवून दिल्या आहेत. सरकारी कामासाठी जमीन संपादन करताना मात्र या प्रमाणित किमतीचा वापर केला जात नाही.

**भूखंड व्यवहारांचे अतिजहाल मिश्रण**

शेतकऱ्यांना देशोधडी लावले आणि जमीन खात्याच्या किंवा संस्थेच्या ताब्यात आली की मग पुढारी आणि त्यांची दोस्त मंडळी त्या जमिनींचे लचके तोडतात. महाराष्ट्रात अनेक संस्थाचा प्रमुख उद्योगच मुळी संपादन केलेल्या जमिनी गिळंकृत करणे हा आहे. पुण्याच्या कृषि उत्नन्न बाजार समितीचे उदाहरण, मासला म्हणून पुरसे आहे. गुलटेकडी येथील शेतमालाच्या बाजारासाठी प्रचंड जमीन सरकारने या संस्थेच्या हाती दिली. कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा म्हणून आजपर्यंत काहीही केलेले नाही; पण समितीच्या अधिकारातील जागा पुढाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या आप्तसंबंधियांना बहाल करण्याचा सपाटा मात्र चालवला आहे. शेतमालाच्या बाजाराकरिता संपादन केलेली जमीन दारूचे गुत्ते, हॉटेल, मोटारसायकली-मोटारगाड्या यांची दुकाने, गॅस एजन्सी असल्या वाटेल त्या कामाकरिता दिली आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या अधिकारातील जमीन बिगरशेती करण्याची गरज नसते आणि शहरी कमाल धारणेचा कायदाही तिला लागू पडत नाही. म्हणून मोठे पुढारी समितीकडून जागा ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतात.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी एक एकराची जागा राखून ठेवलेली होती. एक दिवस समितीने एका बैठकीत ऐनवेळचा विषय म्हणून या जमिनीचा प्रश्न विचारात घेतला आणि एका ट्रस्टाला ती जमीन किरकोळ मोबदला घेऊन देऊन टाकली. ज्या दिवशी हा ठराव झाला त्या दिवशी असा कोणता ट्रस्ट अस्तित्वातच नव्हता. असा ट्रस्ट करण्यासंबंधीचा अर्ज धर्मादाय आयुक्तांकडे दाखल झाला तोच मुळी जमिनीच्या घबाडासंबंधी समितीचा ठराव झाल्यानंतर! या ट्रस्टने शेतकऱ्यांच्या सोयीचे कोणते काम केले? तर त्या प्लॉटवर एक मंगल कार्यालय बांधले. या मंगल कार्यालयाचे रोजचे भाडे बारा ते वीस हजार



रुपये आहे. शेतकऱ्यांच्या भल्याच्या काही चुटपूट हालचाली हा ट्रस्ट दाखवतो; पण शेतकऱ्यांना देशोधडीला लावून त्यांच्या गिळंकृत केलेल्या जमिनीवर खोऱ्याने पैसा ओढण्याचे काम हा ट्रस्ट करतो. यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयाने चौकशी समिती नेमावी असा आदेश महाराष्ट्र शासनाला दिला होता. तो कोर्टाचा आदेश धुडकावून लावण्यात आलेला आहे. चौकशीची सुरुवातसुद्धा झालेली नाही. कारण कदाचित हे असावे की, या ट्रस्टचे प्रमुख आहेत माननीय शरदचंद्रावजी पवार.

दलाल आणि पुढारी यांच्या भूखंड व्यवहारांचे मिश्रण अतिजहाल झाले आहे. मुंबईत अलीकडे घडलेले दंगे, खरे म्हटले तर, जातीय नव्हते. झोपडपट्ट्यांनी व्यापलेली जागा मोकळी करून तेथे बांधकाम करण्याकरिता दंगेधोपे आणि जळिते नियोजनपूर्वक घडवून आणण्यात आली होती आणि यात थोरथोर नेत्यांचा हात होता हे आता स्पष्ट होऊ लागले आहे.

**मावळ्यांचे गुंडगिरीला आव्हान**

या असल्या भयानक आर्थिक, राजकारणी आणि गुंडगिरीच्या सामर्थ्याला आव्हान द्यायला उभे राहिले आहे मावळातील हे धिटुकले गाव आणि त्यातील मूठभर शेतकरी.

चिखलीत आज जे वादळ उभे राहिले आहे त्याचा इतिहास थोडक्यात सांगण्यासारखा आहे. चिखली गावातील जवळजवळ हजार एकर जमिनी संपादन करण्यासंबंधी सरकारी अधिसूचना १९७० साली निघाली. याच वेळी पिंपरी चिंचवडच्या विस्ताराकरिता अशाच अधिसूचना इतरही दहा गावांत निघाल्या. अधिसूचना निघाल्याबरोबर कर्ज देणे बंद झाले, हस्तांतरणाचे सर्व व्यवहार स्थगित झाले.

१९७२ मध्ये पिंपरी चिंचवड नगरविकास प्राधिकरण स्थापना करण्यात आले. या प्राधिकरणाचा हेतू 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर निवासी घर बांधणीसाठी प्लॉट उपलब्ध करून देणे हा होता आणि आहे.

१९७६ मध्ये शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शेतकरी संघटना स्थापना केली आणि या संस्थेतर्फे शेतीची जमीन संपादन करण्यास विरोध केला; पण माळरान जमीन देण्याची तयारी दाखवली.

**अल्प भरपाईत भूसंपादनाचा प्रयत्न**

१९८६ मध्ये जमीन संपादनाचा आदेश निघाला. सर्वसाधारणपणे जमिनीची किमत एकरी ४००० रुपये ठरली. त्यावर ३० टक्के सांत्वना आणि व्याज असे

सगळे मिळून शेतकऱ्याला दर एकरी १२ ते १६ हजार रुपये मिळावे असा सरकारी निर्णय झाला. काही अडल्यानडल्या शेतकऱ्यांनी पैसे घेतले, काहींनी यातून सुटका नाही अशा भावनेने निषेध नोंदवून पैसे स्वीकारले; पण बहुसंख्य शेतकऱ्यांनी पैसे घेतले नाहीत. एवढेच नव्हे तर, जमिनीचा ताबा सोडण्यास नकार दिला. जमीन ताब्यात घेतल्याचा खोटा पंचनामा प्राधिकरणाने कार्यालयात बसून पुरा केला आणि त्यावर पंचाच्या युक्ति-लबाडीने सह्या घेतल्या, याबाबत तपशीलवार माहिती ९ मे ९३ च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये दिली आहे. हा कागदोपत्री व्यवहार झाला. शेतकरी आपले शेतीचे व्यवहार करतच राहिले. ७/१२ च्या उताऱ्यावर प्राधिकरणाचा कब्जा दाखवण्यात आला, त्याबद्दल शेतकऱ्यांनी निषेध नोंदवला; पण अन्याय करणारे निर्णय देणारे आणि त्यांची अंमलबजावणी करणारे सगळे एकच. त्यामुळे ७/१२ च्या उताऱ्यातील फेरफाराबद्दल फार काही गडबड केली नाही.

शेतकरी जमीन कसत राहिले. आजही तेथे शाळूची पिके घेतल्याच्या स्पष्ट खुणा आहोत गुलाबाची बाग आहे, अशोकाची आणि इतर झाडांची वनशेती आहे आणि चांगली बहरणारी आमराईही डोलत आहे. या काळात तेथे विहीर घेतली गेली. एका शेताला तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने अगदी अलीकडे, म्हणजे १९९० मध्ये विजेचे कनेक्शनसुद्धा दिले आहे.

**चार हजाराचे अकरा लाख!**

चिखलीच्या जमिनीच्या कर्मकथेला नवी कलाटणी मिळाली ती ६ जानेवारी १९९३ रोजी. त्या दिवशी तत्कालीन सरक्षणमंत्री माननीय श्री. शरदचंद्रावजी पवार पुण्यास भेटीस आले होते आणि त्यांनी चिखलीच्या जमिनीपैकी टाटांच्या ट्रक कारखान्याच्या विस्तारासाठी १०० एकर जमीन देण्याचे जाहीर केले. एक महिन्याने पिंपरी चिंचवड प्राधिकरणाने टेल्कोला त्याहीपुढे जाऊन १८८ एकर जमीन देण्याचे जाहिर केले. ही जमीन आता निवासी उपयोगाकरिता वापरली न जाता कारखानदारीसाठी वापरली जाईल असा बदलही पिंपरी चिंचवड प्राधिकरणाने जाहीर करून टाकला. या भागात आता जमिनीची किमत ५०-५५ रुपये प्रतिचौरस फूट आहे. पण टेल्कोला, घाऊक गिऱ्हाईक म्हणून, २५ रुपये प्रतिचौरस फूट किंवा ११ लाख रुपये प्रति एकर भावाने देण्याचा सौदा झाल्याचे समजते. शेतकऱ्यांच्या हाती असताना ज्या जमिनीची किमत ४००० रु. एकर होती, ती आता ११ लाख रुपये एकराची झाली!

या सगळ्या व्यवहारात गोलमाल गोंधळ फार मोठा आहे



१) प्राधिकरणाचे काम 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर निवासी प्लॉट तयार करून देणे हे आहे. कारखानदारी वसाहतींचा विकास हे प्राधिकरणाचे (पिंचिप्रा) काम नाही.

२) मुळात निवास कामाकरिता जमिनीचे संपादन झालेले असताना दुसऱ्या कोणत्याही कामाकरिता जमिनीचा वापर करणे भूसंपादन कायद्यास धरून नाही. म्हणजे, अयोध्येच्या मंदिराच्या भोवतालची जमीन प्रवाशांच्या सुखसोयीकरिता म्हणून संपादन करायची आणि मग तिथे राममंदिर बनवायचे! हे कायद्याला मान्य नाही. त्यामुळे सर्व भूसंपादनाची कारवाईच रद्दबातल होते. हा बदल घडवून आणण्यासाठी पिंचिंप्राने घिसाडघाईने कारवाई चालवली आहे. या बदलासाठी ज्या अधिकाऱ्यांची संमती आवश्यक आहे त्यांनीही ही संमती दिलेली नाही; पण तरीही ही जमीन टेल्कोला देऊन व्यवहार पुरा करण्याची मोठी गडबड उडाली आहे.

**शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढू - शेतकरीपुत्र शरद पवार**

चिखलीच्या शेतकऱ्यांनी थोडासा निषेधाचा सूर काढल्याबरोबर सर्व हितसंबंधी मंडळी चवताळून उठली. टाटांच्या कारखान्यातील कामगारांचे पुढारी सरसावून उठले. कारखान्याचा विस्तार झाला पाहिजे, कामगारांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजे, या विस्ताराच्या आड कोणी आले तर ते खपवून घेतले जाणार नाही अशी भाषा ते वापरू लागले.

कारखान्याचा विस्तार झाल्यामुळे ४५० कोटी रुपयांचे उत्पादन वाढेल, ३००० कामगारांना नोकऱ्या मिळतील, चिखलीच्या शेतकऱ्यांनी जमीन दिली नाही तर टाटा गुजरातेत जाण्याचा विचार करतील, तेथे सरकारने त्यांना फुकट जमीन देऊ केली आहे अशा धमक्याही शहाजोग मंडळी देऊ लागली आणि सर्वात शेवटी, १५ मे १९९३ रोजी शरद पवारांनी गर्जना केली, 'ही जमीन द्यायचे ठरले आहे, आम्ही ती देणार आहोत. या जमिनीवर शेतकरी शेती करत असतील तर ते अतिक्रमण आहे. जमीन देण्यास विरोध केला तर तो आम्ही मोडून काढू ..... इत्यादी'

**शेतकऱ्यांचा लढाईचा निर्धार**

चिखलीने हे आव्हान स्वीकारले आहे. राष्ट्रीय हिताच्या आड येण्याचा त्यांचा कोणताही हेतू नाही. कारखान्याच्या विस्ताराच्या आड येण्याची त्यांची मुळीच इच्छा नाही. सरकारने त्यांची भूमी संपादन केली आहे हे मुळी त्यांना मान्य नाही. जमिनीचे मालक शेतकरी आहेत, त्यांची वहिवाट चालू आहे.

टेल्कोला व्यवहार करायचा असेल तर तो त्यांनी परस्पर शेतकऱ्यांशी केला पाहिजे, प्राधिकरणाशी नाही. आता या जमिनीकरिता शेतकऱ्यांच्या हातावर एकरी ४००० रुपये टिकवण्याची भाषा झाली, तीच जमीन प्राधिकरणाने, त्यात एक दगडही इकडच्या तिकडेसुद्धा हलवला नाही तरी आता २२ लाख रुपये एकराची झाली आहे. टेल्कोला ११ लाख रुपयांस दिली जात आहे आणि त्याचा फायदा प्राधिकरणाशी संबंधित टोळभैरव अधिकारी आणि पुढारी घेणार आहेत. हे शेतकऱ्यांना मान्य नाही. यासाठी लढा देण्याची त्यांनी तयारी केली आहे आणि महाराष्ट्रभरचे शेतकरी त्यांना साथ देतील असा त्यांना विश्वास आहे.

**हीही खुल्या अर्थव्यवस्थेची लढाई**

नेहरू व्यवस्थेत शेतकऱ्यांना भरडण्याची अनेक साधने वापरण्यात आली. शेती तोट्यात ठेवण्याची धोरणे आणि शहरांना पोसण्याची धोरणे यथास्थित चालली. शेतकऱ्यांना भरडण्याच्या या साधनात भूसंपादनाचा कायदा अत्यंत अन्यायी आणि कठोर म्हटला पाहिजे. आता नेहरूव्यवस्था संपली आहे, खुल्या व्यवस्थेकडे वाटचाल सुरू झाली आहे. अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप मोडून काढण्याचा शेतकऱ्यांनी निर्धार केला आहे. ३० जानेवारी १९९३ रोजी सेवाग्राम येथे आणि ३१ मार्च १९९३ रोजी लालकिल्ल्यावर शेतकऱ्यांनी खुल्या अर्थव्यवस्थेसाठी लढण्याचा आपला निर्धार जाहीर केला. शहरीकरणास सामोऱ्या आलेल्या शेतजमिनींबद्दल काय व्यवस्था असावी यासंबंधी 'राष्ट्रीय कृषि नीती' या मसुद्यात स्थायी कृषि सल्लागार समितीने म्हटले–

५६. मोठी शहरे आणि महानगरे यांच्या सीमांवरील शेतकऱ्यांना एका गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. शहरांच्या विस्तारासाठी त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जात आहेत. या जमिनी सामान्यतः कमीत कमी किमत देऊन ताब्यात घेतल्या जातात. या जमिनींची थोडीफार सुधारणा केल्यानंतर त्यांना भरमसाट किमती मिळतात. ज्या शेतकऱ्याला आपले हे उपजीविकेचे साधन सोडणे भाग पाडले जाते त्याला जमिनीच्या मिळालेल्या तुटपुंज्या किमतीतून नवा उद्योगव्यवसाय सुरू करणे मुश्किल होऊन बसते. यापुढे, जमिनीमधून उत्पादन काढीत असलेल्या शेतकऱ्याला आपली जमीन सोडण्यास भाग पाडले जाणार नाही असे धोरण राहील. शेतकरी जी जमीन कसत नसतील त्या जमिनींचा विकास करून संबंधित नगर विकास अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या योजना व आराखड्यानुसार प्लॉट पाडण्याची व नंतर ते खुल्या



बाजारभावाने विकण्याची परवानगी अशा जमिनींच्या मालकांना व्यक्तिगत अथवा एकत्रित जबाबदारीवर देण्यात येईल. अशा तऱ्हेने जमिनीचा विकास करणे शेतकऱ्याच्या कुवतीबाहेर असेल तर त्याला विकासखर्च वजा जाता विकसित जमिनीच्या किमतीच्या जवळपास किमत मिळाली पाहिजे' (राष्ट्रीय कृषिनीती, शरद जोशी, पृष्ठे ३७, ३८)

**मावळे पुन्हा इतिहास घडवणार**

खुल्या अर्थव्यवस्थेत सरकारी भूसंपादनास आर्थिक क्षेत्रात तरी स्थान नाही, भूसंपादनाचा कायदा मोडीत काढण्यासाठी मावळातील शेतकरी उठतो आहे. मावळाचा शेतकरी उठतो तेव्हा तेव्हा इतिहास घडतो हाही इतिहास आहे. आपले शिवार वाचवायला चिखली सज्ज झाली आहे. इतर शेतकऱ्यांनाही आपल्याला शिवाराच्या रक्षणासाठी उभे राहावे लागेल.

(शेतकरी संघटक, २१ मे १९९३)

■

नऊ

# भूखंडखोरांचा बंदोबस्त

**सगळे गुंड हटले**

देशातील शासनाची सारी सूत्रे भूखंडसम्राटांकडे जाण्याचा धोका आहे. तसे राजकारण शेतकरी, कामगार, कारखानदार, व्यापारी आदी उत्पादकांच्या हाती कधीच नव्हते. स्वातंत्र्यानंतर ते अधिकाधिक हातभट्टीवाले, तस्कर, लायसेंस परमिटदार, काळाबाजारवाले, मादक द्रव्यांची वाहतूक करणारे, भूखंडखोर आणि नोकरदार यांच्या हाती गेले. जिल्ह्याचे राजकारण हातभट्टीवाल्यांच्या हातात, राज्य नेतृत्व तस्कर आणि भूखंडखोर यांना सुपूर्द, कारखानदारी व आयात-निर्यातसंबंधी परवान्यांचे खेळ करणारे केन्द्रात आणि मादक द्रव्यांचे वाहतूकदार खलिस्तान, तामिळइलम इत्यादी फुटीर गटांत अशी सगळ्या गुंडांनी आणि दादांनी देशाची आपापसात वाटणी करून घेतली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. या गुंड दादांना पोसणारे वर्षानुवर्षे चालत आलेले भ्रष्टाचाराचे काही प्रकार थोडे आटोक्यात येत आहेत; निदान ते आटोक्यात येतील अशी चिन्हे दिसत आहेत; पण भूखंडाचा भ्रष्टाचार मात्र अधिकाधिक पसरत चालला आहे. त्यामुळे सगळे राजकारण भूखंडांचे खेळ करणाऱ्यांच्या हातात जात आहे.

**राहिले भूखंड-तस्कर**

अर्थव्यवस्था जसजशी खुली होईल, परेदशी व्यापार मोकळा होईल तसतसे आयात-निर्यातीच्या परवान्यांचा खेळ खेळून पैसे कमावण्याची शक्यता कोणालाच राहणार नाही. ना नोकरदारांना, ना व्यापारी कारखानदारांना, ना पुढाऱ्यांना. पंजाबमधील परिस्थिती जसजशी आटोक्यात येईल तसतसे मादक द्रव्यांच्या वाहतुकीचा पाया उखडला जाईल. तीच परिस्थिती हातभट्टीदादांची आणि तस्करांची. सगळ्या गुंडदादांची सद्दी संपत आली आहे; पण



भूखंडखोरांची सत्ता अव्याहत चालू आहे, कारण त्यांच्या धंद्यात वाढती बरकत आहे; जमिनीच्या दलालांना, बांधकाम व्यावसायिकांना आणि त्यापेक्षा पुढाऱ्यांना.

मुंबईच्या बाँबस्फोट प्रकरणात एक गोष्ट स्पष्ट झाली. तस्करी आणि भूखंड या दोन्ही धंद्यांचा मोठा जिवाभावाचा संबंध आहे. तस्करांना जमिनीवर गुदामे, इमारती, संदेशवहन व्यवस्था आवश्यक आहेत. भूखंडखोरांना तस्करीत गुंतवणुकीला चांगला वाव आहे. रुपया परिवर्तनीय झाला; सोन्याची आयात खुली झाली. त्यामुळे तस्करांवर गंडांतर आले. ते दारूगोळ्याच्या वाहतुकीकडे वळले; पण भूखंडांच्या क्षेत्राला खुलेपणा अद्याप शिवलेला नाही. तेथे लायसेन्स-परमिटराज्य अजूनही चालू आहे.

**बहुरत्ना वसुंधरा**

शहरीकरणामुळे जमिनीच्या किमती सोन्यापलीकडे भडकल्या आहेत. शेकडो कायद्यांच्या जंगलामुळे मौल्यवान जमिनींच्या मालमत्तांचे मालकी हक्क वादांत पडले. सत्ताधारी अधिकारांचा दुरुपयोग करून महागामोलाच्या जमिनीवर मनमानेल तसा हात मारीत आहेत. परिणामी भूखंड हा भरमसाट फायद्याचा प्रचंड व्यापार झाला आहे.

**कल्याणकारींनी केले कल्याण**

भाडेकरू कायद्याचेच उदाहरण घ्या. खुळचट कल्याणकारी कल्पनांनी भाडेकरूंना अवास्तव संरक्षण देण्यात आले. त्यामुळे भाडेकरूंना लॉटरी लागली आणि मालक अभागी ठरले. भाडेकरूंनी गिळलेली मालमत्ता मोकळी करणे; जरूर पडेल तसे कायदेशीर वा बेकायदेशीर, वाटेल ते मार्ग वापरून घरमालकांना त्यांची जमीन निर्वेध करून देणे किंवा अडचणीत सापडलेल्या मालकांकडून त्यांची मालमत्ता पडेल त्या भावाने खरेदी करून नंतर ती निर्वेध करून घेणे; हा अनेक गुंडांच्या सेनांचा आणि पुढाऱ्यांचा मोठा तेजीचा व्यवसाय झाला आहे.

अशाच खुळचट स्वस्त लोकरंजनाच्या धोरणांनी शेतीच्या आणि शहरी जमिनीसंबंधी कमाल धारणेचे कायदे झाले आहेत. कमाल मर्यादेच्या वर ज्यांच्याकडे जमीन निघेले ती जमीन मातीमोलाने सरकारच्या हाती येते आणि लगेच मातीमोलाची बनते. कायद्याच्या या कहारातून सुटण्याच्या पळवाटाही आहेत; पण त्या सगळ्यांच्या किल्ल्या सत्ताधाऱ्यांच्या हाती. तसेच कोणताही जमिनीचा तुकडा शेती, कारखानदारी, निवासी, सार्वजनिक अशा वेगवेगळ्या

झोनमध्ये टाकला की त्यांच्या किमतीत जमीन अस्मानाचा फरक होतो आणि झोन ठरवणे नोकरदारांच्या पुढाऱ्यांच्या हाती!

कोणतीही अडचण नसलेली जमीनसुद्धा भूसंपादन कायद्याने अडचणीत आणता येते. सार्वजनिक कामाकरिता म्हणून जमिनी संपादन करायच्या आणि नंतर त्याचा उपयोग स्वतःच्या किंवा मित्रमंडळींच्या फायद्याकरिता करण्याचा हा व्यवहार गुंड राजकारण्यांच्या हाती 'परिस'झाला आहे.

**मालमत्तेच्या हक्काखेरीज खुली व्यवस्था**

गंमत अशी की मुक्त अर्थव्यवस्थेच्या घोषणा झाल्या तरी जमिनीसंबंधी नेहरूकालीन कायदेकानूंचे घनघोर जंगल छाटण्याची भाषादेखील कोठे सुरू झालेली नाही. मालमत्तेचा हक्क हा मुक्त अर्थव्यवस्थेचा पाया आहे. जमीन आणि मालमत्ता खुली नसतील तर कोणतीही व्यवस्था खुली होऊच शकणार नाही. आर्थिक सुधारणा शहरी क्षेत्रापाशीच येऊन थांबल्या आहेत. खेडेगावात आणि शेतीत त्यांना अजून प्रवेश मिळालेला नाही. तसेच काहीसे मालमत्तेबद्दल झाले आहे. कल्याणकारी समाजवादी भाषा म्हणजे निव्वळ बकवास आहे, सरकार कोणतेही काम कार्यक्षमतेने करू शकत नाही हे सर्वमान्य झाले; पण अशा गबाळ सरकारच्या हातात सगळ्या जमीनजुमल्याची प्राथमिक मालकी आहे. नागरिकांचे हक्क गुंडाळून ठेवून जमिनीसंबंधी नियम बदलण्याची, एवढेच नव्हे तर सार्वजनिक हिताकरिता म्हणून जमिनीचे संपादन करण्याची निरंकुश सत्ता शासनाच्या हाती आजही आहे. ही सगळी हत्यारे भ्रष्ट आणि गबाळ पुढारी आणि नोकरदार अजूनही परजत आहेत. जमिनींच्या मालकीबद्दल नेहरूप्रणीत व्यवस्था अशीच सुरू राहिली तर भूखंडखोरांचे फावणार आहे. इतर गुंडदादांना वेसण बसली आणि भूखंडखोरांना मात्र मोकळे रान मिळाले तर सगळा देश त्यांच्या हाती येणार आहे.

**जमिनीच्या गुलामीचा इतिहास : जमीनदार ठेचा**

इंग्रजी अमलात, सार्वजनिक कामासाठी जमिनी संपादन करण्याची कायदा एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीच झालेला होता. स्वातंत्र्याच्या काही काळ आधीपासून जमिनीचे फेरवाटप घडवून आणण्याच्या दृष्टीने कायदेकानू करण्यास सुरुवात झाली, तेव्हापासून जमिनीच्या मालकीवर परिणाम करणारे तीन वेगवेगळ्या प्रकारचे कायदे करण्यात आले; १) जमीनदारी संपवणारे कायदे २) कुळांना जमिनीची मालकी देणारे कायदे ३) जमीनधारणेवर मर्यादा घालणारे कायदे.

जमीनदारी नष्ट करण्याचा कार्यक्रम मोठा लोकप्रिय होता. काही जमीनदार



सोडले तर त्याला कोणाचाच फारसा विरोध नव्हता. जमीनदारीची पद्धत इंग्रजांनी महसूल जमा करण्याच्या सोयीसाठी उभी केली. महसूल जमा करण्याकरिता त्यांनी नेमलेले जमीनदारच जमिनीचे मालक होऊन बसले. मूळ कुळेही फारशी शेतावर राहिली नाहीत. आपल्या जागी पोटकुळे नेमून त्यांच्याकडून मिळणाऱ्या महसुलात आपला वाटा ठेवून ती शेतीपासून दूर झाली. सरकारी महसूल गोळा करणाऱ्या फुकटखाऊ मध्यस्थांची रांगच्या रांग तयार झाली; त्यांच्या ओझ्याखाली प्रत्यक्ष शेतावर राबणारे कूळ भरडले जाऊ लागले. जमीनदारांनी मिळालेले पैसे ऐषआरामत, चैनीत उधळण्याची प्रथा ठेवली; शेतीसुधाराकरिता काही गुंतवणूक केली नाही; उत्पादन घटत चालले आणि वाटेकरी वाढत चालले. साहजिकच जमीनदारी नष्ट केली म्हणजे शेतीतील दारिद्र्याचे सगळे प्रश्न सुटून जातील अशी सर्वमान्य विचारधारा होती. जमीनदार म्हणजे आर्थिक शोषण; जमीनदार म्हणजे सरंजामशाहीचे अवशेष; त्यांना दूर केल्याखेरीज ग्रामीण विकासाचा श्रीगणेशासुद्धा होऊ शकत नाही, या भूमिकेतून जमीनदारी संपवण्याचे कायदे झाले. १९५५ पर्यंत जमीनदारीविरोधी कायद्यांमुळे तीस लाख कुळांना बासष्ट लाख एकर जमीन जमीनदारांकडून मिळाली व त्याचा मोबदला म्हणून जमीनदारांना ६७० कोटी रुपये मिळाले. म्हणजे सरासरीने जमीनदारांना दर एकरी १००० रुपयांवर मोबदला मिळाला. त्या काळच्या जमिनींच्या किमती लक्षात घेता जमीनदारी नष्ट करण्याच्या अभियानात कुळांपेक्षा जमीनदारांचाच जास्त फायदा झाला असावा. शेतीउत्पादकता कमी; कुळे इतकी महागरीब की त्यांच्याकडून बळजोरीनेसुद्धा वसुली करणे कठीण; एका काळच्या जमीनदारीचा थाट महाल, मैफली यांचे काप जाऊन भोके फक्त उरलेली. अशा अवस्थेत खचलेल्या जमीनदारांना भरपूर मोबदला देऊन सरकारने जमिनी विकत घ्याव्या ही योजना परमेश्वरी वरदहस्तच वाटला असला पाहिजे. हाती आलेल्या गडगंज पैशाच्या आधाराने या मंडळींनी नवे व्यवसाय चालू केले, कारखानदारीत प्रवेश केला, ग्रामीण राजकारण ताब्यात घेतले. नेहरूकाळात शेतकरीविरोधी व्यवस्था उभी करण्यात या मंडळीचा मोठा हात राहिला.

**मालक हटवा**

कुळांकडून जमीन कसून घेण्याची पद्धत जमीनदारीतच होती असे नव्हे; रयतवारी, महालवारी व्यवस्थांतही निम्म्यावर शेतजमीन कुळांच्याच हाती होती. शेतीचा दाहक अनुभव घेतल्यानंतर जमीन स्वतः कसण्यापेक्षा ती

दुसऱ्या कोणाला कसण्यासाठी देऊन त्याच्याकडून मिळालेला खंड खात जगावे ही कल्पना सगळ्यांनाच आकर्षक वाटते. छोटे-मोठे जमीनदार, खोत सावकार यांच्या जमिनी तर बहुतेक कळुच करत असत. १९५५ मध्ये एकूण शेतजमिनीपैकी २० % जमीन आधिकृतरीत्या कुळांकडे होती. जवळजवळ तितकीच जमीन कागदोपत्री नोंद न करता कुळांकडे होती. म्हणजे कुळांच्या हाती जवळजवळ ४० % जमीन कसण्यासाठी होती. कूळ पद्धतीत सुधारणा करण्यासाठी कायदे झाले. खंडाची किमान रक्कम किती असावी याचे प्रमाणे ठरले; कुळांना मनमानीने काढून टाकता येऊ नये यासाठी तरतुदी झाल्या आणि त्यापलीकडे जाऊन कुळांकडे मालकी हक्क सोपवण्यासाठी सर्वच राज्यात कायदे करण्यात आले.

कूळ कायद्यांचा अंमल सुरू झाल्यानंतर, म्हणजे ६१ मध्ये, शिरगणतीप्रमाणे ७७ % जमीन स्वतः कसणाऱ्यांच्या हाती होती. ८ % कुळांच्या आणि १५ % मिश्रव्यवस्थेत. म्हणजे कूळ कायद्याने हाती जमीन देण्याचा हेतू फार मोठ्या प्रमाणावर साध्य झाला असे दिसत नाही. जुन्या हैदराबादमधील आकडेवारी वरून असे दिसते की जुन्या कुळांपैकी फक्त १२ % कुळे म्हणूनच काम करीत राहिली; २ % कुळांना कायदेशीर नोटिसा देऊन काढण्यात आले आणि २२ % कुळांना धाकदपटशा देऊन काढण्यात आले, १७ % कुळांनी स्वखुषीने (!) आपले हक्क सोडून दिले. देशात इतरत्र परिस्थितीही साधारण अशीच असावी.

### फोडा आणि झोडा

जमीनदार, जमीनमालक, सावकार या काही खेड्यातल्या लोकप्रिय संस्था नव्हत्या. रयत त्यांच्याकडे दुराव्याने पाही यात आश्चर्य नाही; पण ही दुष्टत्रयी शेतकऱ्यांच्या शोषणाचे काही आदिकारण नव्हती, शेतकऱ्यांच्या शोषणाच्या जागतिक व्यवस्थेचा शेतकऱ्यांच्या सर्वात निकटचा दुवा होती. आपल्या शेतीच्या दुर्दशेची सूत्रे लंडनहून हलतात याची जाणीव फुले, रानडे, दादाभाई नौरोजी असे काही उपवाद सोडल्यास फार थोड्यांना होती. त्यामुळे सावकार संपला; जमीनदार संपला; म्हणजे आपली सगळी दुःखे दूर होतील अशी शेतकऱ्यांची सर्वदूर भावना होती.

महात्माजींची मात्र या विषयावरील धारणा वेगळी होती. सावकार, जमीनदार यांची भूमिका फारशी स्पृहणीय नाही, तरीही शेतकऱ्यांचा लढा जमीनदार सावकारांच्या विरोधी नाही हे महात्माजींनी चंपारण्य आंदोलनात स्पष्ट केले



होते, 'शहरातील व्यापारीवर्ग इंग्रजांच्या मदतीने रयतेचे शोषण करतो आणि त्या पापाबद्दल त्याला एक दिवस परमेश्वराच्या दरबारी झाडा लागेल' असे महात्माजींनी परखडपणे म्हटले. याउलट सावकार, जमीनदार गावगाड्याचे भाग आहेत; शेतकरी- जमीनदार संघर्ष गावचा अंतर्गत मामला आहे; तो गावातल्या गावात सोडवता येईल अशी गांधीवादी भूमिका होती.

### स्टॅलिनचे हिंदुस्थानी अवतार

स्वातंत्र्याबरोबर गांधींचा दृष्टिकोन बाजूस हटला आणि समाजवादी विचार सर्वमान्य झाला. स्टॅलिनने सोव्हिएट रशियात मोठ्या शेतकऱ्यांच्या विरुद्ध प्रचाराची वावटळ उठवून अखेरीस त्यांचे टँक बंदुकांच्या साहाय्याने शिरकाण केले. हिंदुस्थानात जहागीरदार-सावकारांना वारेमाप बदनाम करण्यात आले; पण त्यांच्यावर बंदुका चागल्या नाहीत. त्यांना नामशेष केले म्हणण्यापेक्षा 'इंडियन' व्यवस्थेत सामावून घेण्यात आले असे म्हणणे जास्त योग्य होईल.

### जमीनदारी केवळ निमित्त

जमीनदारी आणि कुळपद्धती नष्ट करण्याचे कायदे आता इतिहास बनले आहेत. ते योग्य होते किंवा नाही या प्रश्नांना आणि त्याच्यावरील चर्चांना आता फारसा अर्थ उरलेला नाही. या कायद्यांचा परिणाम काय झाला? जमीनदारांचे काही फारसे नुकसान झाले नाही. कूळ कायद्यांचा अमलही असाच तोडका मोडका, म्हणजे शेतीशी सगळ्याच संबंध तुटलेल्या मालकांच्या बाबतीत झाला. विशेषत: बिगर शेतकरी जातींच्या मालकांविरुद्ध झाला.

या कायद्यांची अंमलबजावणी काहीही असो, या कायद्यांमागील भूमिका कितपत बरोबर होती याबद्दल जबर शंका घ्यायला जागा आहे. जमीन हे संपत्तीचे साधन आहे आणि जमिनीच्या वाटपातील विषमता दूर केल्याखेरीज सामाजिक न्याय प्रस्थापित होऊच शकत नाही हा विचार खरा आहे काय ? शेती हे संपत्तीचे साधन, निदान गेल्या शतकाभरात नव्हते, हे आता सर्वमान्य झाले आहे. शेती हे तोट्याने साधन आहे आणि सरकारी धोरणामुळे शेती तोट्याची राहिली हे आता शेतकरी आंदोलनाने स्पष्ट केले आहे. अशा या तोट्याच्या साधनाचे वाटप केल्याने शेतकऱ्यांचे आणि कुळांचे भले होईल याची काहीही शक्यता नव्हती. या कायद्यांच्या अंमलबजावणीचा अनुभव असे दाखवतो की ज्याची जमीन गेली ते सुखी झाले आणि ज्याच्या डोक्यावर जमीन आली ते बरवाद झाले.

या कायद्यांमागील दुसरी भूमिका अशी होती की मोठी मोठी शेते आणि

त्यावर आधुनिक पद्धतीने भांडवली शेती यामुळे बेकारी वाढेल व विकास थांबेल. भांडवलाचा वापर कारखानदारीसाठी करायचा आणि शेतीवर जितके कमी भांडवल लागेल तितके चांगले असे नेहरू व्यवस्थेचे सूत्र होते. शेतजमीन ही छोट्या छोट्या शेतकऱ्यांच्या व्यक्तिगत मालकीची असावी, जमीनदारांना त्यात स्थान नसावे आणि यथावकाश छोट्या शेतकऱ्यांनी सहकारी शेती तयार करावी असे नेहरूंचे सोव्हिएटी स्वप्न होते. सहकारी शेतीची कल्पना पुढे काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात बारगळली. सावकारशाही, जमीनदारी जाऊनही शेतकरी गरीब होत राहिला आणि आज कार्यक्षम, उत्पादक, व्यावसायिक शेती देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे असे सर्वमान्य झाले आहे.

**आता पाळी शेतकऱ्यांवर**

जमीनदारांना संपवल्यानंतर नेहरूसत्ता मध्यम शेतकऱ्यांना गिळायला निघाली. जमिनीच्या मालमत्तेसंबंधी यापुढील पाऊल १९६१ मध्ये शेतजमिनीच्या धारणेवर कमाल मर्यादा घालून उचलण्यात आले. शेतजमिनीची कमाल धारणा १९७५ मध्ये पुन्हा एकदा बदलून कमी करण्यात आली. सामाजिक न्यायाची गरज काही फक्त शेतीच्याच क्षेत्रात होती असे नव्हे, शहरातील विषमता त्याहीपेक्षा विक्राळ होती; पण शहरी भागात संपत्तीच्या धारणेवर कमाल मर्यादा लादण्याचा प्रयत्नही झाला नाही. शेतजमिनीवर मात्र लागोपाठ दोनदा अधिकाधिक जाचक मर्यादा घालण्यात आल्या. शेतजमिनीवर घातलेली कमाल मर्यादा इतकी अपुरी होती की केवळ त्यावर जगणारा श्रीमंतातला श्रीमंत शेतकरी शहरी कारकुनाच्या बरोबरीला येऊ शकला नसता.

शेतकरी द्वेषापोटी, कमाल जमिनीधारणा कायदा करताना अनेक तत्त्वे आणि सिद्धांत धुडकावून लावण्यात आले. कमाल जमीन धारणा ठरविण्याकरता कुटुंब नावाचा एक कृत्रिम घटक गृहीत धरण्यात आला. ही संकल्पनाच देशाच्या घटनेशी, एवढेच नव्हे तर हिंदू कायदा आणि शरीयत यांच्याही विरुद्ध आहे. शेतकरी परिवारातील वयात आलेल्या मुलींना संपत्ती हक्क स्त्री-पुरुष समानतेचे सर्व सिद्धांत ठोकरून लावून नाकारण्यात आला. अज्ञान आणि वयात आलेल्या भावाभावांच्या संपत्ती हक्कात घटनेस मान्य न होणारा दुजाभाव कायद्याने केला. अशा वेगवेगळ्या युक्त्यांनी शेतकऱ्यांकडची जमीन वरकड ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि जमिनीकरिता द्यायचा मोबदलाही अपुरा ठरवण्यात आला.

**न्यायालय विरुद्ध शासन**



जमीनदारी, कूळ व्यवस्था आणि कमाल जमीनधारणेसंबंधी कायदे कितपत न्याय्य, देशाच्या हिताचे होते याबद्दल मोठी शंका आहे. या कायद्याने देशाचे काही भले झाले असे आजतरी दिसत नाही; पण हे सर्व कायदे देशाच्या संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत होते यात काही शंका नाही. यासंबंधीचे कायदेकानू अनेक न्यायालयांनी रद्द ठरवले. न्यायालयांनी कायदा रद्द ठरवला की सरकारने घटनाच बदलून टाकायची आणि न्यायालयांनी तरीही शेतकऱ्यांची बाजू घेतली तर फिरून फिरून घटना बदलायची अशी रस्सीखेच सतत चालली. शेतकरी म्हणजे जणू शत्रूराष्ट्राचे नागरिक आहेत; त्यांना संपत्तीचा हक्का तर सोडा, न्याय मागायचासुद्धा हक्क असता नये; कोर्टदरबारी दिरंगाई करून शेतकरी लोक शोषणविरहित समाज निर्माण करण्यास अडचणी आणत आहेत असा गदारोळ करण्यात आला. शेतकऱ्यांचा मालकीहक्क हिरावून घेण्यासाठी सर्व घटनाच तिरपागडी करण्यात आली. आणीबाणीच्या दोन अडीच वर्षांत कायद्याचे राज्य म्हणून देशात राहिले नव्हते, तेव्हा शहरी लोकांचा केवढा तिळपापड होता होता. शेतकऱ्याचे जमिनीवरचे मालकी हक्क नष्ट करण्याकरिता सरकारने आणीबाणीच्या किती वरताण दडपशाही केली हे पाहिले म्हणजे स्टॅलिनचे टँक परवडले असे सहज वाटावे. शेतकऱ्याविरुद्ध घटनादुरुस्तीचे रणगाडे चालवताना सर्व सांविधानाची इमारत मोडकळीस येत आहे याची शुद्धाशुद्ध न ठेवता सगळी घटना वाकवून, मोडून शेतकऱ्यांच्या मालत्तेविषयीचे कायदे अमलात आणणे गेले.

**न्यायालयाचे दार बंद**

जमीनदारीविरोधी कायदे देशातील बहुतके उच्च न्यायालयांनी घटनाविरोधी म्हणून रद्द ठरवले होते. भारतीय घटना १९५० मध्ये अमलात आली. जमीनदारी नष्ट करण्यासाठी १९५०च्या आधीसुद्धा झालेल्या कायद्यांना संरक्षण देणारे कलम घटनेत घालण्यात आले होते.

पण जमीनदारीचे कायदे नागरिकांच्या मूलभूत हक्कावर घाला घालणारे आहेत असे एका उच्च न्यायालयाने ठरवले तेव्हा सरकारने एक नवे अस्त्र उपसले. जमिनीसंबंधीचे कायदे समाजहितासाठी असल्यामुळे केवळ मूलभूत हक्काचा भंग होतो म्हणून जमीनविषयक कायद्यांना आव्हान देता येणार नाही अशी घटनादुरुस्ती करण्यात आली; एवढेच नव्हे तर, घटनेस ९ वे परिशिष्ट जोडले गेले. या परिशिष्टात सुरुवातीला फक्त १३ कायद्यांची यादी होती; आज त्यात २५७ कायद्यांची यादी आहे. या यादीतील कायद्यांविरुद्ध कोणत्याही

न्यायालयात दादच मागता येणार नाही अशी भयानक तरतूद घटनेत करण्यात आली.

घटनादुरुस्ती आज करायची; पण तिचा अंमल मात्र आजोबांच्या काळापासून धरायचा, असली उफराटी पूर्वानुलक्षी पद्धत इंदिरा गांधींनी आपली खुर्ची टिकवण्याकरिता सुरू केली, असा गैरसमज आहे. पूर्वानुलक्षी घटनादुरुस्ती करण्याची पद्धत पहिल्यांदा नेहरूंनी वापरली, १९५१ मध्येच वापरली आणि ती शेतकऱ्यांविरुद्ध वापरली आणि त्यानंतर पुन्हा एकदा १९६४ मध्ये वापरण्यात आली. पहिल्या घटनादुरुस्तीनंतरही न्यायालयांनी तथाकथित जमिनीच्या फेरवाटपाचे कायदे, शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला अन्याय्य आहे या कारणाने मोडीत काढले. तेव्हा १९५५ मध्ये शासनाने घटनेत चौथी दुरुस्ती केली आणि सरकारने ताब्यात घेतलेल्या जमिनींकरिता दिला जाणारा मोबदला पुरेसा आहे किंवा नाही हा प्रश्न न्यायालयांच्या कक्षेतून काढून टाकला.

**शेतकऱ्यापेक्षा अतिरेकी भला!**

१९६४ मध्ये आणखी एक दुरुस्ती करून जमीनदार-खोतांसाठी केलेल्या कायद्यातील तरतुदी सर्वसामान्य रयतेच्या छोट्या जमीनतुकड्यांनाही लागू पडतील असे ठरवले. छोट्या शेतकऱ्यांची जमीन या दुरुस्तीमुळे 'इस्टेट' मानली जाऊ लागली. काही शेतकरी खासदारांनी आग्रह धरल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देणारी एक तरतूद घटनेत करण्यात आली. जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्याची जमीन त्याला किमान बाजारभावाने मोबदला दिल्याखेरीज काढून घेता येणार नाही अशी एक शर्त घालण्यात आली; पण या शर्तीचे शब्द आणि वाक्यरचना इतकी गोलमाल आणि हुशारीची करण्यात आली, की तिचा फायदा आजपर्यंत शेतकऱ्यांना काहीही मिळालेला नाही.

शेवटी टोकाला जाऊन ४४ व्या दुरुस्तीने घटनेतील मालमत्तेचा मूलभूत हक्कच नष्ट करून टाकला. शेतकऱ्यांविरुद्ध सरकारने केलेल्या कायदेशीर लढाईचा इतिहास मोठा काळाकुट्ट आहे. देशातील वेगवेगळ्या न्यायालयांत शेतकऱ्यांची जवळजवळ २० लाख प्रकरणे पडून आहेत; पण घटनेतील ९ व्या परिशिष्टामुळे त्यांना न्याय मिळण्याची काहीही शक्यता नाही. दहशतवादाविरुद्धच्या कायद्यांमुळे घटनेतील मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असल्याचा युक्तिवाद करता येत नाही. शेतकऱ्यांना शासनाने दहशतवाद्यांप्रमाणेच वागवले. अतिरेक्यांविरुद्धचे कायदेसुद्धा ९ व्या परिशिष्टात येत नाहीत.

शेतकऱ्याचा मालकी हक्क हिरावून घेण्यासाठी घटनेच्या मूळ चौकटीची



भयानक मोडतोड करण्यात आली. परिणामतः, भारतीय नागरिकाला मालमत्ता बाळगता येते, पण हक्काने नाही, सरकारच्या मेहरबानीने. त्याचे दोन परिणाम आजही शेतकऱ्यांना भेडसावत आहेत.

**सरकारी भूक**

लष्करी तळ, धरणे, रस्ते, लोहमार्ग, सरकारी कारखाने, सहकारी संस्था, सरकारी नोकरांची घरे, एवढेच नव्हे तर खाजगी क्षेत्रातील कारखाने व संस्था यांना लागणाऱ्या जमिनी शेतकऱ्यांकडून सक्तीने संपादन केल्या जातात. त्यांना बाजारभाव देणे ही कल्पनाही नोकरशहांना असह्य वाटते. आपले कार्य राष्ट्रीय किंवा सामजिक महत्त्वाचे आहे; तेव्हा त्याकरिता शेतकऱ्यांनी निर्वासित होऊन त्यांच्या जमिनी आपल्या चरणी सुपूर्द केल्या पाहिजेत अशी त्यांची अपेक्षा असते.

कोणा एका नोकरदाराच्या डोक्यात आपल्या खात्याकरिता किवा संस्थेकरिता जमीन हवी असे आले की त्याच्या डोळ्यात भरलेल्या जमिनीच्या मालक शेतकऱ्यांना निर्वासित व्हायला वेळ लागत नाही. नोकरदारांच्या विनंतीवरून कलेक्टरसाहेब भूसंपादन नोटीस काढतात. चौकशीचा फार्स होतो; पण संबंधित जमीन सरकारच्या मते सार्वजनिक हिताकरिता आवश्यक आहे असे तिथून सांगितले की प्रश्न मिटला. जमीन शेतकऱ्याच्या हातून जाणारच ही दगडावरची रेघ. फारतर त्याने गयावया करून भरपाईची रक्कम थोडीफार वाढवून मागावी!

खरेदी, साठेखतातील रकमा बाजारभाव किंवा प्रत्यक्ष व्यवहारातील किमती यांच्याशी जुळणाऱ्या नसतात हे सर्वांना ठाऊक आहे. तरीही त्याच आधारे मोबदल्याची रक्कम ठरवण्यात येते. खरेदीखतावर भरायच्या करासाठी सरकारने स्वतःच वेगवेगळ्या भागांतील जमिनींच्या प्रमाणित किमती जाहीर केलेल्या आहोत; पण संपादन करायच्या जमिनीवर या प्रमाणित किमतीइतक्याही किमती दिल्या जात नाहीत. भूसंपादनाची अधिसूचना निघाल्यानंतर जमिनीचा ताबा जाईपर्यंत वर्षानुवर्षे लोटून जातात. या सगळ्या काळात कोणत्याही प्रकाराने हस्तांतरण करता येत नाही. जमिनीची किमत ठरते ती अधिसूचनेच्या तारखेची. त्यानंतर कितीही वर्षे दफ्तरदिरंगाईमुळे गेली तरी शेतकऱ्याला या काळात फक्त किमान दराने व्याज मिळते.

या सगळ्या कामातली भयानक क्रूरता अलीकडे घडलेल्या चिखली प्रकरणात दिसून आली. गावातील १००० एकर जमीन संपादन करण्यासाठी अधिसूचना निघाली १९७० मध्ये. जमिनीची भरपाई ठरली रुपये ४००० प्रतिएकर. १९८९

मध्ये सरकारकडून व्याजबीज धरून एकरी १९००० रुपये देऊ करण्यात आले. १९९३ मध्ये सार्वजनिक कामाकरिता संपादलेली जमीन सरकार ११ लाख रुपये प्रति एकराने एका खाजगी कंपनीस विकत आहे.

**तमाम शहरांच्या गरजा**

सरकारी खात्याकरिता किंवा संस्थांकरिता शासनाने शेतकऱ्यांकडून जमीन बळकावून घ्यावी हे समजण्यासारखे आहे; पण शहरांच्या वाढत्या गरजांकरिता किंवा नव्या शहरांतील सर्व नागरिकांच्या गरजांकरिता शेतकऱ्यांचा बळी द्यावा यात काय न्याय किंवा तर्कशास्त्र असू शकते?

संबंधित अधिकाऱ्यांची नजर जर एखाद्या जमिनीच्या तुकड्याकडे गेली की ती जमीन सरकारजमा झालीच आणि शेतमालक देशोधडीच लागला म्हणून समजावे.

शेतकरी निर्वासित बनून जगण्यासाठी शहराकडे जात आहे. शहरे झपाट्याने वाढत आहेत. वाढत्या शहरांना जागा करून देण्यासाठी शहराच्या परिसरातील शेतकऱ्यांनाच पुन्हा निर्वासित व्हावे लागत आहे. जमीनदार-जमीनमालक यांच्याविरुद्ध उभ्या केलेल्या हत्यारांचा आणि जमीनधारणा कायद्याच्या वेळी तयार केलेल्या तरतुदींचा आता उपयोग केला जात आहे तो शहरीच्या परिसरातील छोट्या मोठ्या शेतकऱ्यांना उठवून निर्वासित करण्यासाठी.

**छोट्या शेतकऱ्याचा बडा मालक**

शेतकऱ्याची जमीन सरकारी गरजांकरिता किंवा कोणा शहराच्या वाढीकरिता संपादनाच्या तडाख्यातून सुटली म्हणजे भागले आहे, असे नाही. जवळचे शहर वाढता वाढता शेताच्या आसपास येऊन पोहोचले की एक चमत्कार होतो. दीडदोन एकराचा शेतकरी छोटा शेतकरी समजला जातो. पण एक दिवस शेजारच्या शहराची सरहद्द वाढत वाढत त्याच्या शेताला येऊन भिडली की तो दीडदोन एकराचा छोटा शेतकरी न राहता सत्तरऐंशी हजार चौरसफुटाच्या प्लॉटचा मालक म्हणून एका रात्रीत शहरी कमालधारणा कायद्याचा बळी होतो. त्याची शेतजमीन हिरव्यापट्ट्यात येत नाही असे ठरले की त्याच्याकडील १० गुंठे जमीन काय ती ठेवण्याचा त्याला अधिकार. बाकी जमीन सरकार त्याच्याकडून अक्षरशः मातीमोलाने काढून घेते. काढून घेतलेली जमीन मग विकसित केली जाते. त्यासाठी गटारे घालणे, पाण्याची व्यवस्था करणे, रस्ते बांधणे अशा किरकोळ सोयी केल्या जातात. विकास केला न केला तरी जमिनीच्या किमती अस्मानाला भिडतात. शेतकऱ्याला त्याचा काहीच फायदा मिळत नाही.



**भूखंडखोरांची लयलूट**

भूसंपादन आणि नागरी कमाल धारणा कायद्याचे हे हत्यार पुढाऱ्यांच्या हाती वॉशिंग्टनची कुऱ्हाड बनले आहे, शहराच्या परिसरातील जमिनी बेहिशेब संपादन करून ठेवायच्या; सरकारकडे किंवा सरकारसंबंधित एखाद्या संस्थेकडे द्यायच्या आणि मग युक्तिप्रयुक्तीने त्या जमिनीचा प्रत्यक्ष ताबा आपल्या हाती ठेवायचा. सरकारी अधिकाराचा उपयोग करून अडचणीतील जमिनी सोडवायच्या किंवा जमिनीचा नियोजित वापर बदलून तिचे एकदम सोने करायचे हा सर्व महान नेत्यांना व्यवसाय बनला आहे.

जमीन संपादन करण्यासंबंधीचे सगळे कायदे आणि या कायद्यांमध्ये सरकारकडे सोपवलेले व्यापक अधिकार काही राजकीय संकल्पनांवर आधारलेले आहेत. शासनाचा देशातील सर्व जमिनीवर आणि मालमत्तेवर प्राथमिक हक्क आहे, आणि आवश्यक तेव्हा सार्वजनिक कामासाठी किंवा हितासाठी, एखाद्या व्यक्तीवर जरूर पडेल तर अन्याय करूनही, ती ताब्यात घेण्याचा सरकारला अधिकार आहे; अशा या संकल्पना बराच काळ त्यांचा प्रभाव राहिला आहे आणि आजही घटनेची आणि कायद्यांची चौकट याच संकल्पनांवर आधारलेली आहे. याच कल्पनांपोटी भारतीय घटनेची मोडतोड करण्यात आली.

**जमीन खुली होऊ द्या**

नवीन अर्थव्यस्थेत आणि खुल्या बाजारपेठच्या संकल्पनेत शासनाच्या प्राथिमक हक्कास काही अर्थ उरत नाही आणि सार्वजनिक हिताचा पालनकर्ता ही भूमिकाही शासनाकडे राहत नाही. लष्करासाठी किंवा धरण वगैरे बांधण्यासाठी अमूक एक जमीनच हवी असे म्हणण्याचा सरकारला अधिकार असला पाहिजे; पण ती जमीन पुरेपूरच नव्हे तर, भरपूर मोबदला देऊनच शासनाला संपादन करता येईल. इतर कोणत्याही कामाकरिता सरकारला जमिनीची गरज पडत असेल तर त्यासाठी बाजारात उतरून इतर ग्राहकांच्या बरोबरीने स्पर्धा करूनच शासनाला जमीन मिळवावी लागेल, हे तत्त्व खुल्या अर्थव्यवस्थेत मानले गेले पाहिजे.

लायसेंस-परमिट राज्यात आणि कायदेकानूंच्या जंजाळात भ्रष्टाचार आणि काळाबाजार फोफावतात. खुली व्यवस्था सुरू झाली की काळ्याबाजाराला आपोआप आळा बसतो. शेतकऱ्यांवर हल्ला करण्यासाठी कायदेकानूंचे जे जंजाळ स्वातंत्र्यानंतर उभे करण्यात आले ते साफ केले नाही तर भूखंडपुढाऱ्यांचे रान आणखी माजणार आहे. यासाठी उपाय साधा आणि सोपा आहे.

(१) कलम १४ १)फ पुन्हा एकदा मूळ पदावर आणणे म्हणजे संपत्तीचा हक्क भारतीतील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क परत मिळवून देणे आणि

(२) घटनेतील ९वे परिशिष्ट काढून टाकणे आणि शेतकऱ्यांना कोर्टात जाऊन न्याय मिळण्याचा रस्ता उघडून देणे.

जमीन आणि मालमत्ता याविषयीचे लायसेंस- परमिटराज्य मग संपून जाईल आणि भूखंडखोरांचे वर्चस्वही संपू लागेल.

(शेतकरी संघटक, २१ जून १९९३)

■



दहा

# जमीनधारणा सुधार का अर्थव्यवस्था सुधार?

जमीनधारणेचा प्रश्न पुन्हा एकदा वादळ उठवणार अशी चिन्हे दिसत आहेत.

या वर्षाच्या सुरुवातीला अंदाजपत्रक सादर करताना अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी शेतीच्या व्यवस्थापनाकरिता तरी तुकडेबंदी करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला होता.

परंतु त्यानंतर दोन महिन्यांत दिल्ली येथे भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत अगदीच वेगळा सूर निघाला. नेहरू जमान्यातील जुन्याच जमीनधारणा कायद्याचा अंमल अधिकाधिक जोमाने करण्याचा निर्णय पंतप्रधानांनी जाहीर केला.

लोकसभेसमोर ठेवलेल्या राष्ट्रीय कृषी धोरणाच्या मसुद्यात शेतीची तुकडेबंदी हे शेतीपुढील एक महत्त्वाचे आव्हान असल्याचे म्हटले होते; पण त्याबरोबरच जुन्या सुधारणा कायद्यांच्या अंमलबजावणीवरही भर दिला होता. ज्याला जे आवडेल ते त्याने घ्यावे!

अलीकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी फळबागांकरिता जमीनधारणेवरील कमाल मर्यादा उठवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याबद्दल पवारसाहेबांची ख्याती नाही. त्यांनी घेतलेला निर्णय त्यांच्याच पक्षाच्या मध्यवर्ती धोरणाशी न जुळणारा आहे. त्या निर्णयाला हिरवा कंदील दाखवला जाईल अशी शक्यता कमी आहे. कमाल जमीन धारणा पीकनिहाय बदलणे हे प्रशासनाच्या दृष्टीने जवळजवळ अशक्य आहे. फळबागांसाठी जास्त मोठी जमीन काही विशेष फायद्याची ठरते असे नाही. पवारसाहेबांच्या योजनेचा फायदा फळांवरील प्रक्रिया करणारे पाश्चिमात्य

तोंडवळ्याचे कारखाने उभारणाऱ्यांनाच होईल. या निर्णयामागे, सत्तेतील काही सज्जनांनी ताब्यात घेतलेली जमीन नियमात बसवणे हा प्रमुख उद्देश आहे असे म्हटले जाते. हे सगळे खरे असले तरी जमीनधारणेचा आणि वाटपाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेला आणल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करायला पाहिजे.

गेली साठ-सत्तर वर्षे जमिनीचे फेरवाटप हा शेतीविषयक समाजवादी कार्यक्रमाचा पाया होता. जमीनदारी नष्ट करावी, कसणाऱ्याच्या हाती जमीन द्यावी, जमिनीच्या धारणेवर कमाल मर्यादा ठेवावी म्हणजे शेतीतील गरिबीचे सगळे प्रश्न सुटतील अशी समाजवाद्यांची भूमिका असे. त्यांच्या डोळ्याला गावातील झोपडी आणि पडका वाडा यांच्यातील तफावत टोचत असे आणि झोपडीच्या गरिबीच मूळ कारण गावातील वाडे आहेत अशी त्यांची भूमिका होती. शहरातील गगनचुंबी इमारतींचा गावातील झोपडीतील गरिबीशी जो काही संबंध असेल त्याचा उल्लेख ही मंडळी कटाक्षाने टाळत.

समाजवाद्यांचा जमिनीच्या फेरवाटपासंबंधी काही नैतिक राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोन होता.

जमिनीच्या मालकीतील विषमता दूर करून सर्वांना सारखी जमीन अशी व्यवस्था करावी, अशी गरिबांच्या कळवळ्याची साधूसंतांनी घेतलेली भूमिका समाजवाद्यांनीही घेतली. ही त्यांची नैतिकता गावापुरतीच मर्यादित होती, हे दुर्दैव. दिल्लीत स्वतःच्या मालकीच्या दहा-वीस लाखांच्या घरात राहणारे डावे विचारवंत दहा-पंधरा एकर जमिनीच्या मालकावरही दात काढीत. पन्नास एकराचा मराठवाड्यातील शेतकरी रोजगार हमी योजनेत दगड फोडायच्या कामावर सर्रास दिसला तरीही त्यांच्या विचारात फरक पडला नाही. शहरात दरडोई जोते दहा चौरस फुटांचे भरेल तेव्हा शहरातील घरवाल्यांनी दर माणसी फारफार तर पन्नास चौरस फूट मागणी ठेवून राहिलेल्या जागेत बाहेरच्या कुटुंबांची सोय करावी असे मांडण्याइतकी सजाजवाद्यांची नैतिकता अतिरेकाला गेलेली नव्हती!

अनेक राज्यांत जमीनदारांनी रयतेवर, कुळावर केलेल्या अमानुष जुलमाच्या अनेक सत्यकथा कानावर येत असत. जमीनदारांची मध्ययुगीन जुलमी वर्तणूक हे जमीनदारी संपण्यासाठी सर्वांना सहज पटण्यासाखे कारण होते. कित्येक शतकांच्या अनेक राजांच्या, सुलतानांच्या लुटालुटींनी, लढायांनी आक्रमणांच्या बेबंदशाहीच्या काळात, अस्मानी आणि सुलतानीमुळे वारंवार येणाऱ्या दुष्काळाच्या काळात जमीनदारांनी रयतेला काही ना काही तरी संरक्षण दिले



होते. जमीनदारीचा सगळाच इतिहास काही काळाकुट्ट नव्हता. ही गोष्ट समाजवाद्यांनी सोयीस्कररीत्या नरजेआड केली. खानदानी जमीनदार बहुतांशी १८५७ च्या उठावानंतर देशोधडीला लागले, फासावर चढले. त्यांच्या जागी इंग्रजांनी त्यांना सामील झालेल्या गावगुंडांना जमीनदार नेमले. नवीन जमीनदारांच्या उन्मत्तपणात अमेरिकेतील यादवी युद्धासारख्या घटनांनी शेतमालाच्या व्यापाराला काही काळ मिळालेल्या छप्परफाड धनदौलतीमुळे हे नवे जमीनदार उन्मत्त झाले. कथा-कादंबऱ्यातील ऐषआरामी, विलासी, उन्मत्त, जुलमी जमीनदार हे प्रामुख्याने या समाजातील होते. इतकी वस्तुनिष्ठता समाजवाद्यांच्या मठीत असू शकतच नाही. शहरात मालक नोकरांवर जुलूम करत नव्हते, असे नाही; घरगड्यांवर, मोलकरणीवरही अत्याचार होत. पण त्या कारणाने घरमालकांची जायदाद त्यांच्या नोकरांना मिळावी असा युक्तिवाद कोणा तत्त्वनिष्ठ समाजवाद्याने केल्याचे ऐकिवात नाही.

जमिनीच्या फेरवाटपाचे समर्थन करण्यासाठी समाजवादी अर्थशास्त्र्यांनी काही मोठे विनोदी निष्कर्ष काढले. लहान जमिनीच्या तुकड्याची उत्पादकता जास्त असते, छोटे शेतकरी त्यांच्या मालाला अधिक चांगली किमत मिळवतात, ही अशा निष्कर्षाची उदाहरणे. जमिनीच्या छोट्या तुकड्यांची उत्पादकता जास्त असते कारण त्यावर सगळ्या शेतकरी कुटुंबाची जीवतोड मेहनत होते, उत्पादकतेचा संबंध केवळ जमिनीशी नाही श्रमाशी आहे.

जमिनीच्या मोठ्या तुकड्यात उत्पादकता कमी आढळते, कारण तेथे श्रमशक्ती कमी पडते; छोट्या तुकड्यातील शेतीवरील कष्टात जी आपुलकी असते त्याची भरपाई करणारे आधुनिक व्यवस्थापन मोठ्या शेतीलाही परवडत नाही. असल्या बारकाव्यांची पत्रास डाव्या अर्थशास्त्रांना असायचे काय कारण? दहा पोती वांगी मुंबईला पाठवणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा पाटीभर वांगी डोईवर घेऊन पायी चालत बाजारच्या गावी जाणाऱ्या शेतकरणीला किलोमागे जास्त भाव, मिळतो एवढ्या साध्यासुद्धा गोष्टीत समाजवाद्यांना लहान शेतीची श्रेष्ठता स्पष्ट दिसत असे.

रशियातील आणि इतर समाजवादी देशांतील सामूहिक शेतीचे कौतुक करणारे भारतात मात्र छोट्या छोट्या तुकड्यांची शेती झाली पाहिजे असे आग्रहाने मांडीत.

शेतीवरील बचत ओरबाडून नेली जात आहे, शेतावरची माणसे मात्र शेतावरच ओझं बनून राहिली आहेत, ज्यांच्याकडे थोडीफार जादा जमीन असे,

त्या सगळ्यांची जमीन काढून घेतली आणि भूमिहीनांना वाटली तर प्रत्येकाच्या वाट्याला काडेपेटीभर जमीनही येणार नाही आणि अशा फेरवाटपाचा गरिबी हटण्याशी काही संबंध असू शकणार नाही या साध्या अंकगणिताकडेही डाव्यांनी डोळेझाक केली.

त्यांचा आपला एक धोशा; एकच सूत्री कार्यक्रम -जमिनीचे समान वाटप करा.

समाजवाद्यांच्या या मोठ्या शेतकऱ्यांच्या विरोधभक्तीचा फायदा झाला तो छोट्या शेतकऱ्यांना किंवा भूमिहीनांना नाही. भूमिहीनांच्या पदरी दोन-अडीच एकर जमिनीचा तुकडा पडला तर तो लागवडीखाली आणण्याइतकी त्यांची ताकद नसे आणि मोठ्या कष्टाने तेथे शेती केली तरी त्यातून काही सुटायचे नाही. एवढी शेतीची जाणकारी डाव्या प्राध्यापकांना नसली तरी भूमिहीनांना जरूर होती.

जमीन सुधारणा कायद्यांचा फायदा मोठ्या जमीनदारांनाच झाला. स्वातंत्र्य येता येता जमीनदारी संपवण्यासाठी जे कायदे झाले त्यामुळे ६४ लाख एकर जमिनीचे फेरवाटप झाले आणि मोबदला म्हणून जुन्या जमीनदारांना त्यांनी दिलेल्या पडीक, टाकाऊ जमिनीकरिता ६५० कोटी रुपये मिळाले. म्हणजे आजच्या हिशोबात जवळजवळ २० हजार कोटी रुपये. जमीनदारांनी त्यांच्या गेलेल्या जमिनी एकावेळी बाजारात विकायला काढल्या असत्या तर सगळी बाजारपेठेच कोसळली असती आणि या रकमेच्या दहावा भागसुद्धा त्यांना मिळाला नसता. एवढा पैसा हाती आलेले जुने जमीनदार शहरात आले. काहींनी व्यापार सुरू केला; काहींनी कारखानदारी, पुष्कळसे राजकारणात आले. आजचे पंतप्रधान याच वर्गातील एक. त्यांच्या उरलेल्या साताठशे एकर जमिनीचा वाद आणि त्यासंबंधी करण्यात आलेले खोटे दस्तावेज यांची प्रकरणे आजही चालू आहेत. जमीनसुधाराच्या कायद्यांची अंमबजावणी जोमाने करण्याच्या गर्जना हे जमीनदारच करत आहेत.

मोठ्या शेतकऱ्यांच्या विरुद्धच्या आघाडीवा फायदा शहरांना झाला. गावातील जमीनदार, सावकार शेतकऱ्याला लुटत हे खरे; पण निदान दुष्काळासारख्या अडीअडचणीत लुटीतील काही भाग तरी गावाच्या उपयोग पडे. शेतीतील बचत शहरात भांडवल म्हणून पोचायची असेल तर गावातील लुटारूंना दूर केले पाहिजे हे शहरी चाणाक्षांनी अचूक हेरले होते! शेतकऱ्याची 'लक्ष्मी' शहरात आणायची असेल तर गावातील ठग दूर झाले पाहिजेत असा नव्या



शहरी ठगांचा बेत होता आणि तो यशस्वी झाला. जमीनदार गेले, सावकार गेले; पण शेतकरी पहिल्यापेक्षाही जास्त गरिबीत आणि कर्जात बुडत राहिला.

समाजवाद्यांनी जमीनदारांविरुद्धच्या शेतकऱ्यांच्या भावनांचे भांडवल केले आणि त्याचा फायदा घेऊन राज्यकर्त्यांनी भरतीय घटनेतील मालमत्तेचा हक्कच नष्ट करून टाकला. त्यासाठी कोणत्याही न्यायव्यवस्थेच्या चौकटीत न बसणाऱ्या गोष्टी देशावर लादल्या. मालमत्तेच्या मालकीसाठी 'परिवार एकक' धरणे, शेतकऱ्याच्या घरी जन्मलेल्या मुलींना मालमत्तेचा हक्क नाकारणे आणि शेतजमिनीवरील आपला हक्क शाबीत करण्यासाठी शेतकऱ्याला न्यायालयाचा दरवाज बंद करणे अशी अतिरेकी सुलतानी डाव्यांनी देशावर लादली.

नेहरूकालीन नियोजनात शेतकऱ्याचे एक नमुनाचित्र गृहीत धरलेले होते. या नमुनाचित्राची रूपरेषा पहिल्यांदा स्टॅलिनने काढली. गावातील नेतृत्व संपवा, गावात फक्त छोटे शेतकरी ठेवा, हे शेतकरी फक्त कष्टाचे मालक. त्यांनी काय पिकवावे, कसे पिकवावे, त्याने पिकवलेल्या मालाला काय भाव मिळावा हे सगळे निर्णय सरकारच्या हाती आणि ते राबले जाणार सरकारी नोकरशाहीमार्फत. थोडक्यात, नेहरूवादी शेतीचे चित्र म्हणजे बिनमोबदल्याच्या शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचाच डाव होता. शेतकरी नामधारी मालक पण स्वतःची अवजारे घेऊन येणाऱ्या कामगारासारखीच त्याची स्थिती. शेतीच्या व्यवसायातील एकही निर्णय त्याच्या हाती नाही अशी व्यवस्था नेहरूंच्या मनात होती. ती फळाला आली नाही, कारण जमीनदारी-विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीतून कुशलतेने स्वतःची सुटका करून घेतलेले त्यांच्याच पक्षातील जिल्हा पातळीचे पुढारी. नेहरूंच्या मनात तर, यापुढेही पाऊल टाकून सहकारी आणि सामुदायिक शेती देशात आणायची होती. चौधरी चरणासिंग आणि डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादींच्या कडव्या विरोधामुळे नेहरूंना तो नाद सोडून द्यावा लागला.

समाजवादाचा पाडाव अलीकडे झाला तरी त्याची पीछेहाट सुरू होऊन बराच काळ झाला. गेल्या दहा वर्षांत शेती ही काही जीवशैली नाही, शेती हा व्यवसाय आहे हा क्रांतिकारी नवा दृष्टिकोन शेतकऱ्यांनी स्वीकारला आहे. नेहरूवादी व्यवस्थेचे दिवाळे वाजले आणि खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याची भाषा सुरू झाली. तेव्हा जमिनीच्या वाटपाचे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणि गरिबी हटवण्यात नेमके स्थान काय याबद्दल पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक आहे.

जमिनीच्या फेरवाटपाच्या मागणीमागे एक समजूत होती. प्रत्येक मालमत्ता

उत्पादनाचे साधन असते. ज्याच्या हाती संपत्ती, साधने ज्यांच्या हाती भांडवल, त्याच्या त्याच्या हाती उत्पन्नाचा ओघ; ही मार्क्सवाद्यांची श्रद्धा होती. निदान भारतीय शेतीच्याबाबत तरी ही समजूत खोटी होती हे शेतकरी संघटनेने अनेक तऱ्हेने सिद्ध केले आहे. डंकेल प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने भारतीय शेतकऱ्यास सबसिडी नाही. उलटा दंडच आहे, हे अर्थशास्त्रीही कबूल करू लागले आणि सरकारही लपत-छपत लाजत-काजत स्वीकारू लागले. जमीन आजपर्यंत उत्पन्नाचे नाही तर, तोट्याचे साधन होती, हे सत्य असेल तर शेती किफायतशीर करण्याआधी जमिनीचे फेरवाटप म्हणजे 'राजा उदार झाला आणि भिकाऱ्याला हत्ती दिला' अशातली गत, हे स्पष्ट आहे.

नवीन खुल्या व्यवस्थेतील शेतकऱ्याचे चित्र म्हणजे लहानशा तुकड्यावर काबाडकष्ट करणारा शेतकरी आणि त्याचा परिवार असे नसेल. नवनवीन उमेदीने, सतत नवीन प्रयोग करणारा, भरपूर उत्पादन घेणारा, देशी आणि परदेशी बाजारपेठेत पाय रोवून फायदा कमावणारा आणि त्याबरोबरच, देशाची अन्नधान्याची, कच्च्या मालाची आणि परकीय चलनाची गरज पुरी करणारा, असे नव्या शेतकऱ्याचे चित्र असेल. तर मग आर्थिक सुधार आणि समाजवादी जमीनसुधार एकत्र नांदू शकत नाहीत. निदान, डॉ. मनमोहन सिंगांच्या सूचनेप्रमाणे तुकडे तुकडे झालेली जमीन किमान व्यवस्थापनासाठी एकत्र आणण्याची काहीतरी सोय करावी लागेल.

(शेतकरी संघटक, २१ ऑगस्ट १९९३)

■



अकरा

# नेहरूव्यवस्था संपली, शेतकऱ्यांचा दुष्टावा सोडून द्या

गेली दहा बारा वर्षे हिंदुस्थानातला शेतकरी सरकारशी लढत आला आहे. दहा वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा म्हणालो की, 'शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे' तेव्हा पुढारी म्हणायच ''ही काय मागणी आहे? त्यापेक्षा पाणी मागा, धरण मागा, कालवे मागा, साखर कारखाना मागा, बँक मागा...'' आम्ही म्हटलं, असलं काही नको. आम्हाला शेतीमालाचा भाव फक्त पाहिजे. म्हणजे, शेतीमालाला भाव मिळणार नाही असं काही तुम्ही करू नका.

नेहरूव्यवस्था आम्हाला नको हे दहा वर्षांपूर्वी आम्ही म्हटलं. त्यावेळी सगळेच नेहरूवादी होते आणि गेल्या दहा वर्षांत शेतकऱ्यांनी एवढी मोठी लढाई जिंकून दाखविली की पंतप्रधानांना आज कबूल करावं लागतं की, ''नेहरूव्यवस्था संपली, खुल्या अर्थव्यवस्थेकडे आम्ही जाऊ इच्छितो. पुन्हा नेहरूव्यवस्थेची जुनी चूक आम्ही करणार नाही.''

**शेतकरी सरकारविरुद्ध लढायला घाबरत नाही**

चिखली परिसरातील जमिनींच्या संपादनाची ही समस्या १९६८ पासून सुरू झाली; पण शेतकऱ्यांवर डल्ला मारण्याच्या या कारवाईचा इतिहास त्याहून जुना आहे.

शासन शेतकऱ्याची जमीन संपादन का करू शकते? १९५० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला घटना दिली. त्या घटनेमध्ये प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य दिलं, विचाराचं स्वातंत्र्य दिलं, उच्चाराचं स्वातंत्र्य दिलं, आपापला व्यवसाय करण्याचं स्वातंत्र्य दिलं. त्या घटनेमध्ये असं म्हटलं होतं की कुणाचीही मालमत्ता सरकार ताब्यात घेऊ शकणार नाही. कारण ज्याला त्याला

आपला व्यवसाय चालविण्याचा अधिकार आहे. जर सार्वजनिक कामाकरिता जमीन घेणे आवश्यक असलं तर त्याला योग्य तो मोबदला दिला जाईल. ही बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेतील तरतूद.

पुढे काय झालं? त्यावेळी कूळकायदा निघाला होता. वेगवेगळ्या राज्यांमध्ये सिलिंगचा कायदा निघाला होता. शेतकऱ्याकडे १८ एकर बागायती किंवा ५४ एकर कोरडवाहू जमीन यापेक्षा जास्त जमीन असू नये असा सिलिंगचा कायदा. सार्वजनिक न्याय, समता, विषमता निर्मूलन अशी या कायद्यामागची कारणे सांगितली गेली. १८ एकर बागायती जमिनीची किमत आजसुद्धा एक लाख रुपये एकराने १८ लाख रुपये होईल. आज पुण्यासारख्या शहरात १८ लाख रुपयांत एक फ्लॅट मिळणं कठीण आहे; पण असं कुणी म्हणालं नाही की 'शहरामध्ये ज्याच्याकडे चार-पाच खोल्यांचं घर आहे त्या खोल्यांवर सिलिंग आणावं! दोनतीन खोल्यांचं सिलिंग ठेवून ज्या जादा खोल्या असतील त्या विषमता निर्मूलन, सामाजिक न्याय म्हणून फुटपाथवर राहणाऱ्या लोकांना राहायला द्याव्या.' शहरातल्या प्रस्थपितांची मालमत्ता जशीच्या तशीच राहिली पाहिजे. विषमता निर्मूलन इथं नको; पण विषमता निर्मूलन खेड्यात व्हायला पाहिजे. म्हणून, मग सिलिंगचा कायदा झाला. शेतकरी कोर्टात गेले आणि कोर्टाने निकाल दिला की घटनेप्रमाणे, शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेता येणार नाही.

मग, दिल्लीच्या सुलतानांनी काय केलं? त्यांनी घटनाच बदलून टाकली आणि त्यात असं वाक्य घातलं की शेतकऱ्यांची जमीन काढून घेण्याबद्दल कोणताही खटला कोर्टात चालू शकणार नाही. त्याला घटनेतील अनुच्छेद ९ (Schedule IX) म्हणतात. त्यामध्ये सरकारच्या ज्या कारवाईविरुद्ध हायकोर्टात किंवा सुप्रीम कोर्टात कोणीही जाऊ शकणार नाहीत यासंबंधी सुमारे ११२ कायदे आहेत. यापैकी १०८ शेतजमिनीसंबंधी आहेत. म्हणजे, सगळी घटना ही शेतकऱ्यांच्या विरुद्ध करण्याचं काम त्या घटनेमध्ये पहिली दुरुस्ती झाली त्यावेळीच झालं.

आता सरळ सरळ विचार करा की आपलं घर काढून घेतलं, कारखाना काढून घेतला तरी त्यांना कोर्टात जाता येणार नाही असा कायदा शहरातल्या कारखानदारांनी मान्य केला असता तर ते सरकार टिकलं असतं का?

पण, शेतकऱ्यांच्या बाबतीत मात्र असा कायदा झाला. तुमची जमीन आम्हाला हवी आहे, तुम्ही देशोधडीला लागलात तरी आम्हाला चिंता नाही.



आज आम्ही सरकारला सांगतो आहोत की इतके दिवस आम्ही हे सहन करत आलो. त्या काळात नेहरूप्रणीत व्यवस्था होती. सार्वजनिक काम कोणतं, जमिनीची किमत किती हे सरकारनं ठरवायचं, असं त्या व्यवस्थेत होतं; पण आता पंतप्रधानांनी वॉशिंग्टनला जाऊन स्वतः कबूल केलं आहे की ती नेहरूव्यवस्था संपली, समाजवाद संपला, नियोजन व्यवस्था संपली, खुल्या बाजारपेठेची व्यवस्था अमलात येत आहे.

मग, आमच्या शेतकऱ्यांचं असं म्हणणं आहे की डॉ. आंबेडकरांच्या घटनेत शेतकऱ्यांना विरोध करण्याकरिता म्हणून ज्या ज्या काही दुरुस्त्या केल्या आहेत त्या सगळ्या रद्द करा, शेड्युल नऊ रद्द करा. शेतकऱ्याची जमीन घ्यायची असेल तर ती बाजारभावाने आणि शेतकऱ्याने स्वखुशीने दिली तरच घेता येईल. शेतकऱ्याची इच्छा नसतानासुद्धा त्याची जमीन सरकारला घेण्याचा अधिकार फक्त एकाच बावीत असू शकतो आणि ती बाब म्हणजे लष्कराची गरज; पण कुणाला कारखाना काढायचां आहे, कुणाला दुकान काढायचं आहे, कुणाला राहायला जागा हवी याकरिता तुम्ही शेतकऱ्याला निर्वासित करू शकत नाही. हे खुल्या अथव्यवस्थेत चालणार नाही.

आजपर्यंत शेतीमालाच्या भावाचं आंदोलन शेतकरी संघटनेने केलं. खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये आजही आंदोलन करतो आहोत की शेतकऱ्यांच्या मालावर तुम्ही बंधनं घालू नका, त्याच्या वाहतुकीवर बंधन घालू नका, निर्यातीवर बंधन घालू नका. खुल्या व्यवस्थेत हे चालणार नाही. तसंच आमची जमीन तुम्हाला घ्यायची वेळ आली तर ती काय भावानं द्यायची हे आम्ही ठरवू. 'आमची जमीन, आमचा भाव' हे आंदोलन आम्ही देशभर करायचं ठरवल आहे. हा काही चिखली-कुदळवाडी प्राधिकरण-श्रीनिवास पाटील.... असा स्थानिक प्रश्न नाही. शेतीमालाच्या भावाचा प्रश्न देशभरच्या शेतकऱ्यांनी लढवला आणि जिंकला. आम्ही फक्त कांद्याचं आंदोलन करीत बसलो नाही म्हणून पंजाबच्या गहू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी महाराष्ट्रातील शेतकरीही लढले. शेतीमालाच्या भावासाठी केरळपासून पंजाब-हरिणापर्यंतचे शेतकरी लढले तेव्हा ही लढाई जिंकली. आता 'शेतीच्या भावा'चा हा लढा चिखलीपुरता मर्यादित राहून चालणार नाही. दरोडेखारांची मोठी टोळी आहे. तिचा .मुख्य दिल्लीला आहे. छोटा मुख्य मुंबईला आहे. आपण जर असे म्हणालो की माझ्या घरावर दरोडा पडला आहे तेवढ्यात दरोडेखोराला मी हुसकून लावीन तर चालणार नाही. तो पुन्हा आपल्या साथीदारांना घेऊन दरोडा घालायला

येईल. आपल्याला दिल्लीला, जिथं मुख्य दरोडेखोर आहे तिथे हल्ला करायला पाहिजे.

चिखलीची जमीन सुटणं हा सोपा प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठी शेतकरी संघटना तुमच्या पाठीशी राहील; पण तुमची जमीन सुटली म्हणून तुम्ही घरी बसून चालणार नाही. देशभरच्या 'शिवार संरक्षणा 'च्या आंदोलनात चिखलीचे प्रतिनिधी अग्रक्रमाने आले पाहिजेत.

या परिषदेचा निष्कर्ष हा की १९५१ सालापासून नेहरूव्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांना केवळ शेतीमालाच्या भावाला लुटलं एवढंच नव्हे तर त्यांची घरंदारं आणि जमीनसुद्धा लुटली आहे. शेतीमालाच्या भावाचं संरक्षण आजपर्यंत आम्ही केलं. आता आम्ही आमच्या शेतजमिनीचं शिवाराचंसुद्धा संरक्षण करणार आहोत. शेतीमालाच्या भावाची लढाई दहा वर्षांत जिंकली. येत्या पाच वर्षांच्या आत शिवाराच्या संरक्षणाची लढाईही आम्ही जिंकणार आहोत.

**धीट मावळयांचे अभिनंदन**

मी सर्वप्रथम, इथं जमलेल्या, खास करून चिखली विभागातील, पिंपरी चिंचवड प्राधिकरणग्रस्त शेतकऱ्यांचं अभिनंदन करतो. आठ दिवसांपूर्वी खुद्द मुख्यमंत्र्यांनी अशी दटावणी दिली की 'ही सगळी जमीन प्राधिकरणाची आहे, सरकारची आहे आणि जर शेतकरी तिथे शेती करीत असतील तर ते अतिक्रमण करताहेत. याविषयी जर कुणी आंदोलन करीत असेल तर त्याला तोंड द्यायला सरकार समर्थ आहे.' म्हणजे सरकार मुंबईमध्ये जे गुंड धुडगूस घालताहेत त्यांना तोंड द्यायला समर्थ नाही; पण चिखलीच्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरून हुसकून लावायला मात्र सरकार समर्थ आहे. अशी त्यांनी धमकावणी दिली तरी देखील या परिसरामधल्या शेतकऱ्यांनी ते आव्हान स्वीकारून आपली उपस्थिती इथं दाखवली याबद्दल तुम्हा सर्वांच अभिनंदन.

**चिखलीत तेवलेला वातीसाठी अख्खा महाराष्ट्र तेल म्हणून जळणार**

''गावच्या शिवाराचं रक्षण करण्याचा हा लढा चिखली-कुदळवाडीच्या मावळ्या शेतकऱ्यांनी उभा केला आहे. इथं शेतकरी संघटनेच्या आंदोलनात सुरुवातीपासूनच आपला जीव ओतलेले. संघटनेचे रायगड, सोलापूर, अकोला, सांगली, लातूर, औरंगाबाद, अमरावती, नगर, पुणे जिल्ह्यांतील कार्यकर्ते प्रतिनिधी म्हणून हजर आहेत, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खुद्द हजर आहेत, ते इथं मचावर उभं राहून भाषण देण्यासाठी आलेले नाहीत; चिखली- कुदळवाडीचे शेतकरी शिवार संरक्षणाच्या या लढ्यात वात म्हणून तेवणार असतील तर



महाराष्ट्रातील आख्खी शेतकरी संघटना तेल म्हणून जळायला तयार आहे याची ग्वाही देण्यासाठी हजर आहेत. वाडवडिलांपासून कित्येक पिढ्या ज्या शेताने पोसल्या त्या शेतावर राहाता येत नसेल तर शेतकऱ्यांना एकच जागा उरते, ती म्हणजे तुरुंग. शासनाने किंवा प्राधिकरणाने शेतकऱ्यांना आपल्या जमिनीवरून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला तर मीही तुमच्याबरोबर तुरुंगात यायला तयार आहे आणि आख्खं चिखली गाव तुरुंगात गेलं तरी हे सत्याग्रहाचं आंदोलन थांबणार नाही. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामधून सत्याग्रही इथं येतील किंवा त्यांच्या जिल्ह्यांमध्ये चिखलीच्या या शिवार संरक्षणाच्या लढ्याला पाठिंबा म्हणून आंदोलन करतील. तुम्ही चेतवलेली ज्योत फुकट जाणार नाही, हे आश्वासन मी देतो,''

**पाणी कुठंतरी मुरतं आहे**

टेल्कोचे काही अधिकारी जाहीरपणे म्हणतात की आम्ही जमीन घेतली तर प्राधिकरणाकडून घेऊ दुसऱ्याकडून घेणार नाही. असं का? कारखाना चालवणारा मनुष्य किंवा कंपनी यांना कोणत्याही प्राधिकरणाचं प्रेम असायचं काय कारण आहे ? कारखानावाला कसं बोलला पाहिजे ? अरे, प्राधिकरण मला अकरा लाख रुपये एकराने ही जमीन देत आहे, तशीच मला नव्व्याण्णव हजार नऊशे नव्व्याण्णव रुपयांनी कुणी देत असेल तर ती मी घेईन. कारखानदाराची अशी वृत्ती पाहिजे; पण व्यवहारामध्ये माणसं वरीलप्रमाणे बोलू लागतात तेव्हा त्याचा अर्थ इतकाच होतो की पाणी कुठंतरी मुरत आहे.

**हिज मास्टर्स व्हॉईस**

डिसेंबर ९२ मध्ये प्राधिकरणाचे मुख्याधिकारी श्रीनिवास पाटील यांनी टेल्कोला ही जमीन देता येणार नाही असे सांगितले. ६ जानेवारी ९३ रोजी इंडियाचे त्यावेळचे रक्षामंत्री शरद पवार पुण्यात आले आणि त्यांनी घोषणा केली की प्राधिकणाची १०० एकर जमीन टेल्कोला देणार आहोत. रक्षामंत्र्यांच्या अखत्यारीत टेल्को येत नाही, शेतजमीन येत नाही, प्राधिकरणही येत नाही आणि पिंपरी चिंचवडही येत नाही. जमीन लष्कराकरिताही घेत नव्हते. राज्यपालांना आपण विनंती केली पाहिजे की या प्रकरणाची पहिल्यांदा चौकशी व्हावी. कोणत्या अधिकारात रक्षामंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी टेल्कोला विकण्याचा निर्णय घेतला?

शरद पवार शंभर एकर देतो म्हणाल्यानंतर, डिसेंबरात टेल्कोला जमीन देता येत नाही म्हणणारे श्रीनिवास पाटील म्हणाले, आम्ही टेल्कोला १८८ एकर

जमीन विकणार आहोत. एका महिन्यात मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेत आमूलाग्र बदल का झाला याचीही चौकशी झाली पाहिजे.

या जमिनीसंदर्भात शेतकऱ्यांना दिलेली कागदपत्रे आणि प्राधिकरणाच्या कार्यालयातील कागदपत्रे यांत तफावत आहे. ही तफावत कागदपत्रांतील तपशिलात व तारखांत बदल केल्यामुळेच निर्माण झाली असावी. जमिनींच्या २० कोटी रुपयांच्या या व्यवहारात प्राधिकरणाने अफरातफर केलेली आहे. आपण महाराष्ट्राच्या राज्यपालांना विनंती करणार आहोत की चिखली प्रकरणाची सार्वजनिक चौकशी झाली पाहिजे.

**तोतया मालकांपासून सावध!**

शेतकऱ्याची भूमिका स्पष्ट आहे. शेतकऱ्यांचा टेल्कोशी वाद नाही. टेल्कोला जमीन घ्यायची असेल तर त्यांनी खऱ्या मालकांशी व्यवहार करावा, तोतया मालकांशी करू नये. इतर कोणाशीही केलेले व्यवहार बेकायदेशीर असतील. प्राधिकरणाशी व्यवहार करून खोटी कागदपत्रे तयार होऊ शकतील; पण प्रत्यक्ष जमिनीचा ताबा मिळणार नाही कारण आम्ही जमिनीचे मालक आहोत, प्राधिकरण नाही. याविषयी (JRD) टाटांशी संपर्क साधला जाईल.

**चार हजारांचे बावीस लाख?**

शेतकऱ्यांना हे काय गौडबंगाल आहे कळत नाही. आपली जमीन जाताना ४००० रुपये एकराने जाते. त्या जागेवर काहीही डेव्हलपमेंट केली नाही आणि केली तरी काय करतात ? गटाराकरिता चार चर खणायचे, पाईपलाईन आणून द्यायची, रस्ता आखायचा, सपाटीकरण करायचं. हे शेतकरीही करू शकतो. आमच्या हातात असताना ज्या जमिनीची किमत फक्त ४००० रुपये एकर आणि ती जमीन त्या बाजूला गेली की लगेच तिची किमत अकरा लाख नव्हे बावीस लाख रुपये होते! एकराचं मोजमापच संपून जातं आणि दर चौरसफुटावर ठरतात.

आता याची जाणीव महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना चिखलीकरांनी करून दिली याबद्दल त्यांना सगळ्यांना वतीने धन्यवाद दिले पाहिजेत.

(शेतकरी संघटक, ६ जून १९९३)

■



बारा

# निसर्गशेतीवरील किडी

## निसर्ग–विज्ञान–व्यापार

विषय : नैसर्गिक शेती तथा निसर्गविज्ञान. या 'तथा' शब्दाने थोडा गोंधळ होण्याची शक्यता आहे. नैसर्गिक शेती म्हणजेच निसर्ग विज्ञान शेती हे काही खरे नाही. शिबिराचे सूत्रधार 'बळिराजा मासिक' आधुनिक व्यापारी शेतीचे मासिक अशी बिरूदावली मिरवते. निसर्गविज्ञान शेतीची चर्चा आधुनिक व्यापारी दृष्टिकोनातून घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रात जागोजागी उदंड कष्ट, प्रयास, तपस्या करणारी निष्ठावान मंडळी एकत्र जमा झाली आहेत.

**शब्दांचे मोठे पीक**

विषय सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. गेल्या वर्षभरांत अर्ध्या डझनावर देशी–परदेशी विद्यार्थी, या विषयावर डॉक्टरेट करणारे, मला भेटले आहेत. शेतकऱ्यांपेक्षा हा विषय विद्वानात अधिक लोकप्रिय झाल्याने शब्दांचे पीक मोठे उदंड आले आहे. कोणी वैकल्पिक (Alternative) शेती म्हणतो, म्हणजे हरित–क्रांती घडवून आणण्याकरिता वापरलेल्या सुधारित बियाण्यांची वाणे आणि वरखते व औषधे यांच्या उपयोगाने होणाऱ्या शेतीला पर्याय देणारी शेती, कोणी फक्त पेट्रोलियमविरहीत शेती म्हणतो, कोणी जैविक, कोणी Biotic शेती. कोणी म्हणते पर्यावरणी (Ecological) शेती, कोणी शाश्वत (Sustenable) शेती,कोणी भूनाग (Vermiculture) शेती इ. शब्दप्रयोग आहेतच. इंग्रजीत शब्दांची लयलूट आणिक मोठी आहे. Organic, Natural, Bio-Dynamic, Permaculture इ.इ.

**नैसर्गिक शेतकऱ्यांच्या छटा**

फारसे तपशिलात न जाता सांगायचे झाले तर या सगळ्या प्रकारांमध्ये समानता एवढी की शेतीच्याबाहेरून येणाऱ्या, विशेषत: कारखानदारीत तयार

होणाऱ्या वस्तूंचा, निविष्ठांचा वापर कमी. निसर्गशेतीत काही प्रखर निष्ठावान आहेत. एखाद्या सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणे रसायनाच्या सावलीचाही विटाळ त्यांना खपत नाही. एक कण जरी रसायन आले तरी त्यामुळे सगळे नैसर्गिक चक्र बिघडून जाण्याची धास्ती त्यांना वाटते. बाकीच्यांची, आवश्यकता पडल्यास थोडीफार तडजोड करण्याची तयारी असते. या नव्या चळवळीत निसर्गवादी आहेत, तत्त्वज्ञानी आहेत, धर्मवादी आहेत पर्यावरणवादी आहेत, काही काही तर शेतकरीसुद्धा आहेत.

**दुसरा एक प्रवाह**

निसर्गशेतीच्या प्रवाहाबरोबर दुसरीही एक जबरदस्त विचारधारा आहे. नुकतेच महाराष्ट्रातील चार-पाचशे शेतकरी इस्रायलला जाऊन आले. शिवाय अर्थव्यवस्थेच्या खुलीकरणामुळे, निर्यातीसाठी, बी-बियाणे इत्यादींच्या आयातीसाठी अनेक तरुण शेतकऱ्यांचा परदेशी शेतकी तंत्रज्ञानाशी संबंध आलेला आहे. या मंडळींच्या तोंडची भाषा निसर्गशेतीवाल्यांपेक्षा अगदीच वेगळी आहे. आधुनिक व्यापारी शेतीकरीता शेतीमालाचे हुकमी उत्पदन घेतले पाहिजे, निर्यातीचे करारमदार झाले आणि उत्पादनच झाले नाही तर जागतिक बाजारपेठेत आपल्याला स्थान राहणार नाही हे त्यांना चांगले समजते आहे. हुकमी उत्पादन झाले पाहिजे एवढेच नव्हे तर ते उत्पादन ठराविक गुणवत्तेचे झाले पाहिजे; रंग, रूप, आकार, गंध, स्वाद, स्पर्श, चव, शुद्धता अशा सगळ्या कसोट्यांना माल उतरला पाहिजे. त्यांकरिता प्रचंड आच्छादित घरे बांधून उष्णतामान, पाणी, खते, औषधे यांचा ठराविक आणि नियमित पुरवठा करणाऱ्या जवळपास कारखानदारी तंत्रज्ञानाकडे ते वळत आहेत. माल तयार झाल्यानंतरही त्याची तोडणी, शीतकरण, आवेष्टन, साठवणूक, विक्री, प्रक्रिया, निर्यात याकरिता अधिकाधिक कारखानदारी साधने उपयोगात आणण्याची आवश्यकता ते हिरीरीने मांडतात.

एकट्या महाराष्ट्र राज्यातच शेतकऱ्यांमध्ये आणि शेतीसंबंधी दोन विचारप्रवाह सारख्याच हिरीरीने मांडले जात आहेत. एक 'निसर्गशेतीचा' आणि दुसरा 'उद्योजक शेतीचा'.

उद्योजक शेतकरी निसर्गशेतीच्या तसे विरोधी नाहीत, द्राक्षे, फुले, स्ट्रॉबेरी यांची निर्यात करणारी अनेक शेतकरी मंडळी आग्रहाने वरखतांचा वापर टाळतात किंवा मर्यादित ठेवतात. औषधांच्या उपाययोजनांत मात्र काही किरकोळ अपवाद सोडल्यास रासायनिक औषधांचा वापर हे उद्योजक शेतकरी



करतात. हा कलही हळूहळू बदलेल. परदेशात जैविक शेतीमालाचा आग्रह वाढतो आहे. साहजिकच आपल्या देशातील पंचतारांकित मंडळीही जैविक मालाचा आग्रह धरू लागली आहेत. बाजारपेठेचा हा कल राहिला तर उद्योजक शेतकऱ्यांना रासायनिक खतांबरोबरच औषधांचा वापर कमी करावा लागेल. बाजारपेठेत भारताची जवळ जवळ मक्तेदारी होऊ शकेल. या दृष्टीने ही मंडळी निसर्ग शेतीचे महत्त्व मानतात.

**रासायनिकाचे पुरस्कर्ते नाहीत**

'निसर्गशेती' आणि 'रासायनिक शेती' असे दोन शब्दप्रयोग वापरले तर रासायनिक शेतीचे खंदे पुरस्कर्ते अथवा समर्थक असे कुणीच नाही. रसायनेच वापरा, जैविक खते वापरूच नका असा अतिरेक रासायनिकात सापडत नाही. नैसर्गिक खते चांगली पण पुरवठा म्हणून थोड्याफार प्रमाणात रसायनाचा उपयोग करणे सोयीचे आणि फायद्याचे असते एवढीच काय ती त्यांची मांडणी आहे. हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचे खंदे पुरस्कर्ते कोणी नाहीत; पण गेल्या ३० वर्षातील यातंत्रज्ञानाच्या वापराचे समर्थन करणारे अनेक आहेत. हरितक्रांती तंत्रज्ञानाला ३० वर्षांपूर्वी पर्याय नव्हता. जर का तो वापर झाला नसता तर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला नसता, लक्षावधी माणसे उपासमारीत सापडली असती असे त्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की या विषयावर मतभेद नसावा.

**चहूकडे निसर्गशेतीच**

कित्येक शतके हिंदुस्थानात सारी निसर्गशेतीच चालू आहे. रसायनांचा उपयोग या शतकातच आला आणि त्यांतही विशेष करून गेल्या ३० वर्षांतच आला. आजही वरखतांचा वापर इतर देशांच्या तुलनेने अगदीच कमी आहे. तो वापर खात्रीशीर पाणीपुरवठा असलेल्या क्षेत्रात; गहू, भात, ऊस, कापूस अशा कांही मोजक्या पिकांत आहे. बाकी शेतीत रसायनांचा वापर अगदीच किरकोळ आहे. देशातील जवळ जवळ ४० % शेतीत आजदेखील कणमात्र युरिया पडत नाही. निसर्गशेतीच्या शेकडो वर्षांत देशांत दुष्काळ पडत राहिले, माणसे उपाशी मरत राहिली. आजही ४० % शेतकरी निसर्गशेती करतात तरी देश अडचणीतच आहे. तेव्हा निसर्गशेती सगळ्या रोगांवरचा एक मोठा उपाय आहे असली भाषा विद्वानांनी खुशाल वापरावी, शेतकऱ्यांना ती परवडणारी नाही.

निसर्गशेतीच्या विरुद्ध कोणीच नाही. या झेंड्याखाली काही प्रवृत्ती मात्र

मनात काही प्रश्नचिन्हे आणि भीती तयार करतात.

**धर्मवादाचे भूत**

निसर्गशेतीच्या निमित्ताने एक नवा धर्मवाद शेतीमध्ये घुसविण्याचा प्रयत्न होतो आहे असा संशय घेण्यास जागा आहे. बाबामहाराजांचे अनेक शिष्यवर आणि स्वत:ला गांधीवादी म्हणवणारे आणि जन्माच्या अपघाताने मिळालेल्या त्या धर्माच्या वारशाचा गर्व मिरविणारे अनेक लोक निसर्गशेतीच्या चळवळीत अग्रभागी आहेत. शेतकऱ्यांनी निसर्गशेती चळवळीतील धर्मवाद्यांपासून आणि समाजवाद्यांपासून सावध राहिले पाहिजे. मी हा मुद्दा आवर्जून मांडतो, कारण मला हा धोका फार भयानक वाटतो. निसर्गशेतीचे प्रयोग करणाऱ्यांपैकी अनेकजण धर्मवादी तत्त्वज्ञानाने प्रेरित झालेले आहेत. खुद्द 'मासानोबु फुकूओका' यांची निसर्गशेतीची मांडणीच धर्मावर भर देते. त्यांनी म्हटले आहे,

''नैसर्गिक शेतीमध्ये धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा संयोग झाला आहे हे विशेषत: भारतीयांनी जाणले आहे. नैसर्गिक शेती हेच परम सत्य, खरा साधनमार्ग व यथार्थ शेतीपद्धती होय ही गोष्ट त्यांना आकळली याने मला धन्यता वाटली.''

पुण्याच्या आसपास वावरांवर गायत्री मंत्राचा प्रयोग सांगणारे 'विज्ञानंद' झाले. तसेच 'निसर्गशेतीतील धर्मवादी' शेतकऱ्यांना धोका देऊ पाहत आहेत. रासायनिक शेतीच्या दुष्परिणामांनी शेतकरी पोळलेला आहे याचा फायदा घेऊन 'विज्ञान हरले, अध्यात्म जिंकले' अशा आरोळ्या ठोकायला त्यांनी सुरुवात केली आहे. निसर्गशेतीची गोडी शेतकऱ्यांना लागली की मग जुन्या काळच्या ख्रिश्चन मिशनऱ्याप्रमाणे अध्यात्मात बाटवण्याचे हे कारस्थान आहे. जनावरांचे मूत्र शेतीला फायदेशीर पण त्यात गोमूत्र सर्वात फायदेशीर असा प्रचार गोपूजक धर्मवादी करतात. अर्धवट शास्त्रीय परिभाषेत त्याचे थातूरमातूर समर्थन देऊन लोकांना भुलवतात. ज्या ज्या देशात एक वशिंडाची गाय आहे तो तो देश आणि तेथील पर्यावरण उद्ध्वस्त झाले आहे. तरी त्या गाईचे देव्हारे माजवतात; ज्योतिष शास्त्राच्या आधाराने वैदिक शेती करण्याची शिफारस करतात. रायानिक शेतीचा पराभव झाला असेल, नसेल पण विज्ञानाचा पराभव झालेला नाही, चुकीच्या तंत्रज्ञानाचा पराभव झाला आहे. विज्ञाननिष्ठा जिंकत आहे. नफ्याची प्रेरणा सर्वात सबळ आणि सुष्ट प्रेरणा सिद्ध झाली आहे. ही दोन मूल्ये रासायनिक शेतीबरोबर सोडली तर घंगाळातील गढूळ पाण्याबरोबर त्यात न्हाऊ घातलेले बाळही फेकून दिल्यासारखे होईल.



**कांचनमुक्तीचे कांचनमृग**

धर्मवाद्यांप्रमाणेच एक वेगळे अध्यात्म सांगणारी मंडळी निसर्गशेतीत मिरवत आहेत. यात प्रामुख्याने गांधीवादी, सर्व सेवा संघवाले कांचन मुक्तिवादी यांची गणना आहे. निसर्गशेतीचा पुरस्कार करताना ते शेतीतील व्यावसायिकतेवर उघड उघड हल्ला करतात. कोणी 'ॲलन जॉर्ज' हा त्यांचा आवडता लेखक, त्याचे एक वचन उद्‌धृत केले जाते.

''जेव्हा तेव्हा शेतकऱ्याने वास्तविक शेती करण्याचे, अर्थात तिच्यापासून आपली व आसपासच्या समाजाची आवश्यकता पूर्ती करण्याऐवजी आपले उत्पादन दूर, लांब पाठवून पैशाच्या लालसेने विकण्यास सुरुवात केली व तिला व्यापाराचे रूप दिले तेव्हा त्याने संकट विकत घेतले व जमिनीचे शोषण करून हिरव्यागार शेतीचे वाळवंट केले.''

''स्वत: व गाव यांच्या स्वावलंबनाऐवजी नफ्यासाठी शेती करील'' या बुद्धीने शेतकरी निसर्गापासून दूर गेला आणि त्याने स्वत:चे, देशाचे नुकसान केले अशी मांडणी 'सर्व सेवा संघ'वाले करतात.

**दुढ्ढाचार्यांची मळमळ**

आपले हित कशात आहे, आपल्या पोराबाळांचे, कुटुंबाचे हित कशात आहे हे शेतकऱ्यांना कळत नाही; शेतीत काय पिकवावे याचे शहाणपण त्यांनी 'आम्हाकडून' घ्यावे, जग पैशाच्या मागे लागले तरी शेतकऱ्यांनी मात्र सेवाभावी जीवन काढावे अशी दांभिकता या विचारसरणीत आहेच. त्याखेरीज, वैयक्तिक नफ्यापेक्षा काही व्यापक उच्च तत्त्वांच्या आधाराने देशातील साधनसंपत्तीचा वापर अधिक चांगला होतो, असाही एक सिद्धांत आहे. सर्वसामान्य संसारी लोकांना त्यांचे हित काय कळणार? षड्‌रिपूंच्या कर्दमात ते बिचारे गटांगळ्या खात असतात. आम्ही परमेश्वरी ज्ञानाचे वारसदार त्यांना मोक्षाचा मार्ग दाखवतो असा अहंकार धर्मवाद्यांनी वर्षानुवर्षे मिरवला. गहू किती पिकवावा, कोथिंबीर किती लावावी हे शेतकऱ्यांना काय समजणार? त्यासाठी राजधानीतील नियोजन मंडळात बसलेली 'दुढ्ढाचार्य' मंडळी आकडेमोडी करून निर्णय घेतील ही समाजवाद्यांची आणि नेहरूवाद्यांची मांडणी. व्यक्तीच्या प्रेरणा देशघातक असतात आणि देशहित कळते ते आध्यात्मिक किंवा अर्थशास्त्री दुढ्ढाचार्यांना. कारण त्यांच्याकडे काही 'महान व्यापक दृष्टिकोन'असतो. समाजवादी त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आधाराने समाजावर हुकुमत बसवू पाहत होते. गांधीवादी तशाच तोंडवळ्याचा कार्यक्रम आध्यात्माच्या पायावर देत आहेत.

व्यक्तींनी नफ्याचा पाठपुरावा केल्यामुळे देशाचे नुकसान होते या वावदूक कल्पनेचा जागतिक ऐतिहासिक पराभव झाला आहे.

**स्वातंत्र्याच्या कक्षा**

नैसर्गिक शेतीत निसर्गाशी सहजीवन साधले जाते, नैसर्गिक शेती आत्मिक सुख आणि आनंद देते, त्याबरोबर नैसर्गिक शेतीत तयार होणारा माल अधिक पौष्टिक, चवदार असतो. रासायनिक खतांतून तयार झालेल्या मालाच्या सेवनाने माणसाचा स्वभाव बिघडतो, आध्यात्मिक अध:पतन होते असेही वेगवेगळे युक्तिवाद ऐकवले जातात. कोणत्या पदार्थाच्या सेवनाने मनुष्यप्राण्याची आध्यात्मिक उन्नती किंवा अवनती होते हा माझ्या अभ्यासाचा विषय नाही. नैसर्गिक शेतीतील माल अधिक रुचकर, पौष्टिक असतो हे मानण्यास मी तयार आहे; पण याच कारणाने नैसर्गिक शेती शेतकऱ्यांना आणि ग्राहकाला मान्य होईल ही कल्पना मनुष्यस्वभावाच्या चुकीच्या निदानावर आधारलेली आहे. स्वामी चिन्मयानंद एक अनुभव सांगत. पहाटे चार वाजता उठून तांब्याभर पाणी प्याले तर कोठा साफ राहतो, प्रकृती चांगली राहते, उत्साह वाटतो हे सगळे खरे; पण असा अनुभव घेऊनही उष:पान करणारे विरळाच. याउलट, धूम्रपानाने प्रकृती बिघडते, कॅन्सरसारखे भयानक रोग होतात हे माहीत असूनही एका झुरक्याच्या तलफेसाठी माणसे वेळी अवेळी कोसच्या कोस अवघड रस्त्याने पायी चालत जातात. नैसर्गिक शेतीतून आरोग्य, शांती मिळत असेल पण आरोग्य-सुख-शांती ही मनुष्यप्राण्याची उद्दिष्टे नाहीत; माणसाचे उद्दिष्ट स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचे असते. पोटॅशिअम सायनाइडसारख्या जहाल विषाची केवळ चव कळावी आणि मरण येण्याआधी ती लिहून ठेवता यावी यासाठी अनेकांनी प्राण गमावले आहेत असे म्हणतात.

रासायनिक शेतीतील इतर दोष काहीही असोत, त्यात उत्पादनावरील शेतकऱ्याचे नियंत्रण अधिक सज्जड आहे. रासायनिक शेतीला जो काही पर्याय निघेल तो माणसाच्या स्वातंत्र्याच्या कक्षा बंदिस्त करणारा असेल तर त्याची स्वीकृती कठीण आहे.

**पर्यावरणवाद्यांची भयानक भकिते**

निसर्गशेतीच्या चळवळीला धर्मवाद्यांप्रमाणेच पर्यावरणवाद्यांचाही मोठा धोका आहे. शाश्वत शेती किंवा सदा सर्वकाळ चालणारी शेती अशी कल्पना पर्यावरणवादी मांडतात. वर्तमान पिढीचा विकास उद्याच्या पिढ्यांच्या वारसाला धक्का न लागता झाला पाहिजे, जेणेकरून ही सुंदर पृथ्वी आणि त्यावरील



प्राणिमात्र आणि मानव यांची वस्ती सर्वकाळ अबाधितपणे चालू राहील असेच तंत्रज्ञान वापरले पाहिजे अन्यथा पृथ्वीचा नाश अटळ आहे असा त्यांचा आग्रह आहे.

जगाच्या इतिहासात प्रत्येक पायरीला आता ही पृथ्वी बुडते, आता विनाश जवळ आला अशा आरोळ्या ठोकणारी मंडळी दृष्टीस पडतात. पहिली आगगाडी भूगोलावरून धावू लागली तेव्हा सृष्टीचा विनाश जवळ आला असे आधुनिक पर्यावरणवाद्यांचे पूर्वज करवादले होते. पहिले कारखाने उभे राहू लागले तेव्हा ही सारी हरित सृष्टी आता लुप्त होणार याची चिंता पडलेल्यांत टॉलस्टॉय, रस्कीन यांचीही गणना आहे. लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते आणि अन्नधान्याचे उत्पादन मात्र गणिती श्रेणीने वाढते तेव्हा मनुष्यजात भूकबळीने नष्ट होणे अपरिहार्य आहे असे भाकीत यांच्याच पूर्वजांनी वर्तवले होते. ही सगळी भकिते खोटी पाडून माणूस जिवंत राहिला, एवढेच नव्हे तर तो सुधारला, जास्त सुखी झाला हेही सत्य आहे.

**ऊर्जास्रोतांचा कारकुनी हिशेब**

ठराविक पेन्शन मिळणारे म्हातारे आपले सगळे दैनंदिन जीवन त्या रकमेत बसवण्याचा आरखडा तयार करतात, म्हणजे मरेपर्यंत आपणास काही कमी पडू नये. असला हिशेब मानवजात करत नाही. मनुष्य धडपडतो, स्वत:च्या 'स्वातंत्र्याच्या कक्षा' रुंदावण्याकरिता भगीरथ प्रयत्न करतो, निसर्गाची रहस्ये आणि प्रमेये शोधून काढतो. बैलाच्या ताकदीपासून वारा, पाणी, कोळसा, वीज, पेट्रोलियम, अणुपर्यंत ऊर्जेचे अनेक स्रोत त्याने वेसण घालून सेवेस ठेवले आहेत. उरलेल्या पेट्रोल स्रोतांचा नेमका हिशेब मांडून मनुष्यजातीच्या पुऱ्या भविष्यात ते पुरतील अशा गतीने जपून जपून वापरण्याची पद्धती माणसाच्या स्वभावाला जमणारी नाही. पेट्रोल संपले तर त्या जागी दुसरी काही साधने तयार करू, अणुंचा वार करू, समुद्रांच्या लाटांना कामी लावू, सूर्याची ऊर्जा वापरू आणि एक दिवस सूर्यच विझत आला तर त्या जागी एखाद्या तारकेला ओढीत आणून पेटवून देऊन नवा सूर्य उभा करण्याची त्याची जिद्द आहे. पर्यावरणवाद्यांनी प्रगतीला खीळ घालण्याची कोशीस शतकानुशतके केली, पण माणूस थांबला नाही. कर्तबगारी गाजवू इच्छिणाऱ्या पोराला घरातील म्हाताऱ्यांनी सावधगिरीचा सल्ला द्यावा हे योग्यच; त्याचा काही ना काही उपयोग होतोच. पर्यावरणवाद्यांत काही भली मंडळीही आहेत. मनुष्याच्या भवितव्याविषयी त्यांना वाटणारी चिंता खरीखुरी आहे. अन्यथा या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि

संस्थांना वापरणे कठीण व्हावे इतकी साधने, संपत्ती आणि सन्मान अगदी सहजासहजी उपलब्ध झाली नसती.

**अशास्त्रीय शाश्वती**

पर्यावरणवाद्यांच्या सद्हेतूबद्दल, सद्भावनेबद्दल शंका घेण्याचे कारण नाही पण त्यापलीकडे त्यांच्याकडे काही असले तर ते तपासून घ्यावे लागेल. उदा: त्यांची शाश्वततेची कल्पना कितपत शास्त्रीय आहे? सातवी-आठवीच्या पदार्थ विज्ञानशास्त्राच्या पुस्तकात वेगवेगळ्या तऱ्हेच्या कारंज्यांचे प्रयोग केले जातात. थोडीफार बुद्धी असलेले सर्व विद्यार्थी त्या वयात शाश्वत कारंजा तयार करण्याच्या प्रयत्नास लागतात. शाश्वतता ही विज्ञानाच्या मूलभूत नियमानुसार अशक्य आहे. 'जातस्यहि ध्रुवो मृत्य:।' तेव्हा ही पृथ्वी चिरंतन कालापर्यंत चालणारी आहे ही कल्पना शास्त्रीय नाही. पृथ्वीसारखे ग्रह या अफाट विश्वात रोज एक या गतीने तरी खपत असावेत.

शक्य होईल तितका पृथ्वीचा बचाव करावा याबद्दल कोणी वाद घालत नाही; पण खांद्यावर शबनम अडकवून फिरणाऱ्या पर्यावरणवादी कार्यकर्त्यांना पृथ्वीच्या जीवनमरणाची चिंता जे.आर.डी. टाटांपेक्षा अधिक आहे असे मानायला काही कारण दिसत नाही. पृथ्वी जगवायची कशी याचे पर्यावरणवाद्यांना काही विशेष ज्ञान झाले आहे असेही दिसत नाही. झाडे लावणे हा त्यांचा आवडीचा कार्यक्रम. त्यामुळे पाऊस पडतो, निसर्गाचे संतुलन राहते, असा त्यांचा लाडका सिद्धांत; पण सर्व महाराष्ट्रभर जंगलेच जंगले असताना सतत तेरा वर्षे पाऊस पडला नाही आणि दुर्गादेवीचा कराल दुष्काळ झाला, हे कसे? हे ते सांगू शकत नाहीत. सगळा राजस्थान भाक्रा-नान्गलच्या पाण्याने हिरवागार झाला तर मान्सूनचे चक्र थांबेल काय? आणि बाकी सारा देश वाळवंट बनेल काय? या शक्यतेबद्दल ते काहीच ठामपणे सांगू शकत नाहीत. ''पृथ्वीचा विनाश प्रदूषणापेक्षा एखाद्या ग्रहखंडाच्या टकरीने होण्याची शक्यता अधिक आहे. अशी टक्कर टाळायची तर त्याकरता लागणाऱ्या औद्योगिक उत्पादनाने प्रदूषणाचे प्रमाण आणखीनच वाढणार हे नक्की.

**जुने समाजवादी**

कोणत्याही उद्योगाचा पर्यावरणावर काही ना काही अनिष्ट परिणाम होतोच. कोणत्याही प्रकल्पातील असले दोष दाखवून त्यांना विरोध करणे इतपतच पर्यावरणवाद्यांचे ज्ञान. खुल्या व्यवस्थेपेक्षा समाजवादी नियोजनाने विकास जलद होतो हा सिद्धांत खोटा ठरला, जग खुल्या व्यवस्थेकडे जाऊ लागले



तेव्हा अर्थकारणाच्या सबबीवर किंवा पर्यावरणाच्या बागुलबुवाने तरी 'सरकारशाही व्यवस्था' काही काळ टिकवावी या बुद्धीने बहुत सारे जुने समाजवादी आज पर्यावरणवादी झाले आहेत.

**दोषास्पदाकडून दोषात्पदाकडे**

प्रत्येक समाजव्यवस्थेच्या स्वत:च्या पर्यावरण समस्या असतात. निसर्गशेतीचा अंमल चालू असताना मलेरिया, कॉलरा, देवी, नारू, खरूज असल्या रोगांनी सर्वदूर थैमान घातले होते. त्याबरोबर दुसऱ्या काही समस्या तयार झाल्या. त्या सोडवण्याच्या प्रयत्नांत मनुष्य गढला आहे. समाज एका दोषास्पद स्थितीतून दुसऱ्या दोषास्पद स्थितीत जातो आणि नवे दोष करता करता आणखीन नवीन समस्या डोक्यावर घेतो. मनुष्याच्या सांत जीवनात 'शांती'ला स्थान नाही. 'अशांती'तून सुटका कदाचित निर्वाणांत किंवा मोक्षांत मिळत असेल; एरवी नाही.

**माणूसही निसर्ग आहे**

निसर्ग हा नेहमीच श्रेष्ठच असतो, कल्याणकारीच असतो असा पर्यावरणवाद्यांचा दुसरा एक दृढ विश्वास आहे. मनुष्यच काय तो दुष्ट आहे आणि तो निसर्गाच्या मंगलकार्यात आड येतो अशी त्याची ठाम कल्पना आहे. सर्वकल्याणकारी निसर्गाने अशी अभद्र मनुष्यजात जन्माला घातलीच का? आणि तिचेच वर्चस्व प्रस्थापित होऊ दिले कसे? असले तार्किक प्रश्न निसर्गवाद्यांच्या भावविश्वात सामावत नाहीत.

निसर्ग सदाच कल्याणकारी असतोच असे नाही. निसर्ग प्रकृतीने संख्याशास्त्रीय आहे, तटस्था आहे. कधी त्याला वेसणही घालावी लागते. निसर्ग आणि माणसाचे शत्रुत्व नाही. एकाच कुटुंबातील स्त्री-पुरुषांसारखे त्यांचे नाते आहे. नवरा-बायकोत तरी सदसर्वकाळ गोडीगुलाबी आणि चांदणी रात्र असते असे थोडेच आहे!

**अर्थकारण टाळता येत नाही**

निसर्गशेतीच्या पंढरपूरच्या वारीत धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी हौशा-नवशा-गवश्यांप्रमाणे घुसले आहेत, त्यांच्याविषयी शेतकऱ्यांनी सावध राहणे महत्त्वाचे आहे.

**घाट्यातील शेती**

रासायनिक शेतीच्या अनुभवाने शेतकरी पोळला आहे, भांबावला आहे. त्याला आपल्या नादी लावण्याच्या प्रयत्न करणारे अनेक आहेत, त्यांच्यापासून

सावध राहिले पाहिजे; पण मग शेतकऱ्यांनी मार्ग घ्यावा कोणता? या प्रश्नाकडे वळण्याआधी एक महत्त्वाचा मुद्दा मांडणे आवश्यक आहे. निसर्गशेतीकडे वळलेल्या सगळ्या शेतकऱ्यांचा अनुभव एकसारखा आहे. रसायनांमुळे त्यांचे उत्पादन घटत चालले होते, जमिनीचा कस उतरत होता याची जाणीव त्यांना निसर्गशेतीची सुरुवात केल्यानंतर झाली. रासायनिक शेती करत असताना ही शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नाही हे त्यांना सगळ्यांना उमजले होते आणि या जाणिवेतूनच त्यांनी परिवर्तन घडवून आणण्याची धडपड सुरू केली. शेतीतील घाट्याचे कारण रासायनिक तंत्रज्ञान होते काय? डंकेल प्रस्ताव आणि गॅट करार यांच्यासंबंधात हिंदुस्थान सरकारने जे दस्तावेज जिनिव्हात सादर केले त्यावरून आता एक गोष्ट स्पष्ट झाली, की हिंदुस्थानातील शेतकऱ्यांवर सरकारने जाणीवपूर्वक किमान ६९ टक्क्यांची (-) उणे सबसिडी लादलेली होती. शाश्वत शेतीचा उद्‌घोष करणाऱ्यांनी, शेतीप्रश्नातील सर्व काही आपणाला समजले, उमजले आहे असा डौल मिरवणाऱ्या लोकांनी सरकारच्या या धोरणाविषयी आपले तोंड कधी का उघडले नाही? याचा जबाब देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणाचा आव आणून पुढे येणाऱ्या सगळ्या विद्वानांना, शास्त्रज्ञांना, पुढाऱ्यांना, कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांनी खडसावून विचारले पाहिजे, 'सरकार ठरवून सवरून ७० टक्क्यांनी आजपर्यंत आम्हाला लुटत आले याविषयी तुम्ही एक वाक्य बोलला नाही, शेतकऱ्यांना सबसिडीचा मोठा फायदा मिळतो, त्यांच्या मिळकतीवर करदेखील नाही बघा हो! अशी आमच्या दारिद्र्याच्या दु:खावर डागण्या देणारी भाषा चौफेर बोलली जात असताना तुम्ही तिचा रतिमात्र विरोध केला नाही, का ते सांगा? अन्यथा, तुमच्या आतड्यात शेतकऱ्यांविषयी तिळमात्र कणव, कळकळ आहे यावर आमचा विश्वास बसूच शकत नाही, असे खडसावून सांगितले पाहिजे.

डंकेलवर सही झाली; पण म्हणजे शेतकऱ्यांच्या लुटीचे धोरण सरकार सोडून देणार आहे असे अजिबात नाही. शेतकऱ्यांनी बाजारात निविष्ठा खरीदण्याऐवजी आणि बाजारात माल विकण्याऐवजी स्वावलंबी आणि स्वयंभू निसर्गशेती केली म्हणजे शेतकऱ्याची लूट आपोआप थांबेल ही कल्पनाही चुकीची आहे. भारतीय संविधानात ९ वे परिशिष्ट घालून स्वत:च्या जमिनीच्या बचावासाठी शेतकऱ्यांना न्यायालयाची पायरी चढण्याची मुभा न ठेवणारे सरकार निसर्गशेतकऱ्याच्या शेतावर उतरून माल उचलून घेऊन जाण्यास कचरेल अशा भोळ्याभाबड्या आशेने नैसर्गिक शेतीकडे वळत असाल तर ती



आशा खोटी आहे.

**गच्चीवरील शेतीचे अर्थकारण**

निसर्गवाद्यांतील भली भली माणसे शेतीच्या अर्थकारणाचा प्रश्न दुय्यम आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करतात; आपण विज्ञानवादी आहोत, प्रयोगवादी आहोत असा घोष चालू असतानाच 'गच्चीवरील शेती' किंवा 'अर्ध्या गुंठ्यात एका कुटुंबाचे पोषण' असल्या कल्पना मांडताना हिशेबात हातचलाखी करून धोका देतात. एक पिशवीभर केरकचरा, उष्टेमाष्टे, शेण, कुजलेले पदार्थ एकत्र केले तर खर्च काहीच नाही; पण त्यातून कुटुंबाला पुरतील इतकी केळी, आंबे उत्पादन करता येतात या युक्तिवादातली हातचलाखी उघड आहे. बिनखर्चाने पोतेभर कुजलेले पदार्थ जमा करणे फारसे कठीण नाही; पण प्रत्येक शेतकऱ्याने अशी ५० पोती जमा करायची म्हटले तर स्वयंपाकघरातील उष्टेमाष्टेसुद्धा दुर्मिळ होईल आणि चढ्या किमतीने ते विकत घ्यावे लागेल. एका वेलीवरचा वनस्पतिशास्त्रीय प्रयोग लाखो वेलींना लागू पडतो; पण एका वेलीचे अर्थशास्त्र आणि २०० वेलींचे अर्थशास्त्र यात जमीनअस्मानचा फरक असतो.

**दोन गुंठे वांगी**

असाच नजरबंदीचा खेळ बिहारमध्ये काही मंडळींनी केला. कोरडवाहू जमिनीत २ गुंठे वांगी पिकवली आणि त्याच्या आधाराने एकरी साडेतीन लाख रुपये फायदा होऊ शकतो असा दावा मांडला. निसर्गशेतीचे प्रयोग करताना अर्थशास्त्राच्या नियमातून आपण सुटून जाणार आहोत अशी कल्पना कोणाही निसर्ग शेतकऱ्याने ठेवू नये.

एवढे सगळे सांगितल्यानंतर तरीही आता मी म्हणेन की, तीस वर्षांपूर्वी रासायनिक शेतीला पर्याय नव्हता. रासायनिक शेतीने जहाज ते रेशन दुकान ही परिस्थिती संपवली. आता काही फुरसत मिळाली आहे, उसंत मिळाली आहे, संकट टळले आहे, आता काही नवा मार्ग शोधण्याच्या कामास लागले पाहिजे.

**सम्यक पातळीवर निसर्गशेती**

स्वातंत्र्यानंतर अधिक धान्य पिकवा मोहीम हाती घेतली गेली. धान्य तर अधिक पिकवायचे, पण त्याचबरोबर शेतकऱ्यांची लूटही करायची, शेतीत भांडवल निर्मिती होणार नाही अशी व्यवस्था राबवायची हे सरकारी धोरण अमलात आणण्याकरिता पडीक जमीन लागवडीखाली आणण्याची मोहीम हाती घेण्यात आली. त्या काळात जमिनीचा तिसरा भाग तरी पाळीपाळीने

पडीक ठेवण्याची पद्धत होती, ती संपली. जैविक खतांसाठी जमिनीचा एक मोठा भाग राखून ठेवला जात असे, ती पद्धत बंद करून त्याही वावरांत शेती करायची असेल तर बाहेरून रासायनिक खते आणून टाकण्याखेरीज काही पर्यायच नव्हता. व्यापक प्रमाणावर निसर्गशेतीकडे वळायचे असेल तर आजच्या शेतजमिनीपैकी तिसरा भाग वने, कुरणे यांच्या वाढीसाठी नांगराखालून काढून घ्यावा लागेल. त्याचे आर्थिक परिणाम काय होतील, शेतीच्या स्तरावर काय होतील आणि देशाच्या स्तरावर काय होतील याचा अभ्यास झाला पाहिजे.

फळबागांच्या शेतीत झाडांच्या मधल्या जागेत उगवणाऱ्या पालापाचोळ्याने फळझाडांची खतांची पुष्कळशी गरज भागून जाते. धान्ये, कडधान्ये यांच्या शेतीत अशी काही शक्यता नाही. मग जैविक शेतीकडे वाटचाल करताना अन्नधान्य आणि कडधान्य यांच्या उत्पादनाकडे बऱ्याच अंशी पाठ फिरवणे अपरिहार्य होईल. हा मुद्दाही दृष्टीआड होता कामा नये.

सध्याची सर्व जैविक उत्पादने मलमूत्रादी उत्सर्जने पूर्णपणे वापरली तरी नत्र व स्फुरदाच्या आवश्यकतेची २० टक्केही पूर्ती संभव नाही असे काही तज्ज्ञ म्हणतात.

**उत्पादकतेची हरती शर्यत**

रासायनिक शेतीतील उत्पादनाइतकेच उत्पादन नैसर्गिक शेतीत होते असे मला अनेकांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. फारशा तपशिलात न जाता हा मुद्दा मान्य करण्यास मी तयार आहे; पण नैसर्गिक शेतीतील काही अतिरेकी, संकरित वाणाचे बियाणेसुद्धा स्वीकारण्यास तयार होत नाही. जैविक अभियांत्रिकीच्या नव्या युगात तयार होणाऱ्या नवीन वाणांच्या बाबतीत अशी स्पर्धा करणे निसर्गशेतकऱ्यांना शक्य होणार नाही. उत्पादनात पाच-पाच, दहा-दहा पटीचा फरक पडू लागला. त्याबरोबर नेमका पाहिजे त्या गुणवत्तेचा माल जैविक अभियांत्रिकीने तयार करता येऊ लागला तर नैसर्गिक शेतीस बाजारात टिकाव धरणे दुष्कर होईल.

**विज्ञानाचा पर्याय**

अन्नधान्याच्या स्वावलंबनाने काहीशी फुरसत मिळाली आहे. रसायनांवर मर्यादेबाहेर निर्भर राहण्याचे कटू परिणाम समजले आहेत. शेतकऱ्यांना लुटणारी 'नेहरू व्यवस्था' संपण्याची चिन्हे दिसत आहेत. अशा परिस्थितीत एका नव्या शेती तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. नवे तंत्रज्ञान विद्यापीठातून येण्याची शक्यता नाही. मोठमोठ्या कंपन्या त्यांची उत्पादने खपवण्याचा प्रयत्न करतील



आणि त्यांचा वापर हेच उच्च तंत्रज्ञान असे भासवतील. शेतकऱ्यांनी सावध राहिले पाहिजे. गंडादोरे विकणारे मांत्रिक, तांत्रिक, धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी शेतकऱ्याला घेरतील. कुणी त्याला सुबाभुळीचे बी विकेल, कुणी गांडुळे. या सगळ्यांपासून दूर राहून शेतकऱ्यांनी विज्ञानशेती करण्याची गरज आहे. विज्ञानशेती निसर्गशेती असेल किंवा नसेलही; आग्रह बुद्धी, अनुभव आणि तर्क यांच्या वापराचा पाहिजे. रसायनांचा आग्रह नको गोमूत्राचाही नको.

विज्ञान कोणा व्यक्तीस प्रमाण मानत नाही, कोणा ग्रंथासही प्रमाण मानत नाही; कोणा एका विचारप्रणालीलाही विज्ञान सदासर्वकाळ प्रमाण मानत नाही. सकल इंद्रियांचा जागरूकतेने वापर करून भोवतालचे जग कालच्यापेक्षा आज अधिक समजून घ्यावे; कणाकणाने आणि क्षणाक्षणाने ज्ञानाचे कण परिश्रमपूर्वक वेचावे आणि तरीही आपल्या निष्कर्षांबद्दल शंका बाळगावी विज्ञानाची प्रकृती आहे. पुरावा थोडा, श्रद्धा मात्र मोठ्या दाट हा धर्मवाद्यांचा स्वभाव. निसर्गशेतीच्या भक्तांनी विनाआधार श्रद्धा जोपासण्याचा मोह टाळला पाहिजे. विज्ञाननिष्ठेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्ञान हे पुढे जाणारे असते. मनुष्याची प्रगती होत आहे. भूतकाळात मागे जाऊन प्रगती होत नाही. रसायनांनी झटका दिला म्हणून पुन्हा एकदा खताच्या खड्ड्यात जाऊन बसले यात शहाणपण नाही.

**संचित अनुभवांची 'सीताशेती'**

जगभरच्या विज्ञानाच्या अफाट प्रगतीत भारतीय शेतकऱ्याचा पाय टिकेल काय? 'नेहरू व्यवस्थे'त संशोधनाच्या चोरीला प्रतिष्ठा आली, परदेशी पुस्तक नकलणारे शास्त्रज्ञ ठरले. नियोजन व्यवस्थेत आम जनतेचा प्रगत तंत्रज्ञानाशी संपर्क विद्यापीठातील विद्वान आणि पंडित यांच्या माध्यमातूनच शक्य होतो. इतकी वर्षे सरकार ठरवेल तेवढीच परदेशी संशोधनाची फळे लोकांपर्यंत पोचण्याची मुभा. खुल्या व्यवस्थेत आता शास्त्रीय प्रगती तुकाराम ग्यानबाच्या डोळ्यांर्यंत येणार आहे. पाश्चिमात्य पद्धतीच्या संशोधनाची त्याची अजूनही औकात तयार व्हायची आहे.

पण पिढ्यान्‌पिढ्यांच्या संचित अनुभवांचा त्याला मोठा आधार आहे. गावोगाव, घरोघरी कितीतरी अनुभवांच्या गोष्टी सांगितल्या जातात. झेंडूची फुले लावल्याने मिरचीवर रोग पडत नाही. तांबडा राजगिरा पेरला तर लव्हाळा हटतो, असा संशोधनाचा कच्चा माल आमच्याकडे उदंड आहे. या साऱ्या समजुती प्रयोगाने तपासून पाहाव्या लागतील. प्रयोगशीलतेतून शेतीचे नवे

विज्ञान आणि तंत्रज्ञान निघणार आहे; अंधश्रद्धेकडे जाऊन नाही.

**भविष्य मागे नाही, पुढे आहे**

शेती तंत्रज्ञानाची पुढील दिशा कशी असेल? मी एक विज्ञानकथांतल्या प्रमाणे स्वप्नरम्य कल्पना मांडतो. त्याने कल्पना स्पष्ट होईल. रसायनांचा जमिनीवर, पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो तो असंतुलित आणि वारेमाप वापराने. झाडांना गरज असते एक कणाची, आपण फवारतो दहा मण. दोष रसायनांचा नाही, अतिरेकी वापराचा आहे. वारेमाप वापर होतो, कारण झाडाची नेमकी गरज काय हे आम्हाला समजत नाही. अवकाश संशोधनाने आज हे तंत्रज्ञान माणसाला उपलब्ध होते आहे. झाडाला नेमकी पोषक द्रव्ये कोणती हवी, औषधांचा डोस किती हवा याचे अचूक मोजमाप गणकयंत्रावर मिळाले तर रसायनांची पुष्कळशी नासधूस उधळपट्टी थांबेल आणि रासायनिक शेतीचे भयानक परिणाम पुष्कळसे सुसह्य होतील.

या पलीकडे जाऊन वनस्पतींना पोषकद्रव्ये आणि औषधे नेमक्या आणि मोजक्या प्रमाणात देण्याची काही युक्ती सापडली तर माझी खात्री आहे, येत्या पंधरा-वीस वर्षांत एका काळी शेतकरी झाडांवर औषधांचा फवारा मारून झाडे न्हाऊन काढत होता या कल्पनेने लोकांना हसू येईल. माणसाला गोळ्यांनी, सुई टोचून किंवा शिरेवाटे सर्व पदार्थ पोचवता येतात तशी काही युक्ती वनस्पतींच्या बाबतीत शोधली गेली तर कदाचित एका गावात वापरल्या जाणाऱ्या रसायनांवर सर्व देशाची शेती होऊ शकेल. रसायनांच्या भयानक परिणामांवर तोड अशा वैज्ञानिक प्रगतीने निघेल, जुन्या काळात परत जाऊन नाही.

रसायनांचा असंतुलित व अतिरेकी वापर हा जमिनीकरिता विनाशकारक, शेतकऱ्याला तोटा देणारा आणि ग्राहकालाही अनिष्ट ही गोष्ट खरी; पण याचा अर्थ शेतकऱ्यांनी स्वयंभू किंवा स्वावलंबी खेड्यांमध्ये बिगरव्यापारी शेतीकडे वळायचे आहे, असे नाही.

**इतिहासाच्या निर्णायक पायरीवर शेतकरी**

तीन हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागला; शेतकऱ्यांच्या खळ्यावर धान्याची रास जमू लागली; पोटापाण्याच्या दंडबेड्यांतून मनुष्यप्राण्याची सुटका होईल आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी, 'स्वातंत्र्याच्या कक्षा' विस्तारण्यासाठी तो मोकळा होईल अशी अशा वाटत होती, ती आशा खोटी ठरली. शेतीतील वरकड उत्पन्नाची लूट चालू झाली ती आजतागायत चालू



राहिली. लुटारू आले, राजेमहाराजे आले, सावकार, जमीनदार आले, गोरे इंग्रज आले, काळे इंग्रज आले, शेतीची लूट चालू राहिली. शेतीच्या लुटीचे युग संपत आले आहे. मॉस्कोचा पाडाव झाला आहे. नेहरूवाद मिटला आहे. जगभर व्यक्तिगत आर्थिक प्रेरणांचे महत्त्व मानले जात आहे.

सर्वसामान्यांना काही समजत नाही; आम्ही दुढ्ढाचार्य सांगू त्याप्रमाणे त्यांनी करावे; त्यातच त्यांचे कल्याण आहे असे उद्‌घोषणाऱ्या 'प्रेषितां'चा पराभव झाला आहे. नियोजन मंडळात नाही, बाजारपेठेतच सर्वोत्तम निर्णय होतात. छोटी छोटी माणसे आपापल्या कच्च्याबच्च्यांच्याकरिता धडपड करता करता साऱ्या जगाचे कल्याण साधतात. ब्रह्माचे हित आणि पिंडाचे हित एकच आहे, त्यांत तफावत नाही या अद्वैताचा विजय होतो आहे.

हिंदुस्थानातही एक नवा शेतकरी उदयाला येतो आहे. शेती ही त्याची जीवनशैली नाही; त्याचा व्यवसाय आहे. तो केवळ शेतकरी नाही; व्यापारीही नाही; तो सर्वार्थाने उद्योजक आहे. डोळे सताड उघडे ठेवून तो आपली उद्योजकता गाजवणार आहे. रासायनिक शेतीचे त्याला प्रेम नाही. तिला घाबरून धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी आणि इतर हौसे गवसे नवसे यांच्या कच्छपिला तो जाणार नाही. त्याचा शोध विज्ञानाचा असेल, त्याचे निष्कर्ष प्रयोगाने ठरतील. उद्योजक शेतकऱ्याची शेती विज्ञानशेती असेल. जगभर विज्ञान, विशेषत: जैविकशास्त्रे 'हनुमान झेपा' घेत उंचावत आहे. उद्योजक शेतकऱ्याचा आधार हे विज्ञान आहे. निसर्गशेती, जैविक शेती, पर्यावरण शेती इत्यादी इत्यादी पद्धती विज्ञान स्वीकारतील आणि अर्थकारण मानतील तितक्याच प्रमाणात उद्याच्या उद्योजक शेतकऱ्याला मान्य होतील अन्यथा नाही.

(शेतकरी संघटक, २१ एप्रिल १९९४)

■

तेरा

# गोवंश हत्याबंदी नव्हे? 'गो'पाल हत्या

गोवंश हत्याबंदी कायद्यासंबंधीचे बिल विधानसभेत मांडण्यात आले. त्याला काही विरोधकांनी काही दुरुस्त्या सुचविल्या, बिल मागे घेण्यात आले; पण बहात्तर तासांच्या आत सर्व नियमांचा अपवाद करून ते पुन्हा विधानसभेसमोर ठेवण्यात आले. एवढेच नव्हे तर द्विभार्या प्रतिबंधक कायद्याबरोबर घाईघाईने संमतही करण्यात आले.

बहुपत्निकत्वाची चाल किंवा समान नागरी कायदा हे विशेषत: स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय; पण गाय, बैल, गोऱ्हे यांच्या हत्येला बंदी करणारा कायदा हा केवळ शेतकऱ्यांच्याच नव्हे तर सर्व देशाच्याच अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. म्हणून त्याविषयी थोडे तपशिलात जाऊन विचार करणे आवश्यक आहे.

तथाकथित 'हिंदू' वादळामुळे शिवसेना-भाजपा युती सरकारच्या विरोधकांची मोठी त्रेधा उडाली आहे. 'हिंदू' मनाला गुदगुल्या करून झुणका-भाकर आणि स्वस्त घरे असला धर्मादाय आर्थिक कार्यक्रम. यामुळे, विरोधकांना काय युक्तिवाद करावा तेच समजेनासे झाले आहे. जनावरांच्या संरक्षणाकरिता मांडलेल्या विधेयकाच्या सर्व विरोधकांनी मिळून दुरुस्ती सुचविली. विरोधकांच्या सूचनेनुसार, एखादी गाय-बैल दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझ्यासाठी किंवा शेतीमालासाठी उपयोगी राहली नाही तर मालकाने जिल्हाधिकाऱ्यांकडे ते जनावर बाजारभावाने विकत घेण्यासाठी अर्ज करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी अर्जाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत मोबदला द्यावा अशी त्यांची अजागळ सूचना होती. म्हणजे, थोड्यच दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमुख काम भाकड गायीबैल विकत घेणे आणि त्यांना सांभाळत बसणे हे झाले असते. या असल्या कार्यक्रमात पैसे खाण्याची प्रचंड संधी जिल्हाधिकारी व्यवस्थापनास



मिळाली असती. भाकड जनावरे सांभाळण्याचे एक प्रचंड खातेच तयार झाले असते; पण असा विचार करण्याची विरोधकांना ना कुवत, ना फुरसत!

दलित चळवळीतील एक कार्यकर्ते माझ्याशी चर्चा करण्यासाठी आले होते. या विधेयकाला विरोध करण्यासाठी मुस्लिम-दलित संयुक्त आघाडी उभी करण्याचा प्रयत्न होतो आहे आणि गायींचे संरक्षण हा सरसकट सगळ्या हिंदू समाजाचा कळकळीचा विषय नाही हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न होणार आहे. राम आणि शंबूकाची आणखी एक लढाई या विषयावर होऊ शकते.

शिवसेना-भाजपाच्या कायद्याला विरोध करायचा हे ठरले; पण त्यासाठी युक्तिवाद काय करावा? याबाबत मात्र सन्माननीय दलित कार्यकर्त्यांच्या मनात मोठा गोंधळ दिसला. एरवी मांग, महार, ढोर चांभार इत्यादी जातींना गाववहिवाटीने त्यांच्यावर लादलेली बलुतेदारीची कामे नाकारण्याचे आवाहन करणारी दलित नेते मंडळी आता एकदम तोंड फिरवून उलटे बोलू लागली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कायद्यामुळे दलितांच्या वंशपरंपरेने चालत आलेल्या पोटापाण्याच्या व्यवसायावर गदा येईल व भारतीय संविधानात दिलेल्या मूलभूत हक्कांच्या हे विरोधात आहे अशी काहीशी वेडगळ मांडणी नेते करीत होते. व्यवसाय-स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क हा निखळ विनापवाद नाही. घटनेने याविषयी काही अपवादही ठरवले आहेत याची त्यांना माहिती दिसली नाही. आदिवासींच्या मागासलेपणाविषयी अश्रू ढाळावेत आणि एखाद्या प्रकल्पात त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता पडली तर आदिवासींच्या 'निसर्गरम्य' जीवनाचा अंत होत असल्याबद्दलदेखील नक्राश्रू ढाळावेत, तसाच हा प्रकार.

दलित नेत्यांनी आणखी एक अजब युक्तिवाद मांडला. गोमांस भक्षण फक्त मुसलमानच करतात असे नव्हे, मागासलेल्या जमातीतील अनेक गोमांस भक्षण करतात. त्यांच्या परंपरागत जेवणाच्या सवयीवर या कायद्याने आघात होत आहे असाही आक्रोश नेत्यांनी केला. या कायद्याने गोवंशाच्या मांसाच्या भक्षणावर बंदी घातलेली नाही. ज्यांचे त्याखेरीज चालूच शकत नसेल त्या लोकांना गोमांसाची आयात शेजारच्या राज्यातून करण्यास आजतरी कोणतीही बंदी नाही. भारतात आज गोमांसाचा भाव सगळ्यात स्वस्त आहे, ते एकदम महाग होईल हे खरे; पण भोजनस्वातंत्र्यावर निर्बंध आले असा घटनात्मक मुद्दा काढणे हास्यास्पद आहे.

गोवधबंदीसाठी अनेक वर्षे अनेकांचे प्रयत्न चालू आहेत. गायीच्या वधावर यापूर्वीही बंदी होती. आता वळू, बैल, गोऱ्हे यांच्या वधावरही बंदी येत आहे

एवढाच काय तो फरक. पूर्वी जनसंघाने या विषयावर दिल्ली राजधानीत मोठा धुमाकूळ घातला होता. बजाज परिवाराच्या आग्रहापोटी पूज्य विनोबाजींनीही गोवधबंदीसाठी प्राणांतिक उपोषण मांडले होते. गोवधासंबंधी बोलताना बंदी कायद्याच्या पुरस्कर्त्यांच्या मनात प्रामुख्याने देवनारसारख्या कत्तलखान्यात किंवा इतरत्र कसायाच्या सुरीने होणाऱ्या कत्तलीचेच चित्र असते. कत्तलखान्यातील कसायाच्या सुरीपासून गोवंश वाचवला की जिंकलो असा त्यांचा विचार असतो.

गायीचे रक्षण म्हटले की त्यांच्या नजरेसमोर एक वशिंडाची 'धेनू' किंवा 'नंदी'गायच असते. युरोपमध्ये, भारतीयांना परिचित व पूज्य असलेल्या एक वशिंडाच्या या गाईला'झेबू' किंवा 'ब्राह्मण गाय' असे म्हणतात. भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रात आता संकरित गायींचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी सरसावलेल्यांच्या मनात सपाट पाठीची, बिनवशिंडाची होल्स्टीन फ्रिझन किंवा जर्सी संकरित गाय त्या वंशात मोडते किंवा नाही कोणास ठाऊक! पण गाय माता मानली तर संकरित गाय निदान मावशी मानणे योग्य होईल. महाराष्ट्र शासनाच्या कायद्यात नुसते गाय किंवा बैल म्हटले आहे; संकरित गायींचा काही अपवाद केलेला नाही. गोरक्षकांची इच्छा नंदी गायींचे आणि त्याबरोबरच संकरित गायींचेही संरक्षण करण्याची असावी.

व्यवहारात परिस्थिती अशी आहे की कत्तलखान्यांपेक्षा शेतकऱ्यांच्याच घरी अधिक गोवंशाचा उच्छेद होतो. एका यशस्वी दूध व्यावसायिकाने मला स्पष्ट सांगितले की, दुधाचा धंदा फायद्याचा व्हायचा असेल तर संकरित गोऱ्ह्याला एक दिवसही दूध पाजणे परवडणार नाही. एवढेच नव्हे तर संकरित गाय तीन दिवस कोण्या आजाराने बसून राहिली तर त्यानंतर तिला गोठ्यात ठेवणे परवडणारे नसते.

आणीबाणीच्या काळात गायींसाठी कर्जे देण्याची टूम निघाली होती. पहिल्या वितीनंतर दूध थांबले आणि गर्भधारणा लांबली की तिला खाऊ घालणे परवडत नाही आणि पोराबाळांच्या तोंडचा घास काढून गाय जोपासणे कठीण जाते. या कारणास्तव गायीला जाणूनबुजून संपवण्यात येत होते. विमा कंपन्यांकडून भरपाईची रक्कम घेण्यासाठी गायीची शिंगे मृत्यूचा पुरावा म्हणून दाखवावी लागत. एकट्या धुळे जिल्ह्यात एक पुरे गोदाम शेतकऱ्याच्या घरी मेलेल्या (!) गायीच्या शिंगांनी भरलेले, विमा कंपनीच्या निरीक्षकाच्या फुरसतीची



वाट पाहत पडलेले होते.

गोवंशाचे संरक्षण म्हटले की केवळ कसाई-कत्तलीवर बंदी नाही. कसाईबंदीचा उपयोग कोणा जमातीला खिजवण्यासाठी होत असेल; पण त्यामुळे गायींना मारण्याचे थांबणार नाही. कायद्याने बंदी घालून आजपर्यंत कोणतीच सुधारणा झाल्याचा दाखला नाही. १८ वर्षांखालील मुलींची लग्ने सर्रास होतात. नवविधवा सती जात असल्याच्या बातम्या अजूनही येतात. दारूबंदी पोलिस खात्यालाच संपवून गेली आणि अफू-गांजावरील बंदीतून बाबा-महाराजांचे आश्रम आणि खलिस्तानसारख्या विभाजनवादी चळवळी निघाल्या. नवीन कायद्याने गोवंशाचे संरक्षण होणार अशी कायदा करणाऱ्यांचीही कल्पना नसावी. मुसलमानांच्या नाकावर टिच्चून कायदा केला एवढेच समाधान त्यांना पाहिजे असेल तर त्यांना ते नाकारता येणार नाही.

गोसंरक्षकांची विचारपद्धती किंवा निदान प्रचारप्रणाली काहीशी विचित्र आहे. गायीचा विषय निघाला की ते काव्यमय भाषेत बोलू लागतात. गाय माता आहे, गोवंशाच्या अध:पतनामुळे देशाचा अध:पात झाला, 'गाय मरी तो बचा कौन?' असे मोठ्या निष्ठेने ते मांडतात. भारतीय गायीत काही अद्‌भुत गुण आहेत. तिच्या श्वासोच्छ्वासातून प्राणवायू बाहेर पडतो. तिच्या शेणात आणि मुतात काही विलक्षण पोषक, कीटकनाशक, आरोग्यदायक, आत्मसंवर्धक गुण आहेत असे ते विज्ञानातील अर्धेकच्चे संदर्भ देऊन सांगू पाहतात. खत म्हणूनसुद्धा गायीच्या शेणमुताची मातबरी इतर कोणत्याही जनावराच्या उत्सर्जनापेक्षा जास्त आहे असे आग्रहाने सांगतात. गाय आणि बैल यांचे शेतीला महत्त्व किती प्रचंड आहे आणि गोरक्षण व गोसंवर्धन एवढ्या एकच कलमी कार्यक्रमाने देश सुखी आणि समृद्ध होणाची ते खात्री सांगतात.

बऱ्याच वर्षांपूर्वी राधाकृष्णजी बजाज या विषयावर चर्चेसाठी मला भेटले होते. त्यांचे सगळे वैज्ञानिक-अर्थशास्त्रीय विवेचन ऐकल्यानंतर मी त्यांना प्रश्न केला, 'राधाकृष्णजी, तुम्ही हिंदू म्हणून जन्मला नसता तर या कामाचा प्रचार इतक्या हिरीरीने केला असतो का?' बाकी काही असो, माणूस प्रामाणिक. त्यांनी कबूल केले की जन्माने मिळालेल्या सवर्ण सांस्कृतिक वारशाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आहे.

पाँडिचरी येथील अरविंद आश्रमामध्ये नैसर्गिक शेतीचा मोठा व्यापक प्रयोग चालला आहे. त्याची पाहणी करत असताना तेथील प्रमुखांच्या तोंडी गायीचे शेण, गायीचे मूत हे शब्द वारंवार येऊ लागले; तेव्हा त्यांनाही मी

प्रश्न केला आणि बरेचसे आढेवेढे घेऊन का होईना त्यांनी सांस्कृतिक वारशापोटी गायीची भलावण करत असल्याची कबुली दिली.

सर्वच जनावरे उपयुक्त पशू असतात; गाय हा विशेष उपयुक्त पशू. गाईच्या चेहऱ्यावरील अभिव्यक्ती आणि पाणीदार डोळ्यांतील भावना मानवी अभिव्यक्तीशी अधिक जुळणाऱ्या. तिचे दूध मनुष्यप्राण्याच्या बाळांना सहज मानवते. हे सगळे खरे असले तरी जगातील सर्व देशांत गायीविषयी भावनिक जवळीक फारशी नाही. फ्रेंच भाषेत कोण्या स्त्रीला गायीची उपमा देणे हेटाळणीदाखलच होते.

सहृदयतेच्या कारणाने किंवा अगदी अर्थशास्त्राच्या आधाराने कोणत्याही प्राण्याचा वध करू नये असे मांडता येईल; पण व्यवहारी हिशेबापोटी असावे, अगदी गांधीवादीसुद्धा अहिंसेचा आग्रह धरताना सर्व पशूंच्या कत्तलीवर बंदी घालावी अशी मागणी करण्याचे धाष्टर्य करीत नाहीत. त्यांची करुणा गायीपुरतीच मर्यादित राहते!

विज्ञानाचा किंवा अर्थशास्त्राचा आधार गोवंश रक्षणासाठी आवश्यक आहे असे मला वाटत नाही. मनुष्य, व्यक्ती काय किंवा समाज काय, सर्वच काही शुद्ध तर्काने चालत नाहीत. विज्ञानाच्या शिखरावर पोहोचलेली राष्ट्रे पंख असलेले घोडे आणि शिंग असलेले सिंह आपल्या राजमुद्रांवर मिरवतात. गायीविषयीचा पूज्यभाव सर्वसाधारण समाजात आहे, एवढे पुरे आहे. कोणतीच पूज्य भावना विचक्षणेस उतरू शकत नाही. गायीच्याच बाबतीत अशी विचक्षणा का करा? सर्वसामान्य समाजाला गाय मारली जाऊ नये असे वाटत असेल तर तसा कायदा करण्याचा त्यांना अधिकार आहे, गायीच्या श्वासात प्राणवायू आहे आणि प्रत्येक गाय 'कामधेनू'च असते असला अवास्तव कांगावा करण्याची काहीच आवश्यकता नाही.

गायीविषयी प्रेम, आदर आणि करुणा भारतीय साहित्यात पूर्वापार आढळते. याउलट, बैल यज्ञयागात बळी देण्याची प्रथा वेदकालीन आहे आणि बळी दिलेल्या बैलांचे मांस हे ऋत्विजांचे शास्त्रोक्त खाद्य आहे. गोरक्षणाची परंपरा आहे तशी बैल आणि वळू यांच्या रक्षणाची परंपरा भारतीय इतिहासात नाही; पण आधुनिक हिंदुत्वावाद्यांना त्यासाठी आवश्यक ते जनसमर्थन आहे असं वाटत असल्यास त्यांना कोण आणि कसे थांबवणार?

गायींचे संवर्धन आणि त्यांचे रक्षण यावर पुष्कळसे काव्य मी ऐकले होते. मध्य प्रदेशातील छत्तरपूर मुक्कामी गांधी स्मारक आश्रमात मुक्कामास असताना



एका सर्वोदयी नेत्याने या विषयावर चांगले तास दोन तासांचे प्रवचन ऐकवले होते. ते गेल्यानंतर शेतकरी संघटनेच्या बैठकीस सुरुवात झाली. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांसमोर मी शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर आधारित रास्त भावाचे विस्तृत निरूपण केले. शेतीच्या आणि गरिबीच्या सर्व समस्यांचे एक सूत्र रास्त भाव आहे आणि सर्व प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली रास्त भाव आहे हे सांगितले. त्यानंतर एका शेतकरी कार्यकर्त्याने उठून म्हटले, 'शरदजी, तुमचा मुद्दा आम्हाला पटला. तुमच्या आंदोलनात आम्ही जरूर सामील होऊ; पण येथे मध्य प्रदेशात आमच्यापुढे त्याहीपेक्षा एक मोठी समस्या आहे. गावोगावी भाकड गायींचे कळप संख्येने वाढत चालले आहेत. त्यांना पोसण्याची जबाबदारी साऱ्या गावाची. त्यांनी कोठे तोंड लावले तर त्यांना हुसकतासुद्धा येत नाही; लाठी चालवणे दूरच राहिले. कुंपण नसले तर कळपच्या कळप शेतात घुसून पिकाची धूळधाण करतात. शरदजी, हमे गायसे बचाओ, वाजिब दामका मामला हम निबट लेंगे ।' शेतकऱ्यांच्या मनातील भावना आणि शेतकऱ्यांचे नाव पुढे करून बोलणाऱ्यांचे युक्तिवाद यातील तफावतीने मला मोठा धक्का बसला.

महाराष्ट्रात काही जिल्हे सोडल्यास असे मोकाट जनावरांचे कळप नाहीत; पण तरीदेखील दावणीला असलेल्या जनावरांची संख्या सारखी घटत असते हे रहस्य समजून घेण्यासाठी सोळा-सतरा वर्षांपूर्वी आम्ही बैलाचा उत्पादनखर्च काढण्याचा उपद्व्याप केला होता. जन्मल्यापासून अडीचतीन वर्षे गोऱ्ह्याला चांगले पोसावे तेव्हा तो कामास येतो आणि वय झाल्यानंतर जुवाखालून निघाल्यानंतर चारपाच वर्षे तरी बैलाला तसेच पोसावे लागते. मधल्या सात-आठ वर्षांच्या काळात तर त्यांच्या पोषणाचा खर्च खूपच वाढतो. पेंड, वैरण, हिरवा चारा काहीच तोडता येत नाही; नाहीतर शेतीची कामे होतच नाहीत. सतरा वर्षांपूर्वी बैलाच्या आयुष्यात दर दिवशी त्याच्या खाण्याचा खर्च २८ रुपये येतो, असा निष्कर्ष निघाला. शेतातले गवत असले तरी ते काही फुकट नाही, तेही विकतच घेतले आहे असे गृहीत धरून हा हिशेब काढला होता. आयुष्यभर, वर्षभर दरदिवशी २८ रुपये खर्चून पोसलेल्या बैलाचा उपयोग त्याच्या उमेदीच्या वर्षात दरवर्षी जास्तीत जास्त ४० दिवस असतो. त्याकाळी भाड्याने बैलजोडी ३०रु. ने मिळत असे. बैल ठेवणारा शेतकरी शेतीतून सहीसलामत जगण्यावाचण्याची शक्यता शून्य. त्याच्या शेणामुतामुळे होणारा फायदा लक्षात घेऊनही बैल ही न परवडणारी गोष्ट आहे असा निष्कर्ष निघाला.

तात्पर्य, बैल शेतकऱ्याला खातो!

भारतात पवित्र मानली जाणारी एक वशिंडाची नंदी गाय. हिच्यात काही विशेष गुण आहेत यात काही शंका नाही. ती बिचारी काहीच मागत नाही. अगदी दुष्काळाच्या काळातही जमिनीवर आलेले पेरभर वाळकेसाळके गवत खाऊन ती स्वत: गुजराण करते आणि जमेल तसे म्हणजे अर्धा लिटर, लिटर दूध कसोशीने देते. भारतातील शेतकरी Serviva‍l technology (जगून वाचून राहण्याचे तंत्रज्ञान) वापरतो. ही भारतीय शेतकऱ्याची श्रेष्ठता, तसेच त्याची गाय दुष्काळात, इतर कोणत्याही बिकट परिस्थितीत ती टिकून राहते हा तिचा मोठा गुण! नंदी गायीची बहीण संकरित गाय. तिच्या खाण्यापिण्यात आठवडाभर हयगय झाली तर ती कायमची खराब होते. नंदीगायीच्या असल्या मिजाशी नाही. हे तिचे कौतुक.

पण, 'ब्राह्मण गायी'च्या या विशेष गुणाचा एक मोठा विपरीत परिणाम दिसून येतो. गायीची ही झेबू जात जगाच्या पाठीवर प्रामुख्याने भारतीय उपखंड आणि एका काळी त्याला संलग्न असणारा आफ्रिकेचा पूर्व किनारा येथेच सापडते. म्हणजे, या गायीचा राहण्याचा प्रदेश बांगला देश, भारत, पाकिस्तान, इथिओपिआ, टांझानिया आणि केनिया. आश्चर्याची गोष्ट अशी की नेमके हेच देश जगात सर्वांत दरिद्री राहिले आहेत. सपाट पाठीच्या गायींचे देश वैभवाच्या शिखरावर आहेत. म्हशी बाळगणारे थायलंड, कंबोडिया, मलेशियासारखे देश खाऊन पिऊन सुखी आहेत. वशिंडाची ब्राह्मण गाय साऱ्या देशाची लक्ष्मी फस्त करून टाकते याचा हा सज्जड पुरावा आहे.

याचा अर्थ गोवंशाच्या कत्तलीस बंदी करू नये असा नाही. अशा बंदीमुळे देशात चैतन्य पसरणार असेल, लोकांना काही आत्मिक समाधान लाभणार असेल तर असे अवश्य केले पाहिजे. फक्त, वाचलेल्या गायींचे सड एकाकडे आणि खायचे तोंड दुसऱ्याकडे अशी विभागणी करून चालणार नाही. गाय आमची आई आहे, ती भली तोट्याची असो तिला शेवटपर्यंत सुखाने पोसण्याचा आमचा निर्धार आहे. त्यासाठी काहीही किमत द्यावी लागली तरी चालेल असा जेथील आम जनतेचा निर्धार आहे, तेथे कत्तलीस बंदी जरूर झाली पाहिजे; पण बंदीमागोमाग इतरही काही पावले घेतली पाहिजेत. गायीची उत्पादकता सात-आठ वर्षे आणि आयुष्यमान बारातेरा वर्षे अशी परिस्थिती या कायद्याने तयार होईल. भाकड काळात गायीला पोसायचे कोणी? शहरी धर्ममार्तंडांनी गोपूजनाच्या गोलमाल गोष्टी सांगायच्या आणि तिला पोसायचे



ओझे मात्र शेतकऱ्याने घ्यायचे अशी व्यवस्था टिकू शकणार नाही. कत्तलखान्यातील कत्तली थांबतील, पण शेतकऱ्याच्या घरची हेळसांड थोडीच थांबणार आहे? कत्तलीवर बंदी घातली तर मेलेल्या जनावरांचा उपयोग करण्यात आला असे नाटक सहज वठवता येईल. मग, गाय-बैल खरोखरच नैसर्गिकरीत्या मेले की खाण्यापिण्याची हेळसांड झाल्यामुळे मेले की औषध घालून मारले गेले याची प्रत्येक वेळी चौकशी करावी लागेल. प्रत्येक गाय-बैलाचे शवविच्छेदन करावे लागेल. शेतकऱ्यांना कचाट्यात पकडून त्यांच्याकडून आणखी दक्षिणा उकळू पाहणाऱ्या नोकरशहांची आणखीच चंगळ होईल.

गोवंश हत्याबंदी पशुपालनाच्या सर्व सिद्धांताविरुद्ध आहे. गायीचा गोठा किफायतशीर व्हायचा असेल तर पुऱ्या कळपातील गायींची दररोजच्या दुधाची सरासरी ८ लिटर तरी असली पाहिजे. म्हणजे, वीतानंतर वीसबावीस लिटरपेक्षा कमी दूध देणारी गाय आर्थिकदृष्ट्या निव्वळ बोजा आहे. चांगल्या चांगल्या गायींचे संवर्धन आणि कमअस्सल गायींना गोठ्यातून काढणे ही दूधउत्पादनातील आणि यशस्वी पशुसंवर्धनातील गुरुकिल्ली आहे. त्यांचा मान राखला नाही तर काय होईल? गायींची पूजा करणाऱ्या भारतातील गायी सर्वात कमअस्सल आणि जेथे गाय खाल्ली जाते तेथे गायीच्या सर्वोत्कृष्ट जातींचे संवर्धन असे विचित्र दृश्य चालूच राहील.

पण हे सर्व बाजूला ठेवून, भावनेपोटी, गायीची कत्तल होता कामा नये असा आग्रह धरण्यात चूक काही नाही. तसे करायचे ठरले तर येथील दुधाची किंमत जगातील इतर देशांच्या तुलनेने निदान दुप्पट राहील. ती देण्याची तयारी, गायीविषयी पूज्य भावना बाळगणाऱ्यांनी ठेवली पाहिजे. 'तुम्ही गायी सांभाळा आम्ही वसूबारसेला हळद कुंकू वाहू' असली दांभिकता काय कामाची?

(शेतकरी संघटक, २१ ऑगस्ट १९९५)

■

चौदा

# पीकविम्याचा भूलभुलैय्या

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकीय पक्ष आपापल्या जाहीरनाम्यांमध्ये वेगवेगळी आश्वासने देतात. याहीवेळी पुढाऱ्यांनी मोठ्या चपलतेने आपापल्या पक्षाच्या जाहीरनाम्यांत एक कलम घुसडले आहे. 'शेतीकरिता व्यापक पीक विमा योजना तयार करणे आणि अमलात आणणे हे आमच्या पक्षाचे धोरण आणि कार्यक्रम आहे' असे जो तो पक्ष म्हणून लागला. हे उत्तर तद्दन फसवे आहे; खोटे आहे. पुढाऱ्यांना शेतकऱ्यांचा प्रश्न समजलेला नाही. ते काहीतरी थातूर मातूर उत्तर देऊन पळवाट काढत आहेत हे बहुतक शेतकऱ्यांना कळत होते; पण पुढाऱ्यांच्या खोटेपणाचे माप त्यांच्या पदरात पुरेपूर घालणे निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात आणि पुढाऱ्यांच्या वेगवान दौऱ्यांच्या कार्यक्रमात शक्य झाले नाही. त्यामुळे विमा हा शेतीच्या आजारावर एक महत्त्वाचा औषधोपचार आहे असा एक समज रूढ होऊ पाहत आहे. कोणत्याही कारणाने का होईना, शेतकऱ्यांची पिके बुडाली किंवा त्यांचे नुकसान झाले तर शेतकऱ्यांनी काय करावे? सरकार तर काखा वर करून 'आमची इच्छा फार आहे हो पण पैसे आणावे कोठून?' असे जाहीर करते. पीक-विमा असला तर विमा कंपनी नुकसानभरपाईची पुरी रक्कम शेतकऱ्यांना देईलच. म्हणजे शेतकऱ्यांचे पुरे दु:खहरण झालेच. अशी आशा शेतकऱ्यांच्या मनात चमकून गेली. पीक विमा योजना तयार करण्यात पुढाऱ्यांचा डाव काय? नोकरशहांचा स्वार्थ काय? आणि या योजनेत शेतकऱ्यांवर काय परिणाम होणार? याबद्दल मोठा गोंधळ जाणकार विद्वानातही आढळून येतो.

**असमानी-सुलतानी-दुश्मनीला विमा नसतोच**

एखाद्या वर्षी दुष्काळच पडला, पाऊस पडलाच नाही; पिके सपशेल बुडाली, जनावरांना चारा राहिला नाही म्हणून ती रस्त्यारस्त्यावर पटापट मरून



पडू लागली तर हे एक असमानी संकटच म्हणायचे! दुष्काळाच्या वर्षीची नुकसानीची भरपाई करून देणे कोणा सरकाराला शक्य नाही. कोणी विमा कंपनीही एवढे ओझे उचलू शकणार नाही. दुष्काळाच्या वर्षी हवालदिल शेतकऱ्यांची माफक अपेक्षा असते, यंदाचे वर्ष काहीही करून पार पडेल असे मायबाप सरकारने काही करावे आणि शेतकऱ्यांना जगवावे; त्यासाठी रस्त्याची खडी फोडण्याची, रोजगार हमीची, वाटेल ती कामे काढावीत, जनावरांना चारापाणी आणि माणसांच्या पोटाला भाकरी मिळेल असे काहीतरी करून शेतकऱ्यांना जगवावे!

याउलट, पाऊस अतोनात झाला, महापूर आला, पिकेच्या पिके वाहून गेली, गावे, घरे वाहून गेली, माणसे गेली, गुरे ढोरे गेली, अशा अस्मानी संकटातदेखील संपूर्ण भरपाई करणे सरकारलाही शक्य होणार नाही आणि कोणा विमा कंपनीलाही शक्य होणार नाही. अशा महापुराच्या काळातही शेतकऱ्यांची अपेक्षा एवढीच असते की, सरकारने काही मदतीचा हात पुढे करावा. गेलेली माणसे, पिके, जनावरे यांची भरपाई काही पैशाने होत नाही; पण वाचलेल्यांना निदान पुढील वर्षापर्यंत तगून राहता येईल अशी व्यवस्था मायबाप सरकारने करावी.

दुष्काळ, महापूर, भूकंप, शत्रूचा हल्ला, बॉम्ब हल्ल्याने होणारी नासधूस या असल्या आपत्तीत नुकसानभरपाईचा किंवा विम्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही. अशा संकटात राजाने मदत करावी ही रयतेची अपेक्षा हजारो वर्षांपूर्वीही होती आणि आज जनताही लोकनियुक्त शासनांकडून एवढची माफक अपेक्षा ठेवते. दुनियाभरच्या विमा कायद्यात आसमानी संकट आणि दुश्मनी संकट यांबद्दल नुकसान भरपाई देण्याच्या जबाबदारीतून विमा कंपन्यांना सूट दिलेली आहे. सरकारच्या धोरणांमुळेच शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्याबद्दलही कोणतीही विमा कंपनी जबाबदारी स्वीकारणार नाही. उदा. कांद्यातून उत्पन्न बरे मिळावे अशा हिशेबाने शेतकऱ्याने कांद्याचे क्षेत्र वाढवले; पण शासनाने निर्यातीवर बंदी घातली, आयात करून मालाचे भाव पाडले किंवा अध्यादेश काढून कमाल किमती ठरवून टाकल्या आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर नुकसानभरपाईची जबाबदारी कोणतीही विमा कंपनी घेणार नाही. थोडक्यात असमानी, दुश्मनी आणि सुलतानी या तीनही महासंकटांच्या प्रसंगी पीक विमा योजनेचा काहीही उपयोग असणार नाही.

**'सामूहिक कर्जविमा' योजना**

म्हणजे, राहता राहिलेली पीकबुडीची कारणे कोणती? पाऊस थोडाफार अनियमित झाला, रोगराई आली, बियाणे अपेक्षेप्रमाणे उगवले नाही, फुलले नाही, फळले नाही आणि अशा कारणांमुळे पिकांचे नुकसान झाले, म्हणजे विमा कंपनीने ठरविलेल्या पातळीपेक्षा कमी उत्पादन झाले तर अशाप्रकरणी विमायोजना लागू होऊ शकते.

पीकविमा योजना म्हणजे अगदीच काही नवीन अफलातून कल्पना नाही. एक प्रकारची पीक विमा योजना आजही देशात काहीकाही तालुक्यांत, जिल्ह्यांत अमलात आहे. एका राष्ट्रीयीकृत सर्वसाधारण विमा कंपनीच्या सहकार्याने सरकारने या योजना चालवल्या आहेत. खऱ्या अर्थाने पाहिले तर त्यांचे 'पीक-विमा योजना' हे नामाभिधान गैरलागू आहे. योजनेचा आराखडा पाहिला आणि अंमलबजावणी पाहिली तर तिला 'सामूहिक पीक कर्ज विमा योजना' असे नाव देणे अधिक संयुक्तिक ठरेल. या योजनेत विमा कोणाही शेतकऱ्यास त्याच्या इच्छेप्रमाणे उतरवता येत नाही. काही तालुक्यांत काही पिकांसाठीच केवळ विमा योजना लागू झाल्याचे सरकार जाहीर करते. अशा प्रदेशात विमा योजना लागू असलेले पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी पीककर्ज घेतात त्यांना ही विमा योजना आपोआप लागू होते. कर्ज देतानाच विम्याच्या हप्त्यापोटी काही रक्कम कापून घेतली जाते. हप्त्याचा काही बोजा सरकार स्वत: उचलते.

विमा क्षेत्रातील विमा पीक विमा योजनेने ठरविलेल्या पातळीपेक्षा कमी आले तर त्या क्षेत्रातील सर्व पीककर्जदारांना कर्जाच्या रकमेतील नुकसानीच्या टक्केवारीनुसार काही रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळते. साऱ्या तालुक्यात पीक बरे आहे पण एका शेतकऱ्याच्या शेतात मात्र पीक फसले असे घडले तर नुकसानग्रस्त शेतकऱ्याला काहीही भरपाई मिळत नाही. योजनेची अंमलबजावणी मोठी तर्कटी आणि विचित्र होते. एका वर्षी पावसाच्या सुरुवातीस सौराष्ट्रातील शेतकऱ्यांनी कापसासाठी पीककर्जे घेतली, विम्याचा हप्ता भरला, बियाणे खरीदी केले; पण पाऊस झालाच नाही. पाऊसच नाही तर पेरणी करण्यात काय अर्थ आहे म्हणून त्यांनी पेरणी केलीच नाही. सरकारने नुकसानभरपाई नाकारली. पेरणीच केली नाही तर पिकाच्या नुकसानीचा प्रश्नच कसा उद्‍भवतो? थोड्या हमरीतुमरीनंतर, ज्यांनी बियाणे निदान शेतात टाकून दिले होते त्यांना काही प्रमाणात नुकसानभरपाई मिळाली, बाकीच्यांना नाही. नाशिक जिल्ह्यात याच्या उलट घडले. पीक फारसे समाधानकारक नव्हते; पण अगदी वाईटही नव्हते.



तरीही एका दिवशी शेतकऱ्यांच्या हाती नुकसानभरपाईच्या रकमा येऊन पडल्या. सध्या अमलात असलेल्या योजनेला 'पीक विमा योजना' म्हणणे अयोग्य आहे.

**'पीक विमा' कसा पाहिजे?**

खरीखुरी पीक विमा योजना मोटार अपघाताच्या विमा योजनेप्रमाणे चालली पाहिजे. कोणाही शेतकऱ्यास कोणत्याही प्रदेशात तो पीक-कर्जदार असो किंवा नसो, पिकाचा विमा उतरवता आला पाहिजे.

वेगवेगळ्या पिकांच्यासाठी लागणारा खर्च वेगवेगळा; त्यामुळे, हातात पडणारी मिळकतही वेगवेगळी. त्यामुळे प्रत्येक पिकाच्या बाबतीत हप्त्याची आणि नुकसान भरपाईची रक्कम वेगवेगळी असणार हे उघड आहे. पीकबुडीचा धोका वेगवेगळ्या पिकांच्या बाबतीत थोडाफार वेगळा असू शकतो; पण अनेक अहवाल आणि अभ्यास यावरून असा निष्कर्ष निघतो की, पीकबुडीचा धोका हा व्यवस्थापन आणि भांडवल गुंतवणूक यांच्याशी अधिक निगडित आहे. मोटार अपघाताच्या विम्याची आणि हप्त्याच्या रकमा वेगवेगळ्या असतात; पण हप्ता आकारला जातो तो प्रामुख्याने ती गाडी चालवणाऱ्या माणसांच्या अपघाताच्या इतिहासाच्या आधारे. हीच गोष्ट शेतकऱ्यांच्या बाबतीतही खरी आहे. समजा, द्राक्षाचे पीक एकरी लाख रुपये देते आणि कांद्याचे एकरी दहा हजार. द्राक्षाचा विम्याचा हप्ता पिकाच्या रकमेच्या ८ % असला तर कांद्याचा हप्ता २ ते ३ % असेल; पण काही कुशल शेतकऱ्यांच्या बाबतीत नुकसानीचा अनुभव अगदी वेगळा असू शकेल आणि त्यामुळे त्यांना आकारण्यात येणारा हप्ता वेगवेगळा असू शकेल.

टक्केवारीचीच गोष्ट निघाली तर पीक बुडण्याच्या धोक्याची टक्केवारी काय हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. विमा म्हणजे काही संकटग्रस्तांना आकाशातून मिळणारी मदत नाही. संकट ज्यांच्यावर कोसळू शकते अशांनी एकत्र यावे, एक निधी तयार करावा आणि त्या निधीतून ज्यांच्यावर प्रत्यक्षात संकट येऊन कोसळते त्यांना काही भरपाई मिळावी हे विम्याचे मूलभूत तत्त्व आहे. अगदी साध्या उदाहरणाने ही गोष्ट स्पष्ट होईल. २४ वर्षे वयाच्या नागरिकाचा एक वर्षाचा जीवन विमा उतरवायचा आहे. या वर्षात जे मृत्यू पावतील त्यांना एक लाख रुपयाची भरपाई द्यावी अशी योजना आहे. मृत्यूसंबंधीची सारी आकडेवारी पाहिली तर असे दिसते की, २५ व्या वर्षात संबंधित समाजातील व्यक्ती मरण पावण्याची शक्यता फक्त २ % आहे. मग या योजनेतील प्रत्येक विमाधारकाचा हप्ता एक लाख रुपयांच्या दोन टक्के म्हणजे रु. २०००/- होईल. याच पद्धतीने

पीक बुडण्याची किंवा मरण्याची संभाव्यता काय आहे? कोणत्याही प्रदेशातील जमीन, हवामान, श्रमशक्ती, व्यवस्थापनकौशल्य, तंत्रज्ञान, भांडवल या साऱ्या गोष्टी लक्षात घेतल्यानंतर पीक किती यावे याचा अंदाज शेतकीतज्ज्ञ मांडतात. शेतीउत्पादनाची आकडेवारी पाहिली तर हाती येणारे पीक हे तज्ज्ञांच्या अनुमानापेक्षा निम्म्यानेच असते. थोडक्यात, पीकबुडीचा धोका भारतातील परिस्थितीत जवळजवळ ३३ % होईल. शेतीचे एकूण उत्पादनक २३१ खर्व रुपयांचे आहे. याचा अर्थ विम्याच्या नुकसानभरपाईची रक्कम ११५ खर्व रुपये असेल. काही किमान नुकसानीबद्दल भरपाई दिली जाणार नाही असे ठरवले तरी नुकसानभरपाईची रक्कम ९० खर्व रुपयांपेक्षा कमी होणे नाही; पण सगळे शेतकरी काही विमा उरवणार नाही. अनेकांना विमा योजनेची माहिती नसेल. सरकारी आधारभूत किमती फक्त सतरा शेतीमालानाच लागू आहेत. या सतरा मालांपुरतीच विमा योजना मर्यादित ठेवली तरी नुकसानभरपाईची रक्कम २० ते २५ हजार कोटी रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

भारतीय जीवन विमा निगम दरवर्षी नव्या हप्त्यांपैकी रुपये १५,००० कोटीच वसूल करते. तिचा एकूण विमानिधी आजमितीस रुपये ८५,००० कोटीचा आहे. पीक विमा योजना निगम तयार करण्यात आला तर अगदी सुरुवातीलाच वार्षिक हप्त्यांची रक्कम कमीत कमी रुपये ३० हजार कोटी एवढी होईल. पीक विमा निगम म्हणजे केवढी अवाढव्य यंत्रणा होईल याचा अंदाज यावा. या अवाढव्यतेमुळेच पुढारी आणि नोकरदार खुश असावेत! शेतकऱ्यांच्या पिकांचे काहीही होवो, लक्षावधी नोकरदारांची मात्र भरपेट पगाराची तरतूद मजबूत होऊन जाईल. एवढे त्यांना नक्कीच कळते.

आता प्रश्न उरतो की, तो हा शेतकऱ्यांनी पिकाच्या रकमेच्या निम्मा इतका हप्ता भरावा कसा आणि कुठून? शेतीमालाच्या किमती ठरविताना पीकबुडीचा धोका जवळजवळ लक्षात घेतला जातच नाही. पीकबुडीच्या धोक्यापोटी जी किरकोळ रक्कम धरली जाते तेवढीच फक्त विम्याचा हप्ता म्हणून घेतली गेली तर संकल्पित पीक विमा योजनेचे दिवाळे वाजायला सहा महिनेसुद्धा लागणार नाहीत.

यालउट, पीक बुडण्याचा खराखुरा धोका पूर्णत: उत्पादनखर्चाच्या हिशेबात धरला गेला तर साऱ्याच पिकांच्या किमती चाळीस ते पन्नास टक्क्यांनी वाढतील. किमती ठरविताना पीकबुडीचा धोका लक्षात घेतला गेला तर, शेतकऱ्यांच्या हाती वाढीव मिळकत पडेल. चांगल्या पिकाच्या वर्षी हाती



आलेली रक्कम तो बाजूला ठेवू शकेल आणि संकटाच्या वाईट वर्षी कोणाच्याच– ना सरकारच्या ना विमा कंपनीच्या –तोंडाकडे ना पाहता तो आपला योगक्षेम व्यवस्थित चालवू शकेल. अशा आपापल्या विम्याच्या योजनेसाठी काही यंत्रणा नको, नोकरशाही नको, प्रशासनाचा खर्च नको आणि भ्रष्टाचारालाही वाव नको. शास्त्रीय पद्धतीने पीकविमा योजना चालवायची म्हणजे पीक बुडण्याच्या धोक्याचा खर्च शेतकऱ्याच्या हाती बाजारपेठेतील किमतीच्या रूपाने पडणे आवश्यक आहे. तो नाकारला जात असेल तर कोणतीही पीक विमा योजना सफल होणे अशक्य आहे.

(शेतकरी संघटक, २१ मार्च १९९८)

■

पंधरा

# शेतकऱ्यांचे तंत्रज्ञान स्वातंत्र्य

सध्या जैविक बियाण्यासंबंधी सर्व जगभर चर्चा चालू आहे. बरेच जण त्यांच्या विरोधात आहेत. या बियाण्यांसंबंधी शेतकरी संघटनेची भूमिका वेगळी आहे.

फार पूर्वीपासून आपले वाडवडील आपल्या शेतात जे काही पीक आले असेल त्यातले चांगले जे काही असेल ते पुढील हंगामासाठी बियाणे म्हणून बाजूला काढून ठेवत असत. एखाद्या मालाचे दाणे मोठे असणे म्हणजे चांगले असेल तर मोठे मोठे दाणे निवडून बियाणे म्हणून वेगळे ठेवले जायचे. असे पिढ्यान् पिढ्या चालले म्हणजे त्या वाणाचा आकार मोठा मोठा होत जातो.

हरित क्रांतीच्या वेळी काय केले? जर का मोठ्या दाण्याचे उत्पादन पाहिजे असेल तर मोठ्या दाण्याच्या रोपाच्या फुलांचे पुंकेसर आणि लहान दाण्याच्या रोपाच्या फुलांचे स्त्रीकेसर यांचा संकर घडवून आणून असे वाण तयार केले गेले की त्याला खते आणि औषधे पुरेशा प्रमाणात मिळाली तर भरघोस पिक ते देते. वाण चांगले नसेल तर कितीही खते आणि औषधे दिली तरी त्याचा काही उपयोग होत नाही. पण वाण चांगले असेल तर ते खताला आणि औषधाला प्रतिसाद देते आणि उत्पादन वाढते. अशा वाणांच्या विकासाने हरित क्रांतीला सुरुवात झाली. उत्पादन वाढले पण समस्याही उभ्या राहिल्या. या वाणांना खते आणि औषधे जास्त वापरावी लागतात. त्यामुळे खर्च जास्त होतो एवढेच नव्हे तर खताऔषधांच्या अतिवापरामुळे निसर्गाचा, पर्यावरणाचा नाश होऊ लागला; नद्यांमधील मासे मरू लागले, नद्यांचे पाणी दूषित होऊ लागले.

हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानामुळे ही समस्या उभी राहिलेली दिसायला लागल्यानंतर काही मंडळींनी धोशा लावला की खतांचा आणि औषधांचा वापर सोडून द्या



आणि नैसर्गिक शेती करायला लागा आणि मग गावोगाव नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू झाले. खताच्या ऐवजी गायीचे शेण वापरायचे आणि औषधांच्याऐवजी गायीचे मूत्र वापरायचे. आर्थिक उपलब्धीचा काही हिशोब मांडलाच गेला नाही.

त्या काळात लिहिलेल्या एका लेखात मी लिहिले आहे की प्रगती ही अशा तऱ्हेने मागे जाऊन होत नाही. जर नैसर्गिक शेतीमुळे प्रचंड पीक येत असते आणि लोकांना भरपूर खायला मिळाले असते तर या देशामध्ये दुष्काळ कधी पडायलाच नको होता. कारण हजारो वर्षांपासून आपली शेती नैसर्गिकच आहे. आतापर्यंत आपण कधी खते आणि औषधे वापरतच नव्हतो. या समस्येवर तोडगा पुढची शास्त्रीय पायरी गाठल्याने मिळेल, मागे गेल्याने नाही. प्रगती कधी मागे गेल्याने होत नाही, पुढे गेल्याने होते.

मी एका भाषणात एक कल्पना मांडली होती. एखादा रोग होऊ नये म्हणून माणसांना जसे इनॉक्युलेशन करतात तसे झाडांना करता आले तर हा प्रश्न सुटू शकतो. औषध फवारणी करून आपण संपूर्ण झाडांना औषधाची अंघोळ घालतो. त्यातले फारच थोडे औषध रोगनिवारणासाठी आवश्यक असते. उरलेले सारे निसर्गातील प्रदूषणाला कारणीभूत होते. माणसांना जसे इंजेक्शन किंवा सलाईनच्या माध्यमातून आवश्यक तितकेच औषध देण्याची सोय आहे तशी झाडाच्या बाबतीत करता आली तर खर्चही वाचेल आणि पर्यावरणालाही धोका राहणार नाही.

आता जैविक तंत्रज्ञान विकसित होत आहे. प्रत्येक जीवमात्र सूक्ष्म कणापासून सुरू होतो. या कणामध्ये कॉम्प्युटरच्या प्रोग्रॅमप्रमाणेच एक प्रोग्रॅम असतो आणि त्या प्रोग्रॅमनुसार त्या जीवमात्राची कणाकणाने वाढ होते. जैविक तंत्रज्ञानाच्या परिभाषेत या कणांना जनुक (Gene) म्हणतात. या जनुकाच्या प्रोग्रॅममध्ये प्राण्याच्या डोळ्याचा रंग निळा असणार अशी आणखी असेल तर तो निळाच होणार, नाही तर नाही.

शास्त्रज्ञांनी जनुकातला हा प्रोग्रॅम पाहिला, कोणत्या जागी कोणता नियम असतो ते पाहिले.

सध्या वादग्रस्त ठरलेले कपाशीचे बोलगार्ड बियाणे हे या जनुकांच्या अभ्यासातून निर्माण झाले आहे. शास्त्रज्ञांनी साध्या कापसाच्या बियाण्याच्या जनुकाचा अभ्यास केला त्याचबरोबर बोंडअळीला तोंड देण्याची ताकद असलेल्या वाणाच्याही जनुकाचा अभ्यास केला. जनुकातील ज्या घटकामुळे

बोंडअळीला प्रतिकार करणाचा गुणधर्म या वाणात येतो तो घटक साध्या कापसाच्या बियाणाच्या जनुकामध्ये त्यातील संबंधित घटकाऐवजी घालून नवीन बियाणे विकसित केले. हे बियाणे असे तयार झाले की त्यापासून तयार होणाऱ्या रोपांची पानेच बोंडअळीला मारक ठरतात आणि परिणामी फारशी औषधे फवारावी न लागताच पीकसंरक्षण होते.

मी जागतिक कृषी संघटनेच्या चर्चासत्राला गेलो होतो तेथे दोन नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ हजर होते. त्यांनी जैविक तंत्रज्ञानाचे जे भावी चित्र समोर ठेवले त्यावरून असे दिसते की जनुकांतील अशा तऱ्हेच्या बदलांच्या साहाय्याने शेतकऱ्यांच्या हाती बियाणी येऊ लागली तर सध्याची बरीचशी कारखानदारी अनावश्यक ठरेल. कारण, वाणांतल्या जैविक बदलाने आजच्या कारखानदारी मालांची उपयुक्तता थेट शेतीउत्पादनातच निर्माण होऊ शकेल. येत्या शतकात जैविक शास्त्राची प्रगती इतकी होईल की कोणाही माणसाला आजारपण घालविण्यासाठी डॉक्टरकडे जाऊन औषध घेण्याची गरज राहणार नाही, शेतीतून मिळणारे अन्नच त्याच्यापासून रोगांना दूर ठेवेल.

जैविकशास्त्राच्या या झेपेमुळे ज्यांचे हितसंबंध धोक्यात आले आहेत त्यांनी या शास्त्राविरुद्ध काही लोकांना उभे केले आहे. बोलगार्ड या कापसाच्या बोंडअळी प्रतिकारक बियाण्यांच्या आंध्र आणि कर्नाटकातील प्रायोगिक शेतीवर जाऊन या लोकांनी तेथील रोपे उपटून टाकायला सुरुवात केली; पण तेथील शेतकरी जागरूक होते, त्यांनी दुसऱ्या दिवसापासून आपल्या शेतांचे संरक्षण स्वतः करायला सुरुवात केली. दुदैवाने, शेतकऱ्यांच्या फायद्याच्या या तंत्रज्ञानाला विरोध करणाऱ्या लोकांना डॉ. नंजुंडस्वामींसारख्या शेतकरी नेत्याचे नेतृत्व लाभले आहे.

आपली शेतकरी संघटनेची भूमिका काय आहे? हे जे काही नवीन तंत्रज्ञान आहे ते कदाचित नुकसान करणारे असेलही; त्याचे काही वाईट परिणाम असतीलही. विरोध करणारी मंडळी कधी कधी अगदी मूर्खासारखा युक्तिवाद करतात. ते म्हणतात, 'बोंडअळीला प्रतिकार करण्यासाठी कपाशीच्या वाणातील जनुकातला एक घटक बदलला तर त्याच्या संपर्कानेसुद्धा, नको असताना, दुसऱ्या पिकाच्या वाणात तो गुणधर्म जाईल' अशा तऱ्हेचे आचरट युक्तिवाद करून, शेतकऱ्यांच्या हाती आर्थिक सत्ता जाण्याला फक्त ज्यांचा विरोध आहे त्यांनी जो प्रचार चालविला आहे. त्यांच्याविरुद्ध उभे राहणे ही शेतकरी संघटनेची भूमिका आहे. कोणतीही नवीन गोष्ट आली तेव्हा तिला



तीव्र विरोध करणारी मंडळी सर्वकाळ असतात. आगगाडी आली की तिला विरोध करणारे होते, कारखाने आले त्यांना विरोध करणारे होते, खाणींनाही विरोध करणारे होते. हे सर्व घुबडासारखे दिवाभीत आहेत.

जितके आपण प्रयोग करतो तितकी ज्ञानाची प्रगती होते; जितके आपण प्रयोगाला नाकारू, तितकी 'ब्राह्मणी'व्यवस्था तयार होते; जे काही ज्ञान आहे ते आमच्याकडे आहे. बाकी कोणी प्रयोग करण्याची गरज नाही, बाकी कोणी ग्रंथ वाचू नये, आम्ही जे काही म्हणतो ते तुम्ही ऐका असे म्हणणारांची 'ब्राह्मणी'व्यवस्था तयार होते. बियाणे कोणते वापरायचे ते आम्ही तुम्हाला सांगू, तुम्ही प्रयोग करू नका हा ब्राह्मणीवाद शेतकऱ्यांना जैविक तंत्रज्ञानापासून दूर ठेवण्याकरिता वापरला जात आहे.

शेतकरी संघटनेची या विषयावरची भूमिका साधी आणि सोपी आहे. या तंत्रज्ञानाचे जर काही वाईट परिणाम असतील तर ते वाईट परिणाम दूर करण्याकरिता अजून नवीन तंत्रज्ञानच उपयोगी पडेल. जसे हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानातील दोष दूर करण्याकरिता जैविक तंत्रज्ञान पुढे आले तसे जैविक तंत्रज्ञानातील दोष दूर करण्याकरिता पुढील शास्त्रीय पायरी चढावी लागेच, त्याऐवजी 'शेण आणि मूत' नाही वापरून चालणार.

शेतकरी संघटनेची भूमिका एवढीच आहे की तंत्रज्ञान आणि शेतकरी यांच्यामध्ये कोणी भिंती बांधू नयेत. शेतकऱ्यांना खुलेपणाने प्रयोग करायची संधी मिळू द्यावी. त्यांचा त्यांना निर्णय घेऊ द्या की अमुक एक बियाणे वापरले तर पुढच्या वर्षी नवीन बियाणे विकत घ्यावे लागते तरी ते परवडते की नाही ते. कोणी तरी दिल्लीत बसून ते ठरवता येणार नाही.

शेतकरी प्रयोगशील आहे, त्याला तंत्रज्ञान निवडीचे स्वातंत्र्य असायला पाहिजे. दुसऱ्या कोणाच्या ओंजळीतून तुटपुंजे तंत्रज्ञान स्वीकारण्यात शेतकऱ्यांना स्वारस्य नाही हे सिद्ध करण्यासाठी, इतर राज्यांत नवीन वाणांच्या प्रयोगांना विरोध होत असला तरी महाराष्ट्रातले शेतकरी नवीन वाणांचे प्रयोग आपल्या शेतीमध्ये करून त्यातले फायदे तोटे पडताळून पाहतील.

*(दिनांक १६ जून १९९९ रोजी पुणे येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीसमोर श्री. शरद जोशी यांनी केलेल्या भाषणातील तंत्रज्ञानविषयक भागाचे शब्दांकन. शेतकरी संघटक, ६ जुलै १९९९)*

■

सोळा

# आहुती सेनापतीची मंगल होवो तुला

'शेतकरी संघटक'चा हा अंक प्रकाशित होईल तेव्हा ७४ वे वर्ष संपून मी ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याला तीन दिवस होऊन जातील. कार्यकर्त्यांच्या हाती हा अंक पडेपर्यंत ७५ व्या वर्षातला माझा पहिला आठवडा पुरा होऊन गेला असेल.

एका वयानंतर वाढदिवस हा काही आनंदाने साजरा करण्याचा प्रसंग राहत नाही. आयुष्याची गाडी बऱ्यापैकी उतरणीला लागल्यानंतर, उमेदीच्या वर्षांत काय घडले, काय झाले, काय केले, काय करायला हवे होते याचा विचार साहजिकच डोकावून जातो.

पुढच्या आयुष्यात काही आशादायक काळाची अपेक्षा असेल तर अशा तऱ्हेच्या आत्मचिंतनाची फारशी आवश्यकता वाटत नाही; प्रगतीच्या वाटेवर आहोत तर पूर्वायुष्यात जे जे काही झाले ते योग्यच होते, निदान त्यात काही फारसे चूक नव्हते अशी समजूत बुद्धी आणि मन आपोआपच करून घेतात. हेच आयुष्य पुन्हा एकदा जगायला मिळाले तर आयुष्याच्या होडीला जी जी दिशा पाण्याच्या प्रवाहाने किंवा वाऱ्याने दिली ती आपल्या सुदैवाने अनुकूल अशीच झाली आणि वर्तमानकाळातील भाग्य आपल्या कर्तृत्वाइतकेच दैवयोगाने आणि नियतीने घडवून आणले अशी मनाची सहज समजूत होते.

७५ व्या वर्षाच्या सुरुवातीला माझी अशी स्थिती नाही हे उघड आहे. आजतरी मला, येणाऱ्या उष:कालाची अंधुकही छटा पूर्वक्षितिजावर दिसत नाही.

शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात प्रेमाच्या माणसांना लाथाडून देशभर फिरलो. त्यांचे शाप मला लागले का काय अशी शंकाही मनात येऊन जाते. रूढार्थाने माझ्यासारख्या नास्तिकाला ही भावना उचित नाही. मानसिक



संतुलन पहिल्यासारखे खंबीर राहिलेले नाही, मन विचलित झाले आहे याचे हे लक्षण आहे हे मलाही मान्य आहे.

शेतकऱ्यांना सन्मानाने आणि सुखाने इतर नागरिकांप्रमाणे जगता यावे या करिता 'शेतीमालाला रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमासाठी मी सर्वशक्तीने प्रयत्न केला; जात, धर्म, पंथ, भाषा इत्यादी भेदाभेद दूर सारून केला. अगदी प्रामाणिकपणे बोलायचे झाले तर, अनेक वेळा स्वजातीय आणि स्वधर्मीय यांच्यावर प्रहार करून अन्यायच केला. ज्या पुरुष जातीत जन्मलो त्यांच्याही विरुद्ध दंड थोपटले.

**हाती काय आले?**

शेतकरी संघटनेचा एककलमी कार्यक्रम आणि त्याची आर्थिक मीमांसा देशभरच्या शेतीतज्ज्ञांना आणि अर्थशास्त्र्यांना मानावी लागली यात काही वाद नाही. पक्षापक्षांचे नेते आज २५ वर्षांपूर्वीची शेतकरी संघटनेचीच भाषणे आणि भाषा वापरतात हेही खरे. एवढेच नव्हे तर, खुल्या व्यापाराची मांडणी विजयी झाली आणि जागतिक व्यापार संस्था शेतीमालाच्या व्यापारातही शेतकरी संघटनेची भूमिका अंमलात आणू लागली. जैविक तंत्रज्ञानाचा विरोध करणाऱ्यांचा सपशेल पाडाव झाला. जैविक बियाण्याने कपाशीच्या शेतीचा चेहरामोहराच बदलून टाकला. आर्थिक स्वातंत्र्याबरोबर तंत्रज्ञानाच्या स्वातंत्र्याची पताका रोवली गेली.

याउलट, ६० टक्क्यांवर असलेल्या शेतकरी समाजात शेतकरीपणाची अस्मिता रुजली नाही, त्या अस्मितेने मूळच धरले नाही. 'इंडिया विरुद्ध भारत' ही मांडणी न करणारा अर्थशास्त्री आजकाल दुर्मिळ झाला आहे; पण 'भारता'ची अस्मिता ही शेतकरी समाजात मूळ धरू शकली नाही. या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावून आर्थिक संरक्षणवाद्यांनी बऱ्यापैकी मजबूत बांधणी केली.

शेतकऱ्यांच्या मालाला हमखास भाव मिळवून देण्याकरिता सर्व सरकारी यंत्रणेला बाजूला टाकून सुपर मार्केटचे जाळे तयार करावे हा धाडसी प्रयोग शेतकरी संघटनेला पेलवला नाही. सगळ्या देशभर आज अशी जाळी पसरत आहेत, यशस्वी होत आहेत. वायदे बाजारामुळे शेतकरी गणकयंत्र साक्षर व्हावेत आणि त्यांनी योग्य तो भाव मिळवून घ्यावा या प्रयोगालाही डाव्या पक्षांनी खीळ घातली. जागतिक मंदी व त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत आलेली मरगळ आणि हवामानातील बदलामुळे भेडसावणारे दुष्काळाचे सावट यांमुळे शहरी पगारदार ग्राहकांना अनुकूल असणारी अर्थनीती पुन्हा एकदा

'आम आदमी' अर्थशास्त्राच्या नावाखाली राबवली जात आहे एवढेच नव्हे तर ती अत्यंत लोकप्रिय होत आहे. 'आम आदमी'वाद निवडणुका जिंकण्याचे हुकमी साधन झाले आहे.

ज्या शेतकरी समाजाच्या हाती रास्ता रोको, रेल रोको, ठिय्या अशी आंदोलनाची अनेक साधने देऊन लढण्यास उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला; त्या समाजातील शेतकऱ्यांनी गेल्या २५ वर्षांत दररोज वीस ते तीसच्या संख्येने आत्महत्या केल्या.

शेतकरी संघटनेच्या 'नैतिक दर्शना'त उद्योजकतेला मोठे स्थान आहे. १९९१ नंतरच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या काळात देशी उद्योजकांनी मोठी भरारी मारली. पण, तापमानवाढ, हवामानातील बदल यांमुळे सर्व उद्योजकतेवरच मोठे आक्षेप उठत आहेत. उद्योजकतेनेच घात केला, उद्योजकतेनेच पृथ्वी बुडायला आली अशा पर्यावरणवादी विचारालाही जागतिक मान्यता मिळते आहे.

बायबलच्या 'जुन्या करारा'तील जगाच्या निर्मितीसंबंधी मांडलेल्या सिद्धांताच्या आधाराने पर्यावरणवादी प्रतिभा, संशोधन आणि धाडस या गुणांना महापाप मानू लागले आहेत.

आर्थिक मंदी हटविण्याकरिता पुरुषार्थाला आवाहन करण्याऐवजी अंत्योदयाच्या करुणावादाला जोपासले जात आहे.

जी काय थोडीफार वर्षे जगायला मिळेल त्या काळात गुणवत्ता आणि पुरुषार्थ सांगणारा विचार पुढे येण्याची काहीही शक्यता दिसत नाही.

अलीकडे महाराष्ट्राच्या पन्नासाव्या वर्धापनदिनानिमित्त एका मान्यवर वाहिनीने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात एका प्रथितयश संपादकांनी १९८० सालाच्या काळाचा उल्लेख करताना त्यावेळी देशाचा पहिला शेतकरी पंतप्रधान शरद जोशीच होतील अशी सर्वदूर भावना असल्याची आठवण केली होती. १९८० सालापासून शेतकरी संघटनेच्या बांधणीमध्ये, कार्यक्रमांत किंवा विचारात अशा काय चुका झाल्या की आजची निराशाजनक परिस्थिती तयार व्हावी याचा ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याच्या निमित्ताने ऊहापोह करण्याचे योजिले आहे.

गेल्या ७४ वर्षांतील शेवटची ३२ वर्षे स्वित्झर्लंडहून परत आल्यानंतर हिंदुस्थानात गेली. त्यांतील जवळपास ३० वर्षे शेतकरी संघटना आणि शेतकरी आंदोलन यांत गेली.



माझा जन्म शेतकरी कुटुंबातला नाही. निदान पाच पिढ्यातरी माझ्या कुटुंबात कोणी शेती केली नाही. ''शेतकऱ्यांविषयी करुणाभाव उपजून संयुक्त राष्ट्रसंघाची सुखासीन नोकरी सोडून हे हिंदुस्थानात आले.'' असे कोणी विधान केले तर ते मी तत्परतेने खोडून काढीत असे. ''संयुक्त राष्ट्रसंघात परमोच्च पदापर्यंत बढती झाली असती तरी त्यापेक्षा संघटनेच्या कामात

*'दारिद्र्यदु:खअपमानही प्राप्त झाले,*
*कारागृही सतत वास करी जरी मी'*

तरी त्यात मला अधिक सार्थकता वाटेल'' असे मी अनेकवेळा म्हटले आहे.

''नेहरूप्रणीत समाजवादाच्या काळात सर्वच उद्योजकांवर अन्याय झाला; पण त्या सर्वांत भयानक जुलूम शेतकऱ्यांना सहन करावा लागला म्हणून मी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहायचे ठरवले.'' हेही मी वारंवार बोललो आहे.

''शेतमजुरीचे दर शेतीमालाच्या भावापेक्षा अधिक गतीने वाढतात याची मला खात्री आहे; पण, शेतकऱ्यांनी शेतमजुरांना किमान दरानेही मजुरी देण्यात खळखळ केली तर मी शेतमजुरांच्या बाजूने शेतकऱ्यांविरुद्ध लढण्यास उभा राहीन,'' असे मी सुरुवातीपासून स्पष्ट केले आहे.

थोडक्यात, मी जाणीवपूर्वक शेतकरी आंदोलनाचे क्षेत्र निवडले; इतर बहुतेक नेत्यांप्रमाणे जन्माच्या अपघाताने किंवा परिस्थितीच्या रेट्याने डोक्यावर पडलेले कार्यक्षेत्र आपले म्हटले नाही याचाही मला अभिमान आहे.

माझ्याविषयी लिहिताना कै. अरविंद वामन कुळकर्णी यांनी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला आहे. माझ्या विचारात श्रेय म्हणून मी न्याय, सुख, शांती अशी भाववाचक नामे वापरीत नाही. हे कुळकर्णी यांनी आवर्जून मांडले होते. अशा गुणवाचक शब्दांपेक्षा संख्यावाचक श्रेये ठेवणे माझ्या प्रकृतीला अधिक भावणारे आहे. सर्व श्रेयांत 'स्वातंत्र्य' ही संकल्पना संख्यावाचक आहे. तिची व्याख्या करताना मी स्वातंत्र्याच्या वेगवेगळ्या आणि चढत्या कक्षांची संकल्पना मांडली आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या जाणिवांचीही मी संख्यात्मक व्याख्या केली आहे. त्या जाणिवांच्या आधारे ॲडम स्मिथच्या 'Invisible Hand' चे विश्लेषण करून बाजारपेठेचे अध्यात्म उकलण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच आधारे नेतृत्वगुणाचे अध्यात्मही तपासून पाहिले आहे.

७५ वर्षांचे समालोचन करताना माझ्या या आनंदयात्रेचा आठव कमी

होतो. कालखंडाच्या जवळपणामुळे शेतकरी आंदोलनाच्या यशापयशाच्या आधारेच मी माझ्या आयुष्याचे मूल्यमापन करू लागतो. शेतकरी आंदोलन माझ्या दृष्टीने एक संदर्भरेषा होती. शेतकरी संघटना सुरू करण्याआधी माझे जे विचारविश्व होते त्याला संघटनेमुळे प्रचंड व्यापकता आली, पुष्कळशा संकल्पना स्पष्ट झाल्या. हे संघटनेचे ऋण मान्य केलेच पाहिजे; पण शेतकरी आंदोलनाचे अपयश हे फार तर माझ्या आयुष्याच्या एका कालखंडातील प्रयोगाचे अपयश मानणे योग्य होईल. शेतकरी आंदोलनानंतरही माझी आनंदयात्रा चालूच राहणार आहे.

स्वित्झर्लंड सोडून येथे येताना तेथील अनेक सहकाऱ्यांची मने दुखवावी लागली, तुडवावी लागली. यापुढच्या माझ्या मार्गक्रमणेत हाही दाहक अनुभव पुन्हा एकदा घ्यावा लागेल. ही नियती नाकारणे माझ्या हाती नाही आणि कोणाच्याच हाती नाही.

*(शेतकरी संघटक, ३० ऑगस्ट २००९)*

■



# ▪ आंदोलन ▪

सतरा

# नव्या पर्वाची नांदी

मार्च १९८९, नांदेड अधिवेशनात शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची घोषणा झाली. त्याला आता १४ महिने होऊन गेले. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची फलश्रुती काय? शेतकरी स्वतंत्र झाला काय? त्याच्या तुरुंगाचे दरवाजे निदान थोडेफार तरी खिळखिळे झाले किंवा नाहीत? १४ महिन्यांत जे जे काही घडले किंवा घडले नाही त्याचे श्रेय कोणाला आणि कशाला किंवा दोष कोणाला आणि कशाला? डोंगराची बिकट वाट चढताना मधून मधून थांबून, पुढे मागे, वरखाली पाहून अशी समीक्षा करणे आवश्यक असते. संघटनेच्या दृष्टिकोनातूनही अशी समीक्षा करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळवून द्यायचे म्हणजे काय, याची स्पष्ट कल्पना नांदेड अधिवेशनात वारंवार मांडली गेली होती. शेतकरी गुलाम आहे, बंदीशाळेत आहे. दरवाजाचे कुलूप डोळ्यांना दिसत असो वा नसो, हातापायांतील बेड्या खळखळत असोत वा नसोत, शेतकरी स्वतंत्र नाही. गुलामगिरीचे लक्षण काय? तुरुंग कसा ओळखावा? आतील लोकांना बाहेर जायची इच्छा आहे; पण जाता येत नाही आणि बाहेरचा कोणीही आपखुशीने आत येऊ इच्छित नाही अशी परिस्थिती असली तिथे तुरुंग आहे असे समजावे; भिंती असोत वा नसोत, गजाचे दरवाजे दिसोत वा न दिसोत, हातापायांत साखळ्या काचोत वा ना काचोत. अशा ठिकाणी तुरुंग आहे आणि त्यातील निवासी गुलाम आहेत असे समजले पाहिजे. 'शेतकऱ्याला इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने जगता यावे' हे संघटनेच्या पाईकांच्या शपथेतील ब्रीदवाक्य आहे. शेतकऱ्याला माणसाप्रमाणे जगता यावे अशी परिस्थिती तयार करण्यासाठी प्रयत्नांची परकाष्ठा करण्याचे वर्ष म्हणजे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यवर्ष.

शेतकरी कधीतरी स्वतंत्र होईल हे शक्य आहे काय? माणूस शेतकरी



बनला आणि खळ्यात धान्याची रास उभी करू लागला त्या दिवशीच लुटारूंचे डोळे त्याच्याकडे वळले आणि त्याच्या गुलामीला सुरुवात झाली. लुटारू राजे बनले, महाराजे बनले. निसर्गदेवतांचा धाक दाखविणारे भटभिक्षुक भामटे धर्माधिकारी बनले. जखमी झालेल्या जनावराला चोची मारण्यासाठी जमीनदार, सावकार, व्यापारी, नोकरदार अशा कावळ्यांची फौज उठली. देशी राजांनी लुटले, मुसलमान आक्रमकांनी छळले, गोऱ्या इंग्रजाने पिळून चिपाड केले आणि त्यांच्यानंतर आलेल्या काळ्या इंग्रजाने तर दयामायेचा लवलेशही ठेवला नाही. सुलतानांचे तुरुंग, धर्माचे तुरुंग, साम्राज्यवाद्यांचे तुरुंग, इंडियावाद्यांचे तुरुंग. हजारो वर्षे शेतकरी एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात जात राहिला. हजारो वर्षे तो गुलामच राहिला. बेड्या तोडून टाकण्याचे त्याचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले. हजारो वर्षे कोणाला न पेललेले शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचे शिवधनुष्य हाती घेण्याचा विडा उचलला तो दहा वर्षे वयाच्या शेतकरी संघटनेने. हजारो मैल अंतरावर, इकडे तिकडे विखुरलेली लाखो खेडी. त्यांत वसलेले अर्ध्या अब्जाहून जास्त शेतकरी. टेलिफोनसारखी साधने जवळजवळ नाहीत. रेडिओ, दूरदर्शन, प्रवासाची हवाई साधने सगळीच विरोधकांच्या हाती. अगदी वर्तमानपत्रेसुद्धा शेतकऱ्यांना न पेलवणारे हत्यार. एका गावातून दुसऱ्या गावात जायला सडकसुद्धा नाही. गावापर्यंत पोहोचले तरी भाषा वेगळ्या, जाती वेगळ्या, धर्म वेगळे, जमीन वेगळी, हवा वेगळी, शेती वेगळी, पिके वेगळी. दोन शेतकऱ्यांना एकमेकांची सुखदु:खे सांगायला समान भाषासुद्धा नाही. प्रत्येकाला संध्याकाळच्या भाकरीचीच चिंता जाळते आहे. प्यायला पाणी कोसाकोसावरून आणायचे आहे या विचाराचीच धास्ती आहे. जो उजाडतो किंवा नाही याबद्दलच शंका आहे त्या उद्याचा विचार करणारा विरळा आणि आजच्या भाकरीचा पाठला सोडून घराबाहेर पडणारा त्याहूनही दुर्मिळ. तरीही १० वर्षांत संघटनेने एक चमत्कार घडवून दाखविला आणि नांदेड अधिवेशनात स्वातंत्र्यलढ्याचे रणशिंग फुंकले.

स्वातंत्र्यलढ्याचे तंत्र काय? शेतकऱ्यांची लूट थांबविणे हा एकमेव मार्ग. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात लूट थांबविणे याचा अर्थ शेतीमालाला भाव मिळविणे. स्वातंत्र्ययुद्धाच्या वर्षी शेतीमालाच्या भावाचा लढा हा कोण्या एका पिकाच्या भावाचा लढा होऊ शकतच नव्हता. वर्षानुवर्षे शेती तोट्यात राहिल्याने येथून तेथून सगळा शेतकरी कर्जबाजारी झालेला. सगळ्या शेतकऱ्यांवर शतकानुशतके झालेल्या या अन्यायाचा विरोध करण्याचे साधन ठरले कर्जमुक्ती.

कर्जमुक्ती, शेतीमालाचा भाव ही प्रमुख आघाडी; पण या लढाईत जिंकायचे असेल तर डाव्या उजव्या बगलेत, पिछाडीहून हल्ले होणार नाहीत याची दक्षता घेणे तितकेच महत्त्वाचे. नांदेड अधिवेशनात याच कारणाने जातीयवाद्यांविरुद्ध ठाम भूमिका घेतली गेली; नोकरशाहीच्या झपाट्याने पसरणाऱ्या कॅन्सरकडे लक्ष वेधले गेले; स्त्रियांच्या जागृतीचा कार्यक्रम आखला गेला. १९८९/९० या काळात सार्वत्रिक निवडणुका होतील. या राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन शेतकऱ्याचा तुरुंग फोडायचा ही नांदेडमध्ये ठरलेली शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची रणनीती.

स्वातंत्र्यवर्षाच्या अखेरीला कर्जमुक्ती आणि शेतीमालाचा भाव या दोन आघाड्यांवर हाती काय पडले याच्या विश्लेषणाचा थोडक्यात अर्थ असा की, लोकसभेच्या निवडणुका होऊन गेल्या, राज्यातही नवे शासन सत्तेवर आले आणि येत्या काही महिन्यांत तरी शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता दिसत नाही. थोडक्यात सध्यातरी शेतकरी आंदोलनाच्या आघाडीवर सामसूमच दिसत आहे आणि हातात अर्धीमुर्धी कर्जमुक्ती व शेतमालाला रास्त भाव मिळण्यासंबंधी काही चुटपुट प्रगती सोडली तर शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा सूर्य काही अजून नजरेस पडत नाही. कदाचित तो उगवलाही असेल; पण आजतरी ढगाआडच आहे. या पुढची प्रगती शेतकऱ्यांच्या नव्या एखाद्या व्यापक आंदोलनाने होईल की शेतकऱ्यांबद्दल थोडीफार सहानुभूती बाळगणाऱ्या मध्यवर्ती व राज्य शासनाच्या सहयोगाने होईल हे सांगणे कठीण आहे.

वस्तुत: पाहिले तर राजकीय क्षेत्रात जोमदार शेतकरी आंदोलनास अगदी आवश्यक अशी परिस्थिती तयार झाली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा बडेजाव नसावा; छोटे चोर व मोठे चोर यांच्यात समतोल असावा म्हणजे शेतकरी जनआंदोलनाला आपल्या ताकदीवर आपले हक्क मिळविता येतील असे संघटनेच्या व्यासपीठावर सातत्याने सांगितले गेले. निवडणुकांनंतर अगदी हवी तशी राजकीय संतुलनाची परिस्थिती तयार झाली आहे. मुंबईत राज्य काँग्रेसचे, दिल्लीत राज्य राष्ट्रीय मोर्चाचे. दोन्ही शासनांचे बहुमत अगदी जुजबी आणि कामचलाऊ. शेतकरी आंदोलनाने उठायचे ठरवले तर यापैकी कोणतेही किंवा दोन्हीही शासने डळमळीत होतील, प्रसंगी कोलमडूही शकतील. राजकीय रणभूमी सोयीस्कर झाली आहे; पण आंदोलनाची हवा मात्र आजतरी तयार नाही. सगळ्या देशात एक भीतीचे आणि आशंकेचे वातावरण पसरले आहे. काश्मीर, पंजाब, अयोध्या येथील घटनांनी सर्वसामान्य माणूससुद्धा चिंताग्रस्त



झाला आहे. शहरा-शहरात, गावा-गावात अमानुष क्रौर्याचे आणि गुंडगिरीचे प्रकार सर्रास घडत आहेत. या परिस्थितीत नव्या सत्ताधाऱ्यांबद्दल लोकांच्या मनात एक सहानुभूतीही तयार झाली आहे. सर्वसामान्य शेतकरी आज रस्त्यावर उतरायला तयार नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या अपुऱ्या राहिलेल्या उद्दिष्टांसाठी आंदोलनच आवश्यक असेल तर आज तरी शेतकरी त्यासाठी तयार दिसत नाही.

गेल्या दहा वर्षांमध्ये संघटनेने जे काही मिळविले ते खरोखर अलौकिकच. स्वातंत्र्यवर्षाच्या काळात फार काही करावे लागले नाही आणि तरीदेखील जवळजवळ ४००० कोटी रुपयांची कर्जमुक्ती आणि जवळजवळ तितक्याच रकमेची वाढीव भावाच्या रूपाने उत्पन्नात वाढ ही काही थोडी मजल नव्हे; पण यापेक्षा पुष्कळ जास्त प्राप्त करण्याची संधी आपल्यासमोर इतिहासाने आणून ठेवली होती तिचा पुरेपूर फायदा आपण घेऊ शकलो नाही ही गोष्ट खरी.

महाराष्ट्रातील संघटनेचा पाईक आणि संघटना कोठे कमी पडली?

एक साधी सरळ दिसणारी कमजोरी. याबद्दल काही वादविवाद होऊ नये. शेतकरी तितुका एक एक असे आपण म्हटले, काही प्रसंगी संघटना जातिधर्माच्या कल्पनांवर मात करून अर्थवादी भूमिका घेऊ शकते हे संघटनेने दाखवून दिले आहे. छोटे मोठे शेतकरी हा भेद आपण मानत नाही हेही आग्रहाने आपण सांगत आलो आहोत; पण जातीयवाद आणि धर्मवाद यांच्या प्रभावातून सर्वसाधारण शेतकरी पाईक सुटला आहे असे काही दिसत नाही. शेतकरी संघटनेने अयोध्या मंदिराविषयी किंवा जातीयवादी पक्षांविषयी घेतलेली भूमिका अनेक कार्यकर्त्यांना खरे म्हटले तर पचली नव्हती. शेतकरी संघटनेच्या भूमिकेला उघड विरोध कोणाच पाईकाने केला नाही; पण काही जणांनी संघटनेच्या कार्यक्रमांतून अंग काढून घेतले, काहींनी निदान मतदान करताना आपल्या पूर्वसंस्कारित प्रवृत्तींना मोकळी वाट करून दिली. पण निष्ठेने जातीयवाद व धर्मवाद यांच्याविरुद्ध उभे राहण्याची मानसिक ताकद फार थोड्या शेतकऱ्यांनी आणि पाईकांनी दाखविली.

शेतकरी संघटनेची राजकीय भूमिकाही बहुसंख्य पाईकांनाच नव्हे तर संघटनेच्या बिनीच्या कार्यकर्त्यांनासुद्धा पचायला जड गेली. संघटना गैरराजकीय आहे, सर्वच राजकीय पक्ष चोर आहेत, छोटा चोर आणि मोठा चोर यांतील समतोल साधणे हे संघटनेचे राजकारण आहे ही वाक्ये अनेकदा घोकली गेली; पण प्रत्येकाच्या मनात त्याचा एक लाडका राजकीय पक्ष असतो. संघटनेचे धोरण त्या त्या लाडक्या पक्षास सोयीस्कर व पोषक असेपर्यंत संघटनेची वाहवा

केली जाते. परिस्थितीनुसार त्या पक्षाला बोचेल असे काही संघटनेस करावे लागले की तीच माणसे संघटनेच्या विरुद्ध हाकाटी करू लागतात. १९८९ आणि ९० च्या निवडणुकांत संघटना किती खऱ्या अर्थाने राजकारणात निर्लेप आहे हे दिसून आले. पण राजकीय पक्षांची जवळीक ही आंदोलनाच्या सोयीसवडीनुसार ठरायची असते हे सूत्र पचविणे बहुतेकांना फार जड गेले.

संघटनेचे कार्यकर्ते फार मोठ्या प्रमाणावर थकले आहेत हे मान्य करण्यात कमीपणा कोणताही नाही. म. गांधींनी मोठी आंदोलने १० वर्षांच्या अंतरा अंतराने केली. पोलिसांची लाठी आणि बंदूक यांचे थैमान डोळ्यांनी एकदा पाहिले की त्यानंतर पुन्हा मोकळ्या हाताने सत्याग्रहासाठी जायला मन सहसा तयार होत नाही. संघटनेच्या सर्व प्रसाराचा आणि व्यापाचा शारीरिक आणि आर्थिक बोजा १० वर्षे कार्यकर्त्यांनी सतत सहन केला. कार्यकर्ते स्वातंत्र्ययुद्धाच्या उंबरठ्यावरच थकले भागलेले होते ही गोष्ट खरी.

नांदेडच्या कार्यक्रमास मिळालेला प्रतिसाद खऱ्या अर्थाने पाहिले तर अगदी तुटपुंजा होता. जातीयवाद्यांना गावबंदी करण्याच्या पाट्या किती गावांवर लागल्या? दारूची दुकाने बंद करण्याचे सत्याग्रह अनेक ठिकाणी झाले; पण महाराष्ट्रात त्याचे वादळ बनले नाही. जिल्हा परिषदा काबीज करणे यासारखा कार्यक्रम महिला आघाडीच्या आंदोलनासाठी करायचा सराव म्हणून ठीक झाला; पण लोकांची झोप खाड्कन मोडून टाकण्यासारखे स्वरूप त्याला येऊ शकले नाही. नोकरदारांच्या भ्रष्टाचाराविरुद्धचे आंदोलन खरे म्हटले तर करायला सोपे, ताबडतोब हाती फायदा पडून देणारे असे मोठे प्रतिभाशाली स्वरूपाचे आंदोलन; पण प्रत्यक्षात ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच ठिकाणी पार पडले. कर्जमुक्तीच्या अर्जांची संख्या किती याचा गवगवा देशभर झाला; पण आंदोलनाच्या यशस्वितेसाठी अर्जांची जी किमान संख्या ठरली होती त्याच्या जवळपासही आपण प्रत्यक्षात पोहोचलो नाही हे उघड आहे. कर्जमुक्ती हवी असेल, शेतीमालाला भाव हवा असेल तर जातीयवाद्यांना एक मत देऊ नका; कर्जमुक्तीसाठी आणि शेतीमालाच्या भावाच्या मागणीसाठी मला ताठ मानेने दिल्लीला जायला मिळू द्या असे आवाहन मी विधानसभा निवडणुकांआधी शेकडो सभांतून केले. प्रत्यक्षात या आवाहनाला जो प्रतिसाद मिळाला तो पाहिला तर हाती पडलेले कर्जमुक्ती आणि रास्त भाव याबाबतचे तोडकेमोडके यशसुद्धा मोठे अद्भूत वाटू लागते. जे हाती पडले ते आंदोलनाच्या प्रयासाने नव्हे, अंगिकारलेल्या कष्टांमुळे नव्हे तर सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या



अपघातामुळे असे म्हटले तर चूक होणार नाही.

देशाच्या रंगमंचावर एक नवा अंक चालू होतो आहे. त्यातून कदाचित शेतकरीच नव्हे तर सर्व शोषित जनांना आशादायक वाटणारी पहाटही दिसू शकेल; याउलट, जातीयवादी आणि धर्मवादी यांच्या हुकूमशाहीची काळीकुट्ट रात्रही पसरू शकेल. शेतकरी आंदोलनाला यातून वाट काढायची असेल तर गेल्या दहा वर्षांच्या वाटचालीचे परखड आणि प्रामाणिक आत्मविश्लेषण आवश्यक आहे. नवीन फौजा उभाराव्या लागतील. नव्या ताज्या दमाचे नेतृत्व सर्व पातळ्यांवर उभे व्हावे लागेल.

*(शेतकरी संघटक, ६ जून १९९०)*

■

अठरा

# सद्य:स्थिती आणि शेतकरी आंदोलन

शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे हे मानणारे आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणारे पंतप्रधान पदच्युत झाले आणि त्यांच्याच पक्षात काहीतरी बंडाळी होऊन एक नवे पंतप्रधान इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्याने शपथविधी होऊन त्या पदावर आरूढ झाले. शेतीमालाच्या भावाचे काम काही झाले आहे असे नाही. कर्जमुक्तीही सरकारला महागाची; पण शेतकऱ्यांना काही फायद्याची नाही अशा पद्धतीने पार पाडली. आणेवारीची अट एक वर्षावर आणण्याचा विचार असून त्यामुळे कर्जमुक्तीची एकूण रक्कम ९००० कोटी रुपयांवर जाईल असा अंदाज आहे असे जुने अर्थमंत्री म्हणत होते. त्या निर्णयाची अजून अंमलबजावणी सुरू झालेली नाही. आणेवारीची अट शिथिल करण्याचे त्यांनी मान्य केले तेव्हा त्यांना असे वाटत होते की फार तर याने रकमेत चार-पाचशे कोटी रुपयांची वाढ होईल. आता नवीन सरकार हे मान्य करील किंवा नाही याबद्दलही थोडी शंका निर्माण झाली आहे. सगळ्याच किमती इतक्या गतीने वाढू लागल्या आहेत. अंदाजपत्रकातील तरतुदींबाबत तयार झालेली स्थिती, विशेषत: पेट्रोलवरचा वाढता कर, मध्य पूर्वेकडे चाललेली लढाईची तयारी या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून बाकीच्या सगळ्या किमती इतक्या प्रचंड वेगाने वाढू लागल्या आहेत की शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत आपल्याला जो काही विजय मिळाला असेल तो पार धुऊन गेल्यासारखा झाला आहे. त्यापासून आनंद, समाधान किंवा अनुकूल आर्थिक परिणामही नाही अशी स्थिती आली आहे. सगळ्या किमतीच्या प्रश्नांवर शहरी हितसंबंधियांनी शक्य तितक्या जोरात आरडाओरड सुरू केली आहे. अगदी कम्युनिस्ट पक्षाचे लोकसुद्धा ''देशात सगळ्यात गंभीर प्रश्न कोणता?'' असे विचारले तर ''महागाईचा'' असेच उत्तर देतील. शेतकरी संघटनेशी संबंधित असलेली, शेतकरी संघटना



ज्यांना समजली आहे अशी जाणती मंडळीसुद्धा ''महागाई फार वाढली'' असे म्हणतात. शहरी भागातल्या लोकांनी ही जी काही आरडोओरड सुरू केली आहे ती पाहता यापुढे काही काळ तरी शासनाची शेतीमालाच्या भावाकडे विशेष लक्ष देण्याची प्रवृत्ती राहील असे दिसत नाही.

नुकतेच शेतीमालाच्या रब्बी हंगामासाठी किमती जाहीर झाल्या आहेत. गेल्या वर्षी सुरुवातीला ३२ आणि नंतर २० असे एकदम ५२ रु. गव्हाच्या क्विंटलमागे वाढवून मिळाले. कदाचित काही जणांची अशी अपेक्षा झाली असेल की आता दरवर्षी भाव चाळीस पन्नास रुपयांनी वाढवून मिळतील; पण हे काही संभाव्य नव्हते. आज जी काही वाढ जाहीर झाली आहे त्यामुळे कुणाला काही समाधान वाटले आहे असे दिसत नाही. या पलीकडे उसाच्याही नवीन किमती जाहीर झाल्या आहेत. या किमती कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाने केलेल्या शिफारशींपेक्षाही कमी पातळीवर ठरवण्यात आल्या आहेत. आमच्या स्थायी कृषीधोरण सल्लागार समितीने उसाचा वाहतूक खर्च धरला जात नाही हे सिद्ध करून दाखवल्यानंतरसुद्धा उसाच्या किमतीत वाहतूक खर्चासाठी काही रक्कम धरावी अशी शासनाची तयारी नव्हती. कारण रेशनच्या साखरेचे दर किलोला ५ रु. ९० पैशांपासून वाढून ६ रु. २५ पैसे झाले या एका गोष्टीने शासन घाबरून गेले होते. त्यामुळे उसाच्या शेतकऱ्याचे काय होते आहे याकडे लक्ष द्यायला कुणाला काही फुरसत नव्हती. केंद्र शासनाच्याच पातळीवर हे होते असे नाही. महाराष्ट्र शासनाने ऊस-शेतकऱ्याला किमान रोख रक्कम टनाला २७५ रुपये द्यावी पण ती ३७५ रुपयांपेक्षाही जास्त असू नये अशी अट साखर कारखान्यांवर घातली आहे. पंजाबमध्ये याच वेळी, शर्करांशाचा संबंध न ठेवता उसाची किमान किमत प्रति टन ४०७ रुपये ठरवण्यात आली आहे. लोकांच्या मनात संतोष नाही; पण या असंतोषाला वाचा कशी काय फुटायची? प्रश्न उपस्थित होतो तो हा की हे आपण करू शकू का आपल्यापेक्षा लढाऊ माणसे पुढे येतील? आंदोलन करायचे ठरवले तर या पुढच्या आंदोलनाची आखणी कशी राहील? यावर विचार करण्याआधी थोडी पार्श्वभूमी समजावून घेतली पाहिजे.

गेल्या दीड-दोनशे वर्षांपासून शेतकऱ्यांचा असंतोष शेतकरी आंदोलन या स्वरूपात पुढे आला. त्याच्याआधीचे शेतकऱ्यांचे उठाव होते, बंडे होती. शेतकऱ्यांच्या उठाव बंडांपासून शेतकरी आंदोलनापर्यंतच्या मधल्या काळात जे झाले त्याला बंड म्हणावे की आंदोलन म्हणावे हे समजत नाही. उदाहरणार्थ,

१८६२ च्या सुमारास महाराष्ट्रामध्ये पुणे–नगर या जिल्ह्यांमध्ये झालेला सावकारांविरुद्धचा उठाव याला दक्षिणेतील बंड म्हणावे का आंदोलन? शेतकरी एकत्र येऊन सावकाराच्या घराला वेढा घालायचे आणि सांगायचे की आमचे कर्जरोखे जाळून टाका. एका सावकाराचे नाक कापले गेल्याचा फक्त उल्लेख आहे. त्या पलीकडे, कुणाला मारहाण झाली किंवा घरातल्या माणसांना त्रास दिला असे एकही उदाहरण त्यात झालेले दिसत नाही. तंट्या भिल्लाने जो संघर्ष केला ते आदिवासी शेतकऱ्यांचे बंड होते. त्यानंतर सासवडला झाला तो उठाव होता.अशा तऱ्हेने हळूहळू आंदोलनाकडे जात असताना असे लक्षात येते की शेतकऱ्यांनी प्रामुख्याने चंपारण्य, बारडोली, खेडा या भागांत संख्येची ताकद वापरली आणि त्या संख्येच्या ताकदीबरोबर महात्मा गांधींचे नेतृत्व या आंदोलनाला मिळाले. सरदार वल्लभभाई पटेलांचे नेतृत्व त्याला मिळाले. यामुळे शेतकऱ्यांचे आंदोलन पहिल्यांदा राष्ट्रीय आंदोलनाबरोबर जुळले गेले. तंट्या भिल्लाच्या आंदोलनाला कुणी राष्ट्रीय आंदोलन म्हटले नाही. वासुदेव बळवंत फडक्यांच्या आंदोलनाला कुणी राष्ट्रीय म्हटले नाही. सासवडचे आंदोलन, काही शेतकरी चिडले आणि उठले असं झाले. शेतकरी जे काही मागत होते त्याचा आणि राष्ट्राचा काही संबंध आहे असे झाले नाही. महात्मा गांधींनी शेतकऱ्यांचे आंदोलन पहिल्यांदा राष्ट्रीय प्रवाहात आणले. खरे तर हे विधान तसे विनोदी आहे. कारण शेतकरी आंदोलन वजा केल्यास त्यावेळी जे काही राष्ट्रीय आंदोलनाचे संस्थान उभे होते त्याचे स्वरूप एखाद्या किरकोळ ओढ्याइतकेच होते. म्हणजे ओढ्याला गंगा येऊन मिळावी तसे शेतकरी आंदोलन त्या राष्ट्रीय प्रवाहाला येऊन मिळाले, त्या प्रवाहाशी एकरूप झाले; पण शेतकरी बोलतात तेव्हा कुणी ऐकत नाही. शेतकरी रडतो तेव्हा सगळ्याचे कान बंद असतात आणि ते संघर्ष करून उठले म्हणजे हे अचानक असे कसे झाले, शेतकरी एकदम का उठले अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया होते. ही तंट्या भिल्लाच्या वेळी झाली, वासुदेव बळवंत फडक्यांच्या वेळीही झाली आणि चाकणच्या कांदा आंदोलनाच्या वेळीही झाली. शेतकरी एकदम उठून काय मागू लागले आहेत म्हणून अचंबा व्यक्त करतात. जणू काही ही मंडळी परग्रहावरून इथे आली आहेत आणि त्यांना कळत नाही की इथल्या शेतकऱ्याचे हे काय चालले आहे! अशा प्रकारचे नाटक ही मंडळी करीत असतात.

१९८० पासून सुरू झालेल्या शेतकरी आंदोलनात दोन नवीन गोष्टी आहेत. महात्मा गांधींपासून सुरू झालेला एक महत्त्वाचा प्रवाह इथे थांबला. राष्ट्रीय



आंदोलनाच्या मुख्य प्रवाहाबरोबर शेतकरी आंदोलन जाणे हे इथे थांबले. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय प्रवाह हा खोटा आहे; तुमचे राष्ट्र, तुमची राष्ट्रीय धोरणे ही राष्ट्रीय नव्हेत, राष्ट्रद्रोही आहेत; तुमचा देश वेगळा दिसतो, आमचा देश वेगळा आहे असे म्हणून शेतकरी आंदोलनाने यावेळी तथाकथित राष्ट्रीय प्रवाहापासून फारकत घेतली. याचे कारण साधे सोपे होते. एकूच राजकीय संस्था, राजकीय पक्ष, राजकीय नेते यांच्याविषयी लोकांचा भ्रमनिरास झाला होता. ही माणसे आपल्याकरिता काही करीत नाहीत, असे लोकांना वाटू लागले होते. सर्वच राजकीय प्रक्रियेतून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची तड लागेल असे काही कुणाला दिसत नव्हते. 'पुढून मागून जावई, मुलाची वेळ कधीच नाही' तशी जी काही भांडणे व्हायची, राजकीय प्रवाहामध्ये, ती कारखानदार आणि व्यापारी यांची होतील, 'अंबानी' आणि 'वाडिया' यांची होतील; पण शेतीचा प्रश्न त्यात काही निघायचाच नाही. शेतकऱ्यांची जी मुले तिथे राजकारणात गेली, नेतेपदी गेली, मुख्यमंत्री झाली ती मंडळी शेतकऱ्यांची राहिली नाहीत हाही अनुभव आला. जागोजाग सहकारी संस्थांमध्ये, जिल्हा पातळीवर किंवा राज्य पातळीवर जी माणसे गेली तीसुद्धा आपापले खिसे भरण्यात रमून गेली. आता आपले कुणी राहिले नाही, या बाकीच्या इतिहासाचा आणि शेतकरी आंदोलनाचा काही संबंध राहिला नाही. ही पहिली जाणीव शेतकऱ्यांमध्ये १९८० पर्यंत निर्माण झाली.

आणखी काय शेतकऱ्यांना टोचायला लागलं यावेळी? उत्पादनाची शक्ती भरपूर वाढवूनसुद्धा फायदा होण्याऐवजी आपल्याला जास्तच लुटले जाते याची जाणीव शेतकऱ्यांत निर्माण झाली. जेव्हा घरामध्ये एकच गाय ठेवत होतो तेव्हा थोडे तरी दूध घरात राहत होते आणि जेवणाखाणामध्ये, निदान पोराबाळांच्या, जात होते; आता कर्जाच्या दोन गाई किंवा म्हशी घेतल्या आणि दूध सोसायटीला घालायला सुरुवात केल्यानंतर सर्वांचे कष्ट वाढले; पण घरी तेवढेसुद्धा दूध शिल्लक राहीनासे झाले असा अनुभव येऊ लागला. ज्वारी जास्त पिकायला लागली; पण हातामध्ये येणारी गोष्ट एकूण कमी झाली ही एक बोच तयार झाली. या परिस्थितीमध्ये शेतकरी आंदोलनाची वाढ होऊ लागली.

ही १९८० ची गोष्ट. देशामध्ये आणीबाणी येऊन गेली होती. म्हणजे राजकीय व्यवस्था ढासळू लागली होती; पण तरीसुद्धा अगदी बेबंदशाही माजली नव्हती. कायदा नावाची गोष्ट अजूनही अस्तित्वात होती. कायदा असेल तर कायदाभंग करता येतो. कायदाच नसेल तर भंग कशाचा करायचा? आज

जर कुणी बिहारसारख्या राज्यात जाऊन म्हणायला लागले की आम्ही कायदेभंग करणार आहोत तर लोक म्हणतील भंग करण्याऐवजी एखादा कायदा पाळणार असे काही करणार असाल तर ते नवलाचे होईल! कारण कोणताच कायदा काही पाळला जात नाही अशी जवळजवळ सध्या स्थिती आहे. महात्मा गांधींनी दिलेले आंदोलनाचे तंत्र म्हणजे एखादी मागणी पुढे करण्याकरिता जाणीवपूर्वक आत्मक्लेष स्वीकारणे. मग ते उपोषणाच्या मार्गाने असो की तुरुंगात जाण्याच्या तयारीने असो. दुसऱ्यावर क्लेश लादण्यापेक्षा स्वत:वर क्लेश लादून घेण्याकरिता वापरावयाचे वेगवेगळे मार्ग आहेत. यातील सत्याग्रह हा एक आहे. आम्ही कायदा मोडणार आहोत. कोणता कायदा मोडणार आहोत याला फारसे महत्त्व नाही. तो कायदा मोडणाराने निवडायचा असतो. मग तो रस्ता बंद करण्याचा असो की रेल्वे बंद करण्याचा असो.

याचबरोबर शेतकरी संघटनेने सत्याग्रहाला एक नवीन जोड दिली. पाचशे माणसे रस्त्यावर बसवली, पाच हजार बसवली, कधी दोन लाख बसवली. शासनाने जर ठरवले तर पाचशे माणसे तुरुंगात टाकणे त्यांना काही कठीण जाणार नाही; पण त्या काळी आम्ही शेखीने म्हणायचो की आम्ही तीस हजार सत्याग्रही तुरुंगात पाठवले तर महाराष्ट्रातले सगळे तुरुंग भरून जातील; कुठे ठेवाल इतकी माणसे? आणि सरकारलाही त्यावेळी त्याचा धाक वाटायचा. तरीही सरकार ५०० माणसे तुरुंगात डांबू शकते, ३०,००० ही डांबू शकते. गेल्या महिनाभरामध्ये, सरकारी आकडेवारीनुसार, उत्तर प्रदेश सरकारने १ लाख ७० हजार माणसांना तुरुंगात टाकले. कारसेवेच्या आयोजकांचे म्हणणे हा आकडा साडेतीन लाख आहे. सांगायचा मुद्दा, त्या काळी शासनाला ५०० माणसांनासुद्धा अटक करायची म्हणजे धाक वाटायचा. तरीही ते अटक करू शकत होते.

आणि तुरुंगात गेलेली माणसे जर नाउमेद झाली तर मग शेतकरी आंदोलन हे दीर्घ पातळीवर उभे राहणार नाही अशी शक्यता होती. म्हणून तुरुंगात गेलेल्या माणसांच्या मदतीला तुरुंगाबाहेर काही ताकदी काम करीत राहिल्या पाहिजेत. म्हणून शेतकरी संघटनेने आंदोलनाला अर्थकारणाची जोड दिली. कांदा हा विषयच मुळामध्ये अशासाठी निवडला की, महाराष्ट्राचे त्याकाळचे कांद्याचे उत्पादन देशाच्या एकूण उत्पादनाच्या जवळजवळ ४० टक्के होते. पुणे आणि नाशिक जिल्ह्यांत त्यापैकी निम्मा कांदा पिकत होता. त्यावेळी शेतकरी संघटनेची ताकद ती किती? पुणे जिल्ह्यातील जेमतेम एक तालुका. तिला काही



खरी ताकद म्हणता आली नसती. पण चाकण भागामध्ये निदान भात उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीने कांदा थांबवता आला तर कांद्याच्या एकूण बाजारपेठेवर परिणाम घडवून आणता येईल. कांदा मिळेनासा होईल, कांद्याचा भाव वाढेल; आणि मग तुरुंगाच्या बाहेर बाजारपेठेवर दबाव या दोन हत्यारांचा एकाचवेळी उपयोग करण्याचे तंत्र शेतकरी संघटनेने वापरले. म्हणजे सत्याग्रह आणि बाजारपेठेवर दबाव अशी दोन हत्यारे शेतकरी संघटनेने वापरली. हे उसाच्या बाबतीतही खरे आहे, दुधाच्या बाबतीतही खरे आहे आणि कापसाच्या बाबतीतही खरे आहे.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या यशापयशाचे विश्लेषण करायचे झाले, का जिंकलो का हरलो हे तपासायचे झाले तर संख्येच्या बाबतीत शेतकरी संघटना फार कमी पडली असे दिसत नाही; निदान १९८९ पर्यंत तरी कमी पडली नाही. १९८९ पर्यंत चूक कुठे झाली हेच शोधायचे असेल तर आपला बाजारपेठेचा अंदाज चुकला असे लक्षात येते किंवा बाजारपेठेमध्येही काही नवनवीन परिस्थिती निर्माण झाली. सुरुवातीला वाटले कपाशीचे उत्पादन चांगले येणार नाही पण नंतर सुधारले. कधी सुरुवातीला वाटले कपाशीचे उत्पादन चांगले होईल आणि भाव उतरतील त्यावेळी प्रत्यक्षात उत्पादन चांगले झाले नाही आणि म्हणून भाव वाढले. तसे बाजारपेठ ही काही समोर हिशोब ठेवून समजण्यासारखी गोष्ट नाहीच. कुणाचाही अंदाज तिथे चुकू शकतो. आपले बाजारपेठेबाबत अंदाज जिथे जिथे चुकले तिथे तिथे आपल्या आंदोलनाला त्या मानाने कमी यश मिळाले.

१९८९ मध्ये मात्र परिस्थिती बदललेली दिसते. खरे तर, परिस्थिती १९८४ पासूनच बदलायला लागली; पण त्याची पूर्ण जाणीव १९८९ मध्ये झाली. १९८० ते ८४ या काळात सत्यागह आणि अर्थकारण या दोघांची जोड देऊन आंदोलन चालवताना वापरलेला सत्याग्रहाचा मार्ग पुढं चालवणं आता फारसं युक्त नाही, किमान संघटना झाल्यानंतर आता आर्थिक दबावाचा जास्त वापर केला पाहिजे, अशी जाणीव झाली हे परभणी अधिवेशनात जे आंदोलनाचे मार्ग ठरविण्यात आले त्यांवरून स्पष्ट होते. अन्नधान्य फक्त स्वत:पुरतेच पिकवा, विकण्यासाठी पिकवू नका; इंडियन माल–ट्रॅक्टर, वरखते, औषधे वगैरे विकत घेऊ नका, कर्जफेड करू नका वगैरे कार्यक्रम काही फारसे यशस्वी होताना दिसत नाही. उदाहरणार्थ, दूध आंदोलन. त्यावेळी कसलाच सत्याग्रह करायचा नव्हता. फक्त आर्थिक हत्यार वापरायचे होते. कुणी रस्त्यात यायचे नाही,

तुरुंगात जायचे नाही. फक्त दूध देऊ नका.

आर्थिक आंदोलनाला अपयश यायचं कारण म्हणजे त्यात चुकारपणा करायला संधी जरा जास्त असते. शंकराच्या गाभाऱ्यामध्ये दूध नेऊन घालायचे आहे; गावातील सगळेच दूध घालणार आहेत तर आपण नुसते पाणी घातले तर ते सगळ्यांच्या दुधाबरोबर संपादून जाईल अशी भूमिका बहुतेकांनी घेतली तर काय होईल? रस्त्यावर येण्याच्या आंदोलनात तसा वाव कमी असतो. तिथे ओळखता येते, अमुक माणूस आला होता. म्हणून घाबरत घाबरत का होईना माणसे येतात.

आर्थिक आंदोलनात भाग घ्यायचा म्हटले की सर्व शेतकरी समाजाची ताकद लवकर संपते. शेतकरी समजाला काही गोष्टींचे वावडे असते. निवडणुकीपासून दूर राहिलेले शेतकऱ्याला आवडत नाही. चार पाच वर्षांनी होणारी करमणूक असते, त्यात कुणाचा तरी जयजयकार करीत फिरले पाहिजे अशी एक मानसिक आवश्यकता शेतकरी समाजाची असते. त्याचप्रमाणे, त्याला उपोषण करणे झेपत नाही. एकादशी, महाशिवरात्रीचे उपवास करणे वेगळे; पण कष्टाचे शरीर असल्याने उपोषण करणे त्याला झेपत नाही. त्याचप्रमाणे, आर्थिक बदल घडवून आणून आपली ताकद वापरावी अशी काही फारशी संघटित ताकद शेतकरी समाजाची नाही किंवा आपण निर्माण करू शकलो नाही.

हे १९८९ पर्यंतच्या शेतकरी आंदोलनाचे थोडक्यात रूप झाले.

१९८९ नंतर शेतकरी संघटनेने दोनतीन कार्यक्रम घेतले. कर्जमुक्तीचा आणि गावबंदीचा. जातीयवाद्यांना गावबंदीच्या कार्यक्रमात आर्थिक काहीच नव्हते. तरी लक्षात आले की आपण संख्येमध्ये कमी पडतो आहोत. गेल्या निवडणुकीत इतके निक्षून सांगितले की, ‘तुम्हाला कर्जमुक्ती मिळवून देण्याचं माझं व्यक्तिगत आश्वासन आहे. तुम्ही बाकी मुद्द्यांकडे लक्ष देऊ नका. उभे राहिलेल्यांपैकी इतक्यांना निवडून द्या.’ पण लोकांनी ज्या तऱ्हेने मते दिली ती पाहता संख्येची ताकद कमी झाल्याचे दिसते. तरीही जे काही सैन्य मदतीला आले त्यामुळे कर्जमुक्तीबाबत आताचे मर्यादित यश तरी मिळाले; पण या मर्यादित यशावर समाधान मानावे लागले याचे कारण लोक संघटनेबरोबर राहिले नाहीत हे आहे. खरे तर ग्रामीण भागामध्ये कर्जमुक्ती हा महत्त्वाचा मुद्दा असायला हवा होता. लोकांना कर्जमुक्ती नको होती? मग असे का घडले?

शिवसेनेसारखी संस्था-ज्याकडे काही विचार नाही, हिंदू धर्माचे पुरस्कर्ते



म्हणावेत तर धर्म आणि त्यांचा काही संबंध नाही अशी मंडळी अयोध्येचा राम वगैरेसारखी कामे घेऊन पुढे येतात आणि ती वावटळ संबंध महाराष्ट्रातच नव्हे तर संबंध देशभर पसरते आणि १० वर्षांमध्ये आपण शेतकऱ्यांमध्ये तयारी केलेली आर्थिक जाणीव जवळजवळ झाकली जाते असे लक्षात आले.

शेतकरी आंदोलनाची नवीन दिशा ठरवताना आता आंदोलनाचा एकूण ‘इतिहास आणि भूगोल’ बदलला आहे हे लक्षात ठेवायला हवे.

१९८९ च्या पूर्वी मी एक वाक्य अनेक सभांमध्ये वापरीत असे, ‘८९/९० नंतर सत्याग्रहाचे हत्यार तुम्हाला वापरायला मिळायचे नाही.’ सत्याग्रहाचा काळ संपला. कारण सत्याग्रहाकरिता दोन गोष्टी असायला हव्यात त्या उरल्या नाहीत. कायदेभंगाकरिता निदान कायदा पाहिजे आणि त्या कायद्याचा भंग झाला तर त्याबद्दल थोडीतरी लाज वाटणारे शासन पाहिजे किंवा जर का मोठ्या प्रमाणावर लोकांनी कायदा मोडला तर आपली सत्ता जाईल अशी भीती असणारी राज्यकर्ती मंडळी पाहिजे. कायदा नाही आणि तो भंग झाला तर त्याबद्दल लाज वाटणारे शासनही नाही. अशी परिस्थिती असताना सत्याग्रहाचे हत्यार उभे राहू शकत नाही असा माझ्या त्या वाक्याचा अर्थ होता.

१९९० वर्ष पुरे व्हायच्या आतच आपल्या डोळ्यांसमोर आंदोलनाचे एक वेगळेच चित्र दिसते आहे. मंडल आयोगासारख्या प्रश्नावर ज्यांच्या काही तक्रारी आहेत, मागण्या आहेत, ज्यांच्यावर हजारो वर्षे अन्याय झालेत त्यांनी नव्हे तर ज्यांना गेली हजारो वर्षे सामाजिक परिस्थितीचा फायदा मिळाला त्यांनी केलेल्या त्राग्याचे स्वरूप म्हणून जवळजवळ दीडशे तरुणांनी दिल्लीत स्वत:ला जाळून घेतले. एखाद्या उद्रेकाप्रमाणे ते आंदोलन वर आले, आता ते शांत होऊ लागले आहे आणि सरकार बदलल्यामुळे आता त्याची काही आवश्यकता राहणारही नाही कदाचित; पण एका अर्थाने या छोट्या विषयावरचे हे आंदोलन एक सरकार पाडून गेले. हे सरकार पाडण्यातली जी काही महत्त्वाची कारणे आहेत त्यांमध्ये मंडल आयोगाच्या शिफारशीसंबंधी उठलेली ही प्रतिक्रिया महत्त्वाची भूमिका बजावून गेली.

दिल्लीसारख्या ठिकाणी दीडशे तरुणांनी स्वत:ला जाळून घेणे यामधून एक सरकार पडू शकले-लोकशाही सरकार पडू शकले. मागे कपाशीच्या प्रश्नावर आंध्र प्रदेशामध्ये ३० शेतकऱ्यांनी एन्ड्रीन पिऊन आत्महत्या केली; पण कापसासंबंधी धोरणात काही बदल झाला नाही. शासनावर परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने एन्ड्रीन पिऊन मरणारा शेतकरी आणि दिल्लीच्या रस्त्यावर

स्वत:ला जाळून घेणारा कॉलेजमधील तरुण यांच्यामध्ये मोठा फरक आहे असे दिसून येते.

अयोध्येच्या प्रश्नासंबंधी मोठी यात्रा झाली, लाखो माणसे जमली, करोडो रुपये जमले आणि प्रत्यक्ष बाबरी मशिदीजवळ सरकारने केलेल्या गोळीबारात नेमकी किती माणसे मेली कुणी सांगू शकत नाही; पण आता देशाला वातावरणाची एक नवी सवय हळूहळू लागू लागली आहे. पंजाबमध्ये सुरुवातीला रोज वीसपंचवीस माणसं मरत होती. मग रोजचे आकडे बारा पंधराचे यायला लागल्यानंतर वाटायचे की आता परिस्थिती आटोक्यात येते आहे; बरी परिस्थिती आली वाटायचे. आता पुन्हा तो आकडा वीस पंचवीसवर जाऊ लागला. काश्मीरमध्ये तर किती माणसे रोज मरतात याचा कुणाला अंदाजच नाही. देशातल्या देशात अयोध्या प्रश्नावर, मंडल आयोग प्रश्नावर शेकडो माणसे मरू शकतात. शेतकरी आंदोलनाची नवी दिशा ठरवताना हे लक्षात घेतले पाहिजे की ज्या राज्यकर्त्यांपुढे शेतकऱ्यांचे प्रश्न मांडायचे आहेत त्या राज्यकर्त्यांना दररोज सकाळी नाश्त्याला आणि जेवणाला दहा, बारा, वीस पंचवीस मुडदे पाहायची सवय झाली आहे. पूर्वीच्या काळी शेतकरी आंदोलनात दोन तीनच माणसे मेली तर त्याबद्दल खळबळ व्हायची. आता दोनतीन माणसे मेल्यावर कोणावरही काहीही परिणाम होणार नाही.

शेतकरी आंदोलनाने मांडलेले प्रश्न सुटले असे वाटत होते; पण सुटलेले नाहीत. सुटायला कदाचित सुरुवात झाली असेल; पण अजून काही समाधान, शाश्वती वाटते असे नाही. मग जे प्रश्न आहेत ते यापुढे या परिस्थितीत शेतकऱ्यांनी मांडावे कसे? १९८०, ८४ आणि ८९ या सालांमध्ये फरक झाला आहे. शेतकरी संघटना आज संख्येतही कमी पडायला लागली आहे का? त्याला काही कारण आहे का? हाही मुद्दा थोडा तपासून घ्यायला हवा.

आज जर समजा उसाच्या प्रश्नावर आंदोलन घेतले तर नाशिक जिल्ह्यात लाख दोन लाख माणसे रस्त्यावर येतील का? सातारा, सांगली, कोल्हापूर या उसाच्या भागातील शेतकरी जमतील काय? मला वाटतं एक महत्त्वाचा फरक घडलेला आहे.

१९८० मध्ये उसाला एकूण भाव मिळत होता १७५ रुपये आणि आज ३७५ रुपये मिळाल्यावर आपण तक्रार करतो आहोत. गेल्या दहा वर्षांमध्ये शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांच्या हातामध्ये जे काही, रास्त नसले तरी जास्त दिले आहे त्यामुळे काही फरक पडला आहे का? रस्त्यावर नोकरी शोधत बेकार



फिरणाऱ्या मनुष्याला जर का कुणी म्हटलं तर तो पटकन रस्त्यावरचा दगड उचलून दुकानावर फेकायला तयार होतो. पण ज्याचे घर आहे, शेत आहे तो म्हणतो आपले अगदीच काही वाईट नाही, बरे चालले आहे. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' असे समाधान मानून तो त्या दंग्यापासून दूर राहायचा प्रयत्न करीत असतो. दोन महिन्यांपूर्वी अहमदाबादच्या एका संस्थेने एक अखिल भारतीय अभ्यास केला. त्यांचा निष्कर्ष असा की दाढीच्या ब्लेडस्, साबण, कपड्याच्या डिटर्जंट पावडरी, रेडिओ, टेलिव्हिजन वगैरे वस्तूंची ग्रामीण भागातील मागणी देशाच्या एकूण मागणीच्या आता ४० ते ६० टक्के आहे. पूर्वी ती १५/२० टक्केसुद्धा नव्हती. एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शेतीचा हिस्सा ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे. ग्रामीण भागातील बिगर शेती व्यवसायांचे उत्पन्न त्यात धरले तर ते एकूण ५० टक्के आहे असं धरू. तरी ग्रामीण भागातील ग्राहकांची मागणी आता ४० ते ६० टक्के यायला लागली आहे. एवढेच नव्हे तर सध्या ज्या नवनवीन कंपन्या शेअर्स काढतात त्या मार्गानेसुद्धा कारखान्यांत गुंतवणूक करणारांची ग्रामीण भागातल्या लोकांची संख्या वाढत आहे आणि मोठमोठ्या कंपन्यासुद्धा आपले शेअर्स या ग्रामीण भागात खपावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. याचा एक अर्थ असा निघू शकतो की लोकांची परिस्थिती काही फार सुधारली आहे असे नव्हे; पण पोटाला जो काही चिमटा बसत होता तो आता कमी झाला आहे. कळवळून उठावे असा चिमटा काही बसत नाही. दुसरा अर्थ असा होतो की या आंदोलनाचा आर्थिक फायदा ज्यांना मिळाला त्यांनी आता आंदोलनात रस घ्यायचे सोडून दिले आहे.

मग पुढे असा प्रश्न निर्माण होतो की चिमटा बसतो म्हणून तक्रार करणारा समाज ग्रामीण भागात शिल्लक राहिला आहे का नाही? का सगळ्यांचे प्रश्न सुटलेत? आंदोलन करून उठण्याकरिता कोणी तयार आहे का?

ज्या अर्थी, रामाच्या नावाने का होईना दंगेधोपे करायला लोक तयार होतात त्या अर्थी असंतोष आहे हे मानायला जागा आहे. त्या असंतोषाला आर्थिक शब्द मिळाले नाहीत तर ते धार्मिक शब्द घेतात, जातीय शब्द घेतात.

आर्थिक स्थिती सुधारली म्हणावी तर आर्थिकदृष्ट्या जो समाज वर चढत असतो त्या समाजामध्ये अशा तऱ्हेचे सांप्रदायिक दंगे होत नाहीत; पण ते होतात त्याअर्थी असंतोष आहे. ज्यांच्यामध्ये असंतोष असायला हवा ती माणसे उठताना दिसत नाहीत; ती उठली तर त्यांच्या हाती जी काही साधने असू शकतात त्या साधनांनी काही परिणाम घडेल असे दिसत नाही.

शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय होत असतानासुद्धा शेकडो-हजारो लोक तुरुंगात गेले तरी शेतकऱ्यांनी शांतता सोडली नाही. शेतकऱ्यांचा हा गुण की अवगुण?

ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता यापुढे शेतकरी आंदोलन किंवा सज्जन आंदोलन, सभ्य आंदोलन, कायदेभंगाचे आंदोलन अशा आंदोलनाला काही भविष्य आहे की नाही? का ज्यांना हातामध्ये शस्त्र घ्यायची हिंमत नाही त्यांनी आता घरी जाऊन स्वस्थ बसावे आणि जी काही भाकरी चटणी समोर येईल तेवढी खाऊन समाधानी राहावे आणि ज्यांच्या हातामध्ये बंदुका घेण्याची ताकद आहे तेच यापुढे देशाचे राजकारण आणि दिशा ठरवणार असे झाले आहे काय?

*(शेतकरी संघटक, २१ नोव्हेंबर १९९०)*

■



एकोणावीस

# दुष्काळाची झळ शेतकऱ्यांनाच का?

प्रिय मोहनजी,

सप्रेम नमस्कार

विषय : महाराष्ट्रातील वारंवार पडणारा दुष्काळ कायम हटविण्यासाठी...

वरील विषयावरील आपले ५ मे १९९२ चे पत्र मिळाले. वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून, असेच पत्र आपण वेगवगळ्या राजकीय संघटना व राजकीय पक्षांचे नेते तसेच स्वयंसेवी संघटनांच्या कार्यकर्त्यांनाही पाठविले आहे असे कळते.

महाराष्ट्रात सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी हलाखी झाली आहे. जनावरांना घालण्यासाठी चारासुद्धा दुरापास्त झाला आहे. काही किरकोळ अपवाद सोडता, माणसांचे भूकबळी कोठे होतील असा काही मोठा धोका दिसत नाही. 'भूकबळी म्हणजे पोटात घालायला अन्न सतत आठवडे आणि आठवडे मिळालेच नाही म्हणून येणारा मृत्यू' या अर्थाने भूकबळी होणार नाहीत; पण कुपोषणामुळे येणारी शारीरिक कमजोरी आणि त्यामुळे होणारे व पसरणारे आजार लक्षात घेतले तर असे भूकबळी सुकाळाच्या वर्षीसुद्धा होतात; दुष्काळाच्या वर्षी अशा बळींची संख्या वाढेल, एवढेच काय ते! पोटात घालायला काही मिळाले नाही म्हणजे काहीही वेडेवाकडे, अरबट चरबट भुकेलेला माणूस पोटात घालतो आणि त्यातून गॅस्ट्रोपासून ते विषबाधेपर्यंत अनेक आजार उद्‌भवून ते त्या बिचाऱ्याचा प्राण हिरावून घेऊ शकतात. असे भूकबळीही वर्षानुवर्षे घडत असतात, यंदाही घडतील.

परिस्थिती गंभीर आहे याची शाब्दिक आणि तोंडदेखली जाणीव तरी सर्वत्र आहे. मुख्यमंत्र्यांनी इतर सर्व खात्यांची अंदाजपत्रके २५ ते ३० टक्क्यांनी कमी करून सिंचन आणि पाणीपुरवठा यासंबंधी प्रकल्पांकरिता रक्कम उपलब्ध करून देण्याची मोठी सनसनाटी घोषणा करून टाकली आहे. त्यासंबंधीचा निर्णय तातडीने दोनच दिवसांत भरणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत व्हायचा होता. वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून, प्रस्तुत बैठकीत तो विषय निघालाच नाही असे दिसते. हे कसे घडले असेल आणि झारीतील शुक्राचार्य कोण असतील याची कल्पना करणे काही फार कठीण नाही.

सत्ताधारी पक्षाची परिस्थिती कोणत्याही दुष्काळात मोठी कठीण होते. आपण काहीतरी करतो आहोत असे दाखविणे तर त्याला आवश्यकच असते. आगीचा भडका उडून गेल्यानंतर ती तातडीने विझविण्यासाठी आगीचे बंब आणले जातात त्याचप्रमाणे दुष्काळाची दाहकता कमी व्हावी यासाठी जुजबी, तात्पुरती किंवा थातुरमातुर योजना कोणत्याही शासनाला करावीच लागते. अगदी शिवराम महादेव परांजप्यांच्या काळातही परदेशी सरकारलासुद्धा खडी फोडायची कामे चालू करावी लागतच होती. आजकाल अशी कामे देण्याची जी व्यवस्था आहे तिला 'रोजगार हमी योजना' म्हटले जाते आणि पुरोगामी महाराष्ट्रातल्या कर्तृत्वान नेत्यांनी राबविलेली क्रांतिकारी योजना असा तिचा गवगवा केला जातो. प्यायला पाणी नाही म्हणून लांबलांबून टँकर लावून पाणी गावांना पुरविले जाते; त्यासाठी अत्यंत दुर्मिळ आणि महाग अशी खनिज तेले बेहिशेबी वापरली जातात. कोठे कोठे जनावरांना चारा पुरविण्याची व्यवस्था होते, काही ठिकाणी जनावरांना आणून बांधण्याकरिता छावण्या उघडल्या जातात. हे असले प्रयत्न आणि योजना शासनाच्या आवाक्यातल्या असतात, प्रशासनाला अशा योजना राबविणे आवडते. दुष्काळाची टांगती तलवार असली म्हणजे अशा परिस्थितीत आणीबाणी असल्याप्रमाणे वागता येते. उधळमाधळ, अकार्यक्षमता थातुरमातुर कारणे सांगून बासनाआड घालता येतात. अशा योजना लोकप्रतिनिधींना आणि विशेषत: सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींना सोयीस्कर वाटतात. एवढेच नव्हे तर त्यांच्याकरिता दुष्काळ म्हणजे एक मोठी पर्वणीच असते. शासनाविरुद्धचा सर्व रोष, असंतोष व उद्रेक शमून जातात आणि दुष्काळाने हवालदिल झालेली जनता बाकी सगळे विसरून आपापल्या



भागांत चारापाणी व रोजगार यांची व्यवस्था व्हावी यासाठी आमदारांच्या घरी खेटे घालू लागतात.

विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना त्यामानाने दुष्काळाचा फारसा फायदा मिळत नाही. ते आरडाओरडा करू शकतात. निदर्शने मोर्चे घडवून आणू शकतात; पण दुष्काळग्रस्त जनतेला हे पक्के ठाऊक असते की काही मिळवायचे असेल तर सत्ताधारी पक्षाच्या प्रतिनिधींकडेच गेले पाहिजे. दुष्काळासारख्या संधीचा सगळाच्या सगळा लाभ राज्यकर्त्या पक्षालाच मिळतो याचे वैषम्य विरोधकांना, साहजिकच टोचत असते. मग ही खदखद 'विधानसभेतील गदारोळ' किंवा 'सातआठ तासांचा बंद' अशा मार्गांनी बाहेर काढण्याखेरीज त्यांना काही फारसा पर्याय नसतो.

दुष्काळामुळे जसजशी सगळी वनराई, झाडे, गवतापाला नाहीसा होऊ लागतो तसतशी एक वेगळीच वाढ सगळीकडे दिसू लागते. पावसाळा सुरू झाला की जमिनीतून वेगवेगळे प्राणी बाहेर पडू लागतात, दगडादगडाखालून कीटक-किडे निघू लागतात. तसेच दुष्काळाच्या कठोर दाहकतेतही एक वेगळी जीवसृष्टी बाहेर येते. इतर देशांतल्याप्रमाणेच भारतात आणि भारतातल्याप्रमाणेच महाराष्ट्रात पर्यावरणाशी संबंधित असलेल्या संस्थांचे पेव फुटले आहे. जगभरच आणि विशेषत: औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांत पर्यावरण हा अत्यंत ज्वलंत प्रश्न म्हणून भेडसावतो आहे. त्यासाठी अनेक संस्था उभ्या राहतात, प्रचंड निधीही उभे राहतात. त्यामुळे खरूज, नारू थैमान घालत आहेत अशा प्रदेशांतसुद्धा रासायनिक प्रदूषण, ओझोन थरावरील परिणाम, ग्रीन हाऊस इफेक्ट अशी शब्दावली मिरविणारे कार्यकर्ते उदंड झाले आहेत. विषयच मुळी मोठा फॅशनेबल! या विषयावर जागोजाग, देशी-परदेशी शेकडो-हजारोंनी संवाद-परिसंवाद भरत असतात; वर्तमानपत्रांत बातम्या येत असतात. अगदी किरकोळ काम करणाऱ्यांवरसुद्धा निधीचा, पारितोषिकांचा आणि सन्मानांचा वर्षाव होतो. साहजिकच, पर्यावरणाचे संरक्षण हा गरिबी हटविण्याच्या कार्यक्रमाइतकाच प्रचंड आणि किफायतशीर व्यवसाय बनतो आहे.

हे सगळे काही निष्क्रिय वाचीवीर आहेत असे नाही. त्यातील काही प्रामाणिक जाणकारांनी आपापल्या लहानशा गावात, प्रदेशात, कोपऱ्यात काही कामे करून दाखविली आहेत आणि भौगोलिकदृष्ट्या मर्यादित का होईना,

डोळ्याला सुख वाटावे असे नमुने तयार केले आहेत. एकट्या महाराष्ट्रातच अशी पाचपंचवीस तरी उदाहरणे असतील. या नमुन्यांची आता पुनरावृत्ती सगळीकडे झाली म्हणजे पर्यावरणाचा प्रश्न संपला, पाण्याचा मिटला, दुष्काळ हटला अशी यांची भाबडी समजूत आहे. कुटुंबातले प्रश्न आणि भातुकलीच्या खेळातले प्रश्न अलग अलग आहेत याचा त्यांच्या कविमनाला विसर पडतो. त्यांच्याबरोबर असलेले बहुतेक तर हौसे, नवसे, गवसे या सदरातच मोडणारे; 'झाडे लावा म्हणजे दुष्काळ कायमचा हटेल' असल्या तर्कविसंगत घोषणा दिवसरात्र परत परत देत राहणारे. या अशा तऱ्हेच्या संस्थांचीही दुष्काळात मोठी चलती होते.

यंदा वळीवाच्या पावसाने अगदीच डोळे वटारले आहेत. उगाच कोठे एखादी सर शिंपडून वळीव नाहीसा झाला आहे. उद्या जर का महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत वळीवाचे ढग भरून आले आणि जोरदार पाऊस झाला, थोडेफार का होईना, ओढे, नाले, तळी, तलाव भरून आले तर दुष्काळाचा विषय कोणाच्याच विषयपत्रिकेवर राहणार नाही. राज्यकर्त्या पक्षाला त्याचा विसर पडेल, विरोधक काही नवीन सनसनाटी विषयाच्या शोधास लागतील आणि पर्यावरणजीवी संस्था व व्यक्ती त्यांचे परिसंवाद, अभ्यास, जाहीरनामे यांमध्ये दुष्काळाविषयी थोडे कमी बोलतील.

या दुष्काळाच्या कठीण अवस्थेत का होईना, दुष्काळ कायम हटविण्याकरिता काही ठोस कार्यक्रम उभा करण्याचे आपण व आपल्या सहकाऱ्यांनी मनात घेतले आहे त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. महाराष्ट्रात आजपर्यंत असा एकही दुष्काळ झाला नाही की ज्या वेळी दुष्काळाचा कायमचा बंदोबस्त करून टाकण्याची भीमगर्जना झाली नाही. या विषयावर फॅमिन कमिशन्स नेमण्यात आली, तज्ज्ञ समित्या नेमण्यात आल्या, अहवाल झाले, पाण्याच्या सिंचनाच्या काही योजना झाल्या; पण दुष्काळ बेटा काही कायमचा हटायला तयार नाही. अपणास नाउमेद करण्याकरिता मी हे लिहितो आहे असे नाही. उमेद गमावणाऱ्यांपैकी आपण नाही हे मी पाहतोच आहे आणि म्हणून काही गोष्टी आपणास लिहिण्याचे मनात आणले आहे. त्यांचाही आपण विचार करावा. १९८२ पासून जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात कमी-अधिक दुष्काळसदृश परिस्थिती तयार झाली तेव्हा तेव्हा या सर्व गोष्टी मी पुढे मांडल्या आहेत. त्यावेळी



त्यांच्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही. आज काही वेगळे होईल अशी अपेक्षा नाही. पण आपल्या हातून मांडणे झाले नाही अशी रुखरुख मनात राहू नये यासाठी हा सर्व प्रपंच.

आपल्या पत्रातील पहिल्याच वाक्यात आपण म्हणता,

*दुष्काळ हा आपल्या राज्याच्या ग्रामीण भागाचा आणि अर्थव्यवस्थेचा स्थायीभावच झाला आहे. दुष्काळ पडला की पिण्याचे पाणी, जनावरांना चारा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना काम देणे अपरिहार्य ठरते.*

या आपल्या वाक्यातच दुष्काळाच्या समस्येची गुरुकिल्ली आहे.

पाऊस अपुरा पडला म्हणजे दुष्काळ पडतो. कधी कधी अतिवृष्टी झाली तर ओला दुष्काळ होतो. दुष्काळ पडला की शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. पिण्याच्या पाण्यासाठी, जनावरांच्या चाऱ्यासाठी आणि जगायसाठी शेतकऱ्यांची केविलवाणी धावपळ सुरू होते. शहरांत असे काही होत नाही. महाराष्ट्रात भले दुष्काळ पडला असेल, मुंबईच्या जीवनात कोठे तसूभरही फरक पडलेला नाही. दुष्काळी कामांवर येणारे झाडून सारे शेतकरी असतात. कोणी सरकारी कर्मचारी येत नाहीत, बँकेचे लेखनिक येत नाहीत, कारखान्यांचे कामगार नाहीत. फक्त शेतकरी तेवढा फरफटत येतो; बायकापोरांसकट येतो. खडी फोडण्याची हातांना सवय नाही, हातातून रक्त येत असले तरी चिंध्या गुंडाळून किंवा पदर गुंडाळून खडी फोडतात. त्यात सगळे येतात; शेतमजूर येतात, शेतकरी येतात. मराठवाड्यात तर अगदी वीसपंचवीस एकर जमिनीचे मालकसुद्धा दुष्काळी कामावर येतात. विदर्भ हा सधन प्रदेश. आजपर्यंत दुष्काळी कामे विदर्भात माहीत नव्हती. आता तेथेसुद्धा दुष्काळी कामांच्या छावण्या चौफेर भरू लागल्या आहेत. पाऊस कमी पडला म्हणजे गाव उद्ध्वस्त, शहर निर्धास्त. शेतकरी निर्वासित आणि शहरवासीयांच्या सुखाला जराही तोशीस नाही. दुष्काळ 'भारता'चा आहे, 'इंडिया'चे सुख तो दुखावत नाही. हे काय गौडबंगाल आहे? या प्रश्नातच दुष्काळाच्या समस्येची गुरुकिल्ली आहे.

चांगला पाऊस पडला, अन्नधान्याची लयलूट झाली तर त्याचा फायदा काय एकट्या शेतकऱ्याला होतो? भाजीपाला, अन्नधान्य भरपूर येते, स्वस्ताई होते त्याने सगळे खुश होतात. शेतकऱ्यांपेक्षासुद्धा बिगरशेतकरी अधिक खुश होतात. सुबत्तेच्या वर्षी पोटात दोन घास जास्त जातात एवढाच शेतकऱ्याला

आनंद. चांगले पीक आले आहे तर पुढच्या दुष्काळी वर्षासाठी बेगमी म्हणून काही मोलाची, पैशाची साठवणूक करावी म्हटले तर शक्य होत नाही, कारण सगळे भाव कोसळतात, हाती काहीच राहत नाही. चांगल्या वर्षात बाकी सर्व खुश, दुष्काळात शिक्षा मात्र शेतकऱ्याला.

देशातील निम्मे उत्पन्न शेतीतून येते. शेती बंद म्हटल्यावर इतर कामे पण कमी होत असली पाहिजेत. तेथली माणसे काही दिवसतरी दुष्काळी कामावर का येत नाहीत? पाऊस कमी पडला म्हणजे फक्त शेतीचेच नुकसान होते असे नाही. धरणांत पाणी कमी पडते. कारखाने दोन दोन महिने बंद ठेवावे लागतात. त्या कारखान्यांचे मालक सोडा, कामगार तरी दुष्काळी कामावर खडी फोडायला येतात? कधीच नाही.

ते म्हणतात, 'यंदा दहाच महिने कारखाना चालला. जेवढा माल तयार झाला तेवढ्यावरच बारा महिन्यांचा खर्च टाकू किंवा आधी झालेल्या फायद्यातून या दोन महिन्यांचा खर्च चालवू. यंत्रांचे तेलपाणी, दुरुस्ती राहिली होती; या काळात ती उरकून घेऊ. म्हणजे वीज सुरू झाली की झपाट्याने उत्पादनाला लागू.'

त्यांना घरदार फुंकून दुष्काळी कामावर खडी फोडायला यावे लागत नाही.

दुष्काळ पडला तर शेतकऱ्यालासुद्धा म्हणता आले पाहिजे, 'यंदा पाऊसबाबाची मर्जी दिसत नाही. ठीक आहे. तो आपला काही नोकर नाही. तो आपल्या मर्जीनेच पडणार. यंदा पिकाचे काम कमी तर जमिनीची पडून राहिलेली कामे उरकून घेऊ. हरळी फार माजली आहे. नागरमुथा वेचून घ्यायला हवा. चर सावरून घ्यायला पाहिजेत, बांधबंदिस्ती सुधारायची राहिली आहे. यंदा ही कामे उरकून घेऊ म्हणजे  पुढच्या वर्षी चांगला पाऊस पडला तर बंदा रुपया पीक येईल अशी व्यवस्था करू.'

शेतकऱ्याला असे का म्हणता येत नाही? त्यालाच दुष्काळी कामावर खडी फोडावयास का जावे लागते? जेव्हा चांगला पाऊस पडतो, पीक चांगले येते तेव्हाही त्याच्या हाती काही येत नाही म्हणूनच ना? आपल्या देशात दोनचार वर्षांतून एकदा दुष्काळ येतोच. शेतकऱ्यांचे हाल होतात ते पाऊस न पडल्यामुळे नाही. जेव्हा पाऊस पडतो तेव्हासुद्धा त्याला काहीच मिळत नाही, पिकते त्यालाही भाव नाही म्हणूनच ना ? दुष्काळात शेतकरी खडी फोडतो तो त्याच्या



मालाला भाव नाही म्हणून. पाण्याच्या अडचणीचेही कारण शेतकऱ्याची आर्थिक अडचणच आहे. आमच्या पूर्वजांनी जी गावे वसविली ती काही वेड्यासारखी वसविली नाहीत. तिथले पाणी संपले तर आमची हलण्याची ताकद नाही. असेल तिथून पाणी पंपाने गावाजवळ आणण्याची ताकद नाही म्हणून पाण्याचा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या प्रत्येक हलाखीचे मूळ कारण शेतीमालाला भाव नाही हेच आहे.

काय गंमत आहे पाहा. पोट भरण्यासाठी शेतकरी खडी फोडतो म्हणजे काय फोडलेली खडी पोटात भरतो काय? नाही, तो खातो ज्वारीच. ते धान्य देशात भरपूर आहे, ते पोटात घालावयास मिळावे म्हणून त्याला खडी फोडावी लागते ही काय भयानक अवस्था आहे? दुष्काळी कामावर हात फोडून घेणाऱ्या शेतकऱ्यांचे साखर कारखान्यांत पैसे ठेवीच्या रूपाने पडून आहेत; सोसायटीत, बँकेत भागाच्या रूपाने त्याचे पैसे अडकले आहेत. त्या पैशावर उचल मिळाली तरी तो खडी न फोडता पोट भरू शकेल; पण शेतीमालाला भाव नाही तोपर्यंत हे शक्य होणार नाही. त्याला खडीच फोडावी लागणार आहे.

म्हणजे, दुष्काळ काही अस्मानी संकट नाही, त्यात सुलतानीचा अंश महत्त्वाचा आहे.

शेतकऱ्यांची हलाखी ही केवळ पावसाच्या अनियमितपणामुळे होते हे म्हणणेही फारसे बरोबर नाही. युरोपातील बहुतेक देशांत प्रत्येक वर्षातील कितीतरी महिने जमीन बर्फाच्छादित राहाते; पण तिथला शेतकरी काही देशोधडीला लागत नाही; इतर नागरिकांच्या बरोबरीने जीवनमान आणि सन्मान उपभोगतो.

दुष्काळासंबंधी आणखी एक गैरसमज पसरलेला आहे. जंगलतोड झाली, पृथ्वीवरचे नैसर्गिक आवरण संपले त्यामुळे पाऊस अनियमित झाला व त्यामुळे दुष्काळ चालू झाले असे मत थोर माणसे मोठ्या गंभीरपणे मांडताना दिसतात. वनराई आणि पाऊसमान, विशेषतः मान्सून प्रदेशातील पाऊसमान कोणते घटक ठरवितात याविषयी गंभीर अभ्यासाला, खरे म्हटले तर, आता सुरुवात होत आहे. सूर्यावरील डागांपासून ते वाढत्या कारखान्यांच्या चिमण्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरापर्यंत अनेक गोष्टींचा पाऊसमानावर परिणाम असू शकतो. काही घटक दूरकालीन आहेत, काही घटक हंगामी आहेत. दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या वेळी महाराष्ट्रात सतत बारा वर्षे पाण्याचा एक थेंबही पडला नाही असे म्हणतात.

त्या काळी तर महाराष्ट्रात घनदाट जंगलांची कोठे कमतरता नव्हती? तेव्हा, दुष्काळाची उपपत्ती अस्मानी संकटाशी लावणे आणि त्या अस्मानी संकटाचा बादरायणी संबंध केवळ वनस्पतीच्या आच्छादनाशी लावणे तर्कसुसंगत नाही. या पलीकडे जाऊन असेही म्हटले पाहिजे की तर्कविसंगती काही भोळेभाबडेपणातून आलेली नाही, त्यामागे काही निश्चित बुद्धी आहे.

या विषयावर आजपर्यंत माझ्या पाहण्यात आलेली अत्यंत खोलवर विश्लेषण करून केलेली मांडणी म्हणजे डॉ. चारुदत्त दाभोळकर यांचे 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना' हे पुस्तक. आपल्या वाचनात हे पुस्तक आले असेलच. आपण पुन्हा एकदा ते जरूर नजरेखालून घालावे.

अनेक लोकांमध्ये आणि विशेषत: पर्यावरणवाद्यांमध्ये असा विचार दिसतो की मोठ्या धरणयोजना या सगळ्या निरर्थक आहेत आणि त्या सर्व रद्द करून लहान पाणीपुरवठ्याच्या योजना आणि पारंपरिक पाणीसंकलाच्या पद्धती यावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे. या विचारात काही तथ्य आहे; पण बराचसा एकांगीपणाही आहे. १९५७ पासून अमलात आणलेल्या सर्व मोठ्या धरणयोजनांवर मी टीका केली आहे. या योजना प्रशासन, पुढारी आणि कंत्राटदार यांच्या सोयीसोयीच्या (Administration-friendly, Politician-friendly, Contractor-friendly)असतात हे मी आग्रहाने सांगितले आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र आणि लाभक्षेत्र यांमध्ये प्राथमिक कार्यवाही न झाल्यामुळे धरणांवर खर्च झालेला बहुतेक पैसा गाळात गेला आहे. भूगर्भातील पाणी हे सिंचनव्यवस्थेतील मूलभूत अंग असले पाहिजे हेही मी आग्रहाने मांडले आहे; पण व्यापक पातळीवरील सिंचनव्यवस्थेत पाणलोट क्षेत्र व लाभक्षेत्र यांची योग्य ती निगा राखणाऱ्या मोठ्या धरणांचे महत्त्वाचे स्थान आहे हे नजरेआड करून चालणार नाही. महाराष्ट्रात दुष्काळ हटविण्यासाठी ज्या गोष्टी करावयास पाहिजेत त्यात 'कृष्णे'सारख्या योजनांचा अंतर्भाव असणे अपरिहार्य आहे. गेल्या काही दशकांत छोटे छोटे बंधारे, कोल्हापूर बांध, वसंत तलाव आणि पाझर तलाव यांची काही थोडीथोडकी कामे महाराष्ट्रातून झाली नाहीत! पण या दुष्काळाच्या वर्षी पाझर तलावांच्या आसमंतातसुद्धा दुष्काळाची दाहकता लवांशानेही कमी नाही. आपल्या कार्यक्रमातील सर्व प्रकल्प पुरे झाले तरी त्यातून महाराष्ट्र सातत्याने सुजलाम् होऊन जाईल हे एक स्वप्नरंजन आहे.



महाराष्ट्र आहे हा असा आहे. भगीरथ प्रयत्नांनीसुद्धा तीस टक्क्यांवर जमीन बागायती होऊ शकणार नाही आणि अगदी अत्यधुनिक सिंचनाच्या प्रचंड भांडवली खर्चाच्या योजना अमलात आणल्या तरी महाराष्ट्राचा काही पंजाब होणार नाही. या वास्तवतेचा बोध घेऊन महाराष्ट्रात अर्थव्यवस्था, उद्योगधंद्यांची वाढ, शेतीचे स्वरूप, पिकवायची पिके आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण यासंबंधी रूपरेषा ठरविली पाहिजे. सरकारने आणि प्रशासनाने आपलेच घोडे मध्ये दामटले नसते तर असा विकास निसर्गत:च झाला असता. तो आजपर्यंत झाला नाही.

आपल्या सर्व आराखड्यातील एका गोष्टीला मात्र माझा सक्त विरोध आहे. हे कार्यक्रम राबविण्यासाठी अधिकारी, अनुभवी तज्ज्ञ, पंचायत समितीचे सभापती, स्थानिक आमदार, बी.डी.ओ., ब्लॉकवार सल्लागार समित्या, सामाजिक, शैक्षणिक व सहकारी आदी क्षेत्रांना प्रतिनिधित्व, त्याखेरीज जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, खासदार, पक्षांचे नेते इत्यादींचे जिल्हा पातळीवर आणि मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय समित्यांचे वर्चस्व मोठे भयावह आहे. आपल्या कार्यक्रमाचे नेतृत्व अशा तऱ्हेचे राहिले तर तो कार्यक्रम यशस्वीपणे अमलात येण्याची सुतराम शक्यता नाही. त्यातून फक्त पुढारी, अधिकारी आणि संस्था यांचीच चंगळ होईल. जवाहर रोजगार योजनेचा अनुभव ताजा आहे, तरीही याच मार्गाने शासन जाणार आहे आणि अपयशी होणार आहे याची मला दु:खद जाणीव आहे.

बाहेरून गावात आलेला निधी कार्यक्षमतेने, ठरलेल्या कामासाठी वापरला जाण्याची काहीही शक्यता नाही आणि शेतकऱ्यांचे अशा तऱ्हेची कामे स्वत:च्या ताकदीवर हाती घेण्याचे पिढ्या न् पिढ्यांच्या शोषणामुळे सामर्थ्य नाही. शेतीची संरचना (infrastructure) भांडवलनिर्मितीच्या अभावानेच नष्ट झाली आहे. याला खरा कार्यक्षम उपाय म्हणजे शेतीमध्ये भांडवलनिर्मिती होऊ देणे हाच आहे. नव्या शासनाची खुली अर्थव्यवस्था शेतीलाही लागू केली तर हे आपोआप घडून येईल. त्याला किती वर्षे लागतील कोणास ठाऊक?

तातडीने दुष्काळ हटविण्यासाठी काही कामे गावोगावच्या शेतकऱ्यांनी हाती घ्यावी अशी प्रामाणिक इच्छा असेल तर त्यासाठी काही वेगळी व्यवस्था लागेल. याकामी सरकारने सैरभैर पैसा उधळण्यापेक्षा, सहकारी संस्थांतील

भागभांडवलासारखी अडकून पडलेली रक्कम दुष्काळ निवारणाच्या कामाकरिता उपलब्ध करून दिली तर अशा योजना जबाबदारीने पार पाडल्या जातील. पण, या पत्राचा हेतू पर्यायी योजना देण्याचा नाही.

आपण पत्र लिहिलेत. शेतकरी संघटनेची दुष्काळ प्रश्नाविषयीची दहा वर्षे सातत्याने मांडली गेलेली भूमिका आपल्यासमोर ठेवण्याकरिता हे पत्र.

कळावे.

१० मे १९९२ **शरद जोशी**

*('वनराई' चे अध्यक्ष माजीमंत्री मोहन धारिया यांच्या पत्राला शरद जोशी यांनी दिलेले उत्तर. शेतकरी संघटक, २१ मे १९९२)*

■



वीस

# शेतकऱ्यांच्या पोटावर नव्हे पाठीवर थाप मारणारा राजा हवा

हा आगळावेगळा आणि आल्हाददायक प्रसंग आहे. स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा स्मृतिदिन आहे. सर्व गंभीर भावनाही मनात आहेत; पण प्रसंग आगळावेगळा अशासाठी की, शेतकऱ्यांच्या एका राजाचं कौतुक करण्याच्या या कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभापती स्वत: अध्यक्ष म्हणून उपस्थित आहेत. राज्याचे मुख्यमंत्रीसुद्धा शेतकऱ्यांच्या या कार्यक्रमाला हजर राहाणं आवश्यक समजून हजर आहेत हेही विशेष आहे. सर्वसाधारणपणे पंतप्रधान, मुख्यमंत्री इत्यादी हे कारखानदारांचे, व्यापाऱ्यांचे असे कार्यक्रम झाले तर त्याला आवर्जून हजर राहतात. पण शेतकऱ्यांच्या कार्यक्रमाला तितके आवर्जून हजर राहात नाहीत. पण हा एक अपवादाचा कार्यक्रम झाला आहे.

वसंतराव नाईकांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्याच्या आणि ज्या आमच्या शेतकऱ्यांनी कौतुकास्पद काम करून दाखविले आहे त्यांच्या कामाचं कौतुक करण्याच्या या कार्यक्रमाला हजार राहण्याकरिता आपण मला निमंत्रण दिले याबद्दल प्रथम मी तुमचे आभार मानतो. तसा मी काही या कर्तबगार शेतकऱ्यांचं कौतुक करण्यास पात्र माणूस नाही. शेतीमध्ये मी काही प्रयोग केले असतील, नसतील. इथे जमलेली मंडळी ही वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तबगारी गाजविलेली मंडळी आहे. कुणी द्राक्षांचं काम केलं आहे, कुणी निर्यातीचं काम केलेलं आहे, कुणी रत्नागिरीला हापूस आंब्याचं काम केलेलं आहे. त्यामुळे, मला येथे येण्याचा मान देणे म्हणजे एखाद्या नॉनमॅट्रिक माणसाला एकदम एखाद्या विद्यापीठाचा कुलगुरू नेमावं असं झालं आहे. तरीही, या कर्तबगार मंडळींना समोरसमोर भेटून त्यांच्या गळ्यात हार घालण्याचे भाग्य लाभते आहे म्हणून,

प्रकृतीचं कारण बाजूला ठेवून, पुसदसारख्या दुर्गम गावी मी आवर्जून हजर राहिलो आहे.

स्व. वसंतराव नाईकांचं गुणवर्णन करताना एकदोघांनी, ते बारा वर्षे महाराष्ट्राचे नेते होते असे म्हटले. यात थोडी गल्लत होते आहे. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असणं म्हणजे महाराष्ट्राचा नेता असं काही समीकरण नाही. मी शेतकरी आंदोलनात पडल्यापासून महाराष्ट्रात पुष्कळ मुख्यमंत्री होऊन गेले. आज मागे वळून पाहिले तर त्यांना महाराष्ट्राचे नेते म्हणणे अवघड आहे. महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद, महाराष्ट्राचं नेतृत्व मिळविण्याची पहिली पायरी असू शकेल; ही पायरी घेतलीच पाहिजे असेही नाही.

सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांचं टेलिव्हिजनवरील पहिलं भाषण ऐकल्यावर त्यांना मी जे पत्र लिहिलं त्यात पहिलं वाक्य असं होतं. ''कोणी मुख्यमंत्री झाले किंवा कोणी पंतप्रधान झाले म्हणजे जी गर्दी उसळते त्या गर्दीत मिसळणारा मी नाही. पण तुमचं भाषण ऐकलं आणि मला असं वाटलं की वसंतरावांची परंपरा कदाचित चालवू शकेल असा मनुष्य मुख्यमंत्रिपदावर आला आहे.'' मला काही त्यांच्याकडून काही मिळवायचं आहे म्हणून मी त्यांचं कौतुक केलं नाही. उलट, मी त्यांना सांगितलं आहे की मी तुमच्याकडे जे काही मागायला येईल ते शेतकऱ्यांकरिता मागायला येईल; माझ्याकरिता कदापि काही मागणार नाही; पण वसंतरावांची गादी नसली तरी त्यांचं व्रत चालवण्याचा प्रयत्न खरोखरी कोणी केला असेल तर तो त्यांच्या पक्षीय किंवा शासकीय वारसांनी नव्हे, तर तो आम्ही रस्त्यावर बसणाऱ्या शेतकऱ्यांनी केला असं मी आग्रहाने सांगू इच्छितो. मोठ्या लोकांचं दुर्दैव असं असतं की त्यांचे शिष्य त्यांच्या मोठेपणाच्या सावलीत येतात. महात्मा गांधी होऊन गेले. नंतर त्यांच्या शिष्यांना काय करावं समजेनासं झालं. मग कोण सूतच कातताेय, तर कोणी ग्रामसफाईच करतोय! गांधीजींच्या नेतृत्वातील क्रांतिकारकता बाजूला राहून गेली आणि त्याची फक्त रूढी किंवा आचारप्रचार तेवढाच शिल्लक राहिला. तसंच, वसंतरावांसारखा दिग्गज माणूस निघून गेला आणि मग ते त्यांचं काम करताना जसे दिसायचे तसे आपण दिसलो म्हणजे झाले अशी त्यांच्या वारसांची धारणा झाली.

स्व. वसंतरावांच्या मागची प्रेरणा काय होती? इथं काही त्यांच्या संपूर्ण कामाचं अवलोकन करणं शक्य नाही; पण त्यांनी केलेली महत्त्वाची कामं कोणती?



रोजगार हमी योजना सर्व जगभर गाजली. ही योजना आपणच अमलात आणली असं श्रेय घेणारे, महाराष्ट्रातले निदान दोनचार नेते मी पाहिले आहेत; पण रोजगार हमी योजनेचे खरे श्रेय वसंतरावांना आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना हे त्यांचे आणखी एक श्रेय. भाताला आधारभूत किमतीपेक्षा अधिक किंमत द्यायची नाही असे धोरण केंद्र सरकारने आखले. त्यावेळी वसंतराव नाईकांनी मुख्यमंत्री या भूमिकेतून केंद्र सरकारला ठणकावून सांगितले की, ''लेव्हीचे भात तुम्हाला आधारभूत किमतीने दिल्यानंतर उरलेल्या भाताला मला जी योग्य वाटेल ती किंमत मी देईन.'' वसंतराव हे ज्वारीची खरेदीची व्यवस्था करणारे मुख्यमंत्री होते. म्हणजे त्यांची प्रेरणा काय होती?

भारतात शेती ही जीवनशैली म्हणून मानली जात असे. त्यात कुणी टाटा–बिर्ला होऊ शकत नव्हता. शेतकऱ्यांनी सकाळी उठून कामाला लागावं, पाऊस पाडणाऱ्या वरच्या परमेश्वराचं कौतुक करावं, त्याचे आभार मानावे, त्याच्या मर्जीला जे काही येईल आणि आपल्या पदरामध्ये तो जे काही घालेल त्यावर जगावं आणि समाधान मानावं अशी ही जीवनशैली होती. अगदी शाळा–कॉलेजातील पुस्तकांतसुद्धा लिहिलेलं असायचं की शेतीकडे एक व्यवसाय म्हणून बघू नका, ती एक जीवनशैली आहे! म्हणजे शेतावर नांगर चालवता चालवता तुमच्या अंगावरचं धोतर फाटकंच राहिलं, मळकंच राहिलं तरी तक्रार करू नका. गावातला पोरगा शहरात गेला आणि कोणत्यातरी बँकेत नुसता चपराशी झाला की तीन महिन्यांच्या आत टेरिलीनची पँट घालून, खांद्याला ट्रान्झिस्टर लटकावून गाणी गुणगुणत खेड्यात येतो त्याच्याबद्दलही तक्रार करू नका. कारण, त्याची जीवनशैली वेगळी आणि शेतकऱ्याची जीवनशैली वेगळी!

या जीवनशैलीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याचं काम करणारी जी मंडळी होऊन गेली त्यांमध्ये जोतिबा फुले, शाहू महाराज यांची नावे घेतली जातात. या परंपरेतले वसंतराव नाईक हे शेवटचे शेतकरी नेते होते असे म्हणावे लागेल. त्यांनी काय केलं?

शेती ही आता जीवनशैली नाही, शेती हे एक शास्त्र आहे, कौशल्य आहे. जशी जमेल तशी शेती करायची नाही; आवश्यक तर पाण्याची व्यवस्था करायची आहे, चांगलं बियाणं वापरायचं आहे. खतं औषधं वापरायची आहेत आणि शास्त्रीयदृष्ट्या शेती करून उत्पादन वाढवायचं आहे. शेतीकडे पाहण्याचा हा एक दुसरा टप्पा झाला. याला आपण हरितक्रांतीचा टप्पा म्हणू. स्व. वसंतराव नाईक हे शासनातर्फे हरितक्रांतीच्या टप्प्याचे अग्रणी होते.

शेतकऱ्यांच्या नेत्याच्या स्मृतिदिनी कर्तबगार शेतकऱ्याचं कौतुक करण्याचा हा समारंभ पाहता पाहता एक आठवण होते आहे. कोल्हापूरला शाहू महाराज शेतकऱ्यांच्या, गावच्या जत्रांना मुद्दाम हजर राहत आणि शेतकऱ्यांचा हा राजा जत्रेतून चालता चालता, शेतकऱ्याचा एखादा चांगला बैल दिसला तर मुद्दाम उभं राहून कौतुक करून, जाणकारपणानं त्या बैलाचं मूल्यमापन करून त्या शेतकऱ्याला बोलावून त्याच्या पाठीवर थाप मारत असे आणि शेतकऱ्याच्या राजाने आपल्या पाठीवर थाप मारली म्हणजे आपले पूर्वज स्वर्गाला पोहोचले इतका आनंद त्या काळच्या शेतकऱ्यांना होत असे. आज असं होतं, नाही असं नाही!

पण, परवा पंधरा ऑगस्टला पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी काय भाषण केलं? मला काही त्यांच्यावर टीका करायची नाही. उलट, शेगाव मेळाव्यापासून, त्यांनी अंगिकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या कार्यक्रमाचा मी पुरस्कार करीत आलो आहे.

पण जर का शेतकऱ्यांचा खराखुरा प्रतिनिधी लालकिल्ल्यावरून १५ ऑगस्ट १९९२ रोजी भाषण द्यायला उभा राहिला असता तर त्यानं भाषणामध्ये पहिलं वाक्य काय वापरलं असतं माहीत आहे? त्यानं म्हटलं असतं, ''मला भारतातल्या सगळ्या लोकांचं, शेतकऱ्यांचं अभिनंदन करू द्या. पाऊस येतो की नाही अशी चिंता होती, पण बहाद्दरांनो, पाऊस आला; चांगली पिकं येणार आहेत.'' भारताच्या खऱ्याखुऱ्या पंतप्रधानाचं लाल किल्ल्यावरचं पंधरा ऑगस्टचं भाषण हे त्या वर्षीच्या पावसासंबंधानं सुरू झाले पाहिजे असा माझा आग्रह आहे. हे झालं नाही कारण शेतकऱ्यांचे नेतृत्व शासनाला असावे ही पद्धती हरित क्रांतीच्या काळामध्ये कुठेतरी खंडित झाली.

आज सुधाकरराव नाईकांनी, इथल्या प्रतिष्ठानानं मला आग्रहानं बोलावलं. मी जे काही थोडंथोडकं शेतीसंबंधी लिहिलं त्याचं कौतुक केलं; पण मला आठवतं की १९८० मध्ये आम्ही एवढंच म्हटलं की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुम्ही उसाचं फार मोठं साम्राज्य निर्माण केलं म्हणता पण उसाला भाव नाही. उसाला टनाला ३०० रुपये भाव मिळावा एवढीच मागणी आम्ही केली होती. ही मागणी काही काँग्रेसविरोधी नव्हती. त्यावेळी माधवराव बोरस्तेंसारखी काँग्रेसची नेतेमंडळी माझ्याबरोबर व्यासपीठावर हजर होती. त्यामुळे त्याला काही विरोधी पक्षाचा वास नव्हता. आमचं पहिलं कांद्याचं आंदोलन झालं तेव्हा दिल्लीला जनता पक्षाचं सरकार होते. मोहन धारियांनी कांद्यावर निर्यातबंदी लावली



म्हणून आम्हाला कांद्याचं आंदोलन करावं लागलं. म्हणजे आमच्या आंदोलनाला कोणताही पक्षीय वास नव्हता; पण त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटलं की, ''शरद जोशी हे आधी खरे शेतकरी आहेत हे त्यांना सिद्ध करू द्या. मग आम्ही त्यांच्याशी चर्चा करायची किंवा नाही ते बघू.'' आता निदान, मी शेतकरी असो वा नसो, बोलण्यालायक प्राणी आहे असं शासनाचं मत झालं हेही काही वाईट नाही.

सुधाकरराव नाईकांच्या दूरदर्शनवरील त्या भाषणाने एक आशा तयार झाली. ती आशा खोटी ठरणार नाही असे मी गृहीत धरतो. कारण, आम्ही शेतकरी फार वेळा मृगजळामागे धावतो. फार मोठे नेते म्हणून आम्ही पुष्कळ मुख्यमंत्र्यांच्या मागे गेलो. त्यातले काही आमच्या बरोबरही होते. नंतर असा अनुभव आला की, मुख्यमंत्री झाल्यावर प्रत्येक वेळी भेटले म्हणजे दिलखुलास हसून, गोडगोड बोलून आम्ही जे काही मागू त्याला 'हो' म्हणायचं आणि अंमलबजावणी शून्य. सुधाकररावांच्या भाषणावरून वाटलं की ते काहीतरी वेगळं करून दाखवतील आणि या आशेनं मी त्यांना पत्र लिहिलं.

सुधाकररावांकडून केलेली अपेक्षा काही फार मोठी नाही. आम्हा दोघांच्या विचारांमध्ये फार मोठा फरक आहे असंही नाही. फरक काय आहेत?

आताच सुधाकररावांनी म्हटलं की गरीब माणसाला, अगदी शेवटच्या माणसालाही मीठ, मिरची, तेल, ज्वारी आणि डाळ हे पाच पदार्थ मिळाले पाहिजेत. यात काही वाद नाही. हे पदार्थ सगळ्यांना स्वस्तात स्वस्त, ठराविक भावाने, चांगल्या गुणवत्तेचे मिळाले पाहिजेत. यात काही वाद असण्याचे कारण नाही. कदाचित आज आपण मीठ, मिरची, तेल ज्वारी, डाळ आणि मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक व त्यांचं राज्य चालू राहिलं तर, मी अशी आशा करतो की, पाच वर्षांमध्ये आपण त्यांच्यामध्ये थोडेथोडे दूधदुभते, भाज्या आणि फळफळावळसुद्धा घालू; पण पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आम्ही अजून मीठमिरचीवरच आहोत, ही माझी खंत आहे.

आणि मीठमिरची जर गरिबांना पोहोचवायची असेल तर त्यासाठी सुधाकररावांनी एक चांगलं वाक्य वापरलं की, बजेटामधले दोनतीनशे कोटी रुपये घालावे लागले तरी चालतील पण मीठ, मिरची, तेल, ज्वारी, डाळ सगळ्यांना मिळाली पाहिजे.

केंद्र शासनाचं धोरण असं नाही आणि गेली चाळीस वर्षे ते असं नाही. जर का गरिबांना मिरची, तेल, ज्वारी, डाळ स्वस्त द्यायची तर त्या करिता मिरचीचा

भाव पाडला पाहिजे, भुईमुगाचा भाव कमी राहिला पाहिजे. ज्वारीचा कमाल भाव ठरला पाहिजे; त्याच्या वर जर का भाव जायला लागला तर परदेशातून आयात करून त्या वस्तू आम्ही इथं ओतू पण भाव वर जाऊ देणार नाही हे केंद्र शासनाचं धोरण आहे.

मीदेखील शेती करायला लागलो तेव्हा सत्कारमूर्ती शेतकऱ्यांच्या उत्साहानंच करायला लागलो. मी काही आंदोलन करायला आलो नव्हतो; पण जन्मानं शेतकरी नसल्याने मला शेती वाचून-वाचून करायला लागायची. नव्याने लग्न झालेली गृहिणी जसं स्वयंपाकशास्त्रावरील पुस्तक वाचत वाचत स्वयंपाक करते तशी मी शेती करीत होतो. त्यावेळी आबासाहेब पाटील शेतकरी मासिक चालवायचे. भुईमूग कसा करायचा? आबासाहेबांनी लिहिलं की भुईमुगामध्ये तीनदातरी खुरपणी करावी. त्यवेळी मी स्वित्झर्लंडमधून संयुक्त राष्ट्रातील नोकरी सोडून आलो होतो. थोडा प्रोव्हिडंड फंड शिल्लक होता. आम्ही आबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे खुरपणी केली आणि नंतर माझ्या असं लक्षात आलं की तीन खुरपण्या करून आपलं काही जमायचं नाही. भुईमुगाला जो भाव मिळतो तो पाहता तीन खुरपण्या परवडायच्या नाहीत. मग हळूहळू आम्ही एक नवीन तंत्रज्ञानाकडे आलो. त्याला मी नाव दिलं आहे, हरित क्रांती नाही, तर सर्व्हायव्हल टेक्नोलॉजी (Survival Technology). म्हणजे, शेतकरी म्हणून जगून राहायचं असेल तर जे तंत्रज्ञान वापरायला लागतं त्याला आम्ही सर्व्हायव्हल टेक्नॉलॉजी म्हणतो. हे तंत्रज्ञान वापरायचं नसेल तर मग दुसरा एक उपाय आहे. तो म्हणजे गावच्या दूध सोसायटीमध्ये निवडून जायचे किंवा आसपासच्या सोसायट्यांच्या राजकारणात पडायचं, निवडणुका लढवायच्या वगैरे; पण त्या क्षेत्रात गेलं की मग काही, शेतीमालाचा उत्पादनखर्च किती आहे आणि त्याला किंमत काय मिळते याला काही फारसं महत्त्व राहत नाही. पण शेतकऱ्यांना सर्व्हायव्हल टेक्नॉलॉजीशिवाय पर्याय राहात नाही, याचे कारण केंद्र शासनाचे धोरण आहे.

मी शंकरराव चव्हाणांना ते मुख्यमंत्री असताना कपाशीबद्दल एक आवाहन केलं होतं आणि आताच्या शासनालाही करीत आहे. उत्पादन वाढवायचं आहे ना? आम्ही शेतकरी तुमच्याबरोबर आहोत; आम्हाला दुसरं काम काय आहे? पण जेव्हा जेव्हा तुम्हाला असं पटेल की केंद्र शासनाचं धोरण हे शेतकरीविरोधी आहे त्यावेळी तुम्ही तुमचा पक्ष सोडायचा नाही, तुमची खुर्ची सोडायची नाही फक्त दिल्लीला जाऊन एक वाक्य बोला की, ''तुमचं हे धोरण चुकीचं आहे असं



आम्ही शेतकऱ्यांच्या वतीने, नम्रपणे तुमच्या नजरेस आणू इच्छितो.'' एवढं म्हणायला काही हरकत नाही ना?

दिल्लीच्या सध्याच्या काही धोरणांबद्दल मला चिंता आहे. पंजाबमधला शेतकरी गव्हाच्या बाबतीत अत्यंत संतप्त आहे. पंजाबचा गव्हाचा भाव सरकारने ठरवला क्विंटलला २८० रुपये; बाजारात भाव चालला आहे क्विंटलला ३३० रुपये; पण सरकारने व्यवस्था अशी केली की अडत्यांनी आणि खाजगी व्यापाऱ्यांनी गव्हाच्या मंडीमध्ये येताच कामा नये; म्हणजे मग शेतकऱ्यांना २८० रुपये भावाने गहू सरकारला विकणं भाग पडावं. सगळे लोक तक्रार करत असतील; पण मला सांगायला आनंद वाटतो की, आमच्या संघटनेमुळे गव्हाची पुरेशी वसुली होऊ शकली नाही. यंदा आम्ही थोडं कमी पडलो. पण केंद्र शासनाचं हे धोरण पुढे असंच चालू राहिलं तर पंजबामध्ये पुढच्यावेळी एक पोतंसुद्धा गहू सरकारी खरेदीयंत्रणेला मिळू नये अशी व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करू. शेतकऱ्यांना ३३० रुपये मिळू नये अशी सरकारने व्यवस्था केल्यामुळे वसुली कमी झाली, त्यावर सरकारने काय उपाय केला? त्या सरकारने क्विंटलमागे ५५६ रुपये खर्च करून कॅनडातून गहू आणून आमच्या देशामध्ये ओतला. सुधाकरराव, आम्हा शेतकऱ्यांच्या वतीने, दिल्लीला जाऊन कोणी विनम्रपणे म्हणेल का की तुम्ही पीएल् ४८० इतकी वर्षे चालवले, त्याने काही देशातला गव्हाचा प्रश्न संपला नाही; वसंतराव नाईकांनी हरित क्रांतीची सुरुवात केली आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले तेव्हा गव्हाचा प्रश्न संपला आणि आम्ही अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो. पं.नेहरूंच्या काळातला पीएल् ४८० चा करंटेपणा करू नका, असे तुमच्यापैकी कुणी म्हणेल का?

दिल्लीमधला एक जण असं म्हणाला, कोणाही पक्षीय माणसाला जे समजलेलं नाही किंवा समजलं तरी बोलायची हिंमत नाही ते, जे पक्षीय राजकारणातील नाहीत असे अर्थमंत्री मनमोहनसिंग म्हणाले. ते म्हणाले, ''एक वर्ष फक्त मला द्या. चलनवाढीचा प्रश्न इतका गंभीर आहे की आजच्या काळामध्ये काही गोष्टी करणे मला भाग आहे; पण एक वर्षानंतर माझं धोरण शेतकरी-अनुकूल होतं की नाही तुम्ही ठरवा आणि तुम्हाला जर वाटलं की मी शेतकरी-अनुकूल नाही तर तुम्ही सांगाल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे.'' जो मनुष्य पक्षीय राजकारणातला नाही तो हे बोलू शकतो तर मग आम्ही शेतकऱ्यांनी निवडून दिलेले तुम्ही आमचे नेते हे का बोलत नाहीत?

आज, प्रश्न काही फक्त गव्हाच्या आयातीचा नाही. १० लाख टन गव्हाची

आयात झाली आहे. अजून १० लाख टन होणार, असं म्हणतात. गेल्या आठवड्यातील वर्तमानपत्रांतील बातम्यावरून कळतं की ५० हजार टन पामोलिन तेल फुकट आणायचं ठरलं आहे आणि ज्या दूध महापूर योजनेने देशातल्या दूध योजनेचं वाटोळे केले-म्हणजे परदेशातून दूध पावडर व लोणी आणून त्याचं दूध करून इथल्या दुधाचे भाव पाडले व इथल्या दूधयोजनेची हानी केली-ती योजना पुन्हा चालू झाली आहे. दूधमहापूर योजना-३ या नावाने. पुन्हा एकदा युरोपवाल्यांनी आपल्याला दिलेलं लोणी आणि दूधपावडर इथं आणून इथल्या शेतकऱ्यांचे भाव पाडण्याचा कार्यक्रम चालू झाला आहे.

इथं एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. युरोपमध्ये तिथली सरकारे शेतकऱ्यांना दुधाला अत्यंत चांगला भाव देतात. त्यामुळे दुधाचे अतोनात उत्पादन होते. दुधाच्या नद्या वाहतात आणि लोणी व चीजचे डोंगर तयार होतात. कोठे साठवावे त्यांना कळत नाही. हा जादा झालेला माल ते हिंदुस्थानसारख्या देशाला द्यायला तयार होतात; पण दुधाचा भाव कमी करायला तयार होत नाहीत. तुम्ही जास्त पिकवा, जास्त भाव घ्या, दुधाचं काय करायचं ते आपण नंतर बघू, असं युरोपीय सरकारे म्हणतात आणि आमच्या देशाचे करंटे राज्यकर्ते म्हणतात, ''तुमचे ते जादा दूध आम्हाला द्या, आम्ही आमच्या देशातल्या दुधाचे भाव पाडतो.'' अशा तऱ्हेने परदेशातील दुधाच्या साहाय्याने 'दूध' म्हणून लिहिलेल्या गाड्या फिरायला लागल्या आणि ठिकठिकाणी शीतकरण यंत्रे बसवली की म्हणायचे दूध-क्रांती झाली!

खरं तर महाराष्ट्राने दुधाची क्रांती शेतकऱ्यांच्या साहाय्याने करून दाखविली. त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी कष्ट घेतले; पण गुजरातसारखी अनुकूल परिस्थिती नसताना महाराष्ट्रात दुधाची क्रांती झाली याचे कारण महाराष्ट्रातल्या शासनाने दुधाच्या किमतीच्या धोरणाबद्दल जागरूकता दाखविली आणि त्याचं श्रेय पहिलं दूधभाताचं आंदोलन करणाऱ्या शेतकरी संघटनेलाच आहे.

आता, इतकं सरळ सरळ शेतकरीविरोधी धोरण केंद्र शासन राबवत असताना, 'हे धोरण चुकीचं आहे' इतकंसुद्धा शेतकऱ्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी का बोलत नाहीत? शेतकऱ्यांनी तुम्हाला नेते म्हणून निवडलं आहे, तुम्ही मंत्री व्हा, मुख्यमंत्री व्हा, उद्या तुमच्यापैकी कुणी पंतप्रधानाच्या जागेकडेही जातील; पण पंतप्रधानाच्या जागेकडे जाणारा जो सर्वात चांगला मार्ग आहे तो शेतकऱ्यांच्या आशीर्वादातून जातो, दिल्लीच्या मर्जीतून नाही. स्व. वसंतराव बारा वर्षे मुख्यमंत्रिपदी राहिले, ते कशामुळे राहिले? त्यांची प्रेरणा शेतकऱ्यांच्या हिताची होती,



म्हणूनच राहिले. पण, हे जसे शेतकऱ्यांचे हरितक्रांतीच्या टप्प्यातील शेवटचे नेते होते तसे आज सुधाकररावांनी मुख्यमंत्री म्हणून काही बदल केला नाही तर मला दुर्दैवाने म्हणावे लागेल की, महाराष्ट्राचे शेवटचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर, महाराष्ट्रात मुख्यमंत्री झाले नहीत. दिल्लीहून महाराष्ट्र प्रांतावर सुभेदाराची नेमणूक व्हायला लागली. सुभेदार कुठपर्यंत वर जाणार त्याच्या काही मर्यादा आहेत. पण जर का तुम्ही इथल्या सगळ्या शेतकऱ्यांचे आशीर्वाद घ्याल तर दिल्लीमध्ये अशी कोणतीही ताकद नाही की जी तुम्हाला सांगू शकेल की तुम्ही आता इथून निघा. यामुळे निदान, त्या खुर्चीबरोबर शेतकऱ्यांचेच नव्हे तर साऱ्या देशाचे कल्याण केल्याचे समाधान मिळेल. कुणाच्यातरी वशिल्याने, कुणाच्यातरी चपला उचलल्या म्हणून किंवा कुणाचे तरी पाय पुसले म्हणून मुख्यमंत्री राहिलो असे म्हणण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या सेवेमधला गावपातळीचा कार्यकर्ता राहण्यामध्ये समाधान आहे असे जो मानील तो मोठा. स्व. वसंतरावांची प्रतिमा व प्रेरणा ही होती.

सुधाकररावांनी पाण्याचा एक प्रश्न मांडला आणि पाण्याचा प्रश्न खरोखरीच गंभीर आहे. यंदा आता पाऊस पडला आहे. पुसद भागात चांगला झाला आहे, पिकं खरंच सुंदर आहेत. पुढं काय होतं माहीत नाही; पण आमच्या पुणे भागातला पाऊस आजवर असा आहे की विहिरींना अजून पाणी लागलेलं नाही. जर का आता पावसाने रजा घ्यायची ठरवली तर यंदा बहुतेक फेब्रुवारीपासूनच सुधाकररावांना दुष्काळाचा आणीबाणीचा कार्यक्रम राबवावा लागणार आहे. हे आता नेहमीचंच झालं आहे. अजूनही काही भागात टँकरने पाणी पुरवावं लागतंच आहे.

दुष्काळाचा प्रश्न सोडविण्याकरिता अण्णासाहेब हजारेंनी त्यांच्या गावामध्ये काम केलं आहे. इतरही अनेक गावांमध्ये तसं काम करता येईल. काही मंडळी असंही सांगतील की झाडी लावल्यामुळे पाऊस चांगला पडतो, म्हणून झाडी लावा. तसं हल्ली झाडी लावणं हा बराच किफायतशीर 'धंदा' झाला आहे. मी दहा वर्षांपासून सांगतो आहे की झाडी लावल्याने पाऊस वाढतो ही कल्पना चुकीची आहे.

दुष्काळाचे कायमचे निर्मूलन करायेच असेल तर नुसतं 'पाणी अडवा, पाणी जिरवा'नं भागायचं नाही, कुणी तरी सांगितलं म्हणून झाडी लावूनही पुरायचं नाही; त्याकरता, सहा वर्षांच्या पिकावर शेतकऱ्याला सात वर्षे निश्चिंतपणे जगता येईल असे धोरण आखले पाहिजे.

आणखी, कापूस एकाधिकार खरेदी योजनेबद्दल मी बोलू इच्छितो. पूर्वी व्यापारी लहान लहान सुऱ्यांनी शेतकऱ्यांच्या माना कापत असतील, तर आता या नवीन योजनेप्रमाणे दिल्लीला शेतकऱ्यांच्या माना कापणारा एक अत्याधुनिक कत्तलखाना चालू झाला आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या सरसकट माना कापण्याची व्यवस्था झाली आहे. स्व. वसंतराव नाईकांची ही प्रेरणा होती का? नाही. या योजनेची सुरुवातीच्या दोन वर्षांच्या काळातील कामगिरी याची ग्वाही देते; पण, १९८६ साली केंद्र सरकारने फतवा काढला की कापूस एकाधिकार खरेदी योजनेतील कापसाचा हमी भाव आधारभूत किमतीपेक्षा जास्त असता कामा नये. मग, एकाधिकाराची मक्तेदारी शेतकऱ्यांनी कशाकरता मान्य करावी? मोठी दुर्दैवाची गोष्ट अशी की तत्कालीन मुख्यमंत्री किंवा पक्षांचे पुढारी यांपैकी कुणीही या प्रश्नावर आवाज उठवायला पुढे आला नाही. आम्ही शरद पवारांना म्हटलं, शंकरराव चव्हाणांना म्हटलं की केंद्राचा हा जो फतवा आहे तो तुमच्या योजनेच्या विरुद्ध आहे. आपण बरोबर जाऊ किंवा आम्ही बरोबर नको असल्यास तुम्ही एकटे जा आणि हा फतवा योग्य नाही असं केंद्र सरकारला सांगा. पण कुणी तयार नाही. मनात भीती, जर का कापसाच्या भावाबद्दल तक्रार केली तर मग आपल्या भाच्याला मिळायचं ते तिकीट मिळेल किंवा नाही याची खात्री सांगता येणार नाही.

कोणाला राग यावा किंवा कोणाला टोचून बोलावे म्हणून मी हे बोललो नाही. पण, शेतकऱ्यांच्या हिताचं काही करायचं असेल तर त्या मार्गातले हे जे धोंडे आहेत ते दूर केले पाहिजेत. या शेतकऱ्यांच्या पोरांनी आम्हा शेतकऱ्यांचे फार नुकसान केलं आहे. शेतकऱ्याचा पोरगा मंत्रालयात गेला आणि त्याला एकदा का त्या गालिचावर चालायची सवय लागली की त्याला कापसाला भाव काय मिळतो त्याची पर्वा राहत नाही. त्याचं डोकं वेगळ्याच दिशेनं चालत असतं. अजून वरच्या जागी कसं जायचं आणि सध्याच्या मुख्यमंत्र्याच्या पायात पाय घालून त्या जागेवर आपला क्लेम कसा लावायचा याची चिंता त्याला पडलेली असते. मग, केंद्राच्या धोरणाविरुद्ध तो बोलत नाही. स्वत: मोठं होण्याकरिता, या शेतकऱ्यांची पोरं असलेल्या पुढाऱ्यांनी शेतकऱ्याला दावणीला बांधून त्यांचं शोषण कसं होईल या दिल्लीच्या योजनेला हातभार लावला. असं करून काय मिळवलं? कुणीही त्यांच्यातला मोठा झाला नाही. मुंज नावाच्या राजाला कालिदासानं एकदा म्हटलं की, ''बा मुंजा, आजपर्यंत फार मोठेमोठे राजे होऊन गेले पण त्यांच्या एकाच्याही बरोबर काही पृथ्वी गेली नाही. तू राज्य



मिळविण्याकरिता आणि टिकविण्याकरिता एवढी कटकारस्थानं करतोस, कुणास ठाऊक कदाचित ही पृथ्वी तू गेल्यानंतर तुझ्याबरोबर स्वर्गात येणार असेल!''

ज्यांनी ज्यांनी दिल्लीला जाऊन शेतकऱ्यांचं इमान विकलं त्यांचे हात कुठे आभाळाला लागले नाहीत. आज लोक स्वयंस्फूर्तीने, स्वयंप्रेरणेने येतात ते स्व. वसंतराव नाईकांना श्रद्धांजली वाहायला. मोठी माणसं कोण होतात? मुख्यमंत्री खूप झाले. मी हिंदुस्थानात येऊन आंदोलन करायला लागल्यापासून किती मुख्यमंत्री झाले याची यादी करायला बसलो तर आठवतसुद्धा नाही. आता प्रवासात कुठे त्यांच्यापैकी कुणी भेटले की आठवतं, मुख्यमंत्री असताना त्यांचा काय थाट असायचा. वाटेने मुख्यमंत्री खूप पडलेत; पण आठवण होते वसंतराव नाईकांची.

आज आम्हाला आठवण होते जोतिबा फुल्यांची. जोतिबा फुले गव्हर्नर जनरलच्या दरबारात खांद्यावर घोंगडं टाकून गेल्याची गोष्ट सगळ्यांनाच ठाऊक आहे. त्यावेळी गव्हर्नर जनरल कोण होता हे कोणाला आठवतं का? तो तर त्यावेळी थाटमाटात दरबारात बसला होता. जोतिबा फुले घोंगडं खांद्यावर टाकून गेले होते. आता जयजयकार होतो जोतिबा फुल्यांचा. आज जागोजाग पुतळे उभे आहेत जोतिबा फुल्यांचे. त्या गव्हर्नर जनरलचं नावसुद्धा कुणाच्या लक्षात नाही. मुख्यमंत्री अनेक होऊन गेले, विसरले जातील. त्यांची नावं इतिहासात राहणार नाहीत. पण वसंतराव नाईकांचं नाव इतिहासात राहणार आहे. त्यात कदाचित हेही लिहिलं जाईल की मधल्या बारा वर्षांच्या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही होते. त्यांचे मोठेपण मुख्यमंत्रिपदात नाही, महाराष्ट्राच्या नेतेपदात आहे.

आणि जर का असा कुणी नेता आम्हा शेतकऱ्यांना मिळाला की राजकारणात राहून का होईना, पण शेतकऱ्यांची बाजू घेणारा, पाऊस पडत नाही म्हटल्यावर चिंतीत होणारा, विलंबाने येणारा पाऊस आला म्हटल्यावर मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या खोलीतसुद्धा दोनशे रुपयांचे पेढे वाटणारा– तर तो आम्हाला हवा आहे. 'वसंतराव नाईक' पुन्हा इथं यावा या अपेक्षेने मी पाहतो आहे असं मी सुधाकररावांच्या पत्रात म्हटलं आहे आणि तीच अपेक्षा मी इथं व्यक्त करतो.

आम्ही कोणीही आंदोलन करण्याकरिता जन्माला आलो नाही. मी काही आंदोलन करणारा म्हणजे तरुणपणापासून झिंदाबाद म्हणत ओरडणारा मनुष्य नाही. २०/२५ वर्षांच्या सरकारी आणि संयुक्त राष्ट्रातील नोकरीनंतर मी जेव्हा शेती करायला लागलो आणि मी असं पाहिलं की शेतकरी म्हणून इमानेइतबारे

राबूनसुद्धा माझं दररोजचं भागू नये आणि दुष्काळ आला म्हणजे मला खडी फोडायला जावं लागावं अशा जाणीवपूर्वक योजना व धोरणं आखली जात आहेत तेव्हा त्याविरुद्ध उठण्याखेरीज गत्यंतर नाही, म्हणून मी या मार्गाला लागलो.

सुधाकरराव, तुम्ही जर हा शेतकऱ्यांचा प्रश्न उठवला तर या कामातनं मी मोकळा होईन आणि शेतकऱ्यांना एक दिवस सांगू शकेल की आता आपल्याला आंदोलन करण्याची गरज नाही. कारण, शेतातला शेतकरी 'राजा' झाला आहे. एवढं सांगायला मिळावं आणि मग निवृत्त व्हायला मिळावं एवढी एक इच्छा स्व. वसंतराव नाईकांच्या पुण्यस्मृतीच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या सगळ्यांच्या साक्षीने करतो.

*(शेतकरी संघटक, ६ सप्टेंबर १९९२)*

■



एकवीस

# कृषिभवनाचा विदुषकी चाळा

जनता दलाचे माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांनी राष्ट्रीय कृषिनीती तयार करण्याचे तीन वर्षांपूर्वी जाहीर केले. गेल्या डिसेंबर महिन्यात लोकसभेसमोर सध्याचे कृषी मंत्री श्री. बलराम जाखर यांनी शेतकी धोरणासंबंधीच्या ठरावाचा मसुदा सादर केला.

डोंगर पोखरून उंदीर काढावा आणि तो उंदीरही मेलेला असावा, असा हा प्रकार आहे. ६० कोटी शेतकऱ्यांचेच नव्हे तर ८७ कोटींच्या देशाचे भवितव्य ठरवणारा हा मसुदा दोन ओळींत ऐसपैस अंतर सोडूनही कसाबसा साडेपाच पानी भरतो. स्वातंत्र्यापासून औद्योगिक धोरण अनेकदा जाहीर झाले; पण शेतीसंबंधी धोरण मात्र एकदाही तयार करण्यात आले नाही याबद्दल व्ही.पी. सिंगांनी आश्चर्य व्यक्त केले होते. पण कृषिधोरण म्हणजे साडेपाच पानांचा ठराव असेल तर असला ठराव ५० वर्षात न झाल्याने शेतकऱ्यांचे किंवा देशाचे काही नुकसान झाले आहे असे वाटत नाही. पूर्वीच्या सरकारची अनेक धोरणे आणि निर्णय नवीन सरकारे उलटवतात आणि फिरवतात. राव सरकारला शेतीच्या धोरणासंबंधी ठराव करण्याचा निर्णय रद्दबातल करणे अवघड वाटले असावे, त्यामुळे शेतकरी समाजात असंतोष निर्माण होईल अशी त्यांना चिंता वाटली असावी. म्हणून धोरण तर जाहीर करायचे पण त्यात धोरण म्हणून ठेवायचे नाही अशी खास पी.व्ही. नरसिंह राव सरकारची मध्यममार्गी नीती चालवण्यात आली असावी.

आजपर्यंत कृषी नीती लिहिण्याच्या उपद्व्यापात कोणतेही सरकार पडले नाही याचे कारण उघड आहे. शासनाचे धोरण शेतकऱ्यांचे मरण असल्याने त्याची जाहीर वाच्यता करणे कोणाही सरकारला परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे शेतकरी कल्याणाच्या आणि हिताच्या घोषणा करीत करीत शेतकऱ्यांचा गळा

कापण्याचे काम स्वातंत्र्यानंतर बिनधास्तपणे चालू आहे. नेहरूव्यवस्था कोसळली, देशावर आर्थिक अरिष्ट आले तरीही निदान शेतीच्या बाबतीत तरी जुनेच धोरण पुढे रेटायचा प्रयत्न सरकार करीत आहे. बलराम जाखरांच्या या मसुद्यात अशीच गुळगुळीत, गोलमाल आणि गोडगोड भाषा वापरण्यात आली आहे. पण या गुळगुळीत शब्दांतून काही निश्चित धोरणाची दिशा स्पष्ट होत नसल्यामुळे प्रत्यक्षात मात्र सरकार मनमानी करायला मोकळे राहील असा हा सरकारी डाव आहे.

कृषिनीतीच्या या ठरावाला ठराव तरी कसे म्हणावे? संसदेने करायच्या ठरावाची एक विशिष्ट शैली आणि भाषा असते. त्या धाटणीत हा मसुदा लिहिलेला नाही. एखाद्या शाळकरी पोराने शेतीविषयी अस्ताव्यस्त निबंध लिहावा तसे याचे स्वरूप आहे. मसुद्याच्या शेवटच्या परिच्छेदात लेखकाला हा ठरावास मसुदा आहे असे म्हटल्याचा विसर पडला आणि त्याने कृषिनीतीसंबंधी हे 'निवेदन' आहे असे म्हटले आहे. लेखकच गोंधळला तर इतरांची काय कथा सांगावी?

धोरण म्हणावे तर एकाही विषयावरील धोरण साडेपाच पानांच्या या मसुद्यात स्पष्ट करण्यात आलेले नाही. मध्यवर्ती शासनाची भूमिका सहकारी संस्थांना पैशाची आणि इतर मदत आणि शेतीमालाला रास्त भाव यासंबंधीची धोरणे पूर्वीप्रमाणे पुढे चालू राहतील असे मसुद्यात म्हटले आहे. पण ही जुनी धोरणे नेमकी काय होती याचा खुलासा सोयीस्कररित्या टाळण्यात आला आहे. शेतीक्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूक वाढवून आणि खाजगी भांडवलास उत्तेजन देऊन 'नवे चैतन्य' निर्माण करण्याची भाषा मसुद्यात एका ठिकाणी वापरली आहे. विनोदाचा भाग म्हणजे दुसऱ्या एका जागी संपन्न आणि स्वयंभू शेतीसाठी धोरणांची नवी दिशा ठरवण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे; पण अशा नवीन दिशा ठरवणे हेच मुळी कृषिनीतीच्या ठरावाचे काम आहे. हा विषय असा टांगता ठेवला तर ठराव जाहीर करण्याची काहीच गरज नव्हती.

काही नवे करण्याची इच्छा या दोन मुद्द्यांपुरतीच मर्यादित आहे, एरवी सर्व ठरावात नुसती मंत्रिछाप आश्वासनांची लयलूट आहे.

–शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत, उत्तेजन आणि धक्का (!) देणे.

–विकास आणि संशोधन कार्य एकसूत्री करणे.

– हंगामानंतरच्या कामाच्या तंत्रज्ञानाच्या विकासावर भर देणे आणि कृषिप्रक्रिया केंद्रे निर्माण करणे.



–पीक आणि जनावरे यांच्या विम्याची नवीन प्रकारची व्यवस्था करणे.

–शेतीउत्पादन वाढवण्यासाठी व त्याची विविधता वाढवण्यासाठी एक दीर्घ मुदतीचे धोरण ठरवणे.

–उद्योगधंद्यांच्या बरोबरीची शेतीसाठी पोषक पणन आणि गुंतवणूक व्यवस्था तयार करणे.

–जमीनसुधार पुढे रेटणे.

–जमिनीचा मगदूर लक्षात घेऊन विकास करणे.

–पावसाचे पाणी साचवण्यास चालना देणे.

ही असली अजागळ आश्वासनांची रांगच्या रांग मसुद्यात सापडते.

मसुद्याला शाळकरी पोराचा निबंध म्हणणेसुद्धा कठीण आहे. कोणताही शाळामास्तर पोरांच्या निबंधात चालवून घेणार नाही अशी परस्परविरोधी विधानांची मसुद्यात रेलचेल आहे. मसुद्याच्या सुरुवातीसच आजच्या शेतीपुढील महत्त्वाची आव्हाने कोणती म्हणून सतरा गोष्टींची लांबलचक यादी दिली आहे. परिच्छेद ४ ते १३ या १० परिच्छेदात या १७ आव्हानांना तोंड देण्याचा विषय आहे. म्हणजे एका परिच्छेदामागे १.७ आव्हाने. एका हातास आव्हान आणि दुसऱ्या बाजूस त्यावरचा तोडगा असा एकास एक संबंध लावणे अवघड आहे. प्रत्यक्षात अर्धा एक डझन आव्हाने अशी आहेत की ज्यांचा नंतरच्या परिच्छेदात नावालासुद्धा उल्लेख नाही आणि नंतरच्या परिच्छेदांत अशा काही गोष्टींचा उल्लेख आहे की, ज्यांचा आव्हानांच्या यादीत समावेश नाही. अशी ही सारी गंमत आहे.

जिथे एकास एक आव्हान आणि धोरण असा आकडेवारीने संबंध लागतो तिथेदेखील परिस्थिती फारशी समाधारकारक आहे असे नाही.

उदाहरणार्थ: जमिनीची धारणा कमी होत आहे. जमिनीचे तुकडे पडत आहेत आणि त्यामुळे व्यवस्थापन आणि शेतीचे उत्पन्न यावर विपरीत परिणाम होत आहेत हे एक आव्हान म्हणून सांगितले आहे. याला उत्तर म्हणून शेतीची तुकडेबंदी करण्याची किंवा निदान एकत्र वहिवाट करण्याची काही आकर्षक योजना धोरणात दिली असेल म्हणून पाहावे तर फसगत होईल. जमीनसुधार कायद्यांची नेटाने अंमलबजावणी करणे एवढा एकच उल्लेख नंतरच्या परिच्छेदात आहे. म्हणजे, जमिनींचे आणखी तुकडे करण्याची योजना आहे. वित्तमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांच्या चालू वर्षाच्या आर्थिक अहवालात जमिनीची तुकडेबंदी करण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. बलराम जाखर मात्र एवढी हिंमत दाखवायला तयार नाहीत.

शेती विकासासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे हे आव्हान नंबर १६ आहे. शेती आणि उद्योगधंदे यांच्यासाठी समान भूमिका ठरावात स्वीकारली आहे. कारखानदारीच्या क्षेत्रात स्वयंसेवी संघटनांची मदत घेण्याची कोणी भाषा काढली तर त्याचे हसे होईल मग शेतीच्या बाबतीतच स्वयंसेवी संघटनांची मदत घेण्याची काय आवश्यकता आहे?

गेल्या चाळीस वर्षांत शेतीतील संशोधन आणि उत्पादन यातील विकास तिरपागडा झाला याची कबुली ठरावात आहे; पण असे असंतुलन का तयार झाले आणि त्याची पुनरावृत्ती भविष्यात टाळता कशी येईल यासंबंधी मात्र चकारशब्द काढलेला नाही.

जमिनीची धूप आणि जलसाधनांचा अपव्यय जैविक दाबामुळे झाला असा मसुद्यातला जावईशोध आहे. त्यावर तोडगा काय तर बहुविध शेती आणि प्रक्रियेची कारखानदारी. ७० % शेतकरी फक्त २७ % राष्ट्रीय उत्पादन आज देतो. ४० वर्षांपूर्वी ७४ % शेतकरी ६५ % उत्पादन देत होता. याला उत्तर म्हणून मोठ्या प्रमाणावर शेतीतून निघून बिगरशेती व्यवसायात जाण्याची शक्यता तयार करणे हा आहे. त्यासाठी देशाचे एकूण आर्थिक धोरण संपूर्ण बदलावे लागेल, थातुरमातुर मलमपट्टीने हा आजार बरा होण्यासारखा नाही.

व्यापारी देवघेवीच्या अटी शेतीस अधिक किफायतशीर करून शेतीतील भांडवलनिर्मिती मोठ्या प्रमाणावर सुधारणे हे आव्हान नंबर १७ आहे. यावर उपाययोजना कोणती?

''शेतीला मिळणाऱ्या साधनांची उपलब्धता ठरवणारी व्यवस्था पुन्हा तपासून पाहिली जाईल आाणि उपलब्ध साधने सध्याच्या मदत योजनांकडून वळवली जातील.''

'शेतीस किफायतशीर किंमत आणि व्यापारव्यवस्था याद्वारे आवश्यक ते आर्थिक वातावरण तयार केले जाईल.'

'त्याशिवाय शेतकऱ्यांना रास्त भाव मिळवून देण्याची आपली जबाबदारी सातत्याने पार पाडेल आणि त्यासाठी किमती आणि व्यापारयंत्रणा यावर नजर ठेवेल.'

शेती अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाच्या प्रश्नांची अशी झटपट वासलात या मसुद्याने लावली आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा बिगर शेतकरी आणि शेतकरी यांच्या दरडोई उत्पन्नाचे प्रमाण १.४ होते. आता ६.२ झाले आहे. इतक्या गंभीर परिस्थितीवर उपाय म्हणून किरकोळ मलमपट्टी मसुदा सुचवतो, जुन्या धोरणाबद्दल



ना खेद ना खंत.

कृषि धोरणासंबंधीचा हा ठराव नाही, त्यात धोरणही नाही. यापलीकडे त्यात शेतीही नाही. शेतीच्या कारभाराची सरकारात व्यवस्था अशी. शेती हा राज्य शासनाच्या अखत्यारीतील विषय आहे. केंद्र शासनाचा आणि शेतीचा तसा संबंध फार थोडा आहे; पण हळूहळू शेतीविषयीचे अधिकार केंद्र सरकार हातात घेत आहे आणि आज कृषी मंत्रालयात शेतकरी हा केंद्राचा विषय नसताना ३० हजार लहान मोठे अधिकारी पगार काढत आहेत. शेतीसंबंधीचे सर्व महत्त्वाचे प्रश्न कृषिभवनाच्या बाहेरच हाताळले जातात. पाटबंधारे मंत्रालय वेगळे आहे. वरखतांचे धोरण पेट्रोकेमिकल्सच्या महत्त्वाच्या मंत्रालयात ठरते. शेतीतील मजुरी हा श्रम मंत्रालयाचा विषय आहे. शेतीमालाची निर्यात व्यापार मंत्रालयाकडे. या सगळ्या महत्त्वाच्या विषयांना संपूर्ण मसुद्यात बगल देण्यात आली आहे.

पाणीपुरवठा म्हणजे शेतीचा जीव की प्राण; पण मसुद्यात 'पावसाचे पाणी साठवणे' एवढाच काय तो उल्लेख आहे. स्वातंत्र्योत्तर काळात 'विकासाची मंदिरे' म्हणून नेहरूंनी नावाजलेल्या मोठमोठ्या धरणयोजनांचे फलित काय याची तपासणी नाही. भूगर्भातील पाणी वाढविणे त्यासाठी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' कालव्याने दिलेल्या पाण्याने जमिनीचे झालेले नुकसान टाळणे इत्यादींबद्दल मसुद्यात एक अवाक्षरही नाही.

वरखते : वरखतांचे कारखाने म्हणजे मोठे राजकारण आहे. कारखान्यांना परवाने देणे, त्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती ठरवणे, त्यांचा बेफाट उत्पादनखर्च, सबसिडीवर उधळली जाणारी अफाट रक्कम, भारतासारख्या गरीब देशात वरखते सगळ्यात महागडी असणे यांचा मसुद्यात पुसटसासुद्धा उल्लेख नाही. पेट्रोलियम साठे संपत आले आहेत. शेतीसाठी पर्यायी तंत्रज्ञान तयार करणे आवश्यक आहे; पण पेट्रोकेमिकल्स मंत्रालयाचा मंत्री कोण असावा हे ठरवण्याचा अधिकार खुद्द पंतप्रधानांना नाही. सोनिया गांधी ते ठरवतात. तेथे बापुड्या बलराम जाखरांची काय हिंमत चालणार?

बियाणे : सुधारित वाणाची बियाणी शेतकऱ्यांना त्यांच्या गावांजवळ पुरवली जातील एवढाच उल्लेख कृषिनीती ठरावाच्या मसुद्यात आहे. नव्या जैविक तंत्रज्ञानाने बियाण्यांच्या क्षेत्रात उलथापालथ होत आहे. बौद्धिक संपदेच्या हक्काचा प्रश्न मोठा वादाचा विषय बनला आहे याचे मसुद्यास भान नाही. येणाऱ्या काळात जुन्या गावरान वाणांचा फायदेशीर उपयोग करून जागतिक

बाजारपेठेत पाय ठेवता येईल काय? किंवा नवीन वाणांच्या संशोधनात नाही तर उत्पादनात तरी भारताला मोठा हिस्सा मिळवता येईल काय? याचा परामर्श नाही.

शेतमजुरीचे दर काय असावेत, त्याबरोबर शेतमजुरांच्या आणि विशेषत: महिलांच्या कामाच्या वेळा, सोयीसवलती, स्त्रियांचा जमिनीवरील मालकी हक्क हे प्रश्न बापुडवाणे कृषिभवन काय हाताळणार?

शेतीमालावरील प्रक्रिया हा विषयही मसुद्याच्या अखत्यारीतील नाही. प्रक्रियेचे हिंदुस्थानात काढलेले बहुतेक कारखाने आजारी पडलेले आहेत. त्यांचा भांडवली खर्च भरून निघत नाही. बहुतेक प्रक्रियेचे पदार्थ पाश्चिमात्य तोंडवळ्याचे; पण त्यांची बाजारपेठ परदेशात नाही. त्यामुळे ते पंचतारांकित समाजापुरते मर्यादित आहेत. तरीही सरकार, सहकार आणि नोकरदार यांना 'पेप्सी' धाटणीची प्रक्रिया व्यवस्थाच आकर्षक वाटते. प्रक्रियेसाठी फ्रान्स किंवा हॉलंड यांच्या धर्तीवर शेतावरच देशी तोंडवळ्याचे पदार्थ तयार करण्यात त्यांना स्वारस्य नाही. या सगळ्या गंभीर परिस्थितीबाबत मसुदा आळीमिळी गुपचिळी धरून आहे.

शेतीमालाची निर्यात म्हणजे तर सामर्थ्यशाली व्यापार मंत्रालयाचा खास धुडगूस घालायचा विषय. मसुद्यात लाजतकाजत एवढेच म्हटले आहे की, 'फळे, फुले, भाज्या, कुक्कुटपालन आणि इतर प्राणिजन्य पदार्थांच्या निर्यातीवर भर द्यावा लागेल.' यासाठी कार्यक्रम काय? तर, शेतीमालाचे उत्पादन वाढवणे आणि त्यातील विविधता वाढविणे; पण डंकेल प्रस्तावाच्या नवीन युगात निर्यातीला प्रोत्साहन सरकार कोणत्या प्रकारे देऊ शकेल? निर्यात वाढवण्यासाठी मालाची गुणवत्ता आणि किमत याखेरीज सरकारी धोरण यात क्रांतिकारक बदल करणे आवश्यक आहे. देशात ज्यादा उत्पादन होईल तेव्हाच तात्पुरती निर्यातीला परवानगी द्यायची हे धोरण आता चालणार नाही. प्रक्रिया झालेल्या मालाला निर्यातीसाठी प्राधान्य द्यायचे ही कल्पनाही निरर्थक ठरली आहे. सार्वजनिक वितरण आणि देशातील पुरवठा यांची जबाबदारी शेतकऱ्यांवरच आहे आणि ती पार पाडल्यानंतरच त्यांना निर्यात करता येईल असे आजपर्यंतचे धोरण आत्मघातकी ठरले आहे. ते तसेच पुढे चालवता येणार नाही; चालवायचे म्हटले तरी आगामी डंकेल व्यवस्थेत ते शक्य होणार नाही. शेतीमालासाठी वेगळे धोरण आखावे लागेल हे व्यापारमंत्र्यांनी मान्य केले आहे. (इकॉनॉमिक टाइम्स, २२ जानेवारी १९९३) कृषिमंत्र्यांच्या कुवतीबाहेरचा हा विषय आहे.

सगळ्यात गंमत म्हणजे या सगळ्या मसुद्यात नरसिंह राव सरकारने सुरू



केलेल्या आर्थिक सुधारणांचा आणि खुल्या अर्थव्यवस्थेचा पुसटसासुद्धा उल्लेख नाही. कृषी मंत्रालयाला नवीन धोरणांची माहिती कुणी पुरवत नसावे किंवा नवीन आर्थिक सुधारणा शेतीस लागूच नसाव्यात! शेतमालाच्या प्रक्रियेवर बंधने चालूच आहेत. गव्हाची आयात, युरोपीय दूधभुकटीच्या मदतीने देशांतर्गत दुधाच्या किमती पाडणे, निर्यातीवर बंधने लादणे इत्यादी नेहरू पद्धतीचे शेतकरीविरोधी चाळे अजून चालूच आहेत. नवीन आर्थिक मसुद्यावर खुल्या बाजारपेठेच्या संकल्पनेची पुसटसुद्धा सावली नाही.

मध्यंतरी खुद्द पंतप्रधानांनी पीक विमा योजना व्यापारी तत्त्वावर आधारलेली असली पाहिजे असे विधान केले होते. ते सगळीकडे प्रसिद्धही झाले होते; पण खुद्द पंतप्रधानांच्या मताचीही या मसुद्यात पत्रास ठेवली नाही. खुल्या व्यवस्थेचे कृषी मंत्रालयाला इतके वावडे आहे.

मसुद्याच्या सुरुवातीला मोठी घनगंभीर घोषणा आहे, 'शेतीचा विकास हा सर्व भारताच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या नियोजनाचा गाभा आहे.' सगळा मसुदा वाचल्यानंतर निष्कर्ष असा निघतो की शेतीचा विकास आणि देशाचा विकास यांचा तसा काही संबंध नसावा. कृषिनीतीच्या ठरावाच्या या मसुद्यात ठराव नाही, धोरण नाही, शेती नाही, राज्य सरकारे सोडाच, मध्यवर्ती सरकारच्या शेतीसंबंधीच्या कामकाजाचेही त्यात प्रतिबिंब नाही. भारताच्या संविधानाप्रमाणे दिल्लीत ज्या कृषी मंत्रालयाची गरजच नाही त्यातील अधिकाऱ्यांनी केलेला हा विदुषकी चाळा आहे.

*(शेतकरी संघटक, ६ मार्च १९९३)*

■

बावीस

# शेतकरी आंदोलनाला आद्य खूण गवसली

भारतातील शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात एका नव्या युगाची पहाट झाली आहे. या नव्या युगाच्या उदयाने इतिहासाच्या चक्राचे एक परिभ्रमणही पूर्ण झाले आहे.

भारत, ज्या देशांमध्ये शेती सर्व प्रथम सुरू झाली त्यापैकी एक आहे. म्हणून कदाचित, शेतकरी आंदोलनाचे एक इतिहासचक्र पूर्ण करून नव्या युगाला सुरुवात करणारा भारत हा पहिला देश आहे.

हे कोणते इतिहासाचे कालचक्र आहे? आणि कोणत्या नव्या युगाच्या चाहुलीने ते पूर्ण होत आहे?

मानवाने हेतुपूर्वक बी पेरून धान्याचे उत्पादन करायला सुरुवात केली तेव्हा शेतीची सुरुवात झाली. त्यापूर्वी मनुष्य जंगलात जाऊन फळे, पाने, फुले आणि मुळ्या गोळा करून पोट भरत असे; वनस्पतींच्या विविध गुणधर्मांविषयी आणि उपयोगांविषयी त्याने पुष्कळ ज्ञान संपादन केले होते. केवळ खाद्य म्हणूनच नव्हे तर औषधी, चित्रकेलेचे रंग इत्यादी अनेक रूपांत या वनसंपत्तीचे विविध उपयोग करण्यास तो शिकला होता; पण तरीही ही वनसंपत्ती जंगलात जेथे जशी उपलब्ध होत असे तेथून तशी तो प्राप्त करून आणत असे. म्हटलं तर, हीच मानवाची प्राथमिक शेतीपद्धती होती.

शेतीची यापुढची पायरी स्त्रियांनी शोधून काढली. टोळीच्या समाजात जंगलातून आणलेली शिकार, फळे इत्यादी खाद्यवस्तूंचे वाटप करण्याची जबाबदारी बहुधा महिलांची असे. अन्नाच्या वाटपाची जबाबदारी हा एक महत्त्वाचा अधिकार आणि मोठे फायद्याचे कलम होते; तसेच प्रसंगी आतबट्ट्याचा कारभार होता. या अधिकारामुळे स्त्रिया टोळीतील मध्यवर्ती स्थानी होत्या. गरोदर स्त्रिया तसेच बालके आणि त्यांच्या आयांची विशेष पोषणाची गरज



लक्षात घेता, वाटपाचा अधिकार मोठा उपयोगाचा खरा; पण त्या बरोबरच त्या सत्तेत एक धोकाही होता. दुष्काळामुळे किंवा इतर काही कारणाने अन्नाचा तुटवडा झाला तर अर्धपोटी किंवा उपाशी राहण्याची पाळी स्त्रियांवरच यायची. कदाचित्, अशाच एखाद्या अन्नाच्या तुटवड्याच्याकाळी आसपासच्या जमिनीवर उगवलेल्या धान्याचा उपयोग स्त्रियांना करावा लागला असावा आणि त्यातूनच जमिनीत बी पेरून अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी स्त्रियांनी शेतीची सुरुवात केली असावी. वेदांमध्ये जे उल्लेख सापडतात त्यावरून असे दिसते की स्त्रिया शेतीसाठी बैल किंवा इतर औजारांचा वापर करीत नव्हत्या; एका छोट्या काठीच्या, वेदांमध्ये जिला 'स्फ्य' म्हटले आहे त्याच्या साहाय्याने स्त्रियांची शेती होत असे.

लोकसंख्या वाढत गेली. निसर्गाने जंगलातून निर्माण केलेले अन्नाचे भांडार अपुरे पडू लागले; स्त्रियांची शेतीही अन्नाची गरज भागवू शकत नाही अशी वेळ आल्यामुळे पुरुषांनी बैलांचा वापर करून शेती करायला सुरुवात केली. स्त्रियांच्या हातून शेतीवरचा अधिकार गेला आणि अन्नाच्या वाटपाचा अधिकारही निघून गेला. एका तऱ्हेने पुरुषसत्ताक व्यवस्थेची सुरुवात बैलशेतीच्या काळापासूनच झाली.

आता अन्नधान्य पुरेशा प्रमाणात तयार होऊ लागले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत अन्न गोळा करीत वणवण करावी म्हणजे त्या दिवसाची भूक भागते, या पशुपक्ष्यांसारख्या अवस्थेतून मनुष्य बाहेर पडला. त्याची रानोमाळ होणारी वणवण थांबली. पाऊस पडला म्हणजे धान्याची कोठारे भरू लागली आणि त्या कोठारांमुळे वर्षभराची बेगमी होऊ लागली. शेतीचा हंगाम वगळता वर्षभराच्या उरलेल्या काळात शेतीतून तयार झालेले अन्न वापरत मानवाने जमिनीचा विकास, पाण्याची सोय, मंदिरांची उभारणी, सणसमारंभ, कलासंस्कृती, हत्यारे-औजारे बनविणे अशांसारखी अनेक कामे केली. अन्नधान्याचीच नव्हे साऱ्याच सुखसाधनांची मुबलकता वाढू लागली.

दुर्दैवाने हा सुवर्णकाळ फार वेळ टिकला नाही. धान्याची कोठारे भरू लागली तसे लुटालूट करणाऱ्या झुंडी घोड्यांच्या पाठीवर स्वार होऊन हाती तलवार, भाले, धनुष्य इत्यादी हत्यारे घेऊन जायला लागल्या. एक तऱ्हेने, हा बैल संस्कृती आणि घोडा संस्कृती यांच्यातील संघर्ष होता. लुटालूट करणारे धान्यांची कोठारे, सोने, जडजवाहिर, कला आणि कारागिरीच्या वस्तू लुटून नेत असतच; वर स्त्रियांनाही उचलून नेत असत. या वेळेपर्यंत, टोळी करून

राहणाऱ्या मानवाला टोळीअंतर्गत संबंधाने जन्मलेली प्रजा दिवसेंदिवस कमजोर होत जाते याचे ज्ञान झाले होते. त्यामुळे दुसऱ्या प्रदेशातील टोळ्यांतील स्त्रियांचे हरण करणे हे सशक्त प्रजोत्पादनासाठी आवश्यक मानले जाऊ लागले.

या कालखंडासंबंधी, विशेषत: महिलांच्या सामाजिक स्थितीवर लुटालुटीचे जे परिणाम झाले त्यासंबंधी विस्ताराने मी अन्यत्र लिहिलेले आहे; (चांदवडची शिदोरी, अमरावतीची आयुधे). इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट ही की काळाच्या ओघात ही लुटालूटच एक व्यवस्था बनली. लुटारू सरदार, राजे, महाराजे, सम्राट बनले. दरसाल गुंडांच्या लुटालुटीस तोंड देऊन, तलवारींचे घाव सोसून लूट करवून घेण्यापेक्षा आपल्या उत्पादनातील एक हिस्सा राजे म्हणवून घेणाऱ्या लुटारूंना देणे शेतकऱ्यांनी पत्करले; महाभारतात, बकासुराची भूक भागविण्यासाठी चक्रपूरच्या लोकांनी जसे त्याला रोज गाडाभर अन्न आणि एक माणूस देण्याचे कबूल केले, तसेच.

बकासुराचा वध करणारा भीम चक्रपुरात योगायोगाने आला हे तेथील लोकांचे भाग्य. तमाम शेतकरी मात्र तीन हजार वर्षांपूर्वीपासून बकासुराच्या औलादींना गाडे भरभरून अन्न पाठवीत राहिले आहेत. सरकार नावाच्या गोष्टींचा उगमच मुळी शेतकऱ्यांच्या लुटीत आहे. लूट करणारे किल्ले, गढ्या यांमध्ये राहतात, शहरे वसवतात आणि ते आपली फौज आणि चैनबाजी यांसाठी शेतकऱ्यांची लूट करीत आले आहेत. लुटीचे स्वरूप बदलले; कधी ती उघड उघड झाली, कधी अप्रत्यक्षपणे. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी म्हटले आहे की, सरकार नावाची जी गोष्ट असते ती शेतकऱ्यांची दुष्मनच असते अशी हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची गेल्या तीन हजार वर्षांपूर्वीपासूनच्या अनुभवाने खात्री पटली आहे.

सदासर्वकाळ शेतकऱ्यांनी लुटारूंची लूट मुकाटपणे सहन केली असे नव्हे. मग शेतकरी आंदोलनाचे पहिले स्वरूप कसे होते? जागोजाग शेतकऱ्यांनी एकत्रित होऊन हल्लेखोर लुटारूंना विरोध करण्याचा प्रयत्न केला; बहुतेक वेळा हा प्रयत्न निष्फळ ठरला. कधी असा विरोध सफल झाला तरी शेतकरी एक संघटना आणि एक अर्थव्यवस्था, संरक्षण-व्यवस्था उभारू शकले नाहीत. अल्पावधीतच लुटारूंच्या नव्या झुंडींनी त्यांना उद्ध्वस्त केले. वामनाने शेतकऱ्यांचा राजा बळिराजा याचा केलेला वध हे शेतकरी आंदोलनाच्या या कालखंडाचे प्रतीक आहे.

राजांचे स्वामित्व व सार्वभौम सत्ता स्थापित झाली. शेतकऱ्यांवरील अन्याय



व त्यांची लूट आता व्यवस्थेच्या नावाखाली होऊ लागली. शेतकरी आपल्या देशाच्या राजांच्या विरोधात बंड करून उठू लागले. शक्य असेल त्या प्रकारे शक्य असेल तेथे राजांना विरोध होऊ लागला. 'मृच्छकटिक' नाटकात शेतकऱ्यांच्या उघड बंडाचे उदाहरण सापडते.

शेतकरी आंदोलनाने भारतात नवे रूप धारण केले ते जातीव्यवस्थेमुळे. काही किरकोळ अपवाद वगळता, राज्यकर्ते आणि त्यांचे लष्कर व प्रशासन यंत्रणा यामध्ये गुंतलेले लोक एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला शेतकरी अशा दोन गटांत एकच समाज विभागला होता; या दोन गटात रोटीव्यवहार होत नसे आणि बेटी व्यवहाराही होत नसे. यामुळेच कदाचित्, इतर देशांपेक्षा भारतात शेतकऱ्यांचे शोषण अधिक विक्राळ स्वरूपात झाले. इतर देशांतील सरकार व शेतकरी यांच्यातील संघर्षाचे स्वरूप हळूहळू बरेचसे सौम्य बनत गेले. याचा अर्थ असा नाही की तेथे शेतकऱ्यांच्या समस्या सर्व मिटल्या. तेथेही समस्या नेहमीच उभ्या राहतात. त्यांच्या विरोधात शेतकऱ्यांच्या संघटना लढत राहतात, चळवळी करीत राहतात; पण या चळवळी कामगार, व्यापारी, कारखानदार किंवा पांढरपेशा समाजांच्या चळवळींसारख्याच होतात. या सर्वांना आपापल्या समाजाच्या हिताच्या जपणुकीसाठी दबावगट किंवा फळ्या उभाराव्या लागतात. दुसऱ्या देशांमध्ये या इतर समाजाप्रमाणे शेतकऱ्यांचाही दबावगट किंवा फळी उभी राहू शकली, कारण शेतीसंबंधात तेथील शासन आणि शासनव्यवस्था दुष्टतेने आणि निर्घृणपणाने चालत नाही. भारतात असे झाले नाही. जातीव्यवस्थेमुळे शेतकरी समाज शहरी समाजापासून विभक्त राहिला. तसे, शेतकरी जातीव्यवस्थेत वैश्य गणले जातात. वैश्य गावकुसाच्या आतच राहणारे; तरीसुद्धा गावकुसात राहणाऱ्या ब्राह्मण किंवा क्षत्रियांशी त्यांचे सामाजिक संबंध असत नाहीत. शेतीसंबंधीची अनेक कामे गावकुसाबाहेर राहणाऱ्या शूद्रांकडून करवून घेतली जाऊ लागली तेव्हा तर सवर्ण आणि शेतकऱ्यांमधील सामाजिक व आर्थिक दऱ्या वाढत आणि रुंदावत गेल्या.

शेतकरी, शेतकरीजीवन आणि शेती यासंबंधी भारतात जितकी द्वेषाची आणि शत्रुत्वाची भावना आहे तितकी जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही देशात आढळत नाही. भारतातील तथाकथित उच्चवर्णियांना शेतकरी, त्याचे कष्ट आणि त्याची गरिबी याबद्दल बिलकूल सहानुभूति वाटत नाही. उलट, शेतकरी शुद्ध हवा, पाण्याची रेलचेल, भरपूर फळे भाज्या, निसर्गाचा सहवास यात मस्तीने जगतो. कसल्याही प्रकारचा कर द्यावा न लागता भरपूर सरकारी

मदतीच्या साहाय्याने अत्यंत आनंदात मौजमजेत जीवन जगत असतो असे चित्र ते उभे करतात. मध्यमवर्गीयांच्या मनांत शेतकऱ्यांबद्दल शत्रुत्वाची भावना असते हे एकवेळ समजण्यासारखे आहे; पण मागास समाजातील शेतकऱ्यांबद्दल विद्वेष का असावा? गावच्या शेतमजुराचा संबंध स्वत:च्या नावावर जमीन ठेवणाऱ्या शेतकऱ्यांशीच येतो. त्यांना काम मिळत नाही. याला, ते ज्यांच्या शेतावर काम करतात ते जमीनमालक जबाबदार नसून शेतकऱ्यांच्या शोषणाचे षड्यंत्र रचून ते चालविणारे, दूर शहरात राहणारे जबाबदार आहेत हे त्यांना समजत नाही. गावच्या गरिबीची झळ सर्वात अधिक शेतमजुरांनाच सोसवी लागते. त्यांना गावात जगणे अशक्य होऊन जाते. विशेषत: दुष्काळाच्या वर्षी त्यांना गाव सोडून जाणे भाग पडते. मग ते शहरात येऊन झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या किंवा फुटपाथवर येऊन राहतात आणि गावातील भुकेकंगाल अवस्थेपेक्षा तेथील हलाखीचे जीवनसुद्धा ते बरे मानून घेतात. गावी राहिलेल्या शेतकऱ्यांबद्दलच्या कडवट आठवणी फक्त त्यांच्या मनात शिल्लक राहतात. शेतीमालाला रास्त म्हणून वाढीव भाव मिळाला तर त्याचा सर्वात जास्त भार त्यांनाच सोसावा लागणार असतो. म्हणून ते शेतकरी चळवळीच्या विरोधात उभे राहतात.

आपल्या देशातील शेतकरी चळवळीचा स्वभाव समजून घ्यायचा तर येथील इतिहासाची ओळख करून घेणे आवश्यक आहे. पूर्वी जगभर, अन्नधान्याचे उत्पादन करणारे शेतकरी आणि त्यांचा उपभोग घेणारे बिगरशेतकरी यांच्यामधील संघर्षाची सुरुवात दाहकच झाली; पण हळूहळू संघर्ष निवळत गेले. शेतकऱ्यांकडून लुटलेल्या संपत्तीचा वापर फौजेचा खर्च, महालवाडे बांधणे, मंदिरे उभारणे, दरबारी मौजमजा इत्यादींसाठी होत असे तोपर्यंत उत्पादक शेतकरी आणि उपभोक्ता समाज झगडत राहिले. जमिनीतून पिकविलेल्या अन्नधान्यांच्या कोठारांचा वापर उत्पादन वाढविण्याकरिता आर्थिक योजनांमध्ये व्हायला लागला तेव्हापासून संघर्ष मावळत गेला. भांडवलादी व्यवस्थेने, भारत वगळता जगातील सर्व देशांतील शेती व बिगरशेती समाजातील दरी बऱ्याच प्रमाणात कमी केली. भारतात भांडवलवाद आलाच नाही, जातीव्यवस्थेचाच प्रभाव चालू राहिला आणि म्हणूनच भारतातील शेतकऱ्यांपुढील समस्या इतर देशांतील शेतकऱ्यांच्या समस्यांच्या तुलनेत खूप वेगळ्या आहेत. आपल्या देशात, शहरी बिगरशेतकी आणि ग्रामीण शेतकरी समाजातील दऱ्या बुजल्याच नाहीत.



गाव आणि शहरे यांमधील संघर्षाचा उल्लेख मार्क्सच्या पुस्तकात सापडतो. टॉलस्टॉय, रस्किन इत्यादी लेखकांनीही या संघर्षाची मांडणी केली आहे. फ्रान्समध्ये तर 'एका बाजूला पॅरिस विरुद्ध उर्वरित देश दुसऱ्या बाजूला' अशी संघर्षरेषा मानली जाई. जेथे जातीव्यवस्था नव्हती तेथे हे भेद मिटत गेले. भारतात ना भांडवलवाद आला ना जातिवाद संपला आणि म्हणून या भेदाला 'भारत-इंडिया' संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले. इंग्रज भारतात आले आणि त्यांनी इथे आपला राजकीय जम बसविला तेव्हा भारतातील शेतकरी चळवळीने नवी दिशा धरली.

इंग्रज येण्याआधी 'जात' हीच समाजघटकांची एकक होती. त्याबरोबरच 'गाव' हेही एकक होते. वेगवेगळ्या जातींतील संघर्ष कधी कधी उभे राहत; पण बाह्य आक्रमणाच्या भीतीने ते दबलेले राहात. रोजचा गावगाडा चालायचा म्हणजे शेतीभाती आणि बलुतेदारीची सर्व कामे पार पाडावीच लागत. गावचा कारभार आणि अधिकार सरदार, जमीनदार किंवा पाटील-पटवाऱ्यांच्या हाती असत हे खरे; पण त्या अधिकारांवर गावच्या सार्वजनिक हिताचे काही बंधनही असे. 'खाजगी मालकी' ही संकल्पनाच नव्हती. गावाच्या या रचनेमध्ये काही बदल करायची सुरुवात शेरशहाने पूर्वी केली होती. इंग्रजांनी आपली सत्ता प्रस्थापित करताना महसूल व्यवस्थेचे काम पूर्ण केले. देशभरातील सर्व जमिनींचे नकाशे बनवले, जमिनींना वेगवेगळे नंबर दिले. एकप्रकारे, जमिनीच्या प्रत्येक तुकड्याची मालकी व्यक्तीव्यक्तींवर खाजगी स्वरूपात जवळजवळ लादली गेली. परिणामत:, जमीन ही खाजगी मालमत्ता असू शकते अशी भावना, इतिहासात प्रथमच तयार झाली, 'अहम्'भाव ही प्राणिमात्राची मूलप्रेरणाच आहे. विचार करणारा एकक घटक 'व्यक्ती' असतो. त्यामुळे, 'खाजगी मालकी'ची संकल्पना निसर्गाशी बरीचशी मिळतीजुळती आहे. त्यामुळे अल्पावधीतच तिने लोकांच्या मनाचा पगडा घेतला. अविकसित अवस्थेमुळे गावाच्या संस्कृतीत जी सामूहिकतेची भावना होती ती 'खाजगी मालकी'च्या संकल्पनेमुळे वेगाने लोप पावली.

इंग्रजी राजवटीने जमिनीचा महसूल कठोर सक्तीने वसूल करण्याचा आणि करविण्याचा सपाटा सुरू केला. इंग्रजांनी वेगवेगळ्या प्रदेशातला महसूल चौथ्या किंवा तिसऱ्या हिश्शापर्यंत आकारला होताच; पण जमीनदार, महसूल अधिकारी वसुलीचे काम अशा रीतीने करीत की त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनातील जवळजवळ दोन तृतीयांश उत्पादनाला मुकावे लागे.

ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारीही इतके लालची होते की जमीनदारांनासुद्धा जगणे मुश्किल होऊन बसले. इंग्रज अधिकाऱ्यांच्या जुलुमातून सुटण्याच्या आशेने जमीनदार १८५७ च्या बंडात बऱ्याच मोठ्या संख्येने सामील झाले होते. बंड टिकू शकले नाही कारण बंडात सामील झालेले राजे, जमीनदार सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळवू शकले नाहीत. बंड मोडले, राणीचे राज्य आले आणि बंडात सामील झालेल्या जमीनदारांना कठोरपणे नेस्तनाबूत करण्यात आले. त्यांच्या जागी, इंग्रजांना मदत करणाऱ्या लोकांना जमीनदारी देण्यात आली. नवीन जमीनदारांचा हा वर्ग एक खास रूप घेऊन आला. सर्वसामान्य जनता इंग्रजांविरुद्ध बंडामध्ये सामील झाली नाही हे खरे; पण खानदानी जमीनदारांच्या विरुद्ध इंग्रजांचे पित्ते बनून उभे राहिले म्हणून नव्याने जमीनदारी लाभलेल्या या महाभागांमध्ये रयतेच्या मनात कमालीची घृणा होती. या नव्या जमीनदारांसमोर खानदानाची इज्जत सांभाळण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे त्यांच्या कारभारावर कसल्याच नैतिकतेचे बंधन नव्हते. शेतकरी आणि शेतमजुरांच्या हातून जितके जमेल तितके पीक ओरबाडून घेणे, मौजमजा व ऐषआरामात धनसंपत्ती उडविणे आणि आपले हे भाग्य अखंड राहावे यासाठी शक्य तितक्या तऱ्हांनी सरकारी अधिकाऱ्यांना खूष ठेवणे असे या नवीन जमीनदारांचे जीवन झाले होते.

देशामध्ये इंग्रजी न्यायालये चालू होण्याआधी गावची कोणतीही पंचायत काही सामाजिक अपराधासाठी एखाद्याला जातिबहिष्काराची शिक्षा देऊ शकत असे, पण कोणाला गावाबाहेर हाकलू शकत नसे.

आता जमीनदारांना न्यायालयांच्या मदतीने शेतकऱ्यांच्या जमिनी हिसकावून घेणे शक्य होऊ लागले. जमीनदारांनाही पैशांची गरज नेहमी भासे.सरकारी महसूल भरण्यासाठी सद्वर्तनी जमीनदारांनाही कर्ज काढावे लागे. बाकी साऱ्या जमीनदारांना ऐषआरामासाठी रयतेची पिळवणूक करूनसुद्धा पैशाचा खणखणाट भासत असे. सावकारांना आणि व्याजावर पैसे देण्याचा व्यवसाय करणारांना महत्त्व प्राप्त झाले आणि ते स्वत:च एक ताकद बनले.

इंग्रजांच्या आगमनानंतर कंपनीविरुद्ध जमीनदारांनी उभे केलेले बंड म्हणजे शेतकरी चळवळच होती- जमीनदारांनी केलेली- चळवळ; पण जमीनदारांबद्दल थोडाबहुत आदर राखून असली तरी रयत त्यावेळी इंग्रजांच्या विरोधात उभी ठाकली नाही. शेतकरी-अस्मिता भंग पावली. गाव एकक घटक राहिला नाही. आता शेतकरी चळवळ सरकारविरोधी स्वरूपाची न राहाता गावकुसाच्या आत मर्यादित झाली आणि मग कुठे सावकारांच्या विरोधात तर कुठे जमीनदारांच्या



विरोधात संघर्ष उभे राहू लागले. दक्षिण भारतात झालेले अशा तऱ्हेचे संघर्ष 'दक्षिणेतील दंगे' (Deccan Riots) या नावाने प्रसिद्ध आहेत. या संघर्षाचा सरकारवरही थोडाफार परिणाम झाला. कर्जामध्ये सूटसवलती देणारे काही कायदे झाले, सहकारी व्यवस्था तयार करण्याचेही प्रयत्न झाले. त्यातून काही विशेष निघाले नाही.

शेतकरी चळवळीचे 'गाव विरुद्ध शहरे' हे रूप जाऊन 'गावाच्या अंतर्गत संघर्ष' असे तिचे स्वरूप बनले. या बदलामुळे शहरवासीयांना खूपच आनंद झाला. जमीनदार-सावकार यांविरुद्ध शेतकऱ्यांची बाजू घ्यायला शहरवासी तयार झाले. जमीनदार आणि सावकार रयतेच्या दृष्टीने दुष्ट होते हे खरे होतेच; पण, शहरवासी सावकार व जमीनदारांच्या विरोधात बोलू लागले ते काही त्यांच्या मनात शेतकऱ्यांबद्दल करुणा जागी झाली म्हणून नव्हे; शेतकऱ्यांच्या घरून लुटून नेलेली लक्ष्मी शेतीतून उचलून सावकार जमीनदारांच्या वाड्यांमध्ये आणि गढ्यांमध्ये बंदिस्त होत होती याचे दु:ख शहरवासीयांच्या मनात सलत होते. शेतकऱ्यांच्या शोषणातला पुरेसा हिस्सा आपल्या वाट्याला येत नाही हे शहरवासीयांच्या मनातील शल्य होते.

गांधीजी हिंदुस्थानात आले आणि शेतकरी चळवळीने आणखी एकदा कूस बदलली. शेतकऱ्यांच्या जमीनदार व सावकारांच्या विरोधातील संघर्षाची शक्ती तेथून बाजूस काढून सर्व इंग्रजी राजवटीच्या विरोधात चालू असलेल्या स्वतंत्रता आंदोलनास जोडण्यात महात्मा गांधी आणि त्यांचे सरदार पटेलांसारखे सहकारी यशस्वी झाले. इंग्रजांच्या आगमनानंतर जनतेला कायदा व सुव्यवस्था, शिक्षणाच्या सोयी आणि सार्वजनिक जीवनात समानतेचा अनुभव अशा गोष्टींचा लाभ व्हायला लागला होता. लोकांच्या दृष्टीने जाति-विषमतेचा अंत होणे हे इंग्रज हटण्यापेक्षा महत्त्वाचे होते. सामाजिक सुधार होण्याआधीच इंग्रज निघून गेले तर ज्या लोकांनी शेकडो वर्षे रयतेवर अन्याय केले, जुलूमजबरदस्ती केली त्याच लोकांच्या हातात पुन्हा देशाची सूत्रे जातील अशी त्यांना धास्ती वाटत होती; पण स्वतंत्रता आंदोलनाची गतीच अशी होती की शेतकऱ्यांनी आपल्या प्रधान समस्या बाजूला ठेवून ते या आंदोलनात सामील झाले. गांधीजींचे नेतृत्व मानणारे शासन शेतकऱ्यांच्या समस्या दूर करील, त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही अशी त्यांना आशा वाटत होती.

स्वातंत्र्यानंतर पंचवीस-तीस वर्षे शेतकऱ्यांच्या मनातील ही आशा टिकून होती. समाजवादाच्या घोषणा मोठ्या लोभस ठरल्या. जमिनीसंबंधी जे कायदे

झाले त्यामुळे सर्वसामान्य रयतेला आनंद झाला. कारण, जमीनदारांकडूनच जमीन काढून घेतली जात होती. असा कायदा अमलात आणताना काही कायदेशीर जोरजबरदस्ती करावी लागत असेल तर त्यात काही गैर नाही अशा तऱ्हेच्या 'लेनिनी' खाक्याच्या नैतिकतेचाही प्रभाव मोठा होता. त्यावेळी शेतकऱ्यांच्या लक्षात आले नाही की जमीनदारांचा काटा काढण्यासाठी हातात घेतलेले हे कायद्याचे काटे लवकरच शेतकऱ्यांच्या विरोधातही हत्यारे म्हणून वापरले जाणार आहेत!

देशी सरकारने सावकारी संपवली तेव्हाही शेतकऱ्यांना आनंद झाला; गावच्या सावकाराच्या जागी शहरातील संस्था सावकार बनून आल्याने परिस्थितीत काही फरक पडणार नाही हेही त्यांच्या ध्यानात आले नाही.

हरित-क्रांतीच्या प्रयोगाने उत्पादन वाढले, अन्नधान्याच्या बाबतीत देश आपल्या पायांवर उभा राहिला. सहकाराची रेलचेल झाली. साखर, सूत इत्यादींचे कारखाने उभे राहिले, इतके सगळे होऊनही, आपल्या गरिबीचे निवारण होत नाही हे शेतकऱ्यांना अनुभवाला येऊ लागले. शहराची भरभराट होऊ लागली, गावे ओस पडू लागली.

शेतकरी चळवळ आपले अस्तित्व स्वतंत्रता आंदोलनाच्या राष्ट्रीय प्रवाहात हरवून बसली होती. राष्ट्रीय प्रवाहात सामील झालेल्या शेतकऱ्यांची मुले आता आमदार बनली, खासदार बनली, मंत्री बनली; सहकारी संस्थांचे अध्यक्ष बनली, सहकारी कारखानदार बनली. जमीनदार, सावकार गेले पण त्यांच्या जागेवर पुढाऱ्यांच्या परिवारातील मुले गावच्या सत्तेवर कबजा करून बसली. फक्त, शेतकऱ्याची परिस्थिती सुधारली नाही; याउलट, खालावली.

स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास का झाला नाही, देशात समृद्धी का आली नाही अशा चर्चा सध्या चालू आहेत; कशासाठी? तर म्हणे, सध्या आपण स्वातंत्र्याचा पन्नासावा वर्धापनदिन साजरा करीत आहोत! स्वातंत्र्य येऊनसुद्धा देश गरीब का राहिला, शेतकऱ्यांचे दारिद्र्य का वाढले, गावे उजाड का होऊ लागली असे प्रश्न नव्या शेतकरी चळवळीने पुढे ठेवले आहेत. देशाच्या गरिबीचे आणि शेतकऱ्यांच्या दु:खाचे कारण सरकारची धोरणेच आहे अशी या चळवळीची धारणा आहे. सरकार समाजवादाच्या नावाखाली शेतकऱ्यांना जाणूनबुजून लुटते आहे हे या चळवळीने सप्रमाण सिद्ध केले आहे. १९८० मध्ये सुरू झालेल्या या शेतकरी चळवळीने पुन्हा एकदा 'शेतकरी विरुद्ध बिगर शेतकरी' हे आपले मूळ स्वरूप धारण कले आहे.



गेल्या सहा सात वर्षांपासून शेतकरी चळवळ आणखी एक नवीन भूमिका पार पाडीत आहे. जगभर समाजवादाचा ऐतिहासिक पाडाव झाला आहे; पण हिंदुस्थानात पुढारी, नोकरदार, समाजवादाच्या जमान्यामध्ये समृद्ध झालेले लायसन्स-परमिटांचे दलाल राजकारणी, गुंड, तस्कर अशा सर्वांनी सत्ता बळकावली आहे. इंग्रज आले त्या काळी या देशात ठगपेंढाऱ्यांची अनौपचारिक राजवट चालू होती; इंग्रज गेल्यानंतर पन्नास वर्षांत ठगपेंढाऱ्यांना आपली औपचारिक राजवट रूढ करणे साध्य झाले नाही. नेता, तस्कर, गुंडा, अफसर समाजवादाच्या जमान्यात हाती आलेली सत्ता सोडायला सुखासुखी तयार होणार नाहीत. उलट, 'येनकेन प्रकारेण' सरकारशाही व नोकरशाही यांचा अंमल चालूच रहावा यासाठी त्यांची प्रयत्नांची परकाष्ठा सुरू आहे; आणि सरकार व नोकरशाहीच्या प्रभुत्वाविरुद्ध संघर्ष उभा करण्याची महत्त्वाची भूमिका नवी शेतकरी चळवळ पार पाडत आहे.

शेतकरी चळवळीने इतिहासातील एक कालचक्र पुरे केले आहे असे दिसते. या चळवळीची सुरुवात सरकार नावाच्या कोणत्याही गोष्टीला विरोध करण्याने झाली. नंतर काही काळ या चळवळीच्या ज्वाला गावकुसाच्या आतच भडकत राहिल्या आणि तिने जमीनदार व सावकाराविरुद्ध संघर्षाचे रूप घेतले. स्वतंत्रता आंदोलनात राष्ट्रीय मध्यप्रवाहात तिने आपले अस्तित्व झोकून दिले. स्वातंत्र्यानंतर उत्पादन वाढविणे, सहकाराची जोपासना करणे अशी विधायक कामेही या चळवळीने केली आणि आता आपल्या आदिम स्वरूपात पुन्हा एकदा देशाच्या व्यासपीठावर उभी राहिली आहे. सरकारशाहीचा विरोध ही शेतकरी चळवळीची आद्य प्रेरणा होती. आज या चळवळीला आपल्या मूळ ओळखीची खूण सापडली आहे.

*(शेतकरी संघटक, ६ नोव्हेंबर १९९७)*

■

तेवीस

# शेतकऱ्यांना हवा 'मार्शल प्लॅन'

तिरुपती येथे १५ ते १७ मार्च २००० रोजी झालेल्या राष्ट्रीय शेतकरी परिषदेने केलेल्या ठरावांनी मोठी खळबळ उडवून दिलेली दिसते. या ठरावांवर टीका करणारांपैकी बहुतेकांना हे मान्य आहे की शेतकरी भयंकर संकटात सापडले आहेत आणि सरकार वर्षोगणती, त्याचे आपल्याला काही सोयर-सुतक नसल्यासारखे चालते. आयातीवरील गुणवत्ताविषयक निर्बंध टप्प्याटप्प्याने कमी करून अर्थव्यवस्था खुली केली तर भारतीय शेतीला व्यवसाय म्हणून चांगले भवितव्य आहे याबद्दलची जाणीव आता तयार होऊ लागली आहे.

''तिरुपती ठरावांचा सूर समजण्यासारखा आहे; पण त्याची अभिव्यक्ती चुकीची आहे.'' असा काही टीकाकारांचा निष्कर्ष आहे.

त्यांचा सुज्ञ सल्ला असा आहे : ''हिंदुस्थानात करोडो भुकेली तोंडे आहेत आणि हिंदुस्थानी बाजारपेठ शेतकरी जितके पिकवतील ते सर्व रिचविण्यास समर्थ आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांनी उत्पादकता वाढवावी; सरकारने रस्ते, बाजारपेठ आणि सिंचनाच्या पायाभूत सुविधा सुधाराव्या आणि शेतकऱ्यांच्या संघटनांनी त्यांच्या घटकांमधील समन्वय सुधारण्यावर तसेच केंद्र आणि राज्य शासनांनी प्रायोजित केलेल्या उत्पादनयोजनांच्या अधिकृत अंमलबजावणीवर भर द्यावा.''

शेतकऱ्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे नेते अजाण, बालबुद्धीचे नक्कीच नाहीत. तीन दिवस सलगपणे सर्व समस्यांची पाळेमुळे खणून केलेल्या प्रगल्भ विचारमंथनाच्या आधाराने ही परिषद तिरुपती कृतिकार्यक्रमाप्रत येऊन पोहोचली. तिरुपती येथे जमलेल्या शेतकऱ्यांच्या विविध राज्यातील संघटना निविष्टांसाठी अनुदानांची भीक मागणाऱ्या किंवा शेतीमालाला सतत वाढते आधारभाव मागणाऱ्या संघटना नव्हत्या. या सर्व संघटना शेतीमालाच्या देशांतर्गत



बाजारपेठेतील व्यापारावरील तसेच निर्यातीवरील निर्बंध दूर करण्याची मागणी पहिल्यापासून करीत आहेत. सरकारला कर, बिले, सेस वगैरे रूपांनी करावयाचा भरणा न देण्याचा, तसेच उत्पादन कमी करण्याची तयारी ठेवण्याचा मुळावरच घाव घालणारा कृतिकार्यक्रम जाहीर करणे या स्वतंत्रतावादी शेतकरी संघटनांना भाग पडले.

शेतीमालाचे उत्पादन कमी करण्याचा कार्यक्रम अमलात आणणे तशी अवघड गोष्ट आहे. उत्पादनात वाढ होऊनसुद्धा उत्पन्नात घट येऊ लागली तरच शेतकरी अशी टोकाची भूमिका घेतील किंवा मग, त्यांना जर असे वाटू लागले की आपली कोंडी झाली आहे आणि त्यातून सुटण्याचे काहीच मार्ग नाहीत तर उत्पादन कमी करण्याचा मार्ग त्यांना संयुक्तिक वाटेल.

शेतकरी कोंडीत सापडला आहे याला, विविध राज्यात घडणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यासत्राखेरीज आणखी काही पुरावा आवश्यक आहे का? चालू हंगामात व आंध्र प्रदेशच्या वारंगल जिल्ह्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या येण्यास सुरुवात झाली आहे. भपकेबाज समारंभ आणि इन्फो-टेकच्या प्रगतीबद्दल फुशारकी यांनी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे नागडे सत्य झाकता येणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शेतीचा थोडक्यात आढावा घेऊ. नेहरू अंत:करणपूर्वक समाजवादी होते; त्यांनी पाणीपुरवठ्यासाठी व वीजनिर्मितीसाठी धरणे बांधून, जमीन-सुधारणा कायदे करून आणि सहकारी पतसंस्था व बाजारयंत्रणा यांची उभारणी करून शेतीक्षेत्राची संरचना सुधारण्याचा प्रयत्न केला. या धोरणांनी देशाला १९६० च्या दशकात 'बंदरात उतरणाऱ्या अन्नधान्याच्या भरोशावर जगण्याच्या' अवस्थेला आणून पोहोचवले. लालबहादुर शास्त्रींनी हरित क्रांती तंत्रज्ञानाचे स्वागत केले, त्याचबरोबर आधारभूत किमतीची यंत्रणा व त्यासाठी कृषिमूल्य आयोगाची उभारणी केली. शास्त्रीजींच्या 'जय जवान, जय किसान' धोरणाने देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेला नेले. मात्र, काही काळानंतर शेतकऱ्यांच्या असे लक्षात येऊ लागले की उत्पादकतेत आणि उत्पादनात वाढ होऊनही उत्पन्न वाढले नाही, ते हरतच राहिले आणि कर्जाच्या प्रचंड बोजाखाली दबतच राहिले.

एका मागोमाग एक आलेल्या सरकारांनी जाणूनबुजून शेतीक्षेत्राच्या विरोधी धोरणे राबवली; शेतीमालाच्या वाहतुकीवरील, साठवणुकीवरील, प्रक्रियेवरील आणि निर्यातीवरील निर्बंध आणि त्यांच्या जोडीने आपल्या मायबाप सरकारने

परदेशातून आणलेला शेतीमाल कमी किमतीत देशांतर्गत बाजारपेठेत ओतणे या सर्वांनी शेतकऱ्याला कंगाल बनवले. या धोरणात्मक योजनांमुळे शेतीक्षेत्रातील भांडवलाची धूप झाली. परिणामी, शेतकऱ्यांना माघार घेऊन निकृष्ट तंत्रज्ञानाचा आणि व्यवस्थापनाचा अवलंब करणे भाग पडले.

१९९१ साली आर्थिक सुधारांची सुरुवात झाली आणि शेतकऱ्यांच्या मनात आशा पल्लवित झाल्या की सरतेशेवटी आपले दिवस आले आहेत, आता शेतीमालाच्या व्यापारावरील निर्बंध उठतील आणि शेती व्यवसायाला पूरक व तारक उद्योगांची परवान्याच्या बेडीतून सुटका होईल. प्रत्यक्षात, आर्थिक सुधारांचा शेतीक्षेत्राला वारासुद्धा लागला नाही. जागतिक व्यापार संघटनेच्या करारात असलेल्या तरतुदीनुसार हिंदुस्थान सरकारने शेतीमालाच्या व्यापारावरील निर्बंध काढून टाकावे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा पसारा मर्यादित करावा आणि त्या व्यवस्थेतून वितरण करण्यासाठी लागणारा माल खुल्या बाजारातून खरेदी करावा, उत्पादकांवर लेव्ही लादू नये. हिंदुस्थान सरकारने या तरतुदी अमलात आणण्याकडे काणाडोळा केला; पण जागतिक व्यापार संघटनेच्या तरतुदीनुसार आयातीवरील गुणवत्ताविषयक निर्बंध टप्प्याटप्प्याने हटविण्याबाबत जागतिक व्यापार संघटनेच्या अन्य सदस्य राष्ट्रांनी आणलेल्या दबावापुढे हिंदुस्थान सरकार फार काळ टिकाव धरू शकले नाही आणि त्याला शेतीमालाच्या आयातीवरील निर्बंध उठवून आयातीला अनुमती देणे भाग पडले.

एप्रिल २००० च्या सुमारास भारतीय शेतकरी विचित्र कोंडीत सापडलेला असेल : एका बाजूला सरकारची शेतीक्षेत्रासंबंधी वैरभावी धोरणे आणि दुसऱ्या बाजूला, आयात झालेल्या मालाचा ह्न स्वस्त पण आणि मस्त पण ह्न लोंढा.

शेतकऱ्यांना रास्त भाव नाकारणाऱ्या आणि जवळजवळ ८७ टक्के उणे सबसिडी लादण्याच्या सरकारी धोरणांमुळे गेल्या चाळीस वर्षांत शेतीक्षेत्र सडून गेले आहे, शेतीक्षेत्राच्या संरचनेची मोडतोड झाली आहे आणि तंत्रज्ञानातही मागासलेपणा आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जैविक तंत्रज्ञानाने विकसित जातीच्या स्वस्त कापसाचा पूर लोटला असताना हिंदुस्थान सरकार मात्र आपल्या शेतकऱ्यांना त्या बियाण्यांची चाचणी करण्यासाठीसुद्धा परवानगी देत नाही.

तिरुपती येथे शेतकऱ्यांच्या राष्ट्रीय परिषदेसाठी जमलेल्या शेतकऱ्यांच्या संघटनांना माहीत आहे की शेतकऱ्यांना दु:स्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग



शेतकऱ्यांना बाजारपेठ आणि तंत्रज्ञान यांच्याशी संपर्क साधण्याचे स्वातंत्र्य ताबडतोब मिळण्यानेच खुला होणार आहे. त्यांना हेही माहीत आहे की, 'इंडिया'च्या सततच्या चाळीस वर्षांच्या आर्थिक आक्रमणामुळे तयार झालेल्या सडलेल्या अवस्थेतूनही 'भारता'चे पुनरुत्थान होणार आहे. फक्त, संरचना आणि तंत्रज्ञान यांचा दर्जा सुधारण्यासाठी 'मार्शल प्लॅन'सारखी एखादी योजना आवश्यक आहे.

तिरुपती येथील राष्ट्रीय शेतकरी परिषदेने अगदी निकराचे आवाहन केले आहे, त्याने तरी सरकारला जाग येईल या आशेने.

शेतकऱ्यांनी स्वत:पुरते आणि आपल्या गावापुरतेच पिकवले तर सरकारला जागे व्हावेच लागेल. स्टॅलिनने अशी परिस्थिती उद्‌भवली तेव्हा त्यांच्या शेतकऱ्यांवर रणगाडे घातले; हिंदुस्थान सरकार थोडा बरा विवेक दाखवील अशी शेतकऱ्यांच्या संघटनांना आशा आहे.

*(शेतकरी संघटक, ६ एप्रिल २०००)*

## 'मार्शल प्लॅन' उगमाचे भाषण

सभ्य जन हो, जगाची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे याची तुम्हाला कल्पना देणे मला आवश्यक वाटते. खरे तर, सर्व बुद्धिमान लोकांना याची जाणीव असेलच; पण माझ्या दृष्टीने अडचणीची बाब म्हणजे ही समस्या इतकी गुंतागुंतीची आहे की त्यासंबंधी वर्तमानपत्रे आणि रेडिओ यांच्या माध्यमातून जनतेसमोर येणाऱ्या सर्व माहितीची गोळाबेरीज केली तरी सर्वसामान्य माणसाला या गंभीर परिस्थितीचे स्वच्छ आकलन होणे कठीण आहे. त्यापलीकडे, आपण जगाच्या समस्याग्रस्त भागांपासून खूपच दूर आहोत आणि समस्याग्रस्त लोकांची दीर्घकालीन दुर्दशा आणि तीवरील प्रतिक्रिया आणि त्या सर्वांचा त्यांच्या सरकारांवर होणारा परिणाम या सर्वांचे आपल्या राष्ट्रातील नागरिकांना आपण सुरू केलेल्या जागतिक शांतता स्थापनेच्या प्रयत्नांच्या संदर्भात आकलन होणे कठीण आहे.

युरोपच्या पुनर्वसनासाठी काय काय आवश्यक आहे याचा हिशोब करताना प्रत्यक्ष जीवितहानी; शहरे, कारखाने, खाणी, रेल्वेमार्ग अशा दृश्य नुकसानीचा अंदाज बरोबर काढला गेला आहे; पण गेल्या काही महिन्यांत सहजी असे दिसून आले की युरोपच्या अर्थव्यवस्थेचे जाळे विस्कळित झाल्याने जे नुकसान झाले आहे त्या मानाने या दृश्य विद्‌ध्वंसामुळे झालेले नुकसान कमी गंभीर आहे. गेल्या दहा वर्षांत परिस्थिती सातत्याने फारच अस्वाभाविक, विचित्र बनत गेली. तापाच्या धुंदीत असल्यासारखी केलेली युद्धाची तयारी आणि त्याहून अधिक धुंदीत केलेला युद्ध चालू ठेवण्याचा आटापिटा यांनी राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या सर्वच अंगांना ग्रहण लागले. यंत्रसामुग्री नादुरुस्त झाली किंवा दुरुस्तीपलीकडे

बिघडली. स्वैर आणि विघातक नाझीशाहीखाली अक्षरशः प्रत्येक उद्योग जर्मन युद्धयंत्रणेचा भाग बनवला गेला. भांडवलाची हानी, राष्ट्रीयीकरणात गडप होणे किंवा सरळसरळ विद्ध्वंस यांमुळे दीर्घकालीन व्यापारी संबंध, संस्था, बँका, विमा कंपन्या आणि जहाज कंपन्या नामशेष झाल्या. बऱ्याच राष्ट्रांमध्ये, स्थानिक चलनावरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. युद्धकाळात युरोपमधील उद्योगांची मांडणी पूर्णपणे मोडून पडली. लढाया संपून दोन वर्षे उलटली तरी जर्मनी आणि ऑस्ट्रियाबरोबर शांतता करार होऊ न शकल्याने नुकसानीतून वर येण्याची गती गंभीरपणे कमी कमी होत आहे; पण या सर्व समस्यांतून सुटण्यासाठी काही तातडीचा तोडगा निघाला तरी युरोपातील अर्थकारणाची घडी नीट बसवायची तर आधी वाटत होते त्यापेक्षा बराच अधिक कालावधी आणि प्रयत्न आवश्यक आहेत.

या बाबीची आणखी एक बाजू आहे लक्षणीय आणि गंभीरही. शेतकरी नेहमी आपल्या इतर गरजा भागविता याव्या म्हणून शहरवासीयांबरोबर विनिमय करण्यासाठी अन्नधान्य पिकवितो. ही श्रमविभागणी आधुनिक संस्कृतीचा पाया आहे. या घडीला हा पायाच उखडला जाण्याची भीती तयार झाली आहे. छोट्या मोठ्या शहरांतील उद्योग शेतकऱ्याला पुरेशा वस्तूंचे उत्पादन करीत नाहीत. कच्चा माल आणि इंधनाचा पुरवठा अपुरा आहे. यंत्रसामुग्रीची कार्यक्षमता कमी झाली आहे किंवा ती मोडीतच निघाली आहे. शेतकरी किंवा जमीनदार यांना जो माल खरेदी करण्याची इच्छा आहे तो विक्रीसाठी उपलब्धच नाही. त्यामुळे हाती आलेला पैसा काहीच उपयोगाचा ठरत नसल्याने शेतात पिकवलेला माल बाजारात नेऊन विकण्याचा खटाटोप त्याला बिनफायद्याचा वाटू लागला आहे. त्यामुळे, त्याने बरीच जमीन पिकांखालून काढून त्यांत गुरे चारायला सुरुवात केली आहे. कपडेलत्ते आणि आधुनिक संस्कृतीस साजेशी यंत्रेउपकरणे त्याच्याकडे नसली तरी शेतकरी आपल्या जनावरांना जादा धान्य खाऊ घालतो आणि त्याला व त्याच्या कुटुंबीयांनाही पुरून उरण्याइतके अन्न त्याच्याकडे आहे. इकडे, शहरातील लोकांना अन्न आणि इंधनाचा तुटवडा पडू लागला आहे. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांच्या सरकारांना आपल्याकडील परकीय चलन आणि आपली पत खर्चून परदेशातून अन्न आणि इंधन विकत आणून शहरी लोकांच्या गरजा पुऱ्या करणे भाग पडत आहे. जी गंगाजळी पुनर्बांधणीच्या तातडीच्या कामासाठी वापरायची तीच अशा तऱ्हेने आटून चालली आहे. अशा तऱ्हेने एक गंभीर समस्या वेगाने आकार घेत आहे, ही जगाच्या दृष्टीने शुभसूचक घटना निश्चितच नाही. उत्पादनांच्या विनिमयाला आधारभूत असणारी श्रमविभागणीची आधुनिक प्रणाली मोडून पडण्याच्या धोक्यात सापडली आहे.

यातील सत्य परिस्थिती अशी आहे की येत्या तीन-चार वर्षांत युरोपला लागणाऱ्या परदेशी - प्रामुख्याने अमेरिकन - अन्नधान्ये आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती त्याच्या सध्याच्या आर्थिक क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक आहे. त्यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळायला हवी किंवा अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय ऱ्हासाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल.

हे दुष्टचक्र भेदणे आणि युरोपीय राष्ट्रांच्या तसेच समग्र युरोपच्या आर्थिक भवितव्याबद्दल त्यांच्या जनतेत आत्मविश्वास पुनर्प्रस्थापित करणे हाच या परिस्थितीवरील तोडगा आहे.



संपूर्ण युरोप क्षेत्रातील चलनांच्या प्रचलित मूल्यांबद्दल चर्चा करण्यात काही अर्थ नाही; पण युरोप खंडातील सर्व उत्पादक आणि शेतकरी आपल्या मालांची देवाणघेवाण या चलनांच्या माध्यमातून करण्यास राजी होतील अशी परिस्थिती तयार व्हायला हवी.

या सर्व परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर निरुत्साहाचे वातावरण तयार होईल आणि त्या निरुत्साहातून आलेल्या अगतिकतेमुळे दंगेधोपे उसळण्याची शक्यता आहे; पण त्याबरोबरीनेच अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे काय परिणाम होतील तेही आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. जगाचे आर्थिक स्वास्थ्य चांगलेच राहायला हवे, त्याशिवाय समाजात स्थैर्य आणि शांतता नांदू शकणार नाही. त्यामुळे, जागतिक आर्थिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी अमेरिकेने शक्य तितकी मदत करणे तर्कसंगतच होईल. आपली धोरणे कोण्या राष्ट्राविरुद्ध किंवा विचारसरणीविरुद्ध नाहीत; आपली धोरणे भूक, गरिबी, वैफल्य आणि अव्यवस्था यांच्याविरुद्ध आहेत. स्वतंत्रतावादी संस्थांचे अस्तित्व धोक्यात येणार नाही अशा प्रकारच्या जागतिक अर्थव्यवस्थेची पुनर्स्थापना करणे हा आपल्या धोरणांचा उद्देश असला पाहिजे आणि माझी खात्री झाली आहे की मदतच करायची झाली तर वेगवेगळ्या समस्या उभ्या राहिल्या की त्या त्या वेळी तुकड्या तुकड्याने मदत करण्याचा काही उपयोग होत नाही. सरकारने यापुढे मदत करायची ठरवली तर ती वरवरच्या मलमपट्टीप्रमाणे न करता समस्येचे पूर्णांशाने निराकरण करणारी असावी. ज्या राष्ट्रांच्या सरकारांना आपल्या अर्थव्यवस्थेची पुनर्स्थापना करण्याची मनापासून तळमळ आहे त्यांना अमेरिकेच्या सरकारकडून संपूर्ण सहकार्य मिळेल असा मला विश्वास वाटतो. इतर राष्ट्रांच्या आर्थिक सुधारणांच्या प्रयत्नांना अडथळे आणून त्यांना खो घालण्याचे उपद्व्याप करणाऱ्या राष्ट्रांना मात्र आमच्याकडून अशी मदतीची अपेक्षा करता येणार नाही. त्यापुढे जाऊन, जी सरकारे, राजकीय पक्ष आणि गट राजकीय किंवा इतर फायद्यांसाठी मानवी समाजात दुर्दशा निर्माण करणाऱ्या कारवाया करतील त्यांना अमेरिकेच्या तीव्र विरोधाला तोंड द्यावे लागेल.

युरोपीय राष्ट्रांच्या समस्येचे निराकरण करणाऱ्या आणि त्यांना आपल्या अर्थव्यवस्थेची पुनर्स्थापना करण्याच्या प्रयत्नांत मदत करणाऱ्या या योजनेत अमेरिका सरकारने सहकार्याची फार पुढची पावले टाकण्याआधी युरोपीय राष्ट्रांमध्ये, साहजिकपणे, एक करार होणे आवश्यक आहे. या करारात अमेरिकेची जी काही योजना असेल त्या योजनेकडून प्रत्येक राष्ट्राची अपेक्षित मागणी आणि योजना अमलात आणण्यासाठी त्यांचा सहभाग याविषयी स्पष्टता असली पाहिजे. युरोपला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी अमेरिकेने एकतर्फी एखादी योजना आखून ती त्यांच्यावर लादणे योग्य होणार नाही आणि फलदायीही ठरणार नाही. ते युरोपियनांचे काम आहे. तेव्हा, माझ्या मते, पुढाकार युरोपियनांनीच घ्यायला हवा. आमच्या देशाची भूमिका युरोपियनांना त्यांच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात मित्रत्वाच्या भावनेतून मदत करणे आणि नंतर ती अमलात आणण्यासाठी प्रत्यक्षात शक्य होईल तितके आर्थिक पाठबळ देणे इतकीच राहील. हा कार्यक्रम सामुदायिक असायला हवा; सगळी नाही तरी युरोपातील बरीच राष्ट्रे यात सामील झाली पाहिजेत.

एकूण समस्येचे स्वरूप आणि तिच्या निराकरणासाठी केलेली उपाययोजना यासंबंधी

अमेरिकेच्या आम जनतेची जाण हा या कार्यक्रमांतील अमेरिकेच्या प्रत्येक यशस्वी सहभागाचा गाभा असणार आहे; त्यात राजकीय अभिनिवेशाला किंवा पूर्वग्रहाला वाव असणार नाही.

इतिहासाने आपल्या राष्ट्रावर ही जी जबाबदारी सोपविली आहे ती आम अमेरिकन जनतेच्या त्या जबाबदारीला सामोरे जाण्याच्या मनीषेच्या बळावर, मी आतापर्यंत ज्या काही अडचणी आपल्यासमोर ठेवल्या त्यांवर मात करून पार पाडू शकू आणि पार पाडू.

जनरल मार्शल यांच्या या भाषणानंतर लवकरच 'युरोपीय आर्थिक सहकार परिषदे'ची स्थापना झाली. तिच्या चर्चासत्रांनंतर 'युरोपीय आर्थिक सहकार संघ' स्थापन झाला. त्यांनी जनरल मार्शल यांच्या अपेक्षेनुसार करारनामा केला आणि युरोपीय राष्ट्रांच्या आर्थिक पुनरुत्थानाचा कार्यक्रम सुरू झाला. समाजवादी रशियाने या कार्यक्रमात भाग न घेण्याचे दडपण त्यांच्या गटातील युरोपीय राष्ट्रांवर आणले. १९४८ साली सुरू झालेल्या या आर्थिक सहकाराच्या कार्यक्रमात अमेरिकेने युरोपीय राष्ट्रांना डिसेंबर १९५१ पर्यंत १३३० कोटी डॉलर निधी पुरवला.

महायुद्धाने सर्वतः उद्ध्वस्त झालेली जी युरोपीय राष्ट्रे या कार्यक्रमात सहभागी झाली ती आज जगाच्या नकाशात प्रगत राष्ट्रे म्हणून ओळखली जातात.

*(५ सप्टेंबर १९४७ रोजी हार्वर्ड विश्वविद्यालयात जनरल मार्शल यांनी केलेल्या भाषणाचे मराठीकरण) (शेतकरी संघटक, ६ एप्रिल २०००)*

■



चोवीस

# शेतकरी स्वातंत्र्याचा जाहिरनामा

उभ्या भारतवर्षातील आम्ही शेतकरी,

एका ऐतिहासिक कलाटणीच्या क्षणी, दिल्ली येथे ६ एप्रिल २००१ रोजी एकत्र येऊन सर्व शक्तिनिशी जगाच्या निदर्शनास आमची कैफियत आणू इच्छितो;

भारतातील शेतकरी शतकानुशतके अस्मानी आणि सुलतानी यांनी पीडला गेला आहे. भरपूर सूर्यप्रकाश, मुबलक पाणी यांची नैसर्गिक देणगी देशाला लाभली आहे. सर्व संकटांचा सामना करणाऱ्या कष्टकरी उद्यमी शेतकऱ्यांच्या बळावर देश समृद्धीच्या शिखरावर निसर्गसिद्ध पोहोचला असता.

प्रत्यक्षात, पावसाच्या लहरीप्रमाणे शेतीचा जुगार चालत राहिला; हजारो वर्षे नित्यनियमाने दुष्काळ, महापूर येत गेले; शेतीची धूळधाण होत राहिली. ज्यावर्षी भरपूर पीक आले त्यावर्षीही सुल्तानीचा तडाखा बसे. परिणामतः दुष्काळाचा सामना करण्यासाठी शेतकऱ्याकडे काही उरत नसे.

ही सुलतानी स्थानिक राजांनी केली, स्वधर्मीयांनी केली, दूरच्या राजांनी केली, परकीय आक्रमकांनी केली, परधर्मीयांनी केली. गोऱ्या इंग्रजांच्या अंमलापर्यंत हे असेच अव्याहत चालू राहिले.

इंग्रजी आमदानीत शेतकऱ्यांच्या मुलांना निदान शिकण्याची संधी मिळाली. जातीव्यवस्थेच्या जुलूमातून सुटका होण्याची आणि शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाने काही प्रगती होण्याची आशा वाटू लागली तोच स्वराज्य आले.

स्वराज्याच्या काळात शेतीच्या शोषणाची धोरणे संपतील आणि शेतीतील उत्पादन व उत्पादकता वाढविणारी धोरणे राबविली जातील अशी आशा होती ती लवकरच मालवली. देशाची अन्नधान्याची गरज परदेशातून केलेल्या आयातीतून भागत असेल तर शेतीकडे दुर्लक्ष करायलाही हरकत नाही असा

विचार बळावला. अन्नधान्याच्या तुटवड्याचा विपरीत परिणाम देशाच्या संरक्षणक्षमतेवर होत आहे हे लक्षात येताच पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे आणि त्याचबरोबर शेतीमालाला आधारभूत किमान किमतीची हमी देण्याचे धोरण सुरू केले. शास्त्रीजींच्या निधनानंतर हरितक्रांती थंडावली. गहू आणि भात या पिकांच्या पलीकडे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब झाला नाही. पंजाब, हरियाणा व पश्चिमी उत्तर प्रदेश यांसारख्या खात्रीच्या पाणीपुरवठ्याच्या प्रदेशांपलीकडेही हरितक्रांती झेपावली नाही. याउलट, शेतीमालाला भावाची हमी देण्याची यंत्रणा कमजोर करण्यात आली आणि सरकारी आधारभूत किमत किमान भाव ठरण्याऐवजी बाजारपेठेतील कमाल भाव ठरू लागला.

जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याचा सुलतानशाही वापर करून शेतीच्या देशी बाजारपेठेत निर्बंधांचे जाळे पसरविण्यात आले. सर्व औद्योगिक उत्पादनांना निर्यातीसाठी उत्तेजन दिले जात असताना शेतीमालाच्या निर्यातीला मात्र बंदी किंवा बंदिस्ती अव्याहत चालू राहिली. या सर्व आयुधांच्या उपयोगाने शेतीतील वरकड उत्पादन औद्योगिकीकरणाकरिता बळजबरीने काढून नेण्याचे धोरण राबविले गेले.

या असल्या धोरणांच्या पाठपुराव्यासाठी 'समाजवादी व्यवस्थेच्या गरजा', 'अन्नधान्याची सुरक्षितता', 'देशातील उद्योगधंद्यांना उत्तेजन' इत्यादी अनेक गोंडस सिद्धांतांची नावे वापरण्यात आली. सगळ्या धोरणांचा मिळून परिणाम काय? तर, संपन्न देशांत सरकारे त्यांच्या शेतकऱ्यांना भरमाप अनुदाने आणि संरचना यांचा आधार देत असताना भारतातील शेतकऱ्याला मात्र जीवघेणी उणे सबसिडी आणि त्याचबरोबर रस्ते, पाणी, वीज, वाहतूक, संचार या सर्व संरचनांचे दारिद्र्य यांचा सामना करावा लागला.

शेतीमालाला रास्त भाव मिळू न देणे आणि व्यापारी अटी सतत शेतीविरुद्ध ठेवणे या धोरणांचा अपरिहार्य परिणाम अत्यंत घातक झाला. जमिनींची सुपीकता खालावत गेली. जमिनीच्या पोटातील पाणी कमी कमी होऊ लागले. असले नसलेले भांडवल आणि साधनसामग्री रोडावत गेली. शेतीक्षेत्रात नवी भांडवली गुंतवणूक करण्यास कोणीच पुढे येईना; ना सरकार, ना खाजगी भांडवलदार. शेतकरी सरसकट कर्जबाजारी बनला आणि विसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत म्हणजे स्वातंत्र्याचे अर्धशतक गाठेपर्यंत मोठ्या संख्येने निराश होऊन आत्महत्या करून सुटका करून घेऊ लागला. रात्र घनघोर काळोखी



झाली म्हणजे सूर्योदयाची वेळ येते, त्याप्रमाणे निराशेच्या या गर्तेत अचानक एक आशेचा किरण क्षितिजावर दिसू लागला. रशियातील समाजवादी क्रांतीनंतर नियोजन, सार्वजनिक क्षेत्राचा बडेजाव आणि औद्योगिकीकरण यांचा सत्तर वर्षे चाललेला बोलबाला पोकळ ठरला. सरकारी नियोजनाची व्यवस्था कार्यक्षम असूच शकत नाही हे रशियातील समाजवादी अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळल्याने सिद्ध झाले.

समाजवादाच्या नावाखाली चाललेल्या लायसन्स-परमिट-इन्स्पेक्टर राज्यापुढे बहुतेक सारेच विद्वान अर्थशास्त्री आणि राजकारणी नतमस्तक झाले होते. चक्रवर्ती राजगोपालाचारींचा स्वतंत्र पक्ष आणि त्यानंतर, आधुनिक कालखंडातील शेतकरी आंदोलन यांनी बंदिस्त व्यवस्थेतील दोष तपशीलवार पुढे मांडले. त्याविरूद्ध जनजागृती घडविली. शेतकऱ्यांची आंदोलने झाली, शेकडो हुतात्म्यांनी प्राण दिले तरीही सुबुद्धी न सुचलेले राजकारणी नेतृत्व अखेरीस खुलेपणाच्या जागतिक झंझावातापुढे नमले आणि भारतातही समाजवादी नियोजनाऐवजी खुल्या व्यापाराचा सुधार आणण्याची भाषा सुरू झाली.

पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या आर्थिक तणावाच्या परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार मोडकळीस आला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांनी नव्या जगाची उभारणी करताना सूडबुद्धी सोडून देऊन जित राष्ट्रांनाच आपल्या पायावर उभे राहण्यास मदत करण्याचा कार्यक्रम आखला आणि पुन्हा एकदा देशादेशातील व्यापारात सरकारी हस्तक्षेप किमान राहावा यासाठी प्रयत्न चालू केले. जागतिक व्यापारपेठ उभी राहण्याची सुरुवात होण्यास ऐंशी वर्षांचा प्रदीर्घ कालखंड लागला. तरीही, भारतातल्यासारख्या गरीब आणि अस्मानी व सुलतानी दोन्ही जुलुमांनी ग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना हे काही नवे संकट तर नाही अशी भीती वाटू लागली हे समजण्यासारखे आहे.

जगातील सारी राष्ट्रे गरीब आणि श्रीमंत अशी विभागली गेली आहेत. त्यांच्यातील संबंध काही शतके शोषणाचे राहिले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यात होणारे व्यापारी करार हे काही प्रमाणात तरी असंतुलित राहणार हे उघड आहे. त्यातले त्यात शेतीमालाच्या व्यापारासंबंधी करार तर अधिकच असंतुलित असणे साहजिकच आहे. कारण, या करारात गडगंज अनुदानाने लाडावलेले श्रीमंत देशातील सधन शेतकरी आणि पिढ्यान्‌पिढ्या शोषणाने नाडलेले गरीब देशांतील शेतकरी व्यापारहेतूने एकत्र येतात. जागतिक व्यापार संस्थेच्या या करारामुळे आयात, निर्यात व अनुदाने या सर्वच क्षेत्रांतील

सरकारी हस्तक्षेप कमी करण्याचा आराखडा आहे. सरकारी हस्तक्षेप संपुष्टात यावा ही भारतीय शेतकऱ्यांची कित्येक वर्षांची जुनी मागणी आहे. आंदोलनाच्या दबावाने नाही तरी जागतिक परिवर्तनाने का होईना, देशातील सरकारशाहीला आळा बसेल, शेतीसाधने आणि शेतीमाल यांच्या जागतिक बाजारपेठेत मुक्तपणे प्रवेश अशी आशा शेतकऱ्यांत घालवली आणि त्याबरोबरच, श्रीमंत देशांतील प्रगत शेतीपुढे आपला टिकाव कसा लागेल याबद्दल त्यांच्या मनात चिंताही निर्माण झाली आहे.

निराशेच्या खोल गर्तेत असताना एकविसाव्या शतकाच्या उदयास आणखी एक नवी आशा अंकुरू लागली आहे. मानवजातीच्या उगमापासून ते आजपर्यंत सारी शेती चालली ती निसर्गदत्त बियाण्यांच्या आधाराने. मानवाने आपल्या बुद्धिवैभवाने आता हे कुंपण ओलांडले आहे आणि आवश्यक त्या गुणांचे बियाणे अल्पावधीत तयार करण्याचे सामर्थ्य संपादन केले आहे आणि जैविक शास्त्रातील या क्रांतीने उत्पादन वाढेल, उत्पादकता वाढेल, उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील अनेक उपयुक्तता शेतीतच तयार होऊ लागतील. त्यामुळे, शेती आणि बिगरशेती तसेच, शहरे आणि खेडी यांच्यामधील संघर्षाचा तीन हजार वर्षांचा कालखंड संपेल अशी आशाही शेतकऱ्यांत पालवली. वेगवेगळ्या देशांत या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून जी प्रचंड प्रगती झाली त्यावरून या तंत्रज्ञानाचे भविष्यातील महत्त्व स्पष्ट होते.

भारतीय शेतकऱ्यांना मात्र या तंत्रज्ञानाकडे डोळे लावून बसण्यापलीकडे काही करणे शक्य नाही. कारण, सरकारी झारीतील शुक्राचार्य हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू न देण्याचा निश्चय करून बसले आहेत.

२.

दिल्लीतील हा मेळावा भरताना, अखंड शोषणामुळे हीनदीन झालेली शेती आणि शेतकरी, त्याबरोबरच खुला व्यापार आणि नवे तंत्रज्ञान यांची पहाट असा मोठा ऐतिहासिक संक्रमणाचा काळ आहे.

रानावनात अन्नाच्या शोधात भटकंती करणाऱ्या मानवाच्या अन्नचयनयुगापासून आजच्या प्रगत मानवी संस्कृतीपर्यंत आगेकूच झाली ती तंत्रज्ञान आणि श्रमविभागणी यांमुळे. नवनव्या तंत्रज्ञानाने कमीत कमी श्रम आणि ऊर्जा यांच्या प्रयोगाने अधिकाधिक फलनिष्पत्ती होते आणि निसर्गाच्या संपन्न भांडारातील विविध पदार्थांच्या उपयोगात सामर्थ्य वाढते; श्रमविभागणीच्या तत्त्वाच्या वापराने उत्पादकतेचा गुणाकार होतो. प्रगत राष्ट्रांनी जी आर्थिक



संपन्नता साधली ती या दोन आयुधांनी. गरीब देशांतील अगदी शेवटच्या गरीबगुरीबांनाही पोटाला अन्न, अंगावर वस्त्र, व्याधींवर औषधोपचार आणि अधिक आयुर्मान यांचा लाभ झाला तो तंत्रज्ञान आणि श्रमविभागणी यांच्या संयुक्त करामतीनेच. श्रमविभागणीचे भारतातील स्वरूप, म्हणजे जन्मावर आधारलेली जातीव्यवस्था अकार्यक्षम आणि घातक ठरली. त्यामुळे ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. श्रमविभागणीच्या तत्त्वाचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वापर कार्यक्षमतेच्या तुलनेच्या तत्त्वाने होतो. एक देश दुसऱ्या देशापेक्षा सर्वच उत्पादनांत अधिक वरचढ असेल आणि तरीही सर्व उत्पादन त्याच देशाने करायचे आणि दुसऱ्या देशाने काहीच करायचे नाही यापेक्षा अकार्यक्षम देशाने त्याची कनिष्ठता ज्या उत्पादनात कमी असेल ते ते करावे असा हा सिद्धांत. या तत्त्वाच्या अंमलबजावणीमुळे दोन्ही देशांतील उत्पादकता वाढते, रोजगार वाढतो, संपन्नता वाढते असा हा 'सर्वहितेषु व्यापारा'चा कार्यक्रम आहे.

अशी व्यवस्था राबविण्यासाठी मार्गही साधा आणि सुलभ आहे ह्न सरकारी हस्तक्षेपाला लगाम घालणे.

३.

जागतिक व्यापार संस्थेच्या शेतीसंबंधी कराराच्या महत्त्वाच्या अटींपैकी पहिली म्हणजे आयातीसंबंधी लायसन्स-परमिट व्यवस्था रद्द करणे. हिंदुस्थानात समाजवादी कालखंडात परकीय चलन वाचविण्याच्या नावाने सगळ्याच आयातींवर बंदी होती. आयात काय व्हायची ती सरकारी आयात-लायसन्स किंवा परमिट यांच्या आधारावर. ती मिळायची ती सरकारदरबारी संबंध असलेल्यांनाच. पुष्कळदा ज्यांच्या नावाने लायसन्स निघायची ते त्यांचा उपयोग प्रत्यक्ष आयात करण्याकरिता करीतच नसत. काळ्या बाजारात लायसन्सच्या कागदाची खरेदी-विक्री व्हायची. त्या व्यवहारात मूळ लायसन्सधारक गडगंज पैसा कमवून जायचे. प्रत्यक्षात वाटण्यात आलेले लायसन्स आणि आयात झालेल्या मालाचा तपशील यांचा ताळमेळ कधी बसायचा नाही. त्यामुळे, भावामध्ये टोकाचे चढउतार होत. शेतीमालाच्या बाबतीत 'इंपोर्टेड' मालाचे कौतुक फारसे माजले नाही. इतर क्षेत्रात मात्र सारी हिंदुस्थानी प्रजा 'फॉरेन' आणि 'इंपोर्टेड' मालासाठी पागल बनली होती.

जागतिक व्यापार संस्थेने असली लायसन्स-परमिट आयातव्यवस्था संपविण्याची तरतूद केली आहे. देशातील उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्याच्या तोडीची म्हणजे तोच परिणाम साधणारी आयात शुल्के बसविण्याची

संमती देण्यात आली आहे. त्यासाठी आयात शुल्काची कमाल अपेक्षित मर्यादा काय असेल हे वेगवेगळ्या देशांनी आपखुशीने लिहून दिलेले आहे. बहुतेक देशांनी या तरतुदीचा फायदा घेऊन शंभर टक्के, दोनशे टक्के अशी वारेमाप आयात शुल्काची तरतूद केलेली आहे.

आयातीवरील बंधने हिंदुस्थानला लागू होणारच नव्हती. कारण, जागतिक व्यापारात सातत्याने खोट असणाऱ्या देशांना आयातीवर नियंत्रण ठेवण्याची मुभा आहे. १९९४ नंतर भारताची व्यापार परिस्थिती झपाट्याने सुधारली. परकीय चलनाची गंगाजळी फुगत चालली. त्यामुळे, हिंदुस्थान आयातबंदीसंबंधीच्या सवलतीस अपात्र ठरला. गेल्या वर्षी आयातीवर बंदी असलेल्या १४२८ वस्तूंपैकी ७१४ वस्तूंवरील बंधने उठविण्यात आली. गेल्याच आठवड्यात आणखी ६५९ वस्तूंवरील निर्बंध असेच दूर करण्यात आले आहेत.

हे निर्बंध दूर झाल्याने देशावर मोठे संकट कोसळणार आहे. असा कांगाव्याचा प्रचार लायसन्स-परमिट व्यवस्थेचे जुने लाभधारक करीत आहेत. गेल्या वर्षातील निर्बंध उठविण्याचा प्रत्यक्ष अनुभव सांगतो की, ७१४ पैकी दहाच वस्तूंबाबत आयातीत पाच-दहा कोटी रुपयांची वाढ झाली आहे. अन्यथा, निर्बंध उठविण्याचा कोणताही दुष्परिणाम दिसून आलेला नाही.

काही शेतीमालांच्या बाबतीत याच काळात आयातीत लक्षणीय वाढ झाली आहे हे खरे. उदाहरणार्थ, पामोलिन तेल. या वाढीचा संबंध आयातनिर्बंध उठविण्याशी लावणे निरर्थक आहे. १९९३-९४ सालापासून देशातील तेलबियाचे उत्पादन घटत गेले. याउलट, मिळकती वाढत गेल्या तसे खाद्यतेलाची मागणी वाढत गेली. ही मागणी पुरविण्यासाठी आयात होणे अपरिहार्य होते. याचवेळी मलेशिया, इंडोनेशिया, पापुआ-न्युगिनी यांसारख्या देशांत तेलबियांऐवजी झाडाच्या खोडापासून खाद्यतेल तयार करण्याचे तंत्रज्ञान उभे राहिले. अशा तऱ्हेने उत्पादन झालेल्या तेलाचा उत्पादनखर्च पारंपरिक तेलापेक्षा खूपच कमी असतो. साहजिकच, पामतेलाची हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर आयात होत आहे. त्यामुळे, तेलबियांचा शेतकरी आणि तेलाचे गिरणीवाले संकटात येत आहेत ही गोष्ट खरी आहे; पण अशा अपवादात्मक प्रकरणी का होईना, आयात शुल्क कमाल मर्यादेपर्यंत वाढवून संरक्षण देण्याचा काही मान्यवर पक्षांचा प्रस्ताव आत्मघातकी आहे. पहिल्यांदा म्हणजे, हिंदुस्थानने आयात शुल्क वाढवले म्हणजे बाकीचे देश चुपचाप ऐकून घेतील ही अपेक्षा चुकीची



राहील. भारतातून निर्यात होणाऱ्या कोणत्याही मालावर प्रतिकारात्मक शुल्कवाढ इतर देश करू लागले तर त्यातून अखेरीस भारताचेच नुकसान जास्त झाल्याखेरीज राहणार नाही.

शिवाय, प्रश्न देशाच्या हिताचा आहे. केवळ उत्पादकांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचा नाही. इतर देशांतून चांगला माल दूरवर वाहतूक करून आणून येथे स्वस्त विकण्यास कोणी तयार असेल तर त्यावर बंधने घालून ग्रहकावर जुलूम करणे अन्याय्य होईल. अशा तऱ्हेची संरक्षण व्यवस्था काही काळ ठेवण्याची अपेक्षा वाजवी असेल; पण, त्या काळामध्ये शेतीची उत्पादकता वाढवून कारखानदारी आणि संरचना यांची कार्यक्षमता वाढवून जगाच्या टक्करीस तयार होण्याचा काही निर्धार पाहिजे. उणे सबसिडीने कंबरडे मोडलेली भारताची शेती चारपाच वर्षांच्या बदलाच्या काळात संरक्षण मिळाल्यास आणि भारतीय शेती जागतिक दर्जाची करण्यास सरकारने प्रोत्साहन नाही दिले तरी, अडथळा न आणल्यास भारतीय शेतकरी परकीय स्पर्धेस सामर्थ्याने टक्कर देऊ शकेल असा आम्हास आत्मविश्वास आहे.

४.

जागतिक व्यापार संस्थेच्या शेतीविषयक कराराची दुसरी एक अट अशी आहे की, कोणत्याही देशाच्या शासनाने शेतकऱ्यांना अनुदान म्हणून शेतीच्या एकूण उत्पादनाच्या ५ टक्क्यांपेक्षा (अविकसित देशांच्या बाबतीत १० टक्क्यांपेक्षा) अधिक खर्च करू नये. अमेरिका, युरोप, दक्षिण कोरिया, जपान इत्यादी राष्ट्रे त्यांच्या देशातील शेतकऱ्यांना तऱ्हेतऱ्हेने मदत पोहोचवितात. श्रीमंत देशांत शेतीवर कोणीतरी राहणे आवश्यक होऊन बसते. शिवाय, सारा देश कारखान्यांचे आणि सिमेंटचे जंगल बनला तर पर्यावरणाचा विनाश होतो. या दृष्टीनेही शेती फळतफुलत ठेवणे अशा देशांना आवश्यक वाटते. उत्पादन काहीही असो, काही वट्ट रक्कम देण्याच्या व्यवस्था आहेत. एखादे पीक घेतल्याबद्दल अनुदान दिले जाते, एखादे पीक न घेतल्याबद्दल अनुदान दिले जाते. जमीन पडीक ठेवल्याबद्दलही रक्कम पोहोचविली जाते. याखेरीज शेती संशोधन, मागास प्रदेशांना विकासनिधी, ग्रमीण भागातील वाहतूक संचार, संरचना यासाठीही शासन सढळ हाताने खर्च करते. भारतातील परिस्थिती याच्या नेमकी उलटी आहे. श्रीमंत देशांत एकूण लोकसंख्येपैकी शेतकऱ्यांची संख्या एकदोन टक्के, तर हिंदुस्थानात ती सत्तर टक्क्यांच्या वर. ९८% जनता २% शेतकऱ्यांना उदंड अनुदाने देऊ शकते. ३०% जनता ७०% शेतकऱ्यांना फारशी मदत करू

शकत नाही, तसे करण्याची राजकीय इच्छाशक्तीही हिंदुस्थानात नाही. त्यामुळे, भारतीय शेतकरी उणे सबसिडीच्या वरवंट्याखाली सातत्याने भरडला जात आहे.

याला उपाय म्हणून हिंदुस्थान सरकारनेही शेतकऱ्यांना अनुदाने देण्याच्या नवनवीन तरतुदी जागतिक व्यापार संस्थेच्या करारात अंतर्भूत करून घ्याव्यात असे काहीजण सुचवितात. शेतकऱ्यांना अशा तऱ्हेने मदत करण्यासाठी जागतिक व्यापार संस्थेच्या करारातील कोणतीच वर्तमान तरतूद आज आड येत नाही. तेव्हा नवीन तरतुदी करणे निरर्थक आहे. याउलट, जागतिक व्यापार संस्थेच्या करारातील शर्तीप्रमाणे श्रीमंत देशांना अनुदानाच्या वेगवेगळ्या पेट्या एकत्र करायला लावून अनुदाने कमी करण्याचा रेटा लावणे हेच भारतीय शेतीच्या हिताचे ठरेल.

५.

भारतीय शेतीमालाच्या निर्यातीला व्यवहारात किती वाव आहे? शेतीमालाची निर्यात वाढविण्यात दोन प्रकारच्या अडचणी येणार आहेत ह्न देशाबाहेरच्या आणि देशातील.

परदेशात भारतीय शेतीमालास (बासमती तांदूळ, दार्जिलिंग चहा असे काही अपवाद सोडून) फारशी मागणी नाही. पहिले कारण म्हणजे, भारतीय मालाची गुणवत्ता कमी पडते. येथे मालाची प्रतवारी करण्याची पद्धत नाही आणि त्याखेरीज, आरोग्य संरक्षणाकरिता जे नियम जगभर सर्वमान्य झाले आहेत ते येथील व्यवस्थेला फारसे माहीतसुद्धा नाहीत. याशिवाय, लायसन्स-परमिट व्यवस्थेमुळे भारतीय निर्यातदार बेभरवशाचे म्हणून बदनाम झाले आहेत, त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवण्यास तयार होत नाही.

निर्यात बाजारपेठ काबीज करण्यात भारतीय व्यवस्थेतील काही दोष मोठे अडचणीचे ठरतात. वेगवेगळ्या जमीनविषयक कायद्यांमुळे शेतजमिनीचे बारीक बारीक तुकडे झाले आहेत. त्यांची तुकडेबंदी करून जगाच्या बाजारपेठेत पुरेल इतक्या मोठ्या प्रमाणावर दर्जेदार मालाचे उत्पादन करण्याची व्यवस्था नाही. त्याखेरीज, शेतीमालाचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे झाले तरी साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया, प्रतवारी आणि तपासणी या व्यवस्था नसल्यातच जमा आहेत. कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कारभारामुळे शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ बुजून जाण्याइतकी अनोळखी वाटते.

१९९६-९७ सालापर्यंत जागतिक बाजारपेठेतील बहुतेक महत्त्वाच्या



शेतीमालांच्या किमती हिंदुस्थानच्या बाजारपेठेपेक्षा अधिक होत्या. त्यामुळे, निर्यातीची मोठी शक्यता प्रत्यक्षात होती. निदान शिवाराच्या हद्दीवरतरी भारतीय शेतीमाल इतर देशांशी स्पर्धा करू शकत होता. बंदरावर पोहोचेपर्यंत, गचाळ संरचनाव्यवस्थेमुळे यातील बहुतेक फायदे संपून जात असत. तरीही, नैसर्गिक शेतीउत्पादने, औषधी व सुगंधी वनस्पती, संकरित वाणांचे प्रगुणन अशा काही क्षेत्रांत जागतिक बाजारपेठ काबीज करण्यास भारताला मोठा वाव होता.

गेल्या दोनतीन वर्षांत परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. जगभरच्या अनेक देशांत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतीची उत्पादकता वाढत आहे. परिणामत:, जगभर शेतीमालाच्या भावात मंदीचे सावट पसरले आहे. त्यामुळे, अनेक शेतीमालांच्या किमती जागतिक बाजारपेठेच्या तुलनेने हिंदुस्थानातच वरचढ असल्याने निर्यातीत पडतळ पडण्याची शक्यता राहिलेली नाही.

६.

शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी साऱ्या जगाची एकच एक बाजारपेठ बनणे, देश-देशांना एकमेकांपासून दूर ठेवणाऱ्या भिंती कोसळून पडणे ही मोठी ऐतिहासिक आवश्यकता आहे.

अलीकडे ख्रिस्त सनाची २००० वर्षे पूर्ण झाली. यापुढे कदाचित, कालगणना बर्लिनची भिंत कोसळली त्या दिवसापासून केली जाईल. मनुष्यजातीचा इतिहास हा कुंपणे तोडण्याचा आणि भिंती उल्लंघून जाण्याचा आहे. माणसाची परस्परांशी संपर्क करण्याची साधने मर्यादित होती तोपर्यंत त्याचे सारे विश्वच मर्यादित होते. तोंडाने बोलायचे, कानांनी ऐकायचे एवढीच संचारव्यवस्था होती तोपर्यंत देवघेवीचे संबंध गावापुरतेच मर्यादित राहिले. प्रवासाला बैलगाडी मिळाली, घोडा ताब्यात आला तसतसे माणूस गावकुसाबाहेर पडला. तरीही आपापले राज्य, प्रदेश, भाषा यांच्या भिंती कायम राहिल्या. प्रत्येकाला आपल्या कुंपणाविषयी प्रखर अभिमानही वाटू लागला.

चारशे वर्षांपूर्वी धर्म, भाषा आणि अर्थकारण यांच्या आधाराने राष्ट्र या संकल्पनेचा उगम झाला आणि आपल्या राष्ट्राच्या हद्दीतले ते आपले, ते सुष्ट आणि हद्दीबाहेरचे सारे दुष्ट असा एक कडवा राष्ट्राभिमान महान सद्‌गुण मानला जाऊ लागला.

राष्ट्राभिमानाच्या अतिरेकातून साम्राज्यवाद फोफावला. महायुद्धे भडकली, अतोनात जीवित व वित्तहानी झाली तरी राष्ट्रीय अहंकार ही मोठी प्रखर भावना म्हणून शिल्लक राहिली.

गेल्या काही दशकांतच मनुष्यप्राण्याचे संचारसामर्थ्य पराकोटीच्या गतीने वाढले आहे. अरेबियन सुरस कथांतही अद्भुत वाटावे असे जादूचे दिवे व अंगठ्या सर्वसामान्य माणसाच्या हाती आलेल्या आहेत. घरी बसल्याबसल्या जगाच्या दूरवरच्या कोणत्याही कोन्याकोपऱ्यात चाललेले मनोरंजनाचे कार्यक्रम, खेळांच्या स्पर्धा, राजकीय घडामोडी तत्क्षणीच कोणीही पाहू शकतो. गणकयंत्राच्या साहाय्याने जगाला व्यापणारी ज्ञानगंगा सर्वांच्या हाताशी आली आहे. कोणीही जावे, हवी ती माहिती काढून घ्यावी. जगास देण्यासारखे काही ज्ञान आपल्याकडे आहे असे वाटले तर ते इंटरनेटच्या ज्ञानगंगेत सोडून द्यावे असे अद्भुत प्रत्यक्ष डोळ्यासमोर अवतरले आहे. अगदी किरकोळ खर्चाने कोणीही कोठेही बसल्या बसल्या ह्न घरात, मोटारीत, आगगाडीत ह्न जगातील दुसऱ्या कोणत्याही माणसाशी तो कोठेही असला तरी क्षणार्धात सेल्युलर फोनने संपर्क साधू शकतो.

नवीन संचार आणि माहिती तंत्रज्ञानाने जगातील शेवटल्या उरल्यासुरल्या भौगोलिक व राजकीय भिंती जमीनदोस्त करून टाकल्या आहेत. आपल्या प्रकृतीचा समानधर्मी शोधण्यासाठी आता गावकुसाच्या मर्यादा नाहीत, राष्ट्रीय सरहद्दींच्याही नाहीत.

साहजिकच, अर्थकारण, उत्पादन, व्यापार, शिक्षण आणि संस्कृती या सर्वच क्षेत्रात साऱ्या जगाचे एकीकरण होऊ घातले आहे.

कोणी देश या स्थितीत स्वत:ला एक वेगळे बेट कल्पून जगापासून काडीमोड घेऊन राहणे अशक्य आहे. माहिती-तंत्रज्ञानातील ही क्रांती पन्नास वर्षे आधी आली असती तर समाजवाद्यांचा लोखंडी पडदा केव्हाच वितळून गेला असता. आता कोणीही विटामातीचे, बांबूचे पडदे उभे करीत त्यामागे आपापल्या संस्कृतीचे डबके राखून ठेवू शकणार नाही. कोणी तसा प्रयत्न केला तर जगभर चाललेल्या तंत्रज्ञानाच्या आणि उत्पादनाच्या भरारीपासून तो वंचित राहील आणि पुन्हा एकदा सोमनाथाच्या इतिहासाची पुनरावृत्ती अनुभवावी लागेल. या कालप्रवाहात स्वत:ला झोकून देण्यापलीकडे पर्याय म्हणून राहिलेला नाही. पोहायला उतरल्यानंतर नाकातोंडात पाणी जाणार, जीव घाबरा होणार, प्राण कंठाशी येणार आणि आता सारे संपले आहे असे वाटत असतानाच जिवाच्या आकांताने हातापायांची हालचाल चालू झाली आहे आणि आपण बुडण्याऐवजी तरंगत आहोत आणि हे तरंगणे मोठे आनंददायी आहे याचा अनुभव येतो. प्रवाहापासून बाजूला राहणारांबाबत 'थांबला तो संपला' आणि प्रवाहात उतरणारा



'धावत्याला शक्ती येई आणि रस्ता सापडे' या उक्तींचा अनुभव येणार आहे.

७.

पाण्यात उतरलेला पोहायला शिकतो हे खरे; पण शंभरात एखाद्दुसरा काही अपघाताने दुर्दैवीही ठरू शकतो. अगदी असंभव वाटणाऱ्या अपघातांनाही तोंड देण्याची सज्जड तयारी करूनच पाण्यात उतरणे सुज्ञपणाचे; पाणी महापुराप्रमाणे घोंघावत आले आणि काही विचारपूस न करता उचलूनच घेऊन गेले तर तयारी करण्याचा प्रश्नच राहत नाही. एरवी, शक्य तितकी तयारी करणे हे शहाणपणाचे. पाण्यात उतरणारा आजारातून उठलेला असला, अशक्त प्रकृतीचा असला तर मग सावधानतेची सर्व काळजी घेणे विशेष अगत्याचे.

भारतीय शेतकऱ्याची परिस्थिती दीर्घकाळच्या आजारातून उठता उठता महापुराला सामोरे जाणाऱ्या माणसासारखी आहे. गोरा इंग्रज आणि त्यानंतर काळा इंग्रज यांनी केलेल्या शोषणानंतर जमीन नापीक झालेली, तिचे तुकडे तुकडे झालेले, उत्पादन घटलेले, उत्पादकता तर त्याहूनही घसरलेली, शेतीतील भांडवल घसारून गेलेले, नवीन गुंतवणूक फारशी नाही, शेतीत पिकलेल्या मालाच्या साठवणुकीची व्यवस्था नाही, वाहतुकीची नाही, विक्रीची नाही, गावात रस्ता, पाणी, वीज दूरच राहिले, पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नाही असा शेतकरी जागृत होऊन डोळे उघडून पाहतो तर समोर जागतिकीकरणाचा महापूर रोरावत येत असणारा! आणि शेतीव्यवसायाचे युगानुयुगे चालत आलेले स्वरूपच जैविक तंत्रज्ञानातील क्रांतीने उलटेपालटे करून टाकलेले.

जागतिकीकरणाचा मूळ पाया हा 'क्षमतेनुसार श्रमविभागणी' हा आहे. भारतीय शेतकऱ्याला भरपूर सूर्यप्रकाश, उदंड पाणी आणि कष्टाळू हात यांची मोठी देणगी लाभलेली आहे. जगातील कोणत्याही शेतकऱ्यापुढे अंततोगत्वा कमी पडणार नाही. पण, वाडीवस्तीतील कुणबाऊ शेतीपासून जागतिक दर्जाच्या शेतीपर्यंत हनुमानउडी घेताना काही साधनांचा त्याला मोठा उपयोग होणार आहे.

१. देशातील सारी शेतीव्यवस्था सरकारी कायदेकानू, नियम, लालफीत आणि गलथानपणा यांनी ग्रासून गेली आहे. भारतीय शेतीतून सरकारची हकालपट्टी करून तिचे खाजगीकरण करणे हे सर्वात महत्त्वाचे पहिले साधन. शेतजमिनीची मालकी सरकारची, शेतकऱ्यांना ती फक्त कसण्याकरिता पट्ट्याने दिलेली. सरकारची मर्जी फिरेल त्याप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक कामाचे

निमित्त सांगून सरकार शेतकऱ्याला देशोधडीला लावू शकते. साहजिकच, आपल्या जमिनीत मोठी गुंतवणूक करणे शेतकऱ्याला भावत नाही. शेतीकरता लागणाऱ्या खतामुतांपासून यंत्रसामग्रीपर्यंत सर्व गोष्टींवर नियंत्रण शासनाचे. पिकलेल्या शेतीमालाच्या वासलातीची सारी व्यवस्था सरकारी ताब्यात.

२. सर्व जग एक व्हायला आले आहे; पण भारतात मात्र अजून एकसंध बाजार तयार झालेला नाही. जिल्हाबंदी, राज्यबंदी, झोनबंदी, लेव्ही यासारख्या सरकारी बंधनांमुळे देशात अनेक कुंपणे घातलेली आहेत. युरोप खंडातील वेगवेगळे देश -भाषा वेगळ्या, पंथ वेगळे, संस्कृती वेगळ्या, एकमेकात गेल्या शतकातच दोन महायुद्धे झडलेली - हे सारे बाजूला ठेवून युरोप खंडभर एकसंध बाजारपेठ उभी करीत आहेत. भारतातही जीवनावश्यक वस्तूंचा कायदा आणि त्यातून निघणारी सारी बंधने संपवून दक्षिण ते उत्तर आणि पूर्व ते पश्चिम अशी एक बाजारपेठ तयार करणे जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर आवश्यक झाले आहे. एकसंध भारतीय बाजारपेठ उभी राहिली म्हणजे शेतीमालाची मागणी वाढेल. त्याखेरीज, प्रदेशाप्रदेशात पिकांची विभागणी हवापाणी आणि इतर अनुकूलता यांच्या आधाराने बनेल. परिणामत: उत्पादकता वाढून उत्पादनखर्च कमी होईल.

३. शेतीमालाची विक्री बहुधा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून होते. एके काळी समित्यांच्या या बाजारपेठेमुळे शेतीमालाच्या विक्रीव्यवस्थेमध्ये काही सुधारणा झाली हे खरे. आज मात्र बहुतेक समित्यांमध्ये विक्रीसाठी लागणारी किमान व्यवस्थादेखील असत नाही. उदाहरणार्थ, निवाऱ्याची जागा, गोदामे, प्रक्रिया, प्रतवारी, वर्गीकरण, तपासणी, पॅकेजिंग इत्यादीची व्यवस्था, शेतीमालाच्या वेगवेगळ्या बाजारपेठांतील स्थितीसंबंधी माहिती इत्यादी. बाजारपेठांवर अडते आणि दलाल यांचे वर्चस्व असते. या व्यवस्थेऐवजी अनेक विकसित राष्ट्रांत प्रचलित असलेली 'सुपर मार्केट'च्या जाळ्यासारखी व्यवस्था उभी करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झाल्या तर जागतिक बाजारपेठेत पाऊल टाकणे शेतकऱ्यांना अवघड वाटणार नाही.

४. जगभरच्या वेगवेगळ्या बाजारपेठांतील शेतीमालांची आवक-जावक आणि किमती यासंबंधी माहिती तसेच हवामानाविषयीचे अंदाज, त्याशिवाय, शेतीविषयक सल्ला गावागावातील शेतकऱ्यांना तातडीने आणि सहज उपलब्ध होणे आवश्यक आहे. ही सर्व माहिती देणाऱ्या वेबसाईट आणि पोर्टल्स् उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांना ही माहिती मिळविता यावी यासाठी माहितीव्यवस्थेचे



जाळे आवश्यक आहे.

५. सध्याची धान्य आणि इतर शेतीमाल यांच्या खरेदीची व्यवस्था बदलून त्याऐवजी गोदामात माल ठेवून त्याच्या आधाराने किमतीच्या ७० टक्क्यापर्यंत उचल शेतकऱ्याला मिळण्याची व्यवस्था महत्त्वाची ठरेल. त्यासाठी, गोदामाच्या पावत्या (warehouse receipts) यांची निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टखाली गणना केल्यानेही काम सुलभ होईल.

६. ही सर्व कामे शासनव्यवस्थेला पेलण्यासारखी नाहीत. सहकारी संस्थांच्याही ती आवाक्याबाहेरची आहेत. यासाठी, कंपनीव्यवस्थेतील कार्यक्षमता आणि सहकारातील सहभागाची प्रेरणा एकत्र आणून एका नवीन आर्थिक संघटनेची बांधणी करावी लागेल. शेतकऱ्यांनी एकत्र यावे, जमिनीच्या प्रमाणात समभाग घेऊन शेतकऱ्यांची कंपनी तयार करावी आणि कंपनीने भांडवल, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान व शिवाराबाहेरील साठवणूक, प्रक्रिया, विक्री, निर्यात इत्यादी सर्व, सुगीनंतरची कामे यांची जबाबदारी घ्यावी. हे शक्य झाल्यास अगदी नजीकच्या भविष्यकाळात भारतीय शेतकरी जागतिक स्पर्धेचे आव्हान पेलून सशक्तपणे सर्व जगापुढे उभा ठाकू शकेल.

हजारो वर्षांच्या गुलामगिरी आणि शोषणानंतर जागतिक परिस्थितीत झालेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांच्या हातापायांतील बेड्या तुटून पडत आहेत. या गुलामगिरीतच सुख आहे आणि स्वतंत्रता सारी भयानक कष्टप्रद आहे असे संधिसाधूंनी कितीही भासविले तरी त्याला बळी न पडता सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करून एक नवी जागतिक दर्जाची शेतीव्यवस्था उभी करून शेतकऱ्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचा निर्धार या मेळाव्यातील आम्ही शेतकरी जगापुढे निश्चयपूर्वक जाहीर करीत आहोत.

*(शेतकरी संघटक, २१ मार्च २००१)*

■

पंचवीस

# शेतकरी जाती'चा विद्वेष कधी संपणार

दक्षिण आफ्रिकेत दरबान येथे संयुक्त राष्ट्र संघाची 'वंशभेद आणि वंशविद्वेष' या विषयावर एक जागतिक परिषद भरली आहे.

वंशविद्वेषाचा अधिकृत जनक हिटलर. त्याआधीही खुद्द अमेरिकेत निग्रोवंशीयांना गुलाम म्हणून आणले गेले. अमेरिकेतील यादवी युद्धानंतर अब्राहम लिंकनच्या थोर नेतृत्वामुळे गुलामगिरी संपुष्टात आली; पण निग्रो लोकांविषयी भेदाभेदाची वागणूक अजूनही आहे. तसेच साऱ्या गोऱ्या लोकांच्या देशात काळ्या किंवा निमकाळ्या वर्णाच्या लोकांबद्दल किमान दुजाभाव आहे. विशेष प्रसंगाने हा दुजाभाव उफाळतो, काहीवेळा त्यातून दंगलीही होतात, रक्तपात, जाळपोळही होते. गोऱ्या गोऱ्यांच्या समाजातही अनेक ठिकाणी वंशविद्वेष आढळून येतो. हिटलरने उभा केलेला ज्यू-द्वेषाचा ब्रह्मराक्षस हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण. आजही फ्रान्स, जर्मनी या देशांत ग्रीस, इटली आणि स्पेन या देशांतून रोजगाराकरिता आलेल्या मजुरांबद्दल एक वंशभेदाची भावना सर्रास आढळते.

यापूर्वी, संयुक्त राष्ट्र संघाच्या अनेक परिषदांमध्ये वंशविद्वेषाचा विषय चर्चिला गेला, अनेक ठरावही झाले. या चर्चांचा संदर्भ मुख्यत: दक्षिण आफ्रिकेतील भारतीय आणि काळ्या लोकांना दिल्या जाणाऱ्या पक्षपाताच्या वागणुकीच्या संबंधात होता. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण परिषदेच्या अध्यक्षा असताना हा विषय खूप गाजला. दक्षिण आफ्रिकेतील वंशद्वेषी राजवट संपुष्टात आली याचे मोठे श्रेय संयुक्त राष्ट्र संघास देणे भाग आहे.

द. आफ्रिकेतील वंशविद्वेषाच्या राज्यव्यवस्थेबद्दल अगदी सुरुवातीचे आंदोलन महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झाले, त्यामुळे तेथील वंशभेदाच्या प्रश्नाविषयी



भारताला विशेष आपुलकी. वंशद्वेषाचा धिक्कार सगळ्यात तावातावाने करणारे वक्ते भारतीय. या विषयावर महात्मा गांधींच्या कर्तृत्वामुळे बोलण्याचा आपल्याला काही विशेष अधिकार आहे असे संयुक्त राष्ट्र संघातील भारतीय राजदूत मोठ्या दिमाखाने आणि समजुतीने दाखवत.

दरबानच्या परिषदेत ही परिस्थिती संपूर्ण बदलण्याची शक्यता आहे. भारतातील दलित आणि आदिवासी समाजांना जी वागणूक दिली जाते त्यासंबंधी त्या समाजाचे काही म्होरके दरबान येथील संयुक्त राष्ट्र संघाच्या परिषदेत आपली कैफियत मांडणार आहेत. त्याकरिता त्यांनी काही सज्जड दस्तावेज तयार करून देशोदेशी पाठवून दिले आहेत.

वंशविद्वेषाच्या धोरणाविषयी भारत पहिल्यांदा आरोपी म्हणून उभा राहणार आहे. या घटनेने एकच मोहोळ उठवून दिले आहे.

दलित आणि आदिवासी जातींवर अमानुष अन्याय झाले हे कोणी नाकारत नाही. माणसामाणसात स्पृश्यास्पृश्यतेचा भेद करण्याइतका भेद साऱ्या जगाच्या पाठीवर भारत सोडून इतर कोठे नाही. सामाजिक अन्यायातून आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण तयार झाले आणि जातीव्यवस्था अधिकाधिक खोलवर रुजत चालली. जातीव्यवस्थेचा विक्राळपणा टाळण्यासाठी काहीजण शहरात गेले, काही परदेशात गेले, काहींनी धर्मांतर केले, पण अशा स्थलांतराने किंवा धर्मांतराने जातीव्यवस्थेचा कचाटा काही संपला नाही.

स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळातही दलितांच्या मनातील सवर्णांविषयीची भीती स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात मोठी अडचण म्हणून उभी राहिली. देशाला स्वातंत्र्य देऊन इंग्रज निघून गेले तर, ज्यांच्या हाती सत्ता जाईल ते राज्यकर्ते मुसलमान, दलित आणि इतर अल्पसंख्याक यांना न्याय्य वागणूक देतील किंवा नाही याबद्दल दलित नेत्यांच्या मनात तसेच इंग्रज राज्यकर्त्यांच्याही मनात जबर शंका होती. मुसलमान नेत्यांनी पहिल्यांदा विभक्त मतदारसंघ आणि नंतर वेगळा पाकिस्तान मिळवून काही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. दलितांना विभक्त मतदारसंघही मिळाले नाहीत आणि स्वतंत्र भारतात केवळ राखीव जागांवर त्यांना समाधान मानावे लागले.

जातीभेदाच्या पद्धतीविरुद्ध अनेक कडक सामाजिक कायदे झाले; दलित वर्गांना काही सोयी सवलतीही देण्यात आल्या; पण जातिभेदाची खाई अजून काही मिटलेली नाही.

आजही बिहारसारख्या राज्यांत जमातीजमातींचे एकमेकांवर हल्ले होतात

आणि पाचपन्नास लोकांचे सहज खून पाडले जातात, बलात्काराचे प्रकार होतात हे पाहता जातिभेद आजही अतिदुष्ट स्वरूपात शिल्लक आहे असा युक्तिवाद दरबान येथे दलितांचे मुखंड करतील.

याउलट, जातिभेद वगैरे सगळे इतिहासजमा झाले, आज कागदोपत्री तरी जातीच्या आधाराने काही भेदभाव होत नाही; अनेक दलित नागरिक महत्त्वाच्या प्रशासकीय आणि राजकीय स्थानांवर आहेत. स्वत: भारताचे राष्ट्रपतीच दलित समाजाचे आहेत. दलितांसाठी शासनाने केलेल्या कारवाया इतक्या कठोर आणि व्यापक आहेत की त्यातील 'ॲट्रॉसिटी ॲक्ट'च्या कारवायांबद्दल सवर्ण समाजाला जाच वाटतो......इ. अशी मांडणी दलितेतर करतील.

संयुक्त राष्ट्रसंघामध्ये काही मोठा ऐतिहासिक निर्णय होण्याची शक्यता नाही. जास्तीतजास्त म्हणजे भारतातील जातिभेदाच्या पुढे आलेल्या माहितीची नोंद घेतली जाईल.

अशा प्रथा नष्ट करण्यासंबंधीच्या शिफारशी करणारा ठराव संमत होईल; यापलीकडे जाण्याची परिषदेची तयारी असली तर या विषयावर एक मानवी हक्क चौकशी समिती नेमण्याचा विचार होऊ शकेल.

दरबान परिषदेचा निर्णय काय होईल याला फारसे महत्त्व नाही; पण या परिस्थितीत हा प्रश्न उठवला जातो आणि आपल्या देशातील व्यवस्थेची लक्तरे सार्वजनिकरीत्या धुतली जातात याबद्दल अनेकांचा संताप संताप झाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय दरबारात पाकिस्तानसारख्या भारताच्या शत्रूराष्ट्राच्या प्रतिनिधीबरोबर दलितांचे प्रतिनिधी फिर्यादी म्हणून उभे राहतील ही कल्पनाच त्यांना सहन होत नाही. 'जातिभेद दुष्ट आहे हे खरे, पण हा अंतर्गत मामला आहे. तो जगाच्या वेशीवर नेऊन टाकणे अयोग्य आहे. एवढेच नव्हे तर, तो देशद्रोह आहे', असाही आक्रोश केला जात आहे.

या आक्रोशामागे काही दुटप्पी दांभिकता आहे. नर्मदा बचाओ आंदोलनाच्या सवर्ण मेधा पाटकरांनी जागतिक पाणी परिषदेपुढे नर्मदा धरणाविषयीची आपली कैफियत मांडली. त्या धरणाचे काम थांबविण्याच्या शिफारशी मिळवल्या. जागतिक बँकेच्या कमिशनसमोर जाऊन तेथून या धरणासाठी मिळणारी अब्जावधींची कर्जे थांबवली. नर्मदा बचाओ आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी जगभर, देशादेशांत नर्मदा धरणाविषयी प्रचार केला. हिंदुस्थानातील धरणादी प्रकल्पामुळे बेघर झालेल्या लोकांची संख्या आणि समस्या इतक्या विकृतपणे मांडल्या की भारतातील धरणे म्हणजे अणुबाँबपेक्षाही अधिक विनाशक आहेत



असे हिरीरीने मांडले. या अशा मांडणीबद्दल त्यांना जागतिक सन्मान मिळाले. देशातही कुशल व्यापक नेतृत्त्वाबद्दल त्यांची वाहवा झाली. कोणीही नर्मदा धरणाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यामध्ये काही देशद्रोह आहे असे अवाक्षरानेही सुचवले नाही.

धरणांचा फायदा मिळणारा समाज हा प्रामुख्याने शेतकरी समाज. त्याच्या बाजूने उभे राहणे म्हणजे धनदांडग्या बागायतदारांची तरफदारी करणे असे शहरी बुद्धिवंतांच्या मनात पक्के ठसलेले असल्यामुळे धरणांविरोधी आंदोलनाकडे उदारबुद्धीने पाहिले जात असावे. त्यातील देशद्रोह कोणाला खुपला नसावा.

शेतकरीविद्वेष आणि सवर्ण नेतृत्व असले तर भारतातील अंतर्गत कैफियती जगाच्या वेशीवर मांडल्या तर त्याबद्दल काही संताप होत नाही.

याचे आणखी एक उदाहरण म्हणजे जैविक बियाण्यासंबंधी हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना चाचण्यासुद्धा करता येऊ नयेत याकरिता भारतातील मान्यवर पर्यावरणवादी करीत असलेले खटाटोप. जैविक बियाणे जगातील कित्येक देश वापरू लागून कित्येक वर्षे उलटली. ज्यांनी वापर केला त्या देशातील शेतीचे उत्पादन वाढले, उत्पादकता वाढली, उत्पादनखर्च कमी झाला. मालाचा खर्च कमी झाला, गुणवत्ता वाढली. हे देश जगाच्या बाजारपेठेत ताकदीने उभे आहेत.

हे असे जादूचे बियाणे आहे तरी काय? त्याच्या लागवडीचा अनुभव काय? फायदा किती, तोटा किती? याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी चाचण्या करणे भारतीय शेतकऱ्यांना अजून शक्य झालेले नाही. भारतीय शेतकऱ्यांना चाचण्यांची परवानगी देण्यात येऊ नये याकरिता कैफियती मांडायला युरोपातील पर्यावरणवाद्यांचे तांडे दिल्लीत उतरतात आणि जिल्ह्याचे गावही धड न पाहिलेल्या शेतकऱ्यांच्या युरोपभरच्या सहली घडवून आणल्या जातात. भारतातील शेतकरी युरोपातील देशात, 'आम्हाला आधुनिक शेती नको', 'नर्मदा धरण नको' अशा घोषणा देत फिरतात यात काही देशद्रोह झाला असे कुणी पोटतिडकीने म्हटले नाही.

दलित नेत्यांनी दरबानच्या परिषदेत आपली दु:खे सांगण्याचा प्रयत्न केला तर मात्र निषेधाच्या आरोळ्या उठू लागतात. हाच मुळी हिंदुस्थानातील जातिभेद, वंशविच्छेद यांचा सगळ्यात सज्जड पुरावा आहे.

शेतकरी चळवळ चालवताना ती आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यावी, जगातील शेतीसंबंधींच्या संस्थात भारतीयांच्या शोषणाची कैफियत मांडावी अशी कल्पना

माझ्या मनात अनेकदा येऊन गेली. संयुक्त राष्ट्र संघातील सेवेच्या माझ्या अनुभवामुळे अशा तऱ्हेची कार्यवाही करणे, पर्यावरणवादी नेत्यांच्या तुलनेत, मला अगदी सहज शक्य झाले असते. शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळवण्यासाठी भारतातील न्यायालयात जाण्याचा मार्गही मी शक्यतो टाळला. विधानसभेत किंवा लोकसभेत जाऊनही हा प्रश्न सुटेल असे कधी मला वाटले नाही. तेव्हा, जागतिक अन्न आणि शेती संघटनेसमोर जाणे व्यावहारिक वाटले नाही. असा आंतरराष्ट्रीय 'कारभार' करण्याइतकी संघटनेची आर्थिक परिस्थिती कधी मजबूत नव्हती, हीही गोष्ट खरी. भारताविरुद्ध आंतरराष्ट्रीय सभासंमेलनात कैफियती मांडायच्या असल्यास अडचण येऊ न देणाऱ्या अनेक संस्था आणि फौंडेशन्स आहेत हे काही मोठे गुपित नाही.

निदान एका प्रसंगी तरी शेतकरी आंदोलनाच्या मदतीला आंतरराष्ट्रीय मदत घेण्याचा मी प्रयत्न केला. १९८०-८२ सालात शेतकरी आंदोलन सर्वदूर उफाळले आणि पोलिसी दडपशाहीचा कडेलोट झाला. शेतकरी आंदोलकांवर लक्ष ठेवण्यासाठी हेलिकॉप्टर वापरले गेले; ट्रक, गाड्या भरभरून एसआरपी आणि गाड्या रस्त्यावर बसलेल्या शेतकऱ्यांना बेदम मारहाण करून हाकलून काढण्यासाठी वापरल्या जाऊ लागल्या. ज्या गावात शेतकरी संघटनेचे विशेष काम असेल तेथे पोलिसांनी धाडी घालून, दरवाजे फोडून, कौलारू छपरांतून घरात उतरून म्हाताऱ्याकोताऱ्यांना, मुलांना लाथांनी तुडवले. निपाणीच्या आंदोलनात तासाभरात पोलिसांनी १४ मुडदे पाडले; १०० वर जखमी केले. त्यापुढचे आंदोलन जाहीर करताना मी स्वतःच्या जबाबदारीवर इंटरनॅशनल रेडक्रॉस या संस्थेस पत्र लिहून त्यांनी आपले निरीक्षक आंदोलनाच्या जागी पाठवावेत अशी विनंती केली होती. त्यांच्या उपस्थितीमुळे पोलिसांच्या निर्घृणतेत काही फरक पडेल अशी आशा होती. मात्र, शेतकऱ्यांचे आंदोलन म्हटल्यावर इतर आंदोलनाकरिता धावून जाणाऱ्या संस्था मदतीला आल्या नाहीत. देशोदेशीच्या पत्रकारांच्या उपस्थितीमुळे काय फरक पडला असेल तो तेवढाच!

शेतकरी आंदोलनात शेतकऱ्यांची कैफियत आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडण्याची आणखी एक शक्यता तयार झाली. जगभरच्या श्रीमंत देशातील शेतकऱ्यांना अब्जावधी डॉलर्सची अनुदाने मिळतात. याउलट, हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना 'उलटी पट्टी' आहे. ही 'उलटी पट्टी' बिगरशेती व्यवसायाकरिता अप्रत्यक्ष अनुदान आहे; शेतकऱ्यांवर 'उलटी पट्टी' बसवणाऱ्या देशातून होणाऱ्या



आयातीविरुद्ध कार्यवाही करण्याची तरतूद असावी असे एका खाजगी चर्चेत जागतिक व्यापार संस्थेच्या महानिदेशकांना मी सुचवले होते. ज्या देशात शेतकऱ्यांवर 'उलटी पट्टी' आहे त्या देशांच्या प्रतिनिधी मंडळात शेतकऱ्यांना राखीव स्वतंत्र प्रतिनिधित्व असले पाहिजे अशीही सूचना केली. पर्यावरण, कामगार, शेतमजूर यांच्या प्रश्नाविषयी जागरुकता दाखवणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्था भारतीय शेतकऱ्यांच्या प्रश्नात फारसे स्वारस्य दाखवत नाहीत हे स्पष्ट झाले.

शेतकऱ्यांचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त संघटनेत तरी मांडण्याचे माझे प्रयत्न फारसे फलदायी झाले नाहीत हे खरे; पण मी प्रयत्न केले नाहीत असे म्हणणे अप्रामाणिकपणाचे होईल. असे प्रयत्न करण्यात काही देशद्रोह आहे असे मला खरोखरच वाटत नाही. सत्य परिस्थितीचे सम्यक ज्ञान जागतिक परिषदांत मांडले गेले नाही तरी माहिती तंत्रज्ञान आणि संचार तंत्रज्ञान यांच्या 'हनुमान उडी'मुळे आता कोणतीही गोष्ट लपून राहत नाही.

वंशविद्वेषाच्या पलीकडे जाणारा भारतातील जातिभेद ज्यांना दररोज टोचतो आणि घायाळ करतो त्यांनी जगाच्या दरबारात जाऊन किंकाळी मारली तर त्यांचा किंकाळी मारण्याचा मानवी हक्क कोणी नाकारू शकत नाही.

*(शेतकरी संघटक, ६ सप्टेंबर २००१)*

■

सव्वीस

# जलना, जलाना, जालना

शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी व शेतकरी युवा आघाडी या सर्व संघटनांचे संयुक्त अधिवेशन २७ ते ३० जानेवारी २००५ असे चार दिवस मराठवाड्यातील जालना येथे होणार आहे.

शेतकरी संघटना ही आंदोलक संघटना आहे. तिची कोणतीही लिखित घटना नाही. इंग्लंडमधील लोकसभेप्रमाणे कोणतीही लेखी घटना नसताना प्रदीर्घ काळ ऐतिहासिक कार्य करून दाखवणारी शेतकरी संघटना ही एक अनन्यसाधारण चळवळ आहे. घटना तयार करण्याचा प्रयत्न झाला नाही असे नाही; पण आंदोलक स्वरूप घटनेत उमटले तर ते धर्मादाय आयुक्तांना चालत नाही आणि नुसतेच 'समाजवादी' असे स्वरूप दाखवणारी घटना शेतकऱ्यांच्या मनात भावत नाही. अशा पेचामुळे आजही संघटनेला लिखित घटना नाही. परिणामत:, शेतकरी संघटनेनंतर उमललेल्या शेतकरी महिला आघाडी (नोव्हेंबर १९८६) आणि शेतकरी युवा आघाडी (जानेवारी २००२) यांनाही लिखित घटना नाही. शेतकरी संघटनेचे जालना येथे होणारे अधिवेशन हे दहावे अधिवेशन आहे.

अलिखित परंपरेने शेतकरी संघटनेची एक बांधणी आहे. संघटनेचा एक अध्यक्ष असतो. तो अध्यक्ष एक कार्यकारिणी नेमतो, जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेप्रमाणे पदाधिकारी नेमतो. संघटनेने प्रथमपासून रस्ता, पाणी आणि वीज यासंबंधीचे प्रश्न स्थानिक मानले आहेत. या प्रश्नासंबंधीची आंदोलने किंवा कार्यवाही जिल्हा किंवा तालुका संघटनांनी चालवायची असतात. रस्ता, पाणी आणि वीज या सर्वच विषयांत 'भारत' आणि 'इंडिया' यांच्यामध्ये एक खाई आहे. ही खाई इंडिया-भारत यांच्यामधील नववासाहतिक संबंधांचा एक दुय्यम परिणाम आहे. मुख्य प्रश्न शेतीमालाच्या किफायतशीरपणाचा



म्हणजे शेतीमालाच्या भावाचा आणि शेतकऱ्यांच्या मिळकतीच्या पातळीचा आहे. सारे गाव गरीब असेल तर तेथे मुंबईच्या बरोबरीने विजेचा झगमगाट होईल, भोवतालात गुळगुळीत रस्त्यांचे जाळे होईल व घरोघर पाहिजे तसा नळाने पाण्याचा पुरवठा होईल हे संभव नाही. या प्रश्नांवरील लढ्यात सैद्धांतिक मुद्दे फारसे उपस्थित होत नाहीत. देशाकडे आणि शासनाकडे उपलब्ध साधनेच अपुरी असली म्हणजे त्यांच्या वाटपात अपरिहार्यपणे डावे-उजवेपणा येतो. एकच फाटके पांघरूण आईने आपल्या सगळ्या बाळांना अगदी पूर्ण ममतेने घातले तरी एखादे तरी अर्धवट उघडे राहते.

अशा प्रश्नांवर आंदोलने करण्यात अनेक वेळा बाळा-बाळांमध्येच वादावादी निर्माण होते. अमुक एका नदीचे पाणी कोणत्या प्रदेशास किती मिळावे, रस्त्याचा नकाशा कोणकोणत्या दिशांनी जावा याबद्दल गावागावात, अगदी राज्याराज्यांतसुद्धा वितंडवाद उभे राहतात. सतलज नदीच्या पाण्यासंबंधी पंजाब आणि हरियाणा या राज्यांतच रणधुमाळी माजण्याची वेळ आली आहे. तामिळनाडू व कर्नाटक यांच्यामध्ये कावेरी नदीच्या पाणीवाटपावरून अशीच कठीण परिस्थिती कित्येक वर्षांपासून उभी आहे. स्थानिक प्रश्न शेतकरी संघटनेच्या स्थानिक विभागांकडे सोपवण्यात दोन गोष्टी साध्य झाल्या. पहिली म्हणजे तुटपुंज्या साधनांच्या अपरिहार्यपणे असमाधानकारक वाटपाबद्दल सैद्धांतिक भूमिका घेण्याची आवश्यकता राहिली नाही. दुसरा परिणाम असा की स्थानिक प्रश्नावरच्या वितंडवादापासून संघटनेला स्वत:ला अलिप्त ठेवता आले. नाशिक जिल्ह्यात धरणे आणि त्यांच्या पाण्याचा वापर अहमदनगर जिल्ह्यात. या दोन जिल्ह्यांत त्यामुळे वाद; पण ते बाजूला सारून दोन्ही जिल्ह्यांत उसाच्या भावाचे आंदोलन प्रभावीपणे उभे राहिले. पंजाब हरियानातील पाण्याच्या वाटपाचा प्रश्न आर्थिक प्रश्नापासून वेगळा करून पंजाब आणि हरियाना या दोन्ही राज्यांतील किसान युनियन एकत्र काम करतात. आर्थिक प्रश्न आणि स्थानिक प्रश्न यांची अलिखित परंपरेने विभागणी करून शेतकरी संघटनेने, ज्या एका खडकावर इतिहासातील अनेक शेतकरी आंदोलनांची गलबते आदळून फुटली तो खडक शिताफीने टाळला.

शेतीमालाचा भाव, रास्त भाव न मिळू देण्याची सरकारी हस्तक्षेपाची व्यवस्था हे प्रश्न राज्य कार्यकारिणीच्या क्षेत्रातले, यासंबंधीचे निर्णय अध्यक्षांनी नेमलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत होतात.

शेतकरी संघटनेच्या इतिहासात वेळोवेळी असे काही प्रश्न उभे राहत गेले

की ज्यांचा निर्णय करणे कार्यकारिणीलाही आपल्या कुवतीबाहेरचे वाटले. ८० ते ८२ या काळात चाकण, पिंपळगाव बसवंत, निपाणी, महाराष्ट्रातील ऊस आणि दूध उत्पादक प्रदेश यांच्यात उग्र शेतकरी आंदोलने उभी राहिली. या सगळ्या आंदोलनांचा अन्वयार्थ काय? शेतकरी काय मागत आहेत? त्यांच्या दु:खाची मूळ कारणे काय? त्या दु:खावर औषधोपचार काय? पथ्यपाणी कोणते? याचा निर्णय करण्याकरिता सटाणा (नाशिक) येथे १९८२ साली शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन झाले.

समाजाच्या जीवनाच्या बाकी सर्व बाजू अलग करून आंदोलन आपल्या वेगळ्या जगात चालू शकत नाही. त्याला समाजाच्या इतर अंगांचीही नोंद घ्यावी लागते. परभणी (१९८४) च्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या शोषणात राजकीय नेतृत्वाचा हातभार किती आणि सरकारी नोकरशाहीची नेमकी भूमिका काय? हे प्रश्न अनेक कार्यकर्त्यांच्या मनात उभे झाले होते. त्यावेळी पंजाब आणि इतर राज्यांत चालू असलेल्या फुटीरवादी आणि आतंकी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आंदोलनाची नेमकी भूमिका काय याचेही स्पष्टीकरण हवे होते. कांद्याचे आंदोलन झाले, उसाचे झाले, तंबाखूचे झाले, दुधाचे झाले आणि अशी एकएक शेतीमालाच्या आंदोलनांची साखळी किती काळ चालणार? या सगळ्या प्रश्नांच्या मुळावर घाव घालणारी काही उपाययोजना शक्य आहे काय?

१९८२ साली पहिल्यांदा आंतरराज्य समन्वय समिती निर्माण झाली. इतिहासातील सर्व शेतकरी आंदोलनांनी आपापले जिल्हे किंवा राज्ये यांची कुंपणे ओलांडून पलीकडे जाण्यात सक्षमता दाखवली. यावेळचे शेतकरी आंदोलन खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आंदोलन कसे होईल याही संबंधी देशपातळीवर विचारविनिमय आवश्यक होता. या प्रश्नांची उत्तरे कार्यकारिणीला देणे आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरचे आहे असे वाटल्यावरून १९८४ साली परभणी येथे अधिवेशन भरविण्यात आले.

१९८४ साली इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलू लागली. शेतकरी संघटनेकडे कॉंग्रेसविरोधी पक्षांची आघाडी बनविण्याची प्राथमिक जबाबदारी आली. त्याकरिता सर्व महत्त्वाच्या राजकीय पक्षांनी आपली शेतकरी प्रश्नावरची भूमिका स्पष्ट करावी यासाठी शेतकरी संघटनेचे धुळे येथील अधिवेशन बोलावण्यात आले.

जेव्हा जेव्हा काही असाधारण परिस्थितीत सर्व शेतकऱ्यांना कौल लावून



संघटनेची व आंदोलनाची दिशा ठरवण्याची आवश्यता वाटते तेव्हा तेव्हा शेतकरी संघटनेचे अधिवेशन भरवण्यात येते.

शेतकरी महिला आघाडीची स्थापना १९८६ सालच्या चांदवड येथे भरविलेल्या शेतकरी महिला अधिवेशनात झाली. त्यानंतर अमरावती (१९८९) व रावेरी (२००१) येथे महिला आघाडीची स्वायत्त अधिवेशने भरविण्यात आली. शेतकरी संघटना आणि शेतकरी महिला आघाडी यांचे घनिष्ठ संबंध लक्षात घेता अमरावती येथील शेतकरी महिला अधिवेशनावर 'बाबरी मशीद – अयोध्या मंदिर' प्रकरणातील जातीय दंगलींची सावली पडावी हे समजण्यासारखे आहे. रावेरी अधिवेशनातही विदर्भ आणि मराठवाड्यात धगधगू लागलेल्या कापूस प्रश्नाची नोंद घ्यावी लागली. एवढेच नव्हे तर, रावेरीच्या सर्व अधिवेशनाचे कापूस आंदोलनाच्या मोर्चात रूपांतर झाले. अपरिहार्यपणे समग्र शेतकरी समाजाला कौल लावण्याकरिता भरवलेले अधिवेशन हे समग्र शेतकरी परिवाराचे अधिवेशन ठरते. या सर्व परिवारात शेतकरी युवा आघाडीला वेगळे स्थान नव्हते. शेतकरी युवा आघाडीचे बांधणी अधिवेशन दौंड येथे (जानेवारी २००२) भरवण्यात आले.

अधिवेशन केव्हा भरवावे, दोन अधिवेशनांतील कालावधी किती असावा यासंबंधी अर्थातच काही नियम नाही. ही अध्यक्षांच्या अखत्यारीतील गोष्ट आहे. अनेकवेळा एक अधिवेशन झाल्यानंतर थोड्याच काळात काही व्यापक प्रश्न उभे राहिले, परिस्थितीत पालट झाला तेव्हा शेतकरी मेळावे, परिषदा भरवून शेतकऱ्यांना कौल लावण्यात आला.

डॉ. मनमोहनसिंग व श्री. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली खुल्या व्यवस्थेचे धोरण जाहीर झाल्यानंतर शेगाव येथे (नोव्हेंबर १९९१) वेगळा मेळावा भरवण्यात आला. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती आंदोलनाची घोषणा करण्यासाठी जळगाव (१९८८) येथे शेतकऱ्यांचा राजा छत्रपती शिवाजी व दलितांचे कैवारी डॉ. आंबेडकर यांचा संयुक्त जयंती मेळावा भरवण्यात आला. स्वातंत्र्याच्या ५० वर्षांच्या प्रगतीचा ताळेबंद मांडून 'स्वातंत्र्य का नासले?' याचा हिशेब घेण्याकरिता अमरावती येथे १९९८ साली जनसंसद भरवण्यात आली.

दक्षिण महाराष्ट्र मोटार सायकल यात्रेचा समारोप कोपरगावच्या मेळाव्यात झाला. महाराष्ट्र प्रचारयात्रेचा समारोप ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी टेहरे (मालेगाव) येथे झाला. म. फुले विचार प्रचार यात्रेचा समारोप विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झाला. त्यापूर्वीही राजकीय पर्याय निर्माण करण्याच्या

दृष्टीने नागपुरात एक मेळावा घेण्यात आला. त्या मेळाव्यात (१९८७) शेतकरी संघटनेच्या मंचावर विश्वनाथ प्रतापसिंग, चंद्रशेखर, अटलबिहारी वाजपेयी असे तीन भावी पंतप्रधान एकत्र आले होते.

संयुक्त राष्ट्र संघाच्या बीजिंग परिषदेनंतर (१९९५) साऱ्या महिला आंदोलनाला सरकारी दावणीला बांधण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी शेतकरी महिला आघाडीने मुंबई येथे बीजिंगविरोधी परिषदही (१९९६) बोलावली होती. या परिषदेचे दस्तावेज शेतकरी संघटनेच्या विचारधारेवर दूरगामी परिणाम घडवून गेले.

विश्वनाथ प्रतापसिंगांच्या नेतृत्वाचा उदय होत असताना त्यांच्यासाठी सटाणा, धुळे, कोल्हापूर, सांगली, लातूर असे महामेळावे भरविण्यात आले. त्या प्रत्येक मेळाव्यातही पथदर्शक निर्णय जाहीर करण्यात आले. या सर्व अधिवेशने, मेळावे, परिषदा यांचा परामर्श 'शेतकरी संघटक'मध्ये आणि अधिवेशनांच्या स्मरणिकांत ग्रंथित झालेला आहे.

शेतकरी आंदोलनाच्या राजकीय धोरणाची दिशा, विशेषत: १९८४ नंतर, मोठी उलथापालथीची झाली. महाराष्ट्रातील आणि इतरही काही राज्यांतील सहकार चळवळीच्या आधाराने काँग्रेसने बसवलेले वर्चस्व शेतकरी आंदोलनाने मोडकळीला आणले; पण राजकारणापासून दोन पावले दूर राहण्याच्या धोरणामुळे शेतकरी संघटनेला राजकीय पर्याय देता आला नाही. 'छोटा चोर, मोठा चोर', 'मोठा चोर, जातीयवादी महाराक्षस', खुली व्यवस्था, लायसेन्स-परमिट-राज अशा अनेक भोवऱ्यांत शेतकरी संघटनेच्या राजकीय धोरणाची नाव गिरक्या घेत गेली.

समाजवादाचा पाडाव झाल्यानंतर देशाच्या विषयपत्रिकेवरून आर्थिक मुद्देच पुसले गेले आणि इतिहासातील गौरवस्थळे आणि दोषस्थळे यांचे भांडवल करणारे मंडलवादी, मंदिरवादी इत्यादी राजकीय पक्ष पुढे आले. निर्धार्मिकतेचा टेंभा मिरवणारे पक्ष केवळ राजकीय स्वार्थापोटी देशद्रोही तत्त्वांशीही हातमिळवणी करतात. परिणामत: आज केंद्रातील राज्य नक्सलवादी आणि मूलतत्त्ववादी आतंकवाद्यांच्या प्रभावाखाली आले आहे. विशुद्ध स्वतंत्रतावादी पक्ष म्हणून स्वतंत्र भारत पक्ष पुढे आला पण संघटनेच्या बाहेर कार्यकर्त्यांची फळी उभी करण्यात त्याला अपयश आल्यामुळे त्यालाही जातीयवाद्यांच्या एका गटाचा आधार घ्यावा लागला. या संगतीने कर्जमुक्तीसारखा कार्यक्रमसुद्धा निवडणुकीच्या मैदानात मान्यता मिळवू शकला नाही.



१९८० साली शेतकरी संघटनेचा उदय झाला तेव्हा शासन आणि नियोजित अर्थकारण यांच्यावर डाव्या विचारांचा प्रभाव होता. गावागावातील छोटे मोठे शेतकरी यांच्यातील वादच प्रकर्षाने मांडून जमिनीच्या फेरवाटपाला अग्रहक्क दिला जात होता. जमीनधारक शेतकरी म्हणजे भांडवलदार; शोषण होते ते केवळ भूमिहीन मजुरांचे अशी मांडणी २५ वर्षांपूर्वी केली जात होती. शेतकरी संघटनेने या डाव्या विचारांशी संघर्ष केला. शेतकरी संघटनेने 'शेतीवर ज्याचे पोट तो शेतकरी' अशी व्याख्या सुस्थापित केली. 'शेतकरी तितका एक एक' ही मानसिकता रुजवली. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे आणि कर्जबाजारीपणाचे मूळ कारण 'इंडिया'चा वसाहतवाद आहे, शेतीमालाला भाव मिळू न देण्याचे धोरण हे शेतकऱ्यांच्या गरिबीचे मूळ आहे असे मांडले आणि जगापुढे सिद्ध करून दाखवले. 'भीक नको, हवे घामाचे दाम' अशी सन्मानजनक भावना शेतकऱ्यांच्या मनात रुजवली. शेतकरी संघटनेच्या कर्जमुक्ती आणि भ्रष्टाचारविरोधी 'उसने पैसे परत मिळविणे' या आंदोलनांनी तर 'मी कर्जबाजारी शेतकरी आहे याचा मला अभिमान आहे' असे धाष्ट्यनि म्हणण्याइतपत आत्मविश्वास शेतकऱ्यांच्या मनात निर्माण केला.

या मांडणीवर शेतकरी आंदोलन उभे राहिले, देशात चौदा राज्यांत पसरले. वर खाली चढउतार झाले पण २५ वर्षानंतरही शेतकरी आंदोलन झेंडा धुळीत पडू देत नाही; उलट, शेतकरी संघटनेची आर्थिक मांडणीच आता जगमान्य झाली आहे. हे इतिहासातील अपूर्व यश शेतकरी संघटनेने मिळवले; परंतु हे सर्व यश राजकीय उलथापालथीत वाहून जाण्याचा धोका तयार झाला आहे.

सर्व देशात हिंदू म्हणवले जाणारे लोक बहुसंख्य; पण हिंदू तत्त्वज्ञानाची परंपरा व समाजाची मानसिकता ही व्यक्तिनिष्ठ आहे. 'पिंडात्मा आणि ब्रह्मात्मा यांच्यामध्ये कोणीही मध्यस्थ किंवा ग्रंथ नाही' असे मानणाऱ्या उदारमतवादी हिंदू समाजाच्या नेतृत्वाची पताका त्या तत्त्वज्ञानातील देदीप्यमान विचारांचा लोप करून बाहेरून हिंदुस्थानवर आक्रमण करून यशस्वी झालेल्या आणि संघशक्ती मानणाऱ्या देशांतील इतर समाजांचा आदर्श पुढे ठेवून हिंदू समाजाला बळजबरीने संघधर्म बनवणाऱ्यांच्या हातात गेली. हे पताकाधारी गर्जना करतात हिंदुत्वाची पण उदारमतवादी हिंदू त्यांना मानत नाही. हिंदुत्वाच्या घोषणेने भारतीय संघराज्याच्या संसदेत दीडदोनशे जागा मिळवता येतात पण बहुमत मिळवता येत नाही. यासाठी इतर समाजांना न दुखावता बरोबर घेऊन चालणे आवश्यक आहे हे अटलबिहारी वाजपेयी यांनी हेरले आणि राष्ट्रीय लोकशाही

आघाडीला एक प्रतिष्ठा मिळवून दिली. एवढेच नव्हे तर, अपूर्व आर्थिक विकासाचा एक कालखंड प्रत्यक्षात आणून भारत जागतिक महासत्ता होऊ शकतो असे स्वप्न राष्ट्रापुढे उभे केले. २००४ सालच्या लोकसभा निवडणुकीच्या काळातही हिंदू समाजाला कळपवादी बनवू पाहणाऱ्यांनी अतिरेकी प्रकार घडवून आणले त्यातून वाजपेयींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पराभव झाला.

या पराभवातून यथोचित अर्थ काढण्याऐवजी कळपवादी हिंदू, राष्ट्रीय लोकशाही आघाडीने आमच्यापासून हिंदुत्व दूर केल्यामुळे तिचा पराभव झाला व पुन्हा सत्तेवर यायचे असेल तर प्रखर हिंदुत्वाचा ध्वज उभारला पाहिजे असा गिल्ला करीत आहेत. अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रगल्भ सर्वसमावेशक आणि सहिष्णू धोरणामध्ये एक इतिहाससिद्ध हिंदू मानसिकतेचा कल होता. संख्याशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर भारतीय मनाचा तोच सुवर्णमध्य आहे. कळपवादी हिंदुत्वाच्या नेत्यांच्या वक्तव्यांमुळे विरोधी काँग्रेस आघाडीस प्रचाराचा झंझावात उठवण्याची संधी मिळाली आणि परदेशी जन्माच्या नेतृत्वालासुद्धा जनतेने पत्करले. 'अल्पसंख्याकांची मुजोरी चालेल पण बहुसंख्याकांची हुकूमशाही नको.' अशा भावनेने लोकांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीस मागे टाकले.

काँग्रेस निर्धार्मिक कधीच नव्हती. अल्पसंख्याकांच्या धास्तीला खतपाणी घालून आणि त्याहीपेक्षा हिंदू प्रवक्त्यांच्या विरुद्ध जहरी प्रचाराची राळ उठवून काँग्रेसने निर्धार्मिकतेचा कांगावा चालवला आहे त्याला जनतेने पत्करले.

परिणाम असा झाला की ढोंगी निर्धार्मिक काँग्रेस, मागास (मंडल) वर्गीय जाती किंवा अल्पसंख्याक यांच्या एकीच्या मतांची बेरीज यशस्वीपणे करून दाखवणारे भ्रष्टाचारी, मंडलजातीयवादी आणि खुल्या व्यवस्थेला सर्व आघाड्यांवर विरोध करणारे डावे कम्युनिस्ट यांचे राज्य दिल्लीत प्रस्थापित झाले आहे.

राज्यसभेचा सदस्य म्हणून वेगवेगळ्या प्रसंगी अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर, दारिद्र्यनिर्मूलनासंबंधात वेगवेगळ्या पक्षांच्या लोकांची भाषणे ऐकण्याचा योग आला. त्यापलीकडे त्यांची शरीराची भाषाही पाहता आली. त्यांच्या एकमेकांच्या नेत्रपल्लव्या आणि खाणाखुणा प्रत्यक्ष पाहिल्यानंतर माझी भावना झाली ती अशी:

लालूप्रसादसारखे मागासवर्गीय नेते काय, डावे काय आणि काँग्रेसवाले काय – सगळ्यांच्या मनात हिंदुत्वाबद्दल मोठी चीड आहे. देशासाठी कोणतीही



तोशीस न सोसलेली मंडळी प्रखर राष्ट्रवाद्यांचाही उपमर्द करू शकतात. संयुक्त पुरोगामी आघाडी शासनातील सर्व गटांचा समान घटक म्हणजे हिंदूद्वेष. तो व्यक्त करण्याचा त्यांना माहीत असलेला एकमेव मार्ग म्हणजे हिंदू जातीव्यवस्थेमुळे अन्याय झालेले आणि विशेषत: मुसलमान अल्पसंख्याक यांचा खुलेआम अनुनय करणे. हज यात्रेला अनुदान देणे ही काही मोठीशी गोष्ट नाही. अमरनाथ यात्रेलाही शासन मोठा खर्च करते; पण हजच्या अनुदानामागे भावना राजकीय अनुनयाची आहे. अल्पसंख्याकांच्या शिक्षणाकरिता वेगळा आयोग नेमण्यामागेही हीच भावना आहे. अल्पसंख्याकांना राखीव जागा देण्याचे समर्थन याच बुद्धीतून होत आहे. मुसलमान अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वतंत्र शिक्षण संस्था तयार करण्याकरिता प्रोत्साहन देणे आणि बौद्धधर्मीयांना मात्र सर्वसाधारण शिक्षण संस्थांत राखीव जागांची तरतूद करणे या दुटप्पी धोरणातील राजकारण उघड आहे.

पण, धर्मासंबंधी राजकारण हा काही शेतकरी संघटनेचा प्रमुख विषय नाही. दलित, डावे आणि अल्पसंख्याकांचे अनुनयी एकत्र झाल्यामुळे अर्थकारणावर काय परिणाम होत आहेत हे महत्त्वाचे आहे.

एका वाक्यात सांगायचे झाले तर शेतकरी संघटनेने गेल्या २५ वर्षांत जी वैचारिक क्रांती करून दाखवली ती या संयुक्त पुरोगामी आघाडी शासनाच्या धोरणामुळे वाहून जाण्याचा धोका तयार झाला आहे.

शेतीमालाच्या भावासंबंधी ऋणात्मक अनुदान असल्याचे सर्वमान्य झाले होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात शेतीमालाच्या भावाची परिस्थिती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या तुलनेने काहीशी सुधारली. या आकडेवारीचा उपयोग करून संपुआ शासन, आता हजारो शेतकरी आत्महत्या करत असतानाही शेतकऱ्यांना हजारो कोटी रुपयांची अनुदाने असल्याचे उघडउघड बिनदिक्कत सांगते आहे. वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी संसदेच्या हिवाळी सत्राच्या शेवटी लोकसभेस सादर केलेल्या अनुदानासंबंधी निवेदनात हे स्पष्ट होते. आत्महत्या शेतकरी करतात; पण संपुआ सरकारच्या 'आर्थिक सुधार आणि मानवी मुखवटा' या धोरणामुळे शेतीच्या किफायतशीरपणा प्रश्न बाजूला पडत आहे. शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत उभे करण्याकरिता माझ्या अध्यक्षतेखालील कार्यबलाने दिलेल्या शिफारशी बाजूला टाकण्यात आल्या आहेत. कांगावा शेतकऱ्यांचे भले करण्याचा; पण सरकारी पैसा सगळा सहकारी संस्थांच्या पदरात असा कार्यक्रम चालू आहे.

गावाच्या आतही बेरोजगारांच्या प्रश्नावर प्रकाशझोत टाकून रोजगार हमी योजनेसारखी बदनाम व्यवस्था देशभर चालू करून महाराष्ट्राप्रमाणेच 'रोजगार हमी, अर्धे तुम्ही अर्धे आम्ही' आणून शेती व्यवसायातील श्रमबाजारपेठ उद्ध्वस्त करण्याचे निश्चित धोरण आखण्यात आले आहे. शेतकरी संघटनेचा उदय झाला तेव्हा शेतीमालाच्या भावाच्या तुलनेत शेतमजुरी अधिक वाढते असा सिद्धांत शेतकरी संघटनेने मांडला होता. सर्व डाव्यांनी त्याची कुचेष्टा केली होती. आज प्रत्यक्ष प्रमाण आहे की कापूस, भुईमूग असे काही अपवाद सोडले तर शेतीमालाच्या आधारभूत किमती फार तर दुपटीने वाढल्या आहेत, याउलट, शेतमजुरीचे किमान दर महाराष्ट्रात सतरापट वाढले आहेत. शेतकरी संघटनेच्या उदयाच्या वेळी शेतमजुरांना किमान वेतनही दिले जात नाही अशी तक्रार होती. आज सर्वदूर शेतमजुरीचे दर कायद्याने ठरवलेल्या दरापेक्षा अधिक आहेत. अशी परिस्थिती असताना किमान वेतन दर देऊन रोजगार हमी चालवणे यात सरकारी नोकर आणि राजकीय दलाल यांचे भले करण्याचीच बुद्धी दिसून येते. रोजगार हमी योजनेच्या कामावर दाखल करून घेण्याआधी त्याला शेतीच्या कामावर किमान वेतनाने रोज मिळत नाही एवढे तरी तपासून घ्यावे हीही भूमिका स्वीकारायला शासन तयार होत नाही.

मागासवर्गीयांना खासगी क्षेत्रातही राखीव जागा मिळाल्या पाहिजे अशीही घोषणा संपुआच्या किमान संयुक्त कार्यक्रमात केली आहे. त्यासंबंधीचा कायदा लवकरच मांडला जाईल; पण शेती खासगी क्षेत्रात आहे. तेव्हा खासगी क्षेत्रातील राखीव जागांचा फायदा शेतीतील रोजगारीतही मिळाला पाहिजे हे मानायला सरकार तयार नाही.

जम्मू-काश्मीरपासून देशभरातल्या अल्पसंख्याक आतंकवाद्यांविषयी संपुआ सरकारची भूमिका मवाळ होत आहे. हे आतंकवादी दिवसेंदिवस चढत्या श्रेणीने मनमानी करीत आहेत त्याला संपुआतील अनुनयवाद्यांचा पाठिंबा आहे.

नेपाळच्या सरहद्दीपासून ते आंध्र प्रदेशपर्यंत नक्षलवादी आणि माओवादी यांनी खून, लुटालूट, बलात्कार, अपहरण यांचा धुमाकूळ मांडला आहे. डाव्या पक्षांच्या दडपणाखाली संपुआ सरकार याबद्दलही बोटचेपे धोरण घेत आहे. नक्षलवाद्यांत कोणी तरुण आदर्शवादी आहेत त्यांच्याशी बोलणी करून, त्यांची समजूत काढून त्यांना देशाच्या मध्यप्रवाहात आणणेच योग्य राहील अशी 'संपुआ'ची भूमिका आहे. नक्षलवादी आता बेमूर्वतखोरपणे शस्त्रे न टाकता बोलणी करण्याच्या अटी घालतात, संपुआ सरकारे त्यांच्यापुढे मान



झुकवतात. परिणामत:, दीडशेच्यावर जिल्ह्यांत आज नक्षलवाद्यांचे राज्य चालू आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे स्वातंत्र्य खरे नाही या रणदिवे सिद्धांतातून तेलंगण आणि बंगाल येथे उठाव चालू झाले. रणदिवे सिद्धांताचा चौथा हिस्सा तरी विजय झाला आहे. केंद्रात डाव्यांना 'नकाराचा अधिकार' मिळाला आहे.

भारताच्या फाळणीच्या वेळी 'हँस के लिया पाकिस्तान, लड के लेंगे हिंदुस्तान' असे म्हणणाऱ्यांचाही चौथा हिस्सा विजय झाला आहे आणि इस्लामचे राज्य झाले नसले तरी 'हिंदुत्व नित्य जगती अवमानितात' अशी परिस्थिती तयार होत आहे. याला जबाबदार कळपवादी हिंदू नेतृत्व की राजकारणधुरंधर व हिंदू समाजातील असंतुष्ट आणि मुसलमान यांच्या मतांची बेरीज करून आवश्यक तर राष्ट्रहितही बाजूस ठेवण्यास तयार असलेले हा विषय महत्त्वाचा नाही. ग्रमीण भागात घुसलेला वर्गवाद काढून जमीनमालक आणि भूमिहीन या दोघांचाही फायदा करून देणारी विचारसरणी बाजूस सारून गावागावांत जातीयवादाच्या आधाराने 'आहे रे' आणि 'नाही रे' अशी, संघर्ष पेटवून देणारी विचारसरणी यशस्वी होत आहे.

समाजवादी धोरणांचा वरवंटा सगळ्यात क्रूरपणे फिरला तो शेतकऱ्यांवर; पण, लायसन्स-परमिट-इन्स्पेक्टर राज्य फक्त शेतीपुरते मर्यादित नव्हते. व्यापार, उद्योग क्षेत्रांचेही नियोजनव्यवस्थेने वाटोळे केले. श्री. नरसिंहराव यांच्या जमान्यात आर्थिक सुधारांची सुरुवात झाली. त्यात बिगरशेती क्षेत्रातील आर्थिक सुधारांना प्राधान्य दिले गेले. शेतकऱ्यांनाही व्यवसायस्वातंत्र्य असावे अशी शेतकरी संघटनेची धडपड चालू असताना बिगरशेती क्षेत्रातही आर्थिक सुधारणांचा विरोध करणाऱ्या नेता-तस्कर-गुंडा-अफसर यांनी उचल खाल्ली आहे आणि आपल्या युनियनच्या ताकदीवर संप हरताळांचे हत्यार वापरून संपुआ सरकारला जागोजाग नमवण्यास ते यश मिळवत आहेत. परकीय गुंतवणुकीची टक्केवारी, भविष्य निर्वाह निधीचा व्याजाचा दर अशा प्रश्नांवरही डाव्यांचा आग्रहच निर्णायक ठरतो. शेतीक्षेत्रात तर शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा विषयपत्रिकेवरूनच संपवण्यात आला आहे. अन्न आणि खते यांच्यावरील अनुदानाचा गवगवा वाढत आहे. गावागावांत वर्गयुद्ध पेटवण्याचे मनसुबे रचले जात आहेत.

जालना येथे शेतकरी संघटनेचे अधिवेशन बोलावण्यात आले ते या विपरित परिस्थितीत. शेतकरी आंदोलनाच्या झेंड्याखालील दुसऱ्या स्वातंत्र्याची चळवळ मोठ्या अरिष्टात सापडत आहे. इकडे आड, तिकडे विहीर - पाणी

दोघातही नाही – अशा परिस्थितीत पुढची वाटचाल कशी करावी याचा निर्णय स्वत: शेतकऱ्यांनाच करायचा आहे.

शेतकरी आंदोलनाची वाटचाल मोठी कठीणच झाली; पण बळिराजाच्या कृपेने आजपर्यंत वाचून राहिली. 'बचेंगे तो और भी लडेंगे', सर्व शेतकऱ्यांची माय शेतकरी संघटना. तिला चौफेर वेढणाऱ्या शत्रूंपासून वाचवायचे कसे हा थोडक्यात प्रश्न आहे. पुन्हा एकदा संघटना जीवघेण्या संकटात सापडली आहे. शेतीवर पोट भरणाऱ्या आणि सन्मानाने जगू इच्छिणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना हे निमंत्रण म्हणजे मदतीस धावून येण्याची हाक आहे.

(शेतकरी संघटक, ६ जानेवारी २००५)

■



सत्तावीस

# शेतकीमंत्र्यांचे 'शेतकऱ्यांना, चले जाव'

'सोडा' या शब्दामुळे असेल; पण पवारसाहेबांचा 'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' हा सल्ला ऐकून मला आठवण झाली ती पु. ल. देशपांडे यांच्या 'बटाट्याची चाळ'मधील उपवासाच्या कथेची. उपवास करायला बसलेल्या पंतांना कोणी काही तर कोणी काही सोडा असा सल्ला देतो. कोणी म्हणे भात सोडा, कोणी म्हणे बटाटे सोडा, कोणी म्हणे साखर सोडा, कोणी म्हणे नोकरी सोडा आणि शेवटी, 'नोकरी सोडा'. या सल्ल्यामागे पंतांच्या हिताचा विचार नसून पंतांनी नोकरी सोडल्यास चाळीतील त्यांची जागा खाली होऊन ती जागा आपल्याला मिळण्याची शक्यता आहे असा सल्ला देणाऱ्याचा हेतू असावा अशी टिपणी स्वत: पु. ल. देशपांडे करतात.

पवारसाहेब काही मनात येईल तसे बोलणारे नाहीत; मोठे धोरणी, राजकारणधुरंधर नेते म्हणून त्यांची ख्याती आहे. ते बोलतात ते त्यांच्या मनातूनच बोलतात, बुद्धीला पटलेले असते म्हणूनच बोलतात असेही नाही. इतिहास असे सांगतो की, त्याच्या मागे त्यांचे काही निश्चित धोरण असते. आजही त्यांच्या बोलण्यात काही लेचेपेचेपणा दिसला तरी तो त्यांनी जाणीवपूर्वक ठेवलेला असतो आणि पुढेमागे, राजकारणाच्या खेळीत त्याचा उपयोग आपल्याला व्हावा याची अटकळ त्यांनी बांधून ठेवलेली असते.

'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' या सल्ल्यामागे त्यांचे काय धोरण असू शकते? शेतकरी, शेती परवडत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत आणि त्याचे सर्व किटाळ आपल्या अंगावर येत आहे; शेतकऱ्यांनी शेती करायचे सोडून दिल्यास त्यंनी केलेल्या आत्महत्या या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ठरणार नाहीत आणि त्याचे बालंट शेतकीखात्यावर किंवा मंत्रालयावर येणार नाही या धोरणाने कदाचित त्यांनी 'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' असा सल्ला दिला

असेल; पण 'मुळात शेती तोट्याची आहे' असे वाक्य काही त्यांच्या मुखातून निघाले नाही. याउलट, काही काळापूर्वी, त्यांनी 'शेती फायद्याची असते; आपल्या बारामतीच्या शेतीत आपण अठरा एकरांत अठरा लाखाचे उत्पन्न काढतो' असे सांगितले होते. त्यांचे हे म्हणणे खरे असेल तर शेती कशी करावी याबद्दल शेतकऱ्यांना सल्ला देऊन बारामतीला आपण आपल्या शेतीत कोणती आणि किती खते औषधे वापरतो, कोणती बियाणी वापरतो आणि काय किमया करतो की ज्यामुळे आपल्याला दर एकरी एक लाख रुपये फायदा मिळू शकतो याचे रहस्य शेतकऱ्यांना उलगडून दाखविले असते तर, 'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' असा सल्ला देण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती.

बरे, 'शेतकऱ्यांनी शेती सोडावी' असा सल्ला देताना किती शेतकऱ्यांनी शेती सोडावी याचा काही त्यांनी उल्लेख केलेला नाही. सर्वच शेतकऱ्यांनी शेती सोडावी असे सांगितले तरी ते ऐकणार नाहीत आणि त्यांनी ते ऐकले तर देशातील सर्व लोकांचे पोट कसे भरावे यासंबंधीची काही तरतूद त्यांनी योजिली असेल तर त्यांनी सांगायला पाहिजे होती. तसे त्यांनी काही सांगितलेले नाही.

यापलीकडे, शेतकऱ्यांनी शेती सोडून द्यावी तर मग शेतकी मंत्रालयाचे प्रयोजन काय उरते? शेतकऱ्यांनी शेतकी जशी गुंडाळून ठेवायची तसेच शेतकी मंत्रालयही गुंडाळून ठेवले पाहिजे असा काही उल्लेख त्यांनी केलेला नाही. उलट, शेतकी मंत्रालयाचे अंदाजपत्रकी स्थान टिकून कसे राहील एवढेच नव्हे तर, ते वाढेल कसे याचाच विचार ते करताना दिसतात.

पवारसाहेब शेतकीमंत्री झाले तेव्हा महाराष्ट्रातील शहरोशहरी, गावोगावी, रस्तोरस्ती खांबाखांबांवर 'शेतकऱ्यांचा जाणता नेता शेतकीमंत्री झाला' अशा जाहिराती फडकल्या होत्या. शेतकऱ्यांचा जाणता नेता शेतकीमंत्री झाला आणि गेल्या तीन वर्षांत, हिंदुस्थानातील शेतकऱ्यांमध्ये, नैराश्यापोटी वैफल्याने आत्महत्या करण्याची एकच लाट उसळली आणि शेवटी, साहेबच आता 'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' असा सल्ला देऊ लागले आहेत; पण हे सांगताना ही अशी वेळ का आली, शेती तोट्याची का झाली, शेतकरी कर्जबाजारी का झाला हे सांगायची तसदी काही त्यांनी घेतलेली नाही.

तसे, 'शेती सोडा' हा सल्ला शरद पवार आणि त्यांचे साथीदार शेतकऱ्यांना अनेक वर्षे देतच आहेत. पहिल्यांदा, शेती जमत नसेल तर शेतकऱ्यांनी गाई पाळाव्या, म्हशी पाळाव्या, दुग्धव्यवसाय करावा असा सल्ला देऊन झाला.



एवढ्याने जमले नाही, कारण दुधाला भाव नाही, तर मग शेतकऱ्यांनी कोंबड्या पाळाव्या असे सांगून झाले. गाईम्हशी पाळून, कोंबड्या पाळूनही जमले नाही तर बकऱ्या पाळा, डुकरे पाळा, शेवटी फळबागा करा असे सगळे काही सांगून झाले; पण शेतकऱ्याचा मुख्य धंदा आणि देशाची सर्वात मोठी गरज म्हणजे अन्नधान्य उत्पादन करणे, ते करून शेतकरी जगू का शकत नाही याचा उलगडामात्र त्यांनी कधी केला नाही.

शेतकऱ्यांनी शेती सोडावी या सल्ल्यामागे आणखी एक धोरण असू शकते. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी व्हावा, परदेशातून आयात फारशी करू नये, शक्यतो निर्यातही करू नये अशा तऱ्हेचे धोरण नेहरूंच्या समाजवादी काळात राबवण्यात आले. त्यामुळे, देश अधिकाधिक गरिबीतच बुडत गेला. याउलट, आपल्या कर्तृत्वाला इथे काही वाव नाही हे पाहून देश सोडून परदेशात गेलेल्या भारतीयांनी त्यांच्या कर्तृत्वाने, धडाडीने आणि ज्ञानाच्या ताकदीवर सगळ्या जगात स्थान मिळवले. एवढेच नव्हे तर, ते हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाचे प्रमुख साधन बनले. हे लक्षात घेता, देशात राहून देशाचे भले होण्यापेक्षा देशाच्या बाहेर जाऊन देशाचे जास्त भले होऊ शकते असा सर्वांचाच अनुभव आहे. त्याच उदाहरणाप्रमाणे शेतकऱ्यांनी शेती सोडल्यास, कदाचित, शेतीचे जास्त भले होण्याची शक्यता आहे अशी पवारसाहेबांच्या मनातील कल्पना असू शकते. या कल्पनेमागेही काही तथ्य आहे.

हिंदुस्थानातील जवळजवळ सर्वच शेतकरी हे केवळ त्यांच्या वाडवडिलांनी त्यांच्या डोक्यावर जमीन सोडली म्हणून बळजबरीने शेती कशीबशी ओढत आयुष्य कंठतात. दिवसेंदिवस शेतीचे स्वरूप बदलत गेले. घरचे बियाणे, घरची खतेमुते, घरची औषधे, गावातीलच औजारे हे संपून बाहेरची विकत घेतलेली बियाणी, विकत घेतलेली रासायनिक खते व औषधे, कारखानदारीतील यंत्रे यांची शेती आली. केवळ स्वावलंबनी शेती न राहता हिंदुस्थानच्या जनतेला अन्नधान्य, जळण यांचा पुरवठा व्हावा याकरिता शेती होऊ लागली आणि तरीदेखील, शेतकरी तोच राहिला.

आता नवीन जैविक बियाणी आली आहेत. केवळ देशाकरिता शेती करायची नाही तर जगामध्ये ज्या ज्या मालाचे उत्पादन आपला देश अधिक किफायतशीरपणे करू शकतो त्या त्या मालाचे उत्पादन करण्याचे आव्हान शेतकऱ्यांपुढे उभे राहिले आहे. त्याचबरोबर, जागतिक उष्णतामानाच्या वाढीमुळे हिंदुस्थानसारख्या उष्ण कटिबंधातील देशामध्ये अन्नधान्याचे उत्पादन किती

काळ चालू शकेल याबद्दलही शंका निर्माण झाली आहे. कदाचित, काही दशकांत अन्नधान्याचे उत्पादन हे केवळ मध्यम उष्णतामानाच्या प्रदेशात किंवा त्याहीपेक्षा सैबेरियासारख्या थंड प्रदेशातच होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये, हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना वाढत्या उष्णतामानाच्या संकटाला तोंड देण्याकरिता लागणारी वैज्ञानिक तयारी येथील शेतीशास्त्रज्ञ करू शकतील अशी काही लक्षणे दिसत नाहीत. 'अन्नधान्यावर प्रक्रिया होत नाही, होत नाही; प्रक्रिया झाली पाहिजे, शेतीउद्योग वाढले पाहिजेत' असे म्हणता म्हणता अर्धे शतक उलटले आणि वेळ अशी आली की, शेतीमालावर प्रक्रिया करून त्याची साठवणूक करण्याकरिता जे काही शीतकरणाचे तंत्रज्ञान आजपर्यंत उपलब्ध होते तेही आता कालबाह्य होऊ लागले आहे. यापुढे शेती व्हावी कशी? दुधाची क्रांती संकरित गाईंच्या आधाराने झाली आणि त्यामुळे मणिभाईंसारख्यांची खूप हवाही झाली; पण या संकरित गाई दोनचार अंशांनी उष्णतामान वाढले तरी टिकून राहत नाहीत; त्यांचे दुग्धोत्पादन थंडावते. अशा परिस्थितीत, जगाच्या वाढत्या उष्णतामानामुळे, दुधाच्या क्रांतीलाही मोठा अडथळा येणार आहे. तेव्हा आता शेतकऱ्यांनी करावे कसे याचे उत्तरही सरकारकडे नाही. त्यामुळे, हे उत्तर सापडेपर्यंत शेतकऱ्यांनी शेती सोडावी हे जास्त चांगले असाही सुज्ञपणाचा विचार साहेबांना सुचला असावा.

'शेतकऱ्यांनो, शेती सोडा' असे सांगताना शेतकी मंत्रालय बंद करा असे साहेबांनी सांगितले नाही. तसेच, आता शेतीशी संबंधित सहकारी संस्थाही बंद करा, सहकारी बँकाही बंद करा असाही सल्ला साहेबांनी दिलेला नाही. त्यातही एक मोठे धोरण आहे. शेतीत जरी काही निघत नसले तरीसुद्धा सहकाराच्या धंद्यामध्ये उदंड काही मिळते आणि त्यातूनच पुढाऱ्यांची पैदास होते हे साहेबांना चांगले ठाऊक आहे आणि सहकाराचे क्षेत्र जर कमजोर झाले तर मग आपल्या राजकारणाला महाराष्ट्रात स्थान राहणार नाही आणि आपल्यालाही सबंध देशात काही स्थान राहणार नाही याचीही साहेबांना चांगल्यापैकी जाणीव आहे. त्यामुळे साहजिकच एका बाजूला 'शेती सोडा' असा सल्ला शेतकऱ्यांना देताना सहकाराच्या पुनर्बांधणीकरिता आणि मजबुतीकरिता हजारो कोटी रुपयांची दौलत, दिल्ली खजिना लुटून, साहेब महाराष्ट्रात आणि इतर राज्यांमध्ये सहकारी संस्थांच्या मदतीकरिता वाहून आणत आहेत.

शेती सोडा आणि करा काय याचा सल्ला मात्र साहेबांनी अजून नेमका दिलेला नाही. त्यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारने मोठा गाजावाजा



करीत सर्वत्र राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना चालू केली आहे. सर्व शेतकऱ्यांनी आता यापुढे रोजगार हमीच्या कामावर जावे असे त्यांच्या मनात असले तरी तसे साहेबांनी बोलून दाखविलेले नाही. यापलीकडे, संपुआ सरकारचा 'भारत निर्माण'चा जो काही व्यापक आणि भव्य कार्यक्रम आहे त्या कार्यक्रमाचे काय होणार, शेतकऱ्यांनी शेती सोडली तर 'भारत निर्माण' कोणाकरिता करायचा याचाही खुलासा साहेबांच्या वचनात कोठेही येत नाही.

शेतकऱ्यांनी काय करावे हे सांगितले नाही, त्यापेक्षा 'शेती सोडा' हे सांगणे सोपे आहे; पण शेती बंद पडली किंवा बहुसंख्य शेतकऱ्यांनी शेती पिकविण्याचे बंद केले, विशेषत: अन्नधान्याच्या शेतकऱ्यांनी शेती पिकविणे बंद केले तर मग आम नागरिकांनी खायचे काय, ल्यायचे काय, चुलीत जाळायचे काय याचे उत्तर साहेबांनी द्यायचे टाळले आहे. त्याचे कारणही समजण्यासारखे आहे. कारण असो किंवा नसो, ग्राहकांच्या सोयीसाठी आयात करणे सरकारचे कर्तव्य आहे हे साहेबांनी अनेकवेळा निक्षून जाहीर केलेले आहे. तेव्हा, अन्नधान्याची आयाततर आपण करतोच आहोत; त्यापलीकडे, दुधाची, कापसाची, फळफळावळीची – सगळ्यासगळ्याची आयात करणे काही अशक्य नाही. अशा परिस्थितीमध्ये, हरित क्रांतीच्या आधी, अशोक मेहता यांनी अमेरिकेला भेट देऊन सगळ्या जगामध्ये अन्नधान्य किती स्वस्त आणि मुबलक उपलब्ध आहे हे पाहून हिंदुस्थानला आपल्या शेतीकडे काही काळ सद्बुद्धीने दुर्लक्ष (Benign neglect) केल्यास चालण्यासारखे आहे असे त्यांच्या अहवालात म्हटले होते. अशोक मेहतांनंतर साहेब हे दुसरे शहाणे! 'शेती सोडा' हे सांगणे काय आणि अशोक मेहतांच्या शब्दांत (Benign neglect) करा म्हणून सांगणे काय – दोघांचा तथ्यांश तोच.

शेतकऱ्यांना शेतीतून काढण्यात साहेबांचा खरा हेतू काय आहे? साहेबांच्या आसपासचे त्यांच्या पक्षातील लोक महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतींनी जमिनी ताब्यात घेत आहेत हे सर्वश्रुतच आहे. कोणत्या ना कोणत्या नियमाखाली जमिनी अडवायच्या, त्या अडलेल्या जमिनींचे भाव पडले की मग त्या जमिनी विकत घ्यायच्या आणि नंतर आपले सरकारी, राजकीय वजन वापरून त्या अडचणी व अडथळे दूर करून आपल्या जमिनींची किमत वाढवून घ्यायची हा 'भूखंड' उद्योग काँग्रेसचे लोक आणि, त्यातल्या त्यात साहेबांच्या पक्षाचे लोक फार मोठ्या प्रमाणावर केव्हापासून करीत आहेत. आता सगळ्या शेतकऱ्यांना 'शेती सोडा' म्हणून सांगितले म्हणजे साहजिकच शेतकऱ्यांच्या

मनात एक घबराट तयार होणार आणि चांगली पिकतीफळती शेतीची जमीन मिळेल त्या किमतीत विकून टाकायची त्यांची तयारी होणार. अशा तऱ्हेने शेती बंद झाल्याने मोकळी पडलेली जमीन मोठ्या प्रमाणावर आपण ताब्यात घेऊ शकू आणि आता आहे त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात, प्रत्येक जिल्ह्यात हजारो एकर जमीन आपल्या सहकाऱ्यांच्या मालकीची झाली किंवा त्यांच्या ताब्यात आली म्हणजे मग दिल्लीला राज्य कोण करतो आणि मुंबईला राज्य कोण करतो याला महत्त्व न राहता ही जमीनदारी कोणाकडे आहे यावरच शेवटी राजकारणाचे रंग ठरू लागतील.

'शेती सोडा' हे सांगण्यात साहेबांचा हेतू काय होता हे सांगणे खरोखर कठीण आहे. शेतकरी हा वाडवडिलार्जित जमीन मिळाल्यामुळे जबरदस्तीने शेतकरी झाला आहे. शेती परवडत नाही, कर्जबाजारीपणा येतो आणि त्यातून प्राण देण्याची वेळ येते. त्यामुळे, त्याला या शेतीच्या पाशातून सोडविल्यास आणि ज्या इतर कोणाला, जे शेतकरी घरात जन्मलेले नाहीत पण ज्यांना शेती करण्याची हौस आहे, आवड आहे, ज्यांच्या ठायी व्यवस्थापनाचे कौशल्य आहे, आजच्या शेतीच्या तंत्रज्ञानाची मोठी जाणकारी आहे आणि आवश्यक तेवढा भांडवलाचा पुरवठाही आहे अशी मंडळी शेतीत आल्यास हिंदुस्थानातील शेतकऱ्याची 'फाटके धोतर नेसलेला, कंगाल, निरक्षर, आजारी' अशी प्रतिमा न राहता आधुनिक शेतकरी हिंदुस्थानातील शेती राबवू शकेल हा भाग वेगळा; परंतु शेतकऱ्यांना 'शेती सोडा' असा सल्ला देताना अशी कल्पना साहेबांच्या मनात असेल असे काही दिसत नाही. तसे असते तर ते त्यांनी स्पष्टपणे सांगितले असते. त्यांच्या मांडणीमध्ये कोणती स्पष्टता असण्यापेक्षा गोंधळ अधिक आहे. त्यातून निष्पन्न काय व्हायचे ते होवो. एवढे मात्र नक्की की, सध्या विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे स्पेशल इकॉनॉमिक झोन आणि जमीन संपादनाच्या कचाट्यात आधीच सापडलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठी जखम होईल आणि त्या जखमेमुळे साहेबांच्या सहकाऱ्यांना जमिनी घशात घालणे अधिक सोपे होईल.

*(शेतकरी संघटक, २१ ऑगस्ट २००७)*

■



अठ्ठावीस

# शेतकऱ्यांच्या बंडाचे वादळ घोंगावते आहे

शेतकऱ्यांच्या असंतोषाचे ढग गोळा होऊ लागले आहेत आणि लवकरच ढगफुटी होऊन शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि अनेक वर्षे ते सोसत आलेला जुलूम त्यात वाहून जाणार आहेत. ज्यांचे डोळे उघडे आहेत त्यांना शेतकऱ्यांच्या या अपरिहार्य बंडाची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

जेव्हा सर्व लोक २००८ सालाचे स्वागत करीत होते त्यावेळी देशभरातील लाखभर शेतकरी हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा डाग अंगावर बाळगत अस्त पावणाऱ्या २००७ या घातवर्षाला अखेरचा निरोप देत होते. प्रतीकात्मक निरोप म्हणून त्यांनी आपली कर्जासंबंधी कागदपत्रे समुद्रात बुडवली आणि २००८ सालाचे स्वागत करताना नववर्षाच्या अखेरपर्यंत वर्षानुवर्षांच्या आपल्या कर्जबाजारीपणाचा अंत करण्याची प्रतिज्ञा केली. शेतकऱ्यांना आता मनोमन पटले आहे की त्यांच्यावरील कर्जे ही अनैतिक आणि बेकायदेशीरही आहेत; स्वातंत्र्योत्तर काळातील इंडिया सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळेच त्यांच्यावरील कर्जाचा बोजा वाढत गेला आहे.

३१ डिसेंबर २००७ रोजी देशातील शेतकरी संघटनांच्या अखिल भारतीय किसान समन्वय समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन देशभरातील शेतकरी स्त्री-पुरुष, अरबी समुद्र हिंदी महासागराला जेथे मिळतो, श्रीरामाने रावणावरील चढाई ज्या धनुष्कोडीपासून सुरू केली तेथून जवळच असलेल्या रामेश्वर येथे गोळा झाले आणि त्यांनी आपल्या कर्जासंबंधीचे कागदपत्र समुद्रात बुडविले आणि देशभरातील शेतकरी कर्जमुक्त झाल्याचे घोषित केले.

रामेश्वर येथे जमा झालेले शेतकरी, अनैतिक व बेकायदेशीर कर्जाविरुद्ध गेली पंचवीस वर्षे चाललेल्या लढ्यात सतत पराभव पत्करावा लागल्याने, हवालदिल झाले होते. पाव शतक त्यांनी त्यांच्याविरुद्ध केला जाणारा पक्षपात आणि त्यामुळे

त्यांची झालेली दुरावस्था देशासमोर व जगासमोर मांडण्याचा प्रयत्न अनेक मार्गांनी केला. दुर्दैवाने १९९५ पासून दीड लाख शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्यांनीही सर्वसमावेशक अर्थव्यवस्थेची शेखी मिरवणाऱ्या सरकारची सदसद्‌विवेक बुद्धी जागी झाली नाही.

शेवटी, ३१ डिसेंबर २००७ रोजी पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बुंदेलखंड, मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ या राज्यांतील हजारो हवालदिल शेतकरी प्रवासातील अनेक अडचणी, पोलिस आणि रेल्वे अधिकाऱ्यांकडून झालेला छळ सोसत रामेश्वर येथे पोहोचले, त्यांनी आपले कर्जासंबंधी दस्तावेज समुद्रात बुडवले आणि शेतकऱ्यांना अनैतिक व बेकायदेशीर कर्जाच्या बोजातून मुक्त करण्यासाठी १९८४ पासून सुरू केलेल्या वैध मार्गाच्या लढ्याचा त्यांनी शेवट केला.

शेतकऱ्यांनी केलेल्या या लढ्यातील ठळक टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांवरील कर्जाच्या बोजाच्या प्रश्नाला हात १९८४ सालच्या परभणी अधिवेशनातच घातला; कांदा, ऊस, दूध, भात अशा एकेका शेतीमालाच्या उत्पादनखर्चावर आधारित रास्त भावांच्या आंदोलनांच्या शृंखलांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा आणि दुःखाचा अंत होणार नाही. 'शेतकऱ्यांनी शेतात बियाणे कोणतेही पेरले तरी त्याच्या पदरी पीक येते ते सर्वदूर कर्जाचेच' हा सिद्धांत मांडला गेला; शेतकऱ्यांची सर्व कर्जे बेकायदेशीरच नव्हे तर अनैतिकही आहेत याचा कागदोपत्री सज्जड पुरावा देऊन 'कर कर्जा नहीं देंगे' अशी घोषणा देऊन १९८४ मध्येच शेतकऱ्यांची 'कर्जमुक्ती' वास्तवात आणण्याची घोषणा केली. पंजाबमधील शेतकऱ्यांनी १९८४ मध्येच चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या बेड्यांतून मुक्त होण्याची प्रतिज्ञा केली.

सर्वच शेतकऱ्यांना कर्जवसुली अधिकाऱ्यांच्या दडपशाहीस तोंड देता येत नाही. याशिवाय, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या राज्यांत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यातील कलम ४८ (अ) अन्वये शेतीमालाच्या विक्रीच्या रकमेतून परस्परच कर्जवसुली केली जाते हे लक्षात घेता 'कर्जा नहीं देंगे' या आंदोलनापलीकडे जाऊन शेतकरी संघटनेने न्यायालयीन लढाईची घोषणा १४ एप्रिल १९८८ रोजी जळगाव येथे भरविलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'संयुक्त जयंती मेळाव्या'त करण्यात आली. बुडित धंदा करणारे इतर व्यावसायिक न्यायालयात नादारीचे अर्ज भरून मोकळे होतात आणि पुन्हा दुसऱ्या उद्योगात उभे राहतात. त्याचप्रमाणे, शेती व्यावसायिकांनीही नादारी



अर्ज भरावेत आणि सरकारी धोरणामुळेच आमचा धंदा बुडित आहे असे सिद्ध करून घ्यावे असे आंदोलन सुरू करण्यात आले. शेतीमालाचा उत्पादनखर्च भरून निघावा इतकाही भाव शेतीमालाला मिळत नाही त्यामुळे प्रामाणिकपणे निव्वळ शेती करून कर्जफेड करणे अशक्य आहे, जे शेतकरी म्हणवणारे कर्जफेड करतात ते काही गैरमार्गाने हरामाची कमाई करीत असणार हे मनोमन पटलेल्या लक्षावधी शेतकऱ्यांनी 'मी कर्जबाजारी शेतकरी आहे याचा मला अभिमान आहे' असे ताठ मानेने म्हणत नादारी अर्ज भरले. त्यांच्या प्रकरणांनी सर्व जिल्हा न्यायालये तुडुंब भरून गेली. जिल्ह्याजिल्ह्यांत प्रकरणे उभी राहू लागली. ती मुंबई उच्च न्यायालयात गेली. शेवटी, सर्वोच्च न्यायालयाकडून 'नादारी अर्ज जोपर्यंत प्रलंबित आहेत तोपर्यंत कर्जवसुली करण्यात येऊ नये' असा निर्णय मिळविण्यात शेतकरी संघटनेला यश आले.

१९९० मध्ये विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान झाले. शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या फुले-आंबेडकर विचारयात्रेच्या समारोप समारंभात नागपूर येथे स्वत: पंतप्रधानांनी घोषणा केली की, 'सर्व शेतकरी कर्जमुक्त होतील. त्यांच्या कर्जाची रक्कम हजारो कोटीची असेल तर भारताच्या पंतप्रधानाच्या वचनाचीही काही किंमत आहे.' दुर्दैवाने, त्यांच्या आघाडी शासनाच्या राजकारणात हे वचन पुरे झाले नाही. विश्वनाथ प्रतापसिंग मागासवर्गीयांचे नवे महात्मा होण्याच्या नादी लागले; सर्व शेतकऱ्यांना कर्जातून सरसकट दहा हजार रुपयांची सूट तेवढी मिळाली. त्याच्याही अंमलबजावणीत बँकांचे अधिकारी, पदाधिकारी आणि पुढारी यांनीच आपले हात धुऊन घेतले आणि शेतकऱ्यांच्या तोंडास पाने पुसली.

१९९० मध्ये जागतिक व्यापार संस्थेसंबंधीच्या दस्तावेजातच, केंद्र सरकारने शेतकऱ्यांना अब्जावधी रुपयांना बुडविल्याचा सज्जड पुरावा हाती आला. 'सरकारने शेतकऱ्यांच्या प्रत्येक मालावर लादलेल्या उणे सबसिडीच्या कारणाने शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले' असे म्हटल्याने शेतकऱ्यांना फारसा अर्थबोध होत नाही. त्यामुळे, उणे सबसिडीचा प्रत्येक शेतकऱ्याच्या उत्पन्नावर किती परिणाम झाला याची आकडेवारी संगणकाच्या आधाराने काढून १९८४ ते १९९३ या दहा वर्षांच्या कालावधीतील त्याच्या नुकसानीचे प्रमाणपत्र त्याला देण्यात आले. ही प्रमाणपत्रे काही ठिकाणी न्यायालयात सादरही झाली; पण कोणत्याही न्यायालयाने शेतकरी संघटनेच्या जबाबदार व्यक्तींना साक्षीसाठी बोलावण्याची तसदी घेतली नाही.

श्री.शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखालील कृषी कार्यबलाने आपल्या

कार्यकालातील सखोल अभ्यासाअंती आपल्या अहवालात नोंदलेल्या निष्कर्षानुसार शेतीवर उणे सबसिडी लादण्याच्या सरकारच्या धोरणामुळे भारतीय शेतकऱ्यांचे २० वर्षांत तब्बल तीन लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्या तुलनेत शेतकऱ्यांकडील एकूण थकीत कर्ज अत्यल्प आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला. सर्वोच्च न्यायालयाने 'बँकांनी कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांकडील कर्जवसुली वर्षातून एकदाच करावी, त्यांना चक्रवाढ व्याज लावू नये आणि कोणत्याही परिस्थितीत कर्जाची रक्कम मूळ मुद्दलाच्या दुप्पटीपेक्षा अधिक होऊ नये' असा स्पष्ट आदेश देऊनही महाराष्ट्रातील सहकारी बँका सर्रास चक्रवाढ व्याज लावतात आणि मूळ मुद्दलाच्या दुपटीहून अधिक परतफेड केली असतानाही अल्पावधीतच शेतकऱ्यांवरील थकीत कर्जाची रक्कम मूळ मुद्दलाच्या पाच ते दहा पटींनी वाढते. याबद्दल जागोजाग आंदोलने झाली. बँकांकडून कर्जाचे हिशोब फक्त मागून घेऊन त्या आधारे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी चालू आहे.

जवळजवळ पाव शतक शेतकरी संघटनेचा हा 'कर्जमुक्ती'चा लढा चालू आहे. कर्जाच्या रावणाचे एकएक मुंडके कापले जात आहे आणि आता लवकरच, निवडणुकीतील लाभाकरिता का होईना, संपुआ सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या दिशेने काही ठोस पावले उचलील असे दिसत आहे. याची चाहूल लागल्याने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीला केवळ शाब्दिक पाठिंबा देणारे काही पक्षही, कर्जमुक्तीचा मंगलकलश आपणच आणला असे भासवण्याकरिता तिरीमिरीने उठले आहेत.

आपल्या कर्जबाजारीपणाच्या दीर्घकालीन व किचकट आजारावर उपाय शोधण्यासाठी शेतकऱ्यांनी काही वैध मार्ग चोखाळलेच नाहीत असे कोणाला म्हणता येणार नाही. आता सर्व वैध उपाय थकल्याची त्यांची भावना झाली आहे आणि तीच त्यांनी रामेश्वर येथे जगासमोर उघड केली.

केंद्र शासनाच्या येत्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमुक्तीची तरतूद करून शासनाने शेतकऱ्यांवरील अन्यायाचे परिमार्जन करण्याचे ठोस पाऊल उचलले नाही तर गोऱ्या इंग्रजांच्या राजवटीत उठलेल्या 'दख्खनच्या बंडा'सारखे वादळ उठण्याची मोठी शक्यता आहे.

*(शेतकरी संघटक, २१ जानेवारी २००८)*

■



एकोणतीस

# कर्जमाफी आणि सूट योजना फोडा आणि नष्ट करा

दरवर्षी, अर्थसंकल्प सादर झाला की पाठोपाठ त्या अर्थसंकल्पातील तरतुदींचा समाजातील कोणत्या घटकांना कसा कसा आणि किती कमीअधिक लाभ होईल याबाबत लोकानुरंजनी प्रतिक्रिया देणारी चर्चा सुरू होते. शेअर बाजारात हातचलाखी करून काहीही घडवता येऊ शकते अशा संशयामुळे शेअर बाजाराला हीन लेखले जाते; पण मग लोकप्रियतेचे प्रदर्शन करणारी निदर्शनेही घडवून आणता येतात. यावर्षी अर्थसंकल्प सादर होण्याच्या दिवशी दिल्लीतील '१० जनपथ'समोर काँग्रेस आणि संपुआच्या नेत्यांनी शेतकऱ्यांसारख्या दिसणाऱ्या लोकांची अशीच गर्दी जमा केली होती. ही गर्दी सोनिया गांधींचा जयजयकार करायला जमली होती की धिक्कार हे उचित समय होताच ठरणार होते. शेवटी ट्रॅक्टर-ट्रॉल्यांमधून आलेली ही मंडळी तरुण हुडांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस अध्यक्षांवर अभिनंदनाचा वर्षाव करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानाच्या आवारात घुसली.

पी. चिदंबरम् यांच्या कर्जमाफी आणि सूट योजनेच्या प्रथमदर्शनाने झालेल्या अत्यानंदात दोनतीन रात्री खुशीची गाजरे खाल्ल्यानंतर शेतकऱ्यांना आता अर्थमंत्र्यांनी केलेल्या खेळीची क्रूर आणि धूर्त बाजू समजू लागली आहे; ही खेळी शेतकरी समाजाचे भल्यापेक्षा नुकसानच अधिक करणार आहे.

**कर्जबाजारीपणाचे मूळ**

शेतकरी घेतलेली कर्जे परत फेडण्यास असमर्थ आहे याचे मूळ कारण शेती एकूणातच अकिफायतशीर असणे हे आहे हे आता सर्वमान्य झाले आहे आणि शेतीचा हा अकिफायतशीरपणा शेतीमालाच्या बाजारपेठेत सरकारने

वेगवेगळे निर्बंध लादून शेतकऱ्यांवर उणे सबसिडी लादण्यामुळे आला आहे याबद्दलही काही फारसा विवाद उरला नाही. शेतीवर सरकारने लादलेल्या या अकिफायतशीरपणामुळे शेतकऱ्यांना जे नुकसान सोसावे लागले आहे, ते सरकार शेतीनिविष्ठांवर जे काही अनुदान दिल्याच्या आव आणत असते त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. एका विश्वसनीय हिशोबानुसार १९८१ ते २००० या वीस वर्षांच्या कालावधीत शेतीमालांवरील उणे सबसिडीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान ३,००,००० कोटी रुपयांचे आहे. त्याउलट, राधाकृष्णन समितीच्या अहवालानुसार, शेतकऱ्यांचे एकूण थकीत कर्ज फक्त १,३०,००० कोटी रुपयांचे आणि निविष्ठांवरील अनुदानाच्या रूपात शेतीक्षेत्राला मिळणारी रक्कम केवळ ८०,००० कोटी रुपये आहे. देण्याघेण्याचा ताळेबंद काढायला गेले तर शेतकरी सरकारला काही देणे लागत नाही हे उघड आहे.

शेतकऱ्यांना कर्जातून संपूर्णपणे मुक्त करावे अशी मागणी करणाऱ्या शेतकरी संघटनांची भूमिका अशी आहे की शेतकऱ्यांवर दाखविली जाणारी कर्जे ही मुळातच अवैध आणि अनैतिक आहेत. ही कर्जे अवैध आहेत कारण कर्जकरारातील एक पक्ष असलेल्या सरकारनेच दुसऱ्या पक्षाच्या म्हणजे कर्जदार शेतकऱ्याच्या कामगिरीत बाधा आणली ज्यामुळे तो कर्जफेड करू शकत नाही. तेव्हा कायद्याने हा करारच बाद ठरतो. ही कर्जे अनैतिक आहेत कारण देण्याघेण्याचा ताळेबंद काढला तर शेतकरी सरकारचे काहीच देणे लागत नाही, उलट सरकारकडेच शेतकऱ्यांची बाकी निघते.

त्यामुळे, कर्जमाफी न्याय्य आणि नैतिक व्हायला हवी असेल तर ती संपूर्णच व्हायला हवी. कर्ज देणारे खासगी सावकार आहेत का बँका-पतपेढ्यांचे अधिकृत क्षेत्र आहे असा फरक करण्याला काही वाव नाही. त्याचप्रमाणे कर्जदार शेतकऱ्यांमध्येही फरक करण्याला काही वाव नाही. पाच एकरांपेक्षा कमी जमीन धारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना इतरांपासून वेगळे करणे हे राजकारणाच्या फायद्याचे असेल पण; अर्थशास्त्रदृष्ट्या शहाणपणाचे नाही. नजीकच्या भविष्यकाळात शेतीक्षेत्राला हानिकारक विपरित अर्थशास्त्र ठरेल. जमीनधारणा लहान असण्याला फारसे आर्थिक महत्त्व नाही. शेती हे जर का तोट्याचे कलम असेल तर तार्किकदृष्ट्या लहान जमीनधारकाचे नुकसान मोठ्या जमीनधारकाच्या नुकसानीपेक्षा निश्चितच कमी असेल. किंबहुना, लहान जमीनधारणेच्या बाबतीत उत्पादनखर्च तुलनेने कमी आणि शेतीमालाला मिळणाऱ्या किमती तुलनेने थोड्या अधिक असल्याचे पुरावे भरपूर सापडतील. देशाला



अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले ते मोठ्या जमीनधारकांनी, लहान जमीनधारकांनी नव्हे हेही विसरून चालणार नाही. उत्पादनातील बचत (surplus) निर्माण करणारा घटकच शेतकरी समाजातील निर्णायक घटक असतो. चिदंबरम् यांची कर्जमाफी आणि सूट योजना चार कोटी लहान शेतकऱ्यांनाच कर्जाच्या बोजातून सोडवणार असली आणि पुन्हा नव्याने कर्ज मिळविण्यास पात्र करीत असली तरी या लोकांचा अन्नसुरक्षिततेचा प्रश्न सोडविण्यातील सहभाग आणि तोही वातावरणबदलाच्या या युगात, अगदी नगण्य असेल.

त्याचप्रमाणे, खासगी सावकारांकडून घेतलेली कर्जे आणि वित्तसंस्थांच्या अधिकृत क्षेत्राकडून घेतलेली कर्जे यांच्यामध्ये सावत्रभेद करण्यालाही काही समर्थन असू शकत नाही; आजच्या धोरणांखाली शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा ही अटळ बाब आहे. शेतकरी बँकांकडून कर्ज घेतो आणि शेतीच्या उत्पादनातून ते फेडता येत नाही, ते फेडता आले नाही म्हणजे ते फेडण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतो. एखाद्या नशीबवान(!) सावकाराच्या बाबतीत उलटेही होते. त्यामुळे शेतकरी बँकेचे देणे लागतो का सावकाराचे देणे लागतो ही निव्वळ योगायोगाची बाब असते.

अल्प मुदतीची कर्जे आणि भांडवली खर्चासाठी घेतलेली दीर्घ मुदतीची कर्जे यांच्यात फरक करणे हेसुद्धा तेवढेच अन्याय्य आहे. अर्थमंत्र्यांनी त्यांची ही कर्जमाफीची योजना सर्व प्रकारच्या कर्जांना लागू होईल असे काही स्पष्टपणे म्हटलेले नाही; तरीही त्यांनी या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरण्यासाठी जे काही मापदंड सांगितले आहेत त्यावरूनतरी असे दिसते की दीर्घ मुदतीची कर्जे या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरणार नाहीत.

त्यामुळे, कर्जमाफीची ही योजना मांडताना शेतकरी समाजाचे तिहेरी विभाजन होईल असा कुशल प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. संपुआ सरकार मागासवर्गांमध्ये आरक्षणनीतीमुळे 'क्रीमी लेअर' तयार होतो हा सिद्धांत मानायला तयार नाही; पण जो शेतकरी वर्ग आज परिस्थितीने इतका अगतिक झाला आहे की अप्रतिष्ठेचे जिणे जगण्यापेक्षा त्याला मरण बरे वाटते, तो आत्महत्या करू लागतो. त्या समाजाला मात्र सरकार तोच सिद्धांत लावायचा प्रयत्न करते.

ही कर्जमाफी आणि सवलतीची योजना शेतकऱ्यांबद्दलच्या गंभीर चिंतेपोटी मांडली गेली आहे असा दावा अर्थमंत्र्यांची मित्रमंडळीही करणार नाहीत. तसे असते तर सर्वप्रथम अर्थमंत्र्यांनी शेतीमालाच्या बाजारयंत्रणेतील त्रुटी दूर

केल्या असत्या की ज्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा एकदा कर्जाच्या सापळ्याकडे जावे लागले नसते. घडले आहे ते नेमके याच्या उलटे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पाच्या दिवशी अर्थमंत्र्यांनी गहू आणि भात यांच्या वायदे बाजारावर बंदी घातली. नव्याने उभ्या राहणाऱ्या खुल्या बाजार यंत्रणेवर हा क्रूर घाला होता. या वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यांनी या यंत्रणेवर आणखी क्रूर घाव घातला आहे. त्यांनी शेतीमालांच्या वायदे बाजारावरील बंदी उठवली तर नाहीच, उलट वायदे बाजाराच्या उलाढालींवर कर लावला आहे. त्यामुळे वायदे बाजाराच्या विकासप्रक्रियेचे कंबरडेच मोडणार आहे. याच अर्थमंत्र्यांनी शेअरबाजाराबद्दल जी आस्था दाखवली त्याच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी वायदे बाजारावर कर लादण्याचे जे पाऊल उचलले आहे त्यामागील अधाशीपणा स्पष्ट होतो. परिवर्तनशील आणि तरंगत्या वायदे बाजारात शेतीमधील पतपुरवठा आणि गुंतवणूक यासंबंधी समस्या सोडविण्याची क्षमता आहे हे अर्थमंत्र्यांना ठाऊक नसेल असे नाही. वंशविच्छेदच वाटावा अशा दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांच्या रेट्यामुळेच, अर्थमंत्र्यांनी कर्जमाफी योजनेच्या रूपाने ज्या काही भावना व्यक्त केल्या तसे करणे भाग पडले. त्यांना काहीतरी करणे भागच होते. अर्थातच, त्यांनी शेवटच्या घटकेला घाईघाईत, शेतीकर्जासंबंधी सांख्यिकीचा काळजीपूर्वक आढावा न घेता एक 'पॅकेज' तयार केले. कर्जमाफीच्या ६०,००० कोटी रुपयांच्या दाव्यावर विविध क्षेत्रांतून अनेकांनी शंका व्यक्त केली आहे. विश्वनाथ प्रतापसिंगांच्या पंतप्रधानकीच्या काळातील १०,००० रुपयांच्या कर्जमाफीच्या वेळी बँकांनी आपली जबरी वसुलीची क्षमता वापरून आपली स्थिती सुधारून घेतली होती. राजकीय फायदा डोळ्यांसमोर ठेवून बँकांच्या त्या प्रवृत्तीला पोषक व्हावे या दृष्टीने हा आकडा फुगवला असावा असे दिसते.

त्यांचे मार्गदर्शक आणि पूर्वज अर्थमंत्री सध्याचे पंतप्रधान यांच्याप्रमाणेच अर्थतज्ज्ञ हे अत्यंत बिलंदर राजकारणीही असू शकतात हेच चिदंबरम् यांनी या कर्जमाफी योजनेच्या मार्गाने सिद्ध केले आहे. कर्जमाफीच्या या रणात जे जे पक्ष आणि संस्था त्याचे श्रेय लाटण्यासाठी उतरले त्या सर्वांच्या आशा अर्थमंत्र्यांनी एका फटक्यात धुळीस मिळवल्या. त्याचबरोबर, एवढ्या मोठ्या संख्येने होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर राजकीय स्पर्धक म्हणून पुढे येण्याची भीती असलेल्या अराजकीय शेतकरी चळवळीलाही शेतकऱ्यांमध्ये फूट पाडण्याच्या चालीने निष्क्रिय केले आहे.



२००८-०९चा अर्थसंकल्प आगामी निवडणुकांचा वेध घेणार आहे - वेगवेगळ्या समाजघटकांसाठी त्यात खैरात केली आहे या अर्थाने नव्हे, तर अर्थमंत्र्यांनी आपली कर्जमाफीची घोषणा करून सर्वच विरोधी पक्षांचा शेतकरी कळवळ्याचा दांभिकपणा प्रकाशात आणला आणि त्याचवेळी शेतकरी चळवळीमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्नही केला आहे. या अर्थाने हा अर्थसंकल्प येत्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मांडला गेला आहे.

*(शेतकरी संघटक, ६ मार्च २००८)*

■

तीस

# शेतकरी एकजुटीच्या निकडीचा काळ

श्री. श्रीरंगनाना मोरे यांच्या या अमृतमहोत्सव सत्कार समारंभात मला उपस्थित राहण्याची संधी दिली त्याबद्दल मी या समारंभाच्या सत्कार समितीचे आभार मानतो. आभार यासाठी की मी काल येथे आल्यापासून, शेतकरी संघटनेच्या कामात १९८० पासून ज्यांनी ज्यांनी सहभाग घेतला ती सगळी मंडळी, विशेषत: मराठवाड्यातील मला भेटत होती. एवढेच नव्हे, तर काही समजांमुळे किंवा गैरसमजांमुळे थोडी वेगळी झालेली मंडळीसुद्धा नानांच्या प्रेमामुळे, नानांच्या या कार्यक्रमामुळे येथे आवर्जून हजर आहेत त्यांचीही भेट झाली. या कार्यक्रमाला हजर असलेले हे सगळे नानांचे प्रेमी आहेत; आणि हजर राहणार म्हणून ज्यांची नावे चर्चेत होती त्यापैकी जे आलेले नाहीत ते बहुतेक माझ्यावरच्या रागामुळे आले नसावेत. माझ्यामध्ये इतर अनेक गुण आहेत, पण मी माणसे सांभाळणारा नाही असे बरेच लोक म्हणतात. हे खरे असावे. रामदास स्वामींनी संभाजी महाराजांना लिहिलेल्या एका पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या एका गुणाचा मोठा आवर्जून उल्लेख केला आहे. 'शिवरायांची सलगी देणे कैंचे असे!' श्रीरंगनानांनी एखाद्याला सलगी दिली म्हणजे तो जन्मभर त्यांचा मित्र आणि प्रेमी राहणार. माझ्या एका अध्यक्ष कार्यकर्त्याने मला एकदा सांगितले होते की, 'साहेब, तुम्ही आमच्यापैकी कोणाचंही कौतुक करीत जाऊ नका. तुम्ही कौतुक केलं म्हणजे ती माणसं बिघडतात.' हा 'सलगी' देण्याचा गुण मला जमला नाही आणि म्हणून कदाचित मला मानणारे बरेचसे लोक बाजूला बसले असण्याची शक्यता आहे.

हे खरे आहे की नानांच्या स्वागताध्यक्षपदाखाली १९८४ साली परभणीला जे अधिवेशन झाले त्या अधिवेशनाने शेतकरी संघटनेला 'रुमणेधारी शेतकऱ्यां'चे चिन्ह आणि छातीला लावायचा बिल्ला दिला. आजही माझ्या दिल्लीच्या



कार्यालयात त्या शेतकऱ्याची प्रतिकृती आहे आणि १९८४ साली छातीवर लावलेला बिल्ला रात्री झोपतानाही माझ्या छातीवर असतो. त्यामुळे, नानांची आठवण सतत मनात जागत असते, याबद्दल कोणी शंका घेण्याचे कारण नाही.

तरीसुद्धा या सत्कार समारंभाच्या सुरुवातीला मी, थोडेसे औचित्यभंग करण्यासारखे वागलो त्याबद्दल सर्वांची माफी मागून खुलासा करणे क्रमप्राप्त आहे. सुरुवातीला पुष्पहार, शाल-श्रीफळ देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्याचा कार्यक्रम होता. या सत्कारसमितीचे अध्यक्ष डॉ. शेषराव मोहिते यांना विनंती करून मला या कार्यक्रमातून वगळावे अशी विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. १९८४ साली परभणीला झालेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनात आपण पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा कार्यक्रम हाती घेतला. नंतर सगळ्या पक्षांनी त्याची नक्कल करायला सुरुवात केली; पण 'कर्जमुक्ती'ची खरी मांडणी पहिल्यांदा झाली ती शेतकरी संघटनेच्या परभणी अधिवेशनात. गेल्या वर्षी केंद्र सरकारने जी काही कर्जमाफीची योजना जाहीर केली ती फाटकीतुटकी, शेतकऱ्याशेतकऱ्यांत केवळ फूट पाडणारी, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हाती वाटाण्याच्या अक्षता ठेवून पुढाऱ्यांच्या बँकांची आणि सहकारी संस्थांचीच फक्त भर करणारी योजना पाहिल्यानंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने पुन्हा एकदा कर्जमुक्तीचे आंदोलन प्रखर करण्याचा निश्चय केला आणि जोपर्यंत हिंदुस्थानातील समग्र शेतकरी सर्व प्रकारच्या कर्जातून मुक्त होत नाही तोपर्यंत शेतकरी संघटनेच्या मंचावर कोणीही हारतुरे, शाल-श्रीफळांचा सत्कार स्वीकारणार नाही असा ठराव केला. ज्या अर्थी श्रीरंगनाना या मंचावर आहेत त्या अर्थी हा मंच, सत्कार समितीने उभा केला असला तरी तो शेतकरी संघटनेचाच मंच आहे असे मी मानतो आणि म्हणून मी सुरुवातीला हारतुऱ्यांचा सत्कार अव्हेरला.

मला नानांचेही आभार मानायचे आहेत, नानांनी या समारंभाला मान्यता दिली त्याबद्दल. त्यांनी जर 'हो' म्हटले नसते तर तुम्हा सर्वांना भेटण्याचा योग आला नसता. आज सकाळी माझ्या मनात आले की नानांचा अमृतमहोत्सव सत्कार करायला, खरे तर, सर्वांत योग्य जागा ज्या जागी पहिल्यांदा आमचे सूर खऱ्या अर्थी जुळले तीच असायला पाहिजे. म्हणून नानांना भेटण्यासाठी मी मोरेवाडीला नानांच्या वाड्यावर गेलो. नाना वाड्यावर नव्हते, ते त्यांच्या नव्या घरी बसलेले होते. मी त्यांना फोनवरून म्हटले की, ''ज्या देवडीमध्ये आपण पहिल्यांदा भेटलो, जेथे पहिल्यांदा शेतकरी संघटनेच्या सिद्धांताच्या

चर्चा झाल्या तेथेच मला तुम्हाला फूल देऊन तुमचा सत्कार करायचा आहे'' आणि नानांचा मोठेपणा म्हणजे ते त्यांच्याभोवती जमलेल्या प्रेमीजनांच्या गराड्यातून उठून आपल्या वाड्यावर त्वरेने आले आणि त्यांनी माझ्या भावनांची कदर केली. नानांनी जर का या सत्कार समारंभाला मान्यता दिली नसती तर या सगळ्याच अनुभवाला मुकावे लागले असते.

आजकाल दिवस असे आहेत की तालुक्याच्या, पंचायत समितीच्या किंवा जिल्ह्याच्या एखाद्या फडतूस कार्यकर्त्याचा ५१वा किंवा ५२वा जरी वाढदिवस असला तरी दूरदर्शनवर त्याच्या जाहिराती दिवसभरात पन्नास वेळा दाखवतात. हे दाखवणारे काही प्रेमाने दाखवतात अशीही काही गोष्ट नाही; ज्याचा सत्कार असतो त्यानेच, बहुधा, त्याच्या खर्चाची आणि जाहिराती देण्याची व्यवस्था केलेली असते. अशा या जाहिरातींच्या युगात नानांसारखा कार्यकर्ता फक्त शेतकरी संघटनेच्याच मुशीतून तयार होऊ शकतो. शेतकरी संघटनेच्या संपूर्ण इतिहासात कधी कोण्या कार्यकर्त्याची अशी जाहिरात दूरदर्शनवर कोणी दिली नाही आणि शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही अशा अपेक्षेने काम करीत नाहीत. नानांनी आपल्या भाषणात अत्यंत विनम्रपणे सांगितले की आम्ही काय फार मोठे काम केले असे आम्हाला खरोखरच वाटत नाही आणि त्याकरिता पाच पैसे खर्च करून त्याचे नगारे बडवणारी कोणी जाहिरात लावावी हे आमच्या धर्मात बसत नाही.

या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालकांनी सुरुवातीला मुद्दा काढला की नानांची शेतकरी-शेतमजूर संघटना आधी चालू झाली का शरद जोशींची शेतकरी संघटना आधी? हा काय वाद आहे? एव्हरेस्टवर पहिल्यांदा हिलरी गेला का तेनसिंग याबद्दल एखादवेळेस वाद होऊ शकतो; पण हा वाद सुदैवाने माझ्यामध्ये आणि नानांमध्ये कधी आला नाही. त्याचे स्पष्टीकरण अगदी साधे आहे. नानांचा हा सत्कार ज्या सभागृहात होत आहे त्याला ज्या मुकुंदराजांचे नाव दिले आहे त्या मुकुंदराजांनी ज्ञानेश्वरांच्या आधी २००-३०० वर्षे 'विवेकसिंधु' ग्रंथ लिहिला. भक्तिमार्गाचा खरा सिद्धांत मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु'च्या रूपाने जगासमोर पहिल्यांदा मांडला; पण विठोबाच्या दर्शनाला जाणाऱ्या सगळ्यांच्या तोंडी ज्ञानोबाचे नाव येते, तुकोबाचेही येते; मुकुंदराजाचे कधी येत नाही. काव्यामध्येसुद्धा 'ज्ञानदेवे रचिला पाया, कळस झळके वरि तुकयाचा' असेच वर्णन येते. मुकुंदराजांची उपेक्षा झाली हे खरे आहे. मराठवाड्यात इतरही अनेक मोठेमोठे साहित्यिक होऊन गेले; पण त्यांना मिळायला हवी



तशी मान्यता मिळाली नाही. मराठवाड्याचे हे दुर्दैवच आहे!

या निमित्ताने मला एक गोष्ट आठवते. जेरुसलेममध्ये ज्या दिवशी येशू ख्रिस्ताचा जन्म झाला तो दिवस नाताळचा सण म्हणून साजरा केला जातो. ज्या वेळी येशूचा जन्म झाला त्याच्या आधी आकाशामध्ये एक तेजस्वी तारा दिसला होता. त्यावेळी तो तारा पाहून येशूच्या आधी जन्माला आलेले जे पाच संत पुरुष होते त्यांना कळले की जेरुसलेम येथे परमेश्वराचा जन्म होणार आहे आणि ते सगळे तिकडे जायला निघाले. ते जेरुसलेमला पोहोचले आणि त्यांनी त्या नवीन बाळाचे कौतुक केले. या पाचही संतांची कथा ओल्ड टेस्टामेंट आणि न्यू टेस्टामेंट दोन्हीमध्येही लिहिलेली आहे. पण, एक सत्य त्यात आलेले नाही की सामिरतान नावाचा त्याच प्रकारचा एक संत त्याच वेळी हा पश्चिम युरोपातून जेरुसलेमला जायला निघाला होता. वाटेत घनदाट जंगलांचा प्रदेश, त्याच्याबरोबरचे यात्रेकरू पुढे निघून गेल्याने तो एकटा पडला, जंगलात काही लुटारूंनी त्याला पकडले, मारहाण केली, त्याचे कपडे वगैरे काढून घेतले आणि त्याला समुद्रकिनाऱ्यावर गुलामांचा व्यापार करणारांपैकी एकाला विकले. येशू ख्रिस्ताचा पहिला शिष्य बनण्यासाठी निघालेल्या या माणसाला गुलामांच्या त्या व्यापाऱ्याने बोटीत घालून आफ्रिकेला नेले. अनेक वर्षे चाबकाचे फटके खात गुलामगिरीच्या यातना सोसल्यानंतर त्याला एक दिवस संधी मिळाली आणि त्याने त्या गुलामांच्या व्यापाऱ्याच्या तावडीतून सुटका करून घेतली आणि पुन्हा जेरुसलेमची वाट धरली. पुन्हा अत्यंत कष्ट करत अखेरी तो जेरुसलेमला पोहोचला. त्याला आशा होती की ख्रिस्ताच्या जन्माच्या आधी आकाशातील तारा पाहून निघालो होतो त्या जन्मवेळी नाही जमले तरी त्या स्थळीतरी आता आपण जाऊन आता त्याचे दर्शन घेऊ; पण सामिरतान जेरुसलेमला पोहोचला त्या दिवशी येशू ख्रिस्ताला सुळावर दिले होते. सामिरतानच्या नशिबी सुळी दिलेल्या येशू ख्रिस्ताला सुळावरून उतरवण्याचे काम आले.

ज्ञानेश्वर मोठा का झाला आणि मुकुंदराज मागे का पडले हे प्रश्न कोणी विचारते का? असले प्रश्न त्यांच्या विचारांची दुकानदारी करणारांनाच पडतात.

एक काळ असा होता, एकोणीसशे सत्तर-ऐंशीच्या दशकाचा, की शेतकऱ्यांच्या लक्षात यायला लागले की, 'आता आपण अडाणी शेतकरी राहिलो नाही, जेथे दोनतीन क्विंटल पिकत होते तिथे आता वीसवीस, तीसतीस क्विंटल पिकवू लागलो आहोत; पण जितके जास्त पिकवावे तितकी कमी

मिळकत होते आहे, आपण अधिकच गाळात जात आहोत.' तेव्हा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सगळ्या हिंदुस्थानामध्ये शेतकरी आंदोलन वेगवेगळ्या ठिकाणी उभे राहू लागले. हे नवीन आंदोलन सुरू करण्याचे श्रेय कोणाला द्यायचे झालेच तर ते तामिळनाडूच्या नारायणस्वामी नायडूंना द्यावे लागेल; आजसुद्धा मी त्यांना माझे गुरू मानतो. महाराष्ट्रात कोणाला देणार? नानांनी 'भूमिसेवक' सुरू केले त्याच वेळी नागपूरच्या शरद पाटलांनी 'अन्नदाता' सुरू केले होते. आम्हीदेखील काही प्रयत्न करीत होतो. त्यापैकी कोणाच्या गळ्यात श्रेयाची माळ टाकावी या वादात काही अर्थ नाही. पुढे जाणाऱ्यांमध्ये कोणी पुढे जाण्याला आधी सुरुवात केली याबद्दल वाद असत नाही, पुढे जाणाऱ्यांमध्ये वाद निर्माण करू पाहणाऱ्या कुंठितांच्याच मनात असले प्रश्न तयार होतात.

मी आता नानांच्या वयाचा नसलो तरी सत्तरीच्या वर आलो आहे आणि मलाही आता नदीच्या पलीकडील दृश्ये दिसू लागली आहेत. तारुण्याच्या भरात पटले नव्हते पण मला आता वाटू लागले आहे की आपण प्रयत्न करतो हा एक भाग असतो, त्याला यश किती मिळावे हे ठरवणारी शक्ती वेगळी असते. नानांचा जन्म मराठवाड्यात अंबाजोगाईला शेतकऱ्याच्या घरात झाला, त्याऐवजी माझ्याप्रमाणेच मध्यमवर्गीय सुशिक्षित घरात झाला असता तर त्यांनाही माझ्यासारखा परिस्थितीचा फायदा मिळाला असता. मी मध्यमवर्गीय घरात जन्मल्यामुळे मला शिक्षणाची चांगली संधी मिळाली, मी परदेशात गेलो आणि त्या अनुभवाच्या जोरावर मी एकाच वेळी शेतकऱ्यांशी आणि पत्रकार, बुद्धिवादी यांच्याशीही संवाद साधू शकतो म्हणून माझे नाव पुढे राहिले; इतर कमतरता असूनही पुढे राहिले. संघटक म्हणून गुण द्यायचे झाले तर नानांना माझ्यापेक्षा दसपट गुण द्यावे लागतील. इतका त्यांचा जनसंपर्क आहे.

श्रीरंगनानांच्या अमृतमहोत्सव सत्काराच्या निमित्ताने सगळे लोक पुन्हा एकदा एकत्र आले. या निमित्ताने तुम्हा सर्वांना काय सांगावे? नानांच्या काळात शिबिर झाले आणि त्यावर आधारित, तुम्ही ज्याला शेतकऱ्यांची गीता म्हणता असे 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' हे पुस्तक तयार झाले; पण तो काळ आता संपत आला आहे. हे विसरू नका. कोणत्याही धर्माचा कितीही पवित्र ग्रंथ असो – बायबल असो, कुराण असो वा भगवद्‌गीता असो – जो असे धरून चालतो की हा ग्रंथ म्हणजे अखेरचा शब्द आहे, त्यापलीकडे काही नाही त्याचा विनाश जवळ आला आहे असे धरावे. ज्यांना



असे वाटते की, 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकात जे लिहिले आहे ते आपल्याला सगळे समजले आहे आणि त्याच्या आधारे आपण आता शेतकऱ्यांसमोर बोलू शकतो आणि जोपर्यंत शेतकऱ्यांच्या ८० सालच्या गीतेतले शब्द आपण बोलतो आहोत तोपर्यंत शेतकऱ्यांच्या टाळ्या आपल्याला पडणार आहेत आणि आपले कौतुक होणार आहे.' त्यांना मी एक धोक्याचा इशारा देऊ इच्छितो. 'काळ बदलला आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न बदलले आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही जर त्याच त्याच ऐंशी सालच्या घोषणा आणि भाषणे करू लागलात तर १९८० मध्ये शरद पवार जितके हास्यास्पद झाले तितकेच हास्यास्पद तुम्हीही झाल्याखेरीज राहणार नाही, हे निश्चित. काळ बदलला आहे आणि जोपर्यंत तुम्ही नवीन शेतीची भाषा, नवीन शेतीचे व्याकरण, नवीन शेतीचा शब्दकोश शिकत नाही, वाचत नाही, त्याच्या मदतीने शेतीच्या परिस्थितीचा अभ्यास करीत नाही तोपर्यंत तुम्ही शेतकऱ्यांच्या पुढारीपणाचा आव आणला तर येत्या काळात तुमच्याकडून शेतकऱ्यांचा घात होणार आहे. बदलत्या शेतीचा अभ्यास करून त्याची माहिती शेतकऱ्यांना देणे भलत्यासलत्याला पेलणारे धनुष्य नाही.

आपण १९८० मध्ये शेतकरी आंदोलनाला सुरुवात केली तेव्हा जागतिक हवामान बदल किंवा जागतिक तापमान वाढ हे शब्दसुद्धा कोणी ऐकले नव्हते. पंचवीस वर्षांनी महाराष्ट्रातील तापमान ४८ ते ५० अंशांपर्यंत चढेल आणि त्यामुळे आपली नेहमीची पिके घेता येणे शक्य होणार नाही हे १९८० साली आपल्याला माहीत नव्हते. शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे असे म्हणताना त्या काळी गणकयंत्राचे तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते; गणकयंत्राच्या साहाय्याने वायदेबाजारात उतरून आपल्या मालाची रास्त किमत घरबसल्या मिळवणेही त्या काळी शक्य नव्हते. शेतकऱ्यांविषयी मनात द्वेष बाळगणारे सरकार त्या वेळी होते आणि आजही आहे. पण, शेतकऱ्यांवर अन्याय करण्याची त्याची हत्यारे आता बदलली आहेत. आता कृषि उत्पन्न बाजार समितीत शेतकरीविरोधी कारस्थाने चालत नाहीत. आता नवीन परिस्थितीत सरकार वायदेबाजारावरच बंदी घालून शेतकऱ्यांना आपल्या हक्काचा भाव मिळू नये अशी तरतूद करते. शेतात पिकणाऱ्या सगळ्या हिरवळीतून शेतकरी इथेनॉलच्या म्हणजे 'शेततेला'च्या रूपातील इंधन तयार करू शकतो पण तसे स्वातंत्र्य शेतकऱ्याला मिळू नये असे धोरण आखते. शेतकऱ्याला लुटण्याची सरकारची ही नवीन साधने आहेत. या संबंधात ज्यांचा अभ्यास आहे, या

मुद्द्यांवर आपण चांगले बोलू शकतो अशी ज्यांना खात्री आहे त्यांनी त्यांचा त्यांचा आंदोलनाचा मार्ग चालू ठेवावा. त्यांनी माझ्याच सोबत आले पाहिजे असा काही माझा आग्रह नाही; पण तुमच्यापैकी कोणाच्या मनात असे असेल की शेतकरी संघटनेमध्ये तुम्हाला योग्य तो मान मिळाला नाही किंवा तुम्हाला सावत्रपणाची वागणूक दिली गेली तर श्रीरंगनानांच्या साक्षीने, मी कुटुंबप्रमुख म्हणून ती माझी चूक मानतो आणि तुमची माफी मागतो आणि परत या अशी हाक देतो.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पुढचे दिवस अत्यंत कठीण आहेत. शेतकऱ्यांमध्ये फूट पाडण्याची ही वेळ नाही. १९८९ मध्ये, आता दोन वर्षांत शेतकरी कर्जमुक्ती होऊ शकेल अशी शेतकरी आंदोलनाची ताकद तयार झाली होती त्या वेळी महेंद्रसिंह टिकेत यांनी हल्ला केला आणि शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवला. आज ते पाप तुम्ही करू नका, तुम्ही कोणत्याही पक्षात गेला असा किंवा नसा. शेतकरी संघटना जर शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची मागणी करीत असेल तर 'कर्जमुक्ती' आणि 'कर्जमाफी' या दोन शब्दातील भेदसुद्धा न समजता '२५००० पर्यंत कर्जमाफी द्या' म्हणणाऱ्या पक्षांसोबत एक दिवससुद्धा तुम्ही राहू नका.

श्रीरंगनानांनी मनामध्ये कोणत्याही प्रकारचा अहंकार न बाळगता त्यांची शेतकरी-शेतमजूर संघटना पिंपळगाव-बसवंतच्या १९८०च्या सभेत शेतकरी संघटनेत मिसळून टाकली, आपले नाव ठेवण्याचाही आग्रह त्यांनी धरला नाही. त्यांच्या साक्षीने मी तुम्हाला सांगू इच्छितो की, 'तुमच्या मनात प्रामाणिकपणे शेतकऱ्यांविषयी तळमळ असेल, केवळ अहंभाव नसेल' - दुसऱ्या कोणाचा हवाला घेऊ नका, तुमच्या आत्म्याला विचारा - केवळ काही रुसवेफुगवे झाले म्हणून दूर झाला असाल तर मी तुमची माफी मागितली आहे - तर शेतकऱ्यांमध्ये वेगळ्या चुली करू नका. कारण १९८० मध्ये शेतकऱ्यांवर जितकी कठीण परिस्थिती गुजरली होती त्याहीपेक्षा जास्त कठीण वेळ पुढील पाच वर्षांत येणार आहे. त्यासाठी, सगळ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन येणाऱ्या परिस्थितीचा सामना केला तरच शेतकरी जगू शकतो.

*(शेतकरी संघटक, ६ जानेवारी २००९)*

■



# ▪ सहकार ▪

## कापूस, दूध, साखर, पतसंस्था

एकतीस

# शेतकरी आणि सहकार

सहकारी संस्थांविषयी बोलताना काव्याचा वापर भरपूर केला जातो. 'विना सहकार नही उद्धार' अशा प्रकारच्या काव्यपंक्ती उद्धृत केल्या जातात. कोणा एका पुढाऱ्याने तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील सहकारी संस्था स्वत:च्या किंवा आपल्या पुठ्ठ्यातील लोकांच्या ताब्यात ठेवल्या तर त्याला सहकार महर्षीची पदवी प्राप्त होते. कोणत्या सहकारी संस्थेत कुणाला कसे निवडून आणावे हे एक शास्त्र आहे. या शास्त्रात पारंगत असलेल्यांना सहकारसम्राट म्हटले जाते.

खरे म्हटले तर सहकार ही कोणताही व्यवसाय चालविण्याची एक पद्धती आहे. कोणताही धंदा चालवायचा असला तर तो एकट्याचा खाजगी धंदा म्हणून चालवता येतो, भागीदारीत चालवता येतो, मर्यादित जबाबदारीची खाजगी कंपनी काढून करता येतो किंवा व्यवसाय जास्त व्यापक स्वरुपाचा असेल तर आणि भांडवलाची गरज जास्त असेल तर मर्यादित जबाबदारीची सार्वजनिक कंपनीसुद्धा काढली जाते. अशा कंपन्यांच्या प्रमुखांना उद्योगमहर्षी वगैरेसुद्धा फारसे म्हटले जात नाही. त्या कारखानदाराच्या साठाव्या, सत्तराव्या वाढदिवशी एखादा वक्ता कदाचित अशी विशेषणे वापरतो; पण ती कुणी फारशी गंभीरपणे घेत नाही आणि अमुक अमुक कारखानदार 'प्रायव्हेट लिमिटेड महर्षी' आहे किंवा 'पब्लिक लिमिटेड सम्राट' आहे अशीही भाषा कधी ऐकू येत नाही.

'सहकारी चळवळ' हा शब्दप्रयोगही असाच गमतीचा आहे. औद्योगिकीकरणाची चळवळ असू शकते, व्यापार वाढविण्याची चळवळ होऊ शकते; पण पब्लिक लिमिटेड कंपन्यांची चळवळ किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची चळवळ असली भाषा कधी ऐकू येत नाही. या संस्थांप्रमाणेच



एक संस्था जी सहकारी संस्था तिच्या नावाचे मात्र चळवळीचे बारसे होते.

या सहकारी संस्थांचे आणखी एक वैशिष्ट्य. शहरांमध्ये सहकारी संस्था नसतात असे नाही, काही किरकोळ बँका, काही ग्राहक सेवा संघ आणि प्रामुख्याने गृहनिर्माण संस्था सोडल्या तर शहरातील आर्थिक उलाढाली प्रामुख्याने खाजगी आणि सार्वजनिक कंपन्या चालवतात. धंदा छोटा असला तर तो खाजगीत किंवा भागीदारीत चालवतात; पण शहरी व्यवस्थेत सहकाराला स्थान कमीच.

याउलट ग्रामीण भागांतील जवळजवळ सर्व आर्थिक व्यवसाय हे सहकाराशी कोठेतरी जोडले गेले आहेत. गावांतील विविध सेवा सहकारी संस्था असो, खरेदी-विक्री संघ असो, कृषी उत्पन्न बाजार समिती असो, भूविकास बँक असो का दूध, हातमाग, साखर यासारख्या वस्तूंच्या उलाढाली करणाऱ्या संस्था असोत. गावागावातील किरकोळ वाणी आणि बलुतेदारांचे खाजगी व्यवसाय सोडले तर सगळीकडे सहकाराच्याच पाट्या दिसतात. थोडक्यात इंडियाचे व्यवहार सगळे कंपन्यांचे; पण भारतातील व्यवहार तेवढे सहकारी अशी फाळणी दिसते.

खाजगी किंवा सार्वजनिक कंपन्यांचे संचालक किंवा अध्यक्ष हे राजकारणात क्वचितच आढळायचे. ते बिचारे त्यांच्या कंपन्या चालवण्याच्या कामात गर्क राहतात; पण सहकारात मात्र असे नाही. सहकारात आहे आणि राजकारणात नाही असा महर्षी जवळ जवळ अशक्यच. किंबहुना राजकारणात घुसखोरी करता यावी यासाठी उमेदवारी करायचे क्षेत्र म्हणजे सहकार! यादृष्टीनेच होतकरू आणि पोहचलेली पुढारी मंडळी या क्षेत्राकडे पाहत असतात.

कोणताही व्यवसाय चालवण्याचा सहकार हा एक मार्ग किंवा पद्धती आहे असे म्हटले तर सहकार आणि कंपन्या यांच्यात हे जे फरक दिसताहेत ते का दिसावेत? मी सहकारसम्राटांना अनेकदा धारेवर धरतो. लोक मला विचारतात, ''तुम्ही सहकारी चळवळीच्या विरुद्ध आहात काय?'' मी सहकारी चळवळीच्या विरुद्ध नाही तसाच प्रा.लि. कंपन्यांच्याही विरुद्ध नाही आणि पब्लिक लिमिटेड कंपन्यांचेही काही मला प्रेम नाही.

परदेशात असताना मी एका फार मोठ्या सहकारी संस्थेचा सदस्य होतो. पदाधिकारी नव्हतो. केवळ कुतूहल म्हणून मी त्या संस्थेच्या कामकाजाचा अभ्यास केला होता. या संस्थेची एकट्या स्वित्झर्लंडमध्ये हजारो दुकाने होती आणि या सगळ्या दुकानांतून ग्राहकांना ज्या ज्या काही गोष्टींची गरज पडण्याची

शक्यता आहे त्या यच्चयावत गोष्टी अगदी रास्त भावात आणि चांगल्या प्रतीच्या मिळू शकतात. या वस्तू खरिदण्याकरिता संस्थेची जगभर जवळजवळ सगळ्या देशांत केंद्रे आहेत. साधा शेंगदाणा तो काय पण ग्राहकाला विविध प्रकारचा शेंगदाणा मिळाला पाहिजे, तो स्वस्तात मिळाला पाहिजे आणि त्याबरोबर न चुकता मिळाला पाहिजे. याकरिता उत्पादकालाही काही उत्साहवर्धक उत्तेजन मिळाले पाहिजे या दृष्टीने त्यांचे व्यवहार चालतात. शेंगदाणा खरेदीचे ते जे व्यवहार आज करत आहेत तो शेंगदाणा एकोणनव्वद साली स्वीस दुकानांत येईल. शेंगदाणा खरेदीचे काम बघणाऱ्या तिथल्या माणसाला चाकण आणि मंचर इथल्या शेंगदाण्यांचे वैशिष्ट्य तोंडपाठ माहीत होते. दर वर्षाच्या शेवटी ग्राहक म्हणून जितकी खरेदी करेल त्या रकमेवर मला बारा ते वीस टक्के डिव्हिडंड मिळत असे; पण एवढ्या जगड्व्याळ सहकारी संघटनेचे महर्षी किंवा सम्राट म्हणून कुणाचा बोलबाला मी कधी ऐकला नाही. एवढेच नव्हे तर या संस्थेचे पदाधिकारी बनण्याकरिता लक्षावधींची उधळमाधळ झाली असे कधी कानावर आले नाही. निवडणुका जिंकण्यासाठी प्रतिस्पर्ध्यांच्या पाठीराख्यांना पळवून नेण्यात आले असे कधी घडले नाही किंवा ज्यात माल ठेवायचा त्या बारदानांच्या कमिशनवर कुणी सहकारमहर्षी कोट्यधीश बनला हे तर असंभवच.

सहकारी चळवळींचा उदोउदो करणारे पुढारी अनेकदा इतर देशांतील सहकारी चळवळींचे उदाहरण देतात; पण ज्या सहकारी चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख होतो त्या युरोपातील सहकारी पद्धतीचा आणि आपल्या देशातील सहकारी पद्धतीचा काहीही संबंध नाही. आपल्या देशात तयार झालेली पद्धत हे काही एक विचित्रच जनावर आहे. कित्येक वर्षे या सहकारी चळवळीने अपयशाखेरीज काहीच मिळविले नाही आणि तरीही एखादे धनंजयराव गाडगीळ मधूनच 'सहकार अयशस्वी झाला आहे; पण सहकार यशस्वी झालाच पाहिजे' अशा घोषणा देतात.

सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध सोसायट्या यांच्यामुळे गावोगावी रोजगार तयार झाले, डांबरी सडका झाल्या, विजेचे दिवे आले, मोटारसायकली, जीपगाड्या इकडे तिकडे फिरताना दिसू लागल्या, काही कारखान्यांच्या परिसरांत नमुनेदार गुलाबांच्या बागा उभ्या राहिल्या तर काही ठिकाणी कारखान्यांना जोडून वाद्यवृंद तयार झाले. तांत्रिक शाळा तयार झाल्या याचाच डिण्डिम अनेक सहकार महर्षी वाजवताना दिसतात; पण बैल घेतला तो औताची कामे करायला. औताला जुंपला की बैल बसत असेल तर त्याच्या रंगाच्या आणि



रूपाच्या वर्णनाने काय साध्य होणार?

सहकारी संस्था चालल्यामुळे असा काही संपन्नतेचा देखावा जागोजागी तयार झाला हे खरे. काही सहकारसम्राट कोट्यवधींची माया जमवून बसले हेही खरे. काही जणांनी त्यातून राजकारण साधले आणि पार दिल्लीपर्यंत जाऊन पोचले हेही खरे पण ज्या हेतूने सहकारी संस्था सुरू करण्यात आल्या तो हेतू कुठेच सफल झाला नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांची, शेतमजुरांची गरिबी दूर करण्यात सहकारी चळवळीचे अपयश भयानक आहे. सहकारी चळवळीने ग्रामीण भागातील गरिबी दूर केली नाही. एवढेच नव्हे तर ग्रामीण भागाच्या शोषणाला सहकारी चळवळीने हातभार लावला आणि सहकारातून तयार झालेल्या नेतृत्वाने दिल्लीत शिजणाऱ्या शेतकरीविरोधी धोरणाचा चुकूनसुद्धा कधी विरोध केला नाही.

सहकारी चळवळीतील श्रेयाचा तोरा मिरवणाऱ्यांना सहकारी चळवळीच्या अपयशाची जबाबदारी स्वीकारावी लागेल. आयुष्यभर सहकारात घालवून शेतकऱ्यांना बुडवणाऱ्यांच्या हातात हात घालून राजकारण केल्यानंतर जर एखाद्या सहकार महर्षीला जाणीव झाली की देवाच्या आळंदीऐवजी तो चोरांच्या आळंदीला येऊन पोचला आहे, तर शेतकऱ्यांच्या सेवेकरता उतरताना शेतकऱ्यांच्या रक्ताने भरलेली मानवस्त्रे दूर फेकून देण्याची आणि स्वच्छ होऊन शेतकऱ्यांच्या पुढे येण्याची त्याची हिंमत असली पाहिजे.

## १. विविध सेवा सहकारी पतपेढी (सोसायट्या)

सहकारी संस्थांचे सर्व शेतकऱ्यांना माहीत असलेले स्वरूप म्हणजे ज्याच्या त्याच्या गावची विविध सेवा सहकारी पतपेढी. एवढे जडबंबाळ नाव घेण्याऐवजी सगळेजण त्याला नुसतेच सोसायटी म्हणतात.

गावातला कोणी शेतकरी सोसायटीचा चेअरमन झाला की काही दिवसांत त्याची तालुका पातळीवरील पुढाऱ्यांकडे, आमदारांकडे, बँकेत ये-जा चालू होते. टोपी अधिकाधिक टोकदार बनत जाते. कपडे दिवसेंदिवस कडक इस्त्रीचे आणि झगझगीत पांढरे बनत जातात.

सोसायटीचा सेक्रेटरी हा पगारदार माणूस असतो. तालुक्याच्या बँकेच्या चेअरमनकडून त्याची नेमणूक होत असते. लागेबांधे असल्याखेरीज सेक्रेटरीची जागा मिळूच शकत नाही. ओळख फार जवळची नसेल तर पाचदहा हजारांवर

पाणी सोडूनही जागा मिळवावी लागते. त्यामुळे सेक्रेटरी आपली नोकरी अक्षरश: आपल्या काकाची आहे किंवा आपण ती विकत घेतली आहे आणि आता आपल्याला कमाई करण्याचा पुरा अधिकारच आहे अशा थाटात तो मोगलाईच्या मनसबदाराच्या तोऱ्यात वागत असतो.

शेतकऱ्यांना पीककर्जाची परतफेड तर करता येत नाही आणि नवे कर्ज तर हवे असते. समजा गेल्या वर्षीचे कर्ज आणि व्याज मिळून थकबाकी दीडहजाराची आहे. या कर्जाची परतफेड झाल्याखेरीज नवे कर्ज तर मिळूच शकत नाही. त्या पलीकडे सगळ्या सोसायटीची मिळून काही किमान वसुली झाली नाही तर कर्जवाटपच तहकुब होऊन जाते. सोसयटीला कर्जवाटपाचा अधिकार मिळावा म्हणून आणि नंतर प्रत्येक सदस्याला व्यक्तीश: पीक कर्ज मिळावे म्हणून परतफेडीची घाईगर्दी उडते. खरे म्हणजे हा फक्त कागदी घोडे नाचवण्याचा प्रश्न असतो. म्हणजे जुने कर्ज परत झाले असे कागदोपत्री दाखवायचे आणि नवे कर्ज दिले असे दाखवायचे. नव्या आणि जुन्या कर्जाच्या रकमांतील फरकाची काय ती प्रत्यक्ष देवघेव व्हायची.

पण प्रत्यक्षात व्यवहार खूपच विचित्र असतो. परतफेडीचा दाखला तालुक्याला जावा लागतो. तालुक्याचा दाखला जिल्ह्याला जावा लागतो आणि शेवटी राज्य बँकेकडून मंजुरी आल्यानंतर कर्जवाटपाला सुरूवात होते. ही अशी व्यवस्था म्हणजे सगळ्या सेक्रेटरीना सुवर्णसंधीच असते. याचा प्रमुख उद्देश म्हणजे खाजगी सावकारीच होते. परतफेड करू न शकणारे शेतकरी गरजू. त्यांच्यावर दटावणी धाकदपटशाचा प्रयोग पहिल्यांदा होतो. शेतकरी ऐकून घेतात. काय करतील, आधीच ओशाळवाणे झालेले असतात. त्यात हा बाबा मनात आणलं तर जीप पाठवून घरातली भांडीकुंडीसुद्धा उचलून आणायचा. चारचौघांत बेअब्रू करायचा ही धास्ती असतेच. मग शेतकरी स्वत:च ''सेक्रेटरीसाहेब काहीतरी सोय कराच आमची.'' अशी गळ घालू लागतात. मग सेक्रेटरी साहेब काही नवीच कल्पना सुचल्याचा अभिनय करतात आणि शेतकऱ्यांपुढे प्रस्ताव मांडतात. ''बघा, हे काही माझं काम नाही. हा काही माझा धंदा नाही. मी काही सावकारी करत नाही; पण तुम्ही अगदीच अडला आहात तर एका ओळखीच्या माणसाकडून तुमची पैशाची तात्पुरती सोय करता येईल. बघा पाहिजे असेल तर पण व्याज द्यावं लागेल.'' शेतकरी नाही म्हणून सांगतो कोणाला? पठाणाच्या व्याजालाही लाजवणाऱ्या दराने तो कर्ज घेतो. म्हणजे त्याचे जुने कर्ज फिटले असे सोसायटीच्या वह्यात दाखविले जाते. सावकाराच्या



ऐवजी सहकारी पतपुरवठ्याची व्यवस्था आल्याने, सावकारी संपली असे नाही. फारतर भूमिगत झाली. सोसायटीची ज्यांच्यावर जबाबदारी तीच मंडळी संस्थेच्या छपराखाली बसूनच ही नवी सावकारी चालवायला लागली. नवीन भांडवलाची, पठाणी व्याजाची आणि परतफेडीची हमी असलेली सावकारी.

याखेरीज सोसायटीच्या सेक्रेटरींना हात मारायला आणखी एक सुवर्ण संधी मिळते. पिककर्जापैकी एक भाग पैशाच्या रूपाने देण्याऐवजी वस्तुरूपाने दिला जातो. कर्जाची सगळी रक्कम रोख दिली तर शेतकरी ते पैसे बिडी-काडी, नाच- गाण्यात किंवा बाराव्या-तेराव्याला खर्चून टाकील अशी शासनाला मोठी धास्ती वाटत असते. म्हणून काही भाग मुख्यत: खताच्या किंवा प्रसंगी बियाण्याच्या रूपामध्ये दिला जातो; पण अशाने काय प्रश्न सुटणार आहे? शेतकऱ्याची घरची आणि शेतीची परिस्थितीच अशी की आजची निकड तर उद्यावर ढकलता येत नाही. सल्फेट टाकले तर उद्या जास्त चांगले पीक येईल हे खरे; पण आज पोटात घास तर जायला पाहिजे. औषधपाणी तर व्हायला पाहिजे, मग शेतकरी सोसायटीतून खताची चिठ्ठी घेऊन निघतो न् खताच्या दुकानदाराकडे येतो. बहुधा तर दुकानदारच त्याला विचारतो ''खत घेणार का पैसे?'' खत घेणारे शेतकरी विरळाच. कर्जापैकी पाचशे रुपयांचे खत सोसायटीने प्रत्यक्ष वस्तुरूपात द्यायचे ठरविले तर दुकानदार शेतकऱ्याच्या हातात रोख चारशे रुपयेच टिकवतो. याच शेतीवर, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावर काय परिणाम होत असेल ते उघड आहे; पण दुकानदारांची चंगळ होते आणि कोणत्या दुकानदारांच्या नावाने चिठ्ठी द्यायची हे सेक्रेटरीच्या हाती असल्यामुळे ज्याला त्याला 'बोफोर्स' घेण्याचा अधिकार आहेच. त्यामुळे सोसायटीचा सेक्रेटरी हा एक मालदार आणि गब्बर आसामी झाला आहे. पुढाऱ्यांशी नातेसंबंध आणि दोन पैसे जवळ असणे यामुळे त्याचे महत्त्व जबरदस्त असते. कोणतीही निवडणूक असो सेक्रेटरीची फौजच्या फौज ग्रामसेवक इ. कर्मचाऱ्यांबरोबर राज्यकर्त्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराकरीता धावपळ करीत असते.

सेक्रेटरीच्या कमाईत चेअरमनचा हिस्सा असणारच; पण याखेरीज बँका, बाजार समित्या, असल्या निवडणुका आल्या की चेअरमन लोकांची चंगळ चालू होते. प्रत्येक गावच्या सोसायटीला मत असते. हे मत कोणाला द्यायचे या बद्दल सहसा गावच्या सोसायटीचा ठराव होत नाही. याबद्दल ठराव झाला तरी तो पाळला जाण्याची शक्यता काहीच नाही. सोसायट्याच्या ठरावान्वये

सर्वसाधारणपणे चेअरमनलाच मतदान करण्याचा पूर्ण अधिकार दिला जातो. मग काय विचारता? काही दिवस सगळी मौज आणि मजाच. सगळ्या चेअरमनांना आरामगाडीने यात्रेला नेणे, थंड हवेच्या ठिकाणी नेणे, मोठ्या शहरांत नेणे आणि मांस, मटणापासून ते सगळ्याच वरच्या गरजा निवडणुकीच्या दिवसापर्यंत यथासांग पुर्ण करण्याची जबाबदारी निवडणुकीतील उमेदवारच उचलतात. हे ज्याला जमते त्यांनाच सहकारमहर्षी म्हणतात.

गावातील वि.का.स.सेवा सोसायटीचे शेतकऱ्याला दिसणारे वास्तव रूप हे असे आहे. चेअरमनची चंगळ झाली आणि सेक्रेटरी गब्बर झाला याचे शेतकऱ्यांना फारसे सोयरसुतक नसते. भाग्यवान माणसांची बोटे तुपातच असायची. कधीकाळ आपल्यालाही अशी संधी मिळाली तर भरपेट मजा येईल असा थोडा वाटला तर मत्सरच; पण या संस्था चालविणाऱ्या माणसांना आणि त्यातून महर्षी किंवा सम्राट बनलेल्या पुढाऱ्यांचे एवढ्याने भागत नाही. मालामाल होऊन त्यांची भूक भागत नाही. शेतकऱ्यांचे सलाम घेवून त्यांची तहान भागत नाही. राजकारणातल्या खुर्च्या आणि सत्ता बळकावून त्यांची महत्त्वाकांक्षा संपत नाही. त्यांना आणखी वर आपण संत महात्मे आहोत, शेतकऱ्यांच्या आणि गरिबांच्या भल्याकरिता आपण देह झीजवित आहोत अस दंभही मिरवायचा असतो.

या सहकारमहर्षींनी पत पुरवठ्याच्या व्यवस्थेत काय काय मिळविले? किंवा शेतकऱ्यांचे काय भले केले याचा खरोखरच विचार केला तर उत्तर अगदीच निराशाजनक आहे. वि.का.से.स. सोसायटी या नावावरूनच ही काही केवळ पीककर्ज वाटपाची संस्था नाही हे स्पष्ट आहे. तिने विविध प्रकारच्या सेवा शेतकऱ्यांना द्यायच्या आहेत. मूळ तरतुदीप्रमाणे सोसयटीने शेतकऱ्यांना काटकसरीची सवय लावावी व त्यांनी केलेली बचत ठेवीच्या रूपाने स्विकारून राष्ट्रीय गुंतवणुकीत शेतकऱ्यांचा हिस्सा ठेवावा अशी मोठी रोमांचकारी कल्पना मूळ जनकाच्या मनात होती; पण शेतकऱ्यांना दातावर मारायला टिकली नाही तेथे त्यांनी ठेव ठेवायची कसली? जुन्या सावकाराच्या जागी सोसायटी आल्याने काय फरक पडला याचा खरोखरच विचार करण्यासारखा आहे. सावकाराच्या घरी अर्ध्यारात्री गेलं तरी कर्ज मिळू शकत असे आता कर्ज अर्ज केल्यापासून अनेकांच्या मर्जीप्रमाणे जे मिळते ते शेतकऱ्यांची गरज संपल्यानंतरच. कर्ज देण्यापूर्वी सावकार कपाती करायचा– तिजोरी उघडायची की, वही उघडायची की, लक्ष्मीपूजेची दक्षिणा, आणि इतर पन्नास. आजही वेगळ्या



नावांनी कपाती होतच आहेत. सावकारांचा व्याजाचा दर जास्त असे कारण त्यांच्या कर्जाला संरक्षणच नव्हते. कर्जबुडव्यांचे प्रमाण मोठे; पण सोसायटीची कर्जे बुडण्याचा धोका काहीच नाही. अगदीच बुडायला आली तर एखादा अंतुले सोसायट्यांचा उद्धार करण्याकरीता कर्जमाफी घेऊन येतोच आणि तरीदेखील सोसायट्यांचे व्याजाचे दर आजही सावकारी व्याजापेक्षा वरचढच आहे.

सावकार म्हणजे घरादारांवर टाच आणणारा, जमिनीची जप्ती करणारा, पोराबाळांना देशोधडी लावणारा, पिके उचलून नेणारा असे चित्र साहित्यात चितारलेले असते. सहकारी सोसायट्या यापेक्षा काही वेगळ्या नाहीत. शेतकऱ्यावर टाच आणायला, जमिनीवर जप्ती आणायला सावकाराला निदान कोर्टात जावे लागे, कोर्ट सावकारांना अनुकूल असले तरी हुकूम काही कोणाच्याही कोर्टात चार–आठ दिवसांत होत नाही. त्याला वेळ लागतो. दगदग करावी लागते आणि खर्च येतो. सोसायटीला असल्या अडचणी नाहीत. केव्हाही, कधीही हुकूम काढावा, शेतकऱ्यांच्या घरची भांडीकुंडी, एक ट्रान्झिस्टर आणि अगदी बेगमीचे धान्यसुद्धा उचलून आणावे. सावकारांचा जुलूम आता टगे चेअरमन चालवितात.

सावकारात आणि सोसायटीत आणखी एक फरक आहे. सावकार कर्जाचा तगादा लावायचा. त्यामुळे शेतकऱ्याला पीक उभे राहता राहताच बाजारात तरी न्यावे लागे किंवा सावकारालाच नेऊन घालावे लागे. सोसायटी काही धान्याच्या रूपाने कर्जाची परतफेड स्वीकारित नाही, म्हणजे शेतकऱ्याला बाजारात जाणे भाग. सगळे शेतकरी एकावेळी माल घेऊन बाजारात आले की भाव कोसळलेच. शेतकऱ्यांकडून लुबाडलेले धान्यधुन्य गावातला सावकार घरच्या कोठारात ठेवायचा आणि जेव्हा त्याला सोयीस्कर असेल म्हणजे जेव्हा भाव चढते असतील तेव्हाच बाजारात नेऊन विकायचा, म्हणजे शेतकऱ्याच्या लुटीत हात घालण्याचा फायदा शहरी माणसांना फारसा मिळायचा नाही. सगळे लोणी गावातला सावकार खायचा. सोसायटी आल्यापासून हे लोणी सगळेच्या सगळे शहरातील लोकांना खायला मिळायला लागले. हा एवढा मात्र फरक झाला. सोसायटीचेच कशाला. दूध, साखर, कापूस वेगवेगळ्या क्षेत्रांतील सहकारी चळवळीचे रहस्य सार्थपणे कशात दिसत असेल तर आधीच दारिद्र्याने पिचलेल्या खेड्यांतून आणखी एक नळी खुपसून शहरांना आणखी मालेमाल करणे यात.

जोपर्यंत शेती हा तोट्यात चालणारा व्यवसाय आहे तोपर्यंत पतपुरवठा सावकारी असो, सहकारी असो की सरकारी असो, शेतकरी मरायचा वाचू शकत नाही. सहकारी ग्रामीण पतपुरवठ्यावर ढिगांनी अहवाल झाले; पण शेती धंद्याच्या आजच्या परिस्थितीत कोणतेही कर्ज परत फेडण्याची ताकद शेती व्यवसायात आहे किंवा नाही याचा विचार कोणत्याच विद्वानाने केला नाही. शेती कर्जपात्र आहे किंवा नाही एवढा एक प्रश्न सोडून सगळ्या काही प्रकांडपंडिती चर्चा झाल्या.

सरकारने कर्ज द्यायचे आणि सरकारनेच शेती बुडवायची असा हा खेळ चालू आहे. शेतकरी बुडला तर पाहिजे पण खलास तर व्हायला नको. उद्यासुद्धा शेती पिकवायला जिवंत राहिला पाहिजे, त्याने शेती पिकविली पाहिजे आणि पीक उभे राहताच धावत जाऊन बाजारात त्याचा लिलाव मांडला पाहिजे. ही या व्यवस्थेची गरज आहे. हे ज्याला समजले नाही तो वेडाखुळाच पतपुरवठ्याच्या सहकारी संस्था काढून शेतकऱ्यांचे भले होऊ शकते असा वेडगळ कांगावा करू शकेल.

सहकारातले आपण कोणी महाज्ञानी आहोत, आपल्याला काय ते सगळे समजते असा आव कोणी कितीही आणो, कोणी त्यांच्यावर टीका केली तर त्यांच्या ज्ञानाबद्दल हे सहकारसम्राट भली शंका घेवोत; सत्य हे आहे की अगदी सरकारी कागदोपत्री सरकारी अहवालांच्या आणि आकडेवारीच्या आधारानेच सहकारी पतपुरवठ्याच्या व्यवस्थेची दिवाळखोरी स्वयंसिद्ध आहे.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण पतपुरवठ्यासाठी अनेक यंत्रणा रचल्या गेल्या. इंपिरियल बँकेची स्टेट बँक झाली. सोसायट्या वाढल्या. तालुका, जिल्हा बँका आल्या, प्रादेशिक बँका आल्या, खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. त्यांच्यावर ग्रामीण कर्जे वाढविण्याची सक्ती झाली. नाबार्डसारख्या पंचतारांकित संस्था झाल्या आणि तरीदेखील तेवढे करून ग्रामीण पतपुरवठ्याच्या व्यवस्थेची प्रगती काय झाली? हे पाहण्यासारखे आहे.

एक्कावन्न साली देशात एक लाख पाच हजार सोसायट्या होत्या. पंडित नेहरूंच्या काळात असल्या कामाची खूप भरभराट झाली. सोसायट्यांची संख्या दुप्पट झाली म्हणजे दोन लक्ष बारा हजारावर गेली. यानंतर सोसायट्या बंद पडायला सुरुवात झाली एकाहत्तर मध्ये. त्र्याऐंशी साली सोसायट्यांची संख्या फक्त चौऱ्याण्णव हजार राहिली. म्हणजे त्र्यांशीपेक्षा संस्थांची संख्या एक्कावन्न सालापेक्षासुद्धा कमी होती. पीक कर्ज मात्र झपाट्याने वाढले. एक्कावन्न



मध्ये शेतकऱ्यांना सोसायटीने दिलेले पीककर्ज फक्त तेवीस कोटी रुपये होते. आज ते एकवीसशे कोटींवर पोहोचले आहे. या आकड्यांचा उपयोग करून सहकारी पतपुरवठा हा फार यशस्वी झाला आहे अशी फुशारकी मारली जाते. त्र्याहत्तर ते ब्याऐंशी या काळात शेतकऱ्यांना मिळालेल्या पीककर्जात विशेष वाढ झाली म्हणजे जवळजवळ दरवर्षी पंधरा टक्क्यांनी पीककर्जाची रक्कम वाढत गेली; पण नुसती रक्कम वाढल्याने काय होते? त्या रकमेची खरी किमत काय? रूपया तर दरवर्षी हलका होतो आहे. मग कर्जाची नुसती रक्कम वाढवून काय उपयोग? मिळणाऱ्या कर्जामध्ये शेतकऱ्याला किती खत विकत घेता आले असते? याचा जर हिशोब काढला तर दरवर्षीची वाढ फक्त चार टक्क्यांवर येते.

शेतकऱ्यांना उपलब्ध असलेल्या कर्जाची रक्कम वाढली असे मान्य केले तरीही त्यात भूषणास्पद असे काहीच नाही. दरवर्षी जुन्याचे नवे करत करत शेतकरी जगत राहील तर कर्जाची रक्कम वाढत जाणे याचा अर्थ एवढाच की चार दशकानंतरसुद्धा शेतकऱ्याला शेतीच्या कष्टातून खत, बियाण्यांचे पैसेसुद्धा फेडण्याची ताकद आलेली नाही. यात मिशीवर ताव मारून फुशारकी मारण्यासारखे काहीच नाही. या कर्जाचा उपयोग कसा झाला? हे पाहण्यासारखे आहे.

प्रती हेक्टरी कर्जपुरवठा दिसायला रुपये पंचेचाळीसपासून रु. दीडशेपर्यंत वाढला; पण किंमतीत झालेली वाढ लक्षात घेतली तर कर्जपुरवठा आजही प्रती हेक्टरी म्हणजे अडीच एकरामागे किती खर्च येतो? बासष्ट रुपयात काहीतरी भागते काय? आणि या सरासरी बासष्ट रुपयात उसासारख्या पिकांना दहा हजार रु. एकरी मिळणारी कर्जे हिशोबात घेतली तर उरलेल्या पिकांना काय मिळत असेल? याचा अंदाज सोपा आहे; पण या पैशात शेतकरी काय करीत असतील आणि भागवत असतील हे समजणे कठीण आहे.

शेतीच्या सरासरी उत्पादनखर्चाचा अंदाज सरकारी तज्ज्ञांनी केला आहे. १९८२-८३ मध्ये शेतीचा एकूण उत्पादन खर्च सतरा हजार सहाशे नऊ कोटी रु. झाला असे त्यांचे म्हणणे आहे. यावर्षी पतपुरवठा दोन हजार पाचशे अठ्याण्णव कोटी रुपयांचा झाला म्हणजे एकूण उत्पादन खर्चाच्या पस्तीस टक्के.

याच वर्षी म्हणजे १९८२-८३ कर्जाचे वाटप दोन कोटी अकरा लाख झाले. एका शेतकऱ्याचे एकच खाते आहे असे गृहीत धरले आणि प्रत्येक शेतकरी कोणा एका संस्थेकडून एकच कर्ज घेतो असे धरले तरीही देशातील एकूण नऊ

कोटी छत्तीस लाख खातेदारांपैकी फक्त तेवीस टक्के शेतकऱ्यांना पतपुरवठा झाला आहे.

अशी अवस्था असतानाच सहकारी बँका उतरणीला लागल्या. त्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. कारण सोसायट्या बंद पडताहेत. सोसायट्या बंद पडण्याचे प्रमुख कारण अर्थातच वाढती थकबाकी आहे. नव्याजुन्यांचा सगळा जंजाळ ध्यानात घेऊनही थकबाकी वाढत आहे. एकावन्न मध्ये जेव्हा तेवीस कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले होते तेव्हा थकबाकी फक्त सहा कोटी रूपयांची होती. म्हणजे कर्जवाटप थकबाकीच्या जवळजवळ चौपट होते. उलट त्र्याऐंशी मध्ये कर्जवाटप एकवीसशे कोटी होते तर थकबाकी सज्जड पंधराशे कोटी रुपयाची म्हणजे कर्जवाटपात थकबाकीच्या १.४ पट होते.

जी काही प्रगती होत आहे त्यातील फार मोठा हिस्सा राष्ट्रीयीकृत बँकांचा आहे. त्र्याऐंशी मध्ये पतपुरवठ्यातील सहकारी संस्थांचा भाग रुपयात नव्वद पैसे होता. तो आज त्र्याहत्तर पैशांपर्यंत घसरला आहे आणि राष्ट्रीयीकृत बँकांचा सहभाग याच काळात दहा टक्क्यांपासून वाढून बावीस टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचला आहे.

शेतीचा धंदा तोट्यात. त्यामुळे शेतकऱ्यांकडे ठेव ठेवायला निव्वळ बचत होण्याची काही शक्यताच नाही. सोसायट्यांना शेतकऱ्यांकडून ठेवी मिळणार नाही म्हटल्यावर त्यांचे काम एकच राहिले ते म्हणजे वरतून येणाऱ्या पैशाचे कर्ज म्हणून वाटप करणे. शेतीच्या स्वत:च्या ताकदीवर या कर्जाची परतफेड होण्याची शक्यता नाही असे म्हटल्यावर मग या सगळ्या कर्ज व्यवहारातून अर्थ व्यवहार निघून जातो. मग उरतो तो केवळ पुढाऱ्यांचा दांडगेपणा, सेक्रेटरीचा स्वार्थ आणि हौसे, नवसे गवसे चेअरमन. या अवस्थेबद्दल अभिमान बाळगण्यासारखे काही नाहीच. आम्ही चांगल्या हेतूने केले पण जमले नाही हे समर्थनही खोटे आणि लंगडे. कारखानदारांना पतपुरवठा मिळतो कारण कारखाने फायद्यात चालतात. त्यामुळे बँका कारखानदारांच्या मागे कर्ज पुरविण्यासाठी धावत असतात. शेती फायद्याची असती तर सहकारी व्यवस्थेतून पतपुरवठ्याचे स्वव्यापसव्य करावेच लागले नसते. बँका शेतकऱ्यांच्या मागे धावल्या असत्या आणि कर्जाचा व्यवहार अर्थकारणाचा झाला असता. हे ज्यांना समजले नाही किंवा समजत नाही त्यांचा हेतू शेतीच्या भल्याचा नव्हता. पतपुरवठा व्हावा असाही नव्हता. आपापल्या पिल्लांना चरायला कुरणे करून देण्याचा होता असे म्हटले तर वस्तुस्थितीला सोडून नक्कीच नाही.



## २. कापूस एकाधिकार: शेतकऱ्याला लुटण्याची व वरकमाईची योजना

पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना जसा त्यांच्या सहकारी साखर कारखान्यांचा अभिमान आहे तसाच विदर्भातील पुढाऱ्यांना कापूस एकाधिकार खरेदीबद्दल. कापूस एकाधिकार खरेदी सहकारी व्यवस्था आहे असे निर्भयपणे म्हणणे कठीण आहे. पूर्वी खरेदीची व्यवस्था महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन करत असे. आता त्यासाठी स्वतंत्र महामंडळ तयार करण्यात आले. तरी या योजनेची एकूण रचना सहकारी पद्धतीचीच आहे. शेतकऱ्यांनी कापूस देतांना काही एक रक्कम पहिला हप्ता म्हणून घ्यावी आणि वर्षाच्या शेवटी झालेल्या फायद्या-तोट्यानुसार शेतकऱ्यांना मिळायची अखेरची रक्कम ठरावी ही वैशिष्ट्ये सहकारी व्यवस्थेचीच आहेत. त्याशिवाय शेतकऱ्यांकडून शेअर भांडवलापोटी भांडवली निधीसाठी किंवा चढउतार निधीसाठी रक्कम गोळा करणे हेही सहकारी पद्धतीशी सुसंगत आहे.

### वरकमाईचे साधन

महामंडळ तयार करण्याची योजना तीन-चार वर्षांपूर्वी जाहीर झाली तेव्हा विदर्भातील पुढारी मंडळींचा आनंद स्पष्ट दिसत होता. पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखानदारी आहे. त्याला समांतर असे विदर्भात काहीच नाही. त्यामुळे विदर्भात कापसासाठी महामंडळ तयार होणे आवश्यक आहे असा त्यांचा युक्तिवाद होता; पण म्हणण्याचा सूर असा की ''पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांची बघा किती मजा आहे. शेतकऱ्यांना लुटायला त्यांच्या हाती साखर कारखान्यांसारखे जबरदस्त साधन आहे. या कारखान्यांमुळे त्यांना वरकमाई कितीतरी करता येते, आम्हाला मात्र असे काहीच मिळत नाही. शेतकऱ्यांना लुटण्याची आणि वरकमाई करण्याची आमचीही काही सोय झाली पाहिजे.''

पश्चिम महाराष्ट्रात उसाची लागवड कमी होत चालली व कारखान्यांचा बडेजाव वाढत चालला. तशी काही कारखान्यांची परिस्थिती खूपच वाईट झाली आणि त्या कारखान्यांचे सदस्य शेतकरीसुद्धा हा कारखाना बंद पडला तर बरे म्हणजे निदान दुसऱ्या एखाद्या बरी किंमत देणाऱ्या कारखान्याला ऊस घालता येईल अशा भूमिकेकडे येऊ लागले आहेत; पण विदर्भात राष्ट्रभक्तीच्या तोडीने एकाधिकारभक्ती शेतकऱ्यांत लोकप्रिय करण्यात आली. शेतकऱ्यांच्या

आंदोलनातील बहुतेक मंडळांची एकाधिकार व्यवस्थेत काही ना काही सोय लागली. त्यामुळे एकाधिकार खरेदी म्हणजे शेतकऱ्यांच्या हाती आलेली महाप्रचंड विजयश्री आहे आणि कोणत्याही परिस्थितीत तिला धक्का लागता कामा नये असे वातावरण तयार करण्यात आले होते. सेवाग्रामच्या गांधीभक्तांनी कदाचित गोहत्येस संमती दिली असती; पण कापूस एकाधिकाराला धक्का लावण्यस विदर्भातील प्रस्थापित पुढारी तयार झाले नसते.

१९८०-८१ मध्ये मी या विषयावर बोलतांना म्हटले ''खरेदी व्यवस्था कोणतीही असो; सरकारी असो सहकारी असो की व्यापाऱ्याची असो, परमेश्वराची असो की सैतानाची असो शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळणे हे महत्त्वाचे'' ताबडतोब चारी बाजूंनी कावकाव चालू झाली. शरद जोशी आणि शेतकरी संघटना सरकारने चालू केलेल्या या थोर उपक्रमाच्या विरूद्ध आहेत अशी हाकाटी चालू झाली. एकाधिकार ही विदर्भातील कापूस उत्पादकांची 'पवित्र गाय' बनली होती. एकाधिकार हा भावनेचा प्रश्न बनला होता. व्यवहाराचा नाही.

**कापूस उत्पादकांच्या हिताचे केवळ नाव**

शेतकऱ्यांनी एवढ्या पूज्य मानलेल्या एकाधिकाराची आजपर्यंतची कामगिरी तरी काय आहे? एकूण कपाशीखालील जमिनीपैकी तीस टक्के जमीन महाराष्ट्रात आहे. कापूसउत्पादन मात्र सतरा टक्के आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कापसाखालील चार टक्के जमीनसुद्धा बागायती नाही. देशातील प्रती एकरी सरासरी उत्पादन दोन क्विंटलच्या आसपास आहे तर महाराष्ट्रात ते क्विंटलच्याही खाली आहे. साहजिकच महाराष्ट्रातील कपाशीचा उत्पादन खर्च इतर राज्यांच्या तुलनेने जास्त आहे. कपाशीऐवजी पर्यायी पिके घेण्याचा प्रयत्न निदान कोरडवाहू भागात तरी फारसा यशस्वी झालेला नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील कापूस शेतकऱ्यांना विशेष सहाय्याची गरज आहे हे उघड आहे. सातारा, अहमदनगर या जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापसाची खूप चांगली पिके काढली; पण एकूण खर्च-उत्पन्नाची वजाबाकी करता त्यांनी कापसाचे उत्पादन आटोपतच आणले. आणि ते उसाकडे वळू लागले. वीस टक्के कापूस पिकवणाऱ्या राज्यातील एका महाप्रचंड सहकारी व्यवस्थेस महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी विशेष किंमत मिळवून घेणे जमले नाही. ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांतील उसाची लागवड अशीच अकार्यक्षम आहे; पण तेथील शेतकऱ्यांच्या मुखंडांनी आपापल्या राज्याला खास लेव्ही किंमती



मिळवल्या. महाराष्ट्रातील दिग्गज सहकारी पुढाऱ्यांना हे कधीच जमले नाही.

परिणामत: एकाधिकार योजना अंमलात आल्यापासून एखाद दुसऱ्या वर्षाचा अपवाद सोडला तर महाराष्ट्राच्या शेजारच्या राज्यांत कपाशीच्या किंमती एकाधिकारातील किंमतीपेक्षा वरचढ राहिल्या. शेतकऱ्यांना जास्त किंमती देणाऱ्या शेजारच्या राज्यांतील व्यापाऱ्यांनी गडगंज नफा कमावला तर शेतकऱ्यांना कमी किंमत देणाऱ्या एकाधिकार खरेदीस मात्र सतत तोटा होत राहिला.

एकाधिकार खरेदीसंबंधीच्या कायद्याच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे ज्यावेळी ही योजना तयार झाली त्यावेळी रूईच्या गाठींना बाजारात चढा भाव मिळत होता; पण बाजारव्यवस्थेतील दोष आणि मध्यस्थांचा सुळसुळाट यामुळे उत्पादकांना त्यांचा रास्त हिस्सा मिळत नव्हता. असा रास्त हिस्सा मिळवून देणे हे एकाधिकार योजनेचे प्रमुख उद्दिष्ट होते.

जवळजवळ पंधरा वर्षे योजना चालल्यानंतर फरक तो एवढाच पडला की आता रूईचा बाजार तेजीत नाही तर मंदीत आहे. तो मंदीत असण्याचे प्रमुख कारण केंद्र शासनाचे वस्त्रोद्योग धोरणच आहे. या पडत्या भावांची वासलात एकाधिकार खरेदी आणि सहकारीमार्तंड यांनी लावून टाकली आहे. एकाधिकार खरेदीच्या सुरुवातीच्या तुलनेने उत्पादक शेतकरी आता अधिकच कंगाल झाला आहे. एवढेच नव्हे तर इतर राज्यांतील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या तुलनेने त्याच्यावर अन्याय झाला.

**एकाधिकाराच्या अपयशाची कारणे**

एकाधिकाराचा पराभव केंद्र शासनाच्या कापूस धोरणाने झाला हे फक्त निम्मेच सत्य आहे. रूईच्या बाजारात मिळणार किंमत एकाधिकार पद्धतीत शेतकऱ्याच्या हाती पडण्याआधी तिला अनेक फाटे फुटू लागले. एकाधिकारची अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार यामुळे शेतकरी पूर्वीपेक्षाही अधिक नागवला जाऊ लागला.

एकाधिकारात मुख्यत: तीन कामे होतात. कापसाची खरेदी, कापसावरील प्रक्रिया, रूईची विक्री.

कापसाच्या खरेदीत प्रचंड भ्रष्टाचार होतो हे काही कुणाला गुपित नाही. ग्रेडिंग, वजनाचा काटा यात इतका गोंधळ होतो की दरवर्षी प्रत्येक विभागात एक तरी आग लागल्याखेरीज कापूस खरेदीचा हिशेब पुरा होऊच शकत नाही असे शेतकरी चेष्टेने म्हणतात.

कापसापासून रूई बनेपर्यंत खाजगी व्यवसायात साधारपणे दीड टक्क्यांची

घट होते. काही ठिकाणी उत्पादकांनी आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेल्या भ्रष्टाचारामुळे खरेदी केलेल्या कापसाचे वजन जास्त लावले जाते आणि मग घटीची टक्केवारी सात, आठ किंवा नऊ टक्क्यांपर्यंत जाते; पण हा प्रकार फार महत्त्वाचा नाही. योग्यपणे खरेदी झालेल्या कापसातही साडेचार टक्के घट होते.

एकाधिकार व्यवस्थेमुळे त्यात नोकरी लागलेल्यांचे चांगले भले झाले आहे. कापूस कधी येवो न येवो. सरकारी खात्याप्रमाणे अधिकाऱ्यांची फौज, त्यांच्या गाड्या, त्यांचे चपराशी, त्यांच्या सरबराया चालूच राहतात. खाजगी व्यापारी एक खंडी रूईमागे सातशे रु. प्रशासन आणि व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करतो. एकाधिकार खरेदीत हाच खर्च एक खंडी रूईमागे बाराशे पन्नास रुपयाच्यावर जातो.

इतक्या कुतरओढीने तयार झालेली रूई विकायची पाळी आली की मग चंगळ होते गिरणीमालकांची. पूर्वी मुंबईतील गिरणीमालक किमान महिनाभराची कापसाची बेगमी करत असत. एकाधिकार खरेदीमुळे आता असा साठा करण्याची आवश्यकता राहिली नाही. केव्हाही जावे, तयार हजर साठ्यातून कापूस घेऊन यावा. नोकरदार विकणारे, एका बाजूला भोळेभाबडे आणि बाजू आणि दुसऱ्या बाजूला कसलेले मुरब्बी व्यापारी. परिणामत: एकाधिकारातील रूईच्या विक्रीची किंमत बाजारपेठेतील किंमतीपेक्षा चाळीस ते पन्नास रु. प्रति खंडी कमीच भरते.

खरेदीत भ्रष्टाचार, प्रक्रियेत घट, प्रशासकीय खर्च अवाढव्य आणि विक्रीत सूट या पद्धतीने चालणारी व्यवस्था ही शेतकऱ्यांच्या फायद्याची असूच शकत नाही. या व्यवस्थेने फायदा झाला तो त्यात नोकरी मिळालेल्या नोकरदारांचा, कापसाच्या बेगमीच्या ओझ्यातून सुटलेल्या गिरणीमालकांचा आणि गल्लीपासून ते मलबार हिलपर्यंतच्या पुढाऱ्यांचा.

**ओल्पाड-शेतकरी हितदक्ष नफ्यातील सहकार**

पण सहकार चळवळीतील एका स्वच्छ आणि निरोगी संस्थेचं उदाहरण बघण्यासारखं आहे. सूरत जिल्ह्यातील ओल्पाड गावी पुरूषोत्तम शेतकरी सहकारी कापूस जीनिंग आणि प्रेसिंग सोसायटी आहे. हिच्या कामकाजाचे स्वरूप एकाधिकाराप्रमाणेच आहे. या संस्थेने १९७४ पासून शंकर-४ कापसास दिलेल्या किंमती तक्त्यात दाखवल्या आहेत आणि त्याच्याच शेजारी एकाधिकार खरेदीतील एच-४ कापसाला मिळालेल्या किंमती दाखवल्या आहेत. सुरतच्या संस्थेने दिलेल्या किंमती निव्वळ व्यापारी आहेत. तर एकाधिकारातील किंमतीत



सरकारी सहाय्य आणि अनुदान यांचा मोठा हिस्सा आहे. सहकारी चळवळी विषयी गर्व मिरवणाऱ्यांचे नाक उतरवण्यास हा किंमतीचा तक्ता पुरेसा आहे.

| सन | पुरुषोत्तम शेतकरी संस्थेच्या किंमती शंकर-४ | महाराष्ट्र कापूस एकाधिकारच्या किमती एच-४ |
|---|---|---|
| १९७४ | ६१५ | ४५० |
| १९७५ | ४२६ | २९९ |
| १९७६ | ४९३ | ३५५ |
| १९७७ | ६७५ | ५१४ |
| १९७८ | ५६८ | ४२० |
| १९७९ | ५४५ | ३५२ |
| १९८० | ५७२ | --- |
| १९८१ | ६८५ | ५२० |
| १९८२ | ६०२ | ५२० |
| १९८३ | ६५७ | ५२० |
| १९८४ | ७४७ | ५८० |
| १९८५ | ६७५ | ५९२ |
| १९८६ | ६१५ | ५९२ |
| १९८७ | ७७४ | --- |

## ३. सहकारी साखर चळवळीची शोकांतिका

सहकारी चळवळीने शेतकऱ्यांचा उद्धार केला, सहकारी चळवळी म्हणजेच शेतकऱ्यांची एकमेव महत्त्वाची चळवळ हा विचार सहकारी साखर कारखान्यांच्या नेत्यांनी विशेष आग्रहाने मांडला आहे. साखर कारखाना काढावा, त्याच्या आधाराने पाण्याची व्यवस्था करून उसाखालचे क्षेत्र वाढवावे, लागवडीचे शास्त्रीय व्यवस्थापन करून ऊसशेतीची उत्पादकता आणि उसातील शर्करांश वाढवावा, वाहतूक आणि गळीत पूर्ण कार्यक्षमतेने चालवून साखरेचे उत्पादन वाढवावे म्हणजे ऊसउत्पादकांचे सर्वतोपरी कल्याण होईल अशी भूमिका सहकारी साखर कारखान्याच्या आद्य प्रणेत्यांनी मांडली होती. कारखान्यांची स्थापना केली आणि ते कार्यक्षमतेने चालवले म्हणजे कारखान्याच्या तिजोरीत जाऊन पडणारा फायदा शेतकऱ्यांच्या पदरी पडेल आणि त्यामुळे ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या मालाची चांगली, एवढेच नव्हे तर आकर्षक किंमत

मिळेल ही सहकारी साखर कारखाने काढण्यामागची कल्पना आणि आशा होती.

पद्मश्री विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ इत्यादींनी ही कल्पना बाळगली, राबवली, सहकारी कारखानदारीची सुरूवात झाली. सहकारी कारखानदारीने चांगले बाळसे धरले. महाराष्ट्रात ऐशींच्या आसपास सहकारी साखर कारखाने तयार झाले. महाराष्ट्रातील बागायती प्रदेश साखर कारखान्यांनी नटून गेले. सारा परिसर साखर कारखान्याची प्रचंड इमारत, आसपासच्या प्रदेशात बांधलेल्या गुळगुळीत सडका, विजेच्या दिव्यांची रोषणाई, शोभिवंत झाडांच्या बागा, शाळा, बाजारपेठा, बँका यांनी गजबजून गेला. विकासाची पेठ फुटली आहे अशी भावना तयार व्हावी असा चमचमाट दिसू लागला.

महाराष्ट्रात गेल्या पंचवीस-तीस वर्षांत उदयाला आलेले राजकीय नेतृत्व मोठ्या प्रमाणावर साखर कारखान्यातून उदयाला आले आहे. साखर कारखान्यांच्या एकूण कामगिरीविषयी कुणाचेही काहीही मत असले तरी शेतकऱ्यांच्या कमीजास्त शिकलेल्या पोरांची कारखान्याचा गाडा चालविण्याची कार्यक्षमता आणि ताकद त्यांनी सिद्ध केली यात काही शंका नाही. साखर कारखान्यांच्या बऱ्याच अध्यक्षांची दिनचर्या मी पाहिली आहे. त्यांच्या कामाचा व्याप, त्याची समज, कामाचा उरक, राजकीय हातोटी यांनी जवळ जवळ प्रत्येक वेळी मी विस्मित झालो आहे. सहकारी चळवळीची आणि विशेषत: सहकारी साखर कारखान्याची तालीम शाळा तयार झाली नसती तर मंत्रिपदाची धुरा सांभाळण्याच्या ताकदीची माणसे मिळणे ग्रामीण भागात कठीणच झाले असते. महाराष्ट्र राज्यात बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळापासून ते यशवंतराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळापर्यंत जो काही फरक घडून येऊ शकला आणि ग्रामीण कर्तृत्वाला मुंबईदरबारी जे स्थान मिळाले त्याचे फार मोठे श्रेय साखर कारखांन्यामुळे मिळालेल्या अनुभवाला द्यावे लागेल.

सहकारी साखर कारखान्यांच्या उदयाबरोबर उसाखालील क्षेत्र वाढले, उसाचा विकास झाला, ऊस उत्पादकांना कर्जपुरवठ्याची सोयीस्कर व्यवस्था झाली याबद्दलही दुमत असण्याचे काही कारण नाही. कारखान्यांच्या परिसरांतील विकास, ऊस आणि साखर उत्पादनात वाढ आणि ग्रामीण भागांत नवीन राजकीय नेतृत्वाचा उदय याबद्दलचे श्रेय निश्चितपणे सहकारी साखर कानखान्यांना दिले पाहिजे.

पण यापलीकडे जाऊन सहकारी चळवळ म्हणजेच शेतकऱ्यांची चळवळ,



शेतकऱ्यांना भाव मिळवून देण्यासाठी, त्यांचे दारिद्र्य हटविण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे असे कुणी सांगू लागला तर मात्र त्याचे म्हणणे मान्य करणे कठीण होईल. सहकारी क्षेत्रांत कर्तबगारी दाखवून नंतर राज्याचे अनेक वेळा मुख्यमंत्री झालेले आणि राजस्थानच्या राज्यपालपदावरून नुकतेच निवृत्त झालेले वसंतदादा पाटील यांनी आयुष्यभर सहकाराचा हिरीरीने पुरस्कार केला आणि आजही करतात; पण तीन चार दशके सहकाराचे साधन कुशलतेने वापरणाऱ्या वसंतदादा पाटलांना उतरत्या वयात शेतकरी आंदोलनाची भाषा बोलावी लागली ही एकच गोष्ट पुष्कळ काही सांगून जाते. हे आंदोलन राज्यकर्त्या पक्षाच्या चौकटीत आणि पक्षश्रेष्ठींच्या आशीर्वादाने का चालायचे असेना पण शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला आंदोलनाने तोंड द्यावे लागेल अशी स्पष्ट भाषा वसंतदादा वापरू लागले आहेत. सहकारी चळवळीने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला काही मदत झाली नाही हा वसंतदादांसारख्या सहकारमहर्षींच्या आयुष्याचा निष्कर्ष आहे. वसंतदादांनी इतक्या वर्षांच्या सहकार कारकीर्दीनंतर आंदोलनाच्या रणभूमीवर उतरण्याची तयारी दाखवली; कारण त्यांची प्रकृती स्वातंत्र्यसैनिकाची आहे. बेचाळीसच्या चळवळीत गोळी झेलणाऱ्या दादांना आपण देवाच्या ऐवजी चोराच्या आळंदीला येऊन पोहोचलो हे समजण्याची जाणीव आणि कुवत आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या इतर वस्तादांना अजून उपरती झाल्याची लक्षणं दिसत नाहीत.

सहकारी साखर कारखान्यांनी काय कामगिरी बजावली? या कारखान्यांच्या उभारणीसाठी आणि प्रशासनासाठी प्रचंड साधनसंपत्ती आणि मनुष्यसंपत्ती गुंतवली गेली त्यातून निष्पन्न काय झाले, त्यातून शेतकऱ्यांना काय मिळाले याचा वस्तुनिष्ठ ताळेबंद मांडणे आवश्यक आहे. एकोणीसशे एकाहत्तर साली महाराष्ट्रात दोन लक्ष सतरा हजार हेक्टर जमीन ऊस लागवडीखाली होती. १९८५ मध्ये हा आकडा दोन लक्ष त्र्याण्णव हजारपर्यंत गेला. म्हणजे पंधरा वर्षांच्या काळात झालेली वाढ केवळ पस्तीस टक्क्याची. उसाखालील क्षेत्र कारखान्यांच्या स्थापनेमुळे काही स्थिर झाले असेही चित्र दिसत नाही. एकोणीसशे ब्याऐंशी-त्र्याऐंशी मध्ये उसाखालील क्षेत्र तीन लक्ष सव्वीस हजारापर्यंत वाढले होते. त्याच्या आधी दहा वर्षे म्हणजे १९७२ मध्ये उसाखालील क्षेत्र एक लक्ष सेहेचाळीस हजारापर्यंत उतरले होते. म्हणजे सहकारी कारखान्यांमुळे महाराष्ट्र राज्यात तरी ऊसउत्पादन क्षेत्रात काही फार लक्षणीय वाढ झाली आहे किंवा ऊसउत्पादनात स्थिरता आली असे नाही.

याच काळात उसाचे उत्पादन एकशे अठ्ठेचाळीस लाख टनांवरून दोनशे सदतीस लाख टनांवर गेले म्हणजे उसाच्या उत्पादनात साठ टक्के वाढ झाली. प्रती हेक्टर उत्पादन १९७१ मध्ये अडुसष्ट क्विंटल होते. १९७१-८० या काळात उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झाले आणि त्याला काही यशही मिळाले असे दिसते. याउलट गेल्या सात वर्षांत उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने काही फार स्पृहणीय प्रगती झाली आहे असे नाही.

उसातील शर्करांशाची महाराष्ट्रातील सरासरी १९७१ मध्ये ११.२५ होता. १९६८ मध्ये तो ११.२०च होता. महाराष्ट्रातील उसातील शर्करांश इतर राज्यांच्या तुलनेने जास्त आहे ही गोष्ट खरी पण त्यात सहकारी साखर काराखानदारीच्या कर्तबगारीचा काही हिस्सा नाही. याउलट पंजाब राज्यात शर्कराशांची टक्केवारी ८.५७ पासून १०.६३ पर्यंत पोहोचली. उसाच्या पिकाबद्दल सहकारी कारखान्यांनी प्रचंड कामगिरी केल्याचा जो गवगवा आहे त्यात फारसे तथ्य नाही हा महत्त्वाचा मुद्दा.

कारखान्यांची कार्यक्षमताही या काळात वाढली असे म्हणायला काही जागा दिसत नाही. साखर कारखाने हंगामातच चालतात. १९७१ मध्ये महाराष्ट्रातील कारखाने सरासरीने एकशे चौसष्ट दिवस चालले. १९७८ मध्ये कारखान्यांच्या कामाचे दिवस एकशे पंच्याऐंशी पर्यंत वाढले आणि त्यानंतर १९८२ मध्ये कारखान्यांनी दोनशे तीन दिवस काम केले. पण मधल्या वर्षात कामाच्या दिवसांची संख्या एकशे नऊ पर्यंत घसरली. एकोणीसशे शह्यांशी साली कामाच्या दिवसांची संख्या फक्त एकशे तेहतीस होती. कारखान्यात नोकरवर्गाची राजकीय किंवा वैयक्तिक कारणासाठी केलेली वारेमाप भरती, उधळमाधळ, चोऱ्या, भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता याबद्दल लिहिणे नकोच. महाराष्ट्रात पिकलेल्या उसाचे गळीत करण्याचे कामही सहकारी साखार कारखान्यांनी कार्यक्षमतेने पार पाडलेले नाही. याचा अर्थ असा की शासनाचे साखरविषयक धोरण अगदी शेतकऱ्यांना अनुकूल असते तरी सहकारी साखर काराने झाल्यामुळे शेतकऱ्यांना काही विशेष फायदा झाला असता असे नाही. खाजगी कारखान्यांनी कमी खर्चात गळीत केले असते आणि त्याचा फायदा कारखान्याच्या मालकांनी घशात टाकला असता. सहकारी साखर कारखान्यांनी अंदाधुंदीत हा फायदा शेतकऱ्याकडे आला असे नाही. चोराचिलटांनी तो ओरबाडून नेला.

पण सहकारी सहकारी साखर कारखान्यांच्या चळवळीची खरी शोकांतिका यापुढेच आहे. शासन शेतकऱ्यांच्या बाजूने असते तरी सहकारी कारखान्यांनी



शेतकऱ्यांच्या भल्याची कामगिरी बजावली असती असे नाही; पण शासकीय धोरण शेतकऱ्यांविरूद्ध जाऊ लागले तर शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याची कामगिरी सहकारी साखर कारखान्यांच्या बड्या पुढाऱ्यांची होती. सहकारी साखर कारखान्यांच्या पूर्ण इतिहासात शासनाचे धोरण शेतकरी हिताच्या विरोधी होते. एवढेच नव्हे तर ते शेतकरीद्वेष्टे होते. उसाचे उत्पादन तर वाढावे, साखरेचे उत्पादनही त्याबरोबर वाढावे; परंतु शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरून येईल इतकी किंमत तर मिळू नये यासाठी शासनाने मोठ्या क्रूरपणे एक षड्यंत्र रचले. शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून शासन गहू, कापूस, दूध, तेलबिया आणि डाळी या मालांच्या बाबतीत कसोशीने प्रयत्न करते पण उसाला भाव मिळू नये म्हणून शासनाने जो काही खटाटोप केला त्याची सर दुसऱ्या कोणत्याच क्षेत्राला नाही.

उसाची किमान किंमत अगदी अपुऱ्या पातळीवर ठरवणे, वाहतुकीसारख्या महत्त्वाच्या खर्चाकडे डोळेझाक करणे हे ऊसउत्पादकाविरुद्ध शासनाचे वापरलेले प्रमुख हत्यार. गळिताचा खर्चही शासन अपुऱ्या पातळीवरच ठरवते; पण त्याचा तोटा कारखान्यावर काम करणाऱ्या नोकरवर्गावर होत नाही, त्यांचा पगार-भत्ते द्यावेच लागतात. मग तो बोजा बसतो शेतकऱ्यांच्या बोकांडी. उसाची किमान किंमत आणि गळिताचा खर्च दोन्ही अपुरे धरले म्हणजे साखरेची किंमत आपोआपच अपुरी ठरते. या असल्या अपुऱ्या किंमतीत कारखान्यात तयार झालेली साखर जबरदस्तीने लेव्ही म्हणून घेऊन जायची. साखर खपत नसली तर सरकार लेव्ही घ्यायला येणार नाही. साखरेचा तुटवडा असला तर सरकार लेव्ही तर घेणारच; पण वर उधारही साखर घेऊन जाणार. देशात सगळ्या शेतीमालाच्या किंमती एकठोक ठरतात. गहू पंजाबचा असो की महाराष्ट्राचा किंमत एकच. महाराष्ट्रात पिकणाऱ्या कोरडवाहू कापसाचा उत्पादन खर्च इतर राज्यांच्या तूलनेने खूपच जास्त आहे. पण महाराष्ट्राच्या कापसाला काही मदत म्हणून जास्त किंमत मिळत नाही. पण महाराष्ट्र उसाच्या उत्पादनात जरा वरचढ आहे. त्याबद्दल महाराष्ट्राला शिक्षा होते आणि महाराष्ट्रात साखरेची लेव्ही किंमत सगळ्यात कमी ठेवली जाते. लेव्ही देऊन उरलेली साखर खुल्या बाजारात विकायची परवानगी आहे खरी पण ती प्रत्येक महिन्यात किती विकायची हे ठरवायचे सरकारने. ठरवलेल्या आकड्यापेक्षा साखर कमी विकली तर शिक्षा. जास्त विकली तरी शिक्षा. इतक्या जबरदस्त बंधनात सर्व साखर कारखाने जखडलेले आहेत. एवढ्याने भागत नाही म्हणून की काय

साखरेचे आयात -निर्यात धोरण असे राबवले जाते ज्यामुळे साखरेचे आणि परिणामत: उसाचे भाव पडावेत. पण या सगळ्या अन्यायांविरूद्ध दंड ठोकून उठणारा एकसुद्धा 'मायेचा पूत' सहकारी चळवळीने दिला नाही. सहकारी तत्त्वाच्या आत्म्याला संपवणारा उसावरील खरेदीकर सरकारने लादला आणि वसूल केला; पण त्याविरुद्ध तोंडातून कुणी ब्रसुद्धा काढला नाही. उसाचे कारखाने केवळ राजकीय कारणासाठीच स्थापन करण्यात आले. अकार्यक्षम कारखान्यांना जगवण्याकरिता शासनाने झोन व्यवस्था काढली. नगद रकमेत उसाची किंमत किती द्यायची यावर कमाल मर्यादा घातली. बिगरपरतीच्या ठेवीसारख्या विलक्षण योजना उपजल्या त्यांच्या विरूद्ध बोलण्याचे तर कोणत्याही साखरसम्राटाला काही कारण नव्हते! मग कोण्या निधीकरीता, मुख्यमंत्र्यांकरिता, पंतप्रधान निधीकरिता पैसे किती कापून नेले तर त्याचा जाब कोण विचारणार? साखरेवर मिळणारा 'ऑनमनी', मद्यार्कावर मिळणारा प्रचंड छुपा पैसा आणि झोनच्या व्यवस्थेमुळे बिगरसदस्यांच्या उसावर सुटणारा पैसा याच गोष्टींवर सगळ्यांचे लक्ष, याच विषयावर सगळी चर्चा. ऊसउत्पादक शेतकऱ्याला लागलेल्या हृदयरोगाकडे लक्ष द्यायला वेळ कुणालाच नाही. सहकारी साखर कारखान्यांनी भले मोठे पुढारी निपजवले, पण त्यांच्यापैकी शेतकऱ्यांच्या मदतीला कुणीच उतरला नाही.

सहकारी साखर चळवळीची ही शोकांतिका बारकाव्याने समजून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय सहकारी साखर कारखान्यांच्या कर्तृत्वांचा पडदा दूर होणार नाही.

### ३. दूध सोसायट्या : दूध कमी पाणी जास्त

आपल्या देशात अठरा कोटीच्या वर गायी आणि सहा कोटीच्या वर म्हशी आहेत. म्हणजे जगात असलेल्या एकूण गायींपैकी चौदा टक्के आणि म्हशींपैकी शेहेचाळीस टक्के हिंदुस्थानात आहेत. हे सगळे प्राणी चार कोटी टन दूध देतात. म्हणजे जागतिक उत्पादनापैकी सहा टक्क्यांपेक्षासुद्धा कमी. सरासरीने पाहिले तर एक जपानी गाय पाच हजार आठशे साठ किलो दूध देते तर भारतीय गाय फक्त चारशे शहाऐंशी किलो. गाय पूज्य मानली जात असल्यामुळे त्यांचे कळपच्या कळप गावोगावी फिरत असतात. कोणत्याही शेतात घुसावे. यथेच्छ चरावे, पिकांची नासधूस करावी असा त्यांचा खाक्या असतो.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत शेतकरी दूध ही विक्रीची वस्तू समजतच नसे.



गावातून दूध शहराकडे खरवस, खवा, लोणी, तूप याच्या स्वरूपात प्रामुख्याने जाई. दूध घरच्या खाण्यासाठी आणि ताक तर फुकट वाटण्यासाठी अशी बहुतेक दुभती जनावरे पाळणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती होती. जिल्ह्याच्या शहरात वाड्यावाड्यातून कोणी ना कोणी म्हशी पाळी आणि दुधाचा रतीब आसपास घातला जाई. मुंबईसारख्या शहरात रतीबाच्या सोयीने जागोजागी दूध व्यवसाय करणारे म्हशींचे गोठे चालवत असत.

दूध हा व्यवसाय नसल्यामुळे गायी-म्हशींची उपेक्षा अपरिहार्यपणे झाली. देवाला नेवैद्य दाखवून झाला म्हणजे तो पुजाऱ्याच्याच तोंडात जातो. गाय ही देवता खरी; पण भरभरक्कम खायला मागणारी देवता आणि निम्म्या आयुष्यात खात्याच्या बदल्यात काहीच न देणारी देवता. त्यामुळे काही खानदानी गायी सोडल्यास बाकीच्यांची उपेक्षाच झाली. आजही भररस्त्यात वाहतुकीमध्ये फतकल घालून बसलेल्या गायी दिसतात. अगदी भाजी बाजारातील टोपलीत किंवा किराणा दुकानातील डब्यात तोंड घालताना गायी दिसतात; पण ज्यांचे एवढे भाग्य नाही त्या गायींनी काय करावे? आणि सर्वसाधारण वर्षात अशी परिस्थिती, मग दुष्काळाच्या वर्षात काय विचारावे?

आर्यांच्या टोळ्या पूर्व युरोपातून निघून भारतात उतरल्या. आपल्या गायींचे कळप घेऊन हे गोवंश पालक आले असे म्हणतात. त्यांनी आणलेल्या गायी काही सध्या दिसणाऱ्या गायींप्रमाणे एक वशिंडाच्या असणार नाही तर सध्याच्या संकरित गायीप्रमाणे सपाट पाठीच्या असणार. या गायींची मिजास खूप राखावी लागते. खाणे, पिणे, उष्णतामान यात थोडी हयगय झाली तरी या संकरित गायी कायमच्या निकामी होऊन जातात. म्हणूनच काळाच्या ओघात आर्यांच्या टोळ्यांबरोबर आलेल्या गायी निर्वंश होऊन संपल्या असाव्यात. राहिल्या त्या एक वशिंडाच्या गोमाता आणि नंदी. यांचे बिचाऱ्यांचे एक चांगले आहे. त्या खायला फारसे मागत नाहीत, मिळेल त्यावर गुजराण करतात, अर्धा पाऊण लिटर दूध देतात; पण दुष्काळातही पुष्कळशा जगून राहतात. जमिनीवरती बोटबोट आलेले सुद्धा हिरवे पिवळे कसलेही गवत त्या खुरडून घेतात. जमिनीवरचे गवताचे संरक्षण समूळ संपवूनही टाकतात. तरीही नंदी जातीच्या गोमाता जगात फारश्या देशात नाहीत. बांगला देश, पाकिस्तान, भारत (भारतीय उपखंड) त्याखेरीज इथिओपिआ, टांझानिया एवढाच त्यांचा प्रदेश -योगायोगाने म्हणा का कार्यकारण भावाने म्हणा नेमका हाच प्रदेश जगातील सर्वात भणंग गरीब प्रदेश आहे.

**फक्त अर्धा कप दूध**

दूध देऊ शकणाऱ्या जनावरांची संख्या प्रचंड असली तरी भारतात दुधाचे उत्पादन आणि वापर अत्यंत कमी आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा दरदिवशी दर माणशी दुधाचे उत्पन्न केवळ दीडशे ग्रॅम म्हणजे साधारण एक कपभर होते. हा आकडा घसरत घसरत १९७१ मध्ये १०७ ग्रॅम झाला. त्यानंतर पुन्हा चढत चढत १९८४ मध्ये १४० ते १४५ पर्यंत कसाबसा येऊन पोहोचला. दरडोई दरदिवशी दुधाचा वापर फक्त १२४ ग्रॅम. त्यातही बहुतेक मोठ्या शहरातील ग्राहकांच्या तोंडी (२३० ग्रॅम). खेड्यापाड्यातील लोकांचा दुधाचा वापर सरासरीने ६३ ग्रॅम. म्हणजे गावातील त्यातले त्यात गरीब माणूस ओठ ओले होण्यापुरतेसुद्धा दूध वापरत नाही.

स्वातंत्र्यानंतर शहरे झपाट्याने वाढू लागली. एवढेच नव्हे तर त्यांचे स्वरूपही बदलू लागले. स्वातंत्र्याआधीची मुंबई म्हणजे कुलाबा, फोर्ट, मलबार हिल सोडल्यास एक मोठे खेडेच होते. काळबादेवी, ठाकूरद्वारपासून ते परळ, दादर, माहीमपर्यंत जागोजाग म्हशींचे गोठे होते. पण हे गोठे शहरातील दुधाच्या मागणीला तोंड देण्यास असमर्थ ठरू लागले. शिवाय दुभती जनावरे ठेवणे म्हणजे शेणामुताचे काम आणि शहरातील गोठे म्हणजे काही आधुनिक नमुनेदार गोठे नव्हते. गोठ्यांचा वास आणि आसपासच्या दलदलीत तयार होणारे डास याने मुंबईकर हैराण झाले. मुंबई राज्याच्या अगदी पहिल्याच मंत्रिमंडळाने या प्रश्नाला हात घातला. शहराच्या बाहेर सर्व गोठे हलवण्याची व दुधाचे शीतकरण करून बाटल्यांतून मुंबई शहरभर वाटप करण्याची योजना राबवली. त्याकाळी ते मोठे कौतुकच होते. शाळा-कॉलेजातील मुलांच्या सहली आरे कॉलनीतील गोठे आणि कारखाना बघायला धावत. एवढेच नाही तर त्या काळात अनेक हिंदी सिनेमातील नायक-नायिकांच्या लपाछपीच्या दृश्यात भांबावलेल्या म्हशींचे गोठे स्पष्ट दिसून येत.

पण अशा एकट्या आरे कॉलनीत तयार होणारे दूध पिऊन मुंबईकरांचे भागेना. उलट शासन देत असलेल्या दुधाच्या किंमतीबद्दल गोठेवाल्यांची नाराजी वाढू लागली. त्यांचे संप, आंदोलने वाढत्या प्रमाणात होऊ लागली आणि हळूहळू प्रत्यक्ष उत्पादनाचा हा खटाटोप सोडून द्यावा लागला.

शहरांना पुरवठा करण्यासाठी ग्रामीण भागातून दूध गोळा करून आणणे याखेरीज पर्याय राहिला नाही. काही खाजगी व्यापारी आणि डेअरीवाले यांनी चांगल्या प्रतीचे दूध शहरात पुरवण्याचा व्यवसायही चालू केला. व्यवसाय



म्हणून दुधाच्या विक्रीची अशी सुरुवात झाली खरी. पण त्यात एक मोठी अडचण आली. पूर्वी घरच्या वापरासाठी जनावरे ठेवली जात. उरलेले दूध काय मिळेल त्या भावाने देऊन टाकण्याची पद्धत होती. फार काळ दूध विकत घेणाऱ्यांनी दूध अगदी मातीमोलाने विकत घेण्याची सवय अंगात बाणवली होती. त्यांना हे व्यवसायी दूध अतोनात महाग वाटू लागले. आजही मध्यमवर्गीय दूधग्राहकाची प्रवृत्ती बदललेली नाही. १८० ग्रॅ. शीतपेयास साडेतीन रुपये न कुरकुरता देणारे गिऱ्हाईक अर्ध्या लिटर दुधाला तेवढीच किंमत द्यायला नाखूष असते. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यात राज्य शासनाने गावातून दूध गोळा करून आणण्याच्या आणि ते दूध शहरात पुरविण्याच्या योजना चालू केल्या. दूध गोळा करण्याचे काम ग्रामीण भागांतील दूध संस्थांकडे देण्यात आले. वाटपाचे काम अमूल पद्धतीच्या सहकारी संस्था सोडल्यास शासकीय यंत्रणेकडेच राहिले.

दूध क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या जन्माचा हा इतिहास.

हा सगळा इतिहास मुद्दाम एवढ्याकरिता सांगितला की या क्षेत्रातील सहकाराच्या कार्याचे मूल्यमापन यथायोग्य करता यावे. या सहकारी संस्था शेतकऱ्यांनी आपणहून उत्साहाने तयार केल्या नाहीत. शहरांचा दूधपुरवठा नियमितपणे आणि निर्वेधपणे चालू राहण्यासाठी शासनाने या सहकारी संस्था वरून लादल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात सात हजार प्राथमिक दूध सोसायट्या आहेत. त्यांचे नव्वद संघ असून या सोसायट्या एकतीस दूध योजनांना दूध पुरवतात. सोसायटीत दूध जमा झाले की तेथून पुढची सगळी व्यवस्था शासकीय नोकरदार यंत्रणेकडे. याखेरीज शासन दुभती जनावरे घेण्याकरिता कर्ज पुरविणे, जनावरांसाठी खाद्य व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे इत्यादी कामेही वेगवेगळ्या खात्यांमार्फत चालवते.

गुजरातमध्ये अमूल पद्धतीच्या सहकारी व्यवस्थेत ही सगळी कामे सहकारी संस्थेकडेच असतात. शासनाचा त्याच्याशी काहीच संबंध येत नाही.

या सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या त्यावेळी खेड्यात काही गोकुळे होती असे नाही. खेड्यात खपत नसलेल्या दुधाला बाजारपेठ मिळवून देणे हे काही सहकारी संस्थांचे वास्तविक उद्दिष्ट नव्हते. पण आधीच शेतीतील तोट्याने नाडल्या गेलेल्या शेतकऱ्यास कुठूनही दोन पैसे मिळाले तर ब्रह्मांड गवसल्याचा आनंद होतो. दोन पैसे हातात पडण्याची शक्यता दिसली तरी तिचा मोह टाळणे त्याच्या कुवतीबाहेरचे होते. सुरुवातीच्या काळात तर दूध

ही मुळी विक्रीची वस्तूच मानली जात नव्हती. त्या वस्तूचा किती का कमी होईना काहीतरी भाव मिळतो आहे याचाच आनंदोत्सव झाला. तोपर्यंत शेतकऱ्यांच्या घरच्या अपुऱ्या आणि असंतुलित आहाराला थोडीफार दुधाची जोड होती. आता हे दूध शेतकऱ्याच्या घरातून काढून शहरातल्या ग्राहकाकडे पोचवायचे होते. सुरुवाती सुरुवातीला गावातील दूध शहरात गेले ते शहरातल्या दुधाच्या गरजा भागवण्याकरता. शहरांचे वैभव जसजसे वाढत गेले तसतसे हे दूध श्रीखंड, चीज, आईसक्रीम, लोणी, तूप अशा वस्तू बनवण्याकरिता जाऊ लागले. अहमदाबाद, दिल्ली, मुंबईसारख्या शहरांत आईस्क्रिम हा लोकांचा नवा छंद झाला आहे. चाळीस वर्षापूर्वी देशात जवळजवळ माहित नसलेले चीजचे वेगवेगळे प्रकार पाश्चात्य देशांशी परिचित असलेल्या लोकांच्या आवडी पुरवण्याकरिता तयार होताहेत. ज्यांच्या घरी दूर तयार होते त्या शेतकऱ्यांकडे कदाचित स्वातंत्र्यानंतर कपभर चहा घेण्याची शक्यता तयार झाली असेलही; पण ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेच्या आहाराचा आधार तुटला यात काही शंका नाही. किंबहुना गावातील लोकांच्या हातून दूध काढून घेणे, त्याचे त्यांना पैसे देणे व त्या पैशातून त्यांनी डाळी व इतर स्वस्त प्रथिनांचा वापर करणे यातच त्यांचे कल्याण आहे असे अगदी उघडपणे डॉ. कुरियनसारखे दूधमहर्षी प्रतिपादतात.

दूधाचे संकलन आणि वाटप करण्याच्या या योजनेत एक फार मोठी गोम होती. असलेल्या जनावरांचे दूध जुन्या काहातील पडत्या किंमतींना विकण्यास उत्पादकांना काही फारसा त्रास वाटला नाही. दुधाला काही उत्पादन खर्च असतो आणि तो उत्पादन खर्च भरून येण्याइतकी किंमत मिळाली पाहिजे असा विचार लोकांच्या मनाला शिवतही नसे. गाय, म्हैस ही हौसेपोटी किंवा भावनेपोटी  नाही तर चांगलेचुंगले पोटात जावे यासाठी ठेवायचे. आपले भागल्यावर उरेल ते दूध रतीबाने घालणे हासुद्धा कमीपणाच मानला जायचा. मोठ्या घरी लोणी काढून घेतल्यानंतर ताक फुकट वाटायचे हेच खानदानीपणाचे लक्षण मानले जाई; पण घरचे पुरून उरलेल्या दुधाची अशीतशी वासलात लावणे ही गोष्ट वेगळी आणि नियमितपणे व्यवसाय म्हणून दूध पुरवणे ही गोष्ट वेगळी.

घरच्या गायीला काही खास गोठा लागे असे नाही. गृहलक्ष्मी हौसेने गायीचे सगळे काही करी; पण नवीन गायी घ्यायच्या, त्यांची उस्तवार काढायची, माणसं नेमायची आणि बाहेरून विकत घेऊन त्यांना खाऊ घालायचे



म्हणजे नगदी खर्च आला आणि नगदी खर्च आला म्हणजे हौशीपणा संपला.

दुधाच्या उत्पादनात वाढ घडवून आणावी आणि गावातील लोकांच्या थाळीतील दूध, तूप कमी न करता शहरातील दुधाचा पुरवठा व्हावा अशी सरकारची इच्छा असती तर सुरूवातीपासून दुधाचा खर्च भरून निघेल इतकी किंमत शासनाने देऊ केली असती.

या सर्व योजना आखण्यात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे दूध व्यवसाय तज्ज्ञ आर.ओ. व्हाईट यांचा मोठा हातभार होता. व्हाईटसाहेबांनी दुधाचा उत्पादनखर्च १९६४ मध्येच काढला होता. कालवड जन्मल्यापासून आटेपर्यंतचा सर्व खर्च लक्षात घेता म्हशीच्या दुधाचा उत्पादन खर्च प्रति लिटर ५ रू. ४८ पैसे आहे असे त्यांनी १९६४ मध्ये सांगितले. पण इतर सर्व बाबतीत त्यांचे म्हणणे प्रमाण मानले तरी किंमतीच्या बाबतीत मात्र शासनाने जाणीवपूर्वक त्यांच्या शिफारशी बाजूला ठेवल्या व जितक्या कमी भावात दूध मिळणे शक्य होते तितक्या भावात खरेदी चालू केली.

१९७४ मध्ये देवतळे समितीने केलेल्या शिफारशीनुसार भाव वाढवण्यात आले. समितीने दिलेले भाव अपुरे असले तरी दूध व्यवसायास त्यामुळे काही काळ आधार मिळाला. १९८२ मध्ये शेतकरी संघटनेने या विषयावर आंदोलन केले. त्या संबंधात प्रतिलिटर १ रू. ४० पैसेपर्यंत भाववाढ शेतकऱ्यांना मिळाली.

एकूण दूध पुरवठ्याविषयी शासनाचा दृष्टिकोन असा की एका बाजूला शेतकऱ्यांना जनावरे घेण्यासाठी कर्जे आणि सवलती उपलब्ध करून दिल्या, वैद्यकीय सेवा पुरवल्यास आणि कोणत्या का होईना भावात दूध खपण्याची हमी तयार केली की फायद्या-तोट्याचा विचार न करता शेतकरी दूध उत्पादन करतील आणि पुरवतील. दूध ही अत्यंत नाशवंत वस्तू असल्यामुळे शहरातील ग्राहकांच्या हातात पडेपर्यंत ते टिकवणे ही एक समस्याच होती आणि त्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे अपरिहार्य होते.

संकलन करण्यासाठी सहकारी संस्था, वाहतुकीसाठी वाहने, शीतकरण केंद्रे, निर्जंतुकीकरण करणे आणि शहरातील वाटप व्यवस्था एवढा पाया घातला आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली की, दूध योजना यशस्वी होण्यात कोणताच अडथळा असू नये अशी एकूण शासनकर्त्यांची धारणा होती. त्यातल्या त्यात काही प्रमाणात महाराष्ट्र राज्य हेच जास्त व्यापक दृष्टिकोन ठेवून किंमतीचा विचार करणारे. यंदा गुजरात राज्यातील सगळ्या

सहकारी संस्था महाराष्ट्रापेक्षा वरचढ भाव देऊ लागल्या आहेत.

पण एवढे करूनही दुधाच्या उत्पादन वाढीचा कार्यक्रम फारशा उत्साहाने चालू नाही. भूमिहीन, आदिवासी व इतर दुर्बल घटक यांना कर्जावारी गायी मिळतात. पहिल्या वेताच्या दुधाचा काही एक उत्साह असतो; पण त्यानंतर मात्र हौसेने कुणी दूध दुभत्याचा धंदा वाढवतांना दिसत नाही.

या विषयावर तज्ज्ञांनी अनेक अभ्यास केले आहेत. वारणानगर येथील दुभते जनावर ठेवणाऱ्या शेतकऱ्यांपैकी फक्त बारा टक्के जणांनी दुसरे दुभते जनावर विकत घेण्याचा उत्साह दाखवला.

कालीकत येथे केलेल्या पाहणीतही हाच निष्कर्ष निघाला. पाहणी करणाऱ्या विद्वानाने निष्कर्ष असा काढला की, अधिक जनावरे ठेवल्याने फायदा होण्याची शक्यता आहे याची जाणीव शेतकऱ्यास नसावी आणि म्हणून शेतकरी धंदा वाढवण्यास कचरत असावेत. जळगाव जिल्ह्यातील नसिराबाद येथे केलेल्या पाहणीचा निष्कर्ष अगदी स्पष्ट आहे. दुसरे जनावर विकत घेण्याकरिता बीज भांडवला इतकीसुद्धा नगदी रक्कम जमा करता न येणे हेच दुधाचा धंदा वाढवण्याची इच्छा नसण्याचे कारण आहे असे या पाहणीत स्पष्ट मांडण्यात आले.

महाराष्ट्रात एकूण दूध संकलन १९७४ मध्ये प्रतीदिवशी ४.७ लक्ष लिटर होते. देवतळे समितीने दिलेल्या किंमतीतील वाढीमुळे त्यात झपाट्याने वाढ झाली व १९७७ मध्ये उत्पादन ८.५ लक्ष लिटरपर्यंत पोचले. ७७ सालापासून ते ८२ सालापर्यंत पुन्हा एकदा वाढ खुंटली. ८२ सालापर्यंत दुधाचे उत्पादन ११.६ लक्ष लिटर झाले. आंदोलनानंतर दिलेल्या भाववाढीमुळे दूधउत्पादन झपाट्याने वाढून केवळ चार वर्षांत ते २३ लक्ष लिटर झाले.

महाराष्ट्रातील प्रयोगाने हे दाखवून दिले की दुधाच्या उत्पादनाचा संबंध तंत्रज्ञान आणि पणन व्यवस्थेपेक्षा उत्पादकाला मिळणाऱ्या किंमतीशी आहे. महाराष्ट्रातील उत्पादनवाढीची तुलना गुजरात राज्याशी करणे उद्‌बोधक आहे. कारण गुजरात राज्यात डॉ. कुरियन यांच्या व्यवस्थेखाली किंमत हा एक नगण्य घटक समजला जात होता आणि तंत्रज्ञान व पणन व्यवस्था यावरच १९७७ पर्यंत भर दिला जात होता. परिणामी १९७७ पासून देशातील दुधाचे उत्पादन प्रतिवर्षी सहा टक्के या गतीने वाढले. महाराष्ट्र बागायती क्षेत्रात मागासलेला, जमीन जास्त करून भरड तरीही तेथे दूध उत्पादनाच्या वाढीची गती प्रतिवर्षी १० % राहिली. याउलट सुजलाम् सुफलाम् गुजरात राज्यात डॉ. कुरियन यांच्या



दुधमहापूर रणनीतीमुळे उत्पादनवाढीची गती प्रतिवर्षी फक्त ४.५ % राहिली. उत्पादनवाढ घडवून आणण्यात शेतीमालाच्या किंमतीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे असे शेतकरी संघटना आग्रहाने मांडते त्याचा हा सज्जड पुरावा आहे.

किंबहुना योग्य किंमती मिळल्या असत्या तर सहकारी संस्थांचे जाळे विणण्याची, पणन व्यवस्था बनवण्याची उठाठेव करणे आवश्यक होते किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका घेण्यास जागा आहे. सोसायटीच्या दरवाजापासून ते शहरातील दूधसरितेपर्यंत महाराष्ट्रातील सगळीच यंत्रणा हकारी आहे. त्यात संकलनाचे काम सहकारी संस्थेला देऊन दूधउत्पादकाचा किंवा व्यवसायाचा कांही लाभ झाला असेल हे संभवत नाही. सहकारी संस्थेऐवजी दूध गोळा करण्यासाठी एखादा सरकारी नोकर नेमला असता तर संकलनाची कार्यक्षमता कमी कार्यक्षम किंवा अधिक खर्चाची झाली असती असेही नाही. दूध चोरणे, मधून मधून ते नासले असे दाखवणे हे तर सरकारी नोकरदारांनीही केले असते. त्याची बिचाऱ्याची एकट्याचीच भूक असल्यामुळे असे प्रकार होण्याचे प्रमाण बहुधा घटलेच असते. आता सोसायटीशी संबंधित इतर घटकांच्या भुका भागवण्यासाठी हे प्रकार अधिक प्रमाणात घडतात आणि त्यातून उत्पादकांचे नुकसान अधिकच होते.

दुभती जनावरे ठेवून एखाद्याचा संसार थोडाफार सावरलाही असेल. त्याचे खरे श्रेय मोजमाप न ठेवता उरफोड काम करणाऱ्या त्याच्या कारभारणीला द्यायला हवे; पण दूधउत्पादन करून कुणी माड्या बांधल्याचे ऐकिवात नाही. केवळ सभासदत्वापुरते दूध उत्पादन करणाऱ्या चेअरमनचे मात्र घरदार दिवसामासी बाळसे धरताना दिसते.

दुधाला योग्य भाव मिळत असते तर शेतकऱ्यांनी इकडून तिकडून काहीही करून जनावरे संपादन केली असती. त्यांच्या देखभालीची व्यवस्था केली असती. दुध संकलनासाठी यंत्रणा उभी केली असती. वाहतूक प्रक्रिया, वितरण यासाठी सामुदायिक आाणि कार्यक्षम व्यवस्थाही बांधली असती. शेतकऱ्यात ही ताकद आणि कर्तबगारी आहे याचा पुरावा त्याने अनेकदा दिला आहे. महाराष्ट्रातील अनुभवाने उत्पादन वाढीसाठी व्यवस्थेपेक्षा किंमतच जास्त प्रभावी ठरते हेही सिद्ध केले आहे.

| महाराष्ट्राच्या दूधसंकलनातील वाढ | |
|---|---|
| वर्ष | दूध संकलनातील वाढ (लक्ष लिटर) |
| १९७४-७५ | ०४.७ |
| १९७५-७६ | ०६.५ |
| १९७६-७७ | ०८.५ |
| १९७७-७८ | ०८.५ |
| १९७८-७९ | ०९.० |
| १९७९-८० | ०९.५९ |
| १९८०-८१ | १०.५८ |
| १९८१-८२ | १०.७० |
| १९८२-८३ | ११.५८ |
| १९८३-८४ | १४.०९ |
| १९८४-८५ | १७.४२ |
| १९८५-८६ | २०.६० |
| १९८६-८७ | २३.०० |

दुधाच्या क्षेत्रातील सहकाराचे मूल्यमापन खऱ्या अर्थाने करायचे झाले तर ते दुधाला योग्य भाव मिळवून देण्यात या सहकारी व्यवस्थेने काय हातभार लावला याच्या आधारानेच करावे लागेल. दुधाला रास्त भाव मिळवून देण्याच्या बाबतीत सहकारी संस्थेचे अपयश हे भयानक आहे. एवढेच नव्हे तर सहकारी व्यवस्था ही फार कठोरपणे दुधाला भाव नाकारण्यासाठी वापरण्यात आली आहे.

दुधाला भाव नाकारण्यासाठी सहकारी यंत्रणेच्या साहाय्याने जी दोन हत्यारे प्रामुख्याने वापरण्यात आली त्यातील पहिले म्हणजे शासनाने ठरवायचे दुधाचे भाव. देशात दिले जात असलेले भाव अपुरे आहेत याबद्दल कोठेही मतभेद दिसत नाही. १९७१ ते १९७७ या काळात दुधाच्या किंमती प्रतिवर्षी फक्त २% दराने वाढल्या. १९७७ ते १९८८ या काळांत दुधाच्या भावातील वाढीची गती अधिक तेज झाली (७ %). तरी ती किंमतवाढ इतर वस्तूंच्या किंमत वाढीच्या तुलनेने कमीच होती (९ %). गंमत म्हणजे अन्नधान्यांच्या किंमतीतील वाढीपेक्षाही (८ %) दुधातील भाववाढ कमी होती. १९८४ मध्ये जागतिक अन्न आणि शेती संस्थेने (एफ्.ए.ओ.) भारतातील दूधव्यवसायाचा आढावा घेतला होता. या संघटनेचे मुखपत्र ''फुड आऊटलुक'' (२७/४/१९८२ पान



१५) म्हणते ''वाढत्या उत्पादनखर्चानुसार दुधाचे भाव वाढवून देण्यास सरकारने चालवलेली चालढकल हे भारतातील दूधउत्पादन घटण्याचे एक प्रमुख कारण आहे.''

दुधाचे भाव ठरवताना उत्पादनखर्च कमी ठेवण्यासाठी शासकीय समित्यांनी अनेक हातचलाख्या केल्या. देवतळे समितीच्या अहवालातील काही उदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

१. १५०० लि. दूध देणाऱ्या गायीची किंमत केवळ १५०० रू. धरण्यात आली.

२. गायीला आवश्यक असलेल्या पशुखाद्याची मात्रा तज्ज्ञांनी शिफारस केल्यापेक्षा कमी धरण्यात आली.

३. तसेच जमीन, उपकरणे, साधने, मजुरी यांचा खर्च अत्यंत अपुरा धरण्यात आला.

४. ३९० दिवसांत प्रत्येक गाय एक वेत देऊन तीनशे दिवस दूध देते असे गृहित धरले आहे. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील शेतकरी विद्यापीठात किंवा संशोधन केंद्रातसुद्धा चारशे दिवसापेक्षा कमी काळात एक वेत होत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या घरी हा काळ ५५० ते ६०० दिवसांपर्यंत वाढतो.

५. शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना बैलगाडी मागे शेणखताची किंमत ३ रू. धरणारे शासन दूधउत्पादकाला मात्र बैलगाडीमागे शेणाचेच ३० रू. मिळतात असे दाखवते.

६. एवढी हातचलाखी करून काढलेल्या दुधाचा स्निग्धांश किती याचा काहीही अभ्यास न करता गाईचे दूध ४.५ व म्हशीचे ७.० % स्निग्धांशाचे गृहित धरण्यात आले.

७. महाराष्ट्रातील वास्तविक सरासरी ३.५ व ६.० यापेक्षा जास्त नाही.

गाय स्वस्तात मिळाली, तिने 'चारा वैरण कमी खाल्ले, ती बांधावरच्या झाडाखाली लहानाची मोठी झाली, तिला साप किरडू कधी चावलेच नाही, ती चौथ्याच महिन्यात फळली, तिला औषधपाणी करण्याची वेळ कधीच आली नाही, तरीही तिने ४.५ स्निग्धांशचे भरपूर दूध दिले असे गृहित धरून सरकारने दुधाचे भाव ठरवले. थोडक्यात शेतकऱ्याची गाय आखूड शिंगी, कमी खाणारी आणि जास्त दूध देणारी असे आचरट चित्र शासनाने ठरवून सहकारी व्यवस्थेमार्फत हा भाव राबवला.

एवढ्यानेही भागले नाही. शेतकऱ्याने सहकारी, सरकारी व्यवस्था सोडून

खुल्या बाजारात जाऊन दूध विकू नये यासाठी सरकारने आणखी एक षड्यंत्र रचले. वितरण आणि पणन व्यवस्था त्यासाठी लागणारी आधुनिक साधन सामुग्री आणि तंत्रज्ञान उभे करण्यासाठी पैशाची गरज होती. एरवी कोट्यवधी रुपये इकडे तिकडे उधळणाऱ्या सरकारला दीडशे कोटी रूपये जमा करणे इतके जड झाले की त्यासाठी त्यांनी 'भिकेची कटोरी' आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत फिरवली आणि युरोपातील देशांकडून दुधाची पावडर, चरबी यांच्या फुकट देणग्या स्विकारल्या. ही भुकटी आणि चरबी एकत्र मिसळून दूध तयार करायचे आणि ते दूध विकून जो पैसा येईल तो आधुनिकीकरणाची सामुग्री संपादन करण्यासाठी वापरायचा. या योजनेला 'दुधाचा महापूर' असे मोठे भव्यदिव्य नाव देण्यात आले. तिचा देशभर उदो उदो होत आहे.

युरोपीय देश स्वत:च्या शेतकऱ्यांना भरभक्कम भाव देतात. इतके भरभक्कम की तिथे दुधाचे अतिउत्पादन होते. असे उत्पादन झाले तरी दुधाचे भाव कमी करण्याचा विचार त्यांच्या मनातही येत नाही. उलट भाव कमी करण्यापेक्षा हिंदुस्थानसारख्या देशांना असे अतिरिक्त उत्पादन फुकट वाटून टाकणे ते पत्करतात. याचे इंगित काय असावे? असा विचार या योजनेच्या शिल्पकारांच्या मनास शिवला नाही.

काही महिन्यापूर्वी डॉ. कुरियन यांना मी हा प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले

१.दूध महापूर योजनेच्या आधीही दुधाची भुकटी आणि चरबी यांची आयात होतच होती. ती आयात थांबवून राष्ट्रीय विकासासाठी भुकटी व चरबी यांची देणगी घेतली तर काय बिघडले?

२. परदेशातून मिळालेल्या या दानामुळे देशातील दूधभावावर काही विपरीत परिणाम झालाच नाही.

३. अशा तऱ्हेच्या देणग्या स्वीकारणे दुर्दैवाने अपरिहार्य ठरते; कारण दूधमहापूर योजनेस एरवी आवश्यक तो पैसा गोळा करताच आला नसता.

डॉ. कुरियन यांचे हे तीनही युक्तिवाद तपासून घ्यायला पाहिजेत.

दूध महापूर योजनेच्या सुरुवातीला भुकटी व चरबी यांची आयात आवश्यक होती किंवा नाही हा प्रश्न वादाचा मुद्दा म्हणून सोडून देऊ; पण आज तर काही अशा आयातीची गरज नाही. उलट महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना राज्यात तयार झालेल्या भुकटीची वासलात कशी लावावी ही चिंता पडली आहे. मग अगदी दूध महापूर योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातही भुकटी व चरबीच्या या देणग्या का



स्वीकारल्या जात आहेत?

भुकटी-चरबीच्या देणग्यांचा दुधाच्या अंतर्गत किंमतीवर विपरित परिणाम झाला नाही हा युक्तिवाद आता केंद्र शासनाने नेमलेल्या झा समितीनेच खोडून टाकला आहे. कमिशनच्या अहवालात म्हटले आहे ''... आयात दूध भुकटी फुकट मिळते म्हणून ती फार कमी किंमतीत विकली जाते आणि अशा पद्धतीने दुधाची किंमत खाली ठेवली जाते... ज्या प्रमाणात आयात दुग्धजन्य वस्तूंचा असा वापर करण्यात येतो त्या प्रमाणात या आयातीचा राष्ट्रीय उत्पादनावर पी.एल. ४८० योजनेप्रमाणेच दुष्परिणाम होतो ही टीका योग्य दिसते'' (परिच्छेद ८/६)

यापुढे जाऊन झा समिती म्हणते, ''दुधाच्या भुकटीच्या किंमती आजपर्यंत प्रत्येक वेळी स्थानिक किंमतीपेक्षा कमी ठेवण्यात आल्या हे वास्तविक सत्य आहे. दुधाच्या किंमतीच्या तुलनेतसुद्धा आयात भुकटीच्या किंमती कमीच ठरतील.'' (परिच्छेद ९/१०)

पर्याय नसल्याने नाईलाजाने दुधाच्या भुकटीच्या आणि चरबीच्या देणग्या स्वीकाराव्या लागल्या हा युक्तिवादही मान्य होण्यासारखा नाही. इकॉनॉमिक टाईम्स (२१ मार्च ८७) ब्रुसेल्सहून बातमी देतो की, ''भारताने दूध भुकटी आणि चरबी या स्वरूपात मदत मिळण्याचा आग्रह धरला आहे. याउलट युरोपातील देश रोख मदत देऊ इच्छितात.'' याच वर्तमानपत्राच्या २३ मार्च ८७ च्या अंकात म्हटले आहे की, ''युरोपीय देशांच्या मते अशा तऱ्हेच्या देणग्या कमी करण्यात याव्यात किंवा संपूर्णपणे थांबविण्यात याव्या. कारण भारताला आता त्यांची गरज राहिलेली नाही. एवढेच नव्हे तर अशा देणग्यांमुळे दूधउत्पादनाच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होण्याच्या बाबतीत अडथळे निर्माण होतील.'' पर्याय म्हणून युरोपीय देश रोख रकमेच्या स्वरूपात मदत देऊ इच्छितात; परंतु डॉ. कुरियन मात्र दुधाची भुकटी व चरबी मिळण्याचाच आग्रह धरून बसले आहेत व आवश्यक तर अशा देणग्या मिळण्यासाठी अमेरिका, कॅनडा इत्यादी देशाकडे जाण्याचीही त्यांनी तयारी दाखवली.

निष्कर्ष सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट आहे. दुधाची भुकटी व चरबी हा दूध महापूर योजनेचा दुर्दैवी घटक नाही. तो दूधमहापूर योजनेचा आत्मा आहे. दुधाच्या अंतर्गत किंमती पाडणे आणि संकलन पणन व्यवस्थेच्या आकर्षणाने ग्रामीण भागातील दूध काढून नेऊन ते शहरांच्या स्वाधीन करणे, हे करत असताना तंत्रज्ञांचे आणि नोकरदारांचे साम्राज्य तयार करणे हा सरकारी

धोरणाचा गाभा आहे. शेतकऱ्यांच्या गळी तो उतरवता यावा यासाठी सहकाराचे नाटक उभे करण्यात आले आणि चार पैसे खिशात पडतील या आशेने 'शेतकऱ्यांचे म्होरके' यात सामील झाले. दुधाच्या क्षेत्रातील सहकाराची निष्पत्ती ही अशी आहे.

दूध उत्पादनाची आयात व मिळालेली देणगी (आकडे मेट्रीक टनात)

| वर्ष | दूध भूकटी आयात | दुधाची पावडर | देणगी मिळालेली चरबी |
|---|---|---|---|
| १९७०-७१ | ०८,४१८ | १२,३२० | ०२२९२.००० |
| १९७१-७२ | १५,१०७ | १४,२५० | ०२४५२.००० |
| १९७२-७३ | १६,८७७ | १५,४०५ | ०३७०७.००० |
| १९७३-७४ | १२,१९५ | ०९,०४७ | ०४७८१.००० |
| १९७४-७५ | १५,००० | १३,३०७ | १०८००.००० |
| १९७५-७६ | १५,००० | २७,६२५ | ०७१६५.००० |
| १९७६-७७ | १५,००० | १९,६३४ | ०१७८२.००० |
| १९७७-७८ | १५,००० | ११,८२१ | ०७६७९.००० |
| १९७८-७९ | १५,००० | २८,८९६.२७४ | ०६०३९.१५३ |
| १९७९-८० | १५,००० | ३१,१४६.२५० | १२२९०.७३० |
| १९८०-८१ | १५,००० | १८,८१२.०२५ | ०९३७२.७८० |
| १९८१-८२ | १५,००० | ७७,४६६.७७२ | १४०३५.१७० |
| १९८२-८३ | १५,००० | ३७,५७२.५२६ | ०९३३१.०५० |

*(पूर्वप्रकाशन : साप्ताहिक ग्यानबा, नोव्हेंबर १९८७ ते फेब्रुवारी १९८८)*

■



बत्तीस

# कापूस खरेदी योजना शेतकरी अनुकूल हवी

पावसाळा 'नेमेचि' आजकाल फारसा येत नाही. पावसाचे ढग जमून येण्याच्या आधी चातक पक्षी पाण्यासाठी आक्रोश करू लागतात, अशी कविकल्पना आहे, ते पक्षी प्रत्यक्ष कोणाच्या पाहण्यात येतात किंवा नाही कोण जाणे? पावसाळयात सुरुवातीला बेडक्या बाहेर पडू लागतात. सगळ्यांना पंख फुटू लागतात आणि वर्षभरात कधी दृष्टीला न पडलेले चित्र-विचित्र किडे सर्वत्र घिरट्या घालू लागतात.

पावसाळ्याच्या सुरुवातीला नेमेचि होणाऱ्या गोष्टीमध्ये आता महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या भवितव्याची चर्चा हिचीही नोंद केली पाहिजे. दर वर्षी योजनेसाठी नवी मंजुरी मिळविताना या विषयावर चर्चा चालू होते आणि कशीबशी मंजुरी मिळाली म्हणजे मग झालेल्या चर्चेचा आणि त्या चर्चेच्या निष्कर्षांचा सार्वत्रिक विसर पडतो व 'सुष्टीचे कौतुक' चालू राहते.

**एकाधिकारावरील खुली चर्चा**

यंदाही कापूस एकाधिकार खरेदी योजनेवरील चर्चेला सुरवात झाली. यंदाच्या चर्चेचे वैशिष्ट्य म्हणजे तिला एक खुले स्वरूप मिळाले आहे. याचे श्रेय प्रमुखतः सध्याच्या मुख्यमंत्र्यांकडे जाते. काही महिन्यांपूर्वी एकाधिकार खरेदी योजनेवर लोकांची मते मागविण्यात आली. मते मागविण्यासाठी वर्तमानपत्रात निवेदनेही दिली गेली. जवजवळ अडीचशे व्यक्ती आणि संस्थांनी यावर मते व्यक्त केली. महाराष्ट्राच्या अर्थव्यस्थेतील कापसाचे महत्त्व लक्षात घेता, खरे तर हजारो व्यक्ती आणि संस्थांनी मतप्रदर्शन करायला हवे होते; पण या असल्या कार्यक्रमांकडे लोक आता गंभीरतेने पाहूच शकत नाहीत. अडीचशेच

व्यक्ती-संस्थांनी भाग घेतला; पण अशी मते मागविण्याचे पाऊल शासनाने उचलले हेही काही कमी नाही. जी मते आली त्याच्या आधाराने कापूस एकाधिकार खरेदी योजनेसंबंधी जे दहा प्रस्ताव शासनाने तयार केले ते पुढीलप्रमाणे :

१) कापसाची जात व प्रतवारीत सुधारणा करणे.
२) हमी भाव अग्रीम अधिक किमत देण्याच्या पद्धतीत सुधारणा करणे.
३) ३ टक्के भांडवल उभारणी निधी कपातीबाबत विचार करणे.
४) २५ टक्के किंमत चढउतार निधी कपातीबाबत विचार करणे.
५) सहकारी कर्जाच्या वसुलीबाबत विचार करणे.
६) गावपातळीवर अवैध कापूस खरेदीस आळा घालणे.
७) खुल्या बाजारात अंशतः कापूस खरेदीस परवानगी देणे.
८) कापूस खरेदी केंद्रावरील सुविधांमध्ये वाढ करणे.
९) खरेदी केंद्रावर घातलेल्या कापसाचा त्वरित चुकारा करणे.
१०)योजनेचा प्रशासकीय खर्च कमी करणे.

या प्रस्तावांविषय चर्चा करण्याकरिता आणि एकंदरीतच कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या पुनरावलोकनासाठी एका खुल्या चर्चेचे आयोजन मुख्यमंत्र्यांनी केले. महाराष्ट्रातील चार-पाचशे व्यक्ती या चर्चेस हजर राहिल्या. काही भाषणे झाली. त्यांतील मुद्द्यांवर नोंद घेतली गेली असावी. त्या मुद्द्यांवर विचार करण्याकरिता पुन्हा एक समिती नेमली जाणार आहे. ती समिती येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत आपल्या शिफारशी देईल अशी अपेक्षा आहे; म्हणजे यंदाची कापूसखरेदी सुरू होण्याआधी काही महत्त्वाचे बदल घडवून आणणे शक्य व्हावे, फलटण भागातील कापसाची खरेदी १५ ऑगस्टच्या आसपासच सुरूच होते. इतक्या लवकर काही नवी व्यवस्था अमलात येणे शक्य नाही; पण ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत म्हणजे विदर्भ व मराठवाड्यात कापसाचे पीक बाहेर पडेपर्यंत काही नवी व्यवस्था तयार करणे शक्य व्हावे.

**चर्चा निष्फळ डोंगर पोखरण्याची न ठरो**

दुष्काळ आला म्हणजे दुष्काळ कायमचाच हटवून टाकण्याकरिता उपाययोजना करण्याच्या भीमगर्जना होतात तसेच दरवर्षीचे मुख्यमंत्री या कापूस एकाधिकाराच्या डोकेदुखीचे पुढे सरसावतात. दुष्काळावर जसा शासनाच्या आवेशाचा काही परिणाम होत नाही तसाच कापसाच्या खरेदीव्यवस्थेवरही नाही.



पाच वर्षांपूर्वी विषयाचा सांगोपांग अभ्यास करण्याकरिता हाटे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. समितीवर अनेक तज्ज्ञ मंडळी काम करीत होती. समितीने शेकडो जाणकारांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या. भला दणकट अहवाल लिहिला. त्या अहवालाचे आणि त्यातील शिफारशींचे पुढे काय झाले कोणास ठाऊक? पण त्याचा निकाल लागायच्या आधीच एक अनौपचारिक खुली चर्चा नव्या मुख्यमंत्र्यांनी चालू केली आहे आणि या खुल्या चर्चेची विषयत्रिका हाटे समितीच्या शिफारशींपेक्षा काही फार वेगळी नाही. वर दिलेले दहा प्रस्ताव हाटे समितीच्या शिफारशींपेक्षा काही फार वेगळे नाहीत.

यावेळी एक महत्त्वाचा बदल घडून आला आहे हे खरे. १९७१ मध्ये, कापसाच्या एकाधिकार खरेदीला सुरुवात झाली तेव्हा, सत्तेच्या राजकारणाकरिता का होईना, समाजवादाचा बोलबाला होता, बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले होते. घटनेमध्ये, भारतीय संघराज्य समाजवादी असल्याची तुतारी वाजविण्यात आली होती. त्यामुळे निपजलेली कापूस एकाधिकार खरेदी योजना महाराष्ट्रातील समाजवादी भविष्याची पताका असल्याचे गोड समाधान काहींनी मानले होते. आता परिस्थिती बदलली आहे. आता दिल्लीहून मुक्त अर्थव्यवस्थेचे पोवाडे गायिले जात आहेत. त्यामुळे, सतत तोट्यात चालणाऱ्या असल्या सरकारी योजनांना दिल्लीची मान्यता मिळण्याची कितपत शक्यता आहे याबद्दल जबरदस्त शंका उद्भवल्या आहेत. जे लोक आजपर्यंत एकाधिकाराचे आणि सरकारीकरणाचे कौतुक करीत होते तेच आता एक वेगळी भाषा बोलू लागले आहेत. या सगळ्या, डोंगर पोखरण्याच्या कार्यक्रमातून बाहेर काय निघणार ते हळूहळू स्पष्ट होईल; पण या निमित्ताने कापूस एकाधिकार खरेदी योजनोविषयी काही विचार आणि वास्तव पुढे मांडण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील कापूसशेतीची परिस्थिती**

या संबंधी पहिला एक मुद्दा सर्वांना मान्य व्हावा तो हा की, महाराष्ट्रात कापूस आणि तत्संबंधी व्यापाराकरिता एक विशेष आणि वेगळी व्यवस्था असणे आवश्यक आहे. देशातील कापसाखालील एकूण क्षेत्रफळापैकी ३६ टक्के महाराष्ट्रात आहे. याउलट, महाराष्ट्रातील कापसाचे उत्पादन देशातील एकूण उत्पादनाच्या केवळ १७ टक्के आहे. पंजाबातील ९९.१ टक्के, हरयाणातील ९९.७ टक्के तर राजस्थानातील ९०.४ टक्के कापूसशेती, म्हणजे जवजवळ पूर्णपणे बागायतीः आंध्र प्रदेश (१५ टक्के), कर्नाटक, (२० टक्के), गुजरात

(३० टक्के), तामिळनाडू (४५ टक्के) या राज्यांतही बागायती कापूसशेतीचे प्रमाण मोठे. त्यामानाने महाराष्ट्रात फक्त ४ टक्के कापसाची शेती बागायती आहे, त्यामुळे कापसाचे दर एकरी उत्पादन एक क्विंटलच्या आसपासच राहते. म्हणजे, ओरिसाची उसाच्या बाबतीत जी परिस्थिती आहे तीच महाराष्ट्रात कापसाच्या बाबतीत. किंबहुना, महाराष्ट्राची परिस्थिती त्याहीपेक्षा वाईट आहे. उसउत्पादन बंद पडले तरी ओरिसात काही मोठा हाहाकार उडणार नाही. याउलट महाराष्ट्रातील फार मोठ्या प्रदेशाचे जीवनच कापसावर अवलंबून आहे. ओरिसातील सारखेला लेव्हीची किंमत जादा ठरविण्यात येते त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील कापसाला विशेष चढती आधारभूत किंमत मिळणे आवश्यक आहे; पण अशी काहीच व्यवस्था नाही. महाराष्ट्र उसाच्या बाबतीत अग्रेसर राज्य म्हणून त्याला लेव्ही सारखेची किंमत सर्वात कमी मिळते; पण कापसाच्या बाबतीत महाराष्ट्राची परिस्थिती कमजोर, तेथे मात्र त्याला काही मदतीचा हात मिळत नाही. म्हणून अशा विशेष व्यवस्थेची आवश्यकता आहे. एकाधिकाराने ही गरज पुरी होईल असं वीस वर्षांपूर्वी वाटले होते. ती आशा काही फलद्रूप झालेली नाही. तर मग, अशी काही नवी व्यवस्था तयार करावी लागेल की ज्यामुळे विदर्भ-मराठवाड्यात कापसाची अर्थव्यवस्था तगून राहील.

**एकाधिकारात शेतकऱ्यांना स्वारस्य का असावे?**

नवी व्यवस्था एकाधिकाराची असावी किंवा काय याबद्दल पुष्कळ चर्चा होऊ शकतात. अनेक जुन्या समाजवाद्यांच्या निष्ठा राष्ट्रीयीकरण आणि एकाधिकार अशा संकल्पनांत गुतलेल्या आहेत. सर्व जगभर आता या संकल्पांचा पाडाव झाला असला तरी आपापल्या कोपऱ्यात का होईना, असल्या अर्धवट समाजवादी योजना टिकवून ठेवण्यासाठी त्यांची धडपड चालू आहे. कापूस खरेदीच्या एकाधिकाराविषयी निर्णय करताना दोनतीन गोष्टी महत्त्वाच्या म्हणून लक्षात ठेवल्या पाहिजेत.

कापूस खरेदी योजनेच्या नामाभिधानात एकाधिकार हा शब्द घातला गेला ही मोठी दुर्दैवी गोष्ट आहे. मोरारजी देसाईंची कामाची एक पद्धत असे. चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर देशातील सर्व नागरिक देशसंरक्षणासाठी वेगळेगळ्या मार्गांनी निधी द्यायला स्वयंस्फूर्तीने तयार होते. मोरारजी देसाईंनी अर्थमंत्री म्हणून यासाठी एक योजना तयार केली. त्या योजनेला 'संरक्षण निधी योजना ' किंवा असे काही दुसरे नाव दिले असते तर लोकांचा प्रतिसाद अधिक उत्साहाने मिळाला असता. पण मोरारजींची विचार करण्याची पद्धतच



तिरपागडी. त्यांनी त्या योजनेचे नाव ठेवले 'सक्तीची बचत योजना' या सक्ती शब्दामुळेच ही योजना गर्भात नासली आणि नंतर सोडून देण्यात आली. तसेच एकाधिकार खरेदी योजनेचे झाले आहे. सर्व शेतकऱ्यांनी कापूस या योजनेकडेच विकावा ही संकल्पना मान्य करूनही त्यातील एकाधिकाराची सक्तीची भाषा टाळता आली असती. यंदा या योजनेची पुनर्रचना करण्यात आली तर तिच्या नाभाभिधानातील एकाधिकार शब्द काढून टाकावा आणि यंदा पुण्य शताब्दीच्या निमित्ताने महात्मा जोतिबा फुले यांचे नाव या योजनेला दिले तर तिच्याबद्दलची शेतकऱ्यांच्या मनातील आत्मीयता निश्चित वाढेल.

एकाधिकार लादण्यात एक समजण्यासारखा हेतू असावा. खरेदीची उलाढाल मोठी असेल तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळेल. उलाढाल किरकोळ राहिली तर योजनेकडे कापूस आणून देण्यात शेतकऱ्यांना काही स्वारस्य वाटणार नाही. खेरीज, या योजनेच्या स्वरूपामुळे दूर दूर जागीसुद्धा खरेदी केंद्रे उघडण्याची जबाबदारी येते. उलाढाल छोट्या प्रमाणात राहिली तर खरेदीकेंद्रांचे असे जाळे बनवणे शक्य होणार नाही.

पण, उलाढाल वाढविण्याच्या हेतू एकाधिकाराने सिद्ध होण्याऐवजी नेमके उलटे घडले आहे. उलाढाल वाढविण्यासाठी इतर अनेक कल्पना कार्यवाहीत आणता आल्या असत्या. उदाहरणार्थ, कापसाच्या खरेदीबरोबरच इतर शेतीमालाची खरेदी करण्याचे कामही योजनेकडे घेतले असते तर सध्याच्याच प्रशासकीय खर्चात अधिक व्यापक सेवा शेतकऱ्यांना देता आली असती. योजनेची व्यापकता लक्षात घेता शेतकऱ्यांनी तयार केलेला इतर माल आणि शेतकऱ्यांना लागणाऱ्या निविष्ठा व गृहोपयोगी वस्तम यांच्या खरेदी-विक्री केंद्रांचेही कार्यक्षम जाळे उभे केले असते तर ही योजना शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनू शकली असती. परिणामतः एकाधिकार आणि कापूस हे दोनही शब्द वगळून 'महात्मा जोतिबा फुले शेतकरी सेवा व्यवस्था' उभी झाली असती.

**एकाधिकार कधीच नष्ट झाला आहे**

सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की एकाधिकार हा नष्ट झालाच आहे. दरवर्षी कापसाच्या गाड्या हद्द ओलांडून शेजारच्या राज्यांत जातात, त्यांना फारसे कोणी अटकवत नाहीत. नाक्यावरील पोलिसांना गाडीमागे, ट्रकमागे काय बिदागी द्यायची याचे भाव ठरलेले आहेत. एकाधिकाराची स्थिती मोरारजींच्या दारूबंदीसारखी किंवा त्याहीपेक्षा वाईट झाली आहे. शासनालाही वारंवार या

गोष्टींकडे डोळेझाक करावी लागत, तसे जाहीर करावे लागते. शेतकरी कापूस घेऊन परराज्यांत जात असल्यास त्याला अडकविण्यात येणार नाही असे आश्वासन वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांना अनेकवेळा द्यावे लागले आहे. एकाधिकार या अर्थाने एकाधिकार हा कधीच मेला.

पण, एकाधिकाराचा खरा मारेकरी केंद्र शासनच आहे. १९८५ मध्ये योजनेस मुदतवाढ देताना केंद्र शासनाने एक अट घातली. योजनेतील कापसाची हमी किंमत आधारभूत किमतीपेक्षा जास्त असता कामा नये, ही ती अट. या अटीविरूद्ध शेतकरी संघटनेने सात्यत्याने चार वर्षे आंदोलन चालविले. महाराष्ट्र राज्य शासन शेतकरी संघटनेशी सहमत होते. पण केंद्र शासनासमोर जाऊन निर्भीडपणे बोलण्याची हिम्मत आजपर्यंत एकाही मुख्यमंत्र्यांनी दाखविली नाही. वसंतरावांचा वारसा सांगणारे सध्याचे मुख्यमंत्री असा चमत्कार करून दाखवतात का काय ते पाहायचे आहे.

कापूस एकाधिकार कायद्याची योजनाच मुळी, हमी किंमत आधारभूत किमतीपेक्षा जास्त असणार या गृहीततत्त्वावर मांडलेली आहे. इतर राज्यांतील शेतकऱ्यांना आधारभूत किंमत मिळतेच. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एकाधिकार योजना असूनही तेवढ्याच किमतीची हमी असेल तर त्यांनी सरकारी मक्तेदारीचे ओझे का वाहावे? भांडवल निधीसाठी वर्गणी का द्यावी ? कमीत कमी किंमत इतर राज्यांइतकीच असेल तर तेजीच्या वर्षी मिळणाऱ्या किमतीतला एक हिस्सा किमत चढउतार-निधींसाठी का द्यावा? हमी किंमत तेवढीच; पण सर्वोच्च किमत मात्र तुटपुंजी हे महाराष्ट्रातील शेतकरी कसे मान्य करतील? थोडक्यात, लेखणीच्या एका फटकाऱ्याने केंद्र शासनाने योजनेतील एकाधिकाराचा बट्ट्याबोळ केव्हाच करून टाकला आहे. एकाधिकाराच्या प्रेताला आता कितीही शृंगारले तरी ते जिवंत होण्याची शक्यता नाही. कापूस खरेदीच्या व्यवस्थेचा नवा आराखडा ठरविताना अप्रस्तुत गोष्टींना महत्त्व दिले जाऊ नये. १९७१ मध्ये इंदिरा गांधी समाजवादाची भाषा बोलत होत्या म्हणून समाजवादाची पताका फडकावणाऱ्या एकाधिकार खरेदी योजनेचा उदो उदो आणि दिल्लीहून मुक्त व्यवस्थेचे वारे वाहताहेत म्हणून खुल्या बाजारपेठेचे पोवाडे ही मोठी खतरनाक प्रवृत्ती आहे. एक सूचना अशीही आली आहे की या योजनेतील एकाधिकाराचा भाग आस्ते पाचसहा वर्षात काढून टाकण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन केंद्रशासनास आजच द्यावे. पाचसहा वर्षात दिल्लीचे वारे बदलेले आणि पुन्हा उलटे वारे चालू झाले तर हा प्रयत्न मांडणाऱ्यांच्या फजितीला



पारावार राहणार नाही.

**खुल्या चर्चेची विषयपत्रिकाच अप्रस्तुत**

या योजनेचे उद्दिष्ट आहे आणि तत्त्वज्ञान एकच आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला निदान उत्पादनखर्चाइतका भाव मिळाला पाहिजे आणि त्यासाठी रुई, सरकी, सूत, कापड यांच्या विक्रीतून मिळणाऱ्या मिळकतीचा जास्तीत जास्त हिस्सा कापूस उत्पादकांच्या हातात पडला पाहिजे, शेतकऱ्यांची मागणी एवढीच आहे. हे नियोजनाच्या व्यवस्थेत शक्य असेल, आनंद आहे; खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेत शक्य असेल, अति उत्तम आहे! शेतकऱ्यांचा आग्रह आणि बांधिलकी ही कोण्या तत्त्ववेत्त्याने कोणत्या ग्रंथात मांडलेल्या सैद्धांतिक समाजपद्धतीशी नाही. त्यांची मागणी रास्त भावाची आहे.

या दृष्टीने पाहता मुंबईत मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या खुल्या चर्चेची विषयपत्रिका ही अगदीच अप्रस्तुत आहे. हाटे समिती अशाच तऱ्हेच्या विषयपत्रिकेवर विचार करीत होती तेव्हा शेतकरी संघटनेने त्या समितीला इशारा दिला होता की, ''मूळ विषय टाकून अप्रस्तुत विषयांवरच आपण भर दिलात तर थोड्याच वर्षांत पुन्हा एकदा नवी समिती नेमण्याची वेळ येईल.'' हाटे समितीने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले आणि अपरिहार्यपणे तिचा अहवाल बासनात नाही तर कचऱ्याच्या पेटीत गेला आणि आज फिरून एकदा नव्याने ऊहापोह करावा लागत आहे. आणि मोठी विचित्र गोष्ट अशी आहे की या नव्या ऊहापोहातही फिरून तीच विषयपत्रिका पुढे येत आहे. या पत्रिकेतील प्रस्तावांचे महत्त्व नाही असे नाही, कापसाची जात व प्रतवारी यांत सुधारणा करणे अगदी महत्त्वाचे आहे; सहकारी कर्जाच्या वसुलीचे जोखड या यंत्रणेने का स्वीकारावे याला काही उत्तर नाही; खरेदी केंद्रावरील सुविधा वाढविल्या पाहिजेत, चुकारा त्वरित झाला पाहिजे हेही खरे; पण घातक रोगाने जीव जातो का राहतो अशा परिस्थितीत असलेल्या रोग्याच्या इतर किरकोळ आजारांवर औषधोपचार करीत राहणे आणि सर्वांत महत्त्वाच्या प्राणघातक रोगाकडे दुर्लक्ष करणे यात काही शहाणपणा नाही.

**भांडवलनिधीसाठी कपात**

भांडवलनिधीकरिता करण्यात येणारी तीन टक्के कपात हा मोठा वादाचा विषय आहे. शेतऱ्यांकडून या रकमेची आजपर्यंत वसुली करण्यात आली; पण या रकमेचा सूतगिरण्या काढणे किंवा इतर भांडवली खर्चासाठी उपयोग करण्यात आला नाही. या रकमेचे नेमके काय झाले हे सांगणेच कठीण आहे.

मधल्या तोट्याच्या काळात ही रक्कम तोटा भरून काढण्याकरिता वापरली हे उघड आहे. आज या निधीत शिल्लक बाकी शून्य आहे, या रकमेवर शेतकऱ्यांना कायद्याप्रमाणे व्याज मिळायला पाहिजे. गेल्या वर्षापर्यंत शेतकऱ्यांना व्याज देण्यात आले नाही. शेतकऱ्यांनी या व्याजावर आता पाणी सोडले म्हणजे, एका अर्थाने शेतकऱ्यांनी भांडवलनिधीकरिता तीन टक्क्यांपेक्षा जास्त कपात सहन केली आहे. वर्षापलीकडे महामंडळाने भांडवलनिधीतील रकमेवर व्याज द्यायला सुरूवात केली. विनोदाचा भाग असा की त्या वर्षी व्याजाची चुकविलेली रक्कम आणि भांडवलनिधीकरिता केलेली कपात या रकमा जवळजवळ सारख्या होत्या. पहिल्या वर्षी वेगळे चेक काढण्याचा अनावश्यक खर्च तेवढा झाला. त्यानंतरच्या वर्षी वेगळे चेक काढले गेले नाहीत, हे खरे; त्यामुळे व्याजाची रक्कम चुकती करण्यासाठी प्रशासकीय खर्च काही फारसा आला नसावा; पण तरीही व्याजाची रक्कम आणि भांडवलनिधीसाठी कपात यातील फरक आता इतका किरकोळ आहे की हा सर्व 'अव्यापारेषु व्यापार' शेतकऱ्यांच्या मनात चीड निर्माण करण्यापुरताच उपयोगी आहे.

भांडवली निधीतून सूतगिरण्या वगैरे काढल्या म्हणजे शेतकऱ्यांच्या कापसाला काही चढा भाव मिळणार आहे असे नाही. त्यामुळे भांडवलनिधीचा उपयोग कसा करावा हाही एक चर्चेचा विषय होऊ शकतो. सहकारी क्षेत्रात गिरण्या काढण्यापेक्षा या निधीच्या उपयोगाने गावोगावी शेतकऱ्यांना, लहानमोठे रेचे घालण्यास खुलेआम परवानगी दिली तर शेतकऱ्यांचा निदान ज्यादा रोजगाराच्या स्वरूपात तरी फायदा होण्याची शक्यता आहे. आजमितीस, असे रेचे टाकण्याची बंदी आहे. एवढेच नवे तर जुन्या परवानाधारकांचा वीजपुरवठा तोडण्याचा आगाऊपणाही महाराष्ट्र राज्य वीज मंडळामार्फत केला जातो.

**किमत चढउतार निधीचे प्रयोजन**

अंतिम किमत व हमी किमत यांच्यातील तफावतीपैकी एक हिस्सा (२५ टक्के) किमत चढउतार निधीच्या रूपाने बाजूला ठेवणे ही कल्पना स्वागतार्ह आहे. कपात २५ टक्क्यांची असावी का कमीजास्त असावी हे अनुभवांनी निश्चित करता आले असते. चांगल्या बरकतीच्या वर्षी मिळालेल्या लाभातून एक हिस्सा मंदीच्या किंवा दुष्काळाच्या वर्षाकरिता राखून ठेवणे यात वित्तीय सुज्ञपणा आहे; पण या सर्वच योजनेला केंद्र शासनाने सुरुंग लावला. हमी किंमत आधारभूत किमतीपेक्षा जास्त असू नये असे ठरले की किमत चढउतार निधीचे काही प्रयोजनच राहत नाही. कारण, शेतकऱ्यांना किमान आधारभूत



किमत पोहोचविण्याची कायदेशीर जबाबदारी सरकारवर आहे व त्यासाठी आवश्यक ती रक्कम ही सरकारी खजिन्यातून उपब्ध करून दिली पाहिजे. त्यासाठी किंमत चढउतार निधीचा वापर करणे आणि त्याचा बोजा शेतकऱ्यांवर टाकणे बेकायदेशीरच नव्हे तर अन्याय्य आणि अनैतिक आहे. जर किंमत चढउतार निधीचा उपयोग आधारभूत किमतीपेक्षा काही जास्त किंमत शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्याकरिता होणार असेल तर या निधीस काही प्रयोजन आणि अर्थ राहील; पण मग त्याकरिता कायद्यातील तरतुदीत बदल करावा लागेल आणि मग या कामाकरिता करावयाची कपात किती टक्के असावी याचा वेगळा आणि सविस्तर अभ्यास करावा लागेल.

किंमत चढउतार निधीबाबत आणखी एक बारीक पण महत्त्वाचा श्लेष निर्माण झाला आहे. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या दबावामुळे केंद्र शासनाने विक्रीच्या वेळी आधारभूत किमतीखेरीज २० टक्के किंवा अधिक रक्कम अंतरिम बोनस म्हणून जाहीर करण्याची पद्धत पाडली आहे. केंद्र शासनाच्या हमी किमतीबाबतच्या आदेशाचे यामुळे काही प्रमाणात परिमार्जन होते; परंतु किंमत चढउतार निधीबाबत मात्र एक विपरीत परिणाम घडून आला आहे. या निधीकरिता २५ टक्यांची कपात अंतिम किमत आणि आधारभूत किमत अधिक बोनस यातील फरकावर आकारली जाते. म्हणजे, निधीचा शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयोग कमी आणि निधीकरिता करण्यात येणारी कपात जास्त अशी विचित्र परिस्थिती तयार झाली आहे आणि तरीही शासन त्याकडे लक्ष देत नाही. हा विषय महत्त्वाचा आहे काही शंका नाही परंतु योजना जिवंत ठेवण्याकरिता हा विषयसुद्धा मूलभूत महत्त्वाचा ठरत नाही. तरी खुल्या चर्चेच्या विषयपत्रिकेवर या मुद्द्यांचा अंतर्भाव आहे हे योग्यही आहे; पण सर्वात जास्त महत्त्वाच्या मुद्द्यांच्या अंतर्भाव या पत्रिकेत नाही ही मोठी उल्लेखनीय गोष्टी आहे.

**हितसंबंधी स्वारस्य**

हा सारा प्रकार मुल्ला नसिरुद्दीनच्या प्रख्यात गोष्टीतल्यासारखा आहे. अंगठी हरवली जंगलात; पण मुल्लासाहेब अंगठी शोधतात घरासमोरील स्वच्छ सारवलेल्या अंगणात. कारण काय तर, अंगण शोधण्यासाठी सोयीस्कर आहे, साफसुथरे आहे, चांगल्या प्रकाशात आहे! शासनाला आणि योजनेतील कर्मचाऱ्यांना ही योजना चालू राहायला हवी आहे. त्यात त्यांचे हितसंबंध गुंतले आहेत; पण या योजनेची कार्यवाहीच अशी आहे की ती जशीच्या तशी

पुढे चालू ठेवणे शक्य नाही. म्हणून योजनेत सुधारणा करण्याचा आव आणून प्रत्यक्षात मात्र काही थातुरमातुर जुजबी मलमपट्ट्या करून योजना शक्य तो आहे तशीच पुढे चालवायची यात अनेक हितसंबंध गुंतले आहेत.

योजनेतील नोकरदारांची संख्या फार मोठी आहे. वर्षातला निम्मा काळ काम, बाकी आराम आणि इतर सरकारी नोकरांच्या बरोबरीच्या दाम आणि वर शेतकऱ्यांकडून चेपून काढायला पाहिजेत तितके छदाम अशी त्यांची मोठी खुशहाल परिस्थिती आहे. हे बहुतेक नोकरदार पुढाऱ्यांच्या ओळाखी शिफारशीनेच लागलेले आहोत. सध्याची अकार्यक्षम व्यवस्था तशीच चालू राहण्यात या मंडळींचा मोठा हितसंबंध गुंतलेला आहे. या योजनेत बदल करायचा झाला तर नोकरदारांची संख्या थोडीफार कमी करावी लागेल. निदान त्यांच्या कामाचे स्वरूप बदलावे लागेल. अशा कोणत्याही योजनेस या मंडळींचा विरोध होणार आहे.

सहकारी व्यवस्थेतील पुढारी मंडळींचाही या योजनेत सुधारणा करण्यास विरोध राहणार आहे, 'विदर्भाची अस्मिता' एकाधिकाराशी गुंतवून या मंडळींनी विदर्भात असे काही भीतीचे, दहशतीचे वातावरण तयार केले आहे की एकाधिकाराविरुद्ध बोलायला भले भले घाबरतात. एकाधिकार खरेदी योजनेमुळे सत्ताधारी पक्ष परिपुष्ट व्हायला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्गानी शंभरेक कोटी रुपयांची तरतूद होते. अर्थातच, सद्यः परिस्थिती बदलण्यात हे पुढारी मोठा उत्साह दाखविण्याची शक्यता नाही.

**एकाधिकार –गिरणीमालकांचे मोफत गोदाम**

कापूस एकाधिकार खरेदी योजनेत गुंतलेला तिसरा संबंध अधिक नाजूक आहे. कापसाची एकाधिकार खरेदी फक्त महाराष्ट्रात असल्यामुळे तिला देशभरचे गिरणीमालक विरोध करतात आणि मुंबई परीसरातील गिरणीमालकही या योजनेला कोठे पाठिंबा देताना दिसत नाहीत; पण 'अंदर की बात ' फार वेगळी आहे. कापसाची एकाधिकार खरेदी झाल्यापासून मुंबईतील गिरण्यांना आता पूर्वीप्रमाणे तीन-चार महिन्यांचा कापसाचा साठा करावा लागत नाही आणि अशा साठ्यासाठी त्यांचा पैसा गुंतूनही पडत नाही. एकाधिकाराच्या विक्री व्यवस्थेमुळे नेमका पाहिजे तेवढाच कापूस पाहिजे त्यावेळी खरेदी करून त्यांचे चालू शकते. कापसाचा साठा करण्याचा त्यांचा सगळा खर्च वाचला आहे आणि तो एकाधिकार खरेदी योजनेच्या म्हणजे शेतकऱ्यांच्या बोकांडी बसला आहे. मुंबईतील गिरण्यांचे १९७१ च्या पूर्वीचे व नंतरचे ताळेबंद



तपासले म्हणजे हे स्पष्ट होईल.

नोकरदार, पुढारी आणि गिरणीमालक यांचा एकाधिकारामुळे फायदा झाला; पण ज्याच्या हिताकरिता मूलतः ही योजना सुरू झाली त्याच्या पदरात काय पडले? हा विषयच मुळात टाळण्याचा प्रयत्न होतो आहे. जेथे हा विषय टाळणे शक्य नाही तेथे दिशाभूल करणारी आकडेवारी शासनाने खुल्या चर्चेसाठी तयार केलेल्या दस्तऐवजात दिली आहे. यासंबंधी काही मुद्दे ठामपणे पुढे मांडणे आवश्यक आहे.

**कापसाचे भाव**

१. बहुतेक वर्षी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाकरिता मिळालेला भाव परप्रांतातील सरासरी भावापेक्षा कमी राहिलेला आहे. या विषयावर शेतकऱ्यांच्या मनात कोणताही संदेह नाही; पण शासन आणि योजनेतील अधिकारीवर्ग मात्र सत्य परिस्थिती नाकारू पाहतात. परप्रांतातील चढ्या किमती काही काळापुरत्याच मर्यादित असतात. वर्षभरातील भारित सरासरी (weighted average) काढल्यास परप्रांतातील किमतीची वर्षभरातील भारित सरासरी महाराष्ट्रातील अंतिम किमतीपेक्षा कमी असते असा कांगावा करण्यात येतो. खुल्या चर्चेकरिता शासनाने तयार केलेल्या पुस्तिकेत परिशिष्ट ३ मध्ये या संबंधी काही आकडेवारी देण्यात आली आहे. मिळालेल्या थोड्या काळात सर्व आकडेवारी तपासून घेणे काही शक्य झालेले नाही; पण आंध्र प्रदेशातील अडोनी बाजारपेठेतील एच-४ कापसाच्या किमती केंद्र शासनाच्या शेतकी संख्याशास्त्रीय निदेशकांनी प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांच्याशी तुलना करता १९८५ -८६ चे एक वर्ष सोडल्यास बाकी सर्व वर्षी अडोनीतील कापसाच्या सरासरी किमती महाराष्ट्रातमील अंतिम भावापेक्षा वरचढ होत्या हे स्पष्ट दिसते. अर्थातच, तेथील चढ्या किमती महाराष्ट्रात मिळणाऱ्या भावापेक्षा कितीतरी जास्त होत्या

**रुईच्या किमती**

२. एकाधिकार खरेदी योजनेने विकलेल्या रुईच्या किमती रुई व्यापारातील किमतीपेक्षा कमी आहेत. महाराष्ट्रातील एकाधिकार व्यवस्थेच्या हाती देशातील एकूण उत्पादनापैकी १५ ते २० टक्के कापसाचा साठा येतो. एकाधिकार खरेदी योजनेचे क्षेत्र देशातील वस्त्रोद्योगाच्या केंद्राच्या जवळ आहे हे लक्षात घेता या योजनेस इतरांच्या तुलनेने खूपच चांगल्या किमती मिळायला पाहिजे; पण प्रत्यक्षात परिस्थिती उलटी आहे. १९७४ ते १९८७ या काळात रुई आणि सरकी

यांकरिता एकाधिकार योजनेस मिळालेल्या सरासरी किमती व गुजरातमधील सहकारी संस्थेला मिळालेल्या किमती याची तुलना केल्यावर हे लक्षात येते.

महाराष्ट्र कापूस एकाधिकार खरेदी योजनेस मिळालेल्या किमती दहा ते चाळीस टक्क्यांपर्यंत कमी आहेत. गुजरातमधील कापूस हा जास्त चांगल्या जातीचा (एस-४) हे लक्षात घेताही महाराष्ट्राच्या विक्री व्यवस्थेत फार मोठे दोष आहेत हे उघड आहे.

ही परिस्थती शेतकरी संघटनेने पूर्वीच त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या नजरेस आणून दिली होती. विक्री समितीवर देखरेख ठेवण्यासाठी शेतकरी संघटनेचे दोन प्रतिनिधी नेमले जावेत ही सूचना त्यांनी मान्य केली. या सदस्यांची उपस्थिती विक्री समितीस सोयीस्कर नव्हती हे उघड आहे. श्री. शरद पवार मुख्यमंत्री झाल्याबरोबर ही जाचक देखरेख त्यांनी बंद करून टाकली.

**प्रक्रिया घट**

३. कापसाची रुई बनविताना होणारी घट ही महाराष्ट्रातील एकाधिकार व्यवस्थेत अतोनात जास्त आहे. पूर्वी ही घट चार ते पाच टक्के असल्याचे मान्य केले जात असे. आता आकड्यांची फिरवाफिरवी करून घट दोन टक्क्यांच्या आसपास असल्याचे दाखविले जाते. ही नवी आकडेवारी खरी आहे असे गृहीत धरले तरीसुद्धा महाराष्ट्रात घट कमी करण्यास पुष्कळ वाव आहे .

**प्रशासकीय खर्च**

४. कापसाची खरेदी ते रुईची विक्री सर्व कामकाजाकरिता लागणारा प्रशासकीय खर्च महाराष्ट्र कापूस एकाधिकार खरेदी योजनेत वारेमाप जास्त आहे. खाजगी व्यापारात हा खर्च ७० ते ८० रुपये प्रति क्विंटल धरला जातो. महाराष्ट्र कापूस एकाधिकार खरेदी योजनेत आज हा खर्च प्रति क्विंटल १५० रुपयांच्या आसपास आहे. म्हणजे नोकरशहांची उघळपट्टी शेतकऱ्यांच्या तोंडचे ७५ रुपये कापसाच्या दर क्विंटलमागे घेऊन जाते.

**रुई विक्रीतून शेतकऱ्यांना मिळालेला तुटपुंजा हिस्सा**

५. रुईच्या विक्री किमंतीतील जास्तीत जास्त हिस्सा शेतकऱ्यांच्या पदरी पडावा हे एकाधिकार खरेदी योजनेचे मूळ उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात जे घडले ते अगदीच उरफाटे. रुईची किमत एकाधिकार व्यवस्थेला कमी मिळते हे वर दाखविलेच आहे; पण या कुरतडलेल्या किमतीतीलही शेतकऱ्याच्या पदरी पडणारा हिस्सा हा, एखाद दुसरे वर्ष सोडल्यास, घटत चालला आहे. वेगवेगळ्या



तज्ज्ञांनी केलेल्या अभ्यासाप्रमाणे असे आढळून आले आहे की रुईच्या किमतीतील शेतकऱ्यांना मिळणारा हिस्सा कापसाची एकाधिकार खरेदी सुरू होण्यापूर्वी किती तरी जास्त होता. (१९६२ ते १९६८ पर्यंत धुळे, शिरपूर, पाचोरा व जळगांव येथे शेतकऱ्यांना ८८ ते ९३ टक्के इतका हिस्सा मिळाला. या उलट महाराष्ट्र कापूस एकाधिकार योजनेने दिलेला हिस्सा १९७२ ते १९९१ या काळात अनुक्रमे ७६, ६१, ८८, ६४, ४४, ६८, ८५, ८४, ८०, ९४, ८७, ७८, ९६, ११९, ६५, ५२, ६२, ६९, ६० इतका राहिला आहे)

दुसऱ्या काही तज्ज्ञांनी केलेल्या अभ्यासात गुजरातमधील परिस्थितीही सर्वसाधारपणे अशीच होती : म्हणजे गुजरातच्या सहकारी व्यवस्थेत शेतकऱ्याच्या पदरी रुईच्या किमतीतील ९२ ते ९३ टक्के रक्कम पडत असे व खाजगी व्यापारात ही टक्केवारी ८० पेक्षा कमी होती. मुळात तक्रार ही होती. खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारे शोषण दूर करण्याकरिता एकाधिकार व्यवस्था सुरू करण्यात आली. सरासरीने ६७ टक्के इतका हिस्सा एकाधिकाराने शेतकऱ्यांना दिला.

**योजनेत शेतकऱ्यांना अनुकूल बदलाची संधी**

महाराष्ट्र कापूस एकाधिकारी खरेदी योजनेचे मूल्यमापन करताना आणि विक्री पुनर्बांधणी करताना अनेक गोष्टींकडे लक्ष घायला पाहिजे. पण त्यांतील सर्वात महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे विक्री व्यवस्था सुधारणे आणि रुईविक्रीतील जास्तीत जास्त हिस्सा शेतकऱ्याच्या पदरी पडेल, उधळला जाणार नाही अशी व्यवस्था करणे. अशी सुधारणा सध्याच्या सरकारी व्यवस्थेत शक्य आहे काय? यात अशक्य असे काही नाही. महाराष्ट्रातील ही खरेदी व्यवस्था टिकली पाहिजे. एकवीस वर्षे तिला मक्तेदारीचे संरक्षण मिळाले आहे. आता खुल्या बाजारपेठेत उतरून कार्यक्षमपणे आणि सचोटीच्या आधाराने इतरांशी स्पर्धा करण्याची तयारी तिने ठेवली तर महाराष्ट्रातील शासकीय कापूस खरेदी यंत्रणेस भवितव्य आहे आणि एकाधिकार खरेदीच्या आजवरच्या जाचातून मुक्त होऊन शेतकरी 'महात्मा जोतिबा फुले शेतकरी सेवा व्यवस्थे'त उत्साहाने व अहमहमिकेने सहभागी होतील. खुल्या बाजारपेठेचे वारे देशभर वाहत असताना कापसाची एकाधिकार खरेदी आणि शेतकऱ्यांना रुई करण्यासाठी घरगुती रेचे टाकण्याचीसुद्धा बंदी हे कोण चालवून घेणार? खुल्या चर्चेचे आयोजन करुन मुख्यमंत्र्यानी मोठ्या अपेक्षा तयार केल्या आहेत; पण त्यातून निराशा पोटी आली तर शेतकरी आंदोलनाचा नवा उद्रेक चार महिन्यांच्या आत प्रत्यक्ष

समोर येईल, हेही तितकेच खरे.

*(महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई येथे दि. २६ मे १९९२ रोजी एकाधिकार कापूस खरेदी योजना चर्चा आयोजित करण्यात आली होती. श्री. शरद जोशी यांनी या चर्चेच्या वेळी मांडलेले विचार)*

*(शेतकरी संघटक, ६ जून १९९२)*

■



तेहेतीस

# कापूस एकाधिकाराचा मृत्युलेख

महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदीचा अखेरीस अंत झाला. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचे सचिव श्री. सुब्रमण्यम् यांनी तशी अधिकृत घोषणा आता केली आहे.

एकाधिकार योजनेचे एक जनक यशवंतराव मोहिते यांनीच एकाधिकाराच्या संकल्पनेचे रहस्य अजाणता प्रामाणिकपणे सांगून टाकले होते. ''त्या काळात इंदिरा गांधींची राजवट होती, समाजवादाचा बोलबाला होता म्हणून एकाधिकाराची स्थापना झाली.''

महाराष्ट्र राज्याने पहिले पाऊल उचलले, पाठोपाठ इतर राज्येही आपापल्या प्रदेशांत कापूस एकधिकार खरेदी योजना सुरू करतील अशी अपेक्षा होती. महाराष्ट्राखेरीज इतर कोणत्याही राज्याने तसा प्रयत्नसुद्धा केला नाही. गुजरात राज्यात कापूस खरेदीत सहकारी चळवळीचे प्रभुत्व आहे. त्यामुळे गुजरातेत तशी गरज भासली नाही. हरियाणा, पंजाब आणि आंध्र प्रदेश या तीन, कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या राज्यांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (CCI)ची खरेदी खाजगी व्यापाऱ्यांच्या बरोबर बऱ्यापैकी कार्यक्षमतेने काम करत असल्याने एकाधिकाराचा समाजवादी उत्साह त्यांनी कधी दाखवला नाही. महाराष्ट्रात जन्मलेली एकाधिकार योजना महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिली. या भौगोलिक मर्यादेतच एकाधिकार योजनेच्या अपयशाचे एक कारण आहे.

शेतकऱ्यांकडून भांडवल मिळवून कापसापासून ते कापडापर्यंत विविध उद्योगांची एक उतरंड तयार करावी अशी ही योजनेच्या जनकांची कल्पना होती. त्यामुळे कापसाच्या प्रदेशात साखर साम्राज्याच्या तोडीस तोड अशी व्यवस्था तयार होईल अशीही एक आशा. दुर्दैवाने, कापूस एकाधिकार योजना कापूस खरेदीपुरतीच मर्यादित राहिली. शेतकऱ्यांकडून जमा केलेले भांडवल

उधळमाधळीत संपून गेले. एकधिकाराच्या अपयशाचे हे दुसरे कारण.

कास्तकारांनी पिकवलेल्या पांढऱ्या सोन्याला योग्य भाव मिळावा ही एकाधिकाराची महत्त्वाची प्रेरणा. पुलोद सरकाराच्या कारकीर्दीत अखिल भारतीय आधारभूत किमतीपेक्षा निदान २० टक्के अधिक रक्कम हमी किमत म्हणून मिळावी या तत्त्वालाही मान्यता मिळाली; पण प्रत्यक्षात दोन चार वर्षांचा अपवाद सोडला तर एकाधिकाराखाली मिळालेली किमत ही अगदी शेजारच्या राज्यांत खुल्या बाजारात मिळालेल्या किमतीच्या तुलनेने कमी राहिली. राजीव गांधींच्या काळात तर केंद्र शासनाने हमी किमत आणि आधारभूत किंमत यांच्यात तफावत असताच कामा नये असा कडक नियम महाराष्ट्र शासनावर लादला. त्यामुळे एकाधिकार खरेदीची कल्पनाच निरर्थक ठरली होती. महाराष्ट्राखेरीज इतर राज्यांतील शेतकरी पाहिजे तेथे कापूस विकू शकतात. CCI, खाजगी व्यापारी यांतून खरेदीदाराची निवड करू शकतात. त्यांना कायदेशीर हक्काने मिळणारी आधारभूत किंमत आणि महाराष्ट्रातील एकाधिकाराचे कुंकू लावलेल्या शेतकऱ्याला मिळणारी किंमत भांडवली कपात तसेच किमत चढउतार निधी यांचा बोजा सोसूनही सारखीच राहावी हा नियम म्हणजे सरकारी अजागळपणाचाच पुरावा. किंमत चढउतारनिधी या कल्पनेला राजीव गांधींच्या आदेशानंतर काही अर्थच उरला नाही आणि तरीही शासनाने ही कपात चालूच ठेवली.

महाराष्ट्र शासनाच्या एकाधिकार खरेदीत शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळण्याची काहीच शक्यता नव्हती. एकाधिकार खरेदीत राजकीय वशिलेबाजीपोटी भरमसाट नोकरीभरती झाली. कापूस खरेदी हे हंगामी काम; पण त्यासाठी सरकारी धबडग्यात वर्षभर पगार खाणारा पूर्णवेळ नोकरवर्ग, कापसातून रूई करण्यासाठी येणारा खर्च अवाढव्य, त्यात होणारी कापसाची घट सर्वात अधिक. एवढेच नव्हे तर, देशातील एकूण उत्पादनाच्या जवळजवळ २० टक्के माल हाती येऊन विक्रीची किमत मात्र किरकोळ व्यापाऱ्यांना मिळणाऱ्या किमतीच्या तुलनेने कमीच. अशी ही अजागळ व्यवस्था केवळ सरकारी आधारावर चालली, एकाधिकारातील नोकरदारांच्या हितासाठी ती चालली.

कापसाची निर्यात हे कधीतरी चालून येणारे भाग्य. कापसाचे पीक तयार होण्याची वेळ आली की यंदा कापसाचा तुटवडा आहे असा गहजब गिरणी मालकांमार्फत त्यांचे मुखंड टेक्स्टाईल कमिशनर यांच्यापासून सर्वांनी चालू



करायचा, मग जसजसे वर्ष पुढे जाईल तसतसे उत्पादनाचे आकडे वाढत जाणार आणि शेतकऱ्याच्या हाती काहीही माल राहिला नाही तर कधीतरी निर्यातीचा कोटा सरकारच्या मेहरबानीने सुटणार. निर्यात करायची ठरली की ती शेवटपर्यंत पार पडेल याची कहीच खात्री नाही. कापसाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हिंदुस्थानची प्रतिष्ठा शून्य. त्यामुळे हिंदुस्थानातील व्यापाऱ्यांच्या परदेशी भाऊबंदांनी, निर्यात कोटा जाहीर झाल्याबरोबर काही खरेदी केली तर त्यालाच निर्यात म्हणायचे अशी सारी परिस्थिती.

याउलट, गिरणी मालकांनी जरा अरडाओरडा सुरू केला की तातडीने कापसाच्या आयातीचा निर्णय घेऊन तो लागोलग अमलातही यायचा. शेतीमालाच्या शोषणाचे सरकारी धोरण सर्वच शेती-उत्पादनांना लागू आहे हे खरे; पण कापसाइतके शोषण दुसऱ्या कोणत्याच मालाचे झाले नाही. डंकेल प्रस्तावावर सही करताना हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्रालयाने कापसावरील उणे सबसिडी सर्वात अधिक म्हणजे-२०५.८२ टक्के असल्याचा कबुलीजबाब दिला आहे. असल्या सरकारी सुलतानशाहीत एकाधिकार योजना प्रामाणिकपणे राबवली गेली असती तरी यशस्वी ठरली नसती. महाराष्ट्र शासनाची गबाळग्रंथी आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली एकाधिकार योजना यशस्वी होण्याची मुळातच काही शक्यता नव्हती.

निर्यातीचा कोटा जेव्हा जेव्हा जाहीर होई तेव्हा तेव्हा, खरे म्हटले तर महाराष्ट्र एकाधिकार खरेदीस अग्रहक्काने निर्यातीचा कोटा मिळायला पाहिजे होता; पण असे कधी घडले नाही. गुजरात, हरियाणा, पंजाब येथील कापूस निर्यातीत पुढे राहिला. त्यामुळे निर्यातीतील वाढीव किमतीचा फायदा महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यास कधीतरी नवसासायासाने मिळाला.

एकाधिकार खरेदीचा एक मोठे लाभधारक एकाधिकाराचा नोकरवर्ग पण त्याहीपेक्षा मोठा फायदा उठवला तो गिरणी मालकांनी. एकाधिकाराच्या सरकारी यंत्रणेत बाजारातील चढउताराचा फायदा घेऊन विक्री करणे हे कठीणच. त्याऐवजी लालफितीला पेलवणारी एक पद्धती ठरवण्यात आली. आठवड्यातून एकदा कोटेशन मागवून विक्री करायची. आठवड्याच्या आठवड्याला कापूस मिळण्याची खात्री मिळाल्यामुळे गिरण्यांना रूईचा साठा करण्याची काहीच आवश्यकता राहिली नाही. कच्च्या मालाच्या साठ्यात अडकून पडणारे सगळे भांडवल मोकळे झाले आणि बाजारपेठेपेक्षा पडत्याच भावाने खरेदी करण्याची परिपाठी पडून गेली. गिरणी मालक खूश झाले. विक्री समितीच्या श्रेष्ठींच्या

दाही बोटांवर हिऱ्यांच्या अंगठ्या चढल्या. या सगळ्याचा बोजा कापूस उत्पादक कास्तकाराच्या माथ्यावर पडला.

कापूस उत्पादकांना मिळणाऱ्या किमती कमी आहेत हे सरकारदेखील मान्य करीत असे. बरोबरच मोठ्या धिटाईने कापसाच्या पडेल भावांचे समर्थनही करीत असे. कापसाचे भाव वाढले तर सुताचे भाव वाढतील आणि त्यामुळे गरीब बिचाऱ्या हातमाग कामगारांवर उपासमारीची वेळ येईल असा मोठा कळवळ्याचा देखावा ही मंडळी करत. हातमाग धंद्यातील उत्पादन गिरणीच्या मालाच्या स्पर्धेत उतरले तर ते कधीच किफायतशीर ठरणार नाही. उलट तेथे कलाकुसरीचे काम झाले तर चांगले उत्पादन मिळवता येईल याची जाणीव हातमागाच्या मुखंडांनी कधी दाखवली नाही. आम्ही अजागळपणे न परवडणारा धंदा चालवू आणि त्याचा बोजा शेतकऱ्यांनी उचलला पाहिजे असा त्यांचा अट्टाहास.

एकाधिकारीला काँग्रेसजनांचा पाठिंबा राहिला. नोकरदाऱ्यांच्या संघटनांचा पाठिंबा राहिला. गिरणी मालकांना तर ही योजना फारच प्यारी. शेतकऱ्यांच्या हिताचे नाव घ्यावे, समाजवादाचा जयघोष करावा आणि आपल्या तुंबड्या भरून घ्याव्या असा हा कार्यक्रम वर्षानुवर्षे चालला! शेतकऱ्यांनी एकाधिकाराला विरोध केला. आपला माल इतर राज्यांत मोठ्या प्रमाणावर नेला. सरहद्दीवर वाहतुकीची बंदी होती हे खरे; पण पोलिसांचे हात ओले केले की कापसाचा ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडी खुशाल पुढे जाऊ शके. महत्त्वाच्या नाक्यावरील पोलिस अधिकाऱ्याच्या नेमणुकीचा दरच लक्षावधी रुपयांवर गेला. नोकरदार, गिरणी मालक, हातमागवाले यांच्याबरोबर लाचखाऊ पोलिस अधिकाऱ्यांतही ही योजना लोकप्रिय झाली.

राज्यकर्त्या पक्षांचे हे चरण्याचे आवडते कुरण झाले. योजनेमुळे पक्ष कार्यकर्त्यांना शंभरेक कोटी रुपये पचवण्याची तरतूद झाली. भारतीय जनता पार्टी विरोधात असताना एकाधिकाराच्या विरुद्ध बोले. शासनात आल्यावर त्यांचे साहजिकच मतपरिवर्तन झाले. एकधिकार योजना शेतकऱ्यांच्या हिताची असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला. केंद्र शासनाने योजना रद्द केल्याचे जाहीर केल्यानंतरही खरेदी चालू ठेवण्याची घोषणा संबंधित मंत्र्यांनी केली आहे. थोड्याच दिवसांत एकाधिकाराचे नोकरवर्ग आंदोलनास सुरुवात करतील. राज्यात काँग्रेस शासन असते तर कदाचित् आणखी एक वर्ष योजनेला जीवनदान मिळाले असते. विरोधी युतीच्या शासनावर अशी मेहरबानी करण्याचे



काँग्रेसी केंद्र शासनास काहीच प्रयोजन नाही.

खरे पाहिले तर, एकाधिकार खरेदी रद्द झाल्यामुळे सरकारच्या कार्यक्रमात काहीच फरक पडण्याचे कारण नाही. त्यांनी पूर्वीप्रमाणेच खरेदी चालू ठेवावी. व्यापाऱ्यांशी स्पर्धेने वाढती किमत द्यावी, फक्त मक्तेदारीचा आग्रह धरू नये. शेतकऱ्यांना परवडले तर एकाधिकार रद्द झाल्यानंतरही सरकारी खरेदीकडे येतील अन्यथा, खाजगी व्यापाऱ्यांकडे जातील. कायद्याच्या बडग्याने शेतकऱ्यांची निष्ठा मिळवता येणार नाही, त्यासाठी काही कर्तबगारी दाखवावी लागेल.

एकाधिकाराचा अंत झाल्याने शेतकरी सुटकेचा निःश्वास टाकणार आहे; पण स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही येते याचे विस्मरण होता कामा नये. पीक हाती आले की केव्हाही विक्रीकरिता घेऊन जावे, माल बाजारात कधी न्यावा, कोणत्या बाजारात न्यावा याचा विचार करण्याचे काही कारण नव्हते. आता परिस्थिती बदलणार आहे. घायकुतेपणाने माल बाजारात नेला तर किमती कोसळतील आणि आणि 'बघा, एकाधिकारच चांगला होता' अशी शेखी मिरवण्याचा मोका जुन्या व्यवस्थेतील हितसंबंधियांना मिळू शकेल. येणारी व्यवस्था खुल्या बाजारपेठेची नाही. व्यवस्था अजून बंदिस्तच आहे. निर्यात दंडबेड्यात अडकलेलीच आहे. आयात करून देशी किमत पाडण्याचा उद्योग सरकार केव्हाही करू शकते. महाराष्ट्रातील एकाधिकाराची गुलामगिरी संपली एवढेच काय ते पुढचे पाऊल! बाकी साऱ्या लढाया अजून पुढेच आहेत.

*(शेतकरी संघटक, ६ ऑक्टोबर १९९५)*

■

चौतीस

# गुन्हेगार सरकार, गुंड पोलिस

महाराष्ट्रातील कापूस शेतकरी आपल्या मालाला भाव मिळावा म्हणून कित्येक वर्षे झगडत आहे. वर्षानुवर्षे तो सरकारशी लढत होता. गोऱ्या इंग्रजांच्या सत्तेशी. काळ्या इंग्रजांच्या सरकारशी, गिरणी मालकांशी, पुढाऱ्यांशी. आता बदल एवढाच की कापूस शेतकऱ्यांचा संघर्ष आता गुन्हेगारांशी आणि गुंडांशी होत आहे.

**कापसातून वाहणारे रक्त**

तसे सगळ्याच शेतीमालाचे शोषण होते; पण कापसाचे शोषण विशेष क्रूर. मनुष्याच्या पोटाची सोय लागली की त्यानंतरची त्याची सर्वात मोठी गरज अंगभर वस्त्राची. साहजिकच पहिली कारखानदारी उभी राहिली ती कापड गिरण्यांची आणि सार्वात जास्त शोषण झाले ते कापसाच्या पिकाचे आणि कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याचे.

इंग्रजांच्या हिंदुस्थानवरील साम्राज्याचे मूळ उद्दिष्ट कापसाच्या शोषणाचे होते. गांधीजींनी त्याविरुद्ध लढा उभा केला तो चरख्याची निशाणी घेऊन आणि खादीचा कार्यक्रम घेऊन. या एकाच गोष्टीत सगळे कापसाचे राजकारण आणि तत्त्वज्ञान सामावलेले आहे.

गोरा इंग्रज गेला पण त्याजागी काळा इंग्रज आला, शेतकऱ्यांचे शोषण चालूच राहिले. याचा सगळ्यात मोठा पुरावा आता अगदी आकडेवारीने उपलब्ध आहे. १९८६ ते ८९ या काळात सरकारने सगळ्या शेतकऱ्यांना किमान ४७ टक्क्याची उलटी पट्टी दिली. कापूस शेतकऱ्याची उलटी पट्टी तर २०६ टक्क्याची. म्हणजे माल विकून शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असतील तर प्रत्यक्षात त्याला ३०६ रुपये मिळायला पाहिजे होते.

कापसाचा भाव बुडवण्यासाठी सरकारने काय काय केले नाही? गिरणी



मालकांमार्फत दरवर्षी कापसाचे पीक बुडल्याची, पीक अपुरे असल्याची आवई उठवली, निर्यातीवर जवळजवळ कायम बंदी ठेवली. जरा काही शेतकऱ्यांना बरा भाव मिळेल असे दिसले की, बाहेरून कापसाची आयात करण्याची तत्परतेने व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवला. हे सगळे करताना गिरणी मालकांच्या या सेवकांनी आपण हातमागधारकांचे आणि विणकरांचे हितरक्षण करतो आहोत असा आव आणला. हातमागधारकांची एकूण सगळी गरजच मुळी ४ लाख गाठींची. त्यांना कापूस स्वस्त मिळावा याकरिता कितीतरी अधिक सुटसुटीत आणि सोपी व्यवस्था करता आली असती; पण विणकरांची ४ लाख गाठी रुई स्वस्त व्हावी म्हणून १०० लाख गाठींचा बाजार शासनाने वर्षानुवर्षे उद्ध्वस्त केला. जखमांमधून वाहणारे रक्त थांबावे म्हणून कापूस लावला जातो. पण शेतीच्या कापसातून वर्षानुवर्षे रक्त वाहत राहिले आहे.

**मराठी कापसाची करुण कहाणी**

महाराष्ट्र कापूस पिकवणाऱ्या राज्यांतील एक महत्त्वाचे राज्य. देशातील एकूण उत्पादनापैकी २० टक्के कापूस महाराष्ट्रात आजही पिकतो. पंजाब, महारााराष्ट्रात जसजशी आणि जेथे पाण्याची सोय होत गेली तसतशी तेथे तेथे कापसाची पीछेहाट झाली आणि शेतकरी दुसऱ्या पिकांकडे वळले. विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशात जेथे काही पर्याय शेतकऱ्यांपुढे नव्हता तेथे कापसाचे उत्पादन आजही चालू आहे. या प्रदेशातील कापसाची बहुतेक शेती कोरडवाहू. त्यामुळे सर्वसाधारणपणे दर एकरी येणारे पीक एक क्विंटल कापसाचे. हरियाणा, पंजाब येथील बागायती कापसाचे पीक सरासरीनेदेखील ५ क्विंटलच्या वर; आठ-दहा क्विंटल कापूस दर एकरी घेणारे शेतकरी गांवोगावी सापडतात.

महाराष्ट्रातल्या कापूस शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी समाजवादाच्या चलतीच्या काळात एकाधिकार खरेदी व्यवस्था सुरू करण्यात आली. नाव सहकाराचे. अशी ही सगळी व्यवस्था. कापसाच्या खरेदीचा हंगाम चार महिन्यांचा एकाधिकाराचा नोकरवर्ग वर्षभराचा आणि कायम. ज्या त्या पुढाऱ्याला खुश करण्यासाठी त्याच्या माणसांना नोकरीत भरती करणे अपरिहार्य. एकदा अधिकारी लोक नेमले की त्यांचे पगार आले, प्रवास आले, भत्ते आले, मेजवान्या आल्या, गाड्या आल्या, पंचतारांकित हॉटेलातील ओल्या पार्ट्या आल्या; पुढाऱ्यांचे नियंत्रण म्हणजे पुढाऱ्यांच्या भुका आल्या, त्यांचे टेलिफोन आले, प्रवास आला, कमिशन आले, सगळे काही आले.

एकाधिकाराची थोडक्यात अवस्था काय? कापूसखरेदीच्या व्यवस्थेचा खर्च वारेमाप. रुई काढण्यात नासधूस अफाट आणि देशीतील २० टक्के कापसावर नियंत्रण असूनदेखील रुईचा सगळ्यात पडता भाव मिळणार तो एकाधिकाराला. अधिकाऱ्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या बोटात हिऱ्यांच्या अंगठ्या आणि कापूस शेतकरीमात्र विजेचे बिल भरता येत नाही म्हणून विष खाऊन जीव देण्याच्या संकटात. एकाधिकाराने फायदा झाला तो मुंबईच्या गिरणी मालकांचा. कापसाच्या भावातील चढउतारीवरच त्यांचा सगळा फायदा अवलंबून.

पूर्वी ३ ते ६ महिन्यांचा कापूस गिरणीमालक खरेदी करून ठेवत, निदान वायदे बाजारात हक्क राखून ठेवत. कच्चा मालाच्या साठवणुकीच्या खर्चाचा सारा आर्थिक बोजा एकाधिकार व्यवस्थेमुळे गिरणी मालकांच्या खांद्यावरून उठून कापूस शेतकऱ्यांच्या उरावर येऊन पडला. गिरणी मालकांच्या सोयीसोयीने दर आठ दिवसांनी लिलाव करून रुई विकण्याची पद्धत एकाधिकाराने सुरू केली आणि गिरणी मालकांचे नशीब फळफळले.

एकाधिकाराच्या जनकांच्या मनात, आजपर्यंत ती व्यवस्था चालवणाऱ्यांच्या मनात हेतू समाजवादी व्यवस्थेचा होता की कामगारांच्या कल्याणाचा होता कसे सांगावे! कोणाच्या मनातले कसे काय ओळखता येईल? पण एकाधिकाराचा परिणाम गिरणी मालकाचे भले, नोकरदारांचे कल्याण आणि शेतकऱ्यांचे वाटोळे हा झाला यात कणमात्र शंका नाही.

**शेतकऱ्यांचा लढा**

समाजवादाचा आणि नियोजनाचा बोलबाला असलेल्या नेहरू कालखंडात शेतकऱ्यांनी सरकारच्या जुलमाविरुद्ध लढा दिला. व्यवस्था आणि परिवर्तन यांचे प्रश्न निर्माण न करता शेतकऱ्यांनी एक साधी सोपी मागणी केली. व्यवस्था सहकाराची असो, व्यापाऱ्याची असो, परमेश्वराची असो सैतानाची असो; आमच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळणे हे महत्त्वाचे आहे. बाजार खुला असता, शेतकऱ्यांना उलटी पट्टी मिळण्याची कडेकोट व्यवस्था सरकारने केली नसती तर शेतकऱ्यांना सरासरीने मिळणारा भाव उत्पादन खर्चाइतका असता, तेवढा आम्हाला मिळू द्या अशी ही साधी मागणी. या मागणीने वेगळी रूपे घेतली. महाराष्ट्रातील हमी भाव देशभरच्या आधारभूत किमतीपेक्षा निदान २० टक्के जास्त असला पाहिजे, भांडवली खर्च निधी, किंमत चढउतार निधी अशा गोंडस सवबीखाली होणाऱ्या कपाती बंद झाल्या पाहिजेत. अशा भूमिकांतून कापूस शेतकऱ्यांनी सतत प्रदीर्घ लढे दिले.



व्यवस्था, तिचे परिवर्तन, समाजवाद, नियोजन, खुली व्यवस्था असल्या शाब्दिक जडजंबालामुळे गोंधळून जाणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या घामाचे दाम मिळाले पाहिजे ही गोष्ट सहज समजली आणि ते लढ्यात उतरले.

नेहरूवादी व्यवस्था आणि शेतीमालाला रास्त भाव यांचे नाते साप-मुंगसाचे आहे. शेतीमालाला रास्त भाव दिला तर समाजवादी तोंडवळ्याची कोणतीही व्यवस्था एक दिवसही जगू शकत नाही हे हळूहळू शेतकऱ्यांना स्पष्ट होते गेले. कारखानदारांना ते पहिल्यापासून माहीत होते. पुढाऱ्यांनाच काय ते शेतकऱ्यांच्या मागणीतील गूढ इंगित उमगले नव्हते.

**खुल्या व्यवस्थेतही कापसाची विटंबना**

कुणाला समजो ना समजो, अग्नी आपले जाळण्याचे काम केल्याखेरीज राहत नाही. शेतकरी आंदोलनाने नेहरूव्यवस्थेचा पायाच उखडला. ती व्यवस्था संपुष्टात आली. खुल्या व्यवस्थेचे गुणगान चालू झाले. सर्व हयातभर नेहरुव्यवस्थेची हुजरेगिरी करणारे डॉ. मनमोहन सिंग एका दिवसात खुल्या व्यवस्थेचे भीष्माचार्य ठरले. सरकारी सहकार आणि समाजवाद यांच्या गुढ्या वर्षानुवर्षे वाहिलेले शरद पवार खुल्या व्यवस्थेचे सर्वात मोठे समर्थक आपणच आहोत अशी शेखी मिरवू लागले. नेहरूव्यवस्थेपेक्षासुद्धा खुल्या व्यवस्थेत भूखंडाच्या अफरातफरीत आपल्या खिशात अधिक पैसे पडावे अशा तयारीला अनेक पुढारी लागलेत.

खुल्या व्यवस्थेचे गुणगान तोंडी, पण शेतकऱ्यांसाठी मात्र कापसाची एकाधिकार व्यवस्थाच चालू. डंकेल प्रस्तावावर सही, पण प्रत्यक्षात कापूस निर्यातीवर बेगुमान बंदी, असले अर्थकारण सुरू झाले. १९९३ -९४ चे वर्ष म्हणजे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्यायाचा कळस. देशातील कापसाचे एकूण उत्पादन फारसे चांगले नाही; पण महाराष्ट्रात मात्र यंदा कापसाचे भरघोस पीक आले. जेथे एक क्विंटल कापूस यायचा नाही, तेथे चारपाच क्विंटलपर्यंत पीक आले. हंगामाच्या सुरुवातीपासून देशभर भाव चढे राहिले. १४०० रुपये क्विंटल म्हणता म्हणता गेल्या आठवड्यात एच-४ कापसाचे भाव २००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत कडाडले. अनेक वर्षांचे कर्जाचे ओझे उतरण्याची आशा शेतकऱ्यांच्या मनांत पालवली होती.

कापसाच्या उत्पादनाचा ताळेबंद पाहिला तर यंदा १० ते २० लाख गाठी कापसाची निर्यात करता येईल अशी अपेक्षा होती. सरकारी हिमटेपणाने ५ लाख गाठींच्या निर्यातीचा कोटा सुटला. अजून निदान ५ लाख गाठींच्या

निर्यातीची परवानगी मिळेल अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात घडले उलटे. चांगला भाव मिळेपर्यंत शेतकऱ्याने माल राखून ठेवण्याचा प्रयत्न करावा यात गैर ते काय आहे? पण यालाच सरकार 'साठेबाजी' म्हणते. साठेबाजीमुळे कापसाचे भाव भडकत आहेत असा कांगावा करते. विणकरांच्या नावानं डोळयांतून नक्राश्रू वाहवते आणि साठेबाज शेतकऱ्यांना धडा शिकवण्याकरिता सरकार सारी न्यायबुद्धी सद्सद्विवेक आंतरराष्ट्रीय कायदेकानून झुगारून लावते.

**सरकारच गुन्हेगार**

सरकारने कापसाच्या निर्यातीवर तातडीने बंदी घातली, जाहीर केलेल्या ५ लाख गाठींच्या कोट्यांपैकी १ लाख २० हजार गाठीचे करार अजून व्हायचे होते; अशा गाठींचा कोटा रद्द करण्यात आला. एवढ्यावर सरकार थांबले नाही. आपली विक्राळ नखे त्याने चारच दिवसात बाहेर काढली. १ लाख ५० हजार गाठींचे निर्यातीचे करार झालेले होते; पण माल अजून जहाजावर चढला नव्हता, या गाठींचाही निर्यात परवाना रद्द झाल्याचे सरकारने जाहीर केले. एवढेच नव्हे तर, चांगल्या पिकाच्या या वर्षी ५ लाख गाठी आयात करण्याची तयारी चालवली.

अर्थकारण सोडा, न्याय-अन्याय सोडा, सरकारची ही कृती बेकायदेशीर आहे. एवढेच नव्हे तर गुन्हेगारी आहे. डंकेल करारातील तरतुदींप्रमाणे सरकारला अशी निर्यातबंदी करता येत नाही, गॅट संघटनेतील अधिकाऱ्यांशी या विषयावर संपर्क साधला. निर्यातबंदी ही गॅट कराराचा भंग करणारी आहे हे त्यांनी मान्य केले; पण त्याबद्दलची तक्रार शेतकरी संघटनेने किंवा इतर दुसऱ्या कोणत्याही खाजगी संघटनेने किंवा व्यक्तींनी करून चालणार नाही. गॅट करारावर सह्या करणाऱ्या देशांपैकी कोण्या एका देशाच्या शासनाने हिंदुस्थान सरकारविरुद्ध तक्रार नोंदवली पाहिजे. अशी तक्रार नोंदवली गेली तर गॅट आवश्यक ती कारवाई करेल, असे सांगण्यात आले. कापसाची निर्यातबंदी ही गॅट कराराच्या १९ व्या कलमाअन्वये बेकायदेशीर आहे हे स्पष्ट आहे; पण अजून योग्य तो FIR दाखल झाला नाही म्हणून सरकारच्या हाती बेड्या पडलेल्या नाहीत; पण गॅट कराराच्या भंगाबद्दल सरकारवर कारवाई होण्याबद्दल तांत्रिक त्रुटी आहेत, म्हणून काही सरकार अगदी माकळे सुटणार आहे असे नाही. कापसाच्या व्यवहारातील काही युरोपीय आणि जपानी कंपन्यांनी सरकारच्या या निर्यातबंदीमुळे हिंदुस्थानचे नाव 'काळ्या यादीत' घालण्याची धमकी दिली आहे. एवढेच नव्हे तर, नुकसानभरपाईदाखल ४० कोटी रुपयांचा दावा



दाखल केला आहे. या दाव्यामुळें सर्वाधिक नुकसान महाराष्ट्रातील एकाधिकार व्यवस्थेचे होणार आहे. युरोप आणि जपानमधील कापूस व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता भरणार आहे. त्यांचे एक प्रतिनिधी मंडळ देशाला भेट देण्याकरिता येण्याचीही शक्यता आहे. जिनिव्हा येथील कापूस व्यापारी संघटनेने अध्यक्ष श्री. ॲलर्ट गेहरेल यांनी वस्त्रोद्योग मंत्रालयाला आपली नाराजी आधीच कळवलेली आहे. अशा निर्णयामुळे भारताची विश्वसनीयता संपुष्टात येईल अशी जाणीव त्यांची वस्त्रोद्योग मंत्रालयाला दिली आहे.

थोडक्यात, महाराष्ट्रातील कापसाचा एकाधिकार म्हणजे खुल्या व्यवस्थेचे गुणगान करण्याऱ्या केंद्र शासनाची शेतकरीविरोधी खुनशी कारवाई आहे, तर कापसाच्या निर्यातीवरील बंदी हे सरळ सरळ आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीचे कृत्य आहे.

या सरकारी गुन्हेगारीविरुद्ध विदर्भातील शेतकरी निर्धाराने उठला आहे. सरकारी कापसाची खरेदी खुशाला चालू द्या. त्यात एकाधिकाराची मक्तेदारी नको, आम्ही आमचा शेतीमाल आमच्या मर्जीप्रमाणे विकू अशा घोषणा देऊन कापूस शेजारच्या राज्यात घेऊन जात आहे.

**पोलिस- गणवेषातील गुंड**

गुन्हेगारी शासनाच्या विरुद्धच्या या आंदोलनाने पोलिसांचे डोके भडकण्याचे काय कारण? शेतकरी काही चोरीमारी करत नाहीत. देशातल्या देशात एका राज्यात माल विकण्याऐवजी चांगला भाव मिळावा म्हणून सहरद्द ओलांडून शेजारच्या राज्यात कापूस विकतात यात असे भयानक कृत्य काय आहे?

मुंबईमधील बॉंबस्फोटांसाठी कोकणपट्टीत दारूगोळा उतरवण्यात आला. त्या दारूगोळ्याची वाहतूक सुरक्षित व्हावी याचा चोख बंदोबस्त करणारे पोलिस अधिकारी, मुंबईतील दादांकडून नियमित मलिदा घेऊन त्यांच्या सगळ्या भयानक गुन्हेगारी आणि देशद्रोही कृत्यांवर पांघरूण घालणारे पोलिस अधिकारी, कापूस या राज्यातून त्या राज्यात गेला. तर माथेफिरूसारखे का वागतात? प्रतिष्ठित, सामान्य नागरिकांवर किरकोळ चोरीचा आरोप घालून त्यांना दंडबेड्या घालून फिरवतात. एवढे पोलिस बेताल का होतात? अकोल्यात कापसाचा बाजार भरवला तर शिपायांच्या तुकड्यांचा ताफाचा ताफा उतरवून शेतकरी कार्यकर्त्यांना जागोजाग अटक करतात, आंदोलनातील कार्यकर्त्यांना खुलेआम लाथाबुक्क्यांनी तुडवतात, कापूस परराज्यात घेऊन जाणाऱ्या

गाड्यांवर खाजगी गोळीबार करतात, पोलिस अधिकाऱ्यांचे डोके ठिकाणावर का नाही? मुख्यमंत्र्यांपर्यंत हप्ते पोहोचवून त्यांनी सरहद्दीवरची जागा मिळवली असेलही, आता प्रत्येक कापसाच्या गाडीमागे हजारो रुपये गोळा करून गंडगंज पैसा जमा करण्याची स्वप्ने त्यांनी पाहिलेली असतील; पण ती स्वप्ने कोठेतरी दुखावतात म्हणून शेतकऱ्यांवर हातापायी आणि गोळीबार करण्याची हिंमत त्यांना होतेच कशी?

गुन्हेगार सरकार आणि त्यांच्या बेकायदेशार कृतींची अंमलबजावणी करणारे गुंड पोलिस, आपण गणवेषात आहोत तोपर्यंत आपल्याला काही धास्ती नाही अशा थाटांत मिरवत आहेत. कापूस शेतकरी म्हणजे सर्वात शोषित शेतकरी, शेतकऱ्याच्या शोषणाविरुद्धच्या लढ्यातल्या शेवटच्या चरणात त्याच्यावर एक जबाबदारी येऊन पडली आहे. कापूस शेतकऱ्यांना लुटणे आंतरराष्ट्रीय करारांच्या विरुद्ध आहे; पण ते कायदे धाब्यावर ठेवून सरकार शेतकऱ्यांविरुद्ध उठले आहे. सरकारी गुंन्हेगारीचा पाठपुरावा करण्यासाठी सरसावले आहेत. पोलिसी गुंड गणवेषात आले तरी पोलिस होत नाहीत. गणवेश घालणारे चोर गुंडच राहतात हे कापूस शेतकऱ्यांनी कृतीने दाखवून देणे जरूर आहे.

*(शेतकरी संघटक, २१ फेब्रुवारी १९९४)*

■



पस्तीस

# दूध : सहकार विरुद्ध शेतकरी

आपल्या मालाला गिऱ्हाईक मिळू नये म्हणू कोणी उत्पादक करील काय? उघड उघड अशक्य वाटणारी ही गोष्ट प्रत्यक्षात होत आहे.

**सहकाराचा खाजगीकरणास विरोध**

काही दिवसांपूर्वी कऱ्हाड येथे पश्चिम महाराष्ट्रातील दूध सहकारी सोसायट्यांच्या पुढाऱ्यांची बैठक झाली. त्यांनी महत्त्वाचा ठराव केला तो हा की सरकारने कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यवसायाला दुधाच्या क्षेत्रात उतरू देऊ नये. भले दुधाची मागणी कमी राहिली तरी चालेल; पण दुधाचा सगळा कारभार सहकारी संस्थांच्या हातीच राहिला पाहिजे.

दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय सहकारी दूध संस्थांच्या संघटनेच्या एका बैठकीने यापुढे जाऊन, खाजगी कंपन्यांना दुधाच्या क्षेत्रात प्रवेश दिल्यास मोठे आंदोलन उभे करण्याची घोषणा केली आहे.

**सहकाराचा शेतकरीविरोध**

दुधाला भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी जेव्हा जेव्हा आंदोलन केले तेव्हा तेव्हा ते आंदोलन या सहकारी संस्थांनी हाणून पाडायचा प्रयत्न केला. गिऱ्हाईकांचे, विशेषत : लहान बाळाचे, गर्भवती स्त्रियांचे दूध तुटता कामा नये असा कांगावा शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या वेळी करणारी ही मंडळी दुधाच्या क्षेत्रात खाजगी व्यवसायाचे पदार्पण होऊन शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळतील असे दिसताच बालकांचे आणि त्यांच्या आयाचे दूध तोडायला तयार झाली आहेत.

हे सगळे काय गौडबंगाल आहे?

**केंद्र शासनातील चमत्कार**

दुधासंबंधी केंद्र शासनाने 'जीवनावश्यक वस्तू कायद्या' खाली एक नवीन

वटहुकूम काढला आहे. या वटहुकुमाचा तपशील सोडल्यास मुख्य हेतू खाजगी क्षेत्रातील भांडवल दुधावरील प्रक्रियेच्या व्यवसायात उतरू न देणे असा आहे. या वटहुकुमाविरुद्ध सुप्रीम कोर्टात एक अर्ज दाखल करण्यात आला आहे. अहो आश्चर्यम! केंद्रीय शेतकी मंत्रालयाने या प्रकरणी वटहुकुमाचे समर्थन केले आहेः याउलट अन्न प्रक्रिया मंत्रालयाने विरोधी भूमिका घेतली आहे. म्हणजे, कोर्टासमोरील एका दाव्यात केंद्र शासनाची दोन मंत्रालये एकमेकांविरुद्ध ठाकली आहेत.

हाही काय चमत्कार आहे?

**युरोपातील उरल्यासुरल्यावर भारतात महापूर**

८६ कोटी लोकवस्तीच्या या देशात दुधाचे एकूण उत्पादन ५ कोटी टन आहे. यापैकी फक्त ७५ लाख टन व्यापारात उतरते. खाजगी क्षेत्राचा वाटा १५ लाख टनांचा आणि उरलेल्यापैकी २५ लाख टन डॉ. कुरियन यांच्या (NDDB) ताब्यात आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात शहरांची वाढ झपाट्याने होऊ लागली आणि तेथील वाढत्या लोकसंख्येला दुधाचा पुरवठा कसा करायचा ही मोठी समस्या तयार झाली. दोन चार जागी 'आरे कॉलनी' या धर्तीवर दुधाचे उत्पादन स्वतःच करण्याचा प्रयत्न सरकारने केला पण त्यांचा फजितवाडा झाला. डॉ. कुरियन यांच्या प्रशासनाखालील आणंद येथील दुधाच्या डेअरीचे दूध संकलन आणि वितरण यांचे काम एका पतप्रधानांना पसंत पडले आणि त्याच पद्धतीवर देशभरच्या शहरांना दूधपुरवठा करण्यासाठी व्यवस्था करण्याचा सरकारी निर्णय झाला. शेतकऱ्यांच्या दुधाला नवीन बाजारपेठ मिळवून देण्याची घोषणा झाली. त्याकरिता संकलनाची यंत्रणा, शीतकरण, निर्जंतुकीकरण आणि वाहतूक व्यवस्था याकरिता प्रचंड भांडवलाची गरज होती. हे भांडवल उभे करण्याकरिता युरोपातील देशांकडून प्रचंड प्रमाणावर दुधाची भुकटी आणि कच्चे तूप यांच्या देणग्या मिळविण्यात आल्या. या देणग्यांचा वापर ' टोण्ड' दूध बनविण्याकरिता झाला, तसाच बाजारात विक्री करण्यासाठीही झाला. या तऱ्हेने मिळालेल्या पैशातून चकचकीत प्रक्रियाकेंद्र उभी राहिली, दुधाची वाहतूक चालू झाली. सहकारी संस्थांनी वैद्यकीय व इतर सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे दुभती जनावरे ठेवण्यास शेतकऱ्यांना थोडे प्रोत्साहनही मिळाले.

**उत्पादनवाढ महापुरामुळे नव्हे किमतीमुळे**

पण, थोड्याच काळात असे लक्षात आले की डॉ. कुरियन यांच्या दूध



महापूर योजनेचा दुधउत्पादनावर काही विशेष परिणाम झाला नाही. उलट, परदेशातील बाजारात उतरल्यामुळे दुधाची किंमत कमी राहिली आणि दूधउत्पादन करणे शेतकऱ्यांना परवडेनासे झाले. दुधाच्या उत्पादनात प्रचंड झेप घेतली ती गुजरातने नव्हे, महाराष्ट्राने. सुपीक गुजरातपेक्षा दगडांचा महाराष्ट्र देश दूधउत्पादनात पुढे गेला. याचे कारण महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनामुळे दुधाला जास्त आकर्षक किमती मिळू लागल्या.

हळूहळू दूधपुरवठ्याची परिस्थिती सुधारत गेली. म्हणजे भारतीयांचे दरडोई दुधाच्या वापराचे प्रमाण काही फार चांगले आहे असे नाही; पण दूध विकत घेण्यासाठी ज्यांच्याकडे क्रयशक्ती आहे त्यांना पैसा असून दूध मिळत नाही अशी परिस्थिती राहिली नाही.

१९७३ ते १९८६ या काळात दुधाचे उत्पादन, संकलन सर्व देशात मिळून प्रतीवर्षी सरासरी सहा टक्क्यांनी वाढले. महाराष्ट्रातली वाढीची ही गती प्रतिवर्षी दहा टक्के होती, तर दूध महापूर योजनेच्या अड्ड्यात म्हणजे गुजरातमध्ये ही गती सर्वात कमी म्हणजे केवळ साडेचार टक्के होती. दूध महापूर योजना आणि सहकारी संस्था दूध उत्पादनातील वाढीचे श्रेय लाटू पाहात आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की दूधदत्पादन खचवल्याचे पाप त्यांच्या माथी आहे.

**दुधाचा ओघ शहराकडे**

दूध हे कष्टाच्या शरीराला, वाढत्या वयात किंवा पोषणाची गरज असलेल्यांना उत्कृष्ट अन्न आहे. या उलट, ज्यांचे जीवनमान उंचावलेले आहे त्यांची दुधाची आवश्यकता कमी होत जाते. दूध महापूर योजनेचा परिणाम असा झाला की ज्यांना दुधाची खरी गरज होती ते दोन पैसे मिळतील या आशेने कमी गरज असलेल्यांकडे दूध पाठवू लागले. ग्रामीण भागात दूध महापूर योजनेने नळ्या खुपसून तेथील अन्नातील सर्वात पोषक अंश काढून नेण्याची व्यवस्था केली. डॉ. कुरियन स्पष्टपणेच म्हणाले ''दूध म्हणजे महाग प्रथिने आहेत. शेतकऱ्यांनी ती शहरांत पाठवावी आणि स्वत:ची प्रथिनांची गरज डाळींनी भागवावी.''

**प्रक्रियेची चढती कमान**

दुधाचा मुबलकतेबरोबर एक नवी बदल घडून आला. जागोजाग दुधावर प्रक्रिया करून त्याचे आकर्षक, आधुनिक खाद्यपदार्थ बनवून शहरातील पश्चिमी ढंगाच्या ग्राहकांना ते पुरविण्याचा व्यवसाय सुरू झाला. खवा, खव्याची मिठाई, पनीर, चीज अशा पायरी पायरीने जाता जाता आईस्क्रीम, श्रीखंड, चॉकलेट इत्यादी पदार्थांनी बाजार गजबजू लागले. दिल्लीसारख्या शहरात

पंचवीस-पंचवीस, तीस-तीस स्वादांचे आईस्क्रीम पुरवणारे मोठे व्यवसाय अगदी थोड्या काळात भरभराटीला आले. दुधावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रात नवीन भांडवल उतरेल, अगदी बहुराष्ट्रीय कंपन्याही उतरतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. आज दुधावर प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे चालू करण्याकरिता खाजगी क्षेत्रातून पाचशेवर प्रस्ताव आलेले आहेत.

**सहकाराचा कांगावाखोर युक्तिवाद**

गावात तयार होणाऱ्या दुधाला समान्तर आणि पर्यायी मागणी तयार होते आहे हे पाहिल्यावर डॉ. कुरियन यांचे सहकारी चेले गडबडून गेले. आपण शेतकऱ्यांचे हितकर्ते आहोत, त्यांच्या दुधाला बाजारपेठ मिळवून देणे हे आपले जीवितकार्य आहे हा आव त्यांनी झट्कन टाकून दिला आणि खाजगी कंपन्यांना दूध गोळा करण्याची परवानगी असता नये अशी मागणी आपले सर्व राजकीय वजन वापरून केली. या मागणीच्या पाठपुराव्यासाठी त्यांनी दोन युक्तिवाद केले.

पहिल्या युक्तिवाद हा की, दुधाचे उत्पादन वाढविण्याचे श्रेय सहकारी संस्थांचे आहे; त्यासाठी त्यांनी कष्ट केले आहेत, यंत्रणा उभारली आहे. या सर्व खटाटोपाचा फायदा खाजगी कंपन्यांना फुकटाफुकटी मिळता कामा नये.

खेरीज, खाजगी क्षेत्राचा प्रवेश सहकारी संस्थांवर अन्यायकारक होईल. कारण सहकारी संस्थांवर शहरांना द्रवरूपात दूध पुरविण्याची जबाबदारी आहे. खाजगी कंपन्यावर अशी काहीच जबाबदारी नाही. त्यांना प्रक्रियेचा व्यवसाय करू दिल्यास ते दुधावरची सगळी साय खाऊन जातील आणि दूधपुरवठ्याचा आतबट्ट्याचा व्यवसाय तेवढा सहकारी संस्थांकडे राहील.

**कृषी सल्लागार समितीची भूमिका**

खाजगी क्षेत्राला 'प्रवेश निषिद्ध' करण्याची ही मागणी स्थायी कृषी सल्लगार समितीपुढे आली होती. आम्ही या मागणीविरुद्ध शिफारस केली आणि खाजगी क्षेत्राला प्रवेश द्यावा असे सांगितले. आमच्या शिफारशीचा आधार असा होता.

१) सहकारी संस्थांनी दुधाचे उत्पादन वाढविले या म्हणण्यात फारसे तथ्य नाही. दूध उत्पादनाची वाढ वितरण व्यवस्थेच्या विकासापेक्षा आकर्षक किमतीमुळे झाली आहे;

२) दूधप्रक्रियेचा व्यवसाय अफाट फायद्याचा आहे हा युक्तिवाद शंकास्पद आहे. गुजरात राज्यातील सूरत येथील सुमूल डेअरी शेतकऱ्यांना सर्वाधिक



भाव देते. तेथे प्रक्रियेचे काम होत नाही. उलट, प्रक्रिया करून चीज, श्रीखंड, चॉकलेट तयार करणारी आणंद डेअरी सुमूलइतके भाव देऊ शकत नाही; या खेरीज,

३)सहकारी क्षेत्रातील प्रक्रियाउद्योगाचे तंत्रज्ञान व यंत्रसामग्री महागडी आहे त्यामुळे त्या व्यवसायात मूल्यापेक्षा खर्चातच वाढ अधिक होते. खाजगी क्षेत्रातील प्रक्रिया कमी खर्चिक व अधिक कार्यक्षम असल्यामुळे तेथे शेतकरी आणि ग्राहक या दोघांचेही हित अधिक जपले जाते.

सहकारी व्यवस्थेने खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करण्यात सज्ज व्हावे, आवश्यक तर शहरांना दुधाचा पुरवठा करण्याची जबाबदारी त्यांच्याकडून काढून घ्यावी अशी आमची शिफारस त्या काळाच्या अनिश्चित राजकीय वातावरणात काहीही निर्णय न होता पडून राहिली.

**खुल्या अर्थव्यवस्थेची (चा)हूल**

तेवढ्यात आणखी एक महत्त्वाचा बदल घडून आला. आर्थिक अरिष्टाचा सामना करण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष झाला. सगळ्या उद्योगधंद्यांवरचे परवान्याबाबतचे नियम शिथिल झाले आणि साहजिकच दुधाचा व्यवसाय खाजगी क्षेत्राकरिता खुला झाला.

या काळात अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी मी एकदा चर्चा केली त्यावेळी त्यांनी निःसंदिग्धपणे सांगितले, '' शहरातील ग्राहकाला पेय दूध हवे असेल तर त्यासाठी त्यांनी दुधाच्या प्रक्रियाउद्योगातील पदार्थांशी स्पर्धा केली पाहिजे.'' या त्यांच्या बोलण्यावर मी काहीसा आश्वस्त आणि निर्धास्त झालो होतो.

**नेहरूवादाचा थयथयाट**

त्यानंतर पाच-सहा महिन्यांतच परिस्थिती पालटू लागली. खुल्या बाजारपेठेचे धोरण औद्योगिक क्षेत्रातही माघार घेऊ लागले आणि शेतीच्या क्षेत्रात तर अगदी सनातनी शेतकरीविरोधी नेहरूवाद थटथयाट करू लागला. दुधाच्या क्षेत्रात केंद्रात शासनाने दोन आघाड्यांवर माघार घेतली.

**दूध प्रक्रियेवरील निर्बंध**

पहिले म्हणजे, दुधाच्या क्षेत्रात खुला प्रवेश देणारे धोरण रद्द करून 'दूध आणि दुग्धजन्य पदार्थ' वटहुकूम जून १९९२ मध्ये जारी करण्यात आला. या वटहुकुमान्वये एक सल्लागार समिती तयार करण्यात आली आणि दर दिवशी १०,००० लिटरपेक्षा जास्त किंवा वर्षाला ५०० टनांपेक्षा जास्त, दुधातील

घनपदार्थ वापरणाऱ्या उद्योगांकरिता या समितीच्या शिफारशीने नोंदणी आत्यावश्यक करण्यात आली. थोडक्यात, खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्त्वज्ञान शेतकऱ्यांना दुधाच्या बाबतीतही नाकारण्यात आले. सहकार क्षेत्रात सत्ताधारी पक्षाचे राजकीय हितसंबंध गुंतलेले आहेत, त्याच्या बचावाकरिता हा वटहुकूम काढला गेला हे उघड आहे.वटहुकुमातील ढोंग अगदी उघड आहे.

**वटहुकुमातील ढोंगबाजी**

वटहुकुमाचा एक उद्देश, म्हणे, स्वच्छता आणि गुणवत्ता वाढवणे हा आहे. याबाबत, या दृष्टीने खरे पाहिले तर सहकारी संस्थांवरच निर्बंध यायला पाहिजेत. स्वच्छता आणि गुणवत्ता या कारणांकरिता खाजगी क्षेत्रावर बंधन घालणे उघडपणे हास्यास्पद आहे.

वटहुकुमाचा दुसरा हेतू काय तर, शेतकऱ्याला रास्त भाव मिळवून देणे. बाजारात उभी राहत असलेली मागणी छाटून टाकून दुधाला चांगला भाव मिळवून द्यायचा हे काम तर्कशास्त्र आहे?

वटहुकुमाचा खरा हेतू वटहुकुमातच स्पष्टपणे सांगितला आहे – सर्वसाधारण जनतेस शहारामध्ये दूधाचा वर्षभर स्वस्त दराने पुरवठा करणे.

**महापूर योजनेचे पुनरागमन**

याखेरीज, नेहरू जमान्यातील दुसऱ्या भयानक व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. दूध महापूर योजनेचा तिसरा टप्पा सुरू करण्यात आला आणि गेली काही वर्षे बंद पडलेला, युरोपातील दूधभुकटी आणि चरबी भारतात आणून दुधाचे भाव पाडण्याचा कारभार सुरू झाला. आता दरवर्षी १०० कोटी रुपयांचा माल युरोपातून शेतकऱ्यांच्या उरावर येऊन पडणार आहे.

**सहकारातील बोक्यांची चुळबुळ**

या सगळ्या प्रकारात डॉ. कुरियन यांचा संस्थात्मक स्वार्थ उघड आहे; पण त्यांची दृष्टी निदान, वैयक्तिक स्वार्थाची नाही. पण त्यांच्या कृपाछत्राखाली देशभर पसरलेले गावोगावचे, जिल्ह्या-जिल्ह्यातील दूध सोसायट्याचे चेअरमन मात्र हादरून गेले आहेत, ते आपला फायद्याचा धंदा बुडणार या भीतीने. पर्यायी दूधसंकलन- व्यवस्था सुरू झाली तर सोसायटीत दूध घालेल कोण? ज्या सोसायटीत वारंवार दूध नासते आणि जिचे अधिकारी फक्त मालेमाल होतात त्या सोसायटीबद्दल, किरकोळ अपवाद वगळले तर, शेतकऱ्यांच्या मनात तिरस्कार आहे. त्याची या चेअरमन लोकांना पर्वा नाही. शेतकऱ्यांना कसेही मुठीत ठेवू, फक्त त्यांना दूध घालायला दुसरे साधन मिळता कामा नये,



हा त्यांचा विचार आहे. आणि त्याकरिता दुधाच्या आंदोलनाला विरोध करणारे हे शेतकऱ्यांचे शत्रू आपले साम्राज्य टिकविण्याकरिता आंदोलनाची भाषा करू लागले आहेत.

**लढाई अपरिहार्य**

खुली अर्थव्यवस्था शेतकऱ्यापर्यंत पोहोचणार नसेल तर शेतकऱ्यांना पुन्हा एकदा नेहरूवादाच्या पुनरुत्थानाविरुद्ध सर्वस्व पणाला लावून लढाई द्यावी लागणार आहे.

*(शेतकरी संघटक, २१ सप्टेंबर १९९२)*

■

छत्तीस

# महाबळेश्वरची मगरमिठी

**सहकाराचा उगम**

सहकारी चळवळ इंग्रजी अमलात सुरू झाली, त्याला आता जवळजवळ ९०वर्षे झाली. इंग्रजी शासनाने सहकारी संस्थांसंबंधीचा कायदा केला; पण सहकारी संस्था चालू राहाव्यात यासाठी काही विशेष उत्साही आणि व्यापक कार्यक्रम हाती घेतला नाही.

ग्रामीण भागांत त्या काळी जे काही थोडेफार छोटे उद्योगधंदे होते ते प्रामुख्याने खाजगी किंवा कंपन्यांचे होते,उद्योगधंद्यांकरिता लागणारे भांडवल शेतकऱ्यांना जमा करता येणार नाही आणि वित्तपुरवठाही वित्तसंस्थांकडून मिळणे दुरापास्त अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी एकत्र येऊन काही उद्योगधंदा उभारायचे ठरले तर शासनाकडून आणि वित्तीय संस्थांकडून त्यांच्या प्रयत्नास हातभार लागावा अशी मूळ सहकारी कायद्यामागील कल्पना.

**सहकाराचे अपहरण**

सहकारी चळवळीला एक वेगळे वळण लागले ते १९६० सालापासून. महाबळेश्वर येथे भरलेल्या काँग्रेसच्या एका बैठकीत आर्थिक विकासाकरिता सहकारी संघाचा वापर करण्याचे ठरले. हा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला होता, शासनाने नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळे मोडकळीस आलेल्या काँग्रेस पक्षाला तगवून धरण्याकरिता यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही नवी दिशा ठरवण्यात आली.

सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, उपसा जलसिंचन योजना, दूध संघ इत्यादी उभे केले म्हणजे त्यांतून ग्रामीण भागाचा खराखुरा विकास होईल अशी यशवंतराव चव्हाण इत्यादी धुरिणांची भाबडी कल्पना होती. ग्रामीण भागाच्या दारिद्र्याचे मूळ कारण त्यांना समजले नव्हते, हे उघड आहे.



खेडोपाडी शेतकऱ्यांच्या हाती व्यापारव्यवस्था नाही, उद्योगंधदे नाहीत या कारणाने शेतातली लक्ष्मी शहरात निघून जाते अशी त्यांची कल्पना असावी. म्हणून सरकारी साहाय्याने सहकारी संस्थांचे जाळे विणले तर खेडोपाडी लक्ष्मी नांदू लागेल असा त्यांचा आडाखा.

कदाचित, खेड्यापाड्यांच्या दारिद्र्याचे खरे कारण काळ्या इंग्रजांकडून होणाऱ्या भारताच्या शोषणात आहे हे त्यांना कळतही असेल; पण एवढ्या मगरमिठीच्या व्यवस्थेतून शेतकऱ्यांची सुटका शक्य नाही. तेव्हा सहकारी व्यवस्थेच्या मिषाने आपले, आपल्या आप्तसंबंधियांचे, पक्षकार्यकर्त्यांचे भले साधून घ्यावे असा सरळ राजकारणी डावही त्याच्यामागे असावा.

सहकारी चळवळ फारशी कार्यक्षम होत नाही असा १५५५ पर्यंतचाच अनुभव होता. १९५५ मध्ये डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी 'ग्रामीण पतव्यवस्थेची पाहणी' पुरी केली होती. पाहणीचा निष्कर्ष स्पष्ट होता 'सहकार अयशस्वी झाला,' पण गाडगीळसाहेबांची शिफारस होती 'तरीही सहकार यशस्वी झाला पाहिजे.'

महाबळेश्वरच्या बैठकीनंतर सहकारी चळवळीला पक्षाच्या जुवाला जुंपण्याचे काम चालू झाले. सहकारी चळवळीचे आज जे रूप दिसते आहे त्याचे मूळ कारण महाबळेश्वरच्या या काँग्रेस बैठकीत आहे. यशवंतरावांनी आपल्या मोहक वाणीने आणि पाठीवर हात फिरवण्याच्या कलेने शेतकरी कामगार, कम्युनिस्ट इ. पक्षातील दिग्गज मंडळी कुशलतेने वळवून घेतली आणि सहकार आणि सरकार यांचे लक्ष्य साधले.

महाबळेश्वरचा निर्णय काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा ठरला. महाराष्ट्रात आजपर्यंत एकाही निवडणुकीत विरोधी पक्षांचे सरकार निवडून आलेले नाही. याचे महत्त्वाचे कारण पक्षाच्या हुकुमतीखालील सहकारी संस्थांचे जाळे हे सर्वमान्य आहे.

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे विशेष रूप आहे.

**फक्त सत्ताधाऱ्यांचे कुरण**

१) या सर्व संस्था काँग्रेस पक्षाच्या अधिपत्याखाली आहेत. ज्या काही थोड्याफार संस्था विरोधकांच्या हाती दिसतात त्या संस्था सुरुवातीला संस्थापक काँग्रेस पक्षात असताना तयार झाल्या, राजकीय फाटाफुटीमुळे संस्थापक किंवा त्यांचे वारसदार काँग्रेस सोडून निघाले; त्यामुळे काही काळ तरी या संस्था काँग्रेसच्या वर्चस्वाबाहेर राहिल्या; पण सहकार आणि सरकार यांची मगरमिठीच

इतकी अभेद्य आहे की विरोधात गेलेल्या पुढाऱ्यांनाही थोड्याच कालावधीत जगून राहण्याकरिता काँग्रेसमध्ये यावे लागते. शहादे, वाळवा येथील कारखान्यांची उदाहरणे हे स्पष्ट करतात.

सहकारी संस्थांवरील वर्चस्व काँग्रेस पक्षाने फार वर्षांच्या योजनेत आणि परिश्रमाने कमवले आहे. या पकडीची पाळेमुळे फार खोल गेलेली आहेत. विरोधी पक्षांचे सरकार केंद्रात आणि राज्यात सलग १०-१५ वर्षे टिकले तरच ही पकड ढिली किंवा खिळखिली होण्याची शक्यता आहे, अन्यथा नाही.

मुळात सहकारी संस्था स्थापन करण्याची परवानगी काँग्रेस पक्षाच्या पुठ्ठ्यातील लोकांना देण्यात येते. ज्या ज्या क्षेत्रात म्हणून सहकारी संस्था चालवण्यासारख्या आहेत तेथे तेथे पक्षाच्या लोकांनी आपल्या नावाने एक संस्था रजिस्टर करून त्याला मान्यताही मिळवली आहे. आता दुसऱ्या कोणी समातर संस्था काढू म्हटले तर त्याला परवानगी मिळणे अशक्यच आहे. एकाच क्षेत्रात एकाच प्रदेशात एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या सहकारी संस्था स्थापन करण्यास परवानगी, राज्यकर्त्या पक्षाची सोय असेल तरच दिली जाते, एरवी नाही.

पक्षाबाहेरील सचोटीच्या शेतकऱ्यांमध्ये मान्यता असलेल्या कार्यकर्त्यांनी एखादी संस्था उभी करण्याकरिता खूप कष्ट घेतले. तरीही सरकारी मान्यता किंवा सरकारी निधी जागोजाग अडवले जातात आणि एकूण योजनेवर राज्यकर्त्या पक्षाच्या लोकांचे वर्चस्व झाल्याखेरीज संस्थेला हिरवा कंदील काही दिसत नाही. भांडवल अडकून पडल्यामुळे दिल्ली-मुंबईच्या फेऱ्या घालून रडकुंडीस आलेले कार्यकर्ते आणि शेतकरी शेवटी 'जाईना का काँग्रेसच्या हाती, पण कारखाना तर होऊ दे' या भूमिकेवर येऊन पोहोचतात.

इतकेही करून एखादी बिगरकाँग्रेसी संस्था उभी राहिलीच तर तिला कर्जपुरवठा होऊ न देणे, सरकारी कामात जागोजाग खोळंबा करणे इत्यादी मार्गांनी सहज रडकुंडीला आणता येते.

सहकार आणि लोकशाही अशा गोंडस नावाखाली निवडणुकीची यंत्रणा इतकी गुंतागुंतीची केली आहे की त्यावरील पक्षाची पकड जवळजवळ कायमची झाली. गावपंचायतीत माणसे आपली, विकास सहकारी सोसायटीत माणसे आपली, त्यांचे सेक्रेटरी तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील पुढाऱ्यांच्या पुठ्ठ्यातले, सहकारी संस्थावर ताबा आपलाच म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समित्या, खरेदी-विक्री संघ, सरकारी बँका इत्यादींच्या निवडणुकीतील काही पदे हमखास राज्यकर्त्या पक्षाच्या हातात राहतात.



चालू असलेल्या संस्थेमध्ये नवीन सभासद म्हणून कोणाला मान्यता द्यायची आणि कोणाला द्यायची नाही हा निर्णय सत्तेवर असलेल्या संचालक मंडळाच्या हाती असल्यामुळे सदस्यांची यादी ही सत्ताधाऱ्यांच्या सोयीने ठरते. कारखान्याच्या परिसरातील सदस्य म्हणून नोंदवले जात नाहीत अशीही उदाहरणे आहेत आणि सदस्य होण्याकरिता लागणारी गुणवत्ता नसताही हजारोंच्या संख्येने भरती झाली याचीही उदाहरणे आहेत.

**स्पर्धेचे वावडे**

२) सहकारी संस्थावर एका राजकीय पक्षाचे अधिपत्य राहिले आहे याचाच एक परिणाम असा की सहकारी व्यवस्थेला स्पर्धेचे वावडे आहे. सहकारी साखर कारखाना उभा झाला की त्याच्या अधिकारक्षेत्रातील शेतकऱ्यांना दुसऱ्या कारखान्यास ऊस देता येत नाही किंवा घरच्याघरीसुद्धा गुळासाठी गुऱ्हाळ लावता येत नाही. कापसाची सहकारी खरेदी म्हटली की ती एकाधिकाराची, शेतकऱ्यांना दुसऱ्या कोणाकडे जाऊन कापूस विकण्याची संधी मिळता कामा नये, हे एकाधिकाराचे मूळ तत्त्व. दुधावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रात खाजगी भांडवलाला मुभा द्यायची नुसती कल्पना निघाली तर सगळ्या महाराष्ट्रातील दूध संस्थांनी आपली मक्तेदारी टिकण्याकरिता 'दूध रोको' आंदोलन करण्याची धमकी दिली.

**नोकरदारांची हुकुमत**

३) सरकारी आधारावरच सहकारी संस्था चालत असल्यामुळे या सर्व संस्थांवर नोकरदारांची हुकुमत जबरदस्त राहते. साखर कारखान्याचा चेअरमन कारखान्याच्या परिसरात कितीही मिजास मारो; पण साखरनिदेशकापुढे किंवा निदेशालयातील एखाद्या किरकोळ अधिकाऱ्यासमोर शेळी बनतो.

**कळसूत्री बाहुल्या**

४) सहकारी संस्थांचे अध्यक्ष आणि संचालक मंडळ हे कितीही तोऱ्यात फिरले तरी संस्था चालवण्याबद्दल एकही, अगदी साधा किरकोळ निर्णयही घेणे त्यांच्या हाती नाही. साखर कारखान्याचे उदाहरण घ्यायचे झाले तर यंत्रापासून बारदानापर्यंतच्या खरेद्या, कारखान्यातील आणि कापणीसाठी येणाऱ्या मजुरांचे वेतन, उसाची किमान किमत, साखरेची लेव्ही किमत आणि खुल्या बाजारात विकण्याचा साखरेचा कोटा हे सगळे काही सरकारातच ठरते. उसासाठी देय रकमेतून करण्याच्या विविध कपाती - मुख्यमंत्री निधी, अल्पबचत, गृहबांधणी निधी, शिक्षणनिधी, विश्वस्त निधी, परतीची ठेव, बिगर

परतीची ठेव यासंबंधी कपाती – हे सगळे सगळे निर्णय कारखान्याबाहेरच होतात. सहकारी पदाधिकारी हे मंत्रालयातून नाचवल्या जाणाऱ्या कळसूत्री बाहुल्यांपेक्षा काही अधिक कर्तबगारी दाखवू शकत नाहीत.

**नियोजनाबद्दल अनास्था**

५) या सगळ्या कारणानी सहकारी व्यवस्था मोठी अजागळ झाली आहे. बाजारपेठेत नेमका कोणता माल लागतो, मालाची गुणवत्ता कशी सुधारावी, तो आकर्षक कसा करावा, माल स्वस्त कसा करावा, उत्पादनखर्च कमी कसा करावा, कार्यक्षमता कशी वाढवावी हे विषयही सहकारी संस्थांत निघत नाहीत. त्यामुळे सहकारी संस्थांना, किरकोळ अपवाद सोडल्यास तेल आणि सूतगिरण्यासुद्धा यशस्वीरीत्या चालवता आल्या नाहीत. साखर हे क्षेत्र सहकारास तसे सोयीचे आहे. माल ठोक, गिऱ्हाईक हजर अशी ही आळशी कारखानदारी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सव्वाशे कारखान्यांपैकी वीसपंचवीस तरी बऱ्या अवस्थेत आहेत. इतर सर्व क्षेत्रांत सहकारी संस्थांनी आपली अपात्रताच सिद्ध केली आहे.

**खाऊन घ्या**

६) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळवून देणे कारखान्यास शक्य नाही आणि त्याचे कारण सहकारी धोरण आहे, हे सहकारी पदाधिकाऱ्यांच्या लवकरच लक्षात येऊन जाते; पण हे लक्षात येईपर्यंत या खेळातून बाजूला होऊन जगाला हे सत्य आक्रोशाने सांगण्याची त्यांची ताकद संपून जाते. मग, जितका वेळ जमेल तितका वेळ एका बाजूला कारखाना खाणे आणि दुसऱ्या बाजूला कारखान्यातील नोकऱ्या, वाहतूक, पेट्रोलपंप इत्यादीची कंत्राटे वाटून लोकांना खुश करणे अशा कामांत ते स्वतःला गुंतवून घेतात.

राजकारण, निवडणुकींची गुंडागर्दी, नोकरशाहीचे वर्चस्व, विलक्षण उधळमाधळ आणि अकार्यक्षमता यांनी सगळी सहकारी चळवळ ग्रस्त झालेली आहे आणि याचे प्रमुख कारण सरकारी चळवळीचे जाणीवपूर्वक अपहरण करण्याचा महाबळेश्वर येथील १९६० सालचा निर्णय.

**आता इतर संस्थात्मक स्वरूपच वाचवतील**

खुल्या बाजारपेठांकडे वाटचाल चालू असताना सहकारी संस्थांचे काही अध्वर्यू नवीन व्यवस्थेतही सहकारी व्यवस्था आपली कर्तबगारी दाखवील अशी मोठी फुशारकी मारत आहेत. हे सुतराम अशक्य आहे. सहकारी संस्थांचा राजकीय आश्रय काढून घेतला आणि शेतकऱ्यांकडून सक्तीची



वसुली करून घेण्याचे कलम ४८ अ यांसारख्या पठाणी तरतुदी रद्द केल्या तर केवळ आर्थिक संस्था म्हणून दोन टक्केसुद्धा सहकारी संस्था टिकून राहणार नाहीत. त्यांच्या भ्रष्टाचाराची सर्वसाधारण चौकशी झाली तर तुरुंगाबाहेर राहतील असे सहकार महर्षि मोजण्यासाठी एका हाताची बोटेसुद्धा जास्त होतील. खुल्या बाजारपेठेतील, आणि त्याहीपेक्षा, निर्यात बाजारपेठेमध्ये सहकारी संस्था यशस्वी होऊच शकत नाही. काही तरुण, राजकारणाची फारशी गोडी नसलेली मंडळी गेली वर्षे दोन वर्षे द्राक्षाच्या निर्यातीत उत्साहाने काम करीत आहेत. त्यांचा अलीकडचा अनुभव पाहिल्यानंतर, सहकार मोडून काढल्याखेरीज शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होऊच शकणार नाही याची खात्री पटते.

खुल्या अर्थव्यवस्थेत मजबुतीने उभे राहायचे असेल तर शेतीतील उत्पादनासाठी, शेतीमालाच्या व्यापारासाठी, निर्यातीसाठी आणि प्रक्रियांसाठी सहकार या कल्पनेचा विटाळसुद्धा प्रामाणिक कार्यक्षम कार्यकर्त्यांनी होऊ देऊ नये. सहकारामध्ये मिळणारी शासनाची मदत आज कितीही आकर्षक वाटली तरी तीच मदत लवकरच गळफास ठरते.

आर्थिक व्यवहाराची नवी बांधणी करताना खाजगी मालकी, भागीदारी, खाजगी कंपनी, सार्वजनिक कंपनी इत्यादी संघटनांचा वापर करावा. एवढेच नव्हे तर यापलीकडे जाऊन आणखी एक गोष्ट शेतकऱ्यांनी केली पाहिजे. महाराष्ट्रातील प्रत्येक सहकारी संस्थेच्या यापुढील सर्वसाधारण सभेत संस्थेचे रूपांतर खाजगी किंवा सार्वजनिक कंपनीत करावे असा औपचारिक ठराव मांडून शेतकऱ्यांनी आग्रह धरला तरच ग्रामीण भागाची खुल्या अर्थव्यवस्थेत भरभराट होण्याची काही शक्यता तयार होईल.

*(शेतकरी संघटक, ६ मे १९९३)*

■

सदतीस

# साखर साम्राज्यात धरणीकंप

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या एका निर्णयाने उसाची विक्री, साखरेची कारखानदारी आणि सर्वच सहकार क्षेत्र यांत हाहाकार उडाला आहे. न्यायालयाचा निर्णय रद्द करून घेण्यासाठी सारी पुढारी मंडळी कंबर कसून कामाला लागली आहेत. शेतकरी समाज मात्र या निर्णयाबद्दल उदासीन आहे. खंडपीठाच्या निर्णयाला धक्का लागू नये यासाठी शेतकऱ्याने तनमनधनाने प्रयत्नांची पराकाष्ठा करावयासा पाहिजे.

**हे काय प्रकरण आहे?**

सर्वदूर असा पक्का समज आहे की ग्रामीण महाराष्ट्राचे नाव दुमदुमते ते साखर कारखानदारीमुळे. सहकार क्षेत्रातील साखर कारखानदारीच्या विकासामुळे यच्चयावत महाराष्ट्रातील ऊसशेतकरी सुखी आणि संपन्न झाला आहे. एवढेच नव्हे तर तो धनदांडगा झाला आहे. त्याने राजकारणावर प्रभुत्व स्थापन केले आहे; यशवंतराव चव्हाणांपासून ते वसंतदादा ते शरद पवार हे सगळे दिग्गज पुढारी महाराष्ट्रातील साखर लॉबीचे प्रतिनिधी म्हणजेच ऊसशेतकऱ्यांचे नेते इत्यादी इत्यादी. अशा अनेक गैरसमजुती देशभर पसरलेल्या आहेत. ऊस शेतकरी म्हणजे धनदांडगा पुढारी. सत्ता गाजवणारा, आपापल्या परिसरात सुलतानी चालवणारा, लक्षभोजने घालणारा अशी प्रतिमा तयार झाल्याने ऊस शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

**ऊसः राजकारणाचे साधन**

प्रत्यक्षात परिस्थिती अगदी उलटी आहे. साखर कारखान्यांतून फोफावलेल्या नेतृत्वाचे सर्वसाधारण ऊस शेतकऱ्यांचे काहीही कल्याण केले नाही. साखरेवरील लेव्ही, लेव्ही साखरेची किमत, साखर क्षेत्रावरील नियंत्रणे, मळीवरील बंधने, सारे सारे त्यांनी मुकाटपणे स्वीकारले आणि शेतकऱ्यांच्या गळी उतरवले.



ऊसउत्पादक शेतकरी कर्जात बुडत गेला तरी त्याच्या उसाला योग्य किंमत मिळावी असा काही प्रयत्न पुढाऱ्यांनी केला नाही. सहकाराचा झेंडा फडकवून सत्ताधारी पक्षाच्या कोण्या म्होरक्यास साखर कारखाना काढण्याची परवानगी द्यावी, सरकारी तिजोरीतील कोट्यवधी रुपये त्याच्या पदरी टाकावे, त्या म्होरक्यानेही सदस्य शेतकऱ्यांचे काय कपाळ फुटते आहे तिकडे लक्ष न देता कारखान्यात भरमसाट नोकरभरती करावी, आपल्या पित्त्यांना आणि चमच्यांना कंत्राटे द्यावीत आणि कारखाना हडप करण्याची आपला सत्ता निरंकुशपणे चालवावी हा प्रकार वर्षानुवर्षे चालला आहे.

ऊस असो वा नसो, कारखाना हवा या आग्रहापोटी असे कारखाने तयार झाले की जे उसाला उणे भावच देऊ शकतात. शासनाने ठरवलेला उसाचा किमान भाव देता यावा याकरिता कारखान्यांना कर्ज काढावे लागते, कर्जाच्या आणि व्याजाच्या बोजापोटी पुढील वर्षी निघणारा भाव अधिकच खालावतो. पडत्या भावाचे हे दुष्टचक्र चालू राहते.

उत्तरेतील पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यांत नऊ-दहा टक्के शर्करांशाच्या उसाला सरसकट ७२० ते ७४० रुपये प्रतीटन भाव मिळतो तर सांगली कोल्हापूरकडील बारा-साडेबारा टक्के शर्करांश असलेल्या उसालाही ५७५ रुपयांच्या वर भाव दिला जाऊ नये असा आदेश महाराष्ट्र सरकारने काढला आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, ऊस शेतकऱ्यांनी निमूटपणे मान खाली घालून हा अन्याय सहन केला. सहकारी साखर कारखान्यांचे सारे अर्थकारणच असे विचित्र झाले आहे की, म्होरक्या शेतकऱ्यांना उसाच्या भावापेक्षा सहकारातील आणि राजकारणातील लूटमारीची चटक लागली आहे.

दहा-बारा कारखान्यांचा अपवाद सोडला तर सगळे कारखाने तोट्यात आहेत. पण म्हणून काय झाले; त्या कारखान्यांवर आपली सत्ता अबाधित राखण्याकरिता हमरीतुमरी चालूच असते. विद्यमान कारखान्यांना पुरेसा ऊस नाही; पण अजून दहा-वीस कारखाने काढण्याकरिता मुख्यमंत्र्याची धावपळ चालूच आहे.

प्रत्येक कारखान्याचे एक कार्यक्षेत्र ठरलेले असते. त्या कार्यक्षेत्रातील ऊस- शेतकऱ्यांना आपला ऊस संबंधित कारखान्यासच घालण्याची सक्ती आहे. त्या कारखान्याला ऊस न देता गुळाचे गुऱ्हाळ घालण्याचीही परवानगी नाही; पण कार्यक्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांना कारखान्याचे सदस्यत्व आणि त्यांचा ऊस गाळला जाण्याची हमी मिळले याची काही खात्री नाही. प्रत्येक

कारखान्याच्या क्षेत्रात हजारो ऊसउत्पादकांना सदस्य बनू दिले जात नाही, कारण त्यांना सदस्य बनवले तर सत्ताधारी संचालक मंडळाची खुर्ची डळमळीत होण्याचा धोका आहे.

उसाच्या या प्रश्नावर १९८० सालापासून आंदोलने झाली. जागतिक बाजारभावाच्या तुलनेने आपल्या देशातील उसाचे भाव थोडेफार वरचढच आहेत. जगभर उसाचे उत्पादन आकाशातून पडणाऱ्या पाण्यावर होते. आपल्याकडील उसाचे उत्पादन प्रामुख्याने कालव्याच्या आणि उपसा सिंचन योजनांच्या पाण्यावर होते. त्यामुळे आपल्याकडे उसाचा उत्पादनखर्च इतर देशांच्या तुलनेने जास्त राहतो. देशाची भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती, उत्पादनाची कार्यक्षमता आणि गिऱ्हाईकाचे हित पाहिले तर पाण्याची टंचाई असलेल्या देशात, विशेषतः महाराष्ट्रासारख्या कोरडवाहू भूमीत मिळणाऱ्या थोड्याफार पाण्याचा उपयोग ऊस पिकवण्याकरिता व्हावा हे मोठे विचित्र आहे. अर्थकारणाने नाही तर राजकारणाने उसाचे आणि साखरेचे साम्राज्य वाढत गेले.

**अर्थकारणाचे पारडे जड**

पण शेवटी अर्थकारण राजकारणावर मात करतेच. ऊस शेतकऱ्यांनी संघर्ष करण्याची हिंमत दाखवली नाही; पण एका वेगळ्या मार्गाने साखरसम्राटांविरुद्धचा आपला रोष व्यक्त करण्यास सुरुवात केली. उसाच्या ऐवजी निलगिरी, फळबागा, विशेषतः द्राक्षे पिकवण्याकडे शेतकरी झपाट्याने वळत आहेत आणि साखर कारखान्यांची स्थिती अधिकाधिक डबघाईस येत आहे. पाऊसमान चांगले असूनही कारखान्यांना ऊस नाही या कारणाने डझनभर कारखाने यंदा बंदच राहिले. चालू राहणारे कारखाने यंदा मर्यादित काळच चालतील आणि तेवढे चालण्यासाठीदेखील दुसऱ्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जाऊन उसाची पळवापळवी करावी लागेल हे स्पष्ट आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील बिगरसदस्यांच्या उसाचा प्रश्न किती मोठा अटीतटीचा बनला आहे. ज्या शेतकऱ्यांना सदस्य म्हणून मानायला कारखाना तयार नव्हता त्यांनी ऊस मात्र आपल्या कारखान्यासच घातला पाहिजे असा कार्यक्षेत्रातील कारखान्यांचा आग्रह. बिगरसदस्य शेतकरी साहजिकच आपल्या मालाला जास्त भाव मिळावा याकरिता प्रयत्न करणार. कार्यक्षेत्रातील कारखान्याबद्दल कोणत्याही प्रकारची निष्ठा बाळगण्याचे त्यांना काहीच कारण नाही. शेजारच्या कारखान्याला ऊस घालण्याकरिता काही विशेष धडपड



करण्याचीही आता जरूरी राहिली नाही. शेजारचे कारखाने नोटा फडफडवीत यंदा चौफेर फिरत होते आणि सातशे रुपयांच्यावर भाव देऊन ऊस शेतकऱ्यांची मनधरणी करीत खरेदी करत होते.

**शेतकरी वाघांची लढाई**

शेतकरी संघटनेने औरंगाबाद अधिवेशनात सदस्य आणि बिगरसदस्य शेतकऱ्यांनी जिथे चांगला भाव मिळेल तेथे ऊस द्यावा असा सल्लावजा आदेश दिल्याने परिस्थिती अधिकच स्फोटक बनली. एका कार्यक्षेत्रातून दुसऱ्या कार्यक्षेत्रात झोनबंदी तोडून जाणारा ऊस थांबवण्याकरिता कारखानदार धावपळ करू लागले. पोलिस अधिकाऱ्यांना खुश करून त्यांच्यामार्फत आवश्यक तर शेतकऱ्यांना मारहाण करून उसाचे ट्रक रोखू लागले.पकडलेला ऊस पोलिसांच्या ताब्यात वाळून जाऊ लागला. उसाच्या राजकारणात आज अशी बेबंदशाही चालू आहे.

अशा परिस्थितीत कधी नव्हे तो एक चमत्कार घडला. जळगाव जिल्ह्यातील काही शेतकरी कोर्टदरबारी गेले आणि २१ जानेवारी १९९४ रोजी औरंगाबाद खंडपीठाने दिलेला निर्णय शेतकऱ्यांच्या बाजूचा आहे. बिगरसदस्य शेतकऱ्यांनी कार्यक्षेत्रातील कारखान्यास ऊस घालावा अशी कारखान्याची इच्छा असेल तर त्यांच्या उसाला किमान ७४० रुपये प्रति टन किमत दिली पाहिजे असा हा निर्णय आहे. त्याविरुद्ध कारखाने आणि महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालयात अपील घेऊन गेले आहेत.

त्याची पहिली सुनावणी शुक्रवारी दिनांक १८ फेब्रुवारी १९९४ रोजी होणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी आजपर्यंत हा प्रश्न लढवला त्यांचे अभिनंदन; परंतु आपापला ऊस चांगल्या भावात खपला हे पाहताच हे शेतकरी इतके खुश झाले की आपले प्रकरण सुप्रीम कोर्टात लढवण्याची त्यांना इच्छा राहिली नाही.

सुप्रीम कोर्टात दावा लढवायचा म्हटल्यावर येणाऱ्या खर्चाच्या आकड्याने ते हबकले असतील. अगदी शेवटच्या क्षणी शेतकरी संघटना या कोर्टातील मामल्यात उतरण्याची तयारी करीत आहे. पण हा मामला संघटनेच्या नव्हे तर शेतकऱ्यांच्या नावाने लढवला गेला पाहिजे. हे प्रकरण कोर्टात लढवण्यासाठी ऊस शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने पुढे आले पाहिजे.

*(शेतकरी संघटना, २१फेब्रुवारी१९९४)*

■

अडोतीस

# निर्बंधमुक्त साखर आणि निर्बंधभक्त साखरसम्राट

शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना जशी वार्षिक परीक्षा तशीच वित्तमंत्र्यांना अंदाजपत्रकाच्या दिवसाची कसोटी. अंदाजपत्रक प्रतिनिधीसभेला सादर करताना वित्तमंत्र्यांकडे दोन तास, दूरदर्शनच्या माध्यमाने, साऱ्या राष्ट्राचे लक्ष लागून राहते. आपल्या अंदाजपत्रकी भाषणात वित्तमंत्र्यांना अनेक करामती करून दाखवाव्या लागतात. गेल्या आर्थिक वर्षात एखादी अपवादात्मक सुलक्षणी गोष्ट घडली असेल तिचा नगरा पिटणे, बहुतांश विपरीत घटनांवर जमेल तितके पांघरूण घालणे, पंतप्रधानांची शक्य तितकी चापलुसी करणे, आपला अर्थशास्त्रातला असलेला किंवा नसलेला अधिकार दाखविणे, कुवतीप्रमाणे संस्कृत वाङ्मयाचे किंवा निदान बाजारी शेरोशायरीचे प्रदर्शन करणे इत्यादी इत्यादी अनेक करामती वित्तमंत्र्यांना करून दाखवाव्या लागतात. यात कोठेही उणे पडले तर त्यांची सारी राजकीय कारकीर्द धोक्यात येण्याची शक्यता असते. या एका दिवसातील दोन तासांच्या करामतीवर त्यांचे सारे भविष्य टांगून असते.

वार्षिक परीक्षेचे महत्त्व अगदी उनाड विद्यार्थ्यांनासुद्धा वर्षाच्या सुरुवातीपासूनच पक्के माहीत असते ह्न एके दिवशी वार्षिक परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे हे त्यांना पक्के माहीत असते. एक दिवस यमाच्या दरबारात झाडा द्यावा लागणार आहे अशी श्रद्धा असलेले पापभीरू भाविकसुद्धा जीवात जीव असेपर्यंत पुण्याचा रस्ता सोडून भलत्याच रस्त्याला लागतात, तसेच या विद्यार्थ्यांनाही जवळच्या चित्रपटगृहात खेळ, नाटकाचे प्रयोग, सहली, वेगवेगळ्या निवडणुका आणि 'डेज' यांचा मोह काही टाळता येत नाही. परीक्षेला अजून वेळ आहे असे मनाचे समाधान करीत उनाड विद्यार्थी अभ्यास बाजूला ठेवून सारे काही कार्यक्रम यथासांग पार पाडतात. परीक्षा महिन्या दोन महिन्यांवर आली की मग मात्र परीक्षेच्या तयारीसाठी घोकंपट्टीला सुरुवात करतात. वर्षभर अभ्यास केला नाही तरी शेवटच्या महिन्यातील



धडपडीने अपेक्षित प्रश्नांसाठी तयारी करून परीक्षेच्या दिव्यातून आपण पार पडून जावे, निदान एटीकेटी मिळवावी अशी त्यांची खटपट चालू होते.

अर्थव्यवस्थेचा कारभार सुव्यवस्थित चालावा यासाठी वर्षभर सातत्याने परिश्रम केले तर वित्तमंत्र्यांनादेखील अंदाजपत्रकाच्या उंबरठ्यावर धावपळ करण्याची गरज पडू नये; पण असे होत नाही. साऱ्या मंत्रिमंडळात परराष्ट्र, गृह या खात्यांच्या बरोबरीने वित्तखात्याचे महत्त्व असते. वित्तमंत्र्यांना लक्ष घालावे लागणार नाही अशी कोणतीच महत्त्वाची घटना नसते. साहजिकच, वर्षभर विविध कामांच्या व्यापात वित्तमंत्री अडकून जातात.

साधारण फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला त्यांना खडबडून जाग येते. २६ तारखेला अंदाजपत्रक सादर करायचे आहे. मग ते झपाट्याने तयारीला लागतात. गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात मांडलेले खर्चाचे आणि उत्पन्नाचे अंदाज कितपत प्रत्यक्षात उतरले आणि किती चुकले हा महत्त्वाचा मुद्दा; पण त्यावर देखरेख प्रशासन व्यवस्था ठेवत असते. कोणत्याही क्षणी अद्ययावत् आकडेवारी उपलब्ध होते. अपेक्षेपेक्षा उत्पन्न कमी असल्यास संबंधित खात्यांची शेपटी पिरगाळली जाते. खर्चापोटी झालेल्या तरतुदींप्रमाणे कार्यक्रम पार पडले नसतील तर उरलेल्या दिवसांत शक्य तितका खर्चाचा झपाटा लावावा लागतो.

आय-व्ययाचे अंदाज चुकले तर ती काही फारशी गंभीर गोष्ट नाही. हे अंदाज चुकतच असतात. त्याबद्दल सारवासारव करणे फारसे कठीण नसते. याउलट, गतवर्षीच्या अंदाजपत्रकात काही विवक्षित आश्वासने दिलेली असतील आणि त्याविषयी काही प्रगती झाली नसेल तर त्यावर मात्र संसदेत गदारोळ उठू शकतो. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीच्या सुमारास वित्तमंत्री गेल्या वर्षी दिलेल्या आश्वासनांच्या तपासणीस लागतात. यंदाच्या वर्षी वित्तमंत्री यशवंत सिन्हा यांना ही जाग फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आली असावी.

गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकी भाषणात त्यांनी जाहीर केले होते, ''शेतीमालाची वाहतूक, साठवणूक व व्यापार यांवरील बंधनांमुळे शेतकरी अडचणीत सापडतो. .....जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याच्या तरतुदी रद्द करण्यात येतील.'' या अर्थाची दवंडी वर्षानुवर्षे वित्तमंत्री पिटत असतात; पण जीवनाश्यक वस्तूंच्या कायद्याच्या तरतुदी रद्द करणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही! दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून या कायद्याच्या तरतुदींचा वापर करून शेतकरी, इतर उत्पादक आणि व्यापारी यांच्या मागे ससेमिरा लावून स्वत:चे उखळ पांढरे करणाऱ्यांची एक जबरदस्त फळी तयार झाली आहे. एक वेळ काश्मीरच्या प्रश्नावर पुढारी तडजोड करण्यास तयार होतील; पण जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्यात मात्र काहीही बदल

सहन करणार नाहीत. वित्तमंत्र्यांनी या विषयावर वेगवेगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक परिषद बोलावली होती. नागरी पुरवठामंत्र्यांनी केंद्र शासनाची सारी जबाबदारी राज्यांवर ढकलण्याचा प्रयत्न केला होता. आधीच आर्थिक तंगीच्या कात्रीत सापडलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पाचव्या वेतन आयोगाच्या दुधाने तोंड पोळल्यानंतर जीवनावश्यक वस्तूंचा कायदा रद्द करण्याच्या ताकाकडे संशयाने पाहिले. म्हणजे मोठी पंचाईतच झाली! आता संसदेसमोर काही देखावा तर केला पाहिजे! मोठ्या तातडीने मंत्रिमंडळाची संमती घेऊन एक घोषणा करण्यात आली.

गहू आणि तज्जन्य पदार्थ, तसेच भरड धान्ये, डाळी आणि लोणी या पदार्थांच्या निर्यातीवरील बंधने हटवण्यात आली. कांद्याच्या निर्यातीसंबंधी कोटाव्यवस्था चालूच राहणार आहे; पण दरवर्षी ७ लाख टन निर्यातीची शाश्वती देण्यात आली आहे. जगाच्या बाजारात, बंधनमुक्त केलेल्या मालाला आज फारसा वाव नसल्याने या घोषणेत फारसा काही तथ्यांश नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याच्या जबड्यातून एक डझनभर वस्तू वगळण्यात आल्या आहेत. सिमेंट, कापड गिरणीची यंत्रसामग्री, रेशमी कापड, राजीवस्त्रे, लोकरी कापड, धागे इत्यादी इत्यादी. यांत कोणत्याच शेतीमालाचा समावेश नाही.

शेतीमालावरील निर्बंध उठविण्याच्या दृष्टीने एकच महत्त्वाचे पाऊल जाहीर करण्यात आले. साखरेवरील सक्तीची वसुली म्हणजे कुप्रख्यात 'लेव्ही' रद्द करण्यात येणार आहे. त्यासाठी काही पूर्वअटी ठरवण्यात आल्या आहेत. त्या अटींचे स्वरूप असे आहे की त्या नजीकच्या काळात पूर्ण होण्याची शक्यता नाही. तरीदेखील, साखरेवरील सक्तीची वसुली रद्द करण्याच्या घोषणेने साऱ्या साखरसम्राटांच्या महालांत मोठी घबराट उडून गेली आहे. भवानीनगर कारखान्याचे अध्यक्ष श्री. जाचक यांनी उघडपणे लेव्ही संपण्याच्या घोषणेचे स्वागत केले आहे. आणखी दोन-चार कारखान्यांचे अध्यक्ष मनातून स्वागत करीत असतील; पण ते जाहीर करण्याची हिम्मत दाखवू शकत नसतील. एरवी, महाराष्ट्र राज्यात या निर्णयावरील प्रतिक्रिया विशेष तीव्र आहे. 'शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा सहकारविरोधी निर्णय', 'ऊसउत्पादकांना संकटात आणणारा निर्णय', 'सहकारी साखरउद्योग मोडीत काढणारा निर्णय', 'सहकारी साखर कारखानदारी विनाशाच्या उंबरठ्यावर' अशा प्रतिक्रिया साखरसम्राटांनी दिल्या आहेत.

रेशन दुकानात कार्डावर स्वस्त भावाने साखर देता यावी यासाठी प्रत्येक कारखान्याच्या उत्पादनापैकी काही भाग सरकार खुल्या बाजारपेक्षा कमी भावाने सक्तीने वसूल करते. उत्पादन हंगामात होते, वाटप वर्षभर होते; त्यामुळे,



कारखान्यांना लेव्हीचा साठा सांभाळून ठेवावा लागतो. त्यामुळे अडकलेल्या रकमेवरचे व्याज बुडते. १९८० मध्ये शेतकरी संघटनेने उसासंबंधी आंदोलन केले त्यावेळी साखरेच्या एकूण उत्पादनाच्या ६५ टक्के भाग सरकार सक्तीने वसूल करीत असे. या टक्केवारीत क्रमाक्रमाने बदल होत ती सध्या फक्त पंधरावर ठेवण्यात आली आहे. उरलेली सर्व साखर म्हणजे ८५ टक्के उत्पादन बंधनमुक्त समजले जात असले तरी प्रत्यक्षात त्याची विल्हेवाट दिल्लीहून जाहीर करण्यात येणाऱ्या मासिक आदेशाप्रमाणेच करावी लागते. अलीकडे या पद्धतीत थोडा बदल करून आदेश दरमहा निघण्याऐवजी तीन महिन्यांतून एकदा काढण्याची सुरुवात झाली आहे.

सध्या बहुतेक साखर कारखान्यांकडे साखरेचे प्रचंड साठे पडून आहेत. गेल्या काही काळात पाकिस्तानमधून साखरेची जी भरमसाट आयात करण्यात आली त्यामुळे साखरेचे पडून राहिलेले साठे अधिकच वाढले आहेत. गहू साठवण्यास गोदामे नाहीत अशी परिस्थिती देशात तयार झाली त्यासंबंधी बराच गाजावाजा झाला; पण प्रत्येक कारखान्यात साध्या ताडपत्रीच्या आडोशाने हजारो टन साखर पडून आहे याबद्दल फारसा गवगवा होत नाही. किरकोळ बाजारात साखरेचा भाव १३ रु. किलोवर गेला आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव घसरत आहेत. त्यामुळे भारताची साखर निर्यात होण्याची फारशी शक्यता नाही.

साखरसाठ्यांची अशी लयलूट असताना नेमके लेव्हीचा जाच दूर करण्याला मुहूर्त सापडावा यामागे मोठे रहस्य आहे. जनता दलाच्या काळात चौधरी चरणसिंग, शेतकऱ्यांचे तथाकथित मसीहा, सत्तेवर असताना साखरेचे साठे असेच मुबलक झाले होते. आपण शेतकऱ्यांचे मोठे हित साधित आहोत असा देखावा करून चौधरीजींनी साखरेवरील लेव्ही रद्द केली; खुल्या बाजारातील साखरेचे भाव घसरले, शहरी ग्रहकांना आम्ही साखर स्वस्त करून दिली म्हणून समाजवादी थयथया नाचले. शेतकऱ्यांवर उसाची उभी पिके जाळून टाकण्याची वेळ आली. ऊसउत्पादकांच्या असंतोषाचा वणवा भडकू लागला तसे चौधरींनी काढता पाय घेतला आणि लेव्ही व्यवस्था पुन्हा अमलात आणली.

जनता दलाच्या आमदानीत झालेल्या चुकीची पुनरावृत्ती प्रशासन का करत आहे?

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाचे भाव चढे असताना महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एकाधिकाराच्या दंडबेड्यांत जखडून ठेवणारे सरकार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मंदी येताच काढता पाय का घेते?

समाजवादाच्या नावाखाली वर्षानुवर्षे चाललेल्या पद्धती जास्त शिस्तीने आणि

सोयीस्करपणे विसर्जित करता येणार नाहीत काय?

जागतिक बाजारात तेजी आली आणि कापूस उत्पादनाच्या तंत्रज्ञानावरील सर्व बंधने दूर झाली म्हणजे सावचित्तपणे सरकारी खरेदीला समांतर खाजगी खरेदीला वाढता वाव देऊन कापूस एकाधिकाराने यथासांग विसर्जन शक्य आहे. त्याप्रमाणेच, समाजवादाच्या काळात सहकार व्यवस्था आणि साखर उद्योग पोखरून टाकणारी जी व्यवस्था होती ती दूर करून आणि सध्या उद्योगाच्या उरावर साठलेल्या साखरेच्या पोत्यांच्या थप्पी दूर करून लेव्ही रद्द करण्याचे पाऊल उचलता आले असते.

महाराष्ट्रातील सहकार महर्षींनी लेव्ही रद्द करण्याच्या पद्धतीबद्दल वा प्रक्रियेबद्दल टीका केलेली नाही; त्यांचा विरोध लेव्ही रद्द करण्याच्या कल्पनेलाच आहे. कोणी एक उत्पादक कारखानदार त्याच्या उत्पादनापैकी एक सज्जड भाग सरकारने सक्तीने वसूल करून घेऊन जावा असा आग्रह धरतो हे दृश्यच मोठे विचित्र आहे. लेव्ही साखरेचे भाव इतर मालांच्या आधारभूत किमतींप्रमाणे सर्व देशभर एकसारखे नसतात. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू यांसारख्या राज्यांत, जेथे एकरी उत्पादन व शर्करांश अधिक आहे तेथे, लेव्हीची किमत कमी असते. बिहार, ओरिसासारख्या राज्यांत, जेथे एकरी उत्पादन व शर्करांश कमी तेथे, अधिक किंमत देण्याची, राजकारणी पुढाऱ्यांच्या सोयीची पद्धत आहे. बिहार, ओरिसासारख्या, उसाचे दरिद्री पीक घेणाऱ्या राज्यांत लेव्ही उठवण्याविरुद्ध गदारोळ उठला असता तर ते समजण्यासारखे होते. लेव्हीचा सर्वात कमी भाव मिळणाऱ्या महाराष्ट्रातील साखरसम्राटांनी 'आमच्या हातापायांतल्या दंड-बेड्या काढा होऽ' असा गळा काढावा यात महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीचे शेतकरीद्वेष्टे स्वरूप स्पष्ट होते.

चीन देशात पूर्वापारपासून मुलींचे पाय लहान असणे हे सौंदर्याचे लक्षण मानले जाई. त्यासाठी जन्मापासूनच त्यांचे पाय घट्ट बांधून ठेवीत. कम्युनिस्ट क्रांतीनंतर या दुष्ट पद्धतीवर बंदी घालण्यात आली. ज्यांचे पाय पूर्वी बांधलेले होते तेही मोकळे करण्याचे हुकूम सुटले. 'पट्ट्या काढल्यानंतर पायात रक्त वाहू लागले, त्याच्या असह्य वेदना सोसवेनात म्हणून आमचे पाय बांधलेलेच ठेवा' अशी हाकाटी त्या मुलींच्या वतीने करण्यात आली. महाराष्ट्रातील साखर कारखानदार 'लेव्हीचे बंधन चालू ठेवा' अशी जी हाकाटी करतात त्यामागेही, असाच, दूरवरच्या कल्याणाचा विचार नाही.

महाराष्ट्रातील साखर कारखानदारी ही पूर्णत: राजकीय खेळी आहे. कोटी दोन कोटी रुपयांचे भांडवल शेतकऱ्यांकडून जमा करण्याचे कसब असलेला कोणीही



पुढारी सरकारदरबारी असलेले वजन वापरून कारखान्याचा परवाना मिळवू शकतो. त्यामुळे नव्वद-शंभर कोटी रुपये खेळायला मिळू शकतात. अशा सहकारी कारखानदारीमुळे तंत्रज्ञान जुनेबुरसेच वापरले जाते; बाजारपेठ मिळण्याचा विचारही सहकारमहर्षींना वमनप्राय वाटतो! ठराविक प्रकारची साखर सरकारी मदतीने बाजारात खपवण्याच्या व्यवस्थेच्या ते आधीन झाले आहेत. महाराष्ट्रातील सहकाराला स्पर्धेचे वावडे आहे. यामुळे सारे साखरसम्राट एकसुरात कोल्हेकुई करीत आहेत.

चौधरी चरणसिंगांच्या काळात शासनाने लेव्ही उठवण्याआधी अडीअडचणीच्या प्रसंगी उपयोगी पडण्यासाठी पर्याप्त साठा करून ठेवला पाहिजे होता अशी एक विधायक सूचना करण्यात आली होती. कोणाही साखर कारखानदाराने 'शासनाने कारखान्या-कारखान्यांत साठलेल्या साखरेच्या पोत्यांचा निचरा करावा' अशी मागणी केलेली नाही. याचा अर्थ, 'सक्तीच्या वसुलीच्या बेड्यांखेरीज आम्ही चालू शकत नाही' असा हा कबुलीजबाब आहे. लेव्हीची व्यवस्था शेतकऱ्यांना विषाप्रमाणे वाटते आणि कारखानदारांना ती अमृतवल्ली वाटते. यापेक्षा अधिक विदारक चित्र असूच शकत नाही.

साखर कारखानदारांच्या आक्रोशात आणखी एक मोठी, म्हटले तर गमतीची म्हटले तर विचित्र गोष्ट आहे. वर म्हटल्याप्रमाणे लेव्ही पद्धत रद्द करण्यासाठी सरकारने काही अट घातली आहे. अलीकडेच सरकारने साखरेचा वायदेबाजार चालू करण्यासाठी तीन परवाने दिले आहेत. या परवान्यांनुसार साखरेचा वायदेबाजार ठाकठीक काम करू लागला म्हणजे नंतरच लेव्हीची वसुली बंद व्हायची आहे. या पूर्वअटीबद्दल कोणी कारखानदाराने शब्दही काढलेला नाही. वायदेबाजार हे काय प्रकरण आहे हे त्यांना माहीत नाही असे म्हणणे कठीण आहे. वायदेबाजार म्हणजे ऐतखाऊ सटोडियांना 'दिया, लिया करून गडगंज नफा मिळविण्याची व्यवस्था' अशी कल्पना समाजवादाच्या काळात रूढ झाली होती. त्यामुळे कदाचित, सरकारने वायदेबाजार कार्यक्षमपणे चालण्याच्या घातलेल्या अटीकडे कारखानदार दुर्लक्ष करीत असतील.

*(शेतकरी संघटक, २००२)*

■

एकुणचाळीस

# राजकारण पुरे, साखरेच्या अर्थकारणाचे पाहा

अशा घोषणा सहसा कृषिमंत्री करतात; काही वेळा तो मान राज्यमंत्र्यांनाही दिला जातो; पण १९ डिसेंबर २००२ रोजी लोकसभेमध्ये स्वत: पंतप्रधान उभे राहिले आणि त्यांनी उसाची किमान वैधानिक किमत दर क्विंटलला ६४.५० रुपयांवरून ६९.५० रुपयांपर्यंत म्हणजे ५ रुपयांनी वाढविण्यात येत असल्याची घोषणा केली. उत्तर प्रदेशात सुरू असलेल्या ऊसउत्पादकांच्या आंदोलनासंदर्भात लोकसभेत चाललेल्या चर्चेमध्ये हस्तक्षेप करीत पंतप्रधानांनी ही घोषणा केली असली तरी ही वाढ देशातील सर्व राज्यांतील उसाला लागू राहील; उत्तर प्रदेशातील ऊसउत्पादकांना प्रतिक्विंटल आणखी ४ रुपये जादा देण्यात येईल. उसाला जाहीर झालेल्या किमान वैधानिक किमती या ८.५ टक्के साखर उताऱ्याच्या उसासाठी असतात.

नर्मदा परिक्रमेच्या निमित्ताने सध्या मी ज्या भागांतून भ्रमंती करीत आहे तेथे इंग्रजी भाषेतील गुलाबी वर्तमानपत्रांचे दर्शन दुर्लभ आहे. या भागांतील जनतेला वाचायला मिळतात ती हिंदी भाषेतील वर्तमानपत्रे. आर्थिक बातम्यांच्या बारकाव्यांच्या तपशहलात ही वर्तमानपत्रे शिरतच नाहीत. त्या दिवशी माझ्या वाचनात आले ते 'नई दुनिया' हे वर्तमानपत्र – सर्वदूर पोहोचणारे आणि मान्यताप्राप्त. पंतप्रधानांनी केलेल्या वरील घोषणेचे वृत्त देताना त्यात म्हटले होते की 'किमान वैधानिक किमती'तील ही वाढ ६ टक्के साखर उताऱ्याच्या उसासाठी आहे. कोठेतरी काहीतरी चुकते आहे याबद्दल माझ्या मनात खात्री होती. दशकानुदशके उसाची किमान वैधानिक किमत ही ८.५ साखर उताऱ्याच्या उसाच्या संदर्भाने ठरविली जात आहे. पंतप्रधानांनी खरोखरीच ६ टक्के उताऱ्यासाठी ६९.५० रुपये (उत्तर प्रदेशसाठी ७३.५० रु.) किमान वैधानिक किमतीची घोषणा केली असेल तर उसाच्या किमती फारच मोठ्या प्रमाणात वाढविल्यासारखे होईल, ज्या आजच्या परिस्थितीत उत्पादकाच्या हाती पडणे केवळ अशक्य आहे. 'नई दुनिया'मध्ये त्याबद्दल काही उल्लेख नसला तरी वाढीव साखर उताऱ्यासाठी दिली जाणारी वाढीव किमत (प्रिमियम) जुनीच म्हणजे उताऱ्यातील पुढील प्रत्यकि ०.१ टक्क्यासाठी प्रति क्विंटल ७६ पैसे ठेवली आहे असे गृहीत धरले तरी पंतप्रधानांनी केलेल्या घोषणेतील वाढ केवळ ५ रुपये न राहता ती प्रतिक्विंटल २३ रुपये (उत्तर प्रदेशसाठी २७ रुपये) येईल. सध्या इंग्रजी गुलाबी वर्तमानपत्रे किंवा इंटरनेटच्या माहितीजालाशी संपर्क नसल्यामुळे पंतप्रधानांनी उसाची किमान वैधानिक किमत क्विंटलला ५ रुपयांनी वाढविली आहे का २३ रुपयांनी हे मला कळणे कठीण आहे! उत्तर प्रदेशासाठी ही वाढ प्रतिक्विंटल २७ रु. म्हणजे प्रतिटन २७० रुपये होईल. सरळ सरळ ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. हे मुद्राराक्षसाची चूक किंवा उपसंपादकाची डुलकी यामुळे झाले असावे याची खात्री असूनही मी या गोष्टीचा इतका ऊहापोह केला तो एवढ्याचसाठी की, अगदी महत्त्वाच्या आर्थिक घटनांच्या वार्तांकनाच्या बाबतीत आपल्या देशात किती पराकोटीचे दारिद्र्य आहे हे निदर्शनास यावे. या विषयावर नंतर काही पत्रव्यवहारावरही प्रसिद्ध झालेला दिसत नाही.

पंतप्रधानांनी घोषित केलेली वाढ सर्व राज्यांत प्रतिक्विंटल ५ रुपये आणि उत्तर प्रदेशासाठी ९ रुपये असली तरीही काही गंभीर प्रश्न तयार होऊ शकतात.

आपापल्या कारखान्याचा गेल्या हंगामातील साखर उतारा आणि तोडणी व वाहतूक खर्च यांच्या आधाराने २० डिसेंबरच्या घोषणेच्या आधीच्या किमान वैधानिक किमतीतील पहिली उचल न देणाऱ्या साखर कारखान्यांच्या विरोधात महाराष्ट्रातील ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांच्याही कित्येक आठवडे आधीपासून आंदोलन चालविले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक सहकारी साखर कारखान्याचा साखर उतारा वेगवेगळा आहे. कारखानानिहाय लागवड, मशागत व गाळपाचे व्यवस्थापन यांची कार्यक्षमता यांसह अनेक घटकांचा विचार करून हा उतारा ठरविला जातो. त्याचप्रमाणे प्रत्येक कारखान्याचा तोडणी व वाहतूक खर्चही अलग अलग असतो. 'किमान वैधानिक किमत' या संकल्पनेची व्याख्या तंतोतंत लक्षात घेतली तर शेतकऱ्यांकडून घेतलेल्या उसाच्या किमतीपोटी पुढील सूत्राप्रमाणे पहिली उचल ऊस घेतल्यापासून दोन आठवड्यांच्या आत देणे कायद्याने बंधनकारक आहे.

पहिली उचल = किमान वैधानिक किमत + (८.५%) ह्न ७६ ह्न (तोडणी व वाहतूक खर्च)

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा २००१–२००२ साखर हंगामातील सरासरी साखर उतारा ११.८६ टक्के तर तोडणी व वाहतुकीचा सरासरी खर्च १८० रुपये प्रतिटन आहे. म्हणजे, महाराष्ट्रातील उसाची सरासरी किमान वैधानिक किमत जुन्या दराने ८८० रुपये प्रति टन होते. (नवीन दराप्रमाणे, अर्थातच, ९३० रुपये). त्यातून तोडणी व वाहतूक खर्च वजा केला तर उसाच्या किमतीची पहिली उचल सरासरी ७०० रुपये प्रतिटन होते. कारखानानिहाय पहिली उचल सुमारे ६५० ते १००० रुपये प्रतिटन होईल. महाराष्ट्र सरकारने आदेश काढला आहे की कोणत्याही साखर कारखान्याने साखर संचालकांची पूर्वसंमती घेतल्याशिवाय उसाची पहिली उचल प्रति टन ५६० रुपयांपेक्षा जास्त देऊ नये. हा आदेशच मुळात गुन्हा करण्यास फूस लावणारा आहे. साहजिकच, शेतकरी चिडून उठले. शेतकऱ्यांच्या मते केंद्र सरकारने किमान वैधानिक किमतीत वाढ करण्याऐवजी कारखान्यांनी मुळातील किमान वैधानिक किमत ऊसउत्पादकांना प्रत्यक्षात द्यावी यासाठी पावले उचलायला हवी आणि जे कारखाने तशी किमत न देता साखर आदेश १९६६ चा भंग करीत आहेत व तसे करण्यास जी राज्य सरकारे त्यांना फूस लावीत आहेत त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करायला हवी होती.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली आंदोलन करून पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणे परिणामकारकरीत्या थांबविले. कारखानदारांनी गुंडांकरवी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने बळाचा वापर मौजे डिग्रजवर ऐन मध्यरात्री गणवेशधारी 'गुंडां'च्या हल्ल्याच्या अतिरेकापर्यंत आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. प्रशासकीय यंत्रणेनेही बौद्धिक युक्तिवादांमध्ये आंदोलनाच्या नेत्यांना अडकविण्याचा प्रयत्न केला. या आणि अशा कोणत्याही दबावापुढे न नमता ऊसउत्पादकांनी शेतकरी संघटनेवरील निष्ठा कायम ठेवून आंदोलन चालूच ठेवले आणि एकापाठोपाठ एक साखर कारखान्यांना तडजोडीचा दर म्हणून पहिली उचल सरसकट ७५० रुपये प्रतिटन देणे भाग पाडले. त्यातील बऱ्याच कारखान्यांच्या बाबतीत किमान कायदेशीर किमत ७५० रुपयांपेक्षा बरीच जास्त होते. आता पुणे जिल्ह्यातील ऊसउत्पादकांनी आंदोलन पुढे चालू केले आहे.



गेल्या तीस–चाळीस वर्षांत शेतकऱ्यांच्या जीवावर ठिकठिकाणी उभ्या राहिलेल्या साखरसाम्राज्यांचे अध्वर्यू म्हणतात की, साखर कारखान्यांकडे न विकलेल्या साखरेचे मोठे साठे पडून आहेत. ते साठे निकालात काढणे जगभरच्या सध्याच्या मंदीमुळे शक्य होत नाही. त्यामुळे उसाला किमान वैधानिक किंमत कारखाने देऊ शकत नाहीत. हे साठे कमी करण्यासाठी सरकारने कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की कायदेशीर किमतीपेक्षा कमी किमतीत ऊस खरेदी करण्याचा बेकायदेशीर कारभार करण्यापेक्षा कायदेशीर किमान किमत देऊ न शकणारे कारखाने बंद पडणेच चांगले.

पहिला प्रश्न उभा राहतो की किमान वैधानिक किमतीतील वाढीसंबंधी घोषणेमागे परिस्थितीमध्ये काही फरक पडावा असा खरेच काही हेतू आहे का? सरकारने २० लाख टन साखरेचा अतिरिक्त साठा करण्याचीही घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे, ऊसउत्पादकांची देणे बाकी भागविता यावी यासाठी ७८६ कोटी रुपये बाजूला काढून ठेवले आहेत. या जुजबी उपाययोजनांनी साखरसमस्येच्या सोडवणुकीची सुरुवातसुद्धा होणार नाही.

फार काळापासून महाराष्ट्रातील साखरधंदा सरकारकडून मिळणाऱ्या खिरापतीवरच तगून आहे. आता साखर उद्योगाने आपले बस्तान व्यवस्थित बसविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. प्रत्येक कारखान्याच्या परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे आवश्यक आहे. जे कारखाने काही उपाययोजना करून वाचविता येण्यासारखे आहेत ते वाचविण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न व्हायला हवेत. राजकीय लागेबांधे व सोय या पलीकडे ज्यांच्या अस्तित्वाला काही समर्थन नाही असे कारखाने खुशाल बंद झाले पाहिजेत. शेवटी लाख मोलाचा प्रश्न उरतोच: किमान वैधानिक किंमत देण्यासंबंधी ज्या कायदेशीर तरतुदी आहेत त्यांचा किमान वैधानिक किंमत देण्याचे नाकारून भंग करणारांविरुद्ध आणि तसे करण्याची त्यांना फूस लावणारांविरुद्ध कडक कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करण्याची दिल्ली सरकारची तयारी आहे का? तसे नसेल तर समस्या निवारणाच्या नावाखाली अतिरिक्त निधी देण्याच्या आणि साखरेचा अतिरिक्त साठा तयार करण्याच्या प्रस्तावामुळे समस्या प्रत्यक्षात आणखीनच जटील बनण्याची शक्यता आहे. कारण, अशा आयत्या मदतीची शक्यता समोर दिसली तर कार्यक्षमता वाढवून आणि कारभार सुधारून कारखान्याला समस्येतून बाहेर काढण्याची कोणी धडपडच करणार नाहीत.

पंतप्रधानांनी केलेल्या या घोषणांमुळे सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीला थोडीफार उसंत मिळण्याखेरीज दुसरे काही साधणार नाही हे समजायला फारसे कठीण जाऊ नये. साखरसाठा वाढविण्याने साखर कारखान्यांमध्ये पडून असलेल्या साठ्यातील वरचा थरही हलणार नाही. ७८६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद फक्त उत्तर प्रदेशातील ऊस उत्पादकांची देणी भागविण्याच्या उद्देशाने केली असल्याचे सरळसरळ दिसते आहे. त्यामुळे, या निधीमुळे महाराष्ट्रातील साखर समस्येच्या परिस्थितीत काहीही फरक पडणार नाही.

तसे पाहिले तर उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचे आंदोलन त्या मानाने कमी तीव्रतेचे आणि थोड्या कच्च्या पायावरचे आहे. उसाची तेथील राज्य प्रशासित किमत किमान वैधानिक किमतीपेक्षा बरीच अधिक आहे. ऊसउत्पादकांना त्याहून अधिक किमत हवी आहे त्यासाठी हे आंदोलन आहे; पण शेवटी उत्तर प्रदेश हा उत्तर प्रदेश आहे आणि संसदेच्या दोन्ही सभागृहात तेथील ऊस उत्पादकांची बाजू बऱ्यापैकी मांडली जाते. उत्तर प्रदेश राजधानीपासून बराच जवळ असल्यामुळे दिल्ली ही किसान मोर्चाच्या फटक्याच्या अंतरात आहे आणि महाराष्ट्र, तामिळनाडू यांसारख्या राज्यांपेक्षा उत्तर प्रदेशातील निदर्शनांनी धास्तावून जाण्याची दिल्लीश्वरांची परंपराच आहे. त्यात आणि सध्या तर उत्तर प्रदेशातील ऊस उत्पादकांचे नेते संसद भवनालाच धडका देत आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या निर्णयावर महाराष्ट्रातील आंदोलनापेक्षा उत्तर प्रदेशातील आंदोलनाची छाप आहे हे समजण्यासारखे आहे. महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता आहे आणि उत्तर प्रदेशात भाजपाच्या मित्रपक्षाची हे आणखीही एक कारण असू शकते.

सध्या सुरू असलेले हे ऊस आंदोलन शमायला अजून खूप अवधी आहे. आतापर्यंत झाले ती नुसती सलामी होती. उत्तर प्रदेश पुढील चढाईची आखणी करीत आहे. गुजरातसुद्धा फार मागे राहील असे वाटत नाही. हिंदुस्थानातील एकूणच साखर उद्योगाची परिस्थिती सुधारायला लागण्याआधीच आणखी बिघडण्याची भीती आहे.

(शेतकरी संघटक, ६ जानेवारी २००३)

■



# ■ कर्जबळी ■

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या

चाळीस

# मारा, मरू नका!

दिल्लीत नवे सरकार आले आहे. साऱ्या देशभर चर्चा, नव्या सरकारची जुळवाजुळव, त्याकरिता होणारी देवघेव, धावफळ यांकडे वेधले गेले आहे. आंध्र प्रदेशासंबंधी बातम्या येतात त्या चंद्राबाबू नायडू सत्तेचा खेळ किती चलाखीने खेळत आहेत याबद्दल. कर्नाटकात सत्तेसाठी अशीच रस्सीखेच चालू आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री आर्थिक समस्यांनी पीडलेले, विरोधकांनी चेपलेले आणि त्याहीपेक्षा, ताळतंत्र सोडलेल्या ' रिमोट कंट्रोल ने भांबावलेले यासंबंधी बातम्या येतात. आंध्र प्रदेशातील वारंगळ जिह्यात २८० (आकडा २८ मार्च ९८ चा) शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. कर्नाटकातील २० शेतकऱ्यांनी जीव दिला, महाराष्ट्रातही हा आकडा १६ पर्यंत पोचला आहे. एवढ्या मोठ्या संख्यने कोणत्याही सुसंस्कृत देशात आत्महत्या झाल्या असत्या तर साऱ्या वर्तमानपत्रांनी आठवडे न् आठवडे या एका विषयावरच लिहिले असते. हिंदुस्थानात शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयात वर्तमानपत्रांच्या वाचकांना रस नाही, त्यामुळे किरकोळ उल्लेखापलीकडे काही छापले जात नाही.

तीन राज्यांत ३०० च्या वर शेतकऱ्यांनी जीव दिला. जगणे अगदीच असह्य झाले म्हणजे असा कडेलोटाचा निर्णय माणूस घेतो. एकदम ३०० जणांना स्वतःचा अंत करून घेण्यापलीकडे पर्याय नाही असे का वाटले? आंध्र प्रदेशात दहा वर्षांपूवी प्रकाशम जिल्ह्यात १२ शेतकऱ्यांनी विष पिऊन जीव दिला होता. त्यानंतर जवळजवळ प्रत्येक वर्षी तेथे काही शेतकरी जीव देतातच. २३ मार्च १९९६ रोजी महाष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील साहेबराव करपे थोरगव्हाणहून निघाले आणि सारे कुटुंब घेऊन वर्ध्याला आले. विजेचे बिल भरता आले नाही म्हणून त्यांचे वीज कनेक्शन विद्युतमंडळाने तोडले होते. पाण्याअभावी पिके वाळून चालली होती. ते सारी उघड्या डोळ्यांनी



पाहवले नाही म्हणून साऱ्या करपे कुटुंबाने विष प्राशन करून इहलोक यात्रा संपविली.

एकट्यादुकट्या आत्महत्येच्या प्रकरणात परिस्थितीचे संपूर्ण निदान कठीण असते. आर्थिक आपत्तीमागे काही वैयक्तिक दुर्दैवाच्याही कथा लपलेल्या असतात; पण ३०० शेतकरी, तीन राज्यांतील, वेगवेगळ्या जिल्ह्यांतील, दूरवर विखुरलेल्या खेड्यापाड्यांत-महिन्या दोन महिन्यांच्या कालावधीत अशा निर्वाणीच्या निर्णयाला येतात; ही अशी आत्महत्यांची लागण कशी झाली?

काही मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्री म्हणतात की आत्महत्यांची प्रकरणे पुंजक्याने घडतात. जीव जगवावा, त्यासाठी पराकोटीची धडपड करावी अशी साऱ्या जीवमात्रांची प्रेरणा असते; पण कुटुंबातील कोणी जीव दिला, गावात कोणी फाशी लावून घेतली किंवा समाजातही अशा दोनचार हकिकती घडल्याचे कानावर पडले की साऱ्या विपत्तीची अंत करण्याचा आत्महत्या हा एक मार्ग असू शकतो या कल्पनेचा मनात प्रवेश होतो आणि ती कल्पना ठाण मांडून बसते. मंडलप्रकरणी एका गोस्वामीने आत्मदहनाचा प्रयत्न केला याची बातमी पसरताच शंभरावर तरुण विद्यार्थ्यांनी स्वतःला पेटवून घेतले. नव्याने लग्न झालेल्या तरुणीस सासरी जाच असला तर तिच्या मनात पटकन जीव देऊन सुटका करून घ्यावी असा विचार येतो; कारण अनेक तरुणींनी असे केल्याचे तिच्या कानी पडलेले असते. आत्महत्येचा निर्णयच नव्हे, तर साधनहा अशाच पद्धतीने ठरते. नवविवाहिता स्वतःला पेटवून घेतात; शेतकरी कीटकनाशके पितात. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात ही कीटकनाशके सहज उपलब्ध असतात हे कारण झाले; पण त्याबरोबर विष पिऊन जीव दिलेल्या शेतकऱ्यांच्या कहाण्या कानावरून गेल्या असल्या म्हणजे जिवाला कंटाळलेल्या शेतकऱ्यांचे हात आपोआपच कीटकनाशकाच्या बाटलीकडे वळतात,

दहा वर्षांपूर्वी आत्महत्यांची प्रकरणे घडली तेव्हा मी आंध्र प्रदेशातील प्रकाशम् जिल्ह्यात गेलो होतो. ज्या ज्या कुटुंबांतील माणसांनी जीव दिला त्या साऱ्यांना भेटलो. साऱ्यांची कर्मकथा जवळजवळ एकसारखीच. स्वतःची एकदोन एकर जमीन असलेले छोटे शेतकरी कापसाचे पीक जमले तर एकरी पाचेक हजार रुपये हाती पडतील अशा आशेने पाचसहा एकर जमिनी भाडेपट्टीने घेतात, घरच्या लक्ष्मीचे दागदागिने गहाण टाकतात, बियाणे खरीदतात, खते औषध खरीदतात आणि कापूसशेतीच्या जुगाराला लागतात. त्यावर्षी पावसाने डोळे वटारले, किडींचे असे जबरस्त हल्ल्यावर हल्ले झाले की ते आटोक्यात

येईनात. हजार रुपये लिटर दराने कीटकनरशके खरीदून सरहद्दीवर लढणाऱ्या जवानांच्या शर्थाने शेतकऱ्यांनी त्यांच्याशी मुकाबला केला. काहींनी वीसवीस फवारण्या केल्या; पण किडींनी दाद दिली नाही. पिकाचे नुकसान झाले. भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीची पट्टी आता द्यावी कोठून? लक्ष्मीचे दागिने सोडवून आणण्याचा तर प्रश्नच नाही. बायकोचे दागिने गमावणे यापेक्षा पुरुषाला नामुष्कीची गोष्ट ती कोणती? जीव देऊन सुटणे हा एकच मार्ग. जीव देण्याचा एकतरी फायदा या कुटुंबातील लोक जीवापेक्षा प्रतिष्ठा महत्त्वाची मानतात अशी कीर्ती होते. त्यामुळे. जमिनीचे मालक मृताच्या कुटुंबातील कोणाला पुढच्या वर्षी पुन्हा जमीन भाडेपट्ट्याने द्यायला तयार होतात. बारा मृतांपैकी फक्त एकच स्त्री होती. कुटुंबप्रमुख असल्याने तिची गत पुरुषांसारखीच झाली. सरकारने काही थातुरमातुर रक्कम कुटुंबांच्या सांत्वनार्थ दिली होती.

'यापुढे तुम्ही काय करणार ? प्रश्न मी प्रत्येक कुटुंबाला विचारला. सगळ्यांचे उत्तर एकच 'दुसरे काय? कापूस शेतीखेरीज आम्हाला पर्यायच काय आहे?'

यंदा हा आकडा दशकातला नाही; तीनशेच्या वरचा आहे. फरक केवळ अंशात्मक नाही, गुणात्मक आहे. इतके शेतकरी जीव का देतात? त्यात सर्वात जास्त प्रमाण आंध्र प्रदेशचे का? आणि कापूस किंवा तूर पिकविणाऱ्यांचे का? हरियाणातील गव्हाचे पीक यंदाच्या गैरमौसमी पावसाने ४०पैसे बुडाल्याची बातमी आहे; पण कोणी हरयाणवी जाट शेतकऱ्याने जीव दिल्याची बातमी नाही. या साऱ्या आत्महत्यांचे अर्थशास्त्र काय आणि त्यांची समाजशास्त्रीय उपपत्ती काय?

गैरमौसमी पावसाने यंदा देशातील साऱ्याच राज्यांत हाहाकार उडविला. नोव्हेंबर महिन्यात २० दिवस पाऊस आणि डिसेंबर महिन्यात २४ दिवस पाऊस आणि गारा यांचा मारा! अगदी म्हाताऱ्यातील म्हाताऱ्या शेतकऱ्यालादेखील असे पूर्वी कधी घडल्याचे स्मरणात नाही. सोयाबीन, ज्वारी, कापूस आणि तूर यांचे सर्वदूर भयानक नुकसान झाले. पंजाबातील कोरडवाहू प्रदेशात गव्हाचे पीक फारसे येत नाही, तेथे यंदा भरभरून पीक आले आणि मोठ्या प्रमाणात गहू पिकविणाऱ्या जिल्ह्यांत पीकबूड झाली. या पावसाने उसाच्या पिकाचा मोठा फायदा झाला आहे. येत्या हगामात ऊसउत्पादकांना अमाप पिकाचा झटका वसणार आहे. बहुतेक साऱ्या शेतकऱ्यांवर संकट आजच येऊन कोसळले आहे.



ज्यांनी समजूनउमजून डोळे आणि कान बंद केलेले नाहीत त्यांना शेतकऱ्यांच्या दुर्दैवाची आणि रोषाची जाणीव होणे काही कठीण नव्हते.

हरित क्रांतीचे शेतीची सारी पद्धतच आमूलाग्र बदलली आहे. पिके बुडाली म्हणजे शेतकऱ्यांपुढे पहिले संकट उभे राहते ते, विजेचे बिल रोख भरावे कसे? त्यानंतरचे संकट बी-बियाणे, खते, औषधे यांकरिता घेतलेल्या कर्जाचा हप्ता फेडावा कसा? विविध राज्यांतील शेतकरी आंदोलने १९७० पासून विजेचे दर आणि कर्जमुक्ती यावर भर देतात ते यामुळे. ही दोन देणी पहिल्यांदा जबडा वासून पुढे येतात. भरणा करता येत नाही म्हणून द्यायची रक्कम फुगत जाते प्रत्येक वर्षी पावसाळा आला म्हणजे शेतकरी पुन्हा एकदा उमेदीने आणि हिमतीने कामाला लागतो. जमेल तसे बियाणे, खते मिळवतो आणि एखाद्या जुगाऱ्याच्या कैफाने जमिनीत घालतो. काही वेळा पिके बुडतात, काही वेळा थोडी कमी बुडतात. काही झाले तरी शेवटी परिणाम एकच. पिके चांगली असली तर किमती पडतात आणि वाईट असली तर वाढत्या किमतीचा शेतकऱ्याला काहीच उपयोग नसतो. वर्षाअखेरीस साऱ्या शेतीच्या हिशेबांचा ताळेबंद एकच गोष्ट दाखवतो-मुद्दल, व्याजावर व्याज, दंडव्याज सारे मिळून देण्याची रक्कम आणखीच फुगली आहे.

दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यत, शेतकऱ्यांच्या मनात एक सन्मानाची जबरदस्त भावना असते. खोटेपणा त्याला रुचत नाही. हा सारा धार्मिक शिकवणुकीचा परिणाम असेल, कदाचितः पण, कर्ज बुडविणे ही कल्पना त्याला पटत नाही – भले सावकाराने 'आल्गुन फाल्गुन शिमगा' अशी खोटी आकडेमोड केली असो; भले शेतीच्या व्यवसायात हाती काही लागणार नाही अशी व्यवस्था ठरवून झालेली असो.

हे असे पिढ्यान् पिढ्या चालले आहे. वय झाले, शरीर थकले म्हणजे म्हाताऱ्या शेतकऱ्यांच्या लक्षात येते की आयुष्यभर खेळलेल्या खेळात ते हरले आहेत. बापाकडून वारशात मिळालेल्या कर्जापेक्षा कितीतरी जास्त कर्जाचा बोजा आपण आपल्या लेकराच्या डोईवर ठेवून जात आहोत या कल्पनेने तो व्याकूळ होतो. वयोमानामुळे हात चालत नाहीत, काम होत नाही. आपण आता केवळ पोराच्या संसारावर भार बनून राहिलो आहोत; हे त्यांच्या लक्षात येते. पिढ्यान्पिढ्या, अशा वयात शेतकरी आई बाप आपल्या पोरांना सांगत, 'पोरांनो, आमचं आता वय झालं, सारा काही संसार पार पडला, तुम्ही कर्तेसवरते झाले. आता एकच इच्छा राहिली आहे; काशीला

मरण यावे, म्हणजे देहाचे सोने होईल. एवढी एक इच्छा काही करून पुरी करा.' म्हातारा-म्हातारी काशीला जाण्यास निघत, एक लहानसे गाठोडे बरोबर घेऊन. त्यातली काही काशी म्हणा, काही पंढपूर म्हणा -एखाद्या तीर्थक्षेत्री पोहोचत. अशा क्षेत्रस्थानी धनी लोक 'पुण्याय पापक्षालनार्थ।' येतात; गरीबगुरिबांना, अपंग भिकाऱ्यांना भेजनावळीत जेवू घालतात, काही नाही म्हटले तरी आठवड्याभरात दोनतीन जेवणांची तरी सोय होते. सिंदबाद खलाशाच्या कहाण्यांत, 'एका बेटावरील एका दरीत वयोमानाने थकलेले हत्ती मरण्याआधी येऊन ठाकतात' असे वर्णन आहे.' काशीस जावे, नित्य वदावे ।', काशीस जाऊन मरण आले तर सरणाचादेखील खर्च येत नाही. 'काशीस जाणे' हा पिढ्यान्‌पिढ्या शेतकऱ्यांनी स्वीकारलेला सामूहिक आत्महत्येचा मार्ग आहे.

हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानामुळे बिगरशेतकरी लोकसंख्येला मुबलक अन्नधान्य मिळू लागले हे खरे; पण त्यासाठी लागणारे बियाणे, खते, औषधे आणि मजुरी यांचा खर्च मिळणाऱ्या किमतीतून कधीच पुरा भरून आला नाही. शेतकरी गरिबीत आणि कर्जात खचतच गेला. वाढत्या कर्जबाजारीपणाचे प्रमाण पाहिले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या आहे त्यापेक्षा कितीतरी पट मोठी असायला पाहिजे होती; पण असे झाले नाही. शेतकऱ्यांची सन्मान आणि प्रतिष्ठेची परंपरा ढासळत आहे. मोठेमोठे जमीनमालक, त्यांची प्रतिष्ठा मोठी, राजकीय सत्ताही त्यांच्याच हाती. कर्ज परत करणे म्हणजे आपल्या इभ्रतीस कमीपणा आणणारी गोष्ट समजात! कर्ज बुडविण्यास एक प्रकारची सामाजिक प्रतिष्ठा लाभली आहे. याला कोणी 'नीतिमत्ता खालावली ' असे म्हणेल; पण या नैतिक अधःपतनामुळेच शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी कीटकनाशकांच्या बाटलीकडे किंवा जवळच्या विहिरी-डोहांकडे जायच्या थांबल्या आहेत. अन्यथा, ज्यांच्या संसारला 'सांजी' येण्याची काही आशाच नाही त्यांनी आयुष्य कंठावे कोणत्या आधाराने?

यंदाचा पहिला उठाव हरियाणातील शेतकऱ्यांनी केला. विजेच्या दराच्या प्रश्नावर नोव्हेंबर ९७ मध्ये उग्र निदर्शने झाली. लोहमार्गावर बसलेल्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी गोळीबार केला; ८ ठार, शंभरावर जायबंदी. १२ आणि १३ डिसेंबर रोजी 'शिवशाही' पोलिसांनी, कापसाचा भाव वाढवून मागणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील आंदोलक शेतकऱ्यांवर गोळीबार केला; ३ ठार १७ जखमी. मध्य प्रदेशीतील बैतूल जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीनचे पीक साफ बुडाले .



खावटीपोटीतरी काही मिळावे या आशेने शेतकरी मुलताईच्या मामलेदाराच्या कचेरीसमोर जमले. पोलिसांनी कचेरीच्या छपरावर उभे राहून, जनरल डायरला लाजवील अशा क्रौर्याने अंदाधुंद गोळीबार केला. २७ जागीच मेले, त्यात तीन स्त्रिया; घायाळ किती झाले याचा नक्की हिशेब आतापर्यंत लागलेला नाही.

२१ मार्च १९९८ रोजी दिल्लीला किसान समन्वय समितीची बैठक झाली. या साऱ्या परिस्थितीचा आढावा घेतला गेला. आंध्र प्रदेशचे एस.पी. शंकररेड्डी डोळ्यांत पाणी आणून म्हणाले, 'आपण दक्षिणेत काही तरी केले पाहिजे' पंजाबहून आलेला एक शेतकरी म्हणाला,'आमच्यात कोणी जीव दिला नाही एवढेच हो! आमची परिस्थिती मोठी कठीण आहे'.

महाराष्ट्रातल्या काय, कर्नाटकातल्या काय शेतकऱ्यांच्या आत्महत्या दशकानुदशके राबविल्या जाणाऱ्या शेतकरीविरोधी धारेणांचा साहजिक परिणाम आहे. कोणी युगपुरुष अवतरला आणि हिंदुस्थानात शेतकऱ्यांविरुद्ध चाललेल्या अमानुष धोरणासंबंधी साऱ्या जगाला जागविले तर काही आशा आहे. अन्यथा हिंदुस्थानातील शेतकरी मरतच राहतील.आंध्र प्रदेशातील आत्महत्यांकडे थोडे आधिक बारकाव्याने पाहणे आवश्यक आहे.

पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील उप्पकपाडू गावच्या बी. व्यंकटरामा राव यांच्या आत्महत्येसंबंधी अनेक वर्तमानपत्रांनी सविस्तर वृत्तांत छापले आहेत. व्यंकटरामाच्या बापाने १५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. तो दोन वर्षांपूर्वी कॅन्सरने मेला. बँक तगादा लावू लागली. व्याज धरून द्यायची रक्कम आता झाली रुपये २७६९५. कापसाचे पीक बुडाले; देणे थकले; बँकचे अधिकारी गावात कर्जवसुलीसाठी आले; बरोबर पोलिस बंदोबस्त आणि ढोल ताशेवाले. ते साऱ्या गावभर दवंडी देत फिरले. 'व्यंकटरामा राव याने बँकेचा भरणा केला नाही म्हणून त्याच्या घरातील चीजवस्तू जप्त करण्यात येत आहे. बँकेला बुडवू पाहणाऱ्या शेतकऱ्यांनो, याद राखा! शेजाऱ्यापाजाऱ्यांनी दीड हजार रुपये जमा करून बँक अधिकाऱ्यांकडे दिले. व्यंकटरामाने गयावया करून 'दवंडी तेवढी थांबवा आणि माझी अब्रू वाचवा' अशी विनवणी केली. काही परिणाम झाला नाही. त्याने पुन्हा एक विनंती केली,'शेजारच्या ताडेपल्लीगुडम गावच्या सावकाराकडे जाऊन येण्यापुरता मला अवधी द्या. तो ६० टक्के व्याजाने पैसे देतो म्हणतात, असू द्या. तुमची भरपाई करतो' सावकाराने पैसे दिले नाहीत. व्यंकटरामा परत आला तेव्हा बँकेचे अधिकारी हसतखिदळत घरातील सामान

काढून ट्रकमध्ये भरत होते. त्याची आजारी मुलगी एका खाटेवर पडली होती. तिला उतरवून खाली ठेवून ती खाटसुद्धा उचलून नेण्यात आली. कोणीतरी ठरवून व्यंकटरामाचा सूड उगवत होते. व्यंकटरामा जवळच्या कृषिसेवाकेंद्रात गेला, कीटकनाशकाची एक बाटली उघडून प्याला, घराजवळ पोहोचला. बँक अधिकाऱ्यांचा धिगाणा चालूच होता. लडखडत्या पायांनी तो घरासमोर पोहोचला आणि जमिनीवर कोसळला, थोड्याच वेळात निष्प्राण झाला.

तेरा वर्षांच्या आपल्या मुलाला त्यांची विधवा आई म्हणाली, 'आता आपलं काही खरं नाही. मी हे औषध पिऊन जीव देणार आहे. तुला सरकारातून काय पैका भेटल त्यातून होईल तितकं कर्ज फेड आणि बाळा तू औक्षवंत हो' तिच्या पोराने आईला समजवायचा प्रयत्न केला, 'तू गेली तर मी काय करू गे! मला सोडून जाऊन नको माये' पण आईचा निश्चय पक्का. तिने तो पार पाडला.

आणखी एक शेतकरी, थोडा जास्त हिंमतवान. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू एका मोठ्या सभेत भाषण देते होते. तो व्यासपीठावर चढला आणि सगळ्यांदेखत विष घटाघटा प्याला.

मला एक शेतकरी भेटला, त्याने कीटकनाशक पिऊन जीव देण्याचा प्रयत्न केला होता. पण, औषध निघाले भेसळीचे; तो जिवंत राहिला. ज्या भेसळ औषधांनी शेकड्यांनी शेतकऱ्यांवर जीव देण्याची पाळी आणली त्यांनीच या एकट्याचा जीव राखून ठेवला.

वारंगळमधल्या आत्महत्यांची निश्चित कारणमीमांसा करणे कठीण आहे; पण तेथील शेतकरी कापसाची शेती कशी करतात ते पाहिले पाहिजे. या साऱ्या मृत्यूंचे रहस्य त्यामागेच दडले असण्याची शक्यता आहे.

वारंगळमधल्या साऱ्या आत्मघातींनी कापूस पिकविण्याकरिता जमीन भाडेपट्टीने घेतली होती. एका हंगामाचे भाडे मगदुराप्रमाणे एकरी रुपये तीन ते पाच हजार. वारंगलच्या शेतकऱ्याच्या डोक्यावर खर्चाचा हा एक मोठा बोजा आहे. इतर शेतकऱ्यांना तो फारसा जाणवत नाही. बहुतेक शेतकऱ्यांना जमीन वारसा हक्काने मिळालेली असते. तिचा नगदी खर्च काही नसतो. अर्थशास्त्रातल्या 'पर्यायी खर्च (Opportunity Cost) या संकल्पेची त्यांना जाणीवही नाही. पीक घेण्याऐवजी आपण जमीन विकली असती व आलेली रक्कम व्याजाने ठेवली असती तर दरसाल जे बिनधास्त उत्पन्न मिळाले असते ते आता मिळणार नाही. कापूस पिकविण्याचा निर्णय घेतला तेव्हा पहिला बोजा घेतला तो व्याजाची



ही मिळकत सोडून, असे त्यांना कोणी समजावून सांगू लागला तर त्याला मूर्खात काढतात. वारंगळच्या शेतकऱ्यांना जमिनीवरचा खर्च हा काही केवळ संकल्पना नाही, त्यांना तो रोख नोटा टाकून मोजावा लागतो. वारंगळमधील कपाशीचा उत्पादनखर्च देशतील इतर प्रदेशांपेक्षा त्यामुळे जास्त राहाणार. भाडेपट्ट्याची रक्कम आणि पिकांचा उतारा लक्षात घेता वारंगळच्या कापसाचा उत्पादनखर्च प्रती क्विंटल रुपये १५० ते ५०० केवळ जमिनीच्या भाडेपट्ट्यापोटी वरचढ असू शकतो.

दुसरी गोष्ट. आत्महत्यांचे सारे प्रदेश कोरवाहू आहेत. उपसा करून सिंचनाची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी, विहिरी खोदाव्या लागतात, पाईट टाकावे लागतात, वीज घ्यावी लागते. कालव्यावर बागायती होणाऱ्या शेतीपेक्षा हा खर्च कितीतरी पटींनी अधिक असतो. शिवाय, जेथे किमान पाण्याची सोय होईल तेथेच पीक घेतले जाते. कापसाच्या शेतीचे तुकडे दूर दूर विखुरलेले असतात सलग लागोपाठ कापसाची वावरे असू शकत नाहीत. त्यामुळे किडी आणि रोगराईचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढतो. कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो. एकाच पिकासाठी पंधरा-वीस फवारण्या सहज होतात. आंध्र प्रदश साऱ्या देशात वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशक औषधांपैकी २४ टक्के एकटाच वापरतो.

ही संधी साधण्यासाठी काही व्यापारी आणि कारखानदार टपलेलेच असतात. एकट्या वारंगळ जिल्ह्यात कीटकनाशकांचे ६० स्थानिक उत्पादक आहेत. त्यांच्या औषधांचा अनेकदा परिणाम होत नाही. कारण, त्यात भेसळ असते किंवा ती अगदीच खोटी असतात. औषधी विकणारे बरोबरीने सावकारीही करतात. ते खात्यावर औषधे देत नाहीत ; खात्यावर कर्ज देतात आणि मुद्दल रोख देण्याऐवजी तितक्या रकमेचा माल देतात. बनावटी औषधांवर कमिशन जास्त, त्यामुळे असला मालच बिनरोखीच्या गिऱ्हाईकांना जास्त करून पुरवला जातो.

माझ्या ऐकण्यात एक गोष्ट आली. एका शेतकऱ्याची बायको दवाखान्यात होती. त्याला दोन हजार रुपयांची तातडीची गरज होती. पैसे जमा होईनात. तेव्हा त्याने एका दुकानातून ४००० रुपयांचे कर्ज काढले, दोन लिटर कीटकनाशक घेतले. त्यातले थोडे बाजूला ठेवून उरलेले त्याने बाजारात २००० रुपयांना दुसऱ्या एका शेतकऱ्यास विकले; पैसे दवाखान्यात पोहोचवले आणि निरोशेपोटी, बाजूला ठेवलेले औषध पिऊन टाकले.

वारंगळ जिल्ह्यात जीव देणारे शेतकरी आयुष्यातील खडतर प्रश्नांना तोंड देण्यास असमर्थ ठरले; ते भेकडे होते का? त्यांनी शौर्य गाजवले, त्याच्या भोवतालच्या आर्थिक परिरिस्थतीचा आणि आईच्या मांडीवर शिकलेल्या नैतिक मूल्यांचा ते बळी होते.

दहा-वीस वर्षांपूर्वी या भागात कापूस घेण्याचा कार्यक्रम चालू झाला, त्यावेळी जमिनी नव्या होत्या; एकरी पंधरा-वीस क्विंटल पीक येई. आता ते घटत घटत आठ-दहा क्विंटल इतके उतरले आहे. औषधाखतांचा खर्च एकरी बारापंधरा हजार रुपयांपर्यंत वाढला आहे. बऱ्यापैकी पीक आले तरी मजुरीखेरीज काही सुटण्याची शक्यता नाही. पाऊस ठीक पडला नाही, वादळ आले, बियाणे खराब निघाले, कीटकनाशकांत भेसळ असली किंवा नेमक्या पाणी देण्याच्या वेळी वीज गेली की मग तो बुडालाच. सर्कशीतील झोक्याइतकाच हा जीवघेणा खेळ. सर्कशीत खाली संरक्षण जाळे तरी पसरलेले असते; वारंगळच्या कपासशेतीत थोडी चूक झाली तर त्याला क्षमा नाही.

मुडदे पडले म्हणजे गिधाडे जमतातच. ज्यांनी कधी शेतीच्या अर्थकारणात स्वारस्य दाखविले नाही असे स्वयंसेवी संघटनांचे नेते मुलताई आणि वारंगळभोवती घिरट्या घालत आहेत. शेतकऱ्यांना ते सांगतात, ''तुमच्यावर हे संकट कोसळले ते सारे या खुलीकरणाच्या धारेणामुळे. हे असंल स्वातंत्र्य आपल्या काय कामाचं?'' बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक व्यापार संघटना यांच्यावरचा रागही ते या निमित्ताने काढून घेतात, 'बहुराष्ट्रीय कंपन्या आता हिंदुस्थानात ८०० रुपये क्विंटल भावाने कापूस पाठवीत आहेत. त्यामुळे कापसाचे भाव पडले आहेत. या शेतकऱ्यांच्या आत्महत्या नाहीत, हे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे बळी आहेत' अशा प्रचाराना त्यांनी धूमधडाका चालविला आहे.

यात आर्श्चय वाटण्यासारखे काही नाही. मनगढंत अफवा पसरविणे ही त्यांची कामाची शैली आहे. डंकेल प्रश्नावर चर्चा चालू होती तेव्हा हीच मंडळी देशभर साऱ्या शेतकऱ्यांना बागुलबुवा दाखवीत फिरत होती,'हा डंकेल राक्षस तुमच्या शेतातील बियाणे आणि गोठ्यातील गोऱ्हासुद्धा घेऊ मागतोय' या असल्या बाष्कळ प्रचाराचा प्रतिवाद करावा लागतो हीच मोठी दुःखाची गोष्ट आहे. कीटकनाशकांचा संबंध आहे म्हणावे तर शेतकऱ्यांचा प्राण घेतला ते बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या औषधांनी नाही. तर देशी उद्योजकांच्या खोट्या उत्पादनांमुळे. परदेशात कापसाचे भाव हरहमेश येथल्यापेक्षा अधिक चढे राहतात. जागतिक व्यापार संघटनेकडेकडे व्यापार मंत्रालयाने जी आकडेवारी



पुरविली त्यानुसार कापसाला १९८६ ते १९८९ या तीन वर्षांच्या काळात २०५.८२ टक्के उणे सबसिडी होती. थोडक्यात आणि सोप्या भाषेत सांगायचे तर हिदुस्थानातील बाजारपेठेतील कापसाचे भाव देशी कापडगिरण्यांच्या फायद्यासाठी आंतरराष्ट्रीय भावांच्या तुलनेने सतत खाली ठेवण्यात आले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या स्वार्थी असतात, बाजारपेठेत त्या दयामाया दाखवीत नाहीत हे खरे आहे. पण, दुसऱ्या देशात प्रति क्विंटल रु.४००० मोजून येथे आणण्याचा वाहतुकीचा खर्च करून आठशे रुपये प्रति क्विंटल विकायला त्या काही हिंदुस्थान सरकारइतक्या मूर्ख आणि अधम नाहीत!

ही सारी शोकांतिका अशीच वर्षानुवर्षे चालू राहणार? लक्षणे तर सारी अशीच दिसतात. बंगालच्या दुष्काळात लाखोंच्या संख्येने शेतकरी आपली कुटुंबे घेऊन अन्नाच्या शोधार्थ गावे सोडून कलकत्त्याला पोहोचले. लष्कराच्या उपयोगासाठी ठेवलेली धान्यानी भारलेली कोठारे त्यांच्या नजरेला समोर दिसत होती. कोणी एकानेही गोदाम फोडण्याचा प्रयत्न केला नाही. सारे भरल्या गोदामांच्या समोर भुकेने व्याकूळ होत मेले.

गांधीजींनी अनेक वेळा म्हटले, ''अहिंसा म्हणजे भिरुता नाही. भीतीपोटी शरण जाण्यापेक्षा हिंसाचार केलेला अधिक भला. गांधीजींच्या या वाक्यात साऱ्या शेतकऱ्यांना काही संदेश दिसू शकेल. पिढ्यान्‌पिढ्यांच्या शोषणाच्या चटक्यांच्या अनुभवाने निराश झालेल्या, आजच्या संकटांपुढे मूकपणे शरण जाऊन आपली पोरेबाळे तशीच उघड्यावर टाकून निघून जाणाऱ्या शेतकऱ्यांना, आज गांधीजी असते तर त्यांनी काय सांगितले असते? 'शेतकऱ्यांनो, मारा, मरू नका! ' असे नसते सांगितले?

*(शेतकरी संघटक, २१एप्रिल१९९८)*

■

एकेचाळीस

# यवतमाळचे दुखणे

महाराष्ट्राच्या विदर्भ विभागात निसर्गाचे अफाट देणे लाभलेल्या जिल्ह्यांपैकी यवतमाळ हा एक जिल्हा आहे. विपुल पर्जन्यवृष्टीच्या कृपेने या जिल्ह्यातील बरेच भूभाग हिरव्यागर्द वनराईने नटलेले आहेत. यवतमाळ हा महत्त्वाचा कापूस उत्पादक जिल्हा आहे. इतका महत्त्वाचा की ब्रिटिश राजवटीत ब्रिटिश कंपन्यांनी मोठा खर्च करून कापसाच्या वाहतुकीसाठी जिल्ह्यातून स्वतंत्र रेल्वेमार्ग तयार केले. रस्ते आणि जंगले यांतून नागमोडी वाटा काढीत हा मीटरगेज रेल्वेमार्ग अख्ख्या जिल्हाभर फिरला आहे. स्वातंत्र्याच्या उदयकाळी यवतमाळ जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनावर 'इजारदारां'चा पगडा होता. 'इजारदार' याचा शब्दश: अर्थ 'जो इजार म्हणजे पँटपायजमा घालू शकतो' असा. व्यवहारात त्याचा अर्थ तीनशे ते पाचशे एकराच्या आसपास जमीन बाळगणारा छोटा जमीनदार. उदार समृद्ध निसर्गाच्या कृपेने या इजारदारांचा वर्ग संपन्न जीवन जगत होता. अवर्षण, उपासमार यांच्याशी त्यांची गाठ कधी पडली नाही.

आज स्वातंत्र्यानंतर पंचावन्न वर्षांनंतर, यवतमाळचे चित्र पूर्णपणे पालटून गेले आहे. अधिकृत सरकारी आकडेवारीनुसार २००१ सालापासून या जिल्ह्यातील १५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत – २००१ मध्ये १७, २००२ मध्ये ३८, २००३ मध्ये ५२ आणि २००४ मध्ये जुलै महिनाअखेर ४७. आत्महत्या करणाऱ्या या १५४ शेतकऱ्यांपैकी ९ जणांचा अपवाद वगळता सर्वच्या सर्व शेतकरी वेगवेगळ्या कर्जपुरवठा संस्था किंवा सावकार यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या बोजाखाली होते. थकित कर्जाच्या रकमा सर्वसाधारणपणे पाच आकडी होत्या; ज्यांची शेतीमालाची उलाढाल बहुतेकदा सहा आकडी रकमेत व्हायची त्यांच्या दृष्टीने हा कर्जाचा बोजा 'अगदी असह्य' या सदरात नक्कीच



मोडणार नाही.

मराठवाड्यातील, यवतमाळलगतच्या जिल्ह्यांतही आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मोठी संख्या आहे; पण यवतमाळइतकी मोठी नाही. सातारा, पुणे, सोलापूर, जळगाव जिल्ह्यांत पहिल्या आत्महत्या २००४ च्या जुलै महिनाअखेरी झाल्याचे नोंदले गेले आहे.

महाराष्ट्राच्या इतर भागांच्या तुलनेत, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची यवतमाळ जिल्ह्यात सख्या अधिक आहे याचा अन्वयार्थ कसा लावणार?

सर्वात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे कापूस उत्पादक शेतकऱ्यांवरच ही पाळी आली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सर्वाधिक प्रमाण असणाऱ्या आंध्र प्रदेशातही बळी गेले ते मुख्यत: कापूस उत्पादकच. आंध्र प्रदेशातील आत्महत्या सत्रातील बळी हे भूमिहीन शेतकरी होते. उलट, विदर्भातील बळी शेतकरी हे जमीनधारक शेतकरी होते. आंध्रातील शेतकऱ्यांना नकली कीटकनाशके, निकृष्ट बियाणी यांनी दगा दिला; महाराष्ट्रात असे अगदी अपवादाने घडते. साहजिकच, शेतकऱ्यांच्या मोठ्या संख्येने आत्महत्यांचे कारण त्यांनीच पिकविलेल्या कापसासंबंधानेच असणार. किमत अनुदान (Aggregate Measureme of Support - AMS) अर्थात् सब्सिडी. (म्हणजे सरकारी नियंत्रणाखाली शेतकऱ्यांना मिळालेली किमत) उणे (नियंत्रणमुक्त खुल्या बाजारपेठेत मिळाली असती ती किमत) कापसाच्या बाबतीत सर्वात नीच आहे. सरकारने जागतिक व्यापार संस्थेला दिलेल्या माहितीनुसार १९९६–९७ या वर्षात कापसासाठी अनुदान उणे २५८.५१ टक्के होते. म्हणजे त्यावर्षी खुल्या बाजारात ज्या कापसाला ३५८.५१ रुपये मिळाले असते त्याला फक्त १०० रुपये व्हावे अशी सरकारने व्यवस्था केली. तेव्हा, उणे किमत अनुदान किंवा उणे सबसिडी हेच भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागचे मूळ कारण आहे.

शेजारच्या अमरावती जिल्ह्यातील आदिवासींना ज्या उपासमारीचा आणि दुष्काळाचा नेहमीच सामना करावा लागतो त्याची ओळखसुद्धा यवतमाळमधील कापूसउत्पादक शेतकऱ्यांना नव्हती; त्यांना तोंड देण्याचे दूरच. चालू वर्षी अमरावती जिल्ह्याच्या चिखलदरा परिसरातील सुमारे ९००० बालके कुपोषण किंवा उपासमारीच्या तडाख्यात सापडल्याचे उघडकीस आले आहे. विदर्भातील कापूसउत्पादक शेतकऱ्यांना, त्यांच्या जित्याजागत्या आठवणीत, कधी दगड फोडण्याच्या आणि माती वाहण्याच्या 'रोजगार हमी' च्या कामांवर जावे

लागले नाही; पण यंदाचा दुष्काळ त्यांच्यासाठी वज्रघातासारखा ठरला. त्यात लहरी पावसाने त्यांच्या दोनदोन पेरण्या वाया घालवल्या – आजपर्यंत अशा परिस्थितीला तोंड देण्याची त्यांच्यावर कधी वेळ आली नव्हती.

मोसमी पावसाच्या आगमनाच्या कितीतरी आधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी पतसंस्था तसेच अन्य कर्जपुरवठा संस्थांच्या वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या वसुली मोहिमा सुरू केल्या होत्या. त्यात समजुतीने कर्जफेड करण्यास प्रवृत्त करणे, धमक्या देणे, मानखंडना करणे, राहत्या घरातील भांडीकुंडी, पंखे, सायकली, घरावरील पत्रे जप्त करणे तसेच जमिनींचे लिलाव करणे अशा मार्गांचा ते अवलंब करीत होते. यावर्षी वसुलीची मोहीम राबवताना वसुली अधिकारी विशेष कठोर आणि निष्ठूर बनले होते. २००३–२००४ हे वर्ष विदर्भातील कापूस उत्पादकांसाठी विशेष चांगले गेले होते. एक म्हणजे कपाशीचे पीक भरघोस आले होते आणि महाराष्ट्र राज्य एकाधिकार कापूस खरेदी योजनेचा कारभार स्थगित राहून खासगी व्यापाऱ्यांना कापूस विकण्याची मुभा मिळाल्यामुळे कापसाला भावही चांगले मिळाले. सोयाबीनच्या बाबतीतही तेच घडले. फारा वर्षांनी शेतकऱ्यांच्या हाती नेहमीपेक्षा कितीतरी अधिक पैसा आला. कर्जपुरवठा करणाऱ्या बँका, सहकारी सोसायट्या, राष्ट्रीयीकृत बँका यांना आणि खासगी सावकारांनाही त्याचा वास लगेच आला. वसुली करून कर्जखाती 'निल' करण्यास आणि हिशोब पुरे करण्यास ही नामी संधी आहे आणि ती दवडता नये असा त्यांनी निश्चय केला. परिणामी, वसुलीची तऱ्हा शोषणाच्या पातळीपर्यंत कठोर आणि सक्तीची बनली. बँकेच्या अधिकाऱ्यांनी तर शेतकऱ्यांच्या राहत्या घरात दरवाजाची कुलुपे तोडून जे जे हाताला लागेल ते वसुलीच्या नावाने उचलायला सुरुवात केली. अनेक प्रकरणात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी वसुली अधिकाऱ्यांच्या या भुरटेपणाला अटकाव केला. काही बाबींत तर वसुली अधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसांत घरफोडी आणि दरोडेखोरीचे खटलेही नोंदविले. एका गावात तर वसुली अधिकाऱ्यांनी फोडलेल्या घरातून टेम्पोत भरलेला माल, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पोलिस खटल्याचा धाक दाखवताच, अधिकाऱ्यांनी पाट्या भरभरून डोक्यावरून वाहून पुन्हा त्या घरात नेऊन ठेवला. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचे आणि शेतकऱ्यांचे हे विरोधाचे प्रयत्न, प्रस्थापित सत्तेच्या ताकदीपुढे अरण्यरुदनच ठरले. वसुली अधिकाऱ्यांचे गाढवांचे नांगर गावागावात बेमूर्वतपणे फिरतच राहिले.



परिणामी, शेतकरी आत्महत्या करू लागले. पहिल्यांदा फुटकळ फुटकळ घटना घडल्या; पण या अपमानास्पद जिण्यातून सुटण्याचा हा बरा आणि एकमेव मार्ग आहे अशी धारणा मनात रुजू लागली आणि शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येची साथ आल्यासारख्या पटापट वाढत्या संख्येने आत्महत्या घडू लागल्या.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे हिशेब पाहिले तर यावर्षी झालेली कर्जवसुली, दुष्काळ असूनही, गेल्या पाच वर्षांतील सर्वाधिक वसुली आहे ही याबाबतीत पुरेशी बोलकी बाब आहे.

विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची अधिक गंभीर झाली ती महाराष्ट्र शासनाने १९७१ पासून राबविलेल्या एकाधिकार कापूस खरेदी योजनेमुळे. या योजनेखाली शेतकऱ्यांना मिळालेल्या किमती शेजारील मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश व गुजरात या राज्यांतील कापसाच्या किमतींपेक्षा कितीतरी कमी होत्या. परिणामी, विदर्भातील कापूस उत्पादक वर्षागणिक अधिकाधिक कर्जात बुडत आला. महाराष्ट्रातील कापूस उत्पादकांच्या आत्महत्यांना कारणीभूत म्हणून एकच खलनायक शोधायचा असेल तर महाराष्ट्र राज्य एकाधिकार कापूस खरेदी योजनेकडेच बोट दाखवावे लागेल.

*(शेतकरी संघटक, ६ ऑगस्ट २००४)*

■

बेचाळीस

# अन्नदात्याला आस प्राणदानाची

शुक्रवार दि. ३० जूनच्या सकाळी शेतकरी संघटकसाठी लेख लिहिण्यासाठी मी बसलो आहे. आज सकाळीच पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग कृषिमंत्री शरद पवार आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांबरोबर विदर्भात येणार आहेत. विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा हलकल्लोळ चालला आहे. गेल्या वर्षातच ६०० च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. म्हणजे दर दिवशी सरासरी दोन शेतकऱ्यांनी आपल्या जीवनाचा अंत केला. दुर्दैवाची गोष्ट अशी की इतक्या प्रचंड प्रमाणावर आत्महत्या होऊनही देशातील कोणाचे अंत:करण कळवळले असे दिसत नाही. विश्वनाथ प्रतापसिंगांच्या राजवटीत मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारण्याचे जाहीर झाल्यानंतर १०-१२ विद्यार्थ्यांनी आत्मदाह करण्याचा प्रयत्न केला आणि दिल्लीचे सरकार गडगडले. सरकारी आकडेवारीनुसार १९९५ सालापासून देशभरात एक लक्ष वीस हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी स्वत: कृषिमंत्र्यांनी राज्यसभेत आणि लोकसभेत सादर केलेली आहे. तरीसुद्धा, काही भयानक घडते आहे असे कोणाला वाटलेसे दिसत नाही. यासंबंधी अभ्यास करण्यासाठी स्वत: पंतप्रधान आज विदर्भात येत आहेत.

**शासकीय अनास्था**

गेल्या दोन वर्षांत शासनाने या आत्महत्यांच्या साथीविषयी अनास्था दाखवली, एवढेच नव्हे तर मृत शेतकऱ्यांची काहीशी टिंगलही केली. आत्महत्यांची कारणमीमांसा करताना दुष्काळ, अतिवृष्टी, पिकांवरील रोगराई अशा अस्मानी कारणांव्यतिरिक्त घरातील आजारपणे, व्यसने, घरगुती भांडणे अशी वैयक्तिक कारणे आणि शेवटी पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेचा अभाव आणि कर्जबाजारीपणा अशा सुलतानी काही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तर 'कुटुंबाला एक लाख रुपये मिळतात म्हणून शेतकरी आत्महत्या करतात' असे म्हटल्याचे वर्तमानपत्रात प्रसिद्ध



झाले आहे. कारणांचीही यादी बनवण्यात आली. आत्महत्यांच्या आकडेवारीसंबंधी असाच दुष्ट खेळ करण्यात आला. संसदेला दिलेल्या आकड्यानुसार एकट्या २००४ सालातच केवळ कर्नाटक राज्यातच ८००० च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे मान्य करण्यात आले होते. तरीही, देशभरातील पंजाबपासून केरळपर्यंतच्या सर्व राज्यांतील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या २५००० च्या आसपास सांगितली जात होती.

**फसवी आकडेवारी**

पुण्यामध्ये माथाडी कामगारांच्या एका सभेत बोलताना कृषिमंत्री शरद पवार यांनी 'शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत नवे काहीच नाही, बऱ्याच काळापासून या आत्महत्या चालूच आहेत व त्यांचे प्रमाणही फारसे वाढलेले नाही' असे आग्रहाने मांडले. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी गृहमंत्रालयाने संपादन केलेली आकडेवारी पुढे ठेवली. या आकडेवारीनुसार १९९५ सालापासून दरवर्षी देशात घडणाऱ्या एकूण आत्महत्यांपैकी १४ ते १६ टक्के आत्महत्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा असतात असे मोठ्या पंडिती आविर्भावाने त्यांनी मांडले. त्यांनी दिलेली आकडेवारी अविश्वसनीय होती हे उघड होते. देशात ६०% लोक शेतकरी आहेत. त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण एकूण आत्महत्यांच्या १६ टक्के आहे व देशातील ४० % बिगर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण एकूण आत्महत्यांत ८४ % आहे असे मांडणे हा निव्वळ बाष्कळपणा आहे. शेतीशी दुरान्वयेही संबंध असलेल्या माणसाने अशा आकडेवारीचा कागद क्षणभरसुद्धा हातात धरायला नको होता अशी आकडेवारी पवार साहेबांना विश्वसनीय वाटली; एवढेच नव्हे तर, ती त्यांनी लोकसभेत मांडली. याबद्दल, खरे तर त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई व्हायला हवी होती.

बिगर शेतकऱ्यांच्या आत्महत्या शहरी भागातील पोलिस कटाक्षाने नोंदतात. याउलट, खेड्यापाड्यात झालेल्या अनेक आत्महत्या नोंदल्याच जात नाहीत. तेव्हा, गृहखात्याकडे जमा झालेली आकडेवारी खल्लड आहे हे उघड आहे. शिवाय, आत्महत्या करणारे शेतकरी जमीनमालक आहेत. भूमिहीनांपैकी फारसे कुणी आत्महत्या केल्याची नोंद नाही. तेव्हा १६% आत्महत्या देशातील ६ ते ८ टक्के शेतजमीनधारक करतात आणि ही परिस्थिती भयावह आहे हे शेतीमंत्र्यांनी समजून घ्यायला हवे होते व स्पष्ट करायला पाहिजे होते. 'मोलें घातले रडया, नाही आंसू आणि माया' असा हा सगळा प्रकार आहे.

**चोरांच्या बोंबा**

महाराष्ट्र राज्य शासनाने काही अभ्यास केला आणि १० डिसेंबर २००५ रोजी विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांसाठी एक विशेष 'गाठोडे' (Package) जाहीर केले. हे करताना आत्महत्या करणारे शेतकरी प्रामुख्याने अपंजीकृत सावकारांमुळे पीडित असतात असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी तर लगेच सावकारांची सालटी काढण्यापर्यंत भाषा केली. वस्तुस्थिती अशी की बहुसंख्य आत्महत्या शेतकरी सहकारपीडित आहेत. ग्रामीण भागात गावोपाडी व्यापारी बँका कर्जवसुलीसाठी फारशी दांडगेगिरी करत नाहीत; ते त्यांच्या स्वभावात नाही आणि लोकांचा रोष ओढवून घेण्याची त्यांची मानसिकता नसते. खाजगी सावकार फारशी पठाणी वसुली करण्याची हिंमत करत नाहीत. त्यांना गावात राहायचे असते आणि पाण्यात राहून माशांशी वैर घेण्याची त्यांची हिंमत होत नाही. अलीकडे अकोला जिल्ह्यात एका सावकाराने काहीशी दांडगाई केल्यावर गावकऱ्यांनी त्याला ठार मारल्याची बातमी वर्तमानपत्रात आली आहे. कर्जवसुलीसाठी दांडगाई करण्याची हिंमत, ताकद आणि बुद्धी फक्त सहकारी संस्थांच्या वसुली अधिकाऱ्यांकडेच असते. आपल्या मागे राज्यसत्ता उभी आहे अशा खात्रीने कर्जवसुलीसाठी सहकारी मंडळी अनन्वित जुलूम करतात.

व्यापारी बँका आणि सहकारी बँका यांच्या मानसिकतेचा फरक आणखी एका बाबतीत प्रत्ययास येतो. व्यापारी बँका शेतकऱ्याच्या कर्जावर सहसा चक्रवाढ व्याज लावत नाहीत. याउलट, सहकारी बँका मात्र सर्रास चक्रवाढ व्याज लावतात. एवढेच नव्हे तर, चक्रवाढ व्याज महिन्यामहिन्याला किंवा तिमाहीह्नसहामाहीने चढवतात. हे सर्वांना माहीत आहे. या बाबतीत सहकारी बँकांचे अधिकारी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची पत्रास ठेवत नाहीत आणि रिझर्व्ह बँकेच्या आदेशाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. ही त्यांची बेमूर्वतखोर प्रवृत्ती कर्जाच्या वसुलीच्या बाबतीत अधिक क्रूरतेने प्रत्ययास येते.

राज्याच्या गृहमंत्र्यांनीच सालटी काढण्याची भाषा केल्यानंतर शेतकऱ्यांना अडीअडचीतसुद्धा, कर्जतर सोडाच पण दुकानदारांची उधारीसुद्धा मिळेनाशी झाली.

**'गाठोड्या'ने घात केला**

१० डिसेंबर २००५ रोजी राज्य शासनाचे 'गाठोडे' जाहीर झाले. गाठोड्यात जाहीर झालेली मदत कोणत्याही जिल्ह्यात प्रत्यक्षात पोहोचली नाही. नोकरशाही आणि पुढाऱ्यांनी हजार एक कोटी रुपयांची रक्कम गिळंकृत केली असावी हे उघड आहे. 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी शेतकऱ्यांची परिस्थिती झाली. मदत तर मिळालीच नाही, उलट अतिबिकट परिस्थितीत मिळणारा उधारउसनवारीचा



आधारही तुटला. साहजिकच, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण झपाट्याने वाढले.

१० डिसेंबरनंतर घडलेल्या आत्महत्यांची संख्या २००च्या वर गेली तेव्हापासून मी राज्यसभेमध्ये या बाबीचा उल्लेख करण्याचा वारंवार प्रयत्न केला. तो एकदाच यशस्वी झाला आणि त्यानंतर एका विषयावर एका सत्रात एकदाच उल्लेख करता येतो असा नियम सांगून विशेष उल्लेख करण्याची संधी नाकारण्यात आली. आत्महत्यांचा आकडा फुगतच चालला.

**वरवर सहानुभूती नको, मुळात घाव हवा**

बऱ्याच काळापर्यंत शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते शेतकऱ्याच्या आत्महत्येची बातमी आली की धावून जात, कुटुंबीयांची विचारपूस करीत, आत्महत्येचे कारण समजून घेण्याचा प्रयत्न करीत. नंतर मात्र हळूहळू या कामाचा बोजा आणि त्यातील वैफल्य त्यांना जाणवू लागले. प्रत्येक ठिकाणी कहाणी तीच ह्न चांगले पीक आले तरी शेतकरी कर्जात बुडतो आणि वसुलीच्या वेळी होणाऱ्या अप्रतिष्ठेमुळे जीवन संपवण्याच्या निर्णयाप्रत येतो. मग जेव्हा दुष्काळ पडतो किंवा अतिवृष्टी होते तेव्हाचं काय विचारावे? हळूहळू प्रत्येक आत्महत्येच्या प्रकरणी जाऊन चौकशी करण्याच्या कामात ढिलेपणा येऊ लागला.

चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात (१९८६) महिलांवर, विशेषत: नव्याने लग्न होऊन आलेल्या सुनांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणांविषयी बारकाईने चर्चा झाली होती. सुनांच्या जळितांची किंवा आत्महत्यांची प्रकरणे अव्याहत घडतच राहतात. प्रत्येक प्रकरणी दोष सासूचा आणि नवऱ्याचाच असतो असे नाही. चौकशी मोठी क्लिष्ट आणि वेळ घेणारी असते. जर निष्कर्ष जळित सुनेच्या विरोधात गेले तर कार्यकर्त्यांचा धीर खचतो. एक प्रकरण निकालात लागण्याआधी दहा नवी प्रकरणे उभी राहतात. हे सर्व पाहता 'स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची वैयक्तिक प्रकरणे शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी हाताळू नयेत, अशा अत्याचारांचे मूळ कारण शोधण्याचा आणि ते दूर करण्याचा प्रयत्न करावा, त्याबरोबरच स्त्री समुदायावर म्हणून जिथे अत्याचार होत असतील ह्न उदाहरणार्थ दिल्लीतील १९८४ सालचे – शीख विरोधी दंगे ह्न तेथे सर्वशक्तीने उतरावे' असा निर्णय चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात घेण्यात आला होता.

याच कारणाने स्त्रियांच्या मालमत्ता हक्कासंबंधी लक्ष्मीमुक्ती आणि स्त्रियांचा जाच कमी करण्याकरिता दारू-दुकानबंदी असे कार्यक्रम शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने घेतले.

याच तर्कसंगतीने एखाद्या शेतकऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी करून

त्याच्या मागे राहिलेल्या कुटुंबाला लोकांकडून मदत मिळवून देणे किंवा सरकारकडून भरपाई करून देणे हे मोठे क्लिष्ट आणि वेळकाढू काम आहे. एक प्रकरण निकाली लागण्याआधी दहा आत्महत्यांचे प्रकार घडतात.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे एक कारण कर्जबाजारीपणा दूर करावा हे अधिक उचित म्हणून शेतकरी संघटनेने कर्जमुक्ती, चक्रवाढ व्याजमुक्ती अशा कार्यक्रमांवर भर दिला.

गेली २५ वर्षे विदर्भात शेतकऱ्यांची प्रातिनिधिक संघटना म्हणजे शेतकरी संघटना हे सर्वमान्य आहे. शेतकरी संघटनेला नावे ठेवणारे लोकही संघटनेचा बिल्ला लावल्याशिवाय बोलू धजत नाहीत. अशी शेतकरी संघटना कर्जमुक्ती, चक्रवाढव्याजमुक्ती आणि दक्षिण महाराष्ट्रातील उसाचे आंदोलन यांत गुंतली आहे हे पाहता काही पुढाऱ्यांचे आणि संघटनांचे फावले. त्यांनी मोठ्या कटाक्षाने आत्महत शेतकऱ्यांची आकडेवारी गोळा करायला सुरुवात केली, त्यातील काहीजणांच्या घरी भेटी घेऊन पत्रकबाजी सुरू केली. इंटरनेट जाळ्यावर 'संकेत स्थळ' तयार करून आत्महत्यांची आकडेवारी आणि तपशील नोंदविण्यास सुरुवात केली. एरवी शेतकऱ्यांच्या कापूस-विक्री-स्वातंत्र्याला विरोध करणारी ही मंडळी आता कापसाच्या भावासंबंधी तावातावाने बोलू लागली. प्रेत पडल्यानंतर गिधाडांनी जमा व्हावे त्यापेक्षा जास्त तत्परतेने हे पुढारी आणि स्वयंसेवी संघटनांचे कार्यकर्ते चपळता दाखवू लागले आहेत.

**कायद्याची मदत?**

महाराष्ट्र राज्य शासनाचा आत्महत्याप्रवणता कमी करण्याचा कार्यक्रम पार तोंडाशी पडल्यावर केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार पुढे सरसावले. केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्र या आत्महत्याप्रवण राज्यांचे मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्याबरोबर हैदराबाद येथे, मोठा गाजावाजा करून त्यांनी परिषद घेतली आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांचा सखोल अभ्यास करण्याचा क्रांतिकारी (?) निर्णय घेऊन मंडळी पांगली. डॉ. स्वामीनाथन यांच्याकडे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे रहस्य शोधण्याचे काम देण्यात आले. डॉक्टरसाहेब पहिल्या श्रेणींचे शास्त्रज्ञ; पण ग्यानबाच्या अर्थशास्त्राचा त्यांना गंधही नाही. तरीही, त्यांनी कापसाला रु. ३००० प्रती क्विंटल भाव द्यावा आणि शेतीसंबंधीची कर्जव्यवस्था आमूलाग्र बदलावी अशी शिफारस केली. यापलीकडे जाऊन त्यांनी दोन डझन शिफारशी केल्या. त्यातील सर्वांत महत्त्वाची शिफारस म्हणजे अशा प्रकरणांत मदत करण्यासाठी एक 'सज्जड कोष' तीन वर्षांत तयार



करावा अशी! त्या तीन वर्षांत अजून किती हजार शेतकरी आत्महत्या करून जातील याची डॉक्टर साहेबांना फिकीर दिसली नाही.

**दौरा अर्थतज्ज्ञ पंतप्रधानांचा**

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहिल्या. सरकारी आकडेवारीप्रमाणेच यंदा झालेल्या आत्महत्यांचा आकडा ६००च्या वर गेला आणि मग दस्तूरखुद्द राज्यमान्य राजश्री पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंगजी यांची विदर्भाची भेट जाहीर झाली. लगेच धावपळ सुरू झाली. दोन वर्षांपूर्वी प्रत्यक्ष सोनियादेवी विदर्भात येऊन गेल्या होत्या. खास नेहरू-गांधी शैलीने त्यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची विचारपूस केल्याचे चित्रण सर्व वाहिन्यांनी प्रसारित केले होते. त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती किती झाली त्याची शोधाशोध सुरू झाली आणि त्यातील एकही आश्वासन पुरे झाले नाही हे स्पष्ट झाले. सोनियादेवींची आश्वासने अशीच असतात. त्यांचा काही वैचारिक शुद्धतेबद्दल आणि नैतिक स्वच्छतेबद्दल फारसा बभ्रा नाही. अगदी कचाट्यात सापडल्या म्हणजे देवीजी मोठ्या शिताफीने त्यागाचे नाटक करून सटकतात, एवढीच त्यांची ख्याती.

पण डॉ. मनमोहनसिंग यांची गोष्ट वेगळी. पं. नेहरूंनी स्वातंत्र्यानंतर गांधी अर्थशास्त्राला उलथून टाकून समाजवादाच्या नावाखाली लायसेन्स-परमिट कोटा राज्य उभे केले. त्या समाजवादाच्या डोलाऱ्याला पहिला धक्का देणारा अर्थमंत्री म्हणून मनमोहनसिंगाची मान्यता. पंडित नेहरूंच्या तथाकथित तटस्थतावादी परराष्ट्र धोरणाच्या अगदी नेमके उलटे जाऊन अमेरिकेशी सन्मान्य शर्तींवर करार-मदार करण्याची कुशलता त्यांनी दाखवली. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (संपुआ) २४ महिन्यांच्या कारकीर्दीत भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडी झाली, पण दुरान्वयानेही एकही शिंतोडा मनमोहनसिंगांच्या अंगाला चिकटला नाही. अभ्यासू अर्थतज्ज्ञ आणि स्वच्छ चारित्र्याचा प्रधानमंत्री ही त्यांची प्रतिमा. त्यामुळे डॉ. मनमोहनसिंग विदर्भाला भेट द्यायला येतात हे जाहीर झाल्यावर, साहजिकच विदर्भवासीयांच्या आशा पालवल्या.

विदर्भाच्या हालअपेष्टांची पराकाष्ठा झाली ती जून महिन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात. पावसाने एक हुलकावणी दाखवून तोंड लपवले. सुदैवाने, फारच थोड्या शेतकऱ्यांनी पेरणी करण्याचे धाडस केले. कापूस पेरणीची वेळ टळत चाललेली आणि पावसाचे नाव म्हणून नाही. अशी ती भयानक वेळ होती. खरे म्हटले तर त्यावेळी डॉ. मनमोहनसिंग यांनी विदर्भाला भेट देऊन जनांना

आधार द्यायला पाहिजे होता. त्यांची येण्याची तारीख ठरली, जाहीर झाली ती ३० जून. ३० जूनपर्यंत पाऊस पुन्हा येणार यात काही शंकाच नव्हती. याचा अर्थ शेतकऱ्यांच्या क्रोधाच्या आणि आक्रोशाच्या सर्वात उग्र स्वरूपाला सामोरे जाण्याचे प्रधानमंत्र्यांनी शिताफीने टाळले. लोकांच्या मनात शंकेची पहिली पाल चुकचुकली. शेतकऱ्यांचे जीव देणे चालूच राहिले. स्वत: प्रधानमंत्री येत आहेत, काही सुधारणा होईल, थोडे दिवस कळ काढूया अशा विचारानेदेखील अनेक शेतकरी आत्महत्येच्या नि:श्वासापासून दूर झाले नाहीत. आत्महत्या चालूच राहिल्या.

त्यानंतर, कृषिमंत्र्यांच्या रुसवाफुगवीचे एक नाटक घडले. 'अगं अगं म्हशी, मला कोठे नेशी' असे म्हणत पंतप्रधानांच्या सोबत जाण्यास शरद पवार राजी झाले आणि आज सकाळी ही जोडी विदर्भात अवतीर्ण झालेली असेल.

काही आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांना पंतप्रधान भेट देतील, काही अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करतील आणि जाताना पाहुण्याने घरातील मुलांच्या हातावर खाऊ ठेवून जावे तसे पॅकेज जाहीर करतील. शेतकऱ्यांच्या एका वर्गाला कर्जमुक्तीसुद्धा पंतप्रधान जाहीर करतील अशी वदंता आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे अभ्यास अनेकांनी केले. सारे अभ्यास प्रामुख्याने शेतीसंबंधीची धोरणे आखण्याचे आणि राबवण्याचे काम करणाऱ्या नोकरदार तज्ज्ञ आणि पुढारी मंडळींनीच केले. प्रत्यक्षात गुन्हेगार किंवा संशयितावरच गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी टाकली तर ज्या तऱ्हेने आपल्यावरील आळ झटकला जाईल असेच अन्वेषण ते करतील, तसेच काहीसे झाले आहे. म्हणून, सर्व अहवाल निसर्ग आणि शेतकरी यांच्यावर सारी जबाबदारी टाकून मोकळे झाले आहेत.

**आत्महत्यांचे वास्तव**

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधी खरी परिस्थिती काय आहे ते पाहू या. मग त्यातून निष्कर्ष काय निघतात ते पाहू.

१) देशभरात आजपर्यंत घडलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत सर्वाधिक प्रमाण कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आहे. महाराष्ट्र राज्यात आत्महत्यांचे प्रमाण सर्वांत अधिक विदर्भ या कापूसउत्पादक प्रदेशात आहे.

२) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांपैकी बहुतेक सर्वजण जमीनमालक शेतकरी आहेत, भूमिहीन मजूर नाहीत. तेव्हा 'आम आदमी'च्या नावाखाली 'जमीनसुधारणांचा अभाव' अशी कारणमीमांसा बाष्कळ होईल.

३) बहुतेक आत्महत्याग्रस्त शेतकरी सहकारी बँकांच्या पठाणी वसुलीने त्रस्त झालेले होते. त्यामुळे खाजगी सावकारीविरोधाचे जुने गुळगुळीत झालेले समाजवादी



अवडंबर निरर्थक होते.

या उघड उघड सर्वमान्य वस्तुस्थितीवरून काही गोष्टी स्पष्ट होतात.

**मूलभूत कारणे**

सर्वच शेती तोट्यात आहे असे असताना आत्महत्यांत कापूस शेतकऱ्यांचे प्रमाण आधिक्याने का? उत्तर स्पष्ट आहे. भारत शासनाच्या व्यापार मंत्रालयाने जागतिक व्यापार संस्थेस दिलेल्या आकडेवारीनुसार बहुतेक सर्व शेतीमालांना सरकारने उलटी सबसिडी लावलेली आहे. म्हणजे बहुतेक सर्वच पिकांचा उत्पादन खर्चही भरून निघत नाही; पण अशा या तोट्याच्या शेतीमध्ये सर्वांत अधिक तोट्याची शेती कापसाची. बाकी सर्व पिकाच्या बाबतीत शेतकऱ्याचा उत्पादन खर्च रु. १८३ असेल तर त्याला मिळणारा भाव १०० रुपयावर नसतो हे शासनाने मान्य केलेले सत्य आहे. कापसाच्या बाबतीत तर ही परिस्थिती अधिकच विपरीत आहे. कापसाचा उत्पादनखर्च रुपये २१० असला तरी आम हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना रुपये १००च्या वर भाव मिळू नये अशी धोरणे केंद्र शासनाने राबवली आहेत. त्यात आणखी विपरीतपणाची चरमसीमा म्हणजे जगाच्या बाजारपेठेत भाव २१० रुपये असताना देशातील इतर राज्यांना रुपये १०० मिळत होता तर महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार खरेदी योजनेमुळे महाराष्ट्रातील कापूस शेतकऱ्यांना तेवढाही भाव मिळत नव्हता. एकाधिकार योजना सुरू झाल्यापासून विदर्भातील शेतकऱ्यांना फक्त तीन वर्षांचा अपवाद सोडल्यास प्रत्येक वर्षी लगतच्या मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश किंवा गुजरात या राज्यांतील बाजारपेठेत शेतकऱ्यांना मिळणारा भावही मिळाला नाही हे उघड आहे. कापूस एकाधिकार योजनेच्या काळात महाराष्ट्रातील कापूस शेतकऱ्यांचे नुकसान किती झाले याचा एक अंदाज रुपये ३० हजार कोटी इतका जातो. या योजनेने जखमी झालेल्या शेतकऱ्यांची जखम ४० वर्षे सडत (Gangreene) आहे. सध्याच्या आत्महत्यांची लाट प्रामुख्याने 'कापूस एकाधिकार खरेदी योजनेने शेतकऱ्यांवर घातलेले घाव चिघळल्याने आल्याचे निदान योग्य होईल.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. या आत्महत्यांचे कारण तत्कालीन नाही. एक दोन वर्षे पाऊस पडला नाही किंवा पीकबूड झाली म्हणून आत्महत्या करण्याइतका विदर्भातील शेतकरी घायकुता नाही.

**संपन्न विदर्भाचे अपहरण**

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे तात्कालिक नाहीत तशी ती फार जुनीही नाहीत. अगदी माझ्या आठवणीत विदर्भ हा संपन्न प्रदेश मानला जात

असे. विदर्भातले पाहुणे तेथील सुगंधी भाताच्या आणि लोणकढ्या तुपाच्या सुवासाची कथा पश्चिम महाराष्ट्रातील स्नेहीसंबंधींना मोठ्या रंगवून ऐकवत असत. विदर्भातील सासुरवाडी मिळणे पश्चिम महाराष्ट्रातील लोकांना भाग्योदय वाटे आणि विदर्भात मुलगी देणे हे पश्चिम महाराष्ट्रातील लोक मोठे प्रतिष्ठेचे मानीत. महाराष्ट्राशी इतिहासात कधीही संलग्न नसलेला विदर्भ प्रदेश; प्रभू रामचंद्राने संयत विद्वानांचा म्हणून सांगितलेला विदर्भ प्रदेश; मध्यप्रांताची राजधानी नागपूर असलेल्या विदर्भाचा प्रदेश. कापसाचे पांढरे सोने, नागपुरी संत्री आणि लोखंड, मँगनीज, कोळसा अशा खनिजांनी संपन्न प्रदेश आज इतका ढासळला की तेथील शेतकऱ्यांना जगणे असह्य व्हावे? इतिहासाला ही कलाटणी मिळाली केव्हापासून? याची तारीख स्पष्ट आहे.

महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य तयार झाले तर त्यात काँग्रेसला सत्ता मिळणार नाही आणि मुंबईचा खजिना आणि महाराष्ट्राची प्रज्ञा विरोधकांच्या हाती जाईल या भीतीने पंडित नेहरूंनी विदर्भ प्रदेश बळेच महाराष्ट्रात ढकलला. विदर्भातील सर्व काँग्रेस नेत्यांनी या अपहरणाला संमती दिली. नागपूर कराराचा एक कागदाचा तुकडा तयार करून महाराष्ट्राने 'विदर्भ हरण' केले.

कारखानदारीत आणि व्यापारात पुढारलेल्या महाराष्ट्राला कच्च्या मालाची संपदा निसर्गाने बहाल केलेला विदर्भ जोडला गेला आणि मग विदर्भावरील बलात्कार सुरू झाला. विदर्भातील पांढरे सोने लुटण्यासाठी कापूस एकाधिकार खरेदी योजना करण्यात आली. या योजनेचा मुख्य फायदा फक्त मुंबईचे गिरणीमालक आणि एकाधिकारातील ग्रेडर तसेच राज्यकर्त्या पक्षाच्या पुढाऱ्यांचा झाला. शेतकरी अक्षरश: पिळून निघाला.

विदर्भाची जलसंपदा फार मोठी आहे; पण महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकात सर्व पैसा कृष्णा खोऱ्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी वापरला गेला. कृष्णा खोऱ्याचा विकास झाला नाही तर तेथील पाण्याचा हक्क महाराष्ट्र कायमचा गमवून बसेल असा धाक दाखवून विदर्भातील सर्व पाणीपुरवठ्याच्या योजनांना बगल देण्यात आली.

विदर्भाच्या अनुशेषाचे आकडे हजारो कोटींचे झाले तरीही तो अनुशेष संपवण्यासाठी काहीही सज्जड प्रयत्न झाले नाहीत.

तात्पर्य, विदर्भातील शेतकऱ्यांची शोकांतिका कापूस एकाधिकारातून निर्माण झाली आणि महाराष्ट्राने लादलेल्या अनुशेषाने झाली. विदर्भाच्या अपहरणास जबाबदार असलेल्या केंद्रीय आणि वैदर्भीय काँग्रेस नेत्यांना या जबाबदारीपासून



हात झटकता येणार नाही.

विदर्भातील पाणीपुरवठ्याच्या योजना त्वरित गतीने पूर्ण करून तेथील शेतकऱ्यांना नैसर्गिक प्रकोपापासून संरक्षण देणे हे महत्त्वाचे काम आहे.

अंततोगत्वा, विदर्भ महाराष्ट्रापासून वेगळा झाल्याखेरीज विदर्भाच्या दैवदुर्विलासाच्या भयाण अंकावर पडदा पडणार नाही; पण हे करण्यास काही वर्षे जातील. शेतकऱ्यांच्या आत्महत्या तातडीने थांबवायच्या असतील तर काय प्रयत्न केले पाहिजे?

**अगदी तातडीच्या उपाययोजना**

१) मरणाच्या सीमेवर पोहोचलेल्या शेतकऱ्यांचा आक्रोश ऐकला जाण्याची योजना केली पाहिजे. प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात एक टेलिफोन नंबर जाहीर करून आत्यंतिक परिस्थितीत पोहोचलेल्या शेतकऱ्यांनी तेथे संपर्क साधावा असे जाहीर करावे. संपर्क साधणाऱ्या शेतकऱ्याची तीन तासांच्या आत सरकारी अधिकाऱ्यांनी गाठभेट घेऊन त्याच्या कर्जाची परिस्थिती समजावून घ्यावी, त्याला मार्गदर्शन, आर्थिक व इतर मदत करून त्याला वैफल्यमुक्त करावे.

२) शेतकऱ्यांची कर्जे बेकायदेशीर आणि अनैतिक आहेत हे शेतकरी संघटनेने वारंवार पटवून दिले आहे. पुढाऱ्यांना हे पटत नाही. आंध्र प्रदेश, पंजाब, तामिळनाडू येथे शेतीला फुकट वीज आणि कर्जमुक्ती मिळाली. संपुआला हे मान्य होत नाही. ताबडतोबीचा आणि तात्पुरता उपाय सहज करता येईल. सर छोटूराम यांच्या नेतृत्वाखाली युनियनिस्ट पार्टीला एकसंध पंजाबमध्ये कायदा करून कर्जवसुलीपोटी शेतकऱ्यांकडून जमीन काढून घेणे बेकायदेशीर ठरवले होते. त्याबरोबरच, शेतकऱ्यांकडील शेतीकामाची आणि दुभती जनावरे व मालमत्ता जप्त करण्यासाठी बंदी घातली होती. ७५ वर्षांपूर्वी हे पंजाबात घडू शकले.

त्यावेळच्या Land Alianation ॲक्टसारखा कायदा सहज अमलात आणता येईल. कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीची वसुली दखलपात्र गुन्हा ठरवण्यात आली पाहिजे. त्याबरोबरच सुप्रीम कोर्टाच्या व रिझर्व्ह बँकेच्या आदेशाविरुद्ध जाऊन चक्रवाढ व्याजाची आकारणी करणे हाही दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला पाहिजे.

३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या तातडीने थांबवण्याचा आणखी एक उपाय. बहुतेक शेतकरी बापाची जमीन मिळाली म्हणून आणि दुसऱ्या व्यवसायात जाता येत नाही म्हणून शेती करतात. हरित क्रांतीची शेती अनेकांना भावत नव्हती. त्यांच्यापैकी काहींना कुळकायदा, कमाल जमीनधारणा कायदा, जमीनदारीविरोधी

कायदा अशा कायद्यांनी जमिनीपासून सुटका मिळाली. जे शेतीच्या गर्तेतून सुटले त्यांचे भले झाले. आता, जागतिकीकरणाच्या आणि जैविक तंत्रज्ञानाच्या शेतीसमस्या शेतकऱ्यांना अगदी अनोख्या आहेत. हरित क्रांतीच्या आधी शेती न पेलणाऱ्यांना शेतीतून सुटण्याची शक्यता, अनवधानाने का होईना मिळाली. या दुसऱ्या शेतीक्रांतीच्या आधी शेतकऱ्यांना जमिनीच्या कचाट्यातून सुटण्याची संधी मिळाली पाहिजे. ज्याला शेतीव्यवसाय सोडायचा आहे त्यांना जमीन विकता येईल आणि ज्यांना शेतीव्यवसाय करण्यासाठी आर्थिक व्यवस्थापकीय आणि तांत्रिक कुवत आहे त्यांना जमीन विकत घेऊन शेतीव्यवसायात येता आले पाहिजे. यासाठी जमिनीच्या बाजारपेठेची उभारणी तातडीने केली गेली पाहिजे. कोणत्याही शेतकऱ्याला जमीन काढायची असेल तर रोख मुद्रांक शुल्काइतकी रक्कम व वर्षभराच्या आत बाजारभावाने किंमत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

४) विदर्भातील पाणीपुरवठ्याच्या योजनांना सर्वोच्च प्राधान्य देऊन अंमलबजावणी झाली पाहिजे.

५) महाराष्ट्र राज्य कापूस एकाधिकार खरेदी योजना संपुष्टात आली आहे आणि तिचे पुनरुज्जीवन केले जाणार नाही असे जाहीर करायला पाहिजे.

६) सध्या भविष्याची काहीच शाश्वती नसल्याने कापूस व्यापारी दूरदृष्टीने शेतीमध्ये काही गुंतवणूक करण्यास धजावत नाहीत. एकाधिकार व्यवस्था पुरी गाडली गेली आहे. असे स्पष्ट झाले तर व्यापारी अधिक कार्यक्षमतेने आणि अधिक चढत्या भावाने खरेदी करू शकतील.

आणखी एक उपाय लेख संपवण्यापूर्वी मांडतो; पण याचा अर्थ तो कमी महत्त्वाचा नाही. विदर्भावर कापूस एकाधिकार व पाणीपुरवठा योजनांतील अवशेष यामुळे झालेला बलात्कार दूर करण्यासाठी वेगळ्या विदर्भ बळीराज्याची घोषणा तातडीने झाली पाहिजे.

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग इतक्या खोलात जाऊन आत्मचिंतन करतील अशी माझी अपेक्षा नाही; परिणामकारक तातडीची आणि दीर्घ मुदतीची उपाययोजना अमलात आणतील हे काँग्रेस कुलात होणे नाही; पण तरीही या महत्त्वाच्या क्षणी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची मीमांसा लेखी नोंदलेली असावी म्हणून हे सगळे लिहिले.

*(शेतकरी संघटक, ६ जुलै २००६)*

■



त्रेचाळीस

# बळिराजा आता तुझा तेवढा आधार

विदर्भात शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येची साथ पसरली आहे. त्या साथीला आवर कोणीच घालू शकलेले नाही. मुख्यमंत्र्यांनी १० डिसेंबर २००५ रोजी विदर्भातील ६ जिल्ह्यांसाठी हजारेक कोटी रुपयांचे गाठोडे दिले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहिल्या, एवढेच नव्हे तर वाढल्या. माननीय कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी हैदराबाद येथे आत्महत्याप्रवण राज्यांचे मुख्यमंत्री व अधिकारी यांची एक बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी करावयाच्या उपाययोजनात्मक कार्यवाहीबद्दल चर्चा केली त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही. अलीकडे दस्तूरखुद्द पंतप्रधान विदर्भात येऊन गेले आणि त्यांनीही ३७५० कोटी रुपयांचे गाठोडे विदर्भातील आत्महत्याप्रवण जिल्ह्यांना देऊ केले तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या काही थांबल्या नाहीत.

या आत्महत्या का होतात? कर्जबाजारी झालेला शेतकरी वर्षानुवर्षे निसर्गाशी आणि शासनाशी झगडा देत हरल्यानंतर हताश होतो. वर्षानुवर्षे साठलेले कर्ज आणि त्यावरील व्याज यांच्या वसुलीकरता सावकारी पद्धतीने सहकारी बँकांचे अधिकारी आले म्हणजे सर्वदूर अप्रतिष्ठा होते, हे पाहण्यापेक्षा डोळे मिटलेले बरे या भावनेने शेतकरी शेवटी जवळच्या विषाच्या कुपीकडे वळतो. हे पुष्कळसे सत्य आहे.

पण, आत्महत्यांचे आणखीही सखोल विश्लेषण होण्याची गरज आहे. आत्महत्या अपमानापोटी, गरिबीपोटी होत असतील तर त्यांचे प्रमाण सर्वांत जास्त बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा यांसारख्या मागासलेल्या राज्यांत असायला हवे; पण तशी परिस्थिती नाही. याउलट, आत्महत्यांचे सर्वांत जास्त प्रमाण आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्र यांसारख्या शेतीक्षेत्रात प्रगत असलेल्या राज्यांतच दिसून येते.

या परिस्थितीचा फायदा काही मागास मनोवृत्तीचे लोक घेऊ पाहतात आणि ''ज्या शेतकऱ्यांनी सुधारित शेती केली त्यांच्यामध्येच आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. याउलट, जेथे मागास, पारंपरिक शेती चालू आहे तेथील शेतकरी संपन्न झाले नसले तरी आत्महत्येकडे ढकलले गेले नाहीत'' असा युक्तिवाद करू पाहतात. नवीन तंत्रज्ञानामुळेच आत्महत्या आल्या आणि नवीन तंत्रज्ञानाला लागणाऱ्या खते व औषधे यांतील भेसळीमुळे त्यात भर पडली असाही या मागास मनोवृत्तीच्या लोकांचा युक्तिवाद आहे.

आत्महत्यांच्या प्रमाणात भलीमोठी वाढ होण्याचे सांगितले जाणारे एक कारण मोठे विचित्र आहे. कर्जापोटी आत्महत्या केल्याचे सिद्ध झाले तर सरकार आत्महत्या करणाऱ्याच्या परिवारास लाखभर रुपये देते आणि त्यामुळे आपण मेलो तरी मिळालेल्या लाखभर रुपयांच्या नुकसानभरपाईमध्ये निदान कुटुंबतरी कर्जमुक्त होईल या भावनेने काही शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होतात असे म्हटले जाते. काही किरकोळ प्रकरणी तर परिवारातील नातेवाईकांनी अगदी म्हातारे होऊन कोपऱ्यात बसलेल्या परिवारातील एखाद्या माणसास बळेच विष पाजून ती आत्महत्या झाल्याचा गवगवा केला असेही सांगण्यात येते. खरेखोटे परमेश्वर जाणे.

आत्महत्या करण्यास लोक प्रवृत्त का होतात? खरे म्हटले तर प्रत्येक माणसाची जगण्याची इच्छा तीव्र असते; जगण्यासाठीच सारी धडपड चालू असते. मग अचानक अशी काय परिस्थिती तयार होते की ज्यामुळे माणसाला जगण्याची धडपड सोडून देऊन आपली ही जीवनयात्रा संपवून टाकावी असे वाटू लागते?

अमेरिकेसारख्या श्रीमंत देशांत आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. त्याबरोबरच, तेथील कुटुंबव्यवस्था मोडकळीस आल्यामुळे घटस्फोटांचेही प्रमाण अधिक आहे. आई-बाप मुलगा कर्तासवरता झाला म्हणजे आपण त्याचे काही देणे लागतो असे मानित नाहीत; लग्न झाल्यानंतर मुलेही आईबापांस वृद्धाश्रमात ठेवून आपण आपले कर्तव्य केले असे समजतात. श्रीमंतीच्या या उन्मादात अनेकजण मादक द्रव्यांच्या सेवनाचेही व्यसनी बळी बनतात. त्याबरोबरच संपन्न देशांत आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे.

हे असे का व्हावे? जर का माणसाची सगळी धडपड अधिकाधिक चांगले जगण्यासाठी आहे तर अधिक चांगले जगण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर माणसाला मरण्याची इच्छा अधिक प्रमाणात का व्हावी? मागास मनोवृत्तीची



माणसे याला उपभोगवादी समाजाची अनैतिकता हेच कारण असल्याचे सांगतात.

भारतातही, अलीकडे कृषिमंत्र्यांनी संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, ६० टक्के शेतकऱ्यांत १६ टक्के आत्महत्या होतात तर ४० टक्के बिगरशेतकऱ्यांत ८४ टक्के आत्महत्या होतात. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बिगरशेतकरी समाजात आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण सर्वांत जास्त नोकरदारांत आहे. बेरोजगारही आत्महत्या करतात आणि ज्यांना चांगली नोकरी मिळाली आहे अशी माणसेही आत्महत्या करतात.

संपन्न समाजात आत्महत्या अधिक व्हाव्यात आणि कौटुंबिक व सामाजिक प्रश्न अधिक बिकट व्हावे यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. संपन्न समाजातील प्रत्येक व्यक्तीस अधिकाधिक संधी प्राप्त होतात आणि स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावत असताना प्रत्येक वेळी निवड आणि निर्णय करण्याच्या जबाबदारीने त्याच्यावर मानसिक ताण पडतो. जुन्या काळच्या साध्यासुध्या जीवनात निवड आणि निर्णय करण्याची शक्यता माणसांना फार थोडी मिळत असे. या निर्णय करण्याच्या प्रक्रियेत मानसिक ताण आहे. आपण केलेला निर्णय बरोबर आहे किंवा नाही याबद्दलची थोडी चिंता आहे. नंतर चुकीच्या शाबीत झालेल्या निर्णयांबद्दल खंत आहे. यामुळे, मानसिक तणाव अधिक वाढत जातात आणि त्यातूनच अमेरिकासदृश परिस्थिती तयार होऊ शकते.

बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा यांसारख्या राज्यांत आत्महत्या होत नाहीत याचा अर्थ तेथील शेतकरी फार काही सुखी आहे असा नाही. खाण्याची भ्रांत असलेला बिहारमधील शेतकरी आत्महत्या करीत नाही याचा अर्थ तो मनाने मोठा खंबीर आहे असेही नाही. अगदी पराकोटीच्या अडचणीत सापडलेला बिहारमधील शेतकरी गुन्हेगारीकडे वळेल, मारायला तयार होईल, चोरी करायला तयार होईल, दरोडे घालायला तयार होईल; पण आत्महत्या करण्याकडे त्याची प्रवृत्ती होणार नाही. विदर्भातील संस्कृती प्राचीन काळापासून संयत संस्कृती म्हणून प्रसिद्ध आहे. विदर्भातील माणसे सौम्य आणि सज्जन असल्याबद्दल त्यांची प्रख्याती आहे. ही माणसे हिंसाचाराकडे वळून स्वत:ची तुंबडी भरण्याचा विचारही करणे शक्य नाही. त्यांच्यापुढे पर्याय राहतो तो केवळ स्वत:ची जीवनयात्रा संपविण्याचाच.

आत्महत्यांची एक साथही असते. मंडल आयोगाच्या वेळी दिल्लीतील पाच-दहा विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. एकाने आत्महत्या केल्याबरोबर दुसऱ्याने केली, तिसऱ्याने केली ह्न अशी दहा विद्यार्थ्यांनी एका पाठोपाठ आत्महत्या

करण्याचा प्रयत्न केला. सासुसासऱ्याचा जाच होणाऱ्या सुनांच्या बाबतीतही असाच प्रकार आढळतो. एकदा एखाद्या वस्तीमध्ये, कॉलनीमध्ये एका सुनेने छळाला कंटाळून आत्महत्या केली की त्याच भागामध्ये असे प्रकार घडत राहतात. ही एक प्रकारची लागणच होते.

असे का व्हावे? अडचणीत सापडलेला मनुष्य त्या अडचणीतून बाहेर कसे पडता येईल याचा विचार करतो. विचार करताना अधिक कष्ट करावे, मिळकत वाढवावी, अडचणी सोडवाव्या या दृष्टीने सारा विचार होतो. त्याच्या मनात मरणाला कवटाळावे अशी बुद्धी नैसर्गिकरीत्या होत नाही. असा विचार त्याच्या विषयपत्रिकेतही नसतो; परंतु आसपासच्या प्रदेशात समांतर परिस्थितीत सापडलेल्या कोणीतरी आपली जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय केला असे उदाहरण घडले की मग त्यानंतर तशा परिस्थितीत सापडलेल्या सर्वांच्या मनात, निराशेच्या टोकाला गेल्यानंतर, आत्महत्या हा एक व्यावहारिक विकल्प म्हणून विषयपत्रिकेवर येतो. साहजिकच, आत्महत्या एकट्यादुकट्या होत नाहीत; आत्महत्यांची एक साथ असते.

विदर्भातील शेतकऱ्यांमध्येही अशीच आत्महत्येची साथ पसरली आहे. गरिबीमध्ये आत्महत्यांचे प्रमाण कमी आणि संपन्न समाजात जास्त याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. गरीब कुटुंबात प्रत्येक जण गरजू असतो. तेथे आपल्याला कोणाची गरज नाही म्हणून उर्मटपणे वागण्याची प्रवृत्ती होत नाही. म्हाताऱ्या आई-बापांना का होईना, सांभाळून असावे अशी विचारसरणी तयार होते आणि त्यामुळे आपण, बायको, मुलेबाळे, आईबाप एवढेच नव्हे तर, काका-मामांनासुद्धा सांभाळून एकत्र राहण्याची प्रवृत्ती तयार होते. याउलट, संपन्न समाजात आपल्याला कोणाची गरज नाही, आपण कमावतो त्यात वाटेकरी जितके कमी होतील तितके जास्त चांगले अशा भावनेने संबंध तोडून आपले चौकोनी कुटुंब चालण्याची प्रवृत्ती जास्त दिसते.

ही प्रवृत्ती प्रामुख्याने आत्महत्यांचे प्रमाण वाढविण्यास जबाबदार आहे. मानसशास्त्रज्ञांनी या विषयावर अनेक अभ्यास केले आहेत आणि त्यांनी निष्कर्ष काढला आहे की आत्महत्या करण्याची ऊर्मी ही क्षणिक असते. माणसाला एक क्षणभर आलेल्या विफलतेच्या भरात तो काय वाटेल ते करून जातो. तो क्षण जर का कोणत्याही कारणाने आणि कोणत्याही पद्धतीने टाळता आला तर आत्महत्या टळू शकते.

एकत्रित कुटुंबात आत्मकेंद्री विचार करणे कठीणच होऊन जाते. त्याशिवाय,



वैफल्यात सापडलेल्या माणसाला मदत करणारे, धीर देणारे, सांत्वना करणारे कुटुंबातील अनेक सदस्य आजूबाजूला असतात.

याउलट, चौकोनी कुटुंबात कोणाच्या मनाची घालमेल होऊ लागली, वैफल्यग्रस्तता येऊ लागली की सावरण्यासाठी, धीर देण्यासाठी, याकरिता स्थापन झालेल्या काही स्वयंसेवी संघटना सोडल्यास, कोणीच मिळत नाही. आत्महत्यांचे सर्वांत महत्त्वाचे जवळचे कारण कुटुंबाचा आधार मोडकळीस आलेला असणे हे आहे.

याचा अर्थ, कर्जबाजारीपणापोटी शेतकरी आत्महत्या करीत नाहीत असे नाही; पण कर्जबाजारीपणामुळे लक्ष्मी घरातून गेल्यामुळे साहजिकच घरामध्ये गृहकलह होऊ लागतात, घरामध्ये फाटाफूट होऊ लागते. शेतकरी समाजात तर जमिनीच्या वाटणीवरून भावाभावांची डोकेफोडीपर्यंत भांडणे होतात.

कुटुंबसंस्था मोडकळीस येणे हे ना श्रीमंतीचे लक्षण आहे, ना गरिबीचे लक्षण आहे. गडगंज श्रीमंती असलेल्या घरात प्रचंड एकोपा आढळतो आणि अत्यंत गरिबी असलेल्या कुटुंबातही हा एकोपा आढळतो. गडगंज श्रीमंती असलेल्या घरात लोकांना सगळे सांभाळून नेण्याकरिता एकत्र राहण्याची प्रवृत्ती असते, काही काळतरी ती टिकते आणि गरीब घरात एकमेकांच्या गरजांपोटी एकोपा टिकवून ठेवण्याची इच्छा राहते.

आत्महत्यांचे प्रमाण सर्वांत जास्त आढळते ते ना धड संपन्न, ना धड गरीब अशा मध्यम परिस्थितीतील शेतकऱ्यांमध्ये. त्यातही ज्या शेतकऱ्यांनी संपन्नता पाहिली आहे, संपन्नतेचा अनुभव घेतला आहे त्यांना कठीण दिवस आल्यानंतर परिस्थितीला तोंड देणे जास्त अवघड होते.

शेतीमालाला भाव मिळाला नाही, आपण कर्जबाजारी झालो, समाजात आपली प्रतिष्ठा राहिली नाही, सन्मान राहिला नाही हे दुःख ऊर जाळत असताना, 'पण, कुटुंब माझे आहे' ही भावना नष्ट होणे हे खरे दुर्दैव आहे. ''मी कर्जबाजारी झालो ही काही माझी चूक नाही. जे संकट आले आहे ते बाहेरचे आहे. चोरांनी हल्ला केला म्हणून मी आत्महत्या करणे योग्य होणार नाही. सर्व कुटुंबाने मिळून या संकटाला तोंड दिले पाहिजे.'' अशी मनोवृत्ती जर बाळगली गेली, आपल्या कुटुंबाविषयी आपलेपण आणि अनुकंपा बाळगली गेली तर आत्महत्यांचे प्रमाण शेतीचे शोषण असतानाही कमी होऊ शकते.

ज्या कुटुंबांना दारिद्र्यामुळे, कर्जबाजारीपणामुळे आपल्या घरातही आत्महत्येसारखा प्रकार होण्याची भीती वाटते आहे त्यांच्याकरिता सरकार

कधीकाळी काय करेल तो मुद्दा बाजूला ठेवू; पण ज्या सरकारने आजपर्यंत आपल्याला लुटले त्याच सरकारच्या मेहेरबानीची वाट पाहत जगण्यापेक्षा आपण आपले कुटुंब, आपला शेतकरी समाज हा संघटित करण्याची आवश्यकता आहे असे जर मानले तर शेतकऱ्यांची मने खंबीर होतील आणि आत्महत्येसारखा क्षणिक दुर्बलतेचा प्रसंग ते टाळू शकतील.

पूर्वीच्या काळी संध्याकाळच्या वेळी घरामधील सगळी माणसे एकत्र जमून काही प्रार्थना म्हणत. आजही अनेक गांधीपरिवारातील कुटुंबांत ही परंपरा चालू आहे. शेतकऱ्यांनी कोणत्या एका धर्मातील किंवा कोणत्या एक देवाची प्रार्थना करावी असे मी कधीही म्हणणार नाही. शेतकरी काही फक्त हिंदू नाहीत, ते कोणत्याही एका धर्माचे नाहीत; पण सगळ्या शेतकऱ्यांनी मिळून जर अशी प्रतिज्ञा केली की, ''आम्ही बुडालो ते आमच्या चुकीमुळे नव्हे आणि या आक्रमणाला आम्ही सर्व मिळून एकत्र तोंड देऊ, खचून जाणार नाही'' तर, मला असे वाटते की, शेतकऱ्यांना याही प्रसंगातून तगून जाण्याकरिता जे सामर्थ्य हवे ते मिळू शकेल.

*(शेतकरी संघटक, २१ जुलै २००६)*

■



# ▪ परिशिष्ट ▪

# शेतकऱ्यांची संघटना
## अडचणी आणि मार्ग

असाध्य ते साध्य :

'शेतकऱ्यांची संघटना झाल्याशिवाय काही काही व्हायचे नाही.'

'शेतकऱ्यांची एकजूट व्हायला पाहिजे.'

'कलियुगात संघटित झाल्याखेरीज शक्ती नाही.'

शेतकऱ्यांच्या प्रश्नाची चर्चा चालू असली की सगळ्यांचे एकत असते, शेतकऱ्यांची मजबूत आघाडी झाली पाहिजे तरच त्याच्या दु:खांना वाचा फुटू शकेल, एरवी त्याला सगळे रगडणार, पिळणार.

पण त्याच्याबरोबरच निराशेचे सूरही लगेच निघतात.

'पण आपली कुठंची एकी व्हायला हो!'

'शेतकऱ्यांची संघटना म्हणजे वाळूचा पूल, कधीच बनायचा नाही.'

'आहे पण ही आवळ्याची मोट बांधायची कुणी? पुष्कळांनी प्रयत्न केले पण नाही जमलं, शेतकरी अडाणी!'

म्हणजे शेतकरी संघटना आवश्यक आहे याबद्दल जितके एकमत तितकेच अशी संघटना होणे कठीणच नव्हे तर जवळ जवळ अशक्य आहे यावरही सगळ्यांचे एकमत दिसते.

इतिहासामध्ये जे आवश्यक असते ते अशक्य कधीच नसते.

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करण्याआधी महाराष्ट्रात जी भयानक स्थिती होती ती पाहता कुणाला आशा वाटली असती की हा मृतप्राय समाज पुन्हा खडबडून जागा होईल? पण अशक्य ते घडले आणि जुलमी राज्यकर्त्यांच्या बलाढ्य सत्तेचा मुकाबला केला मूठभर मावळ्यांनी.

तुकाराम महाराज म्हणतात–



साधूनी बचनाग खाती तोळा। आणिकांते डोळा न पहावे।।
साधूनी भुजंग धरितील हाती। आणिके कांपितो देखोनिया।।
असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।

विष पचवण्याची सिद्धी आणि साप पकडण्याची युक्ती यासुद्धा प्रयत्नाने, अभ्यासाने साध्य करता येतात. मग शेतकऱ्यांची संघटनाच का अशक्य असावी ? विष पचवता येते पण शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण करता येणार नाही? साप पकडता येईल; पण स्वतंत्र होण्यासाठी, उपासमार थांबवण्यासाठी, पोराबाळांना सुख दिसावे म्हणून शेतकरी त्वेषाने उठायचा नाही?

वन्हि तो चेतवावा रे चेतविताच चेतितो।
केल्याने होत आहे रे आधि केलेची पाहिजे।।

शेतकरी तितूका एक करणे, त्यांचा एकमेकांशी संबंध बांधणे, त्यांना संघटित करून, त्याला माणूस म्हणून जगता यावे यासाठी लढा तयार करणे ही कामे कठीण खरी पण अशक्य खास नव्हेत. त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, अभ्यास लागेल, कठोर परिश्रम लागतील, सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी लागेल. कोणाच्याही लाभाची, पदाची अपेक्षा न ठेवता स्वत:ला प्रसंगी गाडून घेऊन संघटनेचे काम करणाऱ्या लाखो कार्यकर्त्यांची गरज पडेल. जागोजाग वेळोवेळी अपमान होतील. निराशेची सावटे येतील, वादळे येतील तरीदेखील आता शेतकरी एक झाल्याखेरीज राहणार नाही कारण ही काळाची गरज आहे.

शेतकरी संघटनेचे रोप लावले आहे. त्याची फळे 'याची देही याची डोळा' पाहावयास मिळतील अशी आमची अपेक्षाही नाही; पण आमच्या पोराबाळांना नातवंडा-पतवंडांना तरी त्याची मधुर फळे चाखायला मिळावीत म्हणून हा प्रयत्न आहे.

शेतकऱ्यांना संघटित करण्याचे प्रयत्न आजपर्यंत झाले नाहीत असे नाही. अनेक प्रयत्न झाले. इंग्रजांच्या अमलाखाली देशांत अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची बंडे उभी राहिली. सरदार वल्लभभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली बार्डोली येथे शेतकऱ्यांनी यशस्वी लढा दिला. महात्मा गांधींनी चंपारण्याचा सत्याग्रह करून शेतकरी एकजूट करून दाखविली. स्वातंत्र्यानंतरच्या काळातसुद्धा शेतकरी अनेकवेळा बंड करून उठला आहे. कांही ठराविक हेतूने, काही काळ, मर्यादित प्रदेशांतले शेतकरी तरी एकजूट करून उठू शकतात हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. सर्व भारतात जागोजाग शेतकऱ्यातील असंतोषाची आग धुमसत

आहे. मधून मधून एखाद्या ठिकाणी एखादी ज्वाळा उफाळत आहे. ही धुमसती आग चेतवावी कशी याचा सर्व बाजूने विचार व्हावयास पाहिजे.

या प्रयत्नांचे नैमित्तिक स्वरूप काढून टाकून कायम स्वरूपाची देशव्यापी शेतकरी संघटना कशी उभारता येईल? या मार्गात अडचणी काय आणि किती? या अडचणींवर मात कशी करता येईल ?

संघटना कार्यातील अडचणी

शेतकऱ्यांची संघटना बांधण्याच्या कामातील अडचणी व अडथळे खरोखर इतके मोठे व कठीण आहेत की, मी मी म्हणणाऱ्यांनीसुद्धा निराश व्हावे. संघटना बांधण्यासाठी तीन गोष्टीची मुख्यत: आवश्यकता असते. प्रथमत: ज्यांची संघटना बांधायची त्यांच्यात काहीतरी साम्य हवे. एकसूत्रता हवी. दगडांची आणि विटांची एक संघटना होऊ शकत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या घटकांना एकमेकांशी संपर्क साधण्याची, विचारविनिमय करण्याची संधी आणि साधने असली पाहिजेत. एकमेकांच्या विचाराची देवघेव होऊ शकत नसेल तर संघटना कशी व्हावी? एकी बनविण्याच्या कामात तिसरी अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे सर्वांचे एकतरी समान ध्येय असले पाहिजे, समान चेतना असली पाहिजे. निश्चित उद्दिष्टांखेरीज संघटना बांधता येत नाही आणि टिकवता तर अजिबात येत नाही.

शेतकऱ्यांची संघटना आजपर्यंत यशस्वीरीत्या बांधता आली नाही याचे कारण या तीन आवश्यक गोष्टींपैकी एकीचीही पूर्तता होऊ शकलेली नाही. शेतकरीवर्गात एकजिनसीपणा जवळजवळ नाही. वस्ती देशभर विखुरलेली आणि दळणवळणाची साधने नाहीत. त्यामुळे परस्पर विचार विनिमय नाही. वेगवेगळ्या पंथांनी पक्षांनी आणि पुढाऱ्यांनी खोटी उद्दिष्टे घालून दिल्यामुळे शेतकऱ्याला खरे खोटे काय याचा भ्रम पडलेला. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या गोष्टीचा सर्वांगीण विचार केला पाहिजे तरच त्यांच्या प्रयत्नास यश येण्याची शक्यता निर्माण होईल.

शेतकरी-फुटीर समाज

केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगातील सर्व देशांत, शेतकरी हा फटकळ व्यक्तिवादी समजला जातो. त्याचे शेजाऱ्याशी जमत नाही मग बाकीच्यांचा विचारच नको. त्याचा जो काही जमीन तुकडा असेल त्यावर त्याचे अपार प्रेम. त्या तुकड्याला जोपर्यंत धक्का लागत नाही तोपर्यंत बाहेर जगबुडी झाली तरी त्याची त्याला फारशी फिकीर नाही. या जमिनीच्या तुकड्याच्या



प्रेमापायी किती भांडणे, डोकेफोडी, कब्जेदलाली झाल्या असतील आणि किती कुटुंबे धुळीला मिळाली असतील आणि देशोधडीला लागली असतील याची गणती नाही.

शेताच्या वादावादीपलीकडे गावातली भांडणे, मानापमानाच्या कल्पना, घराघरातले हेवेदावे आणि इतर शेकडो लहान मोठ्या कारणांनी सुरू झालेली भांडणं पिढ्यान्‌पिढ्या चालल्याची उदाहरणे जवळ जवळ प्रत्येक गावी सापडतील.

त्यातले त्यात आपला देश जातीव्यवस्थेने ग्रासलेला. ब्राह्मण शेतकऱ्यास इतर शेतकऱ्यांशी आपले काही आतड्याचे संबंध आहेत याची जाणीव नाही. मराठा शेतकरी हरिजन वस्तींतील शेतकऱ्याला आपल्यातला समजतच नाही. हरिजन शेतकऱ्याला इतर शेतकऱ्यांच्या सहकार्याने काही करण्याची भीतीच वाटते म्हणा किंवा इच्छा नाही असे म्हणा.

निवडणुकांमुळे गावातली राहिली-सुहिली एकीसुद्धा तडकून जाते. वेगवेगळे पक्ष आणि उमेदवार आपले नगारे वाजवीत फिरू लागले की गावकऱ्यांची डोकी फिरू लागलीच. कित्येक निवडणुका आपल्या आणि गेल्या. काही उमेदवार हरले, थोडे जिंकले. निवडून आलेल्या उमेदवारांनी लगेच सफेद कपडे घालायला सुरुवात केली; पण शेतकऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांकडे कधी लक्षसुद्धा दिले नाही. निवडणुकांच्या राजकारणाचा आणि शेतकरी जीवनाचा अर्थाअर्थी काहीसुद्धा संबंध कधी दिसलेला नाही. तरीसुद्धा या निवडणुकांमुळे गावात कायमचे तट पडतात. गावातल्या एका फळीने एक बाजू घेती, की दुसऱ्या फळीने दुसरा पक्ष घेतलाच. यामध्ये पक्षाच्या जाहिरनाम्याचा कार्यक्रमाचा वा उमेदवाराच्या लायकीचा काहीही संबंध नाही. परंपरागत चालत असलेल्या गावातल्या वेगवेगळ्या गटांची ही फक्त विरोधभक्ती.

मुळात देशभरात शेतीशेतीतच केवढा फरक. पंजाब हरयाणातील तीनचारशे एकरांची ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्री वापरून केलेली आधुनिक शेतीही यात मोडते. आणि कोकणात डोंगरावर कसेबसे बांध घालून त्यावर पालापाचोळा जाळून केलेली शेतीही यातच मोडते. व्यवस्थित फायदा काढणारे सधन, ऊस आणि द्राक्षे बागायतदारही त्यात जमा होतात. तर कसेबसे भात किंवा नागलीचे एक एक पीक काढणारे आणि जन्मभर लंगोटी लावून फिरणारे शेतकरी यात येतात. स्वत:च्या शेतावर क्वचितच जाणारे शेतकरी यात मोडतात आणि स्वत:च्या शेतांवर खपून जमेल तेव्हा दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करणारेही.

या खेरीज गावातले हेवेदावे आणि भांडणे वेगळीच. कित्येक शेजारची

शेजारची गावे अशी आहेत, की त्यांच्यात वर्षा दोन-वर्षात दगडकाठ्यांची देवघेव होतेच.

'ज्या समाजाची प्रगती खुंटली आहे, त्याची स्थिती साचलेल्या डबक्याप्रमाणे होते आणि त्यात क्षुद्र कीडे वळवळू लागतात. ही दलदल साफ करण्याचा उपाय म्हणजे पाण्याला वाहण्याची वाट करून देणे.

साडेसहा लाख बेटे

शेतकऱ्यांची वस्ती साडेसहा लाख खेड्यांतून विखुरलेली. मोठमोठ्या शहरांच्या प्रदेशातील किंवा राजरस्त्यांच्या आसपासची थोडी भाग्यवान खेडी सोडली तर बाकीची कच्च्या रस्त्यांनी किंवा गाडीवाटेने जोडलेली. क्वचित पायवाटेनेही, यातील बहुतेक रस्ते पावसाळ्यात बंद. तार खाते आणि टेलिफोन खाते जवळजवळ संपूर्णपणे 'इंडियन' म्हणजे शहरांच्या सेवेस वाहिलेली, टपालखात्याने दररोजची डाकसेवा चालू करून काही वर्षे झाली म्हणतात. मुंबईत आणि दिल्लीत बसून टपाल अधिकारी अशा घोषणा अधूनमधून करत असतात. प्रत्यक्षात ग्रामीण भागातील बटवडा हा प्रमुखत: बाजाराच्या दिवशी बाजाराच्या जागीच होतो. टपालवाला फारच जिगरी असेल तर आठदहा दिवसांनी एकेका खेड्याला जाऊन येतो. परिणाम असा की, पंचक्रोशीतल्या शेतकऱ्यांच्या गाठीभेटीसुद्धा बाजारच्या दिवशीच झाल्या तर व्हायच्या एरवी महत्त्वाच्या कामासंबंधाने निरोप पाठवायचा म्हटले तरी लांब तंगडेतोड करीत गेल्याखेरीज गत्यंतर नाही. प्रत्येक खेड्याचा बाहेरच्या जगाशी संबंध इतका थोडा आणि कठीण की जणू काही प्रत्येक खेडे हे अथांग पाण्याने चारी बाजूने वेढलेले बेट आहे. भारतातील आपली साडेसहा लाख खेडी म्हणजे साडेसहा लाख बेटे आहेत. त्यांचा एकमेकांत संपर्क जवळजवळ नाही.

शेतकरी संघटना कार्यकर्त्यांना या लाखो बेटांतील शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांची अशी एकजूट बनवायची आहे की कोट्यवधी निद्रिस्त शेतकरी सिंह खडबडून जागे होतील आणि अशी गर्जना करतील की, त्यांच्या निद्रावस्थेचा फायदा घेणारे कोल्हे, लांडगे आणि खोकड यांची प्रभावळ गर्भगळीत होऊन जाईल.

त्यामानाने शहरी इंडियातील संघटनेचे काम किती सुलभ आहे पाहा. तारा, टेलिफोन, टपाल व्यवस्था, वर्तमानपत्रे वगैरे साधने वापरून कार्यकर्त्यांना एकमेकांशी संपर्क साधणे सहज शक्य होते. डोंबाऱ्याने ढोलके बडवले तरी पाचशे माणसे जमतात. अशा ठिकाणी सभांतून प्रचार करणे सोपे होते.



कारखान्यातील कामगारांच्या संघटनांचे काम तर अगदी सुरळीत चालणाऱ्या यंत्राप्रमाणे चालू शकते. सगळे कामगार कारखान्याच्या जागी नियमितपणे येतात. भेटतात. त्यांच्यात जवळीक, आपुलकी तयार होते. कुठे काही अन्याय होत असला तर त्याची बातमी विजेच्या वेगाने पसरवून प्रतिकारात्मक हालचाली लगेच चालू करता येतात. लढा पुकारायचा झाला किंवा संप चालू करावयाचा असला तरी एकमेकांशी विचारविनिमय अगदी थोड्या वेळात करून आवश्यक तो निर्णय घेता येतो.

शेतकऱ्यांची संघटना उभारण्यात सर्वात मोठी अडचण कोणती असेल तर दूरदूरच्या पसरलेल्या खेड्यांशी संपर्क साधणे ही होय.

ध्येयाची एकवाक्यता

संघटना उभारण्यात आणखी एक मोठी अडचण म्हणजे सर्वसंमत ध्येय निश्चित करणे. शेतकऱ्यांचे प्रश्न इतके विविध आणि इतके मोठे आहेत की त्यातील नेमके कोणते हाती घ्यावे हे ठरवणे फार कठीण आहे. काही जणांना धरणे, कालवे बांधून पाणी आपापल्या ागात आणणे ही सर्वांत महत्त्वची गोष्ट वाटते. अशा मागण्यांसी शेतकरी लवकर एकत्र येऊ शकतात पण लवकरच कालव्यांच्या पाण्याचा फायदा मिळणारे शेतकरी आणि धरण योजनांमुळे ज्यांची शेतीवाडी पाण्याखाली जाते ते शेतकरी यांच्यात वाद चालू होतात. कालव्यांच्या वरच्या भागात ज्यांची शेती आहे ते शेतकरी अशा योजनांबद्दल दुर्मुखलेले राहतात. पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी अशा योजनांच्या मागण्यांबाबत होणारी संघटना ही भौगोलिकदृष्ट्या मर्यादित क्षेत्रातच होऊ शकते. आपल्या भागातील उदाहरण द्यायचे झाले तर आसखेड धरणाच्या मागणीचे देता येईल. या धरणाच्या मागणीसाठी आसखेड किंवा वाकी गावाच्या पूर्वेस असलेल्या भामनहर खोऱ्यातील गावांची संघटना तयार झाली आहे; पण तिचे स्वरूप तेवढ्या भागापुरतेच मर्यादित राहणार. वाहागाव गडद, तोरणे, अम्बु, वांद्रे गावच्या शेतकऱ्यांना त्या मागणीत फारसे स्वारस्य असण्याचे कारण नाही.

तेच चाकण ते वांद्रे हा साठ किलोमीटरचा रस्ता बांधून काढण्याची मागणी घ्या. या मागणीबाबत सर्व भामनहर खोऱ्यातील सर्व शेतकऱ्यांचे एकमत आहे. त्यासाठी लढा देण्यात ते तयार झाले आहेत. भामनहर शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमात या दोन्ही मागण्यांना फार महत्त्व आहे. पण खेड तालुक्याला सर्व शेतकऱ्यांना त्याचे फारसे आकर्षण वाटणार नाही. पुणे जिल्ह्यातील इतर

तालुक्यांतील शेतकरी ज्याबद्दल उदासीनच राहतील. महाराष्ट्र राज्यातील किंवा भारतातील सर्व शेतकऱ्यांना तर या मागण्या क्षुल्लकच वाटतील.

शेतकरी संघटना बांधण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना ज्यात स्वारस्य वाटेल अशा सर्वमान्य मागण्या मांडण्यात आल्या पाहिजेत.

यासाठी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा सखोल विश्लेषणात्मक अभ्यास झाला पाहिजे, तरच त्यावरची अचूक उपाययोजना ठरवता येईल. चार आंधळ्यांची एक प्रसिद्ध गोष्ट आहे. ते चौघेंही हत्ती पाहावयास निघाले. एकाच्या हाती सोंड लागली, तो म्हणाला, 'हत्ती मोठ्या नळीसारखा आहे.' ज्याचा हात हत्तीच्या पायाला लागला, तो म्हणाला, 'हत्ती तर खांबासारखा आहे.' तिसऱ्याने हात उंच केला तो हत्तीच्या कानाला लागला त्याला वाटले हत्ती सुपासारखा आहे. तर चौथा आंधळा शेपटीवरून हात फिरवीत म्हणाला, 'हत्ती अगदी सापासारखा आहे.'

शेतकऱ्यांचे प्रश्न हे हत्तीसारखेच अवाढव्य आहेत. कोणी म्हणतो, शिक्षणाशिवाय शेतकऱ्याची उन्नती होणार नाही. दुसरा म्हणतो, आधुनिक शेतीची तंत्रे वापरल्याखेरीज शेतकऱ्यास तरणोपाय नाही. आणखी तिसरे म्हणतात, ग्रामीण भागात कर्ज वगैरे रूपाने अर्थसाहाय्य व पतपुरवठा करणे आवश्यक आहे, तर कोणी म्हणतात, कुटुंबनियोजनावर सर्वात जास्त भर द्यावसाय हवा, शेकडो आंधळ्यांची शेकडो मते. त्यामुळे शेतकऱ्यांचा बुद्धिभेद होतो. शेतकऱ्यांची प्रगती हे इतके अवघड आणि मोठे काम आहे की ते अगदी हळूहळू आणि संथपणेच होणार अशी त्याची कल्पना होते.

आपल्या स्वत:च्या विकासासाठी किंवा उद्धारासाठी आपण स्वत: तातडीने, उभारीने काही करू शकत नाही अशी एकदा धारणा झाली की, संघटनेसाठी लागणारी स्फूर्ती, उत्साह निर्माण होऊ शकत नाही आणि तेजोभंग झालेला तळमळीचा शेतकरी कार्यकर्तासुद्धा गावोगावचे उत्सव, भजनीमंडळी, काकड आरत्या, पंचायतीचे राजकारण आणि निवडणुका अशा कामात मन रमवू लागतो.

आतापर्यंत शेतकऱ्यांना संघटित करण्याचे जे प्रयत्न झाले त्यात आणि आपल्या शेतकरी संघटनेत फार मोठा फरक आहे. आपली संघटना ही एका निश्चित तत्त्वज्ञानावर आणि विचारप्रणालीवर आधारलेली आहे. संपूर्ण परिस्थितीचा आणि प्रश्नांचा समग्र अभ्यास करून शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर निश्चित तोडगे तिने शोधले आहेत. काही शहरी विद्वानांप्रमाणे पुस्तकी अभ्या



कसून आपली संघटना थांबत नाही तर आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवण्याची तिची धडपड चालू असते. या संघटनेच्या मार्गात वर सांगितलेल्या सर्व अडचणी येत आहेत, येणार आहेत. त्यांचा सामना कसा करावयाचा व त्यातून मार्ग कसा काढावयाचा याचा विचार यापुढे करावयाचा आहे.

दोन

**शेतकरी तितका एक एक**

शेतकऱ्या-शेतकऱ्यांना विभागणारे वादविवाद दोन प्रकारचे. पहिला म्हणजे, जमिनीवरून झालेली भांडणे, जातिजातीतील भेद, निवडणुकांच्या वेळी होणारी तेढ, लग्नसमारंभातले मानापमान, गावागावातील मत्सर आणि घराघरातील वैर इत्यादि. अशा अनेक चिरा प्रत्येक गावाला पडलेल्या आहेत. कोणच्याही कामाकरिता सगळा गाव एकत्र म्हणून येत नाही. गावचे म्हणून कितीही चांगले काम निघू द्या, सगळे मिळून गावकरी कामाला निघतील हे अशक्यच. गावदेवतांच्या उत्सवाच्या वेळी नाही म्हणायला सर्व गाव जमा होतो; पण त्यावेळी एकदिलाने काम करण्याचा फारसा प्रश्न नसतो. देवाचं जे काय करायचं ते जो तो स्वतंत्रपणे करतो. आपला मोठेपणा दाखवण्याच्या अहमहमिकेने एकत्र आलेला तो समाज अंतर्यामी चिरफळलेलाच असतो.

घाणीतील किडे

असल्या वादविवादाचे बाहेरून दिसणारे आणि दाखवण्यात येणारे कारण कोणतेही असो, खरे काण हे की ग्रामीण समाजाची प्रगती भांबली आहे. ज्या समाजाची सतत प्रगती होत नाही तो तुंबलेल्या पाण्याप्रमाणे अशुद्ध बनत जातो. त्यावर शेवाळे आणि घाण जमते, किडे वळवळू लागतात.

आज सर्व देशांत भाषांबद्दल भांडणे चालू आहेत. राष्ट्रभाषेचे स्थान काय असावे याबद्दल रण माजत आहेत. शिवसेनेसारख्या संकुचित विचारांना प्रतिष्ठेचे स्थान मिळते. जन सामान्यांचे नेतृत्व ज्यांनी दूरदर्शीपणाने करावयाचे ते लोकप्रतिनिधी नद्या, खनिज द्रव्ये, जमिनीच्या पोटातील तेल व वायू यावर, सवंग लोकप्रियतेसाठी, आपापल्या प्रदेशाचा हक्क सांगतात. स्वातंत्र्याची चळवळ म. गांधी, सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली भडकत होती तेव्हा कोठे होते हिंदीला विरोध करणारे हे नरवीर. तेव्हा कसे नव्हते कोणी म्हणत की मुंबईतल्या नोकऱ्या मराठी लोकांनाच मिळावयास पाहिजेत म्हणून. त्यावेळी राष्ट्राचा प्रवाह जोमाने चालला होता. अशा वळवळणाऱ्या किड्यांना गतिमान

प्रवाहात जगणेच शक्य नव्हते.

खेड्यापाड्यात जनसामान्यांचे आयुष्य असेच थबकलेले होते. अनेक राज्यकर्ते आले आणि गेले. सर्वांनी रयतेला वेगवेगळ्या प्रकारे नाडले. खेडुत जनतेच्या मनात राज्यकर्त्यांपैकी कोणी काही भले करील अशी आशाच राहिलेली नाही. आपल्या दारिद्र्याचा उगम कोठे आहे याचा शोधच लागत नाही आणि त्यातून सुटायला उपायही दिसत नाही. कोठे जावे, काय करावे हे समजेनासे झाले आहे. तुकाराम महाराज म्हणाले, ''येणे दु:खे माझा फुटो पाहे प्राण''. पिढ्यान्‌पिढ्या तीच दु:खे भोगून आम्ही असे बधिर झालो आहोत, कोडगे झालो आहोत, की या दु:खाने आमचे प्राण कासाविससुद्धा होत नाहीत. मग मन रमविण्यासाठी आम्ही आपापसांतच भांडणे काढून ती झुंजत बसतो. बाहेरून अपमान होऊन आलेल्या गड्याने घरात बायकापोरांवर आरडाओरड करून आपले पुरुषत्व गाजवावे अशी आमची भांडणे आहेत.

नवा पुरुषार्थ

*जळ तडागी सडे, बुडबुडे तडतडे*
*शांती ही बापुडे, बडबडति जनकिडे*

न्यायनिवाडा करून ही भांडणे मिटण्यासारखी नाहीत. त्यात अर्थही नाही. आम्ही ही भांडणे भांडतो कारण आमच्या मनाला गुंतवू शकेल, मोहवू शकेल असा दुसरा खरा पुरुषार्थाचा मार्गच आमच्या दृष्टीसमोर नाही, असा पुरुषार्थ पुढे दिला की शिवाजीच्या अवताराच्या वेळी घडले त्याप्रमाणे 'कोंढाणा पहिला, रायबाचं लगीन मागाहून' ही भावना तयार होईल.

शेतकरी संघटनेचे पहिले साधन म्हणजे असा नवा पुरुषार्थाचा मार्ग दाखवून देणे आहे. यासाठीच शेतकरी संघटना ही पक्षभेद मानत नाही, जातिभेद धरत नाही, तिच्या लेखी धर्मभेद नाही, लहानमोठ्यांत फरक नाही. शेतकरी तितका एक एक!

नवा पुरुषार्थ कोणता ? तर तो हा की शेतकऱ्यांस नवे स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे. जेथे भारताच्या इतिहासात प्रथमच शेतकऱ्याचे स्वत:चे शासन तयार होईल आणि शेतकऱ्यांची गुलामगिरी संपेल. त्याला पोटभर खायला मिळेल. त्यांच्या बायकापोरांस सुखाचे दिवस आणि उज्वल भविष्य दिसेल. आज त्याला हे मिळत नाही कारण एक जगव्यापी षडयंत्र त्याला ताब्यात ठेवत आहे. हराम त्याच्या कष्टावर मौजमजा मारीत आहेत. त्याच्या घामावर दाम कमवित आहेत.



हे षड्‌यंत्र मोडावयाचे आहे. ही ऐतिहासिक कामगिरी भारतातील शेतकऱ्यावर येऊन पडलेली आहे. इतिहास आज येथे घडत आहे.

शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना ही नवी जाणीव शेतकऱ्यांपर्यंत न्यावयाची आहे. अरे शेतकरी बांधवांनो! बाहेरील शत्रू तुम्हास रात्रंदिवस नागवीत आहे. यावेळी घरातील भांडणे विझवून टाका. एकमेकातील वादविवाद विसरा. जेव्हा कधी बाहेरच्या शत्रूचे निर्दालन होईल तेव्हा निवांत वेळ मिळेल असल्या करमणुकींना, पण आज सर्वांनी एक व्हा. कोणी राजकीय पक्षा-पक्षांची भांडणे तुमच्यात आणून लावील. कोणी म्हणेल काँग्रेस मोठी, कोणी म्हणेल जनता मोठी, कोणी म्हणेल आणखी कोणी देवी मोठी. हे सर्व पक्ष शेतकऱ्यांच्या शत्रूचे हस्तक आहेत. आजपर्यंत त्यांच्या हातात अमाप सत्ता होती. काय भले केले त्यांनी शेतकऱ्यांचे? आम्हाला ही देवी नको, तो प्लेग नको आणि तो कॉलरा नको. राजकारणी संधिसाधूंनो, चले जाव! तुमची भांडणे आमच्यात लावू नका.

नका सांगू आम्हाला जुन्यापुराण्या कल्पना आणि जातीविचार. कोण मोठा आणि छोटा. आमच्यात असे भेद पाडून यांनी आम्हाला सर्वांनाच छोटे बनवले आहे. आम्ही नाही मानत कोणताही भेद. जो शेतावर कष्ट करतो तो शेतकरी आणि शेतकरी तितका एक एक!

आज ही पुरुषार्थाची नवी ज्योत, ठिणगी पेटवावयास फार कठीण वाटते; परंतु शेतकरी संघटकांनी निराश होण्याचे कोणतेही कारण नाही. रान शुष्क कोरडे झालेले आहे. प्रयत्न चालू ठेवले तर एका प्रयत्नाने दुसऱ्या प्रयत्नाला जोर येतो. एक सैनिक पडला तर दुसरा त्याची जागा घेतो. एका हुतात्म्याची जागा शेकडो वीर सैनिक घेतील आणि एक दिवस असे रान पेटेल की त्यात सत्य, असत्य, न्याय, अन्याय याचा निवाडा होऊनच थांबेल. त्या यज्ञाची आम्ही तयारी करीत आहोत.

ग्रामीण भागांतील संघर्षाचा दुसरा प्रकार हा जास्त अर्थपूर्ण आहे. जुने जमीनदार आणि कष्टकरी बागायतदार कोरडवाहू शेतकरी यांच्यातील वाद हे आर्थिक हितसंबंधांवर आधारलेले आहेत. त्यांचा विचार वेगळा करावयास हवा.

तीन

भारतीय शेतकऱ्यांची दैनावस्था ही त्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या मोबदल्यामुळे आहे हे आपण पाहिले. या अपुऱ्या मोबदल्याचे मुख्य कारण म्हणजे पावसाळी

शेतीचा माल जवळ जवळ सगळा एकाचवेळी बाजारात उतरतो हेही आपण पाहिले अर्थातच हे उघड आहे की ज्या काही भाग्यवान शेतकऱ्यांची शेती आकाशातून पडणाऱ्या पाण्यावर अवलंबून नाही त्यांना पाहिजे तो माल पाहिजे तेव्हा काढून बाजारभावांच्या कहारातून मुक्तता घेता येते.

शेतीमाल म्हणजे जगण्यासाठी आवश्यक अशा वस्तू. बागायतदारांनी काढलेल्या मालास स्पर्धा जवळजवळ नाही आणि मालही त्यामानाने चांगल्या प्रतीचा. यामुळे बागायती शेती खूपच किफायतशीर ठरू शकते. आधुनिक शेतकी तंत्राचा अभ्यास व वापर करून या वर्गाने शेतीबाबत खरोखर काही चमत्कार घडवून आणलेले आहेत.

बागायतदारांचा उगम

बागायती शेतीची सुरुवात साहजिकच नदी तलाव इत्यादी पाण्याच्या नैसर्गिक साठ्याशेजारी होते. विहिरीच्या पाण्यावर बारमाही बागायती आपल्या प्रदेशात थोड्याप्रमाणावर होऊ शकते. इंग्रजी राज्य येण्यापूर्वी धरणे पाटबंधारे ही आपल्याकडे अस्तित्वात नव्हती. थोडीफार तळी बांधलेली असत. तीही मुख्यत: पिण्याच्या कामासाठी इंग्रजी राज्यात धरणे व पाटबंधारे कामांची खूपच प्रगती झाली. वारंवार येणारे दुष्काळ टाळण्यासाठी ही कामे हाती घेण्यात आली. देशभरच्या शेतीला या तऱ्हेने पाणीपुरवठा करता येणे शक्य नाही. अगदी कमाल म्हणजे २०% जमीन कधी काळी बागायती होऊ शकेल. देशाची जलसंपत्ती योग्य रीतीने वापरली जावी म्हणून कोट्यवधी रुपयांचा खर्च करून या योजना पार पाडल्या जातात. ज्या भागांना अशा योजनांमुळे पाणी मिळते त्या भागांवर साहजिकच एक जबाबदारी पडते. या पाण्याचा उपयोग देश परिस्थितीस आवश्यक अशी पिके काढण्याकरता होईल व आणि या योजनांभोवतालच्या प्रदेशात 'धान्याची कोठारे' तयार होतील अशा हेतूने पाटबंधारे योजना तयार करण्यात आल्या. सार्वजनिक पैसा त्यावर खर्च करण्याची मंजुरी देण्यात आली ती अशा कल्पनेने, की नवीन बागायती जमिनीत धान्याची मोठ्या प्रमाणावर पैदास होऊन देशात पुन्हा दुष्काळी उपासमार होणार नाही.

गुंडराज्याची स्थापना

पाटबंधाऱ्यांचे पाणी एकदा वाहू लागल्यानंतर मग मात्र घडले ते मोठे चमत्कारिक. नवीन बागायती जमिनी धान्याच्या पिकांसाठी क्वचितच वापरल्या गेल्या. बहुतेक जमिनींचा उपयोग ऊस, तंबाखू इत्यादी नगदी पिकांसाठी होऊ



लागला. या पिकांसाठी पाणी घेता यावे म्हणून पाटवाल्यापासून थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हातदाबी चालू झाली. प्रसंगी डोकेफोडीलाही कोणी मागे पाहीना.

सार्वजनिक खर्चाने आलेल्या पाण्याने बागायतदारांच्या खिशात पैशाचा ओघ वाहू लागला. काही ठिकाणी काही बागायतदारांनी या नव्या लक्ष्मीचा आदर केला आणि प्रगतीच्या नवीन दिशा शोधायला सुरुवात केली. अशी उदाहरणे अपवादात्मकच. सर्वसाधारणपणे हा पैसा बायाबाटल्यांवर जास्त उडवला जाऊ लागला. गावपातळीवर गुंडगिरीचे राज्य चालू झाले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांबाबत तर विचारायलाच नको. नवीन पाण्याखाली आलेल्या जमिनीत देशासाठी धान्य पिकवण्याची काही जबाबदारी आहे हे कुणाच्या मनातसुद्धा आले नाही. उसाचे मळे, द्राक्षांचे बगीचे बहरू लागले. अन्नधान्य परिस्थिती १९७६ ते १९७९ हा काळ सोडला तर बिकटच राहिली. दुष्काळाची चिन्हे दिसताच शासनास धान्याची आयात करण्यासाठी धावपळ होऊ लागली.

बागायतदारांनी सत्ता हाती घेतली

शासनाने अंमलात आणलेल्या पाटबंधारे योजनांनी शेतकऱ्यांचा बागायतदार होतो हे पाहताच बागायतदार गटाने आणखी एक पाऊल पुढे टाकले. हातात पैसा तर होताच. ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांवर त्यांचे वजनही होते. तेथे पुढारीपणा करून मते मिळवणे अगदी सोपे होते. बागायतदार गटाने राजकारणात प्रवेश केला. सहकारी सोसायट्या, पंचायत समित्या, पंचायती, ऊस कारखाने, सहकारी बँका, कृषि उत्पन्न बाजार समित्या, खरेदी विक्री संघ अशा अनेक यंत्रणा बागायतदारांनी हाती घेतली. पंचायती राज्याच्या आणि सहकारी चळवळीच्या आधाराने ग्रामीण विभागाची प्रगती करण्याच्या घोषणा करत करत बागायतदार सत्तेची ही केंद्रे तयार झाली.

बागायतदार मंडळींना तसे राजकारणांत स्वारस्य फार थोडे होते. निवडणुका लढवाव्या, पदाधिकारी व्हावे, मान मिळवावा व तो गाजवावा ही ऊर्मी. मिळालेल्या पदाच्या आधाराने जो जो म्हणून फायदा खिशात घालण्यासारखा असेल तो नाकारण्याइतकी नीतिमत्ता आणि चारित्र्य बागायतदार मंडळीत अपवाद म्हणूनच आढळायचे. आपापल्या भागात शाळा, दवाखाने, टपाल कचेऱ्या उघडून घेण्याइतकी कर्तबगारी कठीण नव्हती. बहुतेक बागयती भागांत वीजही आली. रस्तेही सुधारले पण बेताबेतानेच.

राजकारणांतील सत्तास्थानांचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे आपापल्या भागांत पाण्याची व्यवस्था करून घेणे आणि पाण्याची व्यवस्था झाल्यानंतर निघणाऱ्या नगदी पिकांवर गैरवाजवी भाव आकारून कोट्यवधी रुपयांचा फायदा काढणे. जेथे पाटबंधारे योजना होणे कठीण आहे अशा कोरडवाहू शेतीच्या भागाकडे बागायतदार पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले. साखरेचे कारखाने निघून बागायतदारांच्या हाती पैसा आला. पण कोरडवाहू शेतीमालाची परिस्थिती सुधारण्यासाठी साठवणूक वा पाठवणुकीची व्यवस्था, प्रक्रियेचे कारखाने याकडे लक्ष देण्यात आले नाही.

इंडियाचे हस्तक

स्वातंत्र्योत्तर काळात शहरी विभागात आणखी एक मोठा गट तयार झाला. परदेशी मदतीने कारखाने तयार होत होते. परदेशांशी मोठ्या प्रमाणावर आयात निर्यातीचे व्यवहार शासनाने दिलेल्या परवान्यांच्या आधाराने होऊ लागले. पंचवार्षिक योजनांचा मुख्य फायदा या गटाने मिळवला. उद्योगधंद्यात व शहरी भागात विकास झपाट्याने होऊ लागला. बागायतदारांना आपली भरभराट चालू ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे राजकीय सत्तेची गरज होती. त्याचप्रमाणे या शहरी गटालाही होती; पण लोकशाही मुखडा कायम ठेवण्यासाठी मतांचे गठ्ठे मिळवण्याची ताकद या गटाकडे नव्हती. ती ताकद होती बागायतदारांकडे.

साहजिकच बागायतदार आणि शहरी कारखानदार व्यापारी यांची राजकीय युती झाली. सत्तेची दिखाऊस्थाने बागायतदारांनी हाती घेतली. निवडणुकीच्या राजकारणांत ते अढळच होते. हितसंबंधियांच्या इंडियाने बागायतदारांची वर्मे जाणली आणि त्यांचा उपयोग करून इंडियाचे भारतावर वसाहतवादी राज्य चालू केले.

शेतकरी संघटना बागायतदारांपासून वेगळी

बागायतदारांच्या सध्याच्या परिस्थितीतील भूमिकेची मीमांसा ही अशी आहे. गावोगावच्या सोसायट्या पंचायती, पंचायत समित्या, बाजार समित्या यातील पदाधिकारांचे वाटप करून आणि इकडे तिकडे उपसासिंचन योजना, पाझर तलाव असे तुकडे फेकून कोरडवाहू विभागांतही त्यांनी आपल्या हस्तकांचे जाळे कुशलतेने पसरवून ठेवले आहे. स्वत:च्या जमिनीपुरते पाणी येण्याची आशा निर्माण झाली की कोरडवाहू शेतकऱ्यांचे नेतेसुद्धा बागायतदारांची तळी उचलून धरू लागतात.

शेतकरी व बागायतदार यांचा तसा विरोध असण्याचे कारण नाही; पण ही



गोष्ट स्पष्ट आहे की, या दोन गटांचे हितसंबंध अगदी वेगळे आहेत. दोघांनाही आपल्या विकासाची वाटचाल वेगळी वेगळीच करावी लागेल. शहरी इंडियांतील प्रतिनिधींशी हातमिळवणी करून बागायतदारांनी राज्यसत्ता हाती घेतली आणि इंडियाचे ध्येयधोरण पुढे चालवले. भारतावरील इंडियाच्या वसाहतवादी राज्यांत इंडियाच्या हस्तकांचे काम त्यांनी घेतले. यामुळेच कोरडवाहू शेतकऱ्यांच्या संघटनेत बागायतदारांच्या गटाला स्थान असूच शकत नाही. बागायतदारी राजकारणापासून शेतकऱ्यांनी सावध राहिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या नावाने बोलून बागायतदार राजकारण्यांनी फार काळ फसगत केली आहे. ती यापुढे चालू देता कामा नये.

चार

ग्रामीण भागातच राहणाऱ्या जमिनीच्या पिकांवर जगणाऱ्या बागायतदारांशी शेतकऱ्यांच्या संघटनेची आघाडी होऊ शकत नाही. त्या उलट शेतीशी अजिबात संबंध नसलेल्या शहरांतील औद्योगिक कामगारांबरोबर शेतकरी संघटना एकजूट करू शकते.

वरवर पाहणाऱ्यास असे वाटल्याशिवाय राहणार नाही यात काही तरी चूक आहे. आमच्या जवळपास राहणारे जमीन कसणारे बागायतदार आमच्यातील नव्हते आणि यंत्रावर काम करणारे झोपडपट्टीत राहणारे कामगार मात्र आमच्यातले हे कसे काय? वरवर पाहणाऱ्याला जरी हे थोडे चमत्कारिक दिसले तरी जरा विचार करता या चमत्काराचे कारण सहज समजून येईल.

आज शहरांतील झोपडपट्ट्यांतून आणि गलिच्छ वस्तींत राहणारे कामगार आले कोठून? मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील झोपडपट्ट्यांतील वस्ती सतत वाढत आहे. पुण्यामध्ये एकूण लोकवस्तीच्या ३८ % इतकी झोपडपट्टीत राहणाऱ्यांची संख्या आहे. १९४७ साली हे प्रमाण ६ % सुद्धा नव्हते. शहरात मोकळी जागा दिसेल तिथे पत्र्या खोक्याची घरे दाटीवाटीने उभारून, पावसापाण्यात, चिखलात, घाणीत राहून मिळेल ते काम करणारे कष्ट, मेहनत करणारे हे लोक येतात तरी कोठून?

झोपडपट्टीतील लोक हे मूळचे ग्रामीण भागांतील कोरडवाहू शेतकरी आहेत. शेतीचा धंदा दिवसेंदिवस बुडीत जाऊ लागला. शेतीवर जगणे अशक्य होऊ लागले. तसतसे पोटापाण्यासाठी कामाच्या शोधात हे शेतकरी शहरात येऊन राहू लागले आणि ग्रामीण भागांतील निर्वासितांचा हा ओघ सतत

मोठ्या शहराकडे वाहत राहिला आहे. शहरातल्या झोपडपट्ट्या सतत वाढत आहेत याचा खरा अर्थ असा, की ग्रामीण भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांना जमिनीवर जगणे अशक्य आहे.

शेतकऱ्यांच्या मालाला कमीत कमी भाव देण्यामध्ये शहरी समाजाला दुहेरी फायदा होतो. कच्चा माल कमीत कमी भावात घेऊन कारखानदारी माल महागात महाग विकून होणारा नफा हा पहिला फायदा. अशा तऱ्हेने कंगाल झालेला शेतकरी शहरी झोपडवस्तीत जाऊन राहिला, की स्वस्त मजुरीत भरपूर पुरवठा होऊन कारखानदारी कामाचा खर्च कमी होतो हा दुसरा फायदा.

शहरात कामाच्या शोधात आलेल्या शेतकऱ्यांचे हाल कांही संपत नाहीत. चांगल्या कारखान्यात नोकरी करणारे भाग्यवान फार थोडे. बहुतेकाना हमाली मजुरी करून कसेबसे पोट जाळावे लागते. तरीसुद्धा खेड्यावरील शेतात राहून संपूर्ण उपासमार होण्यापेक्षा शहरात अर्धपोटी तरी राहणे त्याला पत्करावे लागते.

गावातल्या हजारो वर्षाच्या परंपरेने चालत आलेले आयुष्य सोडून सर्व राज्यांतून आलेल्या अनेक धर्मांच्या, अठरापगड जातींच्या झोपडवस्तीत राहणे त्याला भाग पडते. एकूण सर्वच जीवन उद्ध्वस्त झालेले, जुन्या परंपरा मोडकळीस आलेल्या. स्वत:चे म्हणायला मालमत्ता काही नाही. शरीरात ताकद आहे तोपर्यंत राबराब राबायचं आणि हातावर पोट भरायचे अशी त्याची अवस्था होते.

पण निसर्गाचा काय चमत्कार आहे. जे मातीत संपूर्ण गाडावे त्याचेच बी अंकुरते आणि रोप फुटते. ज्यांना आयुष्यात कशाचाच आधार नाही त्यांना गमवायलाही काही नसते.

गमावण्याचे काही नाही तर कुणाला कशासाठी भ्यायचे? मेलेल्याला मरणाचे काय भय? अशा विचाराने कामगार लढ्याला तयार होतात व त्यासाठी एकजूट करतात. गेल्या चाळीस वर्षांच्या काळात संघटित लढा देऊन कामगारांनी जी प्रगती केली तिचा आदर्श शेतकऱ्यांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.

शेतकरी आणि कामगार हे एकमेकांचे साथी आहेत. भाऊ भाऊ आहेत. शहरी समाजाविरुद्धचा लढा त्या दोघांनाही एकत्र लढावा लागणार आहे.

दोघांचा शत्रू एकच आहे. शहरी समाज, जो दोघांचे शोषण करतो. दोघांनाही नागवतो. कच्च्या मालाचे भाव कमी करण्यासाठी तो शेतकऱ्याला



लुंगवतो तर मजुरीचा खर्च कमी करण्यासाठी तो कामगारांना लुबाडतो. शेतीमालाचे भाव कमीत कमी ठेवून तो या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधतो. शेतीमालाच्या किमती सुधारल्या तर शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल. झोपडपट्टीतील बेकारांची संख्या घटेल व त्यामुळे मजुरीचे दरही वाढतील.

केवळ हातावर पोट भरणाऱ्या कामगाराच्या नैसर्गिक लढाऊ प्रवृत्तीने शहरी राज्यांच्या विरुद्धच्या लढ्याचे नेतृत्व साहजिकच त्यांच्याकडे जाईल. शेतकऱ्यांना शोषणावर आधारलेली चालू व्यवस्था त्या शोषणातून निर्माण झालेला कामगार वर्गच मोडून टाकेल. शेतकरीवर्गाने कामगारांच्या लढ्याना सतत सहानुभूती दाखवली पाहिजे व सक्रिय पाठिंबा दिला पाहिजे.

पाच

शेतकरी त्यांची संघटना, त्यांचा लढा या सर्वांचा आणखी एका वर्गाशी संबंध येतो. या संबंधाचा निदान धावता उल्लेख तरी करणे आवश्यक आहे.

भारताचे लष्कर अफाट मोठे आहे. त्यात लक्षावधी शिपाई आहेत. शांततेच्या काळात पुढील लढ्याची तयारी करणे तसेच महापूर, दुष्काळ अशा आपत्तीच्या वेळी नागरिकांना साहाय्य करणे ही कामे शिपाई पार पाडतात. युद्धकाळात प्राणांची पर्वा न करता शत्रूचा प्रतिकार करून देशांचे रक्षण करणे हे त्यांचे कर्तव्य. ही कामगिरी बजावताना हजारोंनी आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे. देशात अनेक प्रकारच्या नोकऱ्या आहेत; पण पगारावर प्राण द्यावे लागणारी शिपाईगिरी ही एकच नोकरी आहे. युद्ध सुरू असले की जवानांच्या बहादुरींच सगळीकडे वाहवा होते. पुढारी त्यांची प्रशंसा करतात. गांवोगांवचे कवी त्यांच्यावर कवने रचतात. शहरांतील सुखवस्तू बायका आणि त्यांनी महिलामंडळे जवानांना खाण्याच्या वस्तू पाठवू लागतात. त्यांच्यासाठी गरम बंड्या विणू लागतात. काही दिवस सर्व वातावरण सैनिकमय होऊ लागते.

लढाई संपली की जवानांचा सर्वांना सहजच विसर पडतो. लढाईत कामी आलेल्या जवानांच्या बायकामुलांवर तुटपुंज्या पेन्शनवर दिवस कंठण्याची वेळ येते. जखमी झालेल्या, हात पाय गमावलेल्या सैनिकांना बहुतांशी धर्मादाय किंवा सामाजिक सेवांवर अवलंबून राहावे लागते. सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांची स्थितीही फारशी स्पृहणीय नाही. काही स्वयंसेवी संघटना त्यांना साहाय्य करण्याचा प्रयत्न करतात तेवढाच त्यांना आधार.

देशासाठी मरण स्वीकारणाऱ्या हौतात्म्याचे काव्य कितीही स्फूर्तिदायक

असो, शक्यतो हे काम दुसऱ्याने केलेले बरे ही साहजिकच सर्वांची भावना आपण होऊन स्वखुशीने असे सतीचे व्रत स्वीकारणारे कसे काय मिळवावेत? ही अडचण सोडवण्यासाठी बहुतेक सर्व विकसित देशांत लष्करी शिक्षण हे सर्व नागरिकांस सक्तीचे असते व युद्धासारखा प्रसंग आल्यास सर्व नागरिकांस लष्करी कारवाईत सामील व्हावे लागते. राष्ट्ररक्षणासाठी जीवावर घ्यायचा धोका व त्याचे गंभीर परिणाम हे राष्ट्रातील सर्व नागरिक उच्चनीचतेचा विचार न करता विभागून घेतात.

आपल्या देशात अर्थातच अशी स्थिती नाही. आयुष्यभर दुसऱ्याच्या कष्टांवर मौजमजा करणारे शहरी लोक आपले सुखाचे आयुष्य धोक्यात घालायला थोडेच तयार होणार? युद्धाचे भीषण रणकंदन चालू असताना क्रिकेटची टेस्ट मॅच चालू असताना कोणत्या बाजूच्या किती धावा झाल्या ते पाहावे त्याप्रमाणे सैन्य लाहोरला पोंचले किंवा नाही, ढाक्का किती मैल राहिले असे प्रश्न विचारत रेडिओला कान लावून बसायचे हे त्यांचे काम. कुणा आसपासच्या कुटुंबातील एखादा लेफ्टनंट किंवा पायलट जखमी झाल्याची किंवा कामी आल्याची बातमी आली म्हणजे तर जणू आपण प्रत्यक्ष लढाईतच भाग घेतला असल्याची भावना होते. अशा करमणुकीसाठी जवानांकरता मदत म्हणून काही रुपये कपडे द्यावे लागले तर ते काही महाग नाही. युद्ध परिस्थितीचा फायदा घेऊन मालाचा साठा करून किमती वाढवून काळाबाजार करून उपटता आला तर फारच उत्तम. या वृत्तीचे शहरी थोडेच लष्करात भरती होऊन हातात बंदूक घेऊन लढावयास जाणार आहेत?

मग जवान येतात कोठून? कोणत्या भागातून? कोणत्या वर्गातून? लष्करातील जवान हा जवळजवळ सगळा ग्रामीण भागातून म्हणजे भारताचा रहिवासी आहे, त्याचा घरचा मूळचा व्यवसाय शेती, कोरडवाहू शेती किंवा केवळ शेतमजुरी, शहरी अर्थव्यवस्थेच्या कारवायांमुळे शेतीत काहीच सुटत नाही. मुलाबाळांना एकवेळ पोटभर मिळणे कठीण. शिक्षणाची काही शक्यता नाही. भविष्यात सुखाची काही आशा नाही आणि जवळजवळ नेमाने दुष्काळ आला की, सर्व दाही दिशांवर उधळून जायचे. या अशा आयुष्यातून सुटण्याचा मार्ग म्हणून शेतकरी तरुण लष्करात जवान म्हणून भरती होतो, अशा भरती होऊ इच्छिणाऱ्या तरुणांचीही इतकी गर्दी होते की, अधिकाऱ्यांचे हात दाबून भरती करून घ्यावी लागते.

शेतकऱ्याच्या शोषणातून मिळणाऱ्या प्रत्यक्ष फायद्याबरोबर शहरी व्यवस्थेत



उद्योगधंद्यात काम करण्यास तयार असलेले असंख्य बेकार आणि युद्धभूमीवर जीव ठेवण्यास तयार असलेले लक्षावधी जवानही मिळतात.

कामगार ज्याप्रमाणे शेतकऱ्याचे दोस्त आहेत. त्याचप्रमाणे जवान हेही शेतकऱ्याचे साथी आहेत. या अर्थाने शेतकरी संघटनेने 'जय किसान ! जय जवान!!' ही घोषणा स्वीकारली आहे.

देशी किंवा विदेशी वसाहतवादाचा सामना करतांना किसानांइतकीच महत्त्वाची कामगिरी जवानांनी बजावलेली आहे. आपल्या देशातून इंग्रजांना जाणेही भाग पाडले ते आझाद हिंद फौजेत सामील झालेल्या जवानांनी आणि बंडखोर नाविकांनी जवानांच्या या उठावानंतर लॉर्ड माऊंटबॅटन यांनी पंतप्रधान यांना लिहिले होते, 'भारतावर आता बाहेरून राज्य करणे शक्य नाही; पण आतून करता येईल.' पण आतून करता येईल. वसाहतवाद्यांच्या कारवायांना यश आले. भारतावर इंडियाचे राज्य चालू झाले. हजारो जवानांचे आणि हुतात्म्याचे बलिदान व्यर्थ झाले. वसाहतवादाचे बाहेरील रुपडे फक्त बदलले. सामान्य रयत हलाखीतच भरडत राहिली.

भारताच्या या नव्या वसाहतवादाविरुद्धच्या लढ्यात आणि त्यानंतर उभारावयाच्या शेतकरीप्रणीत समाजात भारतीय जवानांचा काय भाग असावा किंवा असेल याची चर्चा निरर्थक आहे. इतिहासाचा पुन:प्रत्यय आल्याखेरीज राहणार नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावावयाला शेतकरी चुकणार नाही, कामगार कचरणार नाही आणि जवान विसरणार नाही.

सहा

शेतकरी समाज हा देशभर विखुरलेला आहे. हा समाज फुटीर आहे. अशा विखुरलेल्या व फुटीर वर्गाची संघटना यशस्वीरीत्या बांधण्यासाठी काय मार्ग योजावेत याचा आता विचार करावयाचा आहे.

संघटना बांधण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व शेतकऱ्यांना मान्य असे समान ध्येय निश्चित करणे. जर असे समान ध्येय ठरवता आले नाही तर मजबूत संघटना उभी राहणार नाही.

प्रत्येक गावच्या काही विशेष अडचणी असतात. कुठे प्यायला पाणी नाही, कुठे वाहतुकीची सोय नाही, कुठे वीज नाही, कुठे शाळा नाही, कुठे औषधपाण्याची सोय नाही.

काही ठिकाणी सरकारी अधिकारी जाच करतात तर कुठे गावांतल्या

गुंडाची मणगटशाही चालते.

दहा-पाच गावच्या गटांच्या काही अडचणी असतात. बांधबंदिस्ती, पाझरतलाव, छोटे पाटबंधारे अशा तऱ्हेच्या योजना तयार करून त्या राबवून घेऊन शेतीची सुधारणा केल्याखेरीज त्या भागातील शेतकऱ्यांना शेतीवर जगणेच शक्य नसते.

अशी अनेक दु:खे आणि अनंत अडचणी. कोरडवाहू शेतकऱ्याचे आकाशच फाटलेले त्याला ठिगळे कुठे कुठे म्हणून लावावीत आणि दोन वेळच्या भाकरीची भ्रांत असलेल्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ताकद कुठून आणावी?

काही ठिकाणी शेतकऱ्यांची स्थिती जरा बरी असते. अशा ठिकाणी काही शेतकरी एकत्र येतात. सहकारी पद्धतीने उपसा योजना वगैरे करून पाण्याची सोय करू बघतात. शेतीला लागणारी वरखते, औषधे, बी-बियाणे एकत्र खरेदी करून खात्रीशीर माल योग्य भावांत मिळावा असा प्रयत्न करतात. तयार झालेला शेतीमाल सहकारी पद्धतीने एकत्र करून त्याची विक्री चांगल्या भावाने करू पाहतात.

उसाच्या बागायतदारांनी यापुढे पाऊल टाकून सहकारी साखर कारखाने काढून अफाट प्रगती केली आहे. दूध उत्पादकांनी सहकारी पद्धतीने व्यवसाय करूनही आपली बरीच प्रगती करून घेतली आहे.

शासनाकडून अशा प्रयत्नांना काही साहाय्यही मिळते पण आजपर्यंतचा सर्वसाधारण अनुभव असा आहे, की काही हाताच्या बोटावर मोजण्याइतके अपवाद सोडल्यास बहुतेक संस्था मरगळल्या आहेत किंवा बंदच पडल्या आहेत. याला कारणे अनेक आहेत. त्यांचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल; पण सहकारी संस्थांच्या अपयशाची महत्त्वाची कारणे म्हणजे त्यातील कारभारी मंडळीतील कुशलतेचा व सचोटीचा अभाव हीच होत.

अनेक सहकारी संस्था बंद पडल्या आहेत. काहीचे व्यवहार थंडावले आहेत काही बंद पडण्याच्या वाटेवर आहेत. ज्या काही चालू आहेत त्यांच्या व्यवहारावर काही कारभारी मंडळी गबर होत आहेत राजकारण करत आहेत. सभासद शेतकऱ्यांच्या परिस्थितीत जवळ जवळ फरक नाही आणि काही संस्थांच्या सभासदांची परिस्थिती संस्था बंद पडल्यामुळे आणखी खराबच झालेली आहे. त्यांच्या नावावर कर्जे चढली आहेत. त्यांच्या जमिनी गहाण पडलेल्या आहेत आणि संस्था बंद असल्यामूळे फायदा काहीच नाही.



शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याचे आजपर्यंत जे प्रयत्न झाले त्यांची फलश्रुति अशी करुणास्पद आहे.

हे प्रयत्न फसणे अटळच होते कारण ते परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करून ठरवण्यात आलेले नव्हते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा ज्यांनी सखोल अभ्यास केलेला नाही अशा पुढाऱ्यांच्या हातात शासनाची साधन संपत्ती आली. त्या साधनांचा उपयोग त्यांनी आपापल्या भागातील योजना राबवण्यासाठी केला. अनेक वेळा या योजना केवळ व्यक्तिगत स्वार्थासाठीच राबवण्यात आल्या.

अशा या निराशाजनक परिस्थितीतून वाट काढायचे काम शेतकरी संघटनेकडे आलेले आहे. कुत्र्याच्या अंगावर दगड फेकला तर तो त्या दगडालाच चावायचा प्रयत्न करतो. तेच वाघाच्या अंगावर दगड फेकला तर तो फेकणाऱ्याच्या नरड्याचा घोट घेतो. शेतकऱ्यावर आज अनेक दगड भिरकावले जात आहे. त्या दगडांच्या मागे धावून त्यांना चावून काहीही उपयोग नाही. दुसरे दगड पेकाटात बसत राहतीलच. हे दगड कोठून येतात? ते कोण फेकत आहे? याचा अंदाज घेऊन त्याचाच बंदोबस्त सिंहाच्या पराक्रमाने करणे आवश्यक आहे.

मग कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हालाखीचे मूळ कोणते? ते मूळ कारण दूर केले पाहिजे. दोन-चार गावच्या किंवा हजार दोन हजार गावांमध्ये थोड्याफार योजना राबवूनसुद्धा हा प्रश्न सुटणार नाही. देशातील साडेसहा लाख खेड्यांचा जर प्रश्न सोडवायचा असेल तर त्या सर्वांच्या दु:खाचे मूळ दूर करावयास पाहिजे. एखाद्या आजारी माणसाचे रक्तच खराब झालेले असेल तर त्याच्या सगळ्या अंगावर फोड येतील. एकेका फोडावर मलमपट्टी करत बसले तर खर्च खूप होईल. वेळ खूप जाईल आणि आजार तर बरा होणार नाही. कारण रक्तच खराब असल्यामुळे नवे नवे फोड सतत येत राहतीलच. त्याला उपाय योजना म्हणजे अशा औषधाची पाहिजे की ज्यामुळे एका सुईने रक्तातील दोष नाहीसे होतील.

आजवर शासनाने जमेल तितक्या फोडांना मलमपट्टी करण्याचे काम चालवले आहे. बहुतेक फोडावर औषध उपचार व्हायचे आहेत. मलमपट्टी झालेल्या ठिकाणी थोडी सुधारणा झाली असे काही काळ वाटले तरी फिरून तिथे फोड येतच आहेत. अशा प्रयत्नाच्या विचाराने टिकाऊ संघटना बांधणे शक्य नाही.

भारतातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हलाखीचे मूळ कारण त्यांना मिळणारा

अपुरा मोबदला हेच आहे. शेतीमाल काढण्यासाठी जो काही खर्च येतो तो कधीही भरून येत नसल्यामुळे कोरडवाहू शेती हा बुडीत धंदा झाला आहे. पावसाच्या अनिश्चितपणामुळे पिकाची जी बूड किंवा नुकसानी होते ती सर्वस्वी शेतकऱ्याच्या डोक्यावर पडते. जर महाभाग्याने एखादे वर्षी बरे पीक आले तर बाजारांत मुबलक पीक आल्यामुळे भाव कमी होतात. याखेरीज दरवर्षी हंगामात सर्व पिके बाजारात एकदम आल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या खर्चाइतकाही मोबदला मिळू शकत नाही. शेतीतल्या खोटीचा परिणाम साहजिकच शेतमजुरीच्या दरावर होतो. शेतकरी कुटुंबाच्या राहणीमानावर होतो. दिवसेंदिवस शेतकऱ्यांची स्थिती खचतच जाते.

सद्य:स्थितीत कोरडवाहू शेतकरी बुडत चालला आहे. पाणी पार त्याच्या नाका तोंडात जाऊ लागले आहे. अशा वेळी त्याला पोहण्याची ताकद यावी म्हणून शक्तिवर्धक औषधे फेकण्यात काही अर्थ नाही. त्या औषधाचा कांही परिणाम होणार नाही आणि होणार असला तरी त्याच्या आधीच शेतकरी बुडून जाईल. त्याच्याकडे आज लगेच भोपळा फेकण्याची गरज आहे. हा भोपळा म्हणजे सर्व शेतीमालास उत्पादन खर्चाच्या थोडाफार तरी वर मोबदला. असा मोबदला मिळाला तरच शेतकरी आपली परिस्थिती सुधारू शकेल.

ही उपाययोजना परिणामकारक आहेच; पण त्याबरोबर सर्व शेतकऱ्यास उपयोगी आहे. म्हणूनच शेतीमालाला योग्य भाव मिळवणे हा शेतकरी संघटनेचा मध्यवर्ती कार्यक्रम असला पाहिजे. या समान ध्येयासाठी सर्व शेतकऱ्यांना एकत्र करता येईल. त्यांच्यामध्ये वादविवाद निर्माण न होता सर्वांचे एकमत होऊन मजबूत आघाडी उभारण्यासाठी ते तयार होतील.

याचा अर्थ असा नाही की शेतकरी संघटना स्थानिक अडचणीकडे लक्ष देणार नाही. गावोगावच्या शेतकरी संघटनांची जितकी ताकद असेल त्या प्रमाणात रस्ता, पाणी, वीज या संबंधीच्या अडचणी दूर करण्यासाठी संघटनेने अवश्य प्रयत्न करावयास पाहिजेत. अशा लढ्यामुळे संघटना मजबूत होण्यास मदत होईल. पण अशा लहान चळवळींनी व लढ्यांनी बांधलेल्या संघटनेचा मुख्य उपयोग हा शेतीमालास रास्त भाव मिळवण्याच्या मुख्य ध्येयासाठी करावयाचा आहे. याचा विसर पडता कामा नये.

सात

शेतमालास योग्य भाव मिळवणे हे मध्यवर्ती ध्येय. हे साध्य झाल्यास



ग्रामीण भारतात पैसा खेळू लागेल. शेतीचा विकास होईल. शेतकरी व शेतमजूर या दोघांचेही जीवनमान सुधारू शकेल.

चालू परिस्थितीत कोरडवाहू शेती ही फायदेशीर होऊ शकतच नाही. पावसाच्या अनिश्चितपणामुळे पिकास निर्माण होणारा धोका इतका मोठा आहे की त्याची गणना विमा हप्त्याच्या पद्धतीने उत्पादन खर्चात केली तर प्रत्येक शेतीमालाचा उत्पादन खर्च त्याच्या चालू घाऊक किमतीपेक्षा निदान ७० % ते ८० % जास्त ठरेल. ज्याअर्थी शेतमालातील फार मोठे प्रमाण पावसाळ्याच्या वा रबी हंगामाच्या शेवटी बाजारात येत असल्यामुळे शेतीमालाची बाजारपेठ सतत व्यापाऱ्यांच्या ताब्यातच राहते आणि सर्व शेतीमाल कमीत कमी किमतीतच विकला जातो. व्यापाऱ्यांना या पद्धतीत इतका मोठ्या प्रमाणात फायदा होतो की वस्तुत: खोटी वजने मापे, खोट्या पट्ट्या, खोटे हिशोब असले प्रकार करण्याचा मोह त्यांना होऊ नये. परंतु मानवतेच्या व नीतिमत्तेच्या विचारांनी स्वत:चा फायदा नाकारल्याचे उदाहरण विरळाच.

शेतीमालास रास्त भाव मिळवण्यासाठी कोणती उपाय योजना करावयास पाहिजे हे आपण पाहिले आहे. सारांशाने सांगावयाचे म्हणजे ही उपाययोजना खालीलप्रमाणे–

शेतीमालास योग्य अशी गुदामे, शीतगृहे, वखारी बांधून शेतमाल साठवण्याची व्यवस्था करणे.

पारंपरिक पद्धतीची शेती उत्पादने बंद करून वा कमी करून सतत नवीन उत्पादने घेणे व पूरक जोडधंदे करणे.

जास्तीत जास्त शेतीमाल कच्च्या स्वरुपात बाजारात न पाठवता त्यावर काहीना काही प्रक्रिया करून टिकाऊ स्वरूप देणे.

या प्रत्येक उपायास बुडीत भांडवल व चालू खर्चासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची गरज लागेल. शेतकऱ्यास त्याच्या चालू मालावर जरी रास्त भाव मिळाला तरी फार थोड्या काळात स्वत:च्या बळावर वर सांगितलेल्या प्रकारची उपाययोजना करणे त्याला शक्य होईल. परंतु भाव नाहीत तोपर्यंत भांडवल नाही आणि भांडवल नाही तोपर्यंत भाव नाहीत अशा कात्रीत तो सापडला आहे.

रास्त भाव मिळवून देणे हा कोरडवाहू शेतकऱ्यांच्या म्हणजेच पर्यायाने आपल्या देशातील बहुसंख्य जनतेच्या आयुष्यातून दारिद्र्य पळवून लावण्याचा एकमेव रामबाण उपाय आहे. ही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ गोष्ट आहे आणि

तरीसुद्धा या एका मार्गाचा धडाडीने अवलंब शासन व इतर गरजा करत नाहीत. शेतीतल्या तंत्रात सुधारणा करणे, नवी औषधे, खते पुरवणे इकडे तिकडे काही गुदामे वा कृषिउद्योग काढणे अशा तऱ्हेचे प्रयोग क्वचित होतात. पण प्रमुख भर कल्याणकारी योजनांवर असतो.

याचे कारण असे की सध्याचे सर्व पक्ष त्यांची शासने यांचे हितसंबंध शहरी व्यवसायात गुंतलले आहेत. शेतकऱ्यासाठी जे करावयाचे ते शहरी भरभराटीच्या नखासही धक्का न लावता करण्याचा त्यांचा साहजिकच प्रयत्न असतो. शेतीमालास रास्त भाव दिल्यास शहरी भांडवलाचा कणाच मोडणार आहे आणि असे स्वजन द्रोही कृत्य कोणाचेही शासन करणार नाही.

गुदामे प्रक्रियाकारखाने असे प्रकल्प हाती घेतले तरी ते ज्या पद्धतीने राबवले जातात त्या पद्धतीने त्याचा फायदा शेतकऱ्यांस न मिळता शहरी व्यवसायासच मिळतो. शेतीमालास योग्य भाव मिळू लागल्यास ग्रामीण भागांतील जनतेच्या हाती भांडवल तयार होईल व ही जनता शासनाचे साहाय्य न घेता आपल्या मालास योग्य किंमत मिळेल अशी कायमस्वरूपी व्यवस्था राबवू शकेल.

भाव व भांडवल यांचे दृष्टचक्र फोडण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित होऊन चळवळ केली पाहिजे. लढे दिले पाहिजेत. आपल्या संख्याबळाचा उपयोग त्यांनी आजवर करून घेतला नाही. ते संख्याबळ वापरून आपल्या मागण्या मान्य करून घेतल्या पाहिजेत. लहानमोठ्या पातळीवर शेतकऱ्यांनी मालाचा संप केला पाहिजे.

समजा शेतकऱ्यांनी एक वर्ष अजिबात तयार माल बाजारात पाठवायचाच नाही असे ठरवले तर काय होईल? अर्थातच शेतकऱ्यांना पुष्ळकशा अडचणी येतील. काहीना २-४ महिन्यांवर भूकमारीस तोंड देण्याची वेळ येईल. काहीना कर्जफेडी करता येणार नाहीत. घरची लग्नकार्ये पुढे ढकलावी लागतील. पण या अडचणी त्या मानाने फारशा मोठ्या नाहीत. शेतकऱ्यांनी संघटित होऊन एकमेकांस साहाय्य केल्यास असे एखादे वर्ष शेतकरी सहज निभावून नेऊ शकतील. शहरी व्यवस्थेमध्ये मात्र अगदी थोड्या काळात एकच अनावस्था पसरेल. मथुरेसारख्या शहरात जाणारे दूध, दही, लोणी अडवणारे श्रीकृष्ण सगळ्या भारतांत आज तयार झाले तर कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रश्न ताबडतोबीने सुटणार आहे व हेच काम शेतकरी संघटनेस प्रमुखतेने हाती घ्यावे लागणार आहे.

काही शहरी विद्वान असा युक्तिवाद करतात की शेतीमालाचे भाव वाढल्यास त्याचा फायदा फक्त मोठ्या शेतकऱ्यांस होईल व लहान शेतकऱ्यांना ज्यांना



घरच्या खाण्यासाठी धान्य विकत घ्यावे लागते त्यांचे यामुळे मोठे नुकसान होईल. हा युक्तिवाद अत्यंत फसवा आहे. धान्य विकत घ्यावे लागणारे शेतकरी वेगवेगळ्या कारणांनी धान्य विकत घेतात.

प्रथमत: घरी मुबलक पीक येणारे शेतकरी त्यांच्या शेतात न होणारा माल विकत घेतात. उदा. भात, डाळी, गहू वगैरे. शेतीमालाचा भाव वाढल्याने याच्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

त्यानंतर घरी अपुरे पीक येत असल्याने त्याच्या बदल्यात कमी दर्जाचे पीक विकत घेणारे शेतकरी उदा. मावळात भात पिकवणारे शेतकरी भात खाऊन वर्ष भागणार नाही म्हणून भात विकतात व बाजरी घेऊन वर्ष काढतात. शेतीमालास योग्य भाव दिल्यास या प्रकारच्या शेतकऱ्यावर विशेष अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता नाही.

तिसरा धान्य विकत घेणारा शेतकऱ्यांचा वर्ग म्हणजे उत्पादन अपुरे असल्यामुळे शेतमजुरी करून धान्य विकत घेणारा. या वर्गावरही अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता नाही. शेतीमालाचे भाव पडत असतानासुद्धा गेल्या दोन-तीन वर्षांत मजुरीचे दर वाढत राहिले आहेत. ते भाव वाढल्यास त्याचा परिणाम शेतमजुरीचे दर वाढण्यात निश्चित होईल.

या अती गरीब वर्गाचा प्रमुख प्रश्न आहे तो शेती हे जगण्याचे साधन अपुरे पडते आहे हा आहे. ग्रामीण भागात प्रक्रियेचे कारखाने आणि इतर उद्योगधंदे निघावयास हवेत ते या दरिद्रीनारायणासाठी. शेतमालाचे भाव चढोत वा पडोत त्यांची हलाखी कायमच राहते. त्याला उत्तर शेतीच्या बाहेर शोधावयास पाहिजे. त्यासाठी शेतीमालाच्या अपुऱ्या भावाचे समर्थन करणे तर्कदुष्ट आहे.

या विद्वानांचे मत जर ग्राह्य धरले तर शेतमालाचे भाव जितके कमी तितका शेतकऱ्यास जास्त फायदा असे विक्षिप्त तात्पर्य निघेल. असल्या शहरी तर्कशास्त्राकडे दुर्लक्ष करून देशभरच्या शेतकऱ्यांनी आपले सर्व लक्ष एका ध्येयावर केंद्रित केले. आपल्या कष्टाचा योग्य मोबदला म्हणजेच शेतीमालास योग्य भाव या एका ध्येयासाठी शेतकऱ्यांचा फुटीर व विस्कळीत वर्ग संघटित करता येईल.

## आठ

आपल्या खंडप्राय देशात लक्षावधी खेड्यापाड्यांतून विखुरलेल्या विस्कळीत आणि फुटीर शेतकरीवर्गाची एकसंध आघाडी तयार करणे हे प्रथम उद्दिष्ट.

अशी आघाडी तयार झाल्याखेरीज भारतातील शेतकऱ्यांचे वसाहतवादी शोषण थांबणार नाही आणि शेती व्यवसाय किफायतशीर होऊ शकणार नाही. शेतकऱ्यांची वाढती हलाखीची स्थिती सुधारायची असेल तर त्यासाठी संघटनेचा उपयोग शहरी व ग्रामीण विभागांतील व्यापारी देवघेवीच्या अटी शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायद्याच्या झाल्या पाहिजेत. यासाठी उभारायच्या लढ्यात औद्योगिक कामगार व सैनिक हे शेतकऱ्यांचे निसर्गसिद्ध साथी आहेत तर कारखानदार, व्यापारी व बागायतदार हे विरोधी शत्रू आहेत. आपल्या ताकदीच्या साहाय्याने हा लढा शेतकऱ्यांना प्रभावी रीतीने लढता येईल. आता प्रश्न राहिला अशी शेतकरी संघटना बांधायची कशी?

विस्कळीत व फुटीर शेतकरी समाजाला एकत्र आणता येईल का? काय मार्गानी व कशा पद्धतीने शेतकरी संघटना बांधता येईल. गरीब शेतकऱ्यांच्या हाती साधने फार तुटपुंजी. एवढ्या थोड्या साधनांत प्रचंड देशव्यापी संघटना कशी काय उभारावयाची?

हे सर्व प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे व बिकट आहेत. त्या सर्वांची समग्र व समाधानकारक उत्तरे देणे या घटकेस कोणासही शक्य होणार नाही. संघटना तयार करताना अनेक आडाखे चुकतील. त्या अनुभवापासून धडा घेऊन चुका सुधारून घ्याव्या लागतील. संघटना बांधत असताना आज ध्यानीमनी नाहीत अशी नवीन संकटे व अडचणी उभ्या राहतील त्यांचाही सामना करावा लागेल.

आजपर्यंतच्या अनुभवावरून काही विचार व कल्पना स्पष्ट होतात. तेवढ्यांचाच परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

अगदी पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे सध्या देशात जे मोठे राजकीय पक्ष आहेत त्यापैकी एकाही पक्षाच्या झेंड्याखाली शेतकऱ्यांची प्रभावी संघटना उभी राहणार नाही. या सर्व पक्षांच्या शेतकरी आघाड्या व संघटना आहेत. पक्षांच्या प्रचंड यंत्रणेत शेतकरी विभाग हा एक छोटासा अंश असतो. पक्षाच्या कार्यक्रमांत या शेतकरी विभागाला फारच थोडे महत्त्व दिले जाते. देशांत शेतकऱ्यांची लोकसंख्या फार मोठी आहे. दारिद्र्याचा प्रश्न हा बहुतांशी कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. अशा परिस्थितीत ज्या पक्षाची गरिबीचा प्रश्न सोडवण्याची खरीखुरी इच्छा असेल त्या पक्षाचा मध्यवर्ती व सर्वात महत्त्वाचा विभाग शेतकरी विभाग हाच असला पाहिजे. व्यापारी, कारखानदार, कामगार, युवा, विद्यार्थी स्त्रिया इत्यादी घटकांच्या संघटनांना दुय्यम महत्त्व दिले गेले पाहिजे.



प्रत्यक्षात कोणत्याही पक्षाचा शेतकरी विभाग हा अति लहान व अकार्यक्षम असा असतो. व्यापार, उद्योग इ. विभागाकडून पक्षांचे निधी जमा होतात. युवा स्त्रिया विद्यार्थी संघटनांत काम करणे शहरांतील हौशी स्त्री-पुरुषास फारशी दगदग न होता जमते. कामगार संघटना शहरांतील बांधील मते गठ्ठ्याने मिळवण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या. अशा परिस्थिततीत पक्षांतर्गत शेतकरी संघटना ही पक्षश्रेष्ठींच्या दृष्टीने अपरिहार्य अशी अडगळ असते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे आमचा पक्ष लक्ष देत नाही असा आरोप येऊ नये म्हणून शेतकरी विभागाचे नाटक उभारलेले असते. शेतकऱ्यांची बाजू कोणी ठामपणे मांडली तर त्याच्यावर लगेच एकांगी विचार केल्याचा गवगवा होतो. देशातील सर्व वर्गांचा विकास होईल असा सर्वोदयी कार्यक्रम आंखण्याचा आव आणून केवळ मूठभर लोकांची भरभराट होईल. अशा तऱ्हेने योजना आखल्या जातात आणि बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या हिताकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते.

राजकीय पक्षांच्या शेतकरी आघाड्यांची ही स्थिती असावी हे सहज समजण्यासारखे आहे. या सर्व राजकीय पक्षांचा एकमेव हेतू राज्यसत्ता काबीज करता येणे हाच असतो. निवडणुका लढवण्यासाठी प्रचंड प्रमाणावर पैसा खर्चावा लागतो. हा पैसा ज्या कारखानदार, व्यापारी बागायतदारांकडून मिळतो त्यांचे हितसंबंध सांभाळणे हे राजकीय पक्षांना अपरिहार्य आहे.

लोकशाहीच्या नावाखाली निवडणूकशाही देशात अंमल करीत आहे. ज्यांच्या हाती पैसा त्यांच्या हाती प्रचाराची साधने, त्यांच्या हाती गाड्या, वर्तमानपत्रे, इ. सर्व साधने. लोकसभेच्या निवडणुकीसाठी एका उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा नुकतीच एक लक्ष रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. प्रत्यक्षात उमेदवार आणि त्यांचा पक्ष मिळून प्रत्येक मतदारसंघात कमीत कमी दहा लक्ष रुपये खर्च करतात. एवढ्या अफाट खर्चाने निवडणुका जिंकल्यावर ज्यांनी खर्चाला हातभार लावला त्यांची कामे करणे निवडून आलेल्या उमेदवारास भागच असते.

श्री. चरणसिंग यांनी म्हटले आहे, 'निवडणुकीमुळे जनतेला कोणताच फायदा मिळत नाही. एकदा निवडणुका संपल्या की शहरी उद्योगधंद्याचे दलाल सगळ्या राजकारणाचा ताबा घेतात. वर्तमानपत्रे नोकरशाही, व्यापारी व दलाल राज्याचे लगाम हाती घेतात. राज्य कोणत्याही पक्षाचे असो कॉंग्रेस, जनता, कम्युनिस्ट खरे राज्य या दलालांचेच असते.'

अशा या निवडणूकशाहीत भारतातील बहुसंख्य कोरडवाहू शेतकऱ्यांना

राज्यकारभारात खराखुरा भाग घेणे अशक्य होते. ज्याला पोटभर खायला मिळायची वानवा तो निवडणुकीसाठी लक्षावधी रुपये कोठून आणेल? याचाच अर्थ असा की, प्रत्यक्षात राज्य हे शहरी उद्योगधंद्यांचे असते. या उद्योगधंद्यांची भरभराट ही शेतीमालाला वाजवीपेक्षा कमी भाव देण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे निवडणूकशाहीतील राज्यसत्ता ही शेतकऱ्याचे शोषण करणाऱ्या मूठभर लोकांच्याच हाती राहते. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देण्याचे हे राज्यकर्ते कधीही सुखासुखी कबूल करणार नाहीत. शेतीमालाचे भाव वाढले तर कारखानदारीला लागणाऱ्या कच्च्या मालाचे भाव वाढणार नाहीत काय? शेती किफायतशीर झाली तर पोटार्थी शेतकऱ्यांचे शहरांकडे वाहणारे लोंढे थांबून रोजगार शोधणाऱ्या बेकारांची संख्या कमी होणार नाही काय? आणि त्यामुळे मजुरीचे दर आणखी वाढणार नाहीत काय? अन्नधान्ये व भाजीपाला इत्यादींचे भाव वाढल्यास कामगारांत असंतोष वाढून ते मजुरीचे दर वाढवून मिळण्यासाठी झगडा देणार नाहीत काय? मग काय म्हणून शहरी उद्योगधंदेवाले शेतीमालाला योग्य भाव देण्याचा मूर्खपणा करतील ? शेतकऱ्यांना किमान भाव देऊन त्यांचे शोषण करण्यावरच त्यांची भरभराट अवलंबून आहे. तेव्हा त्यांची सर्व साधनसामग्री पणाला लावून ते अशाच मंडळींना निवडून आणतील की जी शेतकऱ्यांना कधीही रास्त भाव देणार नाहीत. शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्याच्या कितीही घोषणा होवोत. त्यासाठी कितीही नाटकी कार्यक्रम आखले जावोत. राज्यकर्त्यांचा हेतू शेती बुडीत धंदा ठेवणे हाच असणार.

शोषित शेतकऱ्यांच्या दु:खाचा व संतापाचा उद्रेक होऊन राजसत्ता डळमळू नये म्हणून त्यांच्या तोंडावर मधून मधून विकास योजनांचे तुकडे फेकण्याचे काम राज्यकर्ते करतात आणि या तुकड्यांच्या लालचीने शेतकरी वर्ग आजपर्यंत या शोषणाविरुद्ध दंड ठोकून उभा राहिलेला नाही. भारतावर शहरी इंडियाचे राज्य अखंड चालू राहिले आहे.

सध्याचे सर्व राजकीय पक्ष हे या अर्थाने इंडियातील पक्ष आहेत. भारताचा असा राजकीय पक्षच नाही. कारण चालू निवडणूकशाहीत भारताला स्थान नाही. याचा अर्थ उघड आहे की, इंडियातील कोणताही राजकीय पक्ष भारतीय शेतकऱ्याचे नेतृत्व करू शकणार नाही.

खरीखुरी शेतकरी संघटना ही यामुळेच सर्व राजकीय पक्षांपासून अलग राहिली पाहिजे. कोणत्याही पक्षाचा आधार घेऊन शेतकरी उभा राहिला तर तो पक्ष सत्तेवर येताच त्याचा विश्वासघात झाल्याशिवाय राहणार नाही.



कोणत्याही पक्षाचा आसरा न घेता संघटना उभी करण्यात एक फार मोठी अडचण येते. आजच्या राजकारणाचे स्वरूप नीट न समजल्यामुळे गावोगावची अनेक चांगली शेतकरी मंडळी भ्रमाने या ना त्या पक्षाच्या मागे गेली आहेत. काही निष्ठावंत मंडळींनी वर्षानुवर्षे पक्षाची कामे केली आहेत. या सर्व मंडळींना शेतकरी संघटनेच्या बाहेर ठेवायचे म्हटले तर संघटना दुबळी राहील. जोर धरणार नाही. संघटना मजबूत बनविण्यासाठी या वाट चुकलेल्या कार्यकर्त्यांना शेतकरी संघटनेकडे ओढून आणले पाहिजे.

श्री शिवछत्रपतींच्या स्वराज्य संस्थापनेच्या काळात याच प्रकारचा प्रश्न होता. अनेक शूर वीर मराठे आदिलशाहीच्या सेवेत मान मरातब मिळवून होते. चुकीच्या स्वामीनिष्ठेच्या कल्पनांनी स्वराज्यांच्या प्रयत्नांचाच विरोध करत होते. यातील एकेका किल्लेदारास सभासदास भेटून त्यांना त्यांच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून दिली. तेव्हाच स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. ज्यांनी नाठाळपणे आदिलशाहीची सेवा चालवून स्वराज्याशी द्रोह केला त्यांचे कठोरपणे पारिपत्यही करावे लागले.

शेतकऱ्यांच्या खऱ्या कळकळीपोटी जे कार्यकर्ते गावोगावी पक्षांची भांडणं झुजवीत बसले आहेत. त्यांना ते शत्रूचीच कामगिरी कशी बजावीत आहेत याची जाणीव करून द्यायला पाहिजे. केवळ सरपंचपदासाठी किंवा दुसऱ्या एखाद्या मानासाठी शेतकऱ्यांशी द्रोह करणाऱ्या स्वार्थांध पुढाऱ्यांना शेतकरी संघटनेच्या कामात समरस होणे शक्य होणार नाही. या पुढील काळातही मंडळी आपोआपच बाजूला पडत जातील. आज पक्षीय काम करणाऱ्यांमध्ये ज्यांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल खरीखुरी कळकळ असेल ते आपोआपच संघटनेच्या कामात सामील होऊन जातील.

संघटनेच्या साधनाच्या विचारात, पहिली स्पष्ट गोष्ट म्हणजे खरीखुरी शेतकरी संघटना ही आजच्या राजकीय पक्षांपासून संपूर्णपणे अलिप्त असणे आवश्यक आहे.

नऊ

पक्षांपासून दूर राहिल्यामुळे शेतकऱ्यांचे अंतिम ध्येय साध्य होईल हे खरे; परंतु त्यामुळे संघटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल हेही तितकेच खरे.

सर्व राजकीय पक्षांजवळ अफाट साधन संपत्ती असते. निवडणुकांच्या वेळी सर्व पक्ष कोट्यवधी रुपये जमा करतात. यातील बहुतेक पैसा हा देशांतील

भांडवलदारांकडून जमा केलेला असतो. जवळजवळ सगळ्याच पक्षांना परदेशातूनही फार मोठ्या प्रमाणावर मदत मिळते.

निवडणुकीखेरीज इतर वेळीसुद्धा प्रत्येक पक्षाकडे खूप मोठ्या प्रमाणावर निधी गोळा होत असतो.

हा निधी म्हणजे भांडवलदारांनी राजकीय पक्षांना दिलेली लाचच असते.

या निधीच्या साहाय्याने राजकीय पक्ष जागोजाग कचेऱ्या स्थापन करतात. वर्तमानपत्रे चालू करतात किंवा चालू वर्तमानपत्रे आपल्या ताब्यात आणतात. काही वजनदार व्यक्तींना मानाची पदे वा इतर फायदे देऊन त्यांना वश करून घेता येते.

थोडक्यात म्हणजे प्रचाराच्या दृष्टीने राजकीय पक्षांची स्थिती अगदी हेवा करण्यासारखी असते.

एखाद्या आमदाराने, खासदाराने वा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने कुठे एखाद्या समारंभाच्या निमित्ताने जे काही भाषण केले तरी त्याला खूपच प्रसिद्धी मिळते. त्यांच्या भाषणांना, घोषणांना काहीही अर्थ नसला तरी वर्तमानपत्रे त्याला वीत- दीड वीत जागा देतात.

राज्याचे मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान दररोज अनेक पायाभरणी वा उद्‌घाटन समारंभास हजर राहतात. वेळ मारून नेण्यासाठी काहीतरी बोलतात. ते तरी काय करतील बिचारे, दिवसातून दहा वेळा त्यांनी तरी नवीन नवीन विचार कोठून आणावेत?

या त्यांच्या भाषणांनासुद्धा वर्तमानपत्रातच नव्हे तर आकाशवाणी, दूरदर्शनवरसुद्धा भडक प्रसिद्धी मिळते.

पक्षांपासून दूर राहिल्यामुळे शेतकरी संघटनेला या सर्व साधनांचा फायदा सोडावा लागेल हे खरे; पण या अडचणींतून मार्ग काढण्यातच त्यांचे खरेखुरे हित आहे.

महात्मा गांधींनी म्हटले होते की, ''चांगल्या कामाला पैशांचा तुटवडा कधीही पडत नाही.'' शेतकरी संघटनेच्या कामाला साधनांचा तुटवडा ही कधीही खरी अडचण असणार नाही.

या उलट शेतकरी संघटनांकडे मुलबल निधी जमा झाले तर राजकीय पक्षांप्रमाणे आपल्या संघटनेतही स्वार्थसाधू, नीतिभ्रष्ट, हौशे, नवशे व गवशे जमा होतील व एखाद्या समृद्ध सहकारी संस्थेप्रमाणे हे लोक शेतकरी संघटनेची वाताहत लावतील.



जोपर्यंत आपण सर्व शेतकरी संघटनेसाठी कष्ट करतो, प्रसंगी खिशाला झीज सोसूनही धडपड करतो तोपर्यंत आपल्या संघटनेला ही स्वार्थी पुढाऱ्यांची कीड लागणार नाही.

शेतकरी संघटनेने निधी जमवले की ही कीड संघटनेलाही लागल्याखेरीज राहणार नाही.

शेतकरी संघटनेकडे पैसे नसले तरीही अफाट साधन संपत्ती आहे. ही साधन संपत्ती इतकी प्रचंड आहे की तिच्याशी तुलना करणे कुणालाच शक्य होणार नाही.

ही साधन संपत्ती म्हणजे जवळ जवळ ५० कोटी कोरडवाहू शेतकरी समाज. ५० कोटी माणसांनी एकत्र येऊन काम करावयाचे ठरले तर त्यांना अशक्य काय आहे?

प्रभू रामचंद्रांनी लंकेवर चालून जाण्यासाठी सेतू बांधायला काढला. त्या बांधकामासाठी त्यांच्याकडे वनवासात कुठला आला पैसा? त्यांनी नकाशे केले नाहीत, अंदाजपत्रके केली नाहीत, मंजुऱ्या घेतल्या नाहीत. त्यांच्या प्रचंड वानरसेनेतील प्रत्येकाने भराभर डोक्यावर दगड उचलून समुद्रात टाकावयास सुरुवात केली आणि हां हां म्हणता समुद्रावरचा पूल तयार झाला. लंका सर झाली.

शेतकरी संघटनेचा जो विचार आहे जे तत्त्वज्ञान आहे ते जर खरोखर शेतकऱ्यांच्या हिताचे असेल, भारतातील कोरडवाहू शेतकऱ्यांची परिस्थिती जर खरोखर हलाखीची असेल, संघटना हा त्यावरचा जर रामबाण उपाय असेल तर आज ना उद्या सर्व कोरडवाहू शेतकरी समाज शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली संघटित होऊन लढा करण्यास उभा राहील.

लक्षावधी शेतकरी उपासमारीमुळे निर्वासित होऊन शहरातील झोपडपट्ट्यांत जगत आहेत हे खरे नाही काय?

शहरातील झोपडपट्ट्यातील गलिच्छपणा, घाण, दुर्गंधी, बकालपणा, अठरापगड जाती-धर्माचा बुजबुजाट आणि दारुच्या गुत्त्यांचा गोंगाट हे सर्व परवडले; पण शेतावरील उपासमार नको याच कल्पनेने ते तेथे आयुष्य काढीत नाहीत काय?

शेतीचा धंदा कसाबसा चालवून खेड्यातील असंख्य शेतकऱ्यांना झाडपाला खाऊन राहावे लागते, मुला-माणसांना अंगभर कपडा देता येत नाही आणि पडक्या गळक्या घरातील आयुष्य कंठावे लागते हे खरे नाही काय? दिवसभर

राब राब राबून आणि घाम गाळूनही आयुष्यात सुखाचा एक दिवस नाही अशी त्यांची स्थिती नाही काय? चांगली पिके घेऊन धनधान्यांची मुबलकता झाली तर हेच सरकार शेतकऱ्यांना त्यांची पर्वा न करता त्यांना वाऱ्यावर सोडून देत नाही काय?

हंगामी पाऊस आणि त्याची अनिश्चितता हा काही शेतकऱ्यांचा दोष नाही. त्याची किंमत राष्ट्रातल्या सर्वजणांनी सोसावयास नको काय? अशा सर्व बाजूंनी घेरलेल्या, पिडलेल्या शेतकऱ्यांना एकजूट करून संघटित होण्याखेरीज काही मार्ग नाही काय? तर मग ही सत्य परिस्थिती शहरी स्वार्थसाधूंनी चालवलेल्या प्रचाराचा भेद करून एक दिवस ५० कोटी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याखेरीज राहणार नाही.

आज मावळा पेटला, उद्या घाटावरचा शेतकरी उठेल, परवा कोकणी, विदर्भी, मराठवाड्यातील किसान उठेल. लवकरच शेतकऱ्यांची पहाट येत आहे. शेतकरी जागा होणार आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या कष्टामुळे प्रचारामुळे शेतकरी जागा होणार नाही. त्याची जागा होण्याची वेळ आली आहे म्हणून तो उठणार आहे. आम्ही कोंबड्याप्रमाणे आरवून नव्या पहाटेची ललकारी देत आहोत.

वसंत ऋतू आला की कोकीळ येतोच तो काही वसंत ऋतू आणत नाही, का तयार करत नाही. वसंत ऋतू येण्याची वेळ झाली की, निसर्गात जे काही बदल घडू लागतात त्यातला एक कोकीळ पक्षाचे आगमन आहे.

देशभर स्वयंस्फूर्तपणे लहान मोठ्या प्रमाणात चुकत माकत का होईना शेतकरी संघटना स्थापन होत आहेत. यामागे काहीही मध्यवर्ती योजना नाही. ही एक ऐतिहासिक गरज आहे. शेतकऱ्यांची पहाट ही अटळ गोष्ट आहे.

तर नवीन जाणिवेने भारलेल्या ५० कोटी शेतकऱ्यांची ताकद ही आपली साधन संपत्ती आहे. हे कुबेर भांडार आपल्यासमोर उघडले पडले आहे. हात घालून वाटेल तितके न्यावे, उचलावे. साधनांची काहीच कमतरता नाही.

संघटनेची ठिणगी पाडण्यासाठी काही किरकोळ आर्थिक गरज पडते तेवढी कशीही निभावून नेता येते. प्रत्येक शेतकऱ्याने संघटनेचा सभासद म्हणून एक दोन रुपये दिले तरी तेवढी गरज भागून जाते.

प्रचाराची साधनेसुद्धा अगदी थोड्या खर्चात उभी करता येतात. बातमी येण्यासारखे काहीतरी घडवून आणा की, वर्तमानपत्रवाले धावत येतील तुमच्या बातम्या घ्यायला. भामनहरच्या शेतकऱ्यांनी चालू केलेल्या मोर्चाला व



साराबंदीच्या चळवळीला महाराष्ट्रभर अमाप प्रसिद्धी मिळाली. एक पैसाही न खर्चता. सरकारने शेतकरी चळवळीच्या बातम्यावर बंदी घातली तरीसुद्धा या बातम्या लपून राहावयाच्या नाहीत. एकाच्या मुखातून दुसऱ्यांच्या कानात अशा या बातम्या पसरत राहतील.

सारांश म्हणजे साधनांची कमतरता ही शेतकरी संघटनेच्या फायद्याचा मुद्दा आहे. राजकीय जीवनातील कीड आपल्याकडे त्यामुळे उडून येणार नाही. हे आपले मोठे भाग्य आहे. आपली खरी साधन संपत्ती आहे दलित पीडित असा ५० कोटी कोरडवाहू शेतकरी आणि संघटितपणे लढा उभा करण्याची त्याची ऐतिहासिक गरज.

*(साप्ताहिक वारकरी दि. १० नोव्हेंबर १९७९ ते दि. १६ फेब्रुवारी १९८० मधून साभार)*

■